॥ कोबातीर्थमंडन श्री महावीरस्वामिने नमः ॥

॥ अनंतलब्धिनिधान श्री गौतमस्वामिने नमः ॥ ॥ गणधर भगवंत श्री सुधर्मास्वामिने नमः ॥

॥ योगनिष्ठ आचार्य श्रीमद् बुद्धिसागरसूरीश्वरेभ्यो नमः ॥ ॥ चारित्रचूडामणि आचार्य श्रीमद् कैलाससागरसूरीश्वरेभ्यो नमः ॥

# आचार्य श्री कैलाससागरसूरि ज्ञानमंदिर

## पुनितप्रेरणा व आशीर्वाद

## राष्ट्रसंत श्रुतोद्धारक आचार्यदेव श्रीमत् पद्मसागरसूरीश्वरजी म. सा.

## जैन मुद्रित ग्रंथ स्केनिंग प्रकल्प

ग्रंथांक : १

**श्री महावीर जैन आराधना केन्द्र**

आचार्यश्री कैलाससागरसूरि ज्ञानमंदिर
कोबा, गांधीनगर-श्री महावीर जैन आराधना केन्द्र
आचार्यश्री कैलाससागरसूरि ज्ञानमंदिर
कोबा, गांधीनगर-३८२००७ (गुजरात)
(079) 23276252, 23276204
फेक्स : 23276249
Websiet : www.kobatirth.org
Email : Kendra@kobatirth.org

**शहर शाखा**

आचार्यश्री कैलाससागरसूरि ज्ञानमंदिर
शहर शाखा
आचार्यश्री कैलाससागरसूरि ज्ञानमंदिर
त्रण बंगला, टोलकनगर
परिवार डाइनिंग हॉल की गली में
पालडी, अहमदाबाद – ३८०००७
(079) 26582355

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थसुभाषितानि

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीमहाभारतसुभाषितानि

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

## सार्थश्रीमहाभारतसुभाषितानि

संपादक–विष्णु विनायक परांजपे, पेण

भाषांतरकार–चिंतामण मोरेश्वर परांजपे,
बी. ए., एल्‌एल्. बी.

( १०३२ सुभाषितें, किंमत १२ आणे )

---

## सार्थश्रीरामायणसुभाषितानि

भाषांतरकार–भालचंद्र शंकरशास्त्री देवस्थळी

( ५०२ सुभाषितें, किंमत ८ आणे )

---

## सार्थश्रीयोगवासिष्ठसुभाषितानि

भाषांतरकार–विष्णु विनायक परांजपे

( ५०८ सुभाषितें, किंमत ८ आणे )

---

## सार्थश्रीभागवतसुभाषितानि

भाषांतरकार–विष्णु विनायक परांजपे

( ११७ सुभाषितें, किंमत ३ आणे )

---

## सार्थश्रीरामरक्षा

( किंमत १ आणा )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीमहाभारतसुभाषितानि

संपादक

**विष्णु विनायक परांजपे, पेण**

भाषांतरकार

**चिंतामण मोरेश्वर परांजपे,**

बी. ए., एल्‌एल्. बी.

प्रकाशक

**केशव भिकाजी ढवळे, गिरगांव-मुंबई**

आवृत्ति दुसरी

आषाढ शके १८५२ सन १९३०

किंमत १२ आणे

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मुद्रकः—रा. रा. **रघुनाथ रामचंद्र बखले**, मुंबईवैभव प्रेस,
सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, गिरगांव, मुंबई.

प्रकाशक—**केशव भिकाजी ढवळे**, ( रामचंद्र बिल्डिंग )
गिरगांव, मुंबई.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# प्रस्तावना

लोकांचें अज्ञान नाहींसें होऊन, त्यांना ज्ञान प्राप्त व्हावें, या हेतूनें श्रीभगवान् व्यास महर्षींनीं महाभारत ग्रंथ निर्माण केला. यामध्यें चतुर्विध पुरुषार्थांचें प्रतिपादन पूर्णपणें केलें असून आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना कर्तव्याचा मार्ग स्पष्टपणें दाखविला आहे, त्याप्रमाणेंच या ग्रंथामध्यें आर्यसंस्कृतिही सांठविली आहे. एक लक्ष श्लोकांचा एवढा मोठा विस्तृत ग्रंथ संस्कृत भाषेवांचून इतर कोणत्याही भाषेंत नाहीं. महाभारताची भाषा समजण्याला सोपी असून संस्कृत भाषेचें उत्तम जिवंत स्वरूप या ग्रंथामध्यें चांगल्या प्रकारचें आढळतें.

या महाभारतांतील, सर्व लोकांना उपयोगी पडणारीं, सुबोध, निवडक १०३२ संस्कृत सुभाषित वचनें प्रस्तुत पुस्तकांत घेतलीं आहेत. हीं ओजस्वी वचनें विद्यार्थ्यांनीं तोंडपाठ केल्यास त्यांचें संस्कृत भाषेचें ज्ञान वाढून त्यांना चांगले स्फूर्तिदायक विचार समजतील आणि पुढील आयुष्यांत व्यवहारांतील अनेक प्रसंगीं योग्य रीतीनें वागण्यास ते समर्थ होतील. श्रोत्यांच्या मनावर महाभारतांतील वचनांचा ठसा अधिक उमटतो यासाठीं प्रतिपादनाचे वेळीं हरिदास, पुराणिक यांना या सिद्धान्तरूप वचनांचा विशेष उपयोग होईल. वक्ते व लेखक यांनाही हीं मार्मिक वचनें

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



वरींच उपयोगी पडतील. तसेंच संस्कृत भाषेची अभिरुचि असणाऱ्या सामान्य वाचकांनाही या वचनांचा उपयोग होईल.

या पुस्तकांतील वचनें महाभारताच्या मुंबईप्रतींतून घेतलीं आहेत. वचनें वर्णक्रमानें दिलीं असून शेवटीं मुख्य विषयांची सूची जोडिली आहे. वचनांच्या डावीकडे क्रमांक घातले आहेत आणि उजवीकडे स्थलनिर्देश केला आहे. स्थलनिर्देशांतील डावीकडून पहिला अंक पर्वाचा, दुसरा अध्यायाचा व तिसरा श्लोकाचा समजावा. ज्या वचनांत जो विषय आला, त्या वचनाचा क्रमांक त्या विषयापुढें सूचीमध्यें घातला आहे. सूचीमध्यें एकाच अर्थी आलेले अनेक शब्द त्या त्या ठिकाणीं दिले असून पर्याय शब्द कंसांत घातले आहेत.

श्रीमहाभारतांतील ओजस्वी वचनांचा परिचय सर्वांना सुलभतेनें होण्याला हें पुस्तक उपयोगी पडो, अशी भगवान् श्रीकृष्णपरमात्म्याजवळ प्रार्थना करून प्रस्तावना संपवितों.

भीष्माष्टमी, शके १८५० — **विष्णु विनायक परांजपे**
राहणार पेण, जिल्हा कुलाबा

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# निवेदन

श्रीमहाभारत, श्रीरामायण, श्रीयोगवासिष्ठ व श्रीभागवत या राष्ट्रीय व धार्मिक ग्रंथांतील निवडक सुभाषितांचीं मराठी भाषांतरासह चार पुस्तकें प्रकाशित केलीं. हीं पुस्तकें सर्व लोकांना मान्य झाल्यामुळें पहिली आवृत्ति एका वर्षांतच खपून गेली. आतां ही दुसरी आवृत्ति काढिली आहे.

वचन कोणीं कोणाला सांगितलें, हें समजण्याची विशेष अवश्यकता ज्या श्लोकांत दिसून येते, अशा श्लोकांचा अर्थ देतांना आरंभीं कंसांत अवतरण दिलें आहे. अशा अवतरणांची संख्या या आवृत्तींत वाढविली आहे.

धार्मिक शिक्षण देण्याच्या कामीं हीं चारहि सुभाषितांचीं पुस्तकें बरींच उपयोगीं पडतात, असें पुष्कळ पालकांच्या व शिक्षकांच्या प्रत्ययास आलें आहे. तरी सर्व जनतेला या पुस्तकांचा उपयोग होवो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

आषाढ, शके १८५२ प्रकाशक

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# श्रीमहाभारतांतील १८ पर्वांचीं नांवें

१ आदिपर्व
२ सभापर्व
३ वनपर्व
४ विराटपर्व
५ उद्योगपर्व
६ भीष्मपर्व
७ द्रोणपर्व
८ कर्णपर्व
९ शल्यपर्व
१० सौप्तिकपर्व
११ स्त्रीपर्व
१२ शान्तिपर्व
१३ अनुशासनपर्व
१४ अश्वमेधपर्व
१५ आश्रमवासिकपर्व
१६ मौसलपर्व
१७ महाप्रास्थानिकपर्व
१८ स्वर्गारोहणपर्व

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीमहाभारतसुभाषितानि

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥

१ अकाले कृत्यमारब्धं कर्तुर्नार्थाय कल्पते । प. अ. श्लो.
तदेव काल आरब्धं महतेऽर्थाय कल्पते ॥१२।१३८।९५

कोणतेंहि कार्य भलत्याच वेळीं आरंभिलें असतां त्यापासून कर्त्याचें मनोगत सिद्ध होत नाहीं. तेंच योग्य वेळीं केलें तर तेणेंकरून मोठा लाभ होतो.

२ अकृत्वा कर्म यो लोके फलं विन्दति धिष्ठितः ।
स तु वक्तव्यतां याति द्वेष्यो भवति भूयशः ॥ १०।२।१७

कांहीं परिश्रम न करतां अधिकारारूढ आहे एवढ्यामुळेंच अधिक लाभ घेतो, त्याची जगांत बहुत निंदा होते आणि तो दुसऱ्यांच्या द्वेषाला पात्र होतो.

३ अकृत्वा मानुषं कर्म यो दैवमनुवर्तते ।
वृथा श्राम्यति संप्राप्य पतिं क्लीबमिवाङ्गना ॥ १३।६।२०

कोणत्याही कार्यासाठीं लोकप्रसिद्ध योग्य उपाय न करतां जो केवळ दैविक उपायांचाच अवलंब करितो त्याला, पौरुषहीन पतीशीं गांठ पडलेल्या स्त्रीप्रमाणें, वृथा क्लेश मात्र होतात. तात्पर्य दोन्ही केलीं पाहिजेत.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४ अगोप्तारश्च राजानो बलिषड्भागतस्कराः ।**
**समर्थाश्चाप्यदातारस्ते वै निरयगामिनः ॥ १३।२३।८०**

प्रजेचें रक्षण न करतां तिच्यापासून उत्पन्नाचा सहावा हिस्सा कर मात्र घेणारे राजे व सामर्थ्य असून दान न करणारे खचित नरकास जातात.

**५ अग्निस्तेजो महल्लोके गूढस्तिष्ठति दारुषु ।**
**न चोपयुङ्क्ते तद्दारु यावन्नोद्दीप्यते परैः ॥ ५।३७।६०**

पृथ्वीवरील अग्निरूप प्रचंड तेज लाकडांचे ठिकाणीं गुप्तरूपानें वसत असतें, पण जोंपर्यंत तें दुसऱ्यांनीं [ घर्षणादिकांच्या योगानें ] चेतविलेलें नसतें तोंपर्यंत तें लाकूड त्याचा उपयोग करीत नाहीं. ( कांहीं पुरुषांचे अंगीं लोकोत्तर शौर्यादिगुण असतात पण जोंपर्यंत त्यांस दुसऱ्यांकडून अत्यंत त्रास पोंचला नाहीं किंवा प्रोत्साहन मिळालें नाहीं तोंपर्यंत ते व्यक्त होत नाहींत. )

**६ अग्नौ प्रास्तं तु पुरुषं कर्मान्वेति स्वयं कृतम् ।**
**तस्मात्तु पुरुषो यत्नाद्धर्मं संचिनुयाच्छनैः ॥ ५।४०।१८**

[ मरणोत्तर ] अग्नींत टाकून दिलेल्या मनुष्याबरोबर त्यानें केलेलें [ बरें वाईट ] कर्म तेवढें येत असतें. यासाठींच मनुष्यानें हळूहळू पण यत्नपूर्वक धर्माचा ( पुण्याचा ) संचय केला पाहिजे.

**७ अग्न्याधानेन यज्ञेन काषायेण जटाजिनैः ।**
**लोकान्विश्वासयित्वैव ततो लुम्पेद्यथा वृकः ॥ १।१४०।१९**

अग्निहोत्र ठेवून, यज्ञ करून, भगवीं वस्त्रें परिधान करून, जटा वाढवून, मृगाजिन पांघरून, आधीं लोकांचा विश्वास संपादन करावा; आणि मग लांडग्याप्रमाणें झडप घालून त्यांचा नाश करावा.

**८ अङ्कुशं शौचमित्याहुरर्थानामुपधारणे ।**
**आनाम्य फलितां शाखां पक्वं पक्वं प्रशातयेत् ॥१।१४०।२०**

फळांनीं भरलेली झाडाची खांदी [ आकडीनें ] वांकवून तिच्यावरील पिकलेलीं उत्तम फळें तोडून घ्यावीं, त्याप्रमाणें इच्छित वस्तू प्राप्त करून घेण्याच्या कामीं धर्माच्या बाह्य अवडंबराचा अंकुशासारखा उपयोग होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९ अचिन्त्याः खलु ये भावा न तांस्तर्केण साधयेत् ।
प्रकृतिभ्यः परं यत्तु तदचिन्त्यस्य लक्षणम् ॥ ६।५।१२**

मनाला अचिंत्य असलेल्या अशा ज्या गोष्टी त्यांचा निर्णय केवळ युक्तिवादानें होणें शक्य नाहीं. प्रकृतीच्या--म्हणजे पंचमहाभूतें, मन, बुद्धि व अहंकार या मूलतत्त्वांच्या—पलीकडे असलेल्या वस्तूला ( आत्मतत्त्वाला ) अचिंत्य असें म्हणतात.

**१० अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ६।२८।४०**

अज्ञ असून श्रद्धा न ठेवणारा असा संशयखोर मनुष्य सर्वथा नाश पावतो, अशा संशयात्म्याला ना इहलोक, ना परलोक, ना सुख.

**११ अज्ञानतिमिरान्धस्य लोकस्य तु विचेष्टतः ।
ज्ञानाञ्जनशलाकाभिर्नेत्रोन्मीलनकारकम् ॥ १।१।८४**

अज्ञानांधकारानें डोळ्यांवर झांपड येऊन धडपडणाऱ्या लोकांच्या डोळ्यांत ज्ञानरूपी अंजन घालून त्यांना दिव्य दृष्टि देणारें [ असें हें महाभारत आहे. ]

**१२ अज्ञानेनावृतो लोकः ॥ ३।३१३।८२**

लोक अज्ञानांत गुरफटलेले आहेत.

**१३ अञ्जलिः शपथः सान्त्वं शिरसा पादवन्दनम् ।
आशाकरणमित्येवं कर्तव्यं भूतिमिच्छता ॥ १।१४०।६७**

हात जोडणें, शपथ घेणें, मधुर भाषण करणें, पायांवर डोकें ठेवणें, लालूच दाखविणें या सर्व गोष्टी उत्कर्षेच्छु पुरुषानें केल्या पाहिजेत.

**१४ अतिक्रान्तं हि यत्कार्यं पश्चाच्चिन्तयते नरः ।
तच्चास्य न भवेत्कार्यं चिन्तया च विनश्यति ॥ ८।३१।२९**

गोष्ट होऊन गेल्यानंतर तिच्याविषयीं जो मागाहून चिंता करीत बसतो त्याचें तें कार्य तर होत नाहींच, पण चिंतेनें नाश मात्र होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१५ अति धर्माद्बलं मन्ये बलाद्धर्मः प्रवर्तते ।**
**बले प्रतिष्ठितो धर्मो धरण्यामिव जङ्गमम् १२।१३४।६**

बल हें धर्मापेक्षां श्रेष्ठ आहे. कारण, बलापासूनच धर्माची प्रवृत्ति होते. सर्व जंगम पदार्थ ज्याप्रमाणें पृथ्वीच्या आधारानें राहतांत, त्याप्रमाणें बलाच्या आधारानेंच धर्म राहतो.

**१६ अतियोगमयोगं च श्रेयसोऽर्थी परित्यजेत् ॥१२।२८७।२४**

कल्याणाची इच्छा करणाऱ्या मनुष्यानें [ आहारविहारादिकांचें ] अतिशय सेवन करणें व मुळींच सेवन न करणें या दोहोंचाहि सर्वथा त्याग करावा.

**१७ अतीतेष्वनपेक्षा ये प्राप्तेष्वर्थेषु निर्ममाः ।**
**शौचमेव परं तेषां येषां नोत्पद्यते स्पृहा ॥ १३।१०८।१०**

द्रव्य नष्ट झालें असतां जे शोक करीत नाहींत, व प्राप्त झालें असतां त्याच्या ठिकाणीं जे आसक्त होत नाहींत, आणि ज्यांच्या अंतःकरणांत लोभ उत्पन्नच होत नाहीं ते अत्यंत शुचिभूतच होत.

**१८ अतो हास्यतरं लोके किंचिदन्यन्न विद्यते ।**
**यत्र दुर्जनमित्याह दुर्जनः सज्जनं स्वयम् ॥ १।७४।९५**

स्वतः दुर्जन असलेल्यानें उलट सज्जनालाच दुर्जन म्हणावें, यापेक्षां जगांत अधिक हास्यास्पद गोष्ट दुसरी कोणतीच नसेल !

**१९ अथवा जायमानस्य यच्छीलमनुजायते ।**
**श्रूयते तन्महाराज नामृतस्यापसर्पति ॥ ३।८।११**

( व्यास महर्षि धृतराष्ट्र राजाला म्हणतात ) हे राजा, प्राणी जन्मतःच जो स्वभाव बरोबर घेऊन येतो, तो मरेपर्यंत त्याला सोडून जात नाहीं असें ऐकण्यांत येतें.

**२० अथवा वसतो राजन्वने वन्येन जीवतः ।**
**द्रव्येषु यस्य ममता मृत्योरास्ये स वर्तते ॥ १२।१३।१०**

(सहदेव धर्मराजाला म्हणतो) हे राजा, वनांत राहून कंदमूळांवर उपजीविका करीत असतांनाहि ऐहिक वस्तूंविषयीं ज्याला ममत्वबुद्धि वाटते, तो खरोखर मृत्यूच्या जबड्यांत पडला आहे असें समजावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२१ अदत्तस्यानुपादानं दानमध्ययनं तपः ।**
**अहिंसा सत्यमक्रोध इज्या धर्मस्य लक्षणम् ॥१२।३६।१०**

कोणी देईल तेवढ्याचाच स्वीकार करणें, दान, अध्ययन, तप, अहिंसा, सत्य भाषण, क्रोध नसणें आणि यज्ञ करणें हीं धर्माचीं लक्षणें होत.

**२२ अद्रोहसमयं कृत्वा चिच्छेद नमुचेः शिरः ।**
**शक्रः, साभिमता तस्य रिपौ वृत्तिः सनातनी ॥२।५५।१३**

( दुर्योधन शकुनीला म्हणाला. ) ' मी तुझ्याशीं द्रोह करणार नाहीं ' अशी प्रतिज्ञा करून इंद्रानें नमुचि दैत्याचा शिरच्छेद केला. शत्रूशीं वागण्याची ही त्याची रीति पूर्वापार चालत आलेली असून सर्वसंमत आहे.

**२३ अद्रोहः सर्वभूतेषु कर्मणा मनसा गिरा ।**
**अनुग्रहश्च दानं च शीलमेतत्प्रशस्यते ॥ १२।१२४।६६**

कृतीनें, मनानें व वाणीनें कोणत्याहि प्राण्यास त्रास न देणें, परोपकार करणें आणि दान करणें या प्रकाराचें शील प्रशस्त होय.

**२४ अद्रोहेणैव भूतानामल्पद्रोहेण वा पुनः ।**
**या वृत्तिः स परो धर्मस्तेन जीवामि जाजले ॥ १२।२६२।६**

( तुलाधार वैश्य जाजलि ब्राह्मणाला म्हणतो. ) हे जाजले, कोणत्याहि प्राण्यास मुळींच उपद्रव न देतां, अथवा [ प्रसंगच पडल्यास ] अगदीं थोडी पीडा देऊन आपला निर्वाह करणें हा श्रेष्ठ प्रकारचा धर्म होय, त्याचेंच अवलंबन करून मी रहात असतों.

**२५ अधनं दुर्बलं प्राहुर्धनेन बलवान्भवेत् ।**
**सर्वं धनवता प्राप्यं सर्वं तरति कोशवान् ॥१२।१३०।४९**

निर्धनाला दुबळा समजतात, धनानें मनुष्य बलसंपन्न होतो. सर्व कांहीं धनसंपन्न असलेल्याला प्राप्त करून घेतां येतें. द्रव्याचा खजिना ज्याच्यापाशीं आहे तो सर्व [ आपत्ति ] तरून जातो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२६ अधनस्य मृतं श्रेयः ।। ६।९६।६**

निर्धन मनुष्याला मरण श्रेयस्कर !

**२७ अधनाद्धि निवर्तन्ते ज्ञातयः सुहृदो द्विजाः ।**
**अपुष्पादफलाद्वृक्षाद्यथा कृष्ण पतत्रिणः ।। ५।७२।२०**

ज्याप्रमाणें पक्षी पुष्परहित व फलरहित वृक्षाचा त्याग करतात त्याप्रमाणें दरिद्री मनुष्याचे नातलग व इष्टमित्र त्याला सोडून जातात.

**२८ अधनेनार्थकामेन नार्थः शक्यो विधित्सितुम् ।**
**अर्थैरर्था निबध्यन्ते गजैरिव महागजाः ॥ १२।८।२०**

धनाची इच्छा करणाऱ्याला, आरंभी थोडेंतरी धन जवळ असल्याशिवाय, धन मिळणें शक्य नाहीं, हत्ती पकडण्यास जशी हत्तीचीच योजना करावी लागते, तसें द्रव्यानेंच द्रव्य मिळवावें लागतें.

**२९ अधर्मः क्षत्रियस्यैष यच्छय्यामरणं भवेत् ।। १२।९७।२३**

अंथरुणावर पडून मरणें हा क्षत्रियाचा धर्म नव्हे.

**३० अधर्मरूपो धर्मो हि कश्चिदस्ति नराधिप ।**
**धर्मश्चाधर्मरूपोऽस्ति तच्च ज्ञेयं विपश्चिता ।। १२।३३।३२**

( व्यास महर्षि युधिष्ठिराला सांगतात. ) हे राजा, केव्हां केव्हां धर्माला अधर्माचें रूप येतें, व अधर्माला धर्माचें स्वरूप येत असतें. हें समजून घेणें शहाण्या पुरुषाचें काम आहे.

**३१ अधर्मो धर्मतां याति स्वामी चेद्धार्मिको भवेत् ।**
**स्वामिनो गुणदोषाभ्यां भृत्याः स्युर्नात्र संशयः ।।११।८।३३**

मालक जर धर्मनिष्ठ असला व सेवक अधार्मिक असला तरीसुद्धां धार्मिक बनतो. धन्याच्या आंगच्या गुणदोषांप्रमाणें चाकरांच्या ठिकाणीं गुणदोष उत्पन्न होतात यांत संशय नाहीं.

**३२ अध्रुवा सर्वमर्त्येषु श्रीरुपालक्ष्यते भृशम् ।। ९।६५।२०**

सर्व मनुष्यांचें ऐश्वर्य पूर्ण अशाश्वत आहे असें दिसून येतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३३ अनन्तं बत मे वित्तं यस्य मे नास्ति किंचन ।**
**मिथिलायां प्रदीप्तायां न मे दह्यति किंचन ॥ १२।१७।१९**

( जनकराजा म्हणतो. ) खरोखर माझें ऐश्वर्य अनंत ( अविनाशि ) आहे; कारण माझी कशावरहि ममता नाहीं. साऱ्या मिथिला नगरीला आग लागली तरी त्यांत माझें असें कांहींहि दग्ध व्हावयाचें नाहीं.

**३४ अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ ६।३३।२२**

[ भगवान् श्रीकृष्ण सांगतात ] जे लोक अनन्यनिष्ठेनें माझें चिंतन करून मला भजतात, अशा नित्य माझी भक्ति करणाऱ्या लोकांचा योगक्षेम मी चालवीत असतों.

**३५ अनर्हते यद्ददाति न ददाति यदर्हते ।**
**अर्हानर्हापरिज्ञानाद्दानधर्मोऽपि दुष्करः ॥ १२।२०।९**

दानाला पात्र कोण व अपात्र कोण हें न समजल्यानें कोणी अपात्रीं दान करतो आणि सत्पात्रीं करीत नाहीं. तस्मात् दानरूप धर्म सुद्धां मोठा कठीण आहे.

**३६ अनागतविधाता च प्रत्युत्पन्नमतिश्च यः ।**
**द्वावेव सुखमेधेते दीर्घसूत्री विनश्यति ॥ १२।१३७।१**

पुढें येणाऱ्या संकटाची आधीं तरतूद करून ठेवणारा, व प्रसंग पडतांच ताबडतोब ज्याला युक्ति सुचते तो, अशा दोन प्रकारच्या मनुष्यांनाच सुखाचा लाभ होत असतो. दीर्घसूत्री सर्वथा नाश पावतो.

**३७ अनायुष्यं दिवा स्वप्नं तथाभ्युदितशायिता॥ १३।१०४।१३९**

दिवसा झोंप घेणें आणि सूर्योदयाचेवेळीं निजणें हीं आयुष्याची हानि करणारीं आहेत.

**३८ अनारम्भात्तु कार्याणां नार्थः संपद्यते क्वचित् ॥१०।२।३४**

केव्हांहि कार्याला आरंभ केल्याशिवाय कोणतीहि गोष्ट साध्य होत नसते.

**३९ अनार्याचरितं तात परस्वस्पृहणं भृशम् ॥ २।५४।६**

( धृतराष्ट्र दुर्योधनाला म्हणतो. ) बाबा, परद्रव्याचा अभिलाष धरणें हें केव्हांहि आर्य मनुष्याचें ब्रीद नव्हे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४० अनाहूतः प्रविशति अपृष्टो बहु भाषते ।**
**अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधमः ॥ ५।३३।३६**

मूर्ख मनुष्य कोणी न बोलावितांच प्रवेश करतो, विचारल्यावांचून बडबडत सुटतो, आणि विश्वासास पात्र नसलेल्यावर विश्वास ठेवतो.

**४१ अनित्यं यौवनं रूपं जीवितं द्रव्यसंचयः ।**
**आरोग्यं प्रियसंवासो गृध्येत्तत्र न पण्डितः ॥१२।३३०।१४**

तारुण्य, रूप, जीवित, द्रव्यसंचय, आरोग्य व प्रियजनांचा सहवास हीं सर्व अशाश्वत आहेत. शहाण्या पुरुषानें त्यांचा लोभ धरूं नये.

**४२ अनित्यचित्तः पुरुषस्तस्मिन्को जातु विश्वसेत् ।**
**तस्मात्प्रधानं यत्कार्यं प्रत्यक्षं तत्समाचरेत् ॥१२।८०।९**

मनुष्याचें मन फार चंचल आहे. त्याच्यावर कोण विश्वास ठेवील ? ( कोणाची बुद्धि केव्हां कशी पालटेल याचा काय नेम ? ) यासाठीं, जें काम महत्त्वाचें असेल तें स्वतःच करावें.

**४३ अनिर्वेदः श्रियो मूलं लाभस्य च शुभस्य च ॥५।३९।५९**

लक्ष्मीचें, लाभाचें आणि कल्याणाचें मूळ सतत उद्योग करणें हें आहे.

**४४ अनिर्वेदेन दीर्घेण निश्चयेन ध्रुवेण च ।**
**देवदेवप्रसादाच्च क्षिप्रं फलमवाप्यते ॥ १२।१५३।११७**

दीर्घोद्योगानें, दृढनिश्चयानें व ईश्वरी कृपेनें सत्वर कार्यसिद्धि होते.

**४५ अनिष्टं सर्वभूतानां मरणं नाम भारत ।**
**मृत्युकाले हि भूतानां सद्यो जायति वेपथुः ॥ १३।११६।२७**

( भीष्म धर्मराजाला सांगतात. ) खरोखर कोणत्याहि प्राण्याला मरण नकोसें वाटतें. मृत्युकाल जवळ आला कीं सर्वांना कांपरें भरतें !

**४६ अनीशश्चावमानी च स शीघ्रं भ्रश्यते श्रियः ॥ १०।२।२५**

हातांत सत्ता नसतांना जो दुसऱ्याचा उपमर्द करतो तो ऐश्वर्यापासून लवकरच भ्रष्ट होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४७ अनुकम्प्यो नरः पत्न्या पुष्टो रक्षित एव च ।**
**प्रपतेद्यशसो दीप्तात्स च लोकान्न चाप्नुयात् ॥ १४।९०।४७**

बायकोच्या जिवावर पोसलेल्या व जगलेल्या पुरुषाची कींवच केली पाहिजे ! असा पुरुष उज्ज्वल कीर्तीपासून च्युत होतो, व स्वर्गलोकहि गमावून बसतो.

**४८ अनुक्त्वा विक्रमेद्यस्तु तद्वै सत्पुरुषव्रतम् ॥ ७।१५८।१९**

न बोलतां पराक्रम करून दाखविणें हेंच सत्पुरुषाचें व्रत होय.

**४९ अनुग्रहं च मित्राणाममित्राणां च निग्रहम् ।**
**संग्रहं च त्रिवर्गस्य श्रेय आहुर्मनीषिणः ॥ १२।२८७।१६**

मित्रांवर उपकार करणें, शत्रूंचा पाडाव करणें आणि ( धर्म, अर्थ व काम या ) तीनहि पुरुषार्थांची प्राप्ति करून घेणें हें श्रेयस्कर आहे असें ज्ञाते लोक सांगतात.

**५० अनृतं जीवितस्यार्थे वदन्न स्पृश्यतेऽनृतैः ॥ ७।१९०।४७**

जीव वांचविण्याकरितां असत्य भाषण करणाराला असत्य भाषण केल्याचा दोष लागत नाहीं.

**५१ अन्त्येषु रेमिरे धीरा न ते मध्येषु रेमिरे ।**
**अन्त्यप्राप्तिं सुखामाहुर्दुःखमन्तरमन्त्ययोः ॥ १२।१७४।३४**

ज्ञाते लोक कोणती तरी एक तड पतकरतात, मधल्या स्थितींत आनंद मानीत नाहींत. कारण कोणती तरी शेवटची स्थिति ही सुखकारक आहे, आणि मधली स्थिति ही दुःखदायक आहे.

**५२ अन्नपानानि जीर्यन्ते यत्र भक्षाश्च भक्षिताः ।**
**तस्मिन्नेवोदरे गर्भः किं नान्नमिव जीर्यते ॥ १२।३३१।२४**

अन्नपान व भक्षण केलेले इतर पदार्थ ज्या उदरांत जिरतात त्याच उदरांत असलेला गर्भ अन्नादिकांप्रमाणें कसा जिरून जात नाहीं ?

**५३ अन्यत्र राजन्हिंसाया वृत्तिर्नेहास्ति कस्यचित् ।**
**अप्यरण्यसमुत्थस्य एकस्य चरतो मुनेः ॥ १२।१३०।२८**

( भीष्म धर्मराजाला म्हणतात ) हे राजा, दुसऱ्याला मुळींच पीडा न देतां जगांत कोणाचीही जीवितयात्रा चालूं शकत नाहीं. मग तो अरण्यांत जन्मलेला व एकटाच राहणारा एकादा मुनि कां असेना ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५४ अन्यथा चिन्तितो ह्यर्थः पुनर्भवति सोऽन्यथा ।**
**अनित्यमतयो लोके नराः पुरुषसत्तम ॥ ५।८०।६**

( नकुल श्रीकृष्णाला म्हणतो ) हे पुरुषोत्तमा, मनुष्यानें एका प्रकारानें केलेला बेत पुनः फिरलेला दिसतो. [ याचें कारण ] जगांत माणसांची बुद्धि नेहमीं पालटत असते.

**५५ अन्यया यौवने मर्त्यो बुद्ध्या भवति मोहितः ।**
**मध्येऽन्यया जरायां तु सोऽन्यां रोचयते मतिम् ॥ १०।३।११**

मनुष्याला तरुणपणीं एका विचाराची भुरळ पडते; प्रौढ वयांत दुसरीच एकादी गोष्ट बरी वाटते; व म्हातारपणीं तिसराच एखादा विचार आवडूं लागतो.

**५६ अन्यान्परिवदन्साधुर्यथा हि परितप्यते ।**
**तथा परिवदन्नन्यांस्तुष्टो भवति दुर्जनः ॥ १।७४।९२**

दुसऱ्याची निंदा करण्यांत सज्जनाला जितका खेद वाटतो, तितकाच दुर्जनाला परनिंदा करण्यांत संतोष वाटतो.

**५७ अन्यो धनं प्रेतगतस्य भुङ्क्ते**
**वयांसि चाग्निश्च शरीरधातून् ।**
**द्वाभ्यामयं सह गच्छत्यमुत्र**
**पुण्येन पापेन च वेष्ट्यमानः ॥ ५।४०।१६**

कुडी सोडून गेलेल्या जीवाचें धन दुसरा कोणी भोगतो, [ रक्त-मांसादि ] देहस्थ धातु पक्षी व अग्नि यांच्या भक्ष्यस्थानीं पडतात. फक्त दोन गोष्टी बरोबर घेऊन जीव परलोकीं जातो. त्या म्हणजे त्यानें इहलोकीं केलेलें पुण्य व पाप.

**५८ अन्यो धर्मः समर्थानामापत्स्वन्यश्च भारत ॥ १२।१३०।१४**

( भीष्म धर्मराजाला म्हणतात ) हे भारता, सामर्थ्य असतां आचरण्याचा धर्म निराळा आणि संकटप्रसंगाचा धर्म निराळा.

**५९ अन्योन्यसमुपष्टम्भादन्योन्यापाश्रयेण च ।**
**ज्ञातयः संप्रवर्धन्ते सरसीवोत्पलान्युत ॥ ५।३६।३६**

तळ्यांत वाढणाऱ्या कमलांप्रमाणें, परस्परांस साहाय्य करून व परस्परांचा आश्रय घेऊन ज्ञातींचा उत्कर्ष होत असतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



६० अन्यो हि नाश्नाति कृतं हि कर्म
मनुष्यलोके मनुजस्य कश्चित् ।
यत्तेन किंचिद्धि कृतं हि कर्म
तदश्नुते नास्ति कृतस्य नाशः ॥ ३।२०७।२७

मृत्युलोकीं एका मनुष्यानें केलेल्या कर्मांचें फळ दुसरा कोणीहि भोगीत नाहीं. त्यानें जें कांहीं केलें असेल त्याचें फळ त्याला भोगावेंच लागतें. केलेल्याचा नाश केव्हांहि होत नाहीं.

६१ अपि च ज्ञानसंपन्नः सर्वान्वेदान्पितुर्गृहे ।
श्लाघमान इवाधीयाद्ग्राम्य इत्येव तं विदुः॥१३।३६।१५

बापाच्या घरीं राहून मोठ्या ऐटींत सर्व वेदांचा अभ्यास करून जरी कोणी ज्ञानसंपन्न झाला तरी लोक त्याला खेडवळच म्हणणार.

६२ अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥६।३३।३०

[ श्रीकृष्ण सांगतात ] अत्यंत दुराचारी असलेला मनुष्यहि जर अनन्यभावानें मला भजेल तर तो साधुच समजावा. कारण [ तो मला भजूं लागला म्हणजे ] त्याचा निश्चय चांगला झाला. ( तो चांगल्या मार्गाला लागला. )

६३ अपिचेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥६।२८।३६

( श्रीकृष्ण म्हणतात हे अर्जुना, ) सर्व पापी लोकांहून तूं जरी अधिक पापी असलास तरी ज्ञानरूप नौकेच्या योगानेंच तूं सर्व पापसमुद्र तरून जाशील.

६४ अपि पापकृतो रौद्राः सत्यं कृत्वा पृथक्पृथक् ।
अद्रोहमविसंवादं प्रवर्तन्ते तदाश्रयाः ॥ १२।२५९।११

पाप करणारीं आणि भयंकर अशीं जरी मनुष्यें असलीं, तरी तीं सुद्धां परस्परांशीं सत्यानें वागण्याची शपथ घेऊन त्या सत्याच्या आधारानें, परस्परांशीं विश्वासघात व फसवणूक न करितां वागतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६५ अपि शाकं पचानस्य सुखं वै मघवन्गृहे ।**
**अर्जितं स्वेन वीर्येण नाप्यपाश्रित्य कंचन ॥३।१९३।२९**

( बकमुनि म्हणतात ) हे इंद्रा, कोणावर अवलंबून न राहतां स्वतःच्या हिंमतीनें मिळविलेली मीठभाकर सुद्धां स्वतःच्या घरीं खाण्यांत सुख आहे.

**६६ अपि सर्वस्वमुत्सृज्य रक्षेदात्मानमात्मना॥१२।१३८।१७९**

सर्वस्वाचा त्याग करून देखील आपण आपलें रक्षण करावें.

**६७ अप्युन्मत्तात्प्रलपतो बालाच्च परिजल्पतः ।**
**सर्वतः सारमादद्यादश्मभ्य इव काञ्चनम् ॥ ५।३४।३२**

वेडाच्या लहरींत बरळणाऱ्या वेड्यापासून, तसेंच बोबडे बोल बोलणाऱ्या बालकापासून, सर्वांपासून, दगडांतून सोनें निवडावें त्याप्रमाणें, चांगलें तेवढें ग्रहण करावें.

**६८ अप्रयत्नागताः सेव्या गृहस्थैर्विषयाः सदा ।**
**प्रयत्नेनोपगम्यश्च स्वधर्म इति मे मतिः ॥ १२।२९५।३५**

( *पराशर मुनि जनकराजाला म्हणतात* ) मुद्दाम प्रयत्न न करितां प्रारब्धानुसार ओघानें प्राप्त होतील तेवढ्याच विषयांचें गृहस्थाश्रमी पुरुषानें सेवन करावें, आणि स्वधर्माचें आचरण प्रयत्नपूर्वक करावें असें माझें मत आहे.

**६९ अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन् ।**
**लभते बुद्ध्यवज्ञानमवमानं च भारत ॥ ५।३९।२**

( विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ) समयाला न शोभण्यासारखें भाषण करणारा बृहस्पति जरी असला तरी त्याच्या बुद्धीचा तिरस्कार होतो व तोहि अपमानालाच पात्र होतो.

**७० अबलस्य कुतः कोशो ह्यकोशस्य कुतो बलम् ।**
**अबलस्य कुतो राज्यमराज्ञः श्रीर्भवेत्कुतः ॥ १२।१३३।४**

दुर्बळाला द्रव्य कोठून मिळणार ? व ज्याच्यापाशीं द्रव्य नाहीं त्याला सामर्थ्य कोठलें ? तसेंच ज्याला सामर्थ्य नाहीं त्याचें राज्य कसें राहणार ? व राज्य नाहींसें झालें म्हणजे संपत्ति तरी कशी टिकणार ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७१ अब्रुवन्कस्यचिन्निन्दामात्मपूजामवर्णयन् ।**
**न कश्चिद्गुणसंपन्नः प्रकाशो भुवि दृश्यते ॥ ३।२०७।५०**

कोणाचीहि निंदा न करतां व आत्मस्तुति न करतां कोणताहि गुणसंपन्न पुरुष जगांत प्रसिद्धीस येत असल्याचें दृष्टीस पडत नाहीं.

**७२ अभिमानकृतं कर्म नैतत्फलवदुच्यते ।**
**त्यागयुक्तं महाराज सर्वमेव महाफलम् ॥ १२।१२।१६**

( नकुल युधिष्ठिराला म्हणाला ) [ मी कर्ता अशा ] अभिमानानें केलेलें कर्म सफल झालें असें म्हणतां येत नाहीं. त्यागबुद्धीनें केलेल्या प्रत्येक कर्माचें फळ फार मोठें मिळतें.

**७३ अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ।**
**चत्वारि संप्रवर्धन्ते कीर्तिरायुर्यशो बलम् ॥ ५।३९।७६**

नेहमीं वृद्धजनांना वंदन करून त्यांच्या समागमांत जो राहतो, त्याची कीर्ति, आयुष्य, यश व सामर्थ्य हीं चार वृद्धिंगत होतात.

**७४ अभिशस्तं प्रपश्यन्ति दरिद्रं पार्श्वतः स्थितम् ।**
**दारिद्र्यं पातकं लोके न तच्छंसितुमर्हति ॥ १२।८।१४**

दरिद्री मनुष्य जवळ उभा राहिला तर एकाद्या पातकी मनुष्याप्रमाणें लोक त्याजकडे पाहतात. या लोकामध्यें दारिद्र्य हें एक पातकच आहे ! म्हणूनच त्याची प्रशंसा करणें योग्य नाहीं.

**७५ अभ्यावहति कल्याणं विविधं वाक्सुभाषिता ।**
**सैव दुर्भाषिता राजन्नन‍र्थायोपपद्यते ॥ ५।३४।७७**

( विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ) हे राजा, वाणीनें चागलें भाषण केलें असतां त्यापासून अनेक प्रकारें कल्याण होतें, परंतु, दुर्भाषण केलें असतां तीच वाणी अनर्थाला कारण होते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७६ अमर्षजो हि संतापः पावकाद्दीप्तिमत्तरः ३।३५।११**

असहिष्णुतेमुळें होणारा संताप अग्नीपेक्षांहि अधिक प्रखर असतो.

**७७ अमित्रमुपसेवेत विश्वस्तवदविश्वसन् ।**
**प्रियमेव वदेन्नित्यं नाप्रियं किंचिदाचरेत् ॥ १२।१०३।९**

( बृहस्पति इंद्राला म्हणतात. ) शत्रूवर विश्वास न ठेवतां विश्वास ठेवल्याचा बहाणा करून त्याच्या कलानें वागावें. त्याच्याशीं सदा गोड बोलावें, व त्याला न रुचणारी कोणतीहि गोष्ट करूं नये.

**७८ अमित्रो न विमोक्तव्यः कृपणं बह्वपि ब्रुवन् ।**
**कृपा न तस्मिन्कर्तव्या हन्यादेवापकारिणम् ॥१।१४०।२२**

शत्रु अगदीं दीनवाणीनें बोलूं लागला तरी त्याला मोकळा सोडूं नये. त्याच्यावर दया न करतां त्या अपकार करणाऱ्याला ठार मारावें.

**७९ अमित्रो मित्रतां याति मित्रं चापि प्रदुष्यति ।**
**सामर्थ्ययोगात्कार्याणामनित्या वै सदा गतिः १२।१३८।१३**

कार्याच्या महत्त्वाच्या मानानें शत्रुहि मित्र होतात व मित्रहि शत्रु होतात. कारण, कोणतीहि स्थिति ही कायमची अशी नसतेच.

**८० अमृतस्येव संतृप्येदवमानस्य तत्त्ववित् ।**
**विषस्येवोद्विजेन्नित्यं संमानस्य विचक्षणः ॥१२।२२९।२१**

तत्त्ववेत्त्या पुरुषाला अपमान झाला तर अमृतप्राप्ति झाल्याप्रमाणें संतोष वाटला पाहिजे. व शहाण्यानें विषाप्रमाणें सन्मानाचा तिटकारा मानला पाहिजे.

**८१ अयुध्यमानो म्रियते युध्यमानश्च जीवति ।**
**कालं प्राप्य महाराज न कश्चिदतिवर्तते ॥११।२।५**

( भारतीय युद्धानंतर विदुर धृतराष्ट्राचें सांत्वन करतो ) हे राजा, रणांत पाऊल न टाकणाराहि मरून जातो, आणि घनघोर रणकंदन करूनहि मनुष्य जिवंत राहूं शकतो. सारांश, काळ आल्यावर त्याचा प्रतिकार कोणालाहि करितां यावयाचा नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८२ अरक्षितारं राजानं बलिषड्भागहारिणम् ।**
**तमाहुः सर्वलोकस्य समग्रं पापचारिणम् ॥ १।२१३।९**

जो राजा प्रजेचें रक्षण न करितां प्रजेपासून उत्पन्नाचा सहावा भाग कर म्हणून घेतो तो [ त्या कराच्या रूपानें ] सर्व प्रजेचें पापच ग्रहण करतो असें म्हणतात.

**८३ अरक्षितारं हर्तारं विलोप्तारमनायकम् ।**
**तं वै राजकलिं हन्युः प्रजाः संनह्य निर्घृणम् ॥ १३।६१।३२**

प्रजेचें रक्षण न करितां तिजपासून जो कर घेतो, व प्रजेला सन्मार्गाला न लावितां जो लुबाडतो तो राजरूपी कली प्रजेनें सज्ज होऊन निष्ठुरपणें ठार मारावा.

**८४ अरण्ये विजने न्यस्तं परस्वं दृश्यते यदा ।**
**मनसापि न हिंसन्ति ते नराः स्वर्गगामिनः ॥ १३।१४४।३१**

अरण्यांत एकीकडे पडलेलें दुसऱ्याचें द्रव्य दृष्टीस पडलें असतांही जे लोक मनानें-सुद्धां त्याचा अभिलाष धरीत नाहींत ते स्वर्गाला जातात.

**८५ अराजकेषु राष्ट्रेषु धर्मो न व्यवतिष्ठते ।**
**परस्परं च खादन्ति सर्वथा धिगराजकम् ॥ १२।६७।३**

राजा नसलेल्या राष्ट्रामध्यें धर्म रहात नाहीं. तसेंच लोक एकमेकांना फाडून खातात. अराजकतेला सर्वथा धिक्कार असो !

**८६ अरिणापि समर्थेन संधिं कुर्वीत पण्डितः ।**
**मूषिकश्च बिडालश्च मुक्तावन्योन्यसंश्रयात् ॥१२।१३८।२०३**

सुज्ञ मनुष्यानें शत्रु सामर्थ्यसंपन्न असल्यास त्याच्याशींहि संधि करावा. परस्परांचा आश्रय केल्यानेंच मूषिक आणि मार्जार हे उभयतांहि संकटांतून मुक्त झाले.

**८७ अर्थं महान्तमासाद्य विद्यामैश्वर्यमेव वा ।**
**विचरत्यसमुन्नद्धो यः स पण्डित उच्यते ॥ ५।३३।४०**

विपुल संपत्ति, विद्या किंवा अधिकार प्राप्त झाला असतां जो निरभिमान वृत्तीनें वागतो त्याला पंडित म्हणावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८८ अर्थयुक्त्या हि जायन्ते पिता माता सुतस्तथा ।
मातुला भागिनेयाश्च तथा संबन्धिबान्धवाः । १२।१३८।१४५

आई, बाप, मुलगा, मामे भाचे, तसेंच इतर संबंधी आणि बांधव हे सर्व द्रव्याच्याच संबंधानें परस्पर ( प्रीतियुक्त ) होत असतात.

८९ अर्थसिद्धिं परामिच्छन् धर्ममेवादितश्चरेत् ।
न हि धर्मादपैत्यर्थः स्वर्गलोकादिवामृतम् ॥ ५।३७।४८

पुष्कळ द्रव्य मिळावें अशी इच्छा करणाऱ्यानें प्रथम धर्माचेंच आचरण करावें, कारण, स्वर्गलोकाला सोडून जसें अमृत जात नाहीं तसा अर्थ ( द्रव्य ) धर्माला सोडून रहात नाहीं.

९० अर्थस्य पुरुषो दासो दासस्त्वर्थो न कस्यचित् ।
इति सत्यं महाराज बद्धोऽस्म्यर्थेन कौरवैः ॥ ६।४३।४१

( ' तुम्ही कौरवांचा पक्ष कां सोडीत नाहीं ? ' या युधिष्ठिराच्या प्रश्नाला भीष्म-द्रोणादिकांनीं दिलेलें उत्तर ) पुरुष हा अर्थाचा दास आहे, अर्थ कोणाचाहि दास नाहीं. ह्यास्तव, खरोखर, हे राजा ! मी अर्थामुळें कौरवांशीं बांधला गेलों आहें.

९१ अर्थागमो नित्यमरोगिता च
प्रिया च भार्या प्रियवादिनी च ।
वश्यश्च पुत्रोऽर्थकरी च विद्या
षड् जीवलोकस्य सुखानि राजन् ॥ ५।३३।८२

( विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ) हे राजा, सदोदित द्रव्यप्राप्ति, निकोप प्रकृति, मधुर भाषण करणारी प्रेमळ स्त्री, आज्ञाधारक पुत्र व धनोत्पादक विद्या हीं सहा मृत्युलोकांतील सुखें होत.

९२ अर्थाद्धर्मश्च कामश्च स्वर्गश्चैव नराधिप ।
प्राणयात्रापि लोकस्य विना ह्यर्थं न सिध्यति ॥१२।८।१७

(अर्जुन युधिष्ठिराला म्हणतो ) अर्थ ( द्रव्य ) असेल तर धर्म, काम आणि स्वर्ग यांची प्राप्ति होते. फार काय, पण लोकांची जीवितयात्रा देखील अर्थावांचून चालणार नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९३ अर्थानामीश्वरो यः स्यादिन्द्रियाणामनीश्वरः ।**
**इन्द्रियाणामनैश्वर्यादैश्वर्याद्भ्रश्यते हि सः ॥ ५।३४।६३**

जो मनुष्य संपत्तीचा मालक असून इंद्रियांचा दास होऊन राहतो तो इंद्रियांवर ताबा नसल्यामुळें ऐश्वर्यापासून भ्रष्ट होतो.

**९४ अर्थानारभते बालो नानुबन्धमवेक्षते ॥ २।१५।१४**

अज्ञ मनुष्य निरनिराळ्या कामांना हात घालतो पण पुढील परिणामाकडे लक्ष्य देत नाहीं.

**९५ अर्थी तु शक्यते भोक्तुं कृतकार्योऽवमन्यते ।**
**तस्मात्सर्वाणि कार्याणि सावशेषाणि कारयेत् ॥ १२।१४०।२०**

कोणत्याहि मनुष्याला आपली गरज आहे तोंवरच त्याचा उपयोग करून घेतां येतो. एकदां त्याचें कार्य झालें म्हणजे तो आपली पर्वा करीत नाहीं. यास्तव कोणतेंहि काम पूर्णपणें न करतां त्यांतील अवशेष ठेवावा.

**९६ अर्थेन हि विहीनस्य पुरुषस्याल्पमेधसः ।**
**विच्छिद्यन्ते क्रियाः सर्वा ग्रीष्मे कुसरितो यथा ॥१२।८।१८**

ज्याप्रमाणें ग्रीष्मऋतूंत लहान लहान नद्यांना खांडवे पडतात, त्याप्रमाणें द्रव्यहीन अशा मंदबुद्धि पुरुषाच्या सर्व क्रिया छिन्न विच्छिन्न होऊन जातात.

**९७ अर्थेभ्यो हि विवृद्धेभ्यः संभृतेभ्यस्ततस्ततः ।**
**क्रियाः सर्वाः प्रवर्तन्ते पर्वतेभ्य इवापगाः ॥१२।८।१६**

पर्वतांपासून नद्या उगम पावतात त्याप्रमाणें सर्व बाजूंनीं द्रव्य संपादन करून त्याची वाढ झाली म्हणजे त्यापासून सर्व कार्यें सिद्ध होतात.

**९८ अर्थे सर्वे समारम्भाः समायत्ता न संशयः ।**
**स च दण्डे समायत्तः पश्य दण्डस्य गौरवम् ॥ १२।१५।४८**

( अर्जुन युधिष्ठिराला म्हणतो ) सर्व प्रकारचे उद्योग द्रव्यावर अवलंबून आहेत यांत संशय नाहीं. आणि तें द्रव्य दंडाच्या ( नियामक शक्तीच्या ) अधीन आहे. यावरून दंडाची थोरवी केवढी आहे पहा !



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९९ अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ।
भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥१।७४।४१

स्त्री हें पुरुषाचें अर्धें आंगच होय. स्त्री हाच पुरुषाचा सर्वोत्तम मित्र होय. ( धर्म, अर्थ व काम या ) तीनहि पुरुषार्थांचें मूळ स्त्रीच आहे. संसार तरून जाण्याची इच्छा करणाऱ्याचें मुख्य साधन स्त्रीच.

१०० अलातं तिन्दुकस्येव मुहूर्तमपि हि ज्वल ।
मा तुषाग्निरिवानर्चिर्धूमायस्व जिजीविषुः ॥ ५।१३३।१४

( विदुला माता संजयास म्हणते ) टेंभुरणीच्या लाकडाच्या कोलतीप्रमाणें थोडा वेळ कां होईना, पण चमकून जा. केवळ जिवाची आशा धरून ज्वाला न निघणाऱ्या कोंड्याच्या अग्नीसारखा नुसता धुमसत राहूं नको.

१०१ अल्पोऽपि ह्यरिरत्यर्थं वर्धमानः पराक्रमैः ।
वल्मीको मूलज इव ग्रसते वृक्षमन्तिकात् । २।५५।१७

शत्रु क्षुद्र असला तरी तो आपल्या पराक्रमानें प्रबल होत जाऊन, बुंध्याशीं असलेलें वारूळ जसें अखेर झाडाला खाऊन टाकतें त्याप्रमाणें, आपल्या प्रतिपक्ष्याचा नाश करतो.

१०२ अवज्ञानं हि लोकेस्मिन्मरणादपि गर्हितम् ॥ ३।२८।१२

या जगांत मानखंडना होणें हें मरणापेक्षांहि दुःखदायक आहे.

१०३ अविद्वांसमलं लोके विद्वांसमपि वा पुनः ।
नयन्ति ह्युत्पथं नार्यः कामक्रोधवशानुगम् ॥ १३।४८।३७

जगांत कोणी विद्वान् असो किंवा अविद्वान् असो, तो कामक्रोधांच्या तडाक्यांत सांपडला कीं स्त्रिया त्याला कुमार्गाला नेतात.

१०४ अविश्वासो नरेन्द्राणां गुह्यं परममुच्यते ॥ १२।८५।३४

कोणाचाहि विश्वास न धरणें हें राजे लोकांचें एक मोठें रहस्य आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१०५ अविसंवादनं दानं समयस्याव्यतिक्रमः ।**
**आवर्तयन्ति भूतानि सम्यक्प्रणिहिता च वाक् ॥५।३८।३६**

सरळ बुद्धीनें दिलेलें दान, वचनाचें परिपालन आणि नीट विचार करून केलेलें भाषण यांच्या योगानें सर्व लोक आपलेसे करून घेतां येतात.

**१०६ अवृत्तिर्भयमन्त्यानां मध्यानां मरणाद्भयम् ।**
**उत्तमानां तु मर्त्यानामवमानात्परं भयम् ॥ ५।३४।५२**

निकृष्ट स्थितींतील लोकांना उपासमारीचें भय वाटतें, मध्यम लोकांना मरणाचें भय वाटतें. परंतु उत्तम कोटींतील मनुष्यांना अपमानाचें फार भय वाटतें.

**१०७ अवेक्षस्व यथा स्वैः स्वैः कर्मभिर्व्यापृतं जगत् ।**
**तस्मात्कर्मैव कर्तव्यं नास्ति सिद्धिरकर्मणः ॥१२।१०।२८**

( भीम युधिष्ठिराला म्हणतो ) असें पहा कीं, जगांतील सर्व प्राणी आपआपलीं कर्मे करण्यांत गुंतलेले आहेत तस्मात्, कर्मच केलें पाहिजे. कर्मावांचून सिद्धि नाहीं.

**१०८ अव्यापारः परार्थेषु नित्योद्योगः स्वकर्मसु ।**
**रक्षणं समुपात्तानामेतद्वैभवलक्षणम् ॥ २।५४।७**

दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ न करणें, आपल्या कामांत सदा गर्क असणें आणि संपादन केलेल्या द्रव्याचें रक्षण करणें हीं वैभवाचीं साधनें होत.

**१०९ अशङ्कितेभ्यः शङ्केत शङ्कितेभ्यश्च सर्वशः ।**
**अशङ्क्याद्भयमुत्पन्नमपि मूलं निकृन्तति ॥ १।१४०।६१**

संशयास्पद मनुष्यांवर मुळींच विश्वास ठेवूं नये. इतकेंच नव्हे ज्याच्याविषयीं कोणाला शंका वाटत नाहीं अशाचा देखील विश्वास धरूं नये. कारण विश्वासू मनुष्याकडून कांहीं संकट उत्पन्न झालें तर तें समूळ नाश करतें.

**११० अशाश्वतमिदं सर्वं चिन्त्यमानं नरर्षभ ।**
**कदलीसंनिभो लोकः सारो ह्यस्य न विद्यते ॥ ११।३।४**

खरोखर विचार केला असतां हें सर्व जग अशाश्वत आहे. याची स्थिति केळीसारखी आहे. यांत सार म्हणून कांहींच नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१११ अशुश्रूषा त्वरा श्लाघा विद्यायाः शत्रवस्त्रयः ॥ ५।४०।४**

दुर्लक्ष्य, त्वरा व स्तुति हे तीन विद्येचे शत्रु होत.

**११२ अशोचन्प्रतिकुर्वीत यदि पश्येत्पराक्रमम् ।**
**भैषज्यमेतद्दुःखस्य यदेतन्नानुचिन्तयेत् ॥ ११।२।२७**

पराक्रम करतां येईल असें दिसेल तर शोक न करतां प्रतिकार करावा, दुःखावर औषध हेंच कीं, त्याचें एकसारखें चिंतन करीत बसूं नये.

**११३ अश्नाम्याच्छादयामीति प्रपश्यन्पापपूरुषः ।**
**नामर्षं कुरुते यस्तु पुरुषः सोऽधमः स्मृतः ॥ २।५०।१७**

अन्न आणि आच्छादन आपल्याला मिळत आहे एवढ्यावरच नजर देऊन स्वस्थ राहणारा व शत्रूच्या उत्कर्षाविषयीं असहिष्णुता नसणारा पुरुष अधम पापी, असें म्हटलें आहे.

**११४ अश्रद्धा परमं पापं श्रद्धा पापप्रमोचनी ।**
**जहाति पापं श्रद्धावान्सर्पो जीर्णामिव त्वचम्॥१२।२६४।१५**

अश्रद्धा हें मोठें पाप आहे. श्रद्धा ही पापापासून मुक्त करणारी आहे. जसा सर्प जीर्ण झालेली कांत टाकून देतो तसा श्रद्धावान् मनुष्य पातकाचा त्याग करतो.

**११५ अश्रुतश्च समुन्नद्धो दरिद्रश्च महामनाः ।**
**अर्थांश्चाकर्मणा प्रेप्सुर्मूढ इत्युच्यते बुधैः ॥ ५।३३।३०**

अध्ययन नसतांनाहि गर्विष्ठ, दरिद्री असून मोठमोठ्या खर्चाच्या गोष्टी मनामध्यें आणणारा आणि उद्योग न करितां द्रव्यप्राप्तीची इच्छा करणारा अशाला शहाणे लोक मूढ म्हणतात.

**११६ अश्वमेधसहस्रं च सत्यं च तुलया धृतम् ।**
**अश्वमेधसहस्राद्धि सत्यमेव विशिष्यते ॥१२।१६२।२६**

सहस्र अश्वमेध आणि सत्य हीं तराजूंत घातलीं तेव्हां सहस्र अश्वमेधांपेक्षां सत्यच अधिक भरलें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**११७ अष्टादश पुराणानि धर्मशास्त्राणि सर्वशः ।**
**वेदाः साङ्गास्तथैकत्र भारतं चैकतः स्थितम् ॥१८।५।४६**

अठरा पुराणें, सर्व धर्मशास्त्रें ( स्मृति ) आणि सांग वेद एका बाजूला व एकटें भारत एका बाजूला [ एवढी भारताची योग्यता आहे. ]

**११८ असंशयं दैवपरः क्षिप्रमेव विनश्यति ॥ १२।१०५।२२**

दैववादी मनुष्य सत्वर सर्वथा नाश पावतो यांत संशय नाहीं.

**११९ असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।**
**अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥ ६।३०।३५**

( भगवान् श्रीकृष्ण म्हणतात ) हे महाबाहो अर्जुना, खरोखरच मन हें चंचल असून त्याचा निग्रह करणें अति कठीण आहे. तरीपण अभ्यासानें व वैराग्यानें तें ताब्यांत आणतां येतें.

**१२० असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ ६।२७।१९**

आसक्ति न ठेवतां कर्म करणारा मनुष्य परमपद खचित प्राप्त करून घेतो.

**१२१ असतां प्रतिषेधश्च सतां च परिपालनम् ।**
**एष राज्ञां परो धर्मः समरे चापलायनम् ॥१२।१४।१६**

दुष्टांचें निवारण करणें, सज्जनांचें परिपालन करणें आणि युद्धांत शत्रूला पाठ न दाखविणें हा क्षत्रियांचा श्रेष्ठ धर्म होय.

**१२२ असतां शीलमेतद्वै परिवादोऽथ पैशुनम् ॥ १२।१३२।१३**

दुसऱ्यांची निंदा करणें, आणि चुगल्या करणें हा दुर्जनांचा स्वभावच आहे.

**१२३ असदुच्चैरपि प्रोक्तः शब्दः समुपशाम्यति ।**
**दीप्यते त्वेव लोकेषु शनैरपि सुभाषितम् ॥१२।२८७।३२**

अयोग्य भाषण मोठ्या जोरानें केलें तरी त्याचें तेज पडत नाहीं आणि योग्य भाषण हळू केलें तरी लोकांत त्याचें तेज पडतेंच.

**१२४ असंतोषः श्रियो मूलम् ॥ २।५५।११**

असंतोष हें उत्कर्षाचें मूळ आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१२५ असंत्यागात्पापकृतामपापां-**
**स्तुल्यो दण्डः स्पृशते मिश्रभावात् ।**
**शुष्केणार्द्रं दह्यते मिश्रभावात्**
**तस्मात्पापैः सह संधिं न कुर्यात् ॥ ५।३४।७०**

पापी लोकांचा त्याग केला नाहीं, तर त्यांच्याशीं मिसळल्यामुळें निर्दोषी माणसांनाहि त्यांच्या बरोबरीनें दंड सोसावा लागतो. सुक्याबरोबर मिसळल्यानें ओलेंहि जळून जातें. यास्तव, पापी लोकांशीं संबंध ठेवूं नये.

**१२३ असभ्याः सभ्यसंकाशाः सभ्याश्चासभ्यदर्शनाः ।**
**दृश्यन्ते विविधा भावास्तेषु युक्तं परीक्षणम् ॥१२।१११।६५**

पुष्कळ असभ्य मनुष्यें सभ्य असल्यासारखीं दिसतात व सभ्य असलेलीं असभ्य दिसतात. नानाप्रकारच्या वस्तु दिसतात. [ त्या तशाच असतात असें नाहीं ] यास्तव, त्यांची नीट परीक्षा करणें युक्त आहे.

**१२७ असंभवे हेममयस्य जन्तो-**
**स्तथापि रामो लुलुभे मृगाय ।**
**प्रायः समासन्नपराभवाणां**
**धियो विपर्यस्ततरा भवन्ति ॥ २।७६।५**

सोन्याचा मृग असणें संभवत नाहीं, असें असतांहि श्रीरामचंद्राला सुवर्णमृगाचा मोह पडला ( यावरून असें दिसतें कीं ) बहुतकरून विनाशकाल जवळ आला कीं, माणसांच्या बुद्धीला भ्रम होतो.

**१२८ असम्यगुपयुक्तं हि ज्ञानं सुकुशलैरपि ।**
**उपलभ्यं चाविदितं विदितं चाननुष्ठितम् ॥ ५।३९।३४**

जें समजून घेणें अवश्य आहे तें जर समजून न घेतलें अथवा समजल्यावरहि त्याप्रमाणें वर्तन न केलें तर अतिनिपुण पुरुषांनींहि केलेला ज्ञानाचा उपदेश व्यर्थ जाणार.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१२९ असाधुभ्योऽर्थमादाय साधुभ्यो यः प्रयच्छति ।**
**आत्मानं संक्रमं कृत्वा कृच्छ्रधर्मविदेव सः ॥१२।१३२।४**

जो राजा ( आपन्न स्थितींत असलेल्या लोकांना ) तरून जाण्याचा एक प्रकारचा सेतुच बनून, दुष्ट लोकांपासून द्रव्य काढून घेऊन तें सुष्ट लोकांना देतो, तोच आपद्धर्म जाणणारा होय.

**१३० असुहृत्ससुहृच्चापि सशत्रुर्मित्रवानपि ।**
**सप्रज्ञः प्रज्ञया हीनो दैवेन लभते सुखम् ॥१२।१७४।२८**

स्नेही असोत वा नसोत, मित्र असोत वा शत्रु असोत, बुद्धिहि असो अथवा नसो, तथापि मनुष्यास दैवयोगानें सुखप्राप्ति होते.

**१३१ असूयैकपदं मृत्युरतिवादः श्रियो वधः ॥ ५।४०।४**

एकटा मत्सर मृत्यूला कारण होतो. मर्यादा सोडून भाषण करणें हें लक्ष्मीच्या नाशाला कारण होतें.

**१३२ अस्मिन्महामोहमये कटाहे**
**सूर्याग्निना रात्रिदिवेन्धनेन ।**
**मासर्तुदर्वीपरिघट्टनेन**
**भूतानि कालः पचतीति वार्ता ॥ ३।३१३।११८**

असें म्हणतात कीं मोहरूप प्रचंड कढईत दिवसरात्ररूपी सर्पणानें सूर्यरूपी अग्नीवर, मास-ऋतु-रूप पळीनें ढवळीत ढवळीत, काल हा सर्व प्राण्यांना शिजवीत आहे.

**१३३ अहं वो रक्षितेत्युक्त्वा यो न रक्षति भूमिपः ।**
**स संहत्य निहन्तव्यः श्वेव सोन्माद आतुरः ॥१३।६१।३३**

'मी तुमचें रक्षण करीन' असें म्हणून जो राजा त्याप्रमाणें प्रजेचें रक्षण करीत नाहीं त्याला, सर्वांनी एक होऊन, पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें, ठार करावें.

**१३४ अहन्यहनि भूतानि गच्छन्तीह यमालयम् ।**
**शेषाः स्थावरमिच्छन्ति किमाश्चर्यमतः परम् ॥३।३१३।११६**

रोजच्यारोज मृत्युलोकांतील प्राणी यमसदनास जात असूनहि बाकीचे लोक चिरंजीव आहों असें समजतात, यापरतें आश्चर्य तें कोणतें ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१३५ अहिंसा परमो धर्मः ॥ ३।२०७।७४**

अहिंसा हा परमश्रेष्ठ धर्म होय.

**१३६ अहिंसायां तु निरता यतयो द्विजसत्तम ।**
**कुर्वन्त्येव हि हिंसां ते यत्नादल्पतरा भवेत् ॥३।२०८।३४**

( धर्मव्याध ब्राह्मणाला म्हणाला ) अहिंसेकरितां झटणाऱ्या यतींच्या हातून देखील हिंसा घडतेच; मात्र ती टाळण्याचा त्यांचा प्रयत्न असल्यामुळें फार थोडी घडते.

**१३७ अहिंसार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् ।**
**यःस्यादहिंसासंयुक्तः स धर्म इति निश्चयः॥१२।१०९।१२**

प्राण्यांना पीडा होऊं नये एवढ्यासाठींच धर्म सांगितला आहे. जो अहिंसेनें युक्त असेल तोच धर्म, हा सिद्धांत आहे.

**१३८ अहिंसा सत्यवचनं सर्वभूतेषु चार्जवम् ।**
**क्षमा चैवाप्रमादश्च यस्यैते स सुखी भवेत् ॥ १२।२१५।६**

अहिंसा, सत्य भाषण, सर्वांशीं सरळपणाची वागणूक, क्षमाशीलता व सावधानता हे गुण ज्याच्यापाशीं असतील तो सुखी होईल.

**१३९ अहिंसाऽसाधुहिंसेति श्रेयान्धर्मपरिग्रहः ॥ १२।१५।४९**

दुष्टांची हिंसा ही धर्मशास्त्राप्रमाणें अहिंसाच होय असें मानणें युक्त आहे.

**१४० अहो बत महत्कष्टं विपरीतमिदं जगत् ।**
**येनापत्रपते साधुरसाधुस्तेन तुष्यति ॥ ३।२।६४**

अरेरे ! मोठी दुःखाची गोष्ट कीं, या जगाची रीत विपरीत आहे. ज्याच्या योगानें सज्जनाला खेद होतो त्यानेंच दुर्जनाला संतोष वाटतो.

**१४१ अहो ह्यनित्यं मानुष्यं जलबुद्बुदचञ्चलम् ॥ ७।७८।१७**

पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें मनुष्याचें जीवित किती क्षणभंगुर आहे !

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१४२ आकिंचन्ये न मोक्षोऽस्ति किंचन्ये नास्ति बन्धनम् ।**
**किंचन्ये चेतरे चैव जन्तुर्ज्ञानेन मुच्यते ॥ १२।३२०।५०**

दारिद्र्यांत मोक्ष नाहीं किंवा श्रीमंतींत बंधन नाहीं. श्रीमंतींत काय आणि गरिबींत काय, मनुष्य ज्ञानानें मुक्त होत असतो.

**१४३ आगमानां हि सर्वेषामाचारः श्रेष्ठ उच्यते ।**
**आचारप्रभवो धर्मो धर्मादायुर्विवर्धते ॥ १३।१०४।१५६**

सर्व शास्त्रांत आचार हाच श्रेष्ठ म्हटला आहे. आचारापासून धर्माची उत्पत्ति होते. धर्माचरणानें आयुष्य वाढतें.

**१४४ आत्मदोषैर्नियच्छन्ति सर्वे दुःखसुखे जनाः ॥१।७८।३०**

सर्व लोकांना स्वतःच्या कर्मामुळेंच सुख किंवा दुःख प्राप्त होत असतें.

**१४५ आत्मा जेयः सदा राज्ञा ततो जेयाश्च शत्रवः ।**
**अजितात्मा नरपतिर्विजयेत कथं रिपून् ॥१२।६९।४**

राजानें नेहमीं प्रथम आपलें मन जिंकावें. म्हणजे मग त्याला शत्रूंवर जय मिळवितां येईल. ज्यानें स्वतःचें मन जिंकलें नाहीं तो राजा शत्रूंना कसा जिंकणार ?

**१४६ आत्मानं कः समुद्बध्य कण्ठे बद्ध्वा महाशिलाम् ।**
**समुद्रं तरते दोर्भ्यां तत्र किं नाम पौरुषम् ॥४।४९।१६**

स्वतःस जखडून घेऊन आणि गळ्यांत मोठी धोंड बांधून नुसत्या बाहूच्या जोरावर समुद्र तरून जाण्याच्या भरीस कोण पडेल ? असलें साहस करण्यांत पुरुषार्थ कसला ?

**१४७ आत्मानमसमाधाय समाधित्सति यः परान् ।**
**विषयेष्विन्द्रियवशं मानवाः प्रहसन्ति तम् ॥१२।२६७।२७**

आपलें मन स्वाधीन न ठेवतां जो दुसऱ्यांना आपल्या ताब्यांत ठेवूं पहातो, अशा विषयासक्त इंद्रियाधीन पुरुषाचा लोक उपहास करतात.

**१४८ आत्मा पुत्रः सखा भार्या**
**कृच्छ्रं तु दुहिता किल ॥ १।१५९।११**

पुत्र म्हणजे आपला आत्माच होय. भार्या हा मित्र होय. परंतु मुलगी म्हणजे मात्र खरोखर संकट होय !

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१४९ आत्मार्थे संततिस्त्याज्या**
**राज्यं रत्नं धनानि च ॥ १२।१३८।१७९**

स्वतःकरितां संततीचा, राज्याचा, रत्नांचा व सर्व प्रकारच्या द्रव्याचा त्याग करावा.

**१५० आत्मा सर्वस्य भाजनम् ॥ ९।४।४२**

जीव हाच सर्व गोष्टींचा आधार आहे. [ आधीं जीव जगेल तर सर्व कांहीं अनुकूल होईल. ]

**१५१ आत्मैव ह्यात्मनः साक्षी कृतस्यापकृतस्य च ॥ १३।६।२७**

आपला आत्माच आपल्या बऱ्या वाईट कृत्यांचा साक्षी आहे.

**१५२ आत्मैवादौ नियन्तव्यो**
**दुष्कृतं संनियच्छता ॥ १२।२६७।२९**

पापाचें नियमन करूं इच्छिणाऱ्यानें प्रथम आपल्या मनाचें नियमन केलें पाहिजे.

**१५३ आत्मोत्कर्षं न मार्गेत परेषां परिनिन्दया ।**
**स्वगुणैरेव मार्गेत विप्रकर्षं पृथग्जनात् ॥ १२।२८७।२५**

दुसऱ्याची निंदा करून आपला उत्कर्ष साधण्याची इच्छा धरूं नये. आपल्या आंगच्या गुणांच्या जोरावरच सामान्य लोकांपेक्षां वरचढ होण्याची इच्छा करावी.

**१५४ आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।**
**सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥६।३०।३२**

( श्रीकृष्ण म्हणतात ) अर्जुना, आपणांला जसें सुखदुःख होतें तसेंच सर्व प्राण्यांना होतें, अशा बुद्धीनें जो सर्वत्र सारखेंच पहातो तो योगी परमश्रेष्ठ होय.

**१५५ आददानस्य चेद्राज्यं ये केचित्परिपन्थिनः ।**
**हन्तव्यास्त इति प्राज्ञाः क्षत्रधर्मविदो विदुः ॥ १२।१०।७**

राज्य घेण्याच्या कामीं जर कोणी अडथळा करतील तर त्यांचा वध करावा असें क्षत्रधर्म जाणणारे शहाणे लोक सांगतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१५६ आदावेव मनुष्येण वर्तितव्यं यथाक्षमम् ।**
**यथा नातीतमर्थं वै पश्चात्तापेन युज्यते ॥ ११।१।३५**

आधींपासूनच मनुष्यानें योग्य रीतीनें वागावें. म्हणजे गोष्ट हातची गेल्यावर त्याकरितां पश्चात्ताप करण्याची पाळी येणार नाहीं.

**१५७ आदित्यचन्द्रावनिलानलौ च**
**द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च ।**
**अहश्च रात्रिश्च उभे च संध्ये**
**धर्मश्च जानाति नरस्य वृत्तम् ॥१।७४।३०**

सूर्य, चंद्र, वायु, अग्नि, आकाश, पृथ्वी, जल, तसेंच आपलें अंतःकरण, यम, दिवस, रात्र, सकाळ संध्याकाळचा संधिप्रकाश आणि धर्म इतक्यांना मनुष्याचें बरेंवाईट कृत्य समजतें.

**१५८ आनृशंस्यं परो धर्मः परमार्थाच्च मे मतम् ॥३।३१३।१२९**

[ युधिष्ठिर यक्षाला म्हणतो ] क्रौर्य नसणें म्हणजे दयाळुपणा हाच श्रेष्ठ धर्म होय. असें माझें निश्चित मत आहे.

**१५९ आपत्सु विहितं स्तैन्यं विशिष्टं च महीयसः ।**
**विप्रेण प्राणरक्षार्थं कर्तव्यमिति निश्चयः ॥ १२।१४१।३९**

आपत्कालीं एकवेळ पोट भरेल इतक्या धान्याचें चौर्य शास्त्रविहित आहे. त्यांतूनहि विशेषतः मोठ्यांना. कारण ते प्राणान्तींही शास्त्राचें उल्लंघन न करणारे असल्यामुळें प्राणास मुकतील. म्हणून ब्राह्मणानेंही प्राणरक्षणार्थ तें करावें असा सिद्धांत आहे.

**१६० आपदर्थे धनं रक्षेद्दारान् रक्षेद्धनैरपि ।**
**आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ॥ ५।३७।१८**

संकटप्रसंगीं उपयोग व्हावा म्हणून धनाचें रक्षण करावें. धनाचा त्याग करूनसुद्धां स्वस्त्रीचें रक्षण करावें. आणि धनाचा व स्त्रीचा त्याग करून देखील नेहमीं स्वतःचें रक्षण करावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१६१ आपदेवास्य मरणात्पुरुषस्य गरीयसी ।**
**श्रियो विनाशस्तद्ध्यस्य निमित्तं धर्मकामयोः॥५।७२।२७**

द्रव्यनाश हें मनुष्याला मरणापेक्षांहि अधिक मोठें संकट होय. कारण, त्याचा धर्म व काम या दोनहि पुरुषार्थांचें साधन द्रव्य हें आहे.

**१६२ आभ्यन्तरं भयं रक्ष्यमसारं बाह्यतो भयम्॥१२।१०७।२८**

आपापसांतील भयाचें प्रथम निरसन केलें पाहिजे. कारण, बाह्य लोकांपासून उत्पन्न होणारी भीति ( आपसांतील भीतीपेक्षां ) निःसार असते.

**१६३ आर्तिरार्ते प्रिये प्रीतिरेतावन्मित्रलक्षणम् ।**
**विपरीतं तु बोद्धव्यमरिलक्षणमेव तत् ॥ १२।१०३।५०**

मित्र पीडित झाला असतां आपण पीडित होणें आणि तो आनंदित असतां आनंदित होणें हें मित्राचें लक्षण होय. आणि याच्या उलट स्थिति असणें हें शत्रूचेंच लक्षण जाणावें.

**१६४ आर्येण हि न वक्तव्या**
**कदाचित्स्तुतिरात्मनः ॥ ७।१९५।२१**

आर्य मनुष्यानें केव्हांहि आत्मस्तुति करूं नये.

**१६५ आलस्यं मदमोहौ च चापलं गोष्ठिरेव च ।**
**स्तब्धता चाभिमानित्वं तथाऽत्यागित्वमेव च**
**एते वै सप्त दोषाः स्युः सदा विद्यार्थिनां मताः॥५।४०।५**

आळस, गर्व व मोह, चंचलपणा, जनसमुदायांत जाणें, उद्धटपणा, अभिमान आणि लोभ हे विद्यार्थ्यांचे नेहमीं सात दोष ( त्याज्य ) होत.

**१६६ आशां कालवतीं कुर्यात्कालं विघ्नेन योजयेत् ।**
**विघ्नं निमित्ततो ब्रूयान्निमित्तं चापि हेतुतः ॥१।१४०।८८**

[ प्रसंगविशेषीं शत्रूला ] आशाहि दाखवावी पण तिला काळाची मर्यादा सांगावी. आणि तो काळ आला म्हणजे ती सफल होण्याच्या मार्गांत विघ्नें उपस्थित करावीं. त्या विघ्नांचेंहि कांहींतरीं कारण सांगावें. आणि त्या कारणाच्याहि मूळाशीं कांहीं मतलब असावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१६७ आशां महत्तरां मन्ये पर्वतादपि सद्रुमात् ।**
**आकाशादपि वा राजन्नप्रमेयैव वा पुनः ॥ १२।१२५।६**

( युधिष्ठिर भीष्मांना म्हणतो ) राजा, मला वाटतें कीं वृक्षाच्छादित पर्वतापेक्षां आणि आकाशापेक्षांहि आशा ही मोठी आहे. खरोखर तिच्या मोठेपणाला सीमाच नाहीं !

**१६८ आशीविषैश्च तस्याहुः सङ्गतं यस्य राजभिः ॥१२।८२।२४**

जो राजेलोकांच्या समागमांत राहतो तो खरोखर सर्पांच्याच सहवासांत राहतो.

**१६९ आश्चर्याणामनेकानां प्रतिष्ठा भगवान् रविः ॥ १२।३६२।२**

भगवान् सूर्यनारायण अनेक चमत्कारांचें आश्रयस्थान आहे.

**१७० आश्रमांस्तुलया सर्वान्धृतानाहुर्मनीषिणः ।**
**एकतश्च त्रयो राजन् गृहस्थाश्रम एकतः ॥ १२।१२।१२**

एकीकडे बाकीचे तीन आश्रम व एकीकडे एकटा गृहस्थाश्रम ठेवला तरी बरोबरी होईल असें ज्ञाते लोक म्हणतात.

**१७१ इच्छतोरत्र यो लाभः स्त्रीपुंसोरमृतोपमः ।**
**अलाभश्चापि रक्तस्य सोऽपि दोषो विषोपमः॥१२।३२०।६९**

परस्परांची इच्छा करणाऱ्या स्त्रीपुरुषांना परस्परांचा लाभ होईल तर तो अमृततुल्य असतो, आणि न होईल तर तें दुःखहि विषतुल्यच होय.

**१७२ इज्याध्ययनदानानि तपः सत्यं क्षमा दमः ।**
**अलोभ इति मार्गोऽयं धर्मस्याष्टविधः स्मृतः ॥ ५।३५।५६**

यज्ञ, अध्ययन, दान, तप, सत्यपालन, क्षमाशीलता, इंद्रियनिग्रह आणि निर्लोभता असा आठ प्रकारचा धर्मप्राप्तीचा मार्ग सांगितलेला आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१७३ इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ।**
**बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामयं प्रहरिष्यति ।। १।१।२६८**

[ रामायण महाभारतादि ] इतिहास आणि पुराणें यांच्या अभ्यासानें वेदाध्ययनाची पूर्तता करावी. कारण, अर्धवट शिकलेल्या मनुष्याविषयीं वेदाला अशी धास्ती वाटते कीं, हा माझ्यावर प्रहार करील. ( म्हणजे अर्थाचा अनर्थ करून दुरुपयोग करील. )

**१७४ इत्यर्थमिष्यतेऽपत्यं तारयिष्यति मामिति ।।१।१५९।४**

मनुष्याला अपत्य एवढ्याकरितां हवें असतें कीं त्यानें आपल्याला [ नरकापासून ] तारावें.

**१७५ इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।**
**तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ।। ६।२७।३४**

इंद्रियें आणि त्यांचे विषय यांच्यामधील प्रीति व द्वेष हीं ठरलेलीं आहेत. त्यांच्या ताब्यांत मनुष्यानें जाऊं नये. कारण ते त्याचे शत्रु होत.

**१७६ इन्द्रियाणामनुत्सर्गो मृत्युनापि विशिष्यते ।**
**अत्यर्थं पुनरुत्सर्गो सादयेद्दैवतानपि ।। ५।३९।५३**

इंद्रियांचा आत्यंतिक निरोध मरणापेक्षांहि दुःसह होय, उलट तींच अजीबात मोकळीं सोडलीं असतां देवतांचा देखील नाश करतील.

**१७७ इन्द्रियाणां प्रसङ्गेन दोषमर्च्छत्यसंशयम् ।**
**संनियम्य तु तान्येव सिद्धिमाप्नोति मानवः।। १२।३२३।८**

मनुष्य इंद्रियांच्या नादीं लागला म्हणजे त्याच्या हातून निःसंशय पापाचरण घडतें. परंतु तींच ताब्यांत ठेवल्यानें सिद्धि ( मोक्ष ) प्राप्त करून घेतो.

**१७८ इन्द्रियाण्येव तत्सर्वं यत्स्वर्गनरकावुभौ ।**
**निगृहीतविसृष्टानि स्वर्गाय नरकाय च ।। ३।२११।१९**

स्वर्ग व नरक म्हणून जें कांहीं आहे तें सर्व इंद्रियेंच होत. कारण इंद्रियें, आंवरून धरल्यानें स्वर्गाला, आणि मोकळीं सोडल्यानें नरकाला, कारण होत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१७९ इन्द्रियाण्येव संयम्य तपो भवति नान्यथा ॥ ३।२११।१८**

इंद्रियांचें संयमन केल्यानेंच तपश्चर्या घडते, नाहीं तर घडत नाहीं.

**१८० इष्टं च मे स्यादितरच्च न स्या–**
**देतत्कृते कर्मविधिः प्रवृत्तः ।**
**इष्टं त्वनिष्टं च न मा भजेते–**
**त्येतत्कृते ज्ञानविधिः प्रवृत्तः ॥ १२।२०१।११**

मला इष्ट गोष्टी तेवढ्या घडाव्या व अनिष्ट टळाव्या यासाठीं कर्मकांडाची प्रवृत्ति आहे. इष्ट व अनिष्ट या दोहोंचाहि लेप मला न लागावा यासाठीं ज्ञानकांड आहे.

**१८१ इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः ।**
**तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥ ६।२७।१२**

( श्रीकृष्ण म्हणतात ) यज्ञानें तृप्त झालेले देव तुम्हांला ( यज्ञ करणाऱ्यांना ) इच्छित भोग देतील. त्यांनीं दिलेल्या त्या भोगांचा त्यांना दिल्याशिवाय जो उपभोग घेतो तो चोरच म्हटला पाहिजे.

**१८२ इह प्राज्ञो हि पुरुषः स्वल्पमप्रियमिच्छति ॥ ५।१३५।१७**

[ विदुला संजयाला म्हणते ] इहलोकीं शहाण्या मनुष्याला अल्पस्वल्पानें संतोष होत नाहीं.

**१८३ इह लोके हि धनिनां स्वजनः स्वजनायते ।**
**स्वजनस्तु दरिद्राणां जीवतामपि नश्यति ॥१२।३२१।८८**

या जगांत धनवान् लोकांचे आप्तेष्ट आप्तेष्टांसारखे वागतात. दरिद्री मनुष्याला मात्र आप्तेष्ट असून नसल्यासारखे होतात.

**१८४ ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥६।४२।६१**

( श्रीकृष्ण म्हणतात ) अर्जुना, परमेश्वर सर्व भूतांच्या अंतर्यामीं वास करतो, व आपल्या मायेच्या योगानें यंत्रानें चढविलेल्या [ कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें ] सर्व भूतांना नाचवीत असतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१८५ उच्चैर्वृत्तेः श्रियो हानिर्यथैव मरणं तथा ॥ १२।१३३।५**

उच्च वृत्तीनें राहणाऱ्या मनुष्याला संपत्तीचा नाश मरणासारखाच होय.

**१८६ उत्थानवीरः पुरुषो वाग्वीरानधितिष्ठति ॥ १२।५८।१५**

कर्तृत्ववान् पुरुष वाचाळ पुरुषांवर छाप ठेवतो.

**१८७ उत्थानहीनो राजा हि बुद्धिमानपि नित्यशः ।**
**प्रधर्षणीयः शत्रूणां भुजङ्ग इव निर्विषः ॥ १२।५८।१६**

राजा बुद्धिमान् असला तरी दुसऱ्यांवर चढाई न करील तर, विषहीन सर्पाप्रमाणें, नेहमीं शत्रूंच्या हल्ल्यांना पात्र होतो.

**१८८ उत्थानेनामृतं लब्धमुत्थानेनासुरा हताः ।**
**उत्थानेन महेन्द्रेण श्रैष्ठ्यं प्राप्तं दिवीह च ॥ १२।५८।१४**

[ देवांनासुद्धां ] प्रयत्नानेंच अमृताची प्राप्ति झाली, व प्रयत्नानेंच दैत्यांचा संहार करितां आला. इंद्रदेखील प्रयत्नानेंच इहपरलोकीं श्रेष्ठपणा मिळविता झाला.

**१८९ उत्थायोत्थाय गच्छेत नित्ययुक्तो रिपोर्गृहान् ।**
**कुशलं चास्य पृच्छेत यद्यप्यकुशलं भवेत् ॥ १२।१४०।२२**

नेहमीं सावध राहून दररोज उठून शत्रूच्या घरीं जावें आणि तो जरी खुशाल नसला तरी त्याला कुशलप्रश्न विचारावे.

**१९० उत्पन्नस्य रुरोः शृङ्गं वर्धमानस्य वर्धते ।**
**प्रार्थना पुरुषस्येव तस्य मात्रा न विद्यते ॥ १३।९३।४५**

उपजलेलें हरिणाचें पोर वाढूं लागलें कीं त्याच्याबरोबर त्यांचीं शिंगेंही वाढत जातात. तद्वत् मनुष्याची हांव तो वाढूं लागला कीं वाढूं लागते. मग तिला कांहीं मर्यादा रहात नाहीं.

**१९१ उत्साहश्चापि यत्नेन कर्तव्यो भूतिमिच्छता ॥ १।१४०।८५**

वैभवाची इच्छा करणाऱ्यानें उत्साहानें उद्योग केला पाहिजे.

**१९२ उदाराणां तु सत्कर्म दैवं क्लीबा उपासते ॥ १२।१३९।८२**

श्रेष्ठ प्रकारचे लोक सत्कर्मांची कास धरतात. दुबळे लोक दैवावर हवाला ठेवतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१९३ उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥६।३०।५

मनुष्यानें आपण होऊन आपला उद्धार करावा. आपण आपला नाश करूं नये. कारण, प्रत्येक मनुष्य आपणच आपला बंधु ( हितकर्ता ) किंवा आपणच आपला शत्रु होतो.

१९४ उद्यच्छेदेव न नमेदुद्यमो ह्येव पौरुषम् ।
अप्यपर्वणि भज्येत न नमेतेह कस्यचित् ॥१२।१३३।१०

मानी पुरुषानें नेहमीं ताठ ( बाणेदारपणानें ) असावें कधीं कोणापुढें वाकूं नये. ताठपणानें मोडावें पण ( कोणापुढेंहि ) वांकूं नये. न वांकणें हाच खरा मानीपणा.

१९५ उद्यम्य शस्त्रमायान्तमपि वेदान्तगं रणे ।
निगृह्णीयात्स्वधर्मेण धर्मापेक्षी नराधिपः ॥ १२।५६।२९

रणांगणांत शस्त्र उपसून धांवून येणारा शत्रु वेदान्तविद्यापारंगत असला तरी त्याचा, धर्माची आस्था बाळगणाऱ्या राजानें धर्मयुद्ध करून मोड करावा.

१९६ उन्मत्ता गौरिवान्धा श्रीः क्वचिदेवावतिष्ठते ॥ ५।३९।६६

उन्मत्त गाईप्रमाणें, अविचारी लक्ष्मी कोठें तरी रहात असते !

१९७ उपस्थितस्य कामस्य प्रतिवादो न विद्यते ।
अपि निर्मुक्तदेहस्य कामरक्तस्य किं पुनः ॥ ५।३९।४६

प्राप्त झालेल्या विषयाचा त्याग, देहाची पर्वा न करणाऱ्या जीवन्मुक्ताच्याहि हातून होणें शक्य नाहीं. मग विषयलंपट पुरुषाची गोष्ट कशाला पाहिजे !

१९८ ऊधश्छिन्द्यात्तु यो धेन्वाः क्षीरार्थी न लभेत्पयः ।
एवं राष्ट्रमयोगेन पीडितं न विवर्धते ॥ १२।७१।१६

दुधाच्या आशेनें जो गाईची कांस कापील त्याला दूध कधींच मिळणार नाहीं. त्याचप्रमाणें अयोग्य रीतीनें कर वगैरे लादून राष्ट्राला पीडा दिली असतां राष्ट्राचा उत्कर्ष होत नाहीं.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१९९ ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति मे ।**
**धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते ॥ १८।५।६२**

[ महर्षि व्यास म्हणतात. ] मी बाहू उभारून मोठ्यानें ओरडून सांगतों आहें पण कोणीच माझें ऐकत नाहीं. बाबांनो, धर्मापासूनच अर्थ व काम प्राप्त होतात त्या धर्माचें आचरण तुम्ही कां करीत नाहीं ?

**२०० ऊर्ध्वं प्राणा ह्युत्क्रामन्ति यूनः स्थविर आयति ।**
**प्रत्युत्थानाभिवादाभ्यां पुनस्तान्प्रतिपद्यते ॥ ५।३८।१**

कोणी वृद्ध पुरुष जवळ येऊं लागला कीं, तरुणाचे प्राण वर जाऊं लागतात. त्याला सामोरें जाऊन वंदन केल्यानें ते पुनः तरुणाला प्राप्त होतात.

**२०१ ऋणशेषमग्निशेषं शत्रुशेषं तथैव च ।**
**पुनः पुनः प्रवर्धन्ते तस्माच्छेषं न धारयेत् ॥१२।१४०।५८**

ऋण, अग्नि व शत्रु यांचा थोडासा भाग जरी शिल्लक राहिला तरी तो पुनः पुनः वाढूं लागतो. यास्तव त्यांचा कांहीं अवशेष ठेवूं नये.

**२०२ ऋषीणां च नदीनां च कुलानां च महात्मनाम् ।**
**प्रभवो नाधिगन्तव्यः स्त्रीणां दुश्चरितस्य च ॥५।३५।७२**

ऋषि, नद्या व थोर लोकांचें कुल, त्याचप्रमाणें स्त्रियांचें दुश्चरित्र यांचें मूळ शोधण्याच्या भरीस पडूं नये.

**२०३ एक एव चरेद्धर्मं नास्ति धर्मे सहायता ।**
**केवलं विधिमासाद्य सहायः किं करिष्यति॥१२।१९३।३२**

केवळ धर्मविधीचा आश्रय करून स्वतः एकट्यानेंच धर्माचें आचरण करावें. धर्माचरणांत दुसऱ्याच्या साहाय्याची अपेक्षाच नाहीं. मग साहाय्यकर्त्यांचा उपयोग काय ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२०४ एकं विषरसो हन्ति शस्त्रेणैकश्च वध्यते ।**
**सराष्ट्रं सप्रजं हन्ति राजानं मन्त्रविप्लवः ॥ ५।३३।४५**

विष एकालाच ठार मारतें आणि शस्त्रानेंसुद्धां एकाचाच घात होतो. परंतु राजाच्या गुप्त मसलतींत कांहीं बिघाड झाला, तर तो सर्व प्रजेसह राजाच्या नाशाला कारणीभूत होतो.

**२०५ एकं हन्यान्न वा हन्यादिषुर्मुक्तो धनुष्मता ।**
**बुद्धिर्बुद्धिमतोत्सृष्टा हन्याद्राष्ट्रं सराजकम् ॥ ५।३३।४३**

तिरंदाजानें सोडलेला तीर जेमतेम एका प्राण्याचा वध करील न करील. परंतु बुद्धिमान् पुरुषानें योजलेली युक्ति राजासह सर्व राष्ट्राचा घात करील.

**२०६ एकः क्रुद्धो ब्राह्मणो हन्ति राष्ट्रम् ॥ ५।४०।८**

क्रुद्ध झालेला एक ब्राह्मण सर्व राष्ट्राचा नाश करूं शकेल.

**२०७ एकः क्षमावतां दोषो द्वितीयो नोपपद्यते ।**
**यदेनं क्षमया युक्तमशक्तं मन्यते जनः ॥ ५।३३।४८**

क्षमाशील पुरुषांच्या ठायीं एकच दोष आढळतो, दुसरा नाहीं. तो दोष एवढाच कीं, त्याच्या सहनशीलतेमुळें लोक त्याला दुर्बल समजतात.

**२०८ एकः पापानि कुरुते फलं भुङ्क्ते महाजनः ।**
**भोक्तारो विप्रमुच्यन्ते कर्ता दोषेण लिप्यते ॥ ५।३३।४२**

एकजण पाप करतो व त्याचें फळ पुष्कळ लोकांना भोगावें लागतें. परंतु हे भोगणारे अजीबात सुटून जातात आणि कर्त्याला मात्र पापाचा दोष लागतो.

**२०९ एकत्र चिरवासो हि न प्रीतिजननो भवेत् ॥ ३।३६।३६**

एकाच ठिकाणीं फार दिवस राहणें सुखावह होत नाहीं.

**२१० एकमेव हि लोकेऽस्मिन्नात्मनो गुणवत्तरम् ।**
**इच्छन्ति पुरुषाः पुत्रं लोके नान्यं कथंचन ॥ ७।१९४।५**

या जगांत एक पुत्रच तेवढा आपल्यापेक्षां अधिक गुणवान् व्हावा, असें लोक इच्छीत असतात; दुसरा कोणीहि असा वरचढ होण्याची इच्छा करीत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२११ एकशत्रुवधेनैव शूरो गच्छति विश्रुतिम् ॥ ५।१३४।२३**

एका शत्रूचा वध करितांच शूराची प्रसिद्धि होत असते.

**२१२ एकः शत्रुर्न द्वितीयोऽस्ति शत्रुः**
**अज्ञानतुल्यः पुरुषस्य राजन् ॥ १२।२९७।२८**

मनुष्याचा एकच शत्रु आहे, अज्ञानासारखा दुसरा कोणताच शत्रु नाहीं.

**२१३ एकस्मिन्नेव जायेते कुले क्लीबमहाबलौ ।**
**फलाफलवती शाखे यथैकस्मिन्वनस्पतौ ॥ ५।३।३**

एकाच वृक्षावर ज्याप्रमाणें फळांनीं भरलेली व फलरहित अशा दोनहि प्रकारच्या खांद्या असतात, त्याप्रमाणें एकाच कुळांत अति बलिष्ठ व अत्यंत दुर्बळ पुरुष जन्माला येतात.

**२१४ एकस्मिन्नेव पुरुषे सा सा बुद्धिस्तदा तदा ।**
**भवत्यकृतधर्मत्वात् सा तस्यैव न रोचते ॥ १०।३।१३**

मनावर धर्माचा संस्कार झालेला नसल्यामुळें एकाच मनुष्याच्या ठिकाणीं समयानुरूप निरनिराळे विचार उत्पन्न होतात, व पुढें ते त्याचे त्यालाच आवडेनासे होतात.

**२१५ एकान्ततो न विश्वासः कार्यो विश्वासघातकैः॥१२।१३९।२८**

विश्वासघात करणाऱ्यांवर पूर्ण विश्वास टाकूं नये.

**२१६ एकान्तेन हि विश्वासः कृत्स्नो धर्मार्थनाशकः ।**
**अविश्वासश्च सर्वत्र मृत्युना च विशिष्यते ॥ १२।८०।१०**

कोणावरहि सर्वथा विश्वास ठेविल्यानें धर्म व अर्थ यांचा नाश होतो. उलट, कोणाचाच विश्वास न धरणें हें मरणापेक्षां दुःखदायक होय.

**२१७ एकान्तेन हि सर्वेषां न शक्यं तात रोचितुम् ॥ १२।८९।१९**

कोणतीहि गोष्ट सर्वांना सर्वथा आवडणें शक्य नाहीं.

**२१८ एतज्ज्ञानं विदुर्विप्रा ध्रुवमिन्द्रियधारणम् ॥ ५।६९।२०**

खरोखर इंद्रियें ताब्यांत ठेवणें यालाच ज्ञाते पुरुष ज्ञान असें म्हणतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२१९ एतत्पृथिव्याममृतमेतच्चक्षुरनुत्तमम् ।**
**यद्ब्राह्मणमुखाच्छास्त्रमिह श्रुत्वा प्रवर्तते ॥ १३।३६।१०**

ब्राह्मणाच्या तोंडून शास्त्रार्थ ऐकून त्याप्रमाणें वर्तन करणें हें पृथ्वीवरील अमृत होय, हेंच सर्वोत्कृष्ट दिव्य ज्ञान होय.

**२२० एतावानेव पुरुषः कृतं यस्मिन्न नश्यात ॥ १।१५७।१४**

ज्याच्या ठिकाणीं केलेला उपकार व्यर्थ जात नाहीं तोच मनुष्य म्हणावयाचा.

**२२१ एतावानेव पुरुषो यदमर्षी यदक्षमी ॥ ५।१३३।३३**

जो अपमान व अपकार सहन करीत नाहीं, तोच पुरुष.

**२२२ ऐकगुण्यमनीहायामभावः कर्मणां फलम् ।**
**अथ द्वैगुण्यमीहायां फलं भवति वा न वा ॥ ५।१३५।२८**

उद्योगरहित राहिलें असतां उद्योगानें प्राप्त होणारें जें फल त्याचा अभाव हा एकच प्रकार संभवतो. परंतु उद्योग करीत राहिलें असतां, फल प्राप्त होणें व न होणें असे दोन प्रकार संभवतात.

**२२३ ऐश्वर्यमदमत्तो हि नापतित्वा विबुध्यते ॥ ५।३४।५३**

ऐश्वर्यमदानें धुंद झालेला मनुष्य ऐश्वर्यापासून भ्रष्ट झाल्याशिवाय शुद्धीवर येत नाहीं.

**२२४ कः कस्य चोपकुरुते कश्च कस्मै प्रयच्छति ।**
**प्राणी करोत्ययं कर्म सर्वमात्मार्थमात्मना ॥ १२।२९२।१**

कोण कोणावर उपकार करणार ? आणि कोण कोणाला देणार ? जो तो प्राणी सर्व कांहीं स्वतःकरितां करीत असतो.

**२२५ कच्चिच्छारीरमाबाधमौषधैर्नियमेन वा ।**
**मानसं वृद्धसेवाभिः सदा पार्थापकर्षसि ॥ २।५।८९***

[ नारदमुनि विचारतात ] बा युधिष्ठिरा, शारीरिक पीडा औषधानें व नियमित आचरणानें आणि मानसिक पीडा वृद्ध जनांची सेवा करून तूं नेहमीं दूर करतोस ना ?

* श्लोक २२५ ते २३१ नारदमुनींनी युधिष्ठिराला विचारलेल्या ‘ कच्चित-प्रश्नांतील ’ आहेत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२२६ कच्चित्कृतं विजानीषे कर्तारं च प्रशंससि ।**
**सतां मध्ये महाराज सत्करोषि च पूजयन् ॥ २।५।११९**

( नारदमुनि युधिष्ठिराला विचारितात ) राजा, तूं केलेला उपकार स्मरतोस ना ? आणि उपकारकर्त्याची प्रशंसा करतोस ना ? त्याचप्रमाणें चांगल्या लोकांसमोर त्याचा गौरव करून सत्कार करतोस ना ?

**२२७ कच्चित्ते सर्वविद्यासु गुणतोऽर्चा प्रवर्तते ॥ २।५।९६**

[ राजा ], तूं सर्व विद्यांचा त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें परामर्ष घेतोस ना ?

**२२८ कच्चित्सहस्रैर्मूर्खाणामेकं क्रीणासि पण्डितम् ।**
**पण्डितो ह्यर्थकृच्छ्रेषु कुर्यान्निःश्रेयसं परम् ॥ २।५।३५**

हजारों मूर्ख देऊन त्यांच्या बद्दल एक पंडित तूं विकत घेतोस का ? कारण अडीअडचणीच्या प्रसंगीं पंडिताचा फार उपयोग होईल.

**२२९ कच्चिद्द्वौ प्रथमौ यामौ रात्रेः सुप्त्वा विशांपते ।**
**संचिन्तयसि धर्मार्थौ याम उत्थाय पश्चिमे ॥ २।५।८५**

राजा, रात्रींच्या दुसऱ्या व तिसऱ्या ह्या दोन प्रहरांत झोंप घेतोस ना ? शेवटच्या ( चौथ्या ) प्रहरीं उठून तूं धर्मार्थांचें चिंतन करतोस ना ?

**२३० कच्चिद्राष्ट्रे तडागानि पूर्णानि च बृहन्ति च**
**भागशो विनिविष्टानि न कृषिर्देवमातृका ॥ २।५।७७**

तुझ्या राज्यांत पाण्यानें तुडुंब भरलेले मोठाले तलाव जागोजाग खोदलेले आहेत ना ? शेती केवळ पावसावर अवलंबून नाहीं ना ?

**२३१ कच्चिद्विद्याविनीतांश्च नराञ्ज्ञानविशारदान् ।**
**यथार्हं गुणतश्चैव दानेनाभ्युपपद्यसे ॥ २।५।५२**

विद्याविनयसंपन्न व कलाकुशल गुणी जनांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें व गुणाप्रमाणें पारितोषिकें देऊन त्यांचा गौरव करतोस ना ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२३२ कपाले यद्वदापः स्युः श्वदृतौ च यथा पयः ।**
**आश्रयस्थानदोषेण वृत्तहीने तथा श्रुतम् ॥ १२।३६।४२**

ज्याप्रमाणें मस्तकाच्या कवटींत ठेवलेलें पाणी किंवा कुत्र्याच्या कातड्याच्या पिशवींत घातलेलें दूध आश्रयस्थान वाईट असल्यामुळें दूषित होतें, त्याप्रमाणें आचारहीन मनुष्याचें ज्ञान व्यर्थ होतें.

**२३३ करिष्यन्न प्रभाषेत कृतान्येव तु दर्शयेत् ॥ ५।३८।१६**

एकादी गोष्ट करण्याचें मनांत असतांच उगाच बोलूं नये. काय तें करूनच दाखवावें.

**२३४ कर्णिनालीकनाराचान् निर्हरन्ति शरीरतः ।**
**वाक्शल्यस्तु न निर्हर्तुं शक्यो हृदिशयो हि सः॥५।३४।७९**

शरीरांत रुतलेला बाण, तीर किंवा भाला उपटून काढतां येतो. वाग्बाण मात्र उपटून काढतां येत नाहीं; कारण तो हृदयांत खोल शिरून बसलेला असतो.

**२३५ कर्तव्यमिति यत्कार्यं नाभिमानात्समाचरेत् ॥३।२।७६**

कर्तव्य म्हणून जें करावयाचें तें अहंकारबुद्धीनें करूं नये.

**२३६ कर्मणा येन केनैव मृदुना दारुणेन च ।**
**उद्धरेद्दीनमात्मानं समर्थो धर्ममाचरेत् ॥१।१४०।७२**

सौम्य किंवा तीव्र कोणत्याहि उपायानें प्रथमतः आपला हीन स्थितींतून उद्धार करावा; आणि समर्थ होऊन धर्माचरण करावें.

**२३७ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥६।२६।४७**

[अर्जुना], फक्त कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे, कर्मफलाच्या ठिकाणीं मुळींच नाहीं. [यासाठीं] तूं कर्मफलाची इच्छा करूं नकोस. तसेंच कर्म न करण्याचाहि आग्रह धरूं नको.

**२३८ कर्मभूमिरियं ब्रह्मन् फलभूमिरसौ मता ॥३।२६१।३५**

मृत्युलोक ही कर्मभूमि असून परलोक ही फलभूमि आहे, असें म्हणतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२३९ कल्योत्थानरतिर्नित्यं गृहशुश्रूषणे रता ।**
**सुसंमृष्टक्षया चैव गोशकृत्कृतलेपना ॥ १३।१४६।४८**

[ स्त्रीनें ] सकाळीं लवकर उठून दक्षतेनें घरकाम करावें. सर्व घर उत्तमप्रकारें झाडून स्वच्छ करावें. आणि गाईच्या शेणानें सारवून काढावें.

**२४० कश्चित्तरति काष्ठेन सुगम्भीरां महानदीम् ।**
**स तारयति तत्काष्ठं स च काष्ठेन तार्यते॥१२।१३८।६२**

एकादा प्राणी लाकडाच्या ओंड्याचा आश्रय करून अतिखोल व विस्तीर्ण नदी तरून जातो. [ त्यासमयीं ] तो त्या लाकडाला नदीपार करतो, व लाकूडहि त्याला तारून नेतें.

**२४१ कामक्रोधग्राहवतीं पञ्चेन्द्रियजलां नदीम् ।**
**नावं धृतिमयीं कृत्वा जन्मदुर्गाणि संतर ॥५।४०।२२**

काम व क्रोध ह्या जिच्यांतील सुसरी आहेत, आणि चक्षुरादि पांच इंद्रियें हें जिच्यांतील उदक आहे, अशी ही संसाररूप नदी ज्ञानरूप नौकेचें अवलंबन करून जन्ममरणपरंपरारूप धोक्याचीं स्थळें चुकवून तरून जा.

**२४२ कामचारी तु कामेन य इन्द्रियसुखे रतः ।**
**ब्रह्मचारी सदैवैष य इन्द्रियजये रतः ॥ १४।२६।१५**

विषयलालसेनें जो इंद्रियसुखांत गढून जातो तो कामचारी होय. जो सदैव इंद्रियांचें दमन करण्यांत आनंद मानतो तो ब्रह्मचारी होय.

**२४३ कामं नैतत्प्रशंसन्ति सन्तः स्वबलसंस्तवम् ।**
**गुणसंकीर्तनं चापि स्वयमेव शतक्रतो ॥ १।३४।२**

( गरूड म्हणतो ) हे इंद्रा, स्वतःच्या बळाची स्तुति करणें आणि आपणच आपलें गुणवर्णन करणें हें सज्जनांना मुळींच प्रशस्त वाटत नाहीं.

**२४४ कामे प्रसक्तः पुरुषः किमकार्यं विवर्जयेत् ॥१२।८८।२१**

कामासक्त पुरुष कोणतें अकार्य वर्ज्य करील ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२४५ काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।**
**सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ ६।४२।२**

[ भगवान् श्रीकृष्ण सांगतात ] सकाम कर्मांचा त्याग करणें यालाच ज्ञाते पुरुष संन्यास असें म्हणतात. आणि सर्व कर्मांच्या फलाचा म्हणजे फलाशेचा त्याग करणें यालाच शहाणे लोक त्याग म्हणतात.

**२४६ कारणात्प्रियतामेति**
**द्वेष्यो भवति कारणात् ।**
**अर्थार्थी जीवलोकोऽयं**
**न कश्चित्कस्यचित्प्रियः ॥ १२।१३८।१५२**

कोणी झाला तरी कांहींतरी कारणानेंच प्रिय वाटतो, व कारणानेंच द्वेष्य वाटतो. हें जग सगळें स्वार्थी आहे. [ खरोखर निष्कारण ] कोणी कोणाला प्रिय नसतो.

**२४७ कारणाद्धर्ममन्विच्छेन्न लोकचरितं चरेत् ॥ १२।२६२।५३**

हेतूकडे लक्ष्य देऊन धर्माचरण करावें, केवळ लोकांनीं केलें म्हणून आपणहि तसें करूं नये.

**२४८ कार्यापेक्षा हि वर्तन्ते**
**भावस्निग्धाः सुदुर्लभाः ॥ १२।१११।८६**

कार्याच्या अपेक्षेनेंच लोक प्रेमानें वागतात. खरोखर स्वभावतःच प्रेमळ असे लोक अत्यंत दुर्लभ.

**२४९ कालः कर्षति भूतानि सर्वाणि विविधान्युत ।**
**न कालस्य प्रियः कश्चिन्न द्वेष्यः कुरुसत्तम ॥ ११।२।८**

[ विदुर धृतराष्ट्राला म्हणतो. ] हे कुरुश्रेष्ठा, निरनिराळ्या प्रकारच्या सर्व प्राण्यांना काळ ओढून नेतो. काळाला कोणी प्रिय नाहीं, कोणी द्वेष्य नाहीं.

**२५० कालः पचति भूतानि कालः संहरते प्रजाः ।**
**कालः सुप्तेषु जागर्ति कालो हि दुरतिक्रमः ॥ ११।२।२४**

काळ प्राण्यांना शिजवून काढतो; काळ प्रजेचा संहार करतो, सर्व प्राणी झोंपीं गेले असतां काळ जागा राहतो. खरोखर काळाचें अतिक्रमण करणें अशक्य आहे !

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२५१ कालः पचति भूतानि सर्वाण्येवात्मनात्मनि ।**
**यस्मिंतु पच्यते कालस्तं वेदेह न कश्चन ॥ १२।२३९।२५**

काळ स्वतः सर्व प्राण्यांना आपल्या पचनीं पाडतो, परंतु काळाला जो पचनीं पाडतो त्या परमात्म्याला कोणीच जाणत नाहीं.

**२५२ कालमूलमिदं सर्वं भावाभावौ सुखासुखे ॥ १।१।२४७**

जन्म आणि मृत्यु, सुख आणि दुःख हीं सर्व काळावर अवलंबून आहेत.

**२५३ काले काले तु संप्राप्ते मृदुस्तीक्ष्णोऽपि वा भवेत् ॥३।२८।२४**

जसजशी वेळ येईल त्याप्रमाणें सौम्य किंवा कठोर वृत्तीनें वागावें.

**२५४ कालेन पादं लभते तथार्थं**
**ततश्च पादं गुरुयोगतश्च ।**
**उत्साहयोगेन च पादमृच्छेत्**
**शास्त्रेण पादं च ततोऽभियाति ॥ ५।४४।१६**

प्रथमतः गुरूंपासून चतुर्थांश विद्या प्राप्त होते; नंतर आपल्या बुद्धिवैभवानें चतुर्थांश; कालांतरानें विचारपरिपक्वतेमुळें चतुर्थांश; आणि आपल्याबरोबरच्या लोकांशीं चर्चा केल्याचे योगानें ( विचारविनिमयानें ) चतुर्थांश विद्या प्राप्त होते. ( या श्लोकांत पाठक्रमाहून अर्थक्रम भिन्न आहे असें टीकाकारांनीं म्हटलें आहे त्याला अनुसरून वरील अर्थ दिला आहे. )

**२५५ कालेन रिपुणा संधिः काले मित्रेण विग्रहः ।**
**कार्य इत्येव संधिज्ञाः प्राहुर्नित्यं नराधिप ॥ १२।१३८।२०८**

( भीष्म युधिष्ठिराला म्हणतात. ) हे राजा, प्रसंगानुसार शत्रूशींहि संधि करावा, व मित्राशींहि विरोध करावा, असेंच संधिवेत्ते लोक सदैव सांगत असतात.

**२५६ कालेनाभ्याहताः सर्वे कालो हि बलवत्तरः ॥ १२।२२७।५६**

काळानें सर्वांना मारून टाकलें आहे. काळ सर्वांना पुरून उरला आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२५७ काले मृदुर्यो भवति काले भवति दारुणः।**
**प्रसाधयति कृत्यानि शत्रुं चाप्यधितिष्ठति॥१२।१४०।६७**

योग्य वेळीं जो सौम्य होतो व योग्यवेळीं भयंकर होतो त्याचीं सर्व कार्यें सिद्धीस जातात आणि तोच शत्रूला आपल्या ताब्यांत ठेवितो.

**२५८ काले हि समनुप्राप्ते त्यक्तव्यमपि जीवनम् ॥ ५।९०।७७**

तसाच प्रसंग पडला असतां जीविताचासुद्धां त्याग केला पाहिजे.

**२५९ कालो न परिहार्यश्च न चास्यास्ति व्यतिक्रमः॥१२।२२७।९७**

काळाला चुकवितां येणें शक्य नाहीं. तसेंच त्याचा प्रतिकारहि करितां यावयाचा नाहीं.

**२६० कालोपहतचित्ता हि सर्वे मुह्यन्ति भारत ॥ ९।६३।४७**

खरोखर काळानें बुद्धि ग्रासून टाकली असतां सर्वांना मोह पडत असतो.

**२६१ कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम्।**
**इति ते संशयो माभूद्राजा कालस्य कारणम् ॥ १२।६९।७९**

( भीष्म युधिष्ठिराला म्हणतात. ) काळ हा राजाला कारण होतो का राजा हाच काळाला कारण होतो, याविषयीं तूं संशयांत पडूं नको. कांकीं, राजा हाच काळाला कारण आहे.

**२६२ कालो हि परमेश्वरः ॥ १३।१४८।३९**

काळ हा खरोखर परमेश्वरच आहे !

**२६३ किंचिदेव ममत्वेन यदा भवति कल्पितम्।**
**तदेव परितापार्थं नाशे संपद्यते पुनः ॥ १२।२७६।८**

एकाद्या वस्तूविषयीं 'ही माझी' अशी भावना धरिली, म्हणजे त्या वस्तूचा नाश झाला असतां तीच दुःखाला कारण होते.

**२६४ किं तस्य तपसा राज्ञः किंच तस्याध्वरैरपि।**
**सुपालितप्रजो यः स्यात् सर्वधर्मविदेव सः ॥ १२।६९।७३**

जो राजा प्रजेचें उत्तम प्रकारें पालन करितो तो सर्व धर्म जाणणाराच होय. अशा राजाला तप काय करावयाचें ? यज्ञांची तरी त्याला काय गरज ?

**२६५ किं तु रोषान्वितो जन्तुर्हन्यादात्मानमप्युत ॥ ७।१५६।९५**

खरोखर क्रोधाविष्ट झालेला मनुष्य स्वतःचा देखील घात करील.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२६६ किं तैर्येऽनडुहो नोह्याः किं धेन्वा वाप्यदुग्धया ।**
**वन्ध्यया भार्यया कोऽर्थः कोऽर्थो राज्ञाप्यरक्षता॥ १२।७८।४१**

जे वाहून नेण्याच्या कामीं येत नाहींत त्या बैलांचा काय उपयोग ? दूध न देणारी गाय काय कामाची ? वांझ स्त्री काय करावयाची ? तसेंच, रक्षण न करणारा राजा हवा कशाला ?

**२६७ किं नु मे स्यादिदं कृत्वा किं नु मे स्यादकुर्वतः ।**
**इति कर्माणि संचिन्त्य कुर्याद्वा पुरुषो न वा ॥५।३४।१९**

हें केल्यानें माझा काय फायदा होईल, न केल्यानें काय तोटा होईल, असा विचार करून मग कोणतेंहि कार्य मनुष्यानें करावें अथवा करूं नये.

**२६८ कीर्तिरक्षणमातिष्ठ कीर्तिर्हि परमं बलम् ।**
**नष्टकीर्तेर्मनुष्यस्य जीवितं ह्यफलं स्मृतम् ॥ १।२०३।१०**

कीर्ति राखण्याकरितां झटून प्रयत्न कर. कारण, कीर्ति हें श्रेष्ठ प्रकारचें बल आहे. ज्याची कीर्ति नष्ट झाली त्या मनुष्याचें जिणें व्यर्थ गेलें.

**२६९ कीर्तिर्हि पुरुषं लोके संजीवयति मातृवत् ।**
**अकीर्तिर्जीवितं हन्ति जीवतोऽपि शरीरिणः॥ ३।३००।३२**

कीर्ति ही मातेप्रमाणें मनुष्याला जगांत खरेंखुरें जीवन प्राप्त करून देते. अपकीर्ति जिवंत असलेल्या प्राण्याच्याहि जीविताचा नाश करिते.

**२७० कुतः कृतघ्नस्य यशः कुतः स्थानं कुतः सुखम् ।**
**अश्रद्धेयः कृतघ्नो हि कृतघ्ने नास्ति निष्कृतिः॥१२।१७३।२०**

कृतघ्न मनुष्याला यश कोठून येणार ? अधिकार कोठचा ? आणि सुख तरी कोठचें ? [ अर्थात् त्याला यांपैकीं कांहींच मिळत नाहीं ]. कारण, कृतघ्न हा अविश्वसनीय बनलेला असतो. कृतघ्नाला प्रायश्चित्त नाहीं.

**२७१ कुर्यात्कृष्णगतिः शेषं ज्वलितोऽनिलसारथिः ।**
**न तु राजाभिपन्नस्य शेषं क्वचन विद्यते ॥ १२।६८।५०**

वारा ज्याचा सहकारी आहे असा प्रज्वलित झालेला अग्नि एक वेळ दग्ध केलेल्या वस्तूंतील कांहीं शेष ठेवील. परंतु राजानें ज्याच्यावर हल्ला केला त्याचें कांहींएक शिल्लक राहणार नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२७२ कुर्यात्तृणमयं चापं शयीत मृगशायिकाम् ।**
**अन्धःस्यादन्धवेलायां बाधिर्यमपि संश्रयेत्॥१२।१४०।२७**

[ राजानें प्रसंगविशेषीं ] तृणाचें देखील धनुष्य करावें, हरिणाप्रमाणें सावधपणानें झोंप घ्यावी, अंध होण्याचा प्रसंग आल्यास अंधाप्रमाणें वागावें, व [ बधिर होण्याचा प्रसंग आल्यास ] बहिरेपणाचाहि आश्रय करावा.

**२७३ कुलानि समुपेतानि गोभिः पुरुषतोऽर्थतः ।**
**कुलसंख्यां न गच्छन्ति यानि हीनानि वृत्ततः॥५।३६।२८**

गोधन, कर्तबगार पुरुष आणि द्रव्य यांच्या योगानें कुलांना मोठेपणा प्राप्त होत असतो. पण तीं आचारभ्रष्ट असलीं तर त्यांची गणना चांगल्या कुळांत होत नाहीं.

**२७४ कुलीनस्य च या निन्दा वधो वाऽमित्रकर्शन ।**
**महागुणो वधो राजन्न तु निन्दा कुजीविका ॥५।७३।२४**

( श्रीकृष्ण म्हणतात. ) हे शत्रुनाशका धर्मराजा, कुलीन पुरुषाची निंदा अथवा वध होण्याचा प्रसंग आला असतां त्याचा वध होणें फार बरें; जीवितच दुःखदायक करून टाकणारी निंदा बरी नव्हे.

**२७५ कृतज्ञेन सदा भाव्यं मित्रकामेन चैव ह ॥ १२।१७३।२२**

मनुष्यानें सदैव कृतज्ञ असावें, व मित्र जोडण्याविषयीं इच्छा बाळगावी.

**२७६ कृतं ममाप्रियं तेन येनायं निहतो मृधे ।**
**इति वाचा वदन्हन्तॄन् पूजयेत रहोगतः ॥ १२।१०२।३७**

‘ संग्रामांत ज्यानें या योद्ध्याचा वध केला असेल त्यानें माझें अप्रिय केलें ’ असे उद्गार तोंडानें काढावे, आणि अंतस्थ रीतीनें त्या शत्रूला ठार मारणाऱ्यांचा गौरव करावा.

**२७७ कृतवैरे न विश्वासः कार्यस्त्विह सुहृद्यपि ।**
**छन्नं संतिष्ठते वैरं गूढोऽग्निरिव दारुषु ॥ १२।१३९।४४**

वैर करणारा मनुष्य जरी मूळचा मित्र असला तरी त्याजवर विश्वास ठेवूं नये. कारण, लाकडांत दडून राहिलेल्या अग्नीप्रमाणें वैर गुप्तपणें वसत असतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२७८ कृतार्था भुञ्जते दूताः पूजां गृह्णन्ति चैव ह ॥ ५।९१।१८**

चांगले दूत कामगिरी पार पाडल्यावरच आराम करतात व सत्कार स्वीकारतात.

**२७९ कृती सर्वत्र लभते प्रतिष्ठां भाग्यसंयुताम् ।**
**अकृती लभते भ्रष्टः क्षते क्षारावसेचनम् ॥१३।६।११**

कार्यांत सिद्धि पावलेल्या मनुष्याला सर्वत्र मानसन्मान व सद्भाग्य लाभतें. यशस्वी न झालेला, जखमेवर खारें पाणी शिंपडावें त्याप्रमाणें तिरस्काराला पात्र होतो.

**२८० कृपणं विलपन्नार्तो जरयाभिपरिप्लुतः ।**
**म्रियते रुदतां मध्ये ज्ञातीनां न स पूरुषः ॥ ९।५।३४**

शरीर जरेनें व्यापलेलें, व्याधिग्रस्त होऊन करुणपणें विलाप करतो आहे आणि आप्तस्वकीय भोंवताली बसून रडत आहेत अशा स्थितींत जो मरण पावतो, तो पुरुषच नव्हे.

**२८१ कृपणाः फलहेतवः ॥ ६।२६।४९**

कर्मफलाची इच्छा करणारे दीन होत.

**२८२ के न हिंसन्ति जीवान्वै लोकेऽस्मिन्द्विजसत्तम ।**
**बहु संचिन्त्य इति वै नास्ति कश्चिदहिंसकः ॥३।२०८।३३**

( धर्मव्याध म्हणतो. ) या मर्त्यलोकांत जीवांची हिंसा कोण करीत नाहींत ? या विषयीं पुष्कळ विचार केला असतां [ असें दिसून येतें कीं ] खरोखर मुळींच हिंसा न करणारा कोणीच नाहीं.

**२८३ को हि जानाति कस्याद्य मृत्युकालो भविष्यति ।**
**युवैव धर्मशीलःस्यादनित्यं खलु जीवितम् ॥१२।१७५।१६**

आज कोणाचा मरणदिवस आहे हें कोण जाणूं शकेल ? [ अर्थात् कोणीच नाहीं. या साठीं ] मनुष्यानें तरुणपणींच धर्मपरायण व्हावें. कारण, जीवित हें खरोखर क्षणभंगुर आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२८४ को हि नाम पुमाँल्लोके मर्षयिष्यति सत्त्ववान् ।**
**सपत्नानृध्यतो दृष्ट्वा हीनमात्मानमेव च ॥ २।४७।३२**

आपल्या वैऱ्यांचा उत्कर्ष होत आहे, आणि आपण मात्र हीनास्थितींत आहों, असें पाहून खरोखर कोणता बाणेदार पुरुष तें सहन करील ?

**२८५ कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥६।३३।३१**

(श्रीकृष्ण म्हणतात.) अर्जुना, माझा ( भगवंताचा ) भक्त कधींहि नाश पावत नाहीं हें तूं पक्कें समज.

**२८६ क्रव्यादा अपि राजेन्द्र कृतघ्नं नोपभुञ्जते ॥ १२।१७२।२४**

हिंस्र पशुपक्षीसुद्धां कृतघ्नाला भक्षण करीत नाहींत.

**२८७ क्लीबा हि वचनोत्तराः ॥ ५।१६२।४४**

नामर्द लोक नुसते बोलण्यांत शूर असतात.

**२८८ क्लेशान्मुमुक्षुः परजात्स वै पुरुष उच्यते ॥ २।४९।१३**

शत्रूकडून होणारी पीडा दूर करण्यास झटतो त्यालाच पुरुष म्हणावें.

**२८९ क्षताद्भीतं विजानीयादुत्तमं मित्रलक्षणम् ।**
**ये तस्य क्षतमिच्छन्ति ते तस्य रिपवः स्मृताः ॥१२।८०।१९**

[ राजावर ] येणाऱ्या संकटाची भीति वाटणें हें ( राजाच्या ) उत्तम मित्राचें लक्षण होय आणि जे त्याचा नाश इच्छितात ते त्या राजाचे शत्रुच होत.

**२९० क्षत्रधर्मं विदित्वाहं यदि ब्राह्मण्यमाश्रितः ।**
**प्रकुर्यां सुमहत्कर्म न मे तत्साधुसंमतम् ॥ १०।३।२२**

[ अश्वत्थामा कृपाचार्यांस म्हणतो. ] क्षत्रिय धर्म एकदा पत्करल्यावर जर मी ब्राह्मणधर्माला अनुसरून शमदमादिक मोठमोठीं साधनें करीत बसेन, तर तें माझें करणें सज्जनांना पसंत पडणार नाहीं. ( ' विदित्वा ' म्हणजे जाणून असा नेहमींचा अर्थ असतां या ठिकाणीं ' पत्करल्यावर ' असा अर्थ प्रसंगानें व लक्षणेनें घेतला आहे. )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२९१ क्षत्रियस्य मलं भैक्ष्यं ब्राह्मणस्याव्रतं मलम् । ८।४५।२३**

भिक्षा मागणें हें क्षत्रियाला लांछन आहे, व्रतादिकांचा त्याग करणें हें ब्राह्मणाल लांछन आहे.

**२९२ क्षत्रियस्य महाराज जये वृत्तिः समाहिता ।**
**स वै धर्मस्त्वधर्मो वा स्ववृत्तौ का परीक्षणा ॥ २।५५।७**

युद्धांत जय मिळविणें हा क्षत्रियाचा व्यवसाय ठरलेला आहे; मग त्यांत धर्म असो किंवा अधर्म असो. स्वतःच्या व्यवसायाची चिकित्सा करून काय फायदा ?

**२९३ क्षत्रियस्य विशेषेण हृदयं वज्रसंनिभम् ॥ १२।२२।९**

क्षत्रियाचें अंतःकरण विशेषेंकरून वज्रासारखें कठीण असलें पाहिजे.

**२९४ क्षत्रियस्य सदा धर्मो नान्यः शत्रुनिबर्हणात् ॥ ४।२१।४३**

सदोदित शत्रूचें पारिपत्य करणें याशिवाय क्षत्रियाचा दुसरा धर्म नाहीं.

**२९५ क्षत्रियस्य हि धर्मोऽयं हन्याद्धन्येत वा पुनः ॥७।१९७।३८**

एकतर मारावें, नाहीं तर मरून जावें हाच क्षत्रियाचा धर्म.

**२९६ क्षत्रियस्यातिवृत्तस्य ब्राह्मणेषु विशेषतः ।**
**ब्रह्मैव संनियन्तृ स्यात्क्षत्रं हि ब्रह्मसंभवम् ॥१२।७८।२१**

क्षत्रिय जर आपला धर्म सोडून विशेषतः ब्राह्मणांवर अत्याचार करूं लागेल, तर ब्राह्मणच त्याचें नियमन करील. कारण, क्षत्रिय हा ब्राह्मणापासून उत्पन्न झालेला आहे.

**२९७ क्षत्रियाणां बलं तेजो ब्राह्मणानां क्षमा बलम् ॥१।१७५।२९**

क्षत्रियांचें बळ पराक्रम. ब्राह्मणांचें बळ क्षमाशीलता.

**२९८ क्षममाणं नृपं नित्यं नीचः परिभवेज्जनः ।**
**हस्तियन्ता गजस्येव शिर एवारुरुक्षति ॥ १२।५६।३९**

राजा सदैव अपराध सहन करूं लागला, म्हणजे निकृष्ट प्रतीचे लोकसुद्धां त्याची अवज्ञा करूं लागतात. ( इतकेंच नव्हे तर ) हत्तीच्या मस्तकावर आरोहण करणाऱ्या महाताप्रमाणें ते त्याच्या डोक्यावर बसण्याची इच्छा करूं लागतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२९९ क्षमा गुणो ह्यशक्तानां शक्तानां भूषणं क्षमा ॥ ५।३३।४९**

क्षमा हा दुर्बळांचा गुण, व समर्थांचें भूषण होय.

**३०० क्षमा प्रशस्यते लोके न तु पापोऽर्हति क्षमाम् ॥ ७।१९८।२६**

क्षमा करणें ही गोष्ट लोकांत चांगली समजली जाते. तरीपण पापी मनुष्य क्षमेला पात्र नाहीं.

**३०१ क्षमावन्तं हि पापात्मा जितोऽयमिति मन्यते ॥ ७।१९८।२७**

क्षमा करणाऱ्याविषयीं दुष्ट मनुष्याला वाटतें कीं आपण याला जिंकलें.

**३०२ क्षमावान्निरमर्षश्च नैव स्त्री न पुनः पुमान् ॥ ५।१३३।३३**

जो अपमान सहन करतो, ज्याला राग येत नाहीं तो स्त्रीहि नव्हे, आणि पुरुष तर तो नव्हेच नव्हे !

**३०३ क्षात्रो धर्मो ह्यादिदेवात्प्रवृत्तः**
**पश्चादन्ये शेषभूताश्च धर्माः ॥ १२।६४।२१**

ब्रह्मदेवापासून क्षात्रधर्म हाच प्रथम उत्पन्न झाला, व नंतर दुसरे धर्म निर्माण झाले असून ते सर्व त्याचे अंगभूत आहेत.

**३०४ क्षिप्रं विजानाति चिरं शृणोति**
**विज्ञाय चार्थं भजते न कामात् ।**
**नासंपृष्टो व्युपयुङ्क्ते परार्थे**
**तत्प्रज्ञानं प्रथमं पण्डितस्य ॥ ५।३३।२२**

सांगितलेलें चटकन् समजणें, दुसऱ्याचें म्हणणें पुरेसा वेळ ऐकून घेणें, इच्छेची पर्वा न करतां विचार करून कोणतीहि गोष्ट हातीं घेणें आणि कोणी विचारिल्यावांचून दुसऱ्याच्या कामांत न पडणें, हें पंडिताचें मुख्य लक्षण होय.

**३०५ क्षुधा निर्णुदति प्रज्ञां धर्मबुद्धिं व्यपोहति ।**
**क्षुधापरिगतज्ञानो धृतिं त्यजति चैव ह ॥ १४।९०।९१**

क्षुधा ही बुद्धिभ्रंश करते, धर्मबुद्धि नष्ट करते, आणि क्षुधेच्या योगानें मनुष्याचें ज्ञान पार नाहींसें होऊन त्याचें धैर्य गळून जातें.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३०६ क्षेत्रं पुरुषकारस्तु दैवं बीजमुदाहृतम् ।**
**क्षेत्रबीजसमायोगात्ततः सस्यं समृध्यते ॥ १३।६।८**

उद्योग हें शेत व दैव हें बीं आहे ( उद्योगरूप ) शेत व [ दैवरूप ] बीं यांचा संयोग झाला म्हणजे उत्तम प्रकारचें [ यशोरूपी ] पीक येतें.

**३०७ खरीवात्सल्यमाहुस्तन्निःसामर्थ्यमहेतुकम् ॥ ५।१३५।८**

जें निष्कारण आणि निरुपयोगी वात्सल्य त्याला गाढवीचें प्रेम म्हणतात.

**३०८ गतोदके सेतुबन्धो यादृक्तादृङ्मतिस्तव ।**
**संदीप्ते भवने यद्वत्कूपस्य खननं तथा ॥ ६।४९।२३**

( पांडवांशीं युद्धाचा प्रसंग आणूं नको, म्हणून मीं दुर्योधनाला परोपरीनें सांगितलें असें धृतराष्ट्रानें म्हटलें त्यावर संजयानें दिलेलें हें उत्तर आहे. ) पाणी वाहून गेल्यावर बंधारा बांधावा, किंवा घराला आग लावल्यावर विहीर खणूं लागावें त्यासारखा हा तुझा विचार आहे.

**३०९ गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रसंग्रहैः ।**
**या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिःसृता ॥ ६।४३।१**

एकट्या गीतेचें चांगलें अध्ययन करावें. इतर भाराभर शास्त्रांची गीतेपुढें काय मातब्बरी ? गीता ही प्रत्यक्ष पद्मनाभ जो परमात्मा श्रीकृष्ण त्याच्या मुखकमलांतून बाहेर पडलेली आहे.

**३१० गुणयुक्तेऽपि नैकस्मिन्विश्वसेत विचक्षणः ॥ १२।२४।१८**

गुणसंपन्न अशाहि एकट्या मनुष्यावर शहाण्यानें विश्वास ठेवूं नये.

**३११ गुणानामेव वक्तारः सन्तः सत्सु नराधिप ॥ १२।१३२।१३**

( भीष्म युधिष्ठिराला म्हणतात ) सज्जन हे सज्जनांचे गुण तेवढेच सांगत असतात.

**३१२ गुणान्गुणवतां शल्य गुणवान्वेत्ति नागुणः ॥ ८।४०।२**

( कर्ण म्हणतो. ) हे शल्या, गुणवान् लोकांच्या गुणांची पारख स्वतः गुणी असलेल्यालाच होत असते; गुणहीन असलेल्याला होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३१३ गुरुरात्मवतां शास्ता शास्ता राजा दुरात्मनाम् ।**
**अथ प्रच्छन्नपापानां शास्ता वैवस्वतो यमः ॥ ५।३५।७१**

सुष्टांचा शास्ता गुरु, आणि दुष्टांना शासन करणारा राजा होय. परंतु चोरून पापें करणाऱ्यांना शिक्षा करणारा विवस्वानाचा पुत्र यम हाच होय.

**३१४ गुरुलाघवमादाय धर्माधर्मविनिश्चये ।**
**यतो भूयांस्ततो राजन्कुरुष्व धर्मनिश्चयम् ॥ ३।१३१।१३**

( ससाण्याच्या रूपानें आलेला इंद्र शिबिराजाला म्हणतो. ) हे राजा, धर्म कोणता व अधर्म कोणता, याचा निर्णय करितांना तारतम्य पाहून त्यांतल्या त्यांत जो अधिक श्रेयस्कर दिसेल तोच धर्म, असें निश्चित समज.

**३१५ गुरुशुश्रूषया ज्ञानं शान्तिं योगेन विन्दति ॥ ५।३६।५२**

गुरुशुश्रूषेनें ज्ञान आणि योगानें शांति मिळते.

**३१६ गुरूणामवमानो हि वध इत्यभिधीयते ॥ ८।७०।५१**

गुरुजनांचा अपमान करणें म्हणजे त्यांचा वधच करणें होय !

**३१७ गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।**
**उत्पथप्रतिपन्नस्य न्याय्यं भवति शासनम् ॥ १।१४०।५४**

गर्वानें फुगून गेलेला, कार्य कोणतें अकार्य कोणतें हें न जाणणारा, व दुर्मार्गानें चालणारा गुरु जरी असला तरी त्याला शिक्षा करणें न्याय्य आहे.

**३१८ गृध्रदृष्टिर्बकालीनः श्वचेष्टः सिंहविक्रमः ।**
**अनुद्विग्नः काकशङ्की भुजङ्गचरितं चरेत् ॥ १२।१४०।६२**

[ कार्यसाधु पुरुषानें ] गिधाडासारखी दूरदृष्टि ठेवावी, बगळ्याप्रमाणें निश्चल रहावें, कुत्र्यासारखें सावध असावें, सिंहासारखा पराक्रम गाजवावा. निर्भय राहून कावळ्याप्रमाणें साशंक असावें, व सर्पासारखें नागमोडी वर्तन ठेवावें.

**३१९ गृहस्थस्त्वेष धर्माणां सर्वेषां मूलमुच्यते ॥ १२।२३४।६**

गृहस्थाश्रमी पुरुष हा सर्व धर्मांचा मूळ आधार आहे

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३२० गौरवेण परित्यक्तं निःस्नेहं परिवर्जयेत् ।**
**सोदर्यं भ्रातरमपि किमुतान्यं पृथग्जनम् ॥ १२।२९२।२**

सख्खा भाऊ जरी असला तरी त्याचें पूर्वीचें महत्त्व जाऊन तो शुष्क पडला, त्याचें द्रव्य संपलें म्हणजे इतर बांधव त्याच्या वाऱ्यासही उभे रहात नाहींत. मग इतर सामान्य लोकांची गोष्ट कशाला ?

**३२१ ग्रस्यतेऽकर्मशीलस्तु सदानर्थैरकिंचनः ॥ १२।१३९।८३**

उद्योग न करणाऱ्या दरिद्री मनुष्यावर संकटें नेहमीं कोसळत असतात.

**३२२ चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ ६।३०।३४**

[ अर्जुन म्हणतो ] हे श्रीकृष्णा, मन हें चंचल, [ इंद्रियांना विषयांकडे ] जबरदस्तीनें ओढून नेणारें बलिष्ठ आणि दृढ आहे. त्याचा निग्रह करणें हें वाऱ्याची मोट बांधण्याप्रमाणें मला अत्यंत कठीण वाटतें.

**३२३ चण्डालत्वेऽपि मानुष्यं**
**सर्वथा तात शोभनम् ॥ १२।२९७।३१**

( पराशर मुनि जनक राजाला म्हणतात ) बाबारे, चांडाळयोनींत कां होईना, पण मनुष्याचा जन्म येणें हें सर्वांत उत्तम.

**३२४ चतुर्वेदोऽपि दुर्वृत्तः स शूद्रादतिरिच्यते ॥ ३।३१३।१११**

चारी वेद पढलेला असला तरी दुर्वर्तनी असेल तर तो शूद्रापेक्षांहि कनिष्ठ समजावा.

**३२५ चत्वारि यस्य द्वाराणि सुगुप्तान्यमरोत्तमाः ।**
**उपस्थमुदरं हस्तौ वाक्चतुर्थी स धर्मवित् ॥१२।२९९।२८**

( हंसरूपानें आलेला ब्रह्मदेव म्हणतो. ) देव हो, उपस्थ, उदर, हात व चवथी वाणी हीं चार द्वारें जो दाबांत ठेवतो तो धर्म जाणणारा होय.

**३२६ चराणामचरा ह्यन्नमदंष्ट्रा दंष्ट्रिणामपि ।**
**आपः पिपासतामन्नमन्नं शूरस्य कातराः ॥ १२।९९।१५**

स्थावर पदार्थ हें जंगम प्राण्यांचें अन्न होय. तसेंच दाढा नसलेले प्राणी दाढा असलेल्यांचें. पाणी हें तहानेलेल्यांचें अन्न. तसेंच भित्रे लोक शूराचें भक्ष्य होत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३२७ चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ॥ ६।२८।१३**

[ भगवान् श्रीकृष्ण म्हणतात ] गुण आणि कर्मे यांच्या अनुरोधानें चातुर्वर्ण्य मींच उत्पन्न केलें.

**३२८ चारैः पश्यन्ति राजानः ॥ ५।३४।३४**

राजे लोक हेरांच्या द्वारें पहात असतात.

**३२९ चिरं ह्यपि जडः शूरः पण्डितं पर्युपास्य ह ।**
**न स धर्मान्विजानाति दर्वी सूपरसानिव ॥ १०।५।३**

जो बुद्धीचा जड तो धिमेपणानें फार दिवस जरी एकाद्या पंडिताजवळ राहिला तरी, पक्कान्नांतील पळीला पक्कान्नाची गोडी जशी कळत नाहीं, तसा त्याला धर्मतत्त्वांचं बोध म्हणून होत नाहीं !

**३३० चिरकारी हि मेधावी नापराध्यति कर्मसु ॥ १२।२६६।३**

विचारपूर्वक फार वेळानें काम करणारा बुद्धिमान् मनुष्य कामांत चुकत नाहीं.

**३३१ जरामृत्यू हि भूतानां खादितारौ वृकाविव ।**
**बलिनां दुर्बलानां च ह्रस्वानां महतामपि ॥ १२।२८।१४**

सबळ दुबळ, लहान थोर, सर्व प्राण्यांना जरा व मरण हीं लांडग्यांप्रमाणें खाऊन टाकितात.

**३३२ जरा रूपं हरति हि धैर्यमाशा**
**मृत्युः प्राणान्धर्मचर्यामसूया ।**
**क्रोधः श्रियं शीलमनार्यसेवा**
**ह्रियं कामः सर्वमेवाभिमानः ॥ ५।३५।५०**

वार्धक्य रूपाचा नाश करतें; आशा धैर्याचा, मृत्यु प्राणांचा, मत्सर धर्माचरणाचा, क्रोध लक्ष्मीचा, दुर्जनसेवा शीलाचा, विषयेच्छा विनयाचा, आणि अभिमान सर्वस्वाचा नाश करतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३३३ जलौकावत्पिबेद्राष्ट्रं मृदुनैव नराधिपः ।**
**व्याघ्रीव च हरेत्पुत्रान् संदशेन्न च पीडयेत् ॥ १२।८८।५**

एकाद्या जळूप्रमाणें राजानें सौम्यपणानेंच राष्ट्रांतील द्रव्य कराच्या रूपानें घ्यावें. वाघीण जशी पिलांना आपले दांत लागूं न देतां उचलून नेते, त्याप्रमाणें प्रजेला त्रास न होईल अशा बेतानें तिजपासून कर घ्यावा.

**३३४ जातमन्वेति मरणं नृणामिति विनिश्चयः ॥१२।२९७।२२**

मनुष्य जन्मास आल्याबरोबर मरण त्याच्या पाठोपाठ येतें हें निश्चित होय.

**३३५ जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।**
**तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ ६।२६।२७**

( श्रीकृष्ण म्हणतात अर्जुना, ) जन्मास आलेल्याला मरण ठेवलेलेंच आहे; तसेंच मेलेल्याला पुनः जन्म ठेवलेलाच. यासाठीं, या अपरिहार्य असलेल्या गोष्टीबद्दल शोक करणें तुला शोभत नाहीं.

**३३६ जिता सभा वस्त्रवता मिष्टाशा गोमता जिता ।**
**अध्वा जितो यानवता सर्वं शीलवता जितम् ॥५।३४।४७**

चांगलीं वस्त्रें परिधान करणाऱ्याला सभेमध्यें मान मिळतो. गाई बाळगणाऱ्या मनुष्याची मिष्टान्न खाण्याची हौस सिद्धीस जाते. ज्याच्यापाशीं वाहन असतें त्याला मार्ग सहज आक्रमण करतां येतो. आणि शीलवान् पुरुषाचें सर्वच कांहीं सिद्धीस जातें.

**३३७ जीर्णमन्नं प्रशंसन्ति भार्यां च गतयौवनाम् ।**
**शूरं विजितसंग्रामं गतपारं तपस्विनम् ॥५।३५।६९**

खाल्लेल्या अन्नाची प्रशंसा तें पचल्यावर करावी. तसेंच स्त्रीची तारुण्य उलटून गेल्यावर, शूराची लढाई जिंकल्यावर, आणि तपस्याची तपःसमाप्तीनंतर प्रशंसा करावी.

**३३८ जीर्यन्ति जीर्यतः केशा दन्ता जीर्यन्ति जीर्यतः ।**
**चक्षुःश्रोत्रे च जीर्येते तृष्णैका न तु जीर्यते ॥१३।७।२४**

वार्धक्यानें शरीर जर्जर झालें म्हणजे केस जीर्ण होतात, दांत जीर्ण होतात, डोळे आणि कानहि जीर्ण होतात; परंतु एकटी तृष्णा ( लोभ ) मात्र जीर्ण होत नाहीं !

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३३९ जीवन्भद्राणि पश्यति ॥ ४।२८।४२**

कोणी झाला तरी आधीं जगेल तेव्हां मग चांगले दिवस पाहणार !

**३४० ज्ञातयो वर्धनीयास्तैर्य इच्छन्त्यात्मनः शुभम् ॥५।३९।१८**

स्वतःचें कल्याण व्हावें असें जे इच्छितात त्यांनीं अगोदर आपल्या आप्तेष्टांचा उत्कर्ष करावा.

**३४१ ज्ञानं तत्त्वार्थसंबोधः ॥ ३।३१३।९०**

ज्ञान म्हणजे आत्मतत्त्वाचा बोध होणें.

**३४२ ज्यायांसमपिचेद्वृद्धं गुणैरपि समन्वितम् ।**
**आततायिनमायान्तं हन्याद्धातकमात्मनः ॥ ६।१०७।१०१**

मारण्याच्या इच्छेनें आपल्या अंगावर धांवून येणारा आततायी मनुष्य वयानें मोठा असला, किंबहुना वृद्ध असला, आणि गुणसंपन्न जरी असला तरी त्यास ठार करावें.

**३४३ तदा स वृद्धो भवति तदा भवति दुःखितः ।**
**तदा शून्यं जगत्तस्य यदा मात्रा वियुज्यते ॥ १२।२६६।३०**

ज्यावेळीं मनुष्याला मातेचा वियोग होतो त्यावेळींच तो खरा वृद्ध होतो, त्यावेळींच तो खरा दुःखी होतो आणि त्यावेळींच त्याला सर्व जग शून्य वाटतें !

**३४४ तदेवासनमन्विच्छेद्यत्र नाभिपतेत्परः ॥ ४।४।१३**

ज्या ठिकाणीं दुसरा कोणी येणार नाहीं [ व ऊठ म्हणून म्हणणार नाहीं ] अशीच जागा शोधून काढावी.

**३४५ तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ६।२८।३४**

( श्रीकृष्ण म्हणतात हे अर्जुना, ) प्रणाम केल्यानें, परोपरीनें प्रश्न विचारिल्यानें आणि सेवा केल्यानें तत्त्वद्रष्टे ज्ञानी लोक तुला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करतील असें समज.

**३४६ तपः श्रुतं च योनिश्चाप्येतद्ब्राह्मण्यकारणम् ।**
**त्रिभिर्गुणैः समुदितस्ततो भवति वै द्विजः ॥ १३।१२१।७**

तप, वेदाध्ययन व ब्राह्मणकुलांत जन्म यांच्या योगानें ब्राह्मण्य प्राप्त होतें. या तीन गुणांनीं युक्त असेल तरच तो द्विज या संज्ञेला पात्र होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३४७ तपसा प्राप्यते स्वर्गस्तपसा प्राप्यते यशः ।**
**आयुः प्रकर्षो भोगाश्च लभ्यन्ते तपसा विभो ॥१३।५७।८**

( भीष्म युधिष्ठिराला म्हणतात, ) तपानें स्वर्ग मिळतो, तपानें यश प्राप्त होतें. आयुष्य, वैभव आणि सर्वप्रकारच्या उपभोग्य वस्तु तपानें प्राप्त होतात.

**३४८ तपसा लभ्यते सर्वम् ॥ १२।१५३।३४**

तपानें सर्व कांहीं प्राप्त करून घेतां येतें.

**३४९ तपसा विन्दते महत् ॥ ३।३१३।४८**

तपाच्या योगानें मनुष्य महत्पदाला पोंचतो.

**३५० तपः स्वधर्मवर्तित्वम् ॥ ३।३१३।८८**

तप म्हणजे स्वधर्माप्रमाणें वागणें.

**३५१ तपोर्थीयं ब्राह्मणी धत्त गर्भं**
**गौर्वोढारं धावितारं तुरङ्गी ।**
**शूद्रा दासं पशुपालं च वैश्या**
**वधार्थीयं क्षत्रिया राजपुत्री ॥ ११।२६।५**

ब्राह्मणस्त्री गर्भ धारण करते तो त्यानें [ जन्माला येऊन ] तप करावें म्हणून, गाईनें ओझीं वाहणारा, घोडीनें धावणारा, शूद्रस्त्रीनें दास्यकर्म करणारा, वैश्य स्त्रीनें गुरें राखणारा आणि क्षत्रिय राजकन्येनें युद्धांत मरून जाणारा, गर्भ धारण केलेला असतो.

**३५२ तरसा ये न शक्यन्ते शस्त्रैः सुनिशितैरपि ।**
**साम्ना तेऽपि निगृह्यन्ते गजा इव करेणुभिः॥१२।१३९।३९**

जबरदस्तीनें अथवा तीक्ष्ण शस्त्रांच्या योगानेंहि ज्यांना दाबांत ठेवितां येत नाहीं ते सुद्धां, हत्ती हत्तिणींना वश होतात त्याप्रमाणें, सामोपचारानें वश करितां येतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३५३ तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना**
**नैको ऋषिर्यस्य मतं प्रमाणम् ।**
**धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां**
**महाजनो येन गतः स पन्थाः ॥ ३।३१३।११७**

[ धर्मतत्त्वाचा विचार करूं लागलें असतां ] युक्तिवाद लंगडा पडतो, श्रुतिवाक्यें पहावीं तर तीं निरनिराळ्या प्रकारचीं आहेत, ज्याचें मत सर्वांना प्रमाण आहे असा एकहि ऋषि आढळून येत नाहीं. तात्पर्य, धर्माचें तत्त्व गुहेंत दडलेलें आहे ( म्हणजे अत्यंत गूढ आहे ) अशा स्थितींत, थोर लोक ज्या मार्गानें गेले तोच मार्ग उत्तम !

**३५४ तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ॥ ६।४०।२४**

( श्रीकृष्ण म्हणतात. ) अर्जुना, कार्य कोणतें, अकार्य कोणतें याचा निर्णय करण्याच्या कामीं तुला शास्त्रच प्रमाण मानिलें पाहिजे.

**३५५ तृणानि भूमिरुदकं वाक्चतुर्थी च सूनृता ।**
**सतामेतानि गेहेषु नोच्छिद्यन्ते कदाचन ॥ ५।३६।३४**

गवताचें आसन, स्वच्छ जागा, पाणी आणि चौथें सत्य व प्रिय भाषण या चार गोष्टींची तरी सज्जनांच्या घरीं केव्हांहि वाण पडत नाहीं.

**३५६ तेजसोर्हि द्वयोर्देवाः सख्यं वै भविता कथम् ॥ ५।१०।२२**

[ ' तूं इंद्राशीं सख्य कर ' असें सांगण्याकरितां आलेल्या देवांना वृत्रासुर म्हणतो ] देवहो, दोन तेजस्वी पुरुषांचें सख्य कसें व्हावयाचें ?

**३५७ त्यजन्ति दारान्पुत्रांश्च मनुष्याः परिपूजिताः ॥ १२।९१।५३**

मनुष्यांचा बहुमान केला म्हणजे ते आपल्या स्त्रीपुत्रांचाहि त्याग करण्यास तयार होतात.

**३५८ त्यजेत्कुलार्थे पुरुषं ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।**
**ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥ ५।३७।१७**

[ प्रसंग पडल्यास ] कुलाच्या रक्षणाकरितां कुलांतील एका मनुष्याचा त्याग करावा. सबंध ग्रामाकरितां एका कुळाची पर्वा करूं नये. देशाकरितां एका गांवावरहि उदक सोडावें. आणि आत्मकल्याणाकरितां सर्व पृथ्वीचाहि त्याग करावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३५९ त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ ६।४०।२१**

काम, क्रोध व लोभ हीं तीन आत्मनाश करणारीं नरकाचीं द्वारें होत. तस्मात् या तिहींचाही त्याग करावा.

**३६० त्रीण्येव तु पदान्याहुः पुरुषस्योत्तमं व्रतम् ।**
**न द्रुह्येच्चैव दद्याच्च सत्यं चैव परं वदेत् ॥ १३।१२०।१०**

तीनच गोष्टींना पुरुषाचें उत्तम व्रत असें म्हटलें आहे. त्या म्हणजे, मत्सर करूं नये, दान करावें, आणि श्रेष्ठ असें सत्यच बोलावें.

**३६१ त्वमित्युक्तो हि निहतो गुरुर्भवति भारत ॥ ८।६९।८३**

( श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात ) गुरूला 'तूं' असें संबोधिलें म्हणजे त्याचा वध केल्यासारखेंच झालें.

**३६२ दण्ड एव हि राजेन्द्र क्षत्रधर्मो न मुण्डनम् ॥ १२।२३।४७**

( व्यासमुनि युधिष्ठिराला म्हणतात. ) दंडन हाच क्षत्रियाचा धर्म आहे; मुंडन नव्हे !

**३६३ दण्डनीत्यां यदा राजा सम्यक्कात्स्न्येंन वर्तते ।**
**तदा कृतयुगं नाम कालसृष्टं प्रवर्तते ॥ १२।६९।८०**

जेव्हां राजा योग्य रीतीनें आणि पूर्णपणें दंडनीतीच्या अनुरोधानें चालतो, तेव्हां कालनिर्मित अशा कृतयुगाची प्रवृत्ति होते.

**३६४ दण्डश्चेन्न भवेल्लोके विनश्येयुरिमाः प्रजाः ।**
**जले मत्स्यानिवाभक्ष्यन् दुर्बलान्बलवत्तराः ॥ १२।१५।३०**

जगांत जर दंड नसता तर प्रजा नाश पावल्या असत्या. पाण्यांतील माशांप्रमाणें बलवत्तर लोकांनीं दुर्बळांना खाऊन टाकलें असतें.

**३६५ दण्डः शास्ति प्रजाः सर्वा दण्ड एवाभिरक्षति ।**
**दण्डः सुप्तेषु जागर्ति दण्डं धर्मं विदुर्बुधाः ॥ १२।१५।२**

दंड हाच सर्व प्रजेला वळण लावतो. दंडच सर्वांचें रक्षण करतो. सर्व लोक झोंपीं गेले तरी दंड जागा राहतो. म्हणूनच दंड हाच धर्म आहे असें ज्ञानी लोक समजतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३६६ दण्डस्यैव भयादेके न खादन्ति परस्परम् ।**
**अन्धे तमसि मज्जेयुर्यदि दण्डो न पालयेत् ॥ १२।१५।७**

दंडाच्याच भीतीमुळें कांहीं प्राणी परस्परांना खाऊन टाकीत नाहींत. जर दंडशक्तीनें लोकांचें रक्षण केलें नाहीं तर ते घोर अंधकारांत बुडून जातील.

**३६७ दत्तभुक्तफलं धनम् ॥ ५।३९।६७**

दान करणें व भोग्य वस्तूंचा उपभोग घेणें हें धनाचें फळ होय.

**३६८ दया सर्वसुखैषित्वम् ॥ ३।३१३।९०**

दया म्हणजे सर्वांना सुख व्हावें अशी इच्छा.

**३६९ दर्पो नाम श्रियः पुत्रो जज्ञेऽधर्मादिति श्रुतिः॥१२।९०।२६**

दर्प हा लक्ष्मीचा पुत्र आहे; तो तिला अधर्मापासून झाला असें ऐकण्यांत येतें.

**३७० दाक्ष्यमेकपदं धर्म्यं दानमेकपदं यशः ।**
**सत्यमेकपदं स्वर्ग्यं शीलमेकपदं सुखम् ॥ ३।३१३।७०**

दक्षता हेंच धर्माचें मुख्य कारण होय. दान हेंच यशःप्राप्तीचें मुख्य साधन होय. सत्य हेंच स्वर्गप्राप्तीचें मुख्य साधन होय. आणि शील हेंच सुखाचें मुख्य निधान होय.

**३७१ दानपथ्योदनो जन्तुः स्वकर्मफलश्नुते ॥ १२।२९८।३९**

दान हेंच मनुष्याला परलोकींच्या मार्गांत शिदोरीप्रमाणें उपयोगी पडतें. प्राण्याला स्वतःच्याच कर्माचें फळ मिळत असतें.

**३७२ दानमेव हि सर्वत्र सान्त्वेनानभिजल्पितम् ।**
**न प्रीणयति भूतानि निर्व्यञ्जनमिवाशनम् ॥ १२।८४।७**

दान झालें तरी गोड शब्द बोलून केलें नाहीं, तर तें, तोंडीं लावण्यावांचून दिलेल्या भोजनाप्रमाणें लोकांच्या मनाला आनंद देत नाहीं.

**३७३ दानं मित्रं मरिष्यतः ॥ ३।३१३।६४**

दान हा मरणोन्मुख झालेल्याचा मित्र होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३७४ दाने तपसि सत्ये च यस्य नोच्चरितं यशः ।**
**विद्यायामर्थलाभे वा मातुरुच्चार एव सः ॥ ५।१३३।२४**

दान, तप, सत्यभाषण, विद्या किंवा संपत्ति यांपैकीं कोणत्याहि बाबतींत ज्याची कीर्ति कोणी गात नाहीं तो आपल्या मातेचा केवळ मलोत्सर्ग होय. ( म्हणजे त्याच्या जन्माच्या रूपानें त्याच्या आईनें केवळ आपल्या पोटांतील घाण बाहेर टाकली. )

**३७५ दान्तस्य किमरण्येन तथाऽदान्तस्य भारत ।**
**यत्रैव निवसेद्दान्तस्तदरण्यं स चाश्रमः ॥ १२।१६०।३६**

( भीष्म युधिष्ठिराला म्हणतात ) इंद्रियें स्वाधीन असल्यावर अरण्यांत जाण्याची गरज काय ? व नसल्यावर जाऊन उपयोग काय ? जितेंद्रिय पुरुष ज्या ठिकाणीं वास्तव्य करील तेंच त्याचें अरण्य व तोच त्याचा आश्रम.

**३७६ दुरन्वयं दुष्प्रधर्षं दुरापं दुरतिक्रमम् ।**
**सर्वं वै तपसाभ्येति तपो हि बलवत्तरम् ॥ १३।१२२।८**

दुस्तर, अजिंक्य, प्राप्त होण्यास कठीण, अनुल्लंघनीय असें सर्व कांहीं तपाच्या योगानें साध्य होतें. खरोखर तप हें अत्यंत सामर्थ्यवान् आहे.

**३७७ दूताः किमपराध्यन्ते यथोक्तस्यानुभाषिणः॥ ५।१६२।३९**

सांगितलेला निरोप कळविणाऱ्या दूतांचा तसें करण्यांत काय बरें अपराध आहे ?

**३७८ देशकालौ समासाद्य विक्रमेत विचक्षणः ।**
**देशकालव्यतीतो हि विक्रमोनिष्फलोभवेत्॥१२।१४०।२८**

देशकालांची अनुकूलता पाहून शहाण्यानें पराक्रम गाजवावा. कारण योग्य देश आणि योग्य काल निघून गेल्यावर केलेला पराक्रम निष्फल होतो.

**३७९ दैवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता ॥ ६।४०।५**

दैवी संपत्ति मोक्षाला, व आसुरी संपत्ति बंधनाला, कारणीभूत होते.

**३८० दौष्कुलेयाश्च लुब्धाश्च नृशंसा निरपत्रपाः ।**
**ते त्वां तात निषेवेयुर्यावदार्द्रकपाणयः ॥ १२।८३।७**

[ भीष्म सांगतात ] बा युधिष्ठिरा, हलक्या कुळांत जन्मलेले, लोभी, दुष्ट, निर्लज्ज असे जे लोक आहेत, ते त्यांचा हात ओला होत आहे ( अर्थात् त्यांना द्रव्यादिक पोंचत आहे ) तोंपर्यंतच तुझी सेवा करतील.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३८१ द्रव्यागमो नृणां सूक्ष्मः पात्रे दानं ततः परम् ।**
**कालः परतरो दानाच्छ्रद्धा चैव ततः परा ॥ १४।९०।९४**

द्रव्य संपादन करणें ही गोष्ट कमी महत्त्वाची आहे. सत्पात्री केलेल्या दानाची योग्यता त्याहून जास्त आहे. योग्य काळीं दान करणें हें त्यापेक्षांहि श्रेष्ठ. आणि श्रद्धा ही तर त्याहिपेक्षां श्रेष्ठ आहे.

**३८२ द्रोहाद्देवैरवाप्तानि दिवि स्थानानि सर्वशः ॥ १२।८।२८**

द्रोहाच्याच योगानें देवांनीं स्वर्गांतील सर्व स्थानें संपादन केलीं.

**३८३ द्वावम्भसि निवेष्टव्यौ गले बद्ध्वा दृढां शिलाम् ।**
**धनवन्तमदातारं दरिद्रं चातपस्विनम् ॥ ५।३३।६०**

धनवान् असून दान न करणारा आणि दरिद्री असून तपश्चर्या न करणारा या दोघांना गळ्यांत मोठी धोंड बांधून पाण्यांत बुडवून टाकावें.

**३८४ द्वाविमौ कण्टकौ तीक्ष्णौ शरीरपरिशोषिणौ ।**
**यश्चाधनः कामयते यश्च कुप्यत्यनीश्वरः ॥ ५।३३।५६**

निर्धन असून चैनीची इच्छा करणें व अंगांत सामर्थ्य नसतां रागावणें हे दोन शरीरांतील रक्त अगदीं नाहींसें करून टाकणारे तीक्ष्ण कांटे होत.

**३८५ द्वे कर्मणी नरः कुर्वन्नस्मिँल्लोके विरोचते ।**
**अब्रुवन्परुषं किंचिदसतोऽनर्चयंस्तथा ॥ ५।३३।५४**

दोन गोष्टी करणारा मनुष्य या लोकीं योग्यतेस चढतो. यत्किंचितहि कठोर न बोलणें आणि दुर्जनांचा गौरव न करणें.

**३८६ द्वेष्यो न साधुर्भवति न मेधावी न पण्डितः ।**
**प्रिये शुभानि कार्याणि द्वेष्ये पापानि चैव ह ॥ ५।३९।४**

जो ज्याच्या द्वेषास पात्र झालेला असतो तो त्याला सज्जन, बुद्धिमान् अथवा शहाणा वाटत नाहीं. कारण, प्रिय असलेल्या मनुष्याचीं कृत्यें सर्व कांहीं चांगलीं, आणि द्वेषास पात्र झालेल्या मनुष्याचीं कृत्यें सर्व कांहीं वाईट [ समजणें ही सामान्य *लोकांची रीतच आहे.* ]

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३८७ द्व्यक्षरस्तु भवेन्मृत्युस्त्र्यक्षरं ब्रह्म शाश्वतम् ।
ममेति च भवेन्मृत्युर्न ममेति च शाश्वतम् ॥१२।१३।४

दोन अक्षरें म्हणजे मृत्यु व तीन अक्षरें म्हणजे शाश्वत ब्रह्म होय. ' मम ' म्हणजे माझें असें मानिल्यानें मृत्यु, आणि ' न मम ' म्हणजे माझें नव्हे असें मानिल्यानें शाश्वत ब्रह्मपद प्राप्त होतें.

३८८ धनं लभेत दानेन मौनेनाज्ञां विशांपते ।
उपभोगांश्च तपसा ब्रह्मचर्येण जीवितम् ॥ १३।७।१४

दान करून धन मिळवावें, मौनानें, लोकांनी आपल्या आज्ञेप्रमाणें वागणें, तपश्चर्येनें उपभोग आणि ब्रह्मचर्यानें ( दीर्घ ) जीवित हीं प्राप्त करून घ्यावीं.

३८९ धननाशेऽधिकं दुःखं मन्ये सर्वमहत्तरम् ।
ज्ञातयो ह्यवमन्यन्ते मित्राणि च धनाच्च्युतम्॥१२।१७७।३४

( वैराग्य संपन्न मंकि म्हणतो ) मला वाटतें, द्रव्यनाशाचें दुःख सर्वांत अत्यंत अधिक, कारण नातलग व मित्रहि द्रव्य नष्ट झालेल्याचा अपमान करितात.

३९० धनमाहुः परं धर्मं धने सर्वं प्रतिष्ठितम् ।
जीवन्ति धनिनो लोके मृता ये त्वधना नराः॥५।७२।२३

धन मिळविणें हा श्रेष्ठ धर्म होय असें म्हणतात. धनावरच सर्व कांहीं अवलंबून आहे. धनसंपन्न लोकच जगांत जिवंत असतात. धनहीन पुरुष मेल्यांतच जमा.

३९१ धनात्कुलं प्रभवति धनाद्धर्मः प्रवर्धते ।
नाधनस्यास्त्ययं लोको न परः पुरुषोत्तम ॥ १२।८।२२

( अर्जुन युधिष्ठराला म्हणतो ) हे नरश्रेष्ठा, धनाच्या योगानें कुळाचा उत्कर्ष होतो. धन असेल तर धर्माची वाढ होते. निर्धनाला ना इहलोक ना परलोक.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३९२ धनेन किं यन्न ददाति नाश्नुते**
**बलेन किं येन रिपुं न बाधते ।**
**श्रुतेन किं येन न धर्ममाचरेत्**
**किमात्मना यो न जितेन्द्रियो वशी ॥ १२।३२१।९३**

ज्याचा दान करण्याकडे किंवा भोगण्याकडे उपयोग केला जात नाहीं तें धन काय कामाचें ? ज्याच्या योगानें शत्रूला त्रास दिला जात नाहीं त्या बळाचा काय उपयोग ? धर्मानुष्ठान नाहीं तर विद्येची काय किंमत ? आणि जो जितेंद्रिय, मनोनिग्रही नाहीं तो जीव काय करावयाचा ?

**३९३ धनेनाधर्मलब्धेन यच्छिद्रमपिधीयते ।**
**असंवृतं तद्भवति ततोऽन्यदवदीर्यते ॥ ५।३५।७०**

अन्यायानें मिळविलेल्या द्रव्यानें एकादें व्यंग झांकलें तर तें खरोखर झांकलें जात नाहींच, परंतु त्यापासून आणखीहि एक उत्पन्न होतें.

**३९४ धन्यानामुत्तमं दाक्ष्यं धनानामुत्तमं श्रुतम् ।**
**लाभानां श्रेय आरोग्यं सुखानां तुष्टिरुत्तमा ॥ ३।३१३।७४**

धन मिळविण्याच्या साधनांत दक्षता सर्वांत श्रेष्ठ आहे. धनांमध्यें उत्तम धन विद्या. सर्व लाभांत उत्कृष्ट लाभ म्हणजे आरोग्य. आणि सर्व सुखांत संतोष श्रेष्ठ.

**३९५ धर्म एको मनुष्याणां सहायः पारलौकिकः । १३।१११।१७**

एकटा धर्मच मनुष्यांचा परलोकांतील सोबती आहे.

**३९६ धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः । ३।३१३।१२८**

आपण धर्माचा घात केला तर धर्मच आपला घात करतो. आणि आपण धर्माचें रक्षण केलें तर धर्म आपलें रक्षण करतो.

**३९७ धर्मं यो बाधते धर्मो न स धर्मः कुवर्त्म तत् ।**
**अविरोधात्तु यो धर्मः स धर्मः सत्यविक्रम ॥३।१३१।११**

( ससाण्याच्या रूपानें आलेला इंद्र शिबि राजाला म्हणतो ) ज्याच्या योगानें खऱ्या धर्माला बाध येतो तो धर्मच नव्हे, तो कुमार्ग होय. ज्याचा खऱ्या धर्माशीं विरोध येत नाहीं तोच धर्म.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३९८ धर्मं संहरते तस्य धनं हरति यस्य सः ।**
**ह्रियमाणे धने राजन्वयं कस्य क्षमेमहि ॥ १२।८।१३**

( भीम युधिष्ठिराला म्हणतो. ) जो ज्याचें द्रव्य हरण करतो त्यानें त्याच्या धर्माचाच उच्छेद केल्यासारखें होतें राजा, आमच्या द्रव्याचा अपहार होऊं लागला तर आम्ही कोणाला क्षमा करावी काय ?

**३९९ धर्म हि यो वर्धयते स पण्डितो**
**य एव धर्माच्च्यवते स मुह्यति ॥१२।३२१।७८**

धर्माची जो वाढ करतो तोच पंडित. जो धर्मापासून च्युत होतो तो मोहांत सांपडला असें समजावें.

**४०० धर्मनित्यास्तु ये केचिन्न ते सीदन्ति कर्हिचित् ॥३।२६३।४४**

सदोदित धर्मानें जे वागतात त्यांचा कधींहि नाश होत नाहीं.

**४०१ धर्ममूलः सदैवार्थः कामोऽर्थफलमुच्यते ॥ १२।१२३।४**

केव्हां झालें तरी अर्थप्राप्तीचें मूळ धर्म होय. काम ( म्हणजे इष्टप्राप्ति ) हें अर्थाचें फळ होय.

**४०२ धर्मं पुत्र निषेवस्व सुतीक्ष्णौ च हिमातपौ ।**
**क्षुत्पिपासे च वायुं च जय नित्यं जितेन्द्रियः ।१२।३२१।४**

( व्यास मुनि शुकाला सांगतात. ) हे पुत्रा, तूं धर्माचरणानें वाग. नेहमीं जितेंद्रिय राहून कडक थंडी व ऊन, तहान व भूक, आणि प्राणवायु यांना जिंक ( म्हणजे सहन करण्यास शीक ).

**४०३ धर्मं पूर्वे धनं मध्ये जघन्ये काममाचरेत् ।**
**अहन्यनुचरेदेवमेष शास्त्रकृतो विधिः ॥ ३।३३।४०**

दिवसाच्या पूर्वभागांत धर्मानुष्ठान, मध्यभागांत द्रव्यसंपादन व शेवटल्या भागांत विषयसेवन करावें. याप्रमाणें प्रत्यहीं वागावें हा शास्त्रोक्त विधि आहे.

**४०४ धर्मव्युच्छित्तिमिच्छन्तो येऽधर्मस्य प्रवर्तकाः ।**
**हन्तव्यास्ते दुरात्मानो देवैर्दैत्या इवोल्बणाः॥१२।३३।३०**

जे धर्माचा उच्छेद करूं पाहतात व अधर्माचा प्रसार करतात अशा दुरात्म्यांना, देवानीं महाभयंकर अशा दैत्यांना ठार मारिलें त्याप्रमाणें, ठार मारावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४०५ धर्मश्च सूक्ष्मो निपुणोपलक्ष्यः ॥ २।६७।३८**

सूक्ष्म अशा धर्माचें बारकाईनें परीक्षण करावें.

**४०६ धर्मश्चार्थेन महता शक्यो राजन्निषेवितुम् ॥ ३।३३।४८**

( भीम युधिष्ठिराला म्हणतो ) हे राजा, धर्माचें आचरण विपुल द्रव्याच्याच योगानें करतां येणें शक्य आहे.

**४०७ धर्मस्य निष्ठा त्वाचारस्तमेवाश्रित्य भोत्स्यसे॥१२।२५९।६**

( भीष्म युधिष्ठिराला म्हणतात ) धर्माचा आधार आचार होय. त्याचाच आश्रय केल्यावर तुला धर्माचें ज्ञान होईल.

**४०८ धर्मः सत्यं तथा वृत्तं बलं चैव तथाप्यहम् ।**
**शीलमूला महाप्राज्ञ सदा नास्त्यत्र संशयः॥१२।१२४।६२**

[ लक्ष्मी प्रल्हादास म्हणते ] धर्म, सत्य तसेंच सद्वर्तन, सामर्थ्य आणि मी ( लक्ष्मी ) या सर्वांचें मूळकारण शील हेंच होय यांत संशय नाहीं.

**४०९ धर्मादपेतं यत्कर्म यद्यपि स्यान्महाफलम् ।**
**न तत्सेवेत मेधावी न तद्धितमिहोच्यते ॥ १२।२९३।८**

धर्माला सोडून असलेलें कृत्य केवढेंहि मोठें फल देणारें असलें तरी तें शहाण्यानें करूं नये. कारण त्यापासून खरें कल्याण होत नाहीं.

**४१० धर्माय राजा भवति न कामकरणाय तु ॥ १२।९०।३**

धर्मरक्षणासाठीं राजाची उत्पत्ति आहे, आपल्या इच्छा तृप्त करून घेण्यासाठीं नव्हे.

**४११ धर्मार्थकामकुशलो धर्मार्थावप्यपीडयन् ।**
**धर्मप्रधानकार्याणि कुर्याश्चेति पुनःपुनः ॥ ७।१५१।३७**

( द्रोणाचार्य दुर्योधनाला सांगतात ) तूं धर्म, अर्थ व काम यांविषयीं कुशल आहेस. परंतु, धर्म व अर्थ या दोहोंसहि धक्का न लागूं देतां धर्मप्रधान अशींच कृत्यें करीत जा, हें मी तुला पुनः पुनः सांगतों.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४१२ धर्मार्थकामाः सममेव सेव्या**
**यो ह्येकभक्तः स नरो जघन्यः ।**
**तयोस्तु दाक्ष्यं प्रवदन्ति मध्यं**
**स उत्तमो योऽभिरतस्त्रिवर्गे ।।१२।१६७।४०**

धर्म, अर्थ आणि काम यांचें सेवन सारख्याच प्रमाणानें केलें पाहिजे. यांपैकीं कोणत्याहि एकावरच जो भर देतो तो मनुष्य निकृष्ट होय. यांतून दोहोंच्या ठिकाणीं दक्ष असणारा मध्यम प्रतीचा होय. सर्वांत श्रेष्ठ तोच कीं, जो या तीनहि पुरुषार्थांमध्यें रममाण होऊन राहतो.

**४१३ धर्मार्थौ धर्मकामौ च कामार्थौ चाप्यपीडयन् ।**
**धर्मार्थकामान्योऽभ्येति सोऽत्यन्तं सुखमश्नुते ।। ९।६०।२२**

धर्म व अर्थ, धर्म व काम, काम व अर्थ यांचा एकमेकांशीं विरोध येऊं न देतां धर्म, अर्थ व काम या तिहींचें जो सेवन करतो त्याला आत्यंतिक सुख प्राप्त होतें.

**४१४ धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ ।**
**यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ।। १।६२।५३**

( वैशंपायन जनमेजय राजाला सांगतात ) धर्माविषयीं, कामाविषयीं आणि मोक्षाविषयीं यांत ( महाभारतांत ) जें सांगितलें आहे तेंच इतर ग्रंथांत आहे. जें यांत नाहीं तें कुठेंच नाहीं.

**४१५ धर्मेण राज्यं विन्देत धर्मेण परिपालयेत् ।**
**धर्ममूलां श्रियं प्राप्य न जहाति न हीयते ।। ५।३४।३१**

धर्मानें राज्य मिळवावें व धर्मानेंच त्याचें संरक्षण करावें. धर्मानें मिळविलेल्या राजलक्ष्मीचा त्याग करण्याचा प्रसंग येत नाहीं; व तीहि राजाला सोडून जात नाहीं.

**४१६ धर्मे तिष्ठन्ति भूतानि धर्मे राजनि तिष्ठति ।**
**तं राजा साधु यः शास्ति स राजा पृथिवीपतिः।।१२।९०।५**

धर्माच्या आधारानें प्राणी राहतात, धर्म, राजाच्या आधारानें राहतो, त्या धर्माचें पालन जो राजा उत्तम प्रकारें करतो तो राजा सर्व पृथ्वीचा राजा होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४१७ धर्मे ते धीयतां बुद्धिर्मनस्तु महदस्तु च ॥ १५।१७।२१**

( कुंती युधिष्ठिराला म्हणते ) तुझी बुद्धि धर्माच्या ठिकाणीं स्थिर होवो, आणि तुझें मन मोठें असो.

**४१८ धर्मे मतिर्भवतु वः सततोत्थितानां**
**स ह्येक एव परलोकगतस्य बन्धुः ।**
**अर्थाः स्त्रियश्च निपुणैरपि सेव्यमाना**
**नैवाप्तभावमुपयान्ति न च स्थिरत्वम् ॥ १।२।३९१**

( सौति शौनकादिक ऋषींना सांगतो ) सतत प्रयत्नपूर्वक धर्मानुष्ठान करण्याकडे तुमची प्रवृत्ति असूं दे. कारण तोच एकटा परलोकीं गेल्यावर आपल्या उपयोगी पडणारा आहे. कनक आणि कांता यांची दक्षतेनें सेवा केली तरी तीं कामास येत नाहींत, तीं चिरकाल टिकतहि नाहींत.

**४१९ धर्मेऽसुखकला काचिद्धर्मे तु परमं सुखम् ॥ १२।२७१।५६**

धर्माचरणांत थोडेसे कष्ट वाटले तरी अत्यंत श्रेष्ठ सुख धर्मातच आहे.

**४२० धर्मो हि परमा गतिः ॥ १२।१४७।८**

धर्म हाच उत्कृष्ट प्रकारच्या गतीचें साधन होय.

**४२१ धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्**
**क्षत्रियस्य न विद्यते ॥ ६।२६।३१**

धर्मयुद्धासारखें श्रेयस्कर क्षत्रियाला दुसरें कांहींच नाहीं.

**४२२ धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मेण विधृताः प्रजाः ।**
**यः स्याद्धारणसंयुक्तःस धर्म इति निश्चयः ॥ १२।१०९।११**

धारण करतो म्हणून धर्म म्हणतात. धर्मानेंच लोकांना धारण केलें आहे. धारण करण्याच्या गुणानें जो युक्त असेल तोच धर्म असा सिद्धांत आहे.

**४२३ धिक्तस्य जीवितं राज्ञो राष्ट्रं यस्यावसीदति ।**
**अवृत्त्यान्यमनुष्योऽपि यो वैदेशिक इत्यपि ॥ १२।१३०।३४**

ज्याचें राष्ट्र क्षीण दशेप्रत पावतें आणि परदेशांत राहणारा अन्य मनुष्यहि ज्याच्या राष्ट्रांत उपजीविका न झाल्यामुळें नाश पावतो त्या राजाच्या जीविताला धिक्कार असो !

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४२४ धूमायन्ते व्यपेतानि ज्वलन्ति सहितानि च**
**धृतराष्ट्रोल्मुकानीव ज्ञातयो भरतर्षभ ॥ ५।३६।६०**

( विदुर म्हणतो ) हे भरतश्रेष्ठा धृतराष्ट्रा, लाकडाची कोलितें एकएकटीं असलीं म्हणजे नुसतीं धुमसत राहतात; पण तींच एकत्र असलीं म्हणजे त्यांच्यापासून ज्वाला उत्पन्न होते. त्याचप्रमाणें नातलगांची गोष्ट आहे.

**४२५ धूमो वायोरिव वशे बलं धर्मोऽनुवर्तते ।**
**अनीश्वरो बले धर्मो द्रुमे वल्लीव संश्रिता ॥ १२।१३४।७**

धूर वाऱ्याच्या अंकित राहतो तसा धर्म बळाच्या पाठोपाठ येतो. वृक्षाच्या आश्रयानें राहणाऱ्या लतेप्रमाणें धर्म बळावर अवलंबून असतो.

**४२६ धृतिर्दाक्ष्यं संयमो बुद्धिरात्मा**
**धैर्यं शौर्यं देशकालाप्रमादः ।**
**अल्पस्य वा बहुनो वा विवृद्धौ ।**
**धनस्यैतान्यष्ट समिन्धनानि ॥ १२।१२०।३७**

संथपणा, दक्षता, मनोनिग्रह, बुद्धिमत्ता, विचारशीलता, धैर्य, शौर्य आणि स्थळकालाविषयीं सावधगिरी, हीं आठ साधनें मूळचें थोडें किंवा पुष्कळ असलेलें धन वाढविण्याचीं होत.

**४२७ धेनुर्वत्सस्य गोपस्य स्वामिनस्तस्करस्य च**
**पयः पिबति यस्तस्या धेनुस्तस्येति निश्चयः ॥ १२।१७४।३२**

गाईवर वासराची, गवळ्याची, मालकाची व ( प्रसंगविशेषीं ) चोराचीहि सत्ता असते. पण ज्याला तिचें दूध प्राशन करण्यास मिळतें त्याचाच तिजवर खरा हक्क होय हें निश्चित.

**४२८ न कश्चिज्जात्वतिक्रामेज्जरामृत्यू हि मानवः ।**
**अपि सागरपर्यन्तां विजित्येमां वसुंधराम् ॥ १२।२८।१५**

समुद्रवलयांकित ही सर्व पृथ्वी जिंकूनसुद्धां कोणीहि मनुष्य जरा आणि मृत्यु यांचें अतिक्रमण करूं शकत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४२९ न कश्चित्कस्यचिन्मित्रं न कश्चित्कस्यचित्सुहृद् ।**
**अर्थतस्तु निबध्यन्ते मित्राणि रिपवस्तथा ॥१२।१३८।११०**

मुळांतच कोणी कोणाचा मित्र नसतो, आणि कोणी कोणाचा शत्रुहि नसतो. कार्याच्याच अनुरोधानें मित्र आणि शत्रु हे होत असतात.

**४३० न कश्चिन्नापनयते पुमानन्यत्र भार्गवात् ।**
**शेषसंप्रतिपत्तिस्तु बुद्धिमत्स्वेव तिष्ठति ॥५।३९।३०**

[ नीतिशास्त्रप्रणेत्या ] शुक्राचार्यांव्यतिरिक्त दुसरा कोणीहि मनुष्य कधीं चुकत नाहीं असें नाहीं. परंतु चूक झाल्यावर पुढें काय याचा विचार करण्याची अक्कल बुद्धिमान पुरुषांच्याच ठायीं असते.

**४३१ न कालो दण्डमुद्यम्य शिरः कृन्तति कस्यचित् ।**
**कालस्य बलमेतावद्विपरीतार्थदर्शनम् ॥ २।८१।११**

विनाशकाल प्राप्त झाला म्हणजे तो कांहीं प्रत्यक्ष दंड उगारून कोणाचें डोकें उडवीत नाहीं. तर बुद्धींत भ्रंश पाडून विपरीत प्रकार भासविणें एवढ्यापुरताच तो आपल्या बळाचा उपयोग करतो.

**४३२ न कुलं वृत्तहीनस्य प्रमाणमिति मे मतिः ।**
**अन्तेष्वपि हि जातानां वृत्तमेव विशिष्यते ।५।३४।४१**

( विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ) दुर्वर्तनी माणसाच्या कुलीनपणाला कांहीं किंमत देतां येत नाहीं असें मला वाटतें. हीन कुळांत जन्मलेल्यांच्यासुद्धां शीलालाच महत्त्व आहे.

**४३३ न कृतस्य तु कर्तुश्च सख्यं संधीयते पुनः ।**
**हृदयं तत्र जानाति कर्तुश्चैव कृतस्य च ॥ १२।१३९।३६**

अपराध करणारा आणि त्याचें प्रायश्चित्त देणारा ह्या उभयतांमध्यें पुनरपि मैत्री जडत नसते. कारण, परस्परांचा संबंध काय आहे हें प्रायश्चित्त देणारा व अपराध करणारा ह्या उभयतांचें अंतःकरणच जाणत असतें.

**४३४ न कोशः शुद्धशौचेन न नृशंसेन जातुचित् ।**
**मध्यमं पदमास्थाय कोशसंग्रहणं चरेत् ॥ १२।१३३।२**

अगदीं सोंवळेपणानें राहून संपत्ति मिळत नसते; तशीच ती दुष्टपणानेंही कधींच मिळत नाहीं. यास्तव मध्यम मार्गाचा अवलंब करून संपत्तीचा संग्रह करावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४३५ न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।
गृहं तु गृहिणीहीनमरण्यसदृशं मतम् ॥ १२।१४४।६

नुसत्या घराला घर म्हणत नाहींत. गृहिणी हेंच घर. गृहिणी नसलेलें घर अरण्यासमान होय.

४३६ न च कश्चित्कृते कार्ये कर्तारं समवेक्षते ॥१२।१३८।११२

कार्य होऊन गेल्यावर कर्त्याकडे कोणाचें लक्ष्य जात नाहीं.

४३७ न च शत्रुरवज्ञेयो दुर्बलोऽपि बलीयसा ।
अल्पोऽपि हि दहत्यग्निर्विषमल्पं हिनस्ति च ॥१२।५८।१७

स्वतः बलाढ्य असलेल्यानेंसुद्धां दुर्बळ अशाहि शत्रूला तुच्छ समजूं नये. कां कीं, अग्नि ल्हान असला तरी जाळल्यावांचून रहात नाहीं, आणि विष थोडें असलें तरी प्राणनाश करतेंच.

४३८ न च शुद्धानृशंसेन शक्यं राज्यमुपासितुम् ॥ १२।७५।१८

निर्भेळ दयाळूपणानें राज्य चालविणें शक्य नाहीं.

४३९ न चैव पुरुषो द्रष्टा स्वर्गस्य नरकस्य च ।
आगमस्तु सतां चक्षुर्नृपते तमिहाचर ॥१२।२८।५४

( अश्म नामक ब्राह्मण जनक राजाला सांगतो ) हे राजा, स्वर्ग आणि नरक मनुष्याला दिसत नाहींत. परंतु त्यांना अवलोकन करण्याचे सज्जनांचे नेत्र म्हणजे शास्त्र होय. म्हणून तूं शास्त्रप्रमाणें वाग.

४४० न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥ १।७५।५०

इच्छित वस्तूंच्या उपभोगानें भोगेच्छेची तृप्ति कधींच होत नसते. आहुतींच्या योगानें अधिक पेट घेणाऱ्या अग्नीप्रमाणें ती उलट अधिकच वाढते.

४४१ न जातु त्वमिति ब्रूयादापन्नोऽपि महत्तरम् ।
त्वंकारो वा वधो वेति विद्वत्सु न विशिष्यते ॥ १३।१६२।५३

संकटांत असतांनाहि मोठ्या मनुष्याला 'तूं' असें एकेरी संबोधूं नये. विद्वानाला तूं असें म्हणणें व त्याचा वध करणें सारखेंच.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४४२ न जातु विवृतःकार्यः शत्रुः सुनयमिच्छता ॥ १२।१०५।१४**

उत्कृष्ट प्रकारच्या नीतीप्रमाणें वागूं इच्छिणाऱ्या पुरुषानें केव्हांहि उघड रीतीनें शत्रुत्व करूं नये.

**४४३ न जानपदिकं दुःखमेकः शोचितुमर्हति ।**
**अशोचन्प्रतिकुर्वीत यदि पश्येदुपक्रमम् ॥ १२।३३०।१५**

सर्व देशाच्या दुःखाचा एकट्यानें शोक करणें युक्त नव्हे. शोक न करितां प्रतिकाराचा जर कांहीं उपाय सुचला तर तो मात्र अंमलांत आणावा.

**४४४ न तत्तरेद्यस्य न पारमुत्तरेत्**
**न तद्धरेद्यत्पुनराहरेत्परः ।**
**न तत्खनेद्यस्य न मूलमुद्धरेत्**
**न तं हन्याद्यस्य शिरो न पातयेत् ॥ १२।१४०।६९**

ज्याच्या पैलतीराला पोंचतां येणार नाहीं तें तरून जाण्याच्या भरीस पडूं नये. जें फिरून कोणी आपल्यापासून हिरावून घेईल त्याचें हरण करूं नये. ज्याचें मूळ उपटून टाकतां येत नाहीं तें खणूं नये. ज्याचें शीर खालीं पाडतां येत नाहीं त्याच्यावर प्रहार करूं नये.

**४४५ न तत्परस्य संदध्यात्प्रतिकूलं यदात्मनः ।**
**एष संक्षेपतो धर्मः कामादन्यः प्रवर्तते ॥ १३।११३।८**

आपल्याला अनिष्ट अशी जी गोष्ट ती दुसऱ्याच्या संबंधानें करूं नये. धर्माचें संक्षिप्त स्वरूप हें असें आहे. याला सोडून असलेला तो निव्वळ स्वेच्छाचार होय.

**४४६ न तथा बाध्यते कृष्ण प्रकृत्या निर्धनो जनः ।**
**यथा भद्रां श्रियं प्राप्य तया हीनः सुखैधितः ॥ ५।७२।२९**

( युधिष्ठिर श्रीकृष्णांना म्हणतो ) उत्तम प्रकारचें वैभव प्राप्त होऊन सुखांत वाढलेल्या मनुष्याला तें वैभव नष्ट झालें असतां जेवढें दुःख होतें, तेवढें मूळांतच दरिद्री असलेल्या मनुष्याला होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४४७ न तथेच्छन्ति कल्याणान्परेषां वेदितुं गुणान् ।**
**यथैषां ज्ञातुमिच्छन्ति नैर्गुण्यं पापचेतसः ॥ ५।३७।४७**

दुष्ट मनुष्यांना दुसऱ्यांचे दोष जाणण्याची जशी इच्छा असते, तशी त्यांचे चांगले गुण समजून घेण्याची इच्छा नसते.

**४४८ न तल्लोके द्रव्यमस्ति यल्लोकं प्रतिपूरयेत् ।**
**समुद्रकल्पः पुरुषो न कदाचन पूर्यते ॥ १३।९३।४६**

जगांत असें कोणतेंच द्रव्य नाहीं कीं, जें लोकांना पुरून उरेल. मनुष्य हा समुद्रासारखा आहे. त्याला कधींच कांहीं पुरत नाहीं.

**४४९ न तृप्तिः प्रियलाभेऽस्ति तृष्णा नाद्भिः प्रशाम्यति ।**
**संप्रज्वलति सा भूयः समिद्भिरिव पावकः॥१२।१८०।२६**

प्रिय वस्तूचा लाभ झाल्यानें तृप्ति होते असें नाहीं. तृष्णा ( हांव, लोभ ) ही पाण्यानें शांत होत नाहीं. समिधांनीं जसा अग्नि, तशी ती [ इष्टप्राप्तीनें ] अधिकच प्रज्वलित होते.

**४५० न तेन स्थविरो भवति येनास्य पलितं शिरः ।**
**बालोऽपि यः प्रजानाति तं देवाः स्थविरं विदुः॥३।१३३।११**

एकाद्याचे केस पांढरे झाले म्हणजे तेवढ्यानें तो वृद्ध झाला असें नाहीं. वयानें लहान असला तरी, जो ज्ञानी आहे त्यालाच देव वृद्ध समजतात.

**४५१ न त्वेवात्मावमन्तव्यः पुरुषेण कदाचन ।**
**न ह्यात्मपरिभूतस्य भूतिर्भवति शोभना ॥ ३।३२।५८**

पुरुषानें स्वतःस केव्हांहि हीन लेखूं नये कारण, स्वतःस हीन मानणारास उत्तम प्रकारचें ऐश्वर्य प्राप्त होत नाहीं.

**४५२ न दरिद्रो वसुमतो नाविद्वान्विदुषः सखा ।**
**न शूरस्य सखा क्लीबः सखिपूर्वं किमिष्यते ॥१।१३१।९**

( द्रुपदराजा द्रोणाचार्यांना म्हणतो ) दरिद्री हा श्रीमंताचा अथवा मूर्ख हा विद्वानाचा मित्र नसतो. शूराची नामर्दाशीं मैत्री असणें शक्य नाहीं. तर सख्यपूर्वक तूं काय मागतोस ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४५३ न दृष्टपूर्वं प्रत्यक्षं परलोकं विदुर्बुधाः ।**
**आगमांस्त्वनतिक्रम्य श्रद्धातव्यं बुभूषता ॥ १२।२८।४२**

परलोक हा पूर्वीं कोणीं प्रत्यक्ष पाहिला आहे असें शहाणे लोक समजत नाहींत. परंतु शास्त्रमार्गाचें उल्लंघन न करितां उत्कर्षेच्छु पुरुषानें त्याविषयीं श्रद्धा ठेवावी.

**४५४ न देवा दण्डमादाय रक्षन्ति पशुपालवत् ।**
**यं तु रक्षितुमिच्छन्ति बुद्ध्या संविभजन्ति तम् ५।३५।४०**

देव काहीं एकाद्या गुराख्याप्रमाणें हातांत दंड घेऊन कोणाचें रक्षण करीत नाहींत. तर ज्याचें रक्षण करण्याची त इच्छा करतात, त्याला ते उत्तम प्रकारची बुद्धि देतात.

**४५५ न देवैरननुज्ञातः कश्चिद्भवति धार्मिकः ॥ १२।२७१।४९**

देवांची तशी इच्छा असल्याशिवाय कोणी धार्मिक बनत नाहीं.

**४५६ न द्वितीयस्य शिरसश्छेदनं विद्यते क्वचित् ।**
**न च पाणेस्तृतीयस्य यन्नास्ति न ततो भयम्॥१२।१८०।२९**

आपलें दुसरें डोकें कोणी कापील किंवा तिसरा हात तोडील अशी केव्हांहि भीति नसते. कां कीं, जें मूळांतच नाहीं त्याची भीति मुळींच नसते.

**४५७ न धर्मः प्रीयते तात दानैर्दत्तैर्महाफलैः ॥**
**न्यायलब्धैर्यथा सूक्ष्मैः श्रद्धापूतैः स तुष्यति ॥१४।९०।९९**

( धर्म उंछवृत्तीच्या ब्राह्मणाला म्हणतो ) बाबारे, न्यायानें मिळविलेल्या आणि श्रद्धेनें पवित्र झालेल्या थोड्याशा द्रव्याच्या दानानें धर्म जसा संतुष्ट होतो, तसा केवळ मोठें फळ देणाऱ्या दानांनीं संतोष पावत नाहीं.

**४५८ न धर्मपर एव स्यान्न चार्थपरमो नरः ।**
**न कामपरमो वा स्यात्सर्वान्सेवेत सर्वदा ॥ ३।३३।३९**

मनुष्यानें केवळ धर्माचेंच अवलंबन करूं नये, एकट्या अर्थाच्याच पाठीमागें लागूं नये आणि नुसत्या कामाकडेही सर्व लक्ष्य देऊं नये. परंतु, [ धर्म, अर्थ व काम ] या सर्वांचें सर्वदा सेवन करावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४५९ न नित्यं लभते दुःखं न नित्यं लभते सुखम् ॥१२।२५।२३**

कोणालाहि नेहमींच दुःख होत नाहीं, किंवा नेहमींच सुख होत नाहीं.

**४६० न निर्मन्युः क्षत्रियोऽस्ति लोके निर्वचनं स्मृतम् ॥३।२७।३७**

ज्याला अपमानाची चीड येत नाहीं तो क्षत्रिय नव्हे, अशी लोकांत म्हणच आहे.

**४६१ न पश्यामोऽनपकृतं धनं किंचित्कचिद्वयम् ॥ १२।८।३०**

( अर्जुन युधिष्ठिराला म्हणतो ) दुसऱ्याला यत्किंचित्‌हि उपद्रव न देतां कोणाला केव्हां कांहीं धन मिळाल्याचें आमच्या पाहण्यांत नाहीं.

**४६२ न पूर्वे नापरे जातु कामानामन्तमाप्नुवन् ॥१२।१७७।२२**

पूर्वकाळचे किंवा दुसरे कोणतेहि लोक इच्छेच्या अंतापर्यंत पोंचले नाहींत.

**४६३ न बाह्यं द्रव्यमुत्सृज्य सिद्धिर्भवति भारत ।**
**शारीरं द्रव्यमुत्सृज्य सिद्धिर्भवति वा न वा ॥ १२।१३।१**

( सहदेव युधिष्ठिराला म्हणतो ) बाह्य द्रव्याचा त्याग केल्यानें सिद्धि प्राप्त होत नसते. शरीरांत राहणाऱ्या [ कामक्रोधादिविकाररूप ] द्रव्याचा त्याग करूनहि सिद्धि मिळेल का नाहीं हा प्रश्नच आहे.

**४६४ न बुद्धिर्धनलाभाय न जाड्यमसमृद्धये ।**
**लोकपर्यायवृत्तान्तं प्राज्ञो जानाति नेतरः ॥ ५।३८।३३**

बुद्धि असली म्हणजे धन मिळतें असें नाहीं, आणि बुद्धिमांद्य असलें म्हणजे दारिद्र्य येतें असेंहि नाहीं. लोकव्यवहार हा चतुर पुरुषालाच समजतो, इतरांना नाहीं.

**४६५ न बुद्धिशास्त्राध्ययनेन शक्यं**
**प्राप्तुं विशेषं मनुजैरकाले ।**
**मूर्खोऽपि चाप्नोति कदाचिदर्थान्**
**कालो हि कार्यं प्रति निर्विशेषः ॥ १२।२५।६**

काळ प्रतिकूल असतां नुसत्या बुद्धिमत्तेनें किंवा शास्त्राभ्यासानें मनुष्याला विशेषसा लाभ होणें शक्य नाहीं. उलट, एकादे वेळेस मूर्खालासुद्धां कार्यांत यश येतें. तस्मात् काळ हाच कार्यसिद्धीच्या बाबतींत सर्वांत महत्त्वाचा आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४६६ न ब्रह्मचार्यधीयीत कल्याणीं न दुहेत गाम् ।**
**न कन्योद्वहनं गच्छेद्यदि दण्डो न पालयेत् ॥१२।१५।३७**

जर दंड लोकांचें संरक्षण न करता तर ब्रह्मचाऱ्यानें अध्ययन केलें नसतें. सवत्सा धेनूनें दूध दिलें नसतें; आणि मुलीनें विवाह करून घेतला नसता.

**४६७ न लोके दीप्यते मूर्खः केवलात्मप्रशंसया ।**
**अपि चापिहितःश्वभ्रे कृतविद्यः प्रकाशते ॥ १२।२८७।३१**

लोकांत नुसत्या आत्मप्रौढीनें मूर्खाचें तेज पडत नाहीं. परंतु जो खरा खरा विद्वान् आहे त्याला एखाद्या बिळांत कोंडून ठेविलें, तरी तो चमकल्याशिवाय राहणार नाहीं.

**४६८ नवनीतं हृदयं ब्राह्मणस्य**
**वाचि क्षुरो निशितस्तीक्ष्णधारः ।**
**तदुभयमेतद्विपरीतं क्षत्रियस्य**
**वाङ्नवनीतं हृदयं तीक्ष्णधारमिति ॥ १।३।१२३**

ब्राह्मणाचें हृदय लोण्यासारखें मऊ असतें, परंतु बोलण्यांत तीक्ष्ण धारेच्या पाजवलेल्या वस्तऱ्यासारखा तो कठोर असतो. क्षत्रियाच्या या दोनहि गोष्टी उलट असतात. म्हणजे बोलणें मृदु पण हृदय कठीण.

**४६९ न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्ते नातिविश्वसेत् ।**
**विश्वासाद्भयमुत्पन्नं मूलान्यपि निकृन्तति ॥ ५।३८।९**

अविश्वासू माणसावर विश्वास ठेवूं नये. विश्वासू मनुष्यावर देखील अति विश्वास टाकूं नये. कारण, विश्वास ठेविल्यामुळें जर कांहीं भय उत्पन्न झालें, तर तें आपलीं पाळेंमुळें खणून काढतें.

**४७० न वै मानं च मौनं च सहितौ वसतः सदा ।**
**अयं हि लोको मानस्य असौ मौनस्य तद्विदुः ॥५।४२।४४**

मान व मौन हीं सर्वदा एकत्र रहात नाहींत. हा लोक मानाचा असून परलोक मौनाचा आहे असें म्हणतात.

( अन्न, स्त्री इत्यादि भोगांचे ठिकाणीं जो अभिलाष त्याला 'मान' असें म्हणतात. आणि ब्रह्मानंदसुखाच्या प्राप्तीचें जें कारण त्याला 'मौन' असें म्हणतात. )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४७१ न वै श्रुतमविज्ञाय वृद्धाननुपसेव्य वा ।**
**धर्मार्थौ वेदितुं शक्यौ बृहस्पतिसमैरपि ॥ ५।३९।४१**

शास्त्र समजून घेतल्यावांचून अथवा वृद्धांचा समागम केल्यावांचून धर्म व अर्थ या दोन पुरुषार्थांचें ज्ञान होणें बृहस्पतीसारख्या बुद्धिमान् पुरुषांनाहि शक्य नाहीं.

**४७२ न वै सुखं प्राप्नुवन्तीह भिन्नाः ॥ ५।३६।५६**

आपसांत फुटून राहणारांना जगांत सुख खाचित प्राप्त होत नाहीं.

**४७३ न शत्रुर्वशमापन्नो मोक्तव्यो वध्यतां गतः ॥ ५।३८।२९**

ज्याचा अवश्य वध केला पाहिजे असा शत्रु हातांत सांपडला असतां सोडून देऊं नये.

**४७४ न शत्रुर्विवृतः कार्यो वधमस्याभिकाङ्क्षता ।**
**क्रोधं भयं च हर्षं च नियम्य स्वयमात्मनि ॥१२।१०३।८**

शत्रूला ठार मारण्याची इच्छा करणाऱ्यानें आपला शत्रु प्रगट करूं नये, म्हणजे त्याच्याशीं उघड द्वेष करूं नये. राग, भय व आनंद हीं आंतल्याआंत दाबून ठेवावीं.

**४७५ न श्रेयः सततं तेजो न नित्यं श्रेयसी क्षमा ॥ ३।२८।६**

सदोदित तीव्रपणा श्रेयस्कर नाहीं, तसेंच नेहमीं सौम्यपणाहि कामाचा नाहीं.

**४७६ नष्टं समुद्रे पतितं नष्टं वाक्यमशृण्वति ।**
**अनात्मनि श्रुतं नष्टं नष्टं हुतमनग्निकम् ॥ ५।३९।४२**

जें समुद्रांत पडलें तें नष्ट झालें. न ऐकणाऱ्याला सांगितलेलें वायां गेलें. स्वेच्छाचारी माणसाची विद्या फुकट गेली. राखेंत टाकलेली आहुति व्यर्थ गेली.

**४७७ न संशयमनारुह्य नरो भद्राणि पश्यति ।**
**संशयं पुनरारुह्य यदि जीवति पश्यति ॥ १२।१४०।३४**

संकटांत सांपडल्यावांचून मनुष्याला चांगल्या गोष्टी प्राप्त होत नाहींत. पण संकटांत सांपडल्यानंतर जर तो जिवंत राहिला तर त्याला आपलें कल्याण झालेलें दिसून येईल.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४७८ न स क्षयो महाराज यः क्षयो वृद्धिमावहेत् ।**
**क्षयः स त्विह मन्तव्यो यं लब्ध्वा बहु नाशयेत् ॥५।३९।७**

( विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ) जो क्षय उत्कर्षाला कारण होतो तो खरोखर क्षय नव्हे. जो प्राप्त झाला असतां बहुत नाश करतो त्यालाच क्षय म्हणावें.

**४७९ न सख्यमजरं लोके हृदि तिष्ठति कस्यचित् ।**
**कालो ह्येनं विहरति क्रोधो वैनं रहत्युत ॥१।१३१।७**

जगांत कोणाच्याहि अंतःकरणांत स्नेहभाव कमी न होतां एकसारखा टिकून रहात नाहीं. कालांतरानें स्नेह नाहींसा होतो किंवा क्रोधामुळेंहि नष्ट होतो.

**४८० न सा सभा यत्र न सन्ति वृद्धा**
**न ते वृद्धा ये न वदन्ति धर्मम् ।**
**नासौ धर्मो यत्र न सत्यमस्ति**
**न तत्सत्यं यच्छलेनाभ्युपेतम् ॥ ५।३५।५८**

जेथें वृद्ध लोक नाहींत ती सभा नव्हे. जे धर्माला अनुसरून भाषण करीत नाहींत. ते वृद्ध नव्हेत. ज्यांत सत्य नाहीं तो धर्म नव्हे. आणि जें कपटानें युक्त असेल तें सत्यहि नव्हे.

**४८१ न हायनैर्न पलितैर्न वित्तैर्न च बन्धुभिः ।**
**ऋषयश्चक्रिरे धर्मं योऽनूचानः स नो महान् ॥ १२।२२३।६**

वयोमान, पिकलेले केस, धनदौलत आणि सोयरेधायरे यांचे बलावर कोणाला मोठेपणा प्राप्त होत नाहीं. ऋषींनीं असा नियम ठरविला कीं, जो सांगवेदाचें अध्ययन करणारा त्यालाच आम्ही श्रेष्ठ समजतों.

**४८२ न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ६।३०।४०**

( श्रीकृष्ण सांगतात ) बा अर्जुना, शुभ कर्मे करणारा केव्हांहि दुःस्थितीप्रत जात नाहीं.

**४८३ न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ॥६।२७।५**

कांहींहि कर्म न करितां कोणीाहि एक क्षणभर देखील राहूं शकत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४८४ न हि खल्वनुपायेन कश्चिदर्थोऽभिसिध्यति ।**
**सूत्रजालैर्यथा मत्स्यान्बध्नन्ति जलजीविनः ॥१२।२०३।११**

उपाय केल्यावांचून कोणतेंहि कार्य खचित सिद्ध होत नाहीं. उदाहरणार्थ, जलचरांवर उपजीविका करणारे लोक सुतांचें जाळें टाकूनच माशांना घेरीत असतात.

**४८५ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥६।२८।३८**

खरोखर ज्ञानासारखें पवित्र या जगांत दुसरें कांहींच नाहीं.

**४८६ न हि दैवेन सिध्यन्ति कार्याण्येकेन सत्तम ।**
**न चापि कर्मणैकेन द्वाभ्यां सिद्धिस्तु योगतः ॥ १०।२।३**

[ कृपाचार्य अश्वत्थाम्याला सांगतात ) एकट्या दैवानें किंवा एकट्या उद्योगानें कार्यें सिद्धीस जात नसतात. परंतु या दोहोंच्या संयोगानें कोणतेंहि काम साधत असतें.

**४८७ न हि पश्यामि जीवन्तं लोके कंचिदहिंसया ।**
**सत्त्वैः सत्त्वा हि जीवन्ति दुर्बलैर्बलवत्तराः ॥१२।१५।२०**

( अर्जुन युधिष्ठिराला म्हणतो ) अहिंसावृत्तीनें जगांत जिवंत राहणारा कोणी दिसून येत नाहीं. खरोखर बलवान् प्राणी आपल्याहून दुर्बल असलेल्या प्राण्यांवर उपजीविका करीत असतात.

**४८८ न हि प्रमादात्परमस्ति कश्चित्**
**वधो नराणामिह जीवलोके ।**
**प्रमत्तमर्था हि नरं समन्तात्**
**त्यजन्त्यनर्थाश्च समाविशन्ति ॥ १०।१०।१९**

या लोकीं मनुष्यांना बेसावधपणापेक्षां अधिक घातक असें कांहींच नाहीं. बेसावध राहणाऱ्या मनुष्याला सर्व प्रकारची संपत्ति सोडून जाते, आणि त्याच्यावर संकटें मात्र कोसळतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४८९ न हि प्राणात्प्रियतरं लोके किंचन विद्यते ।**
**तस्माद्दयां नरः कुर्याद्यथात्मनि तथा परे ॥१३।११६।१२**

मृत्युलोकीं प्राणापेक्षां प्रियतर असें कांहींच नाहीं. यास्तव, मनुष्यानें स्वतःप्रमाणेंच दुसऱ्याविषयीं कळकळ बाळगून दया करावी.

**४९० न हि बुद्ध्यान्वितः प्राज्ञो नीतिशास्त्रविशारदः ।**
**निमज्जत्यापदं प्राप्य महतीं दारुणामपि ॥ १२।१३८।४०**

नीतिशास्त्रनिपुण, बुद्धिमान्, चतुर पुरुष केवढेंहि मोठें भयंकर संकट प्राप्त झालें तरी त्यांत बुडून जात नाहीं.

**४९१ न हि वैरं महात्मानो विवृण्वन्त्यपकारिषु ।**
**शनैः शनैर्महाराज दर्शयन्ति स्म ते बलम् ॥१२।१५७।१०**

( भीष्म युधिष्ठिराला म्हणतात ) थोर लोक आपला अपकार करणाऱ्याविषयींचें वैर एकदम प्रगट करीत नाहींत. तथापि हळू हळू आपलें सामर्थ्य दाखविल्यावांचून ते रहात नाहींत.

**४९२ न हि वैराग्निरुद्भूतः कर्म चाप्यपराधजम् ।**
**शाम्यत्यदग्ध्वा नृपते विना ह्येकतरक्षयात्॥१२।१३९।४६**

( पूजनी पक्षीण ब्रह्मदत्त राजाला म्हणते ) वैररूपी अग्नि एकदां उत्पन्न झाला म्हणजे तो दग्ध केल्यावांचून शांत होत नाहीं. आणि अपराधजन्य पातक दोहोंतून एकाचा क्षय केल्यावांचून नाश पावत नाहीं.

**४९३ न हि वैराणि शाम्यन्ति दीर्घकालधृतान्यपि ॥ ५।७२।६२**

वैर दीर्घ कालपर्यंत धारण केलें तरी सुद्धा नाहींसें होत नाहीं.

**४९४ न हि शौर्यात्परं किंचित् ॥ १२।९९।१८**

शौर्यापेक्षां श्रेष्ठ कांहींच नाहीं.

**४९५ न हि संचयवान्कश्चिद्दृश्यते निरुपद्रवः ॥ ३।२।४८**

कोणीहि संचयी पुरुष उपद्रवरहित असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

**४९६ न हि सर्वत्र पाण्डित्यं सुलभं पुरुषेण वै ॥ ३।२८।२७**

मनुष्याची अक्कल सर्व बाबतींत चालणें खचित सोपें नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४९७ नहीदृशमनायुष्यं लोके किंचन विद्यते ।**
**यादृशं पुरुषस्येह परदारोपसेवनम् ॥ १३।१०४।२१**

खरोखर, परस्त्रीगमनाइतकें पुरुषाच्या आयुष्याची हानि करणारें जगांत दुसरें कांहीं नाहीं.

**४९८ न हृष्यत्यात्मसंमाने नावमानेन तप्यते ।**
**गाङ्गो ह्रद इवाक्षोभ्यो यः स पण्डित उच्यते ॥ ५।३३।२६**

आपला सन्मान झाला असतां जो आनंद मानीत नाहीं, अपमान झाला असतां कष्टी होत नाहीं, आणि गंगेच्या डोहाप्रमाणें ज्याची शांति केव्हांही ढळत नाहीं त्याला पंडित म्हणतात.

**४९९ न ह्यनाढ्यः सखाढ्यस्य ॥ १।१३१।६९**

दरिद्री श्रीमंताचा मित्र नसतो.

**५०० न ह्यनुप्तं प्ररोहति ॥ १३।१६३।११**

पेरल्याविना उगवत नाहीं.

**५०१ न ह्यात्मनः प्रियतरं किंचिद्भूतेषु निश्चितम् ॥ ११।७।२७**

प्राणिमात्राला स्वतःपेक्षां प्रिय कांहींच नाहीं हें निश्चित होय.

**५०२ न ह्यात्मस्तवसंयुक्तं वक्तव्यमनिमित्ततः ॥ १।३४।३**

आत्मस्तुतीनें युक्त असें भाषण कारणावांचून करूं नये.

**५०३ न ह्युत्थानमृते दैवं राज्ञामर्थं प्रसाधयेत् ॥ १२।५६।१४**

उद्योगावांचून नुसतें दैव राजांचे मनोरथ सिद्धीस नेणार नाहीं.

**५०४ न ह्यृतेऽर्थेन वर्तेते धर्मकामाविति श्रुतिः ॥ १२।१६७।१२**

अर्थाला ( द्रव्याला ) सोडून धर्म व काम हे पुरुषार्थ रहात नाहींत अशी श्रुति आहे.

**५०५ नाकारो गूहितुं शक्यो बृहस्पतिसमैरपि ॥७।१२।१४**

मनांतील हेतु छपविणें बृहस्पतीसारख्यांनाहि शक्य नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५०६ नाकालतो म्रियते जायते वा**
**नाकालतो व्याहरते च बालः ।**
**नाकालतो यौवनमभ्युपैति**
**नाकालतो रोहति बीजमुप्तम् ॥ १२।२५।११**

वेळ आल्याशिवाय कोणी मरत नाहीं किंवा जन्माला येत नाहीं. योग्य काळ आल्यावांचून लहान मूल बोलूं लागत नाहीं. योग्य काळाशिवाय कोणास तारुण्यावस्था प्राप्त होत नाहीं. आणि पेरललेलें बीं अकालीं उगवत नाहीं.

**५०७ नाकृतात्मा वेदयति धर्माधर्मविनिश्चयम् ॥ ३।२१५।१८**

मनोनिग्रह केल्याशिवाय धर्म कोणता, अधर्म कोणता याचें निश्चित ज्ञान होत नाहीं.

**५०८ नाकृत्वा लभते कश्चित् किंचिदत्र प्रियाप्रियम् १२।२९८।३०**

कांहीं तरी केल्याशिवाय या लोकीं कोणालाहि कांहीं सुखदुःख प्राप्त होत नाहीं.

**५०९ नागामिनमनर्थं हि प्रतिघातशतैरपि ।**
**शक्नुवन्ति प्रतिव्योढुमृते बुद्धिबलान्नराः ॥१२।२२७।३२**

शेंकडों प्रकारचे उपाय केले तरी मनुष्यांना बुद्धिसामर्थ्य असल्यावांचून भावी अनर्थाचा प्रतिकार करितां येणें शक्य नाहीं.

**५१० नाघ्नतः कीर्तिरस्तीह न वित्तं न पुनः प्रजाः ।**
**इन्द्रो वृत्रवधेनैव महेन्द्रः समपद्यत ॥ १२।१५।१५**

शत्रूचा वध न करणाऱ्या राजाला या लोकीं कीर्ति लाभणार नाहीं, धन मिळणार नाहीं आणि त्याची प्रजाहि सुरक्षित राहणार नाहीं. इंद्र सुद्धां वृत्रासुराचा वध करूनच महेंद्रपदवीला पोंचला.

**५११ नाच्छित्वा परमर्माणि नाकृत्वा कर्म दारुणम् ।**
**नाहत्वा मत्स्यघातीव प्राप्नोति महतीं श्रियम् १२।१४०।५०**

शत्रूच्या मर्मस्थानांवर घाव घातल्याशिवाय, भयंकर पराक्रम गाजविल्याशिवाय, आणि मासे मारणाऱ्या कोळ्याप्रमाणें हत्त्या केल्याशिवाय मोठ्या लक्ष्मीचा ( राजलक्ष्मीचा ) लाभ होणार नाहीं.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



५१२ नातः पापीयसीं कांचिदवस्थां शम्बरोऽब्रवीत् ।
यत्र नैवाद्य न प्रातर्भोजनं प्रति दृश्यते ॥ ५।७२।२२

आजच्या अथवा उद्यांच्याहि अन्नाची तजवीज ज्या अवस्थेमध्यें दृष्टीस पडत नाहीं, त्या अवस्थेपेक्षां कोणतीहि अवस्था अधिक दुःखदायक नाहीं, असें शंबरानेंहि सांगितलें आहे.

५१३ नात्मच्छन्देन भूतानां जीवितं मरणं तथा ।
नाप्यकाले सुखं प्राप्यं दुःखं वापि यदूत्तम ॥ ५।७२।५०

( युधिष्ठिर श्रीकृष्णाला म्हणतो ) हे यदुश्रेष्ठा, प्राण्यांना आपल्या इच्छेप्रमाणें जन्म किंवा मरण येत नाहीं. तसेंच, सुख काय किंवा दुःख काय, अकालीं प्राप्त होत नसतें.

५१४ नात्मच्छिद्रं रिपुर्विद्याद्विद्याच्छिद्रं परस्य तु ।
गूहेत्कूर्म इवाङ्गानि रक्षेद्विवरमात्मनः ॥ १२।१४०।२४

आपलें मर्मस्थान शत्रूला समजूं देऊं नये. आपण मात्र शत्रूचें मर्मस्थान शोधून काढावें. कासव ज्याप्रमाणें आपले सर्व अवयव आपल्या शरीरांतच दडवून ठेवतें त्याप्रमाणें राज्याचीं सर्व अंगें गुप्त राखावीं. आणि आपल्या छिद्रांविषयीं जपून असावें.

५१५ नात्यन्तं गुणवत्किंचिन्न चाप्यत्यन्तनिर्गुणम् ।
उभयं सर्वकार्येषु दृश्यते साध्वसाधु वा ॥ १२।१५।५०

सर्वस्वी गुणसंपन्न असें कांहीं नाहीं. आणि सर्वथा गुणहीनाहि कांहीं नाहीं. सर्व गोष्टींत बरें व वाईट हीं दोनहि असलेलीं दिसून येतात.

५१६ नादेशकाले किंचित्स्याद्देशकालौ प्रतीक्षताम् ॥ ३।२८।३२

देशकाल अनुकूल नसतां कांहीं होणार नाहीं. यास्तव, देशकालाकडे नजर द्यावी.

५१७ नाधनो धर्मकृत्यानि यथावदनुतिष्ठति ।
धनाद्धि धर्मः स्रवति शैलादभि नदी यथा ॥ १२।८।२३

द्रव्य नसतां धर्मकृत्यें यथासांग करितां येत नाहींत. पर्वतापासून जशी नदी, तसा द्रव्यापासून धर्म उत्पन्न होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५१८ नाधर्मश्चरितो राजन्सद्यः फलति गौरिव ।**
**शनैरावर्त्यमानो हि कर्तुर्मूलानि कृन्तति ॥ १।८०।२**

(शुक्राचार्य वृषपर्व्याला म्हणतात.) हे राजा, केलेलें पाप गाईप्रमाणें ताबडतोब फल देत नाहीं. परंतु तें पुनः पुनः केलें जाऊन हळूहळू कर्त्यांचीं पाळें मुळें खणून काढतें.

**५१९ नाधर्मो विद्यते कश्चिच्छत्रून्हत्वाततायिनः ।**
**अधर्म्यमयशस्यं च शात्रवाणां प्रयाचनम् ॥ ५।३।२१**

आततायी अशा शत्रूंना ठार मारल्यानें कसलाहि अधर्म होत नाहीं. परंतु शत्रूजवळ याचना करणें हें मात्र धर्मविरुद्ध असून कीर्तीला काळिमा लावणारें आहे.

**५२० नान्यत्र विद्यातपसोर्नान्यत्रेन्द्रियनिग्रहात् ।**
**नान्यत्र लोभसंत्यागाच्छान्तिं पश्यामि तेऽनघ ॥५।३६।५१**

( विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ) हे निष्पाप राजा, विद्या व तप यांच्यावांचून, इंद्रियनिग्रहावांचून, आणि लोभाचा सर्वथा त्याग केल्यावांचून तुला शांति प्राप्त होण्याचा अन्य मार्ग दिसत नाहीं.

**५२१ नान्यद्दुःखतरं किंचिल्लोकेषु प्रतिभाति मे ।**
**अर्थैर्विहीनः पुरुषः परैः संपरिभूयते ॥ ३।१९३।२०**

( बकमुनि इंद्राला म्हणतात ) लोक द्रव्यहीन पुरुषाचा सर्व प्रकारें अपमान करतात, यापेक्षां अधिक दुःखदायक गोष्ट जगांत दुसरी कोणतीही असेल, असें मला वाटत नाहीं.

**५२२ नापराधोऽस्ति नारीणां नर एवापराध्यति ।**
**सर्वकार्यापराध्यत्वान्नापराध्यन्ति चाङ्गनाः १२।२६६।४०**

स्त्रियांचें पाऊल कुमार्गाकडे वळण्याच्या कामीं स्त्रियांचा कांहींएक अपराध नाहीं. या कामीं पुरुष हाच सर्वस्वीं दोषी असतो. अशा प्रकारच्या सर्व बाबतींत पहिली आगळीक पुरुषाकडून होत असल्यामुळें स्त्रीवर्गाकडे दोष येत नाहीं.

**५२३ नापृष्टः कस्यचिद्ब्रूयान्नाप्यन्यायेन पृच्छतः ।**
**ज्ञानवानपि मेधावी जडवत्समुपाविशेत् ॥ १२।२८७।३५**

कोणी प्रश्न न करितां किंवा अन्यायानें प्रश्न केला असतांही शहाण्या मनुष्यानें उत्तर देऊं नये. तर त्यास त्या गोष्टीचें ज्ञान असूनहि त्यानें अजाणत्याप्रमाणें गप्प बसावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५२४ नाप्राप्यं तपसः किंचित् ॥ १२।२९५।२३**

तपाला अप्राप्य असें कांहींच नाहीं.

**५२५ नाप्राप्यमभिवाञ्छन्ति नष्टं नेच्छन्ति शोचितुम् ।**
**आपत्सु च न मुह्यन्ति नराः पण्डितबुद्धयः ॥ ५।३३।३३**

विचारी लोक अप्राप्य वस्तूचा अभिलाष धरीत नाहींत, गेलेल्याचा शोक करीत नाहींत, आणि अडचणीच्या प्रसंगीं भांबावून जात नाहींत.

**५२६ नाभीतो यजते राजन्नाभीतो दातुमिच्छति ।**
**नाभीतः पुरुषः कश्चित्समये स्थातुमिच्छति ॥१२।१५।१३**

( अर्जुन युधिष्ठिराला म्हणतो ) राजा, [ दंडाची ] भीति असल्याशिवाय कोणी यज्ञ करीत नाहीं, भीति वाटल्याशिवाय कोणाला दान करण्याची इच्छा होत नाहीं, आणि भीति वाटल्याशिवाय कोणी मनुष्य केलेला करार पाळूं इच्छित नाहीं.

**५२७ नामर्षं कुरुते यस्तु पुरुषः सोऽधमः स्मृतः ॥ २।५०।१७**

ज्या पुरुषाला दुसऱ्यानें अपमान केला असतां क्रोध येत नाहीं, तो अधम समजावा.

**५२८ नाऽमृतस्य हि पापीयान्भार्यामालभ्य जीवति ॥४।१७।१५**

[ कीचकानें अपमान केला असतां द्रौपदी संतप्त होऊन पांडवांस म्हणते. ] जिवंत पुरुषाच्या भार्येचा अपमान करणारा पापी कदापि जिवंत राहूं शकणार नाहीं !

**५२९ नायमत्यन्तसंवासो लभ्यते जातु केनचित् ।**
**अपि स्वेन शरीरेण किमुतान्येन केनचित् ॥ १२।२८।५२**

कोणासहि खुद्द आपल्या शरीराचासुद्धां सहवास अनंत काळपर्यंत लाभत नाहीं. मग इतर वस्तूंची कथा काय ?

**५३० नायं परस्य सुकृतं दुष्कृतं चापि सेवते ।**
**करोति यादृशं कर्म तादृशं प्रतिपद्यते ॥ १२।२९०।२२**

हा जीवात्मा दुसऱ्याचें सुकृत किंवा दुष्कृत भोगीत नाहीं. तर स्वतः ज्या प्रकारचें कर्म करतो त्याप्रकारचें फळ भोगतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५३१ नारभेतान्यसामर्थ्यात्पुरुषः कार्यमात्मनः ।**
**मतिसाम्यं द्वयोर्नास्ति कार्येषु कुरुनन्दन ॥ २।५६।८**

मनुष्यानें दुसऱ्याच्या सामर्थ्यावर अवलंबून राहून आपलें कार्य हातीं घेऊं नये, कारण एकाच कार्याविषयीं दोघांचें मत सारखें नसतें.

**५३२ नालं सुखाय सुहृदो नालं दुःखाय शत्रवः ।**
**न च प्रज्ञालमर्थानां न सुखानामलं धनम् ॥१२।१७४।२९**

मित्र असले म्हणून ते सुख देऊं शकतात असें नाहीं, व शत्रु असले म्हणून ते दुःख देऊं शकतात असेंहि नाहीं, बुद्धीच्या योगानें द्रव्यप्राप्ति होतेच असें नाहीं, व द्रव्याच्या योगानें सुख होतेंच असेंहि नाहीं.

**५३३ नालसाः प्राप्नुवन्त्यर्थान्न क्लीबा नाभिमानिनः ।**
**न च लोकरवाद्भीता न वै शश्वत्प्रतीक्षिणः ॥१२।१४०।२३**

आळशी, दुर्बळ, गर्विष्ठ, लोकापवादाला भिणारे, आणि नेहमीं वाट पहात राहणारे दीर्घसूत्री अशांना इष्टप्राप्ति होत नाहीं.

**५३४ नावं न शक्यमारुह्य स्थले विपरिवर्तितुम् ।**
**तथैव रथमारुह्य नाप्सु चर्या विधीयते ॥ १४।५०।३०**

नावेंत बसून जमिनीवर इकडे तिकडे हिंडतां येणें शक्य नाहीं. आणि रथांत बसून पाण्यावर चालतां येणार नाहीं.

**५३५ नाश्रोत्रियः श्रोत्रियस्य नारथी रथिनः सखा ।**
**नाराजा पार्थिवस्यापि सखिपूर्वं किमिष्यते ॥१।१३१।११**

( द्रुपद राजा द्रोणाचार्यांना म्हणतो ) वेदवेत्त्या ब्राह्मणाचा मित्र वेद न जाणणारा नसतो. रथांतून लढणाऱ्या योद्ध्याचा मित्र त्याच्याचसारखा असतो. राजाचा मित्र राजाच असतो. पूर्वीच्या मैत्रीला काय करावयाचें ?

**५३६ नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।**
**उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ ६।२६।१६**

जें मूळांतच नाहीं तें अस्तित्वांत येणें शक्य नाहीं, आणि जें आहे तें नाहींसें होणें शक्य नाहीं. असा दोहोंच्या खऱ्या स्वरूपाचा निर्णय तत्त्वदर्शी पुरुषांनीं ठरविला आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५३७ नासम्यक्कृतकारी स्यादप्रमत्तः सदा भवेत् ।**
**कण्टको ह्यपि दुश्छिन्नो विकारं कुरुते चिरम् ॥१२।१४०।६०**

निष्काळजीपणानें कांहीं करूं नये. नेहमीं सावध असावें. कारण एकादा कांटासुद्धां जर अयोग्य रीतीनें तुटला तर तो पुष्कळ काळपर्यंत विकार उत्पन्न करतो.

**५३८ नास्ति जात्या रिपुर्नाम मित्रं वापि न विद्यते ।**
**सामर्थ्ययोगाज्जायन्ते मित्राणि रिपवस्तथा ॥१२।१४०।५१**

खरोखर जन्मतःच कोणी शत्रु नसतो किंवा मित्रहि नसतो. सामर्थ्याच्या योगानें मित्र आणि शत्रु हे होत असतात.

**५३९ नास्ति भार्यासमं किंचिन्नरस्यार्तस्य भेषजम् ॥१२।१४४।१५**

आर्त पुरुषाला भार्येसारखें दुसरें औषध नाहीं.

**५४० नास्ति भार्यासमो बन्धुर्नास्ति भार्यासमा गतिः ।**
**नास्ति भार्यासमो लोके सहायो धर्मसंग्रहे ॥ १२।१४४।१६**

भार्येसारखा मित्र नाहीं, भार्येसारखा आसरा नाहीं. या लोकीं भार्येसारखा धर्मानुष्ठानांत साहाय्य करणारा कोणी नाहीं.

**५४१ नास्ति मातृसमा च्छाया नास्ति मातृसमा गतिः ।**
**नास्ति मातृसमं त्राणं नास्ति मातृसमा प्रिया ॥१२।२६६।३१**

मातेसारखी सांवली नाहीं, मातेसारखी गति नाहीं, मातेसारखें छत्र नाहीं. मातेसारखी प्रिय कोणी नाहीं.

**५४२ नास्ति विद्यासमं चक्षुर्नास्ति सत्यसमं तपः ।**
**नास्ति रागसमं दुःखं नास्ति त्यागसमं सुखम् ॥१२।३२९।६**

विद्येसारखा अन्य नेत्र नाहीं. सत्यासारखें तप नाहीं. विषयवासनेसारखें दुःख नाहीं, आणि त्यागासारखें सुख नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५४३ नास्ति वै जातितः शत्रुः पुरुषस्य विशांपते ।**
**येन साधारणी वृत्तिः स शत्रुर्नेतरो जनः ॥ २।५५।१५**

( दुर्योधन धृतराष्ट्राला म्हणतो ) राजा, जन्मतःच कोणी मनुष्य दुसऱ्या मनुष्याचा शत्रु नसतो. आपल्या सारखीच ज्याची उपजीविका असेल तोच आपला शत्रु; दुसरा कोणी नाहीं.

**५४४ नास्ति सत्यसमो धर्मो न सत्याद्विद्यते परम् ।**
**न हि तीव्रतरं किंचिदनृतादिह विद्यते ॥ १।७४।१०५**

सत्यापरता धर्म नाहीं, सत्यापेक्षां श्रेष्ठ कांहीं नाहीं. असत्यापेक्षां अधिक भयंकर असें जगांत कांहींच नाहीं.

**५४५ नास्थाने प्रक्रिया क्षमा ॥ १२।११९।३**

अस्थानीं बहुमान करणें योग्य नव्हे.

**५४६ नाहं राज्यं भवद्दत्तं भोक्तुमिच्छामि पार्थिव ।**
**बाहुवीर्यार्जितं राज्यमश्नीयामिति कामये ॥ १२।७४।१८**

[ मुचुकुंद कुबेराला म्हणतो ] तुझ्याकडून दान मिळालेलें राज्य भोगण्याची माझी इच्छा नाहीं. स्वतःच्या बाहुबलानें मिळवून त्याचा उपभोग घ्यावा असें मी इच्छितों.

**५४७ नाह्ना पूरयितुं शक्या न मासैर्भरतर्षभ ।**
**अपूर्यां पूरयन्निच्छामायुषापि न शक्नुयात् ॥ १२।१७।४**

वासनेची तृप्ति एका दिवसानें किंवा कांहीं महिन्यांनींहि होणें शक्य नाहीं. वासना ही ' अपूर्य ' असून तिची पूर्ति करणें सबंध आयुष्य खर्चून सुद्धां शक्य नाहीं.

**५४८ निकृत्या निकृतिप्रज्ञा हन्तव्या इति निश्चयः ।**
**न हि नैकृतिकं हत्वा निकृत्या पापमुच्यते ॥ ३।५२।२२**

कपटबुद्धि शत्रूंचा कपटानेंच वध केला पाहिजे असा सिद्धांत आहे. कपटी शत्रूचा कपटानें वध केला असतां त्याला पाप म्हणत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५४९ नित्यं यस्तु सतो रक्षेदसतश्च निवर्तयेत् ।**
**स एव राजा कर्तव्यस्तेन सर्वमिदं धृतम् ॥ १२।७८।४४**

जो नेहमीं सज्जनांचें पालन करील आणि दुर्जनांना घालवून देईल त्यालाच राजा करावें. त्याच्याच आश्रयानें सर्व विश्व असतें.

**५५० नित्यं रक्षितमन्त्रः स्याद्यथा मूकः शरच्छिखी॥ १२।१२०।७**

ज्याप्रमाणें मोर हा शरदृतूंत मौन धारण करतो, त्याप्रमाणें राजानें आपली मसलत नेहमीं गुप्त राखावी.

**५५१ नित्यं विश्वासयेदन्यान् ।**
**परेषां तु न विश्वसेत् ॥ १२।१३८।१९५**

आपल्याविषयीं दुसऱ्यांच्या मनांत नेहमीं विश्वास उत्पन्न करावा. आपण मात्र दुसऱ्यांवर विश्वास ठेवूं नये.

**५५२ नित्यमुद्यतदण्डस्य भृशमुद्विजते नरः ।**
**तस्मात्सर्वाणि भूतानि दण्डेनैव प्रसाधयेत् ॥ १२।१४०।८**

दंडशक्ति नेहमीं सज्ज असली म्हणजे लोक फार वचकून असतात. यास्तव राजानें सर्व प्राण्यांना दंडशक्तीच्या योगानेंच आपल्या ताब्यांत ठेवावें.

**५५३ नित्यं बुद्धिमतोऽप्यर्थः स्वल्पकोऽपि विवर्धते ।**
**दाक्ष्येण कुर्वतः कर्म संयमात्प्रतितिष्ठति ॥ १२।१३९।८८**

बुद्धिमान् पुरुषाजवळ आरंभीं अगदीं थोडें द्रव्य असलें तरी तें नेहमीं वाढत जातें. दक्षतेनें, एकाग्रतेनें उद्योग करणाराचें कार्य पक्कें होतें.

**५५४ निमेषमात्रमपि हि वयो गच्छन्न तिष्ठति ।**
**स्वशरीरेष्वनित्येषु नित्यं किमनुचिन्तयेत् ॥ १२।३३०।२२**

आयुष्य एकसारखें चाललें असून एक पळभरसुद्धां थांबत नाहीं. स्वतःचें शरीरच जेथें अशाश्वत, तेथें कोणती वस्तु शाश्वत म्हणून समजावयाची ?

**५५५ नियन्ता चेन्न विद्येत न कश्चिद्धर्ममाचरेत् ॥ ४।६८।४५**

नियमन करणारा कोणी नसेल तर कोणीहि धर्माप्रमाणें वागणार नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५५६ निरीहो नाश्नुते महत् ॥ ५।१३३।३४**

कांहींएक उद्योग न करणाऱ्या पुरुषाला मोठेपणा प्राप्त होत नाहीं.

**५५७ निर्मन्युश्चाप्यसंख्येयः पुरुषः क्लीबसाधनः ॥५।१३३।६**

ज्याला कधीं राग येत नाहीं असा नामर्द पुरुष कोणाच्या खिसगणतींत नसतो.

**५५८ निर्वनो वध्यते व्याघ्रो निर्व्याघ्रं छिद्यते वनम् ।**
**तस्माद्व्याघ्रो वनं रक्षेद्वनं व्याघ्रं च पालयेत् ॥५।२९।५५**

वन नसेल तर वाघांचा वध होत असतो, आणि ज्यांत वाघ नाहीं तें वनहि लोकांकडून तोडलें जातें. यास्तव वाघानें वनाचें रक्षण करावें, आणि वनानेंहि वाघाचें पालन करावें.

**५५९ निश्चयः स्वार्थशास्त्रेषु विश्वासश्चासुखोदयः ॥१२।१३९।७०**

नीतिशास्त्राचा असा सिद्धांत आहे कीं, विश्वास हा सर्व दुःखांचें उत्पत्तिस्थान आहे.

**५६० निश्चित्य यः प्रक्रमते नान्तर्वसति कर्मणः ।**
**अवन्ध्यकालो वश्यात्मा स वै पण्डित उच्यते ॥५।३३।२४**

प्रथम निश्चय केल्यावरच जो कार्य हातीं घेतो, कार्य हातीं घेतल्यावर तें पार पडल्यावांचून जो स्वस्थ बसत नाहीं, जो आपला वेळ फुकट घालवीत नाहीं आणि ज्याचें मन स्वाधीन आहे त्याला पंडित असें म्हणतात.

**५६१ निषेवते प्रशस्तानि निन्दितानि न सेवते ।**
**अनास्तिकः श्रद्दधान एतत्पण्डितलक्षणम् ॥ ५।३३।१६**

जो प्रशस्त कर्माचें आचरण करतो, निंद्य कर्मापासून दूर राहतो [ पुनर्जन्म, परलोक इत्यादिकांविषयीं ] आस्तिक्यबुद्धि धारण करतो, आणि [ गुरु, वेदवाक्य इत्यादींवर ] विश्वास ठेवतो तो पंडित होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५६२ नैकमिच्छेद्गणं हित्वा स्याच्चेदन्यतरग्रहः ।**
**यस्त्वेको बहुभिः श्रेयान्कामं तेन गणं त्यजेत्॥१२।८३।१२**
**श्रेयसो लक्षणं चैतद्विक्रमो यस्य दृश्यते ॥ १२।८३।१३**

समुदायाला सोडून [ राजानें ] एकाच मनुष्याची इच्छा करूं नये; व एकाचाच अंगीकार करणें अवश्य असल्यास, जो एकटा इतर पुष्कळांपेक्षां श्रेष्ठ असेल, त्याचा स्वीकार करून समुदायाचा खुशाल त्याग करावा. कारण, ज्या पक्षांत जास्त पराक्रम असेल तो स्वीकारणें हें कल्याणाचें लक्षण आहे.

**५६३ नैवास्य कश्चिद्भविता नायं भवति कस्यचित् ।**
**पथि सङ्गतमेवेदं दारबन्धुसुहृज्जनैः ॥ १२।२८।३९**

ह्या जीवात्म्याचा कोणी नाहीं आणि हा कोणाचा नाहीं. स्त्री, इतर नातलग व इष्ट मित्र यांचा सहवास हा केवळ रस्त्यांतील भेटीसारखा आहे.

**५६४ नैवाहितानां सततं विपश्चितः**
**क्षणं प्रतीक्षन्त्यपि दुर्बलीयसाम् ।**
**विशेषतोऽरीन्व्यसनेषु पण्डितो**
**निहत्य धर्मं च यशश्च विन्दते ॥ ८।९०।७१**

शत्रु दुर्बळ झाले म्हणजे शहाणे लोक केव्हांहि त्यांचा नाश करण्याला क्षणभरदेखील विलंब लावीत नाहींत. शत्रूचा वध करणें तो विशेषेंकरून तो संकटांत असतांनाच केला पाहिजे. शहाण्यानें अशाच स्थितींत शत्रूचा नाश केल्यास त्याजकडून धर्माचरण होऊन शिवाय त्यास कीर्तिहि प्राप्त होते.

**५६५ नोदकक्लिन्नगात्रस्तु स्नात इत्यभिधीयते ।**
**स स्नातो यो दमस्नातः स बाह्याभ्यन्तरः शुचिः॥१३।१०८।९**

पाण्यानें आंग भिजविलें म्हणजे स्नान केलें असें म्हणत नाहींत. ज्यानें इंद्रियदमन-रूप उदकांत स्नान केलें तोच खरोखर ‘ स्नात ’ झाला. तो अंतर्बाह्य शुचिर्भूत झाला.

**५६६ न्यायागतस्य द्रव्यस्य बोद्धव्यौ द्वावतिक्रमौ ।**
**अपात्रे प्रतिपत्तिश्च पात्रे चाप्रतिपादनम् ॥ ५।३३।५९**

न्यायानें मिळालेल्या द्रव्याचे दोन दुरुपयोग जाणावे. एक, अपात्रीं दान करणें. व दुसरा, सत्पात्रीं न करणें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५६७ पक्कानां हि वधे सूत वज्रायन्ते तृणान्युत ॥ ७।११।४८**

पक्क झालेल्यांचा वध करण्याच्या कामीं तृणाचासुद्धां वज्रासारखा उपयोग होतो.

**५६८ पञ्चमेऽहनि षष्ठे वा शाकं पचति स्वे गृहे ।**

**अनृणी चाप्रवासी च स वारिचर मोदते ॥३।३१३।११५**

( युधिष्ठिर यक्षाला म्हणतो ) पांचव्या अथवा सहाव्या दिवशीं कां होईना, जो, स्वतःचे घरींच असेल तो भाजीपाला उकडून खातो, ज्याला कोणाचें देणें नाहीं, आणि ज्याला प्रवास करावा लागत नाहीं तो, हे यक्षा, आनंदानें राहतो.

**५६९ पञ्चेन्द्रियस्य मर्त्यस्य छिद्रं चेदेकमिन्द्रियम् ।**

**ततोऽस्य स्रवति प्रज्ञा दृतेः पात्रादिवोदकम् ॥ ५।३३।७७**

मनुष्याच्या पांच इंद्रियांपैकीं एकादें जरी ताब्यांत नसेल तरी त्याच्या द्वारें, भांड्यांतील पाणी भोंकांतून गळून जावें त्याप्रमाणें, त्याची बुद्धि नष्ट होते.

**५७० पठकाः पाठकाश्चैव ये चान्ये शास्त्रचिन्तकाः ।**

**सर्वेव्यसनिनोमूर्खायःक्रियावान्सपण्डितः ॥३।३१३।११०**

शिकणारे व शिकविणारे तसेंच इतर जे कोणी शास्त्राविषयीं विचार करतात ते सर्व अभागी, मूर्ख आहेत. जो कांहीं तरी करून दाखवितो तोच खरा शहाणा.

**५७१ पण्डितेन विरुद्धः सन् दूरस्थोऽस्मीति नाश्वसेत् ।**

**दीर्घौबुद्धिमतो बाहू याभ्यां हिंसति हिंसितः॥१२।१४०।६८**

पंडिताशीं विरोध आला असतां, आपण त्याच्यापासून दूर आहों असें समजून निर्भयपणें राहूं नये. कारण बुद्धिमान् पुरुषाचे बाहू [ दिसण्यांत जेवढे दिसतात तेवढे नसून ते ] फार लांब असतात, व त्याला पीडा दिल्यास त्यांच्या योगानें तो पीडा देणाऱ्यांचा वध करतो.

**५७२ पतितः शोच्यते राजन्निर्धनश्चापि शोच्यते ।**

**विशेषं नाधिगच्छामि पतितस्याधनस्य च ॥१२।८।१५**

( अर्जुन युधिष्ठिराला म्हणतो ) राजा, लोक पातकी मनुष्याच्या संबंधानें हळहळतात आणि निर्धनाच्या संबंधानेंहि हळहळतात. मला तर महापातकी आणि दरिद्री यांच्यामध्यें कांहीं भेद दिसत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५७३ पतिर्हि देवो नारीणां पतिर्बन्धुः पतिर्गतिः ।**
**पत्या समा गतिर्नास्ति दैवतं वा यथा पतिः ॥१३।१४६।५५**

पति हाच स्त्रियांचा देव, पति हाच बांधव, आणि पति हेंच आश्रयस्थान, स्त्रियांना पतीसारखी गति नाहीं, पति हा खरोखर देवासमान होय.

**५७४ पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ ६।३३।२६**

( भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात ) पान, फूल, फळ किंवा नुसतें पाणी सुद्धां जो मला ( परमेश्वराला ) भक्तिपूर्वक अर्पण करतो, त्या शुद्ध अंतःकरणाच्या मनुष्याचें भक्तीनें अर्पण केलेलें मी स्वीकारीत असतों.

**५७५ परं विषहते यस्मात्तस्मात्पुरुष उच्यते ॥५।१३३।३५**

शत्रूचा पराजय करतो म्हणून पुरुष म्हणतात.

**५७६ परं क्षिपति दोषेण वर्तमानः स्वयं तथा ।**
**यश्च क्रुध्यत्यनीशानः स च मूढतमो नरः ॥ ५।३३।३७**

जो दोष स्वतःचे ठिकाणीं आहे त्याच दोषाबद्दल जो दुसऱ्याला नांवें ठेवतो, तसेंच आंगीं सामर्थ्य नसतां जो रागावतो तो मनुष्य पराकाष्ठेचा मूर्ख होय.

**५७७ परनेयोऽग्रणीर्यस्य स मार्गान्प्रतिमुह्यति ।**
**पन्थानमनुगच्छेयुः कथं तस्य पदानुगाः ॥२।५५।४**

ज्याचा पुढारी दुसऱ्याच्या तंत्रानें चालणारा असतो, त्याचा स्वतःचाच मार्ग चुकतो. मग आणखीहि त्याच्या मागून जाणारांना योग्य मार्ग कसा सांपडावा ?

**५७८ परवाच्येषु निपुणः सर्वो भवति सर्वदा ।**
**आत्मवाच्यं न जानीते जानन्नपि च मुह्यति ॥ ८।४५।४४**

दुसऱ्याचे दोष काढण्यांत सर्वजण प्रवीण असतात. कोणालाही स्वतःचा दोष मात्र समजत नाहीं; आणि समजला तर उमजत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५७९ परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ६।२८।८**

( श्रीकृष्ण म्हणतात ) सज्जनांचें संरक्षण करण्यासाठीं, दुष्टांचें निर्दलन करण्यासाठीं, आणि धर्माची संस्थापना करण्यासाठीं युगायुगांच्या ठिकाणीं मी ( परमेश्वर ) अवतार घेत असतों.

**५८० पर्जन्यः पर्वते वर्षन् किं नु साधयते फलम् ।**
**कृष्टे क्षेत्रे तथा वर्षन् किं न साधयते फलम् ॥ १०।२।५**

पाऊस डोंगरावर पुष्कळ पडला तरी त्यापासून कोणतें फळ मिळणार ? तोच नांगरलेल्या शेतांत पडला तर कोणतें फळ मिळणार नाहीं ?

**५८१ पर्जन्यनाथाः पशवो राजानो मन्त्रिबान्धवाः ।**
**पतयो बान्धवाः स्त्रीणां ब्राह्मणा वेदबान्धवाः ॥ ५।३४।३८**

पर्जन्य हा पशूंचा बांधव ( हितकर्ता ) होय. राजांचा बांधव प्रधान. स्त्रियांचा बांधव पति, आणि ब्राह्मणांचा बांधव वेद होय.

**५८२ पर्यङ्कशय्या भूमिश्च समाने यस्य देहिनः ।**
**शालयश्च कदन्नं च यस्य स्यान्मुक्त एव सः ॥ १२।२८८।३४**

पलंगावर पहुडणें व जमिनीवर पडणें हीं दोनहि ज्याला सारखींच वाटतात, तसेंच उंची पक्वान्नें आणि कदन्न ज्याला सारखेंच तो मुक्तच होय.

**५८३ पात्रे दानं स्वल्पमपि काले दत्तं युधिष्ठिर ।**
**मनसा हि विशुद्धेन प्रेत्यानन्तफलं स्मृतम् ॥ ३।२५९।३४**

( व्यासमुनि म्हणतात ) हे युधिष्ठिरा, योग्य ठिकाणीं योग्य वेळीं शुद्ध मनानें केलेलें दान अत्यल्प जरी असलें, तरी त्यापासून मरणोत्तर मोठें फळ मिळतें.

**५८४ पानमक्षास्तथा नार्यो मृगया गीतवादितम् ।**
**एतानि युक्त्या सेवेत प्रसङ्गो ह्यत्र दोषवान् ॥ १२।१४०।२६**

मद्य, जुगार, त्याचप्रमाणें स्त्रिया, मृगया आणि गाणें बजावणें यांचें जपून सेवन करावें. कारण, यांची चटक लागणें फार वाईट.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५८५ पापानां विद्ध्यधिष्ठानं लोभमेव द्विजोत्तम ॥ ३।२०७।५८**

( धर्मव्याध ब्राह्मणाला म्हणतो ) हे द्विजश्रेष्ठा, सर्व पापांचें आश्रयस्थान लोभ हेंच आहे असें जाण.

**५८६ पापेभ्यो हि धनं दत्तं दातारमपि पीडयेत् ।**
**तस्माद्धर्मार्थमनृतमुक्त्वा नानृतभाग्भवेत् ॥ ८।६९।६५**

दुष्टांना धन मिळूं दिलें असतां त्यापासून देणारालासुद्धां पीडा होते. [ म्हणून चोराला धन कोठें आहे हें सांगण्यापेक्षां खुशाल खोटें सांगावें. ] म्हणून धर्मासाठीं खोटें बोललें असतां खोटें बोलण्याचें पाप लागत नाहीं.

**५८७ पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।**
**पुत्राश्च स्थाविरे भावे न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति ॥१३।४६।१४**

स्त्रीचें कुंवारपणीं बाप रक्षण करितो, तरुणपणीं पति रक्षण करितो, आणि वृद्धपणीं मुलगे रक्षण करितात. एवंच, स्त्री ही स्वातंत्र्याला पात्र नाहीं.

**५८८ पित्रा पुत्रो वयःस्थोऽपि सततं वाच्य एव तु ।**
**यथा स्याद्गुणसंयुक्तः प्राप्नुयाच्च महद्यशः ॥ १।४२।४**

मुलगा मोठा झाला असला, तरी सुद्धां तो सद्गुणी व्हावा आणि त्याला उत्तम प्रकारचें यश लाभावें, म्हणून बापानें त्याला तशा प्रकारचा उपदेश करावा.

**५८९ पिबन्त्येवोदकं गावो मण्डूकेषु रुवत्स्वपि ॥१२।१४१।८२**

( तळ्यांतील ) बेडकांनीं कितीहि डरांव डरांव केलें तरी गाई पाणी पितातच !

**५९० पुत्र आत्मा मनुष्यस्य भार्या दैवकृतः सखा ॥३।३१३।७२**

पुत्र हाच मनुष्याचा आत्मा होय, आणि भार्या हा दैवानें प्राप्त झालेला सखा होय.

**५९१ पुत्रं हि मातापितरौ त्यजतः पतितं प्रियम् ।**
**लोकोरक्षति चात्मानंपश्यस्वार्थस्यसारताम् ॥१२।१३८।१४६**

आपला पुत्र प्रिय असूनहि पतित झाला तर आईबापसुद्धां त्याचा त्याग करतात. लोकहि [ इतरांकडे न पाहतां ] स्वतःचें संरक्षण करीत असतात. स्वार्थाचा प्रभाव केवढा आहे पहा !

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५९२ पुत्र नात्मावमन्तव्यः पूर्वाभिरसमृद्धिभिः ॥ ५।१३५।२५**

( विदुला माता संजयाला म्हणते ) हे पुत्रा, प्रथमतः आपणापाशीं जरी संपत्ति नसली तरी त्याकरितां पुरुषानें स्वतःला दीन समजूं नये.

**५९३ पुत्रपौत्रोपपन्नोऽपि जननीं यः समाश्रितः ।**
**अपि वर्षशतस्यान्ते स द्विहायनवच्चरेत् ॥ १२।२६६।२८**

मनुष्य पुत्रपौत्रांनीं युक्त असला तरी ज्याला मातेचा आश्रय आहे, तो आपल्या वयाच्या शंभराव्या वर्षाच्या शेवटींहि दोन वर्षांच्या लहान मुलाप्रमाणें वागेल !

**५९४ पुत्रस्पर्शात्सुखतरः स्पर्शो लोके न विद्यते ॥ १।७४।५८**

पुत्रस्पर्शापेक्षां सुखकर स्पर्श जगांत कोणताच नाहीं.

**५९५ पुत्रः सखा वा भ्राता वा पिता वा यदि वा गुरुः ।**
**रिपुस्थानेषु वर्तन्तो हन्तव्या भूतिमिच्छता ॥१।१४०।५२**

पुत्र, मित्र, भाऊ, बाप किंवा गुरु, कोणीहि असो, तो जर शत्रुत्वानें वागत असेल तर त्याचा उत्कर्षेच्छु पुरुषानें वध करावा.

**५९६ पुत्रा इव पितुर्गेहे विषये यस्य मानवाः ।**
**निर्भया विचरिष्यन्ति स राजा राजसत्तमः ॥१२।५७।३३**

बापाच्या घरांत जसे मुलगे, तसे ज्याच्या राज्यांत लोक निर्भयपणें संचार करूं शकतात, तो राजा सर्व राजांत श्रेष्ठ होय.

**५९७ पुनरावर्तमानानां भग्नानां जीवितैषिणाम् ।**
**भेतव्यमरिशेषाणामेकायनगता हि ते ॥ ९।५८।१५**

जिवाची इच्छा करणारे पण एकदा पराभव पावले असून, पुनः उलटून येणारे असे जे शत्रूकडील उरलेले लोक त्यांचें भय धरावें. कारण, [ मारीन किंवा मरेन एवढा ] एकच विषय त्याच्या दृष्टीपुढें असतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५९८ पुन्नाम्नो नरकाद्यस्मात्पितरं त्रायते सुतः ।**
**तस्मात्पुत्र इति प्रोक्तः स्वयमेव स्वयंभुवा ॥ १।७४।३९**

पुत् नामक नरकापासून मुलगा हा बापाचें रक्षण करतो, म्हणून त्याला स्वतः ब्रह्मदेवानेंच पुत्र असें म्हटलें आहे.

**५९९ पुरुषे पुरुषे बुद्धिर्या या भवति शोभना ।**
**तुष्यन्ति च पृथक्सर्वे प्रज्ञया ते स्वया स्वया ॥ १०।३।३**

प्रत्येक मनुष्यामध्यें जो म्हणून शहाणपणाचा भाग असतो, तेवढ्यावरच जो तो आपआपल्या ठिकाणीं खुष असतो.

**६०० पुष्पं पुष्पं विचिन्वीत मूलच्छेदं न कारयेत् ।**
**मालकार इवारामे न यथाङ्गारकारकः ॥ ५।३४।१८**

बागेंतील माळ्याप्रमाणें वृक्षाचें मूळ न तोडितां फूल येईल तेवढें घेत असावें. लोणाऱ्याप्रमाणें मुळासकट वृक्ष तोडून टाकूं नये.

**६०१ पूर्वं संमानना यत्र पश्चाच्चैव विमानना ।**
**जह्यात्तत्सत्त्ववान्स्थानं शत्रोःसंमानितोऽपि सन्॥१२।१३९।३३**

जेथें पहिल्यानें बहुमान मिळतो व मागाहून अपमान होतो तें ठिकाण, शत्रूकडून पुनरपि मानसन्मान मिळाला तरी, स्वाभिमानी पुरुषानें सोडूनच दिलें पाहिजे.

**६०२ पृथिवी रत्नसंपूर्णा हिरण्यं पशवः स्त्रियः ।**
**नालमेकस्य तत्सर्वमिति मत्वा शमं व्रजेत् ॥ १।७५।५१**

रत्नांनीं परिपूर्ण असलेली सर्व पृथ्वी, सोनें, पशु, स्त्रिया हें सर्व एकट्याला मिळालें तरी, पुरणार नाहीं असा विचार करून, मनुष्यानें मनोनिग्रह करण्यास शिकावें.

**६०३ प्रक्षालनाद्धि पङ्कस्य श्रेयो न स्पर्शनं नृणाम् ॥ ३।२।४९**

चिखल [ आंगावर उडाल्यावर ] धुऊन टाकण्यापेक्षां त्याला स्पर्शच न करणें मनुष्यांना सुखावह होतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६०४ प्रच्छन्नो वा प्रकाशो वा योगो योऽरिं प्रबाधते ।**
**तद्वै शस्त्रं शस्त्रविदां न शस्त्रं छेदनं स्मृतम् ॥२।५५।९**

उघड असो अथवा गुप्त असो, ज्या उपायानें शत्रूचा नाश होत असेल त्या उपायालाच वीरांचें शस्त्र म्हणतात. [हातपाय] तोडणाऱ्या शस्त्राला शस्त्र म्हणत नाहींत.

**६०५ प्रज्ञया मानसं दुःखं हन्याच्छारीरमौषधैः ।**
**एतद्विज्ञानसामर्थ्यं न बालैः समतामियात् ॥१२।२०५।३**

मानसिक दुःख विवेकानें आणि शारीरिक दुःख औषधानें नाहींसें करावें. अशा प्रकारें दुःखाचा नाश करणें हेंच ज्ञानाच्या सामर्थ्याचें लक्षण आहे. [ दुःखाचा परिहार न करितां ] लहान बालकांसारखें वागूं नये.

**६०६ प्रज्ञा प्रतिष्ठा भूतानां प्रज्ञा लाभः परो मतः ।**
**प्रज्ञा निःश्रेयसी लोके प्रज्ञा स्वर्गो मतः सताम्॥१२।१८०।२**

ज्ञान हाच प्राण्यांचा आधार आहे. ज्ञान हाच उत्कृष्ट असा लाभ आहे. लोकांत ज्ञान हेंच मोक्षालाहि कारण आहे. ज्ञान हाच प्रत्यक्ष स्वर्ग आहे. असें सत्पुरुषांचें मत आहे.

**६०७ प्रतिकूलः पितुर्यश्च न स पुत्रः सतां मतः ॥ १।८५।२४**

बापाशीं जो वैर करतो तो पुत्र सज्जनांना मान्य होत नाहीं.

**६०८ प्रत्युपकुर्वन्बह्वपि न भाति पूर्वोपकारिणा तुल्यः ।**
**एकःकरोतिहिकृतेनिष्कारणमेवकुरुतेऽन्यः॥१२।१३८।८२**

उपकारांची भरपूर फेड करणारा मूळ उपकार करणाऱ्याच्या बरोबरीचा ठरेल असें वाटत नाहीं. कां कीं, एकजण आधीं उपकृत झाल्यावर मग [ फेड म्हणून ] करीत असतो, तर दुसरा निरपेक्ष बुद्धीनेंच उपकार करतो.

**६०९ प्रत्युपस्थितकालस्य सुखस्य परिवर्जनम् ।**
**अनागतसुखाशा च नैव बुद्धिमतां नयः ॥१२।१४०।३६**

वेळेवर चालून आलेलें सुख सोडून द्यावयाचें आणि प्राप्त न झालेल्या सुखाची आशा करीत बसावयाचें ही शहाण्यांची रीतच नव्हे.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६१० प्रभवन् योऽनहंवादी स वै पुरुष उच्यते ॥ १३।१४६।१५**

हातीं सत्ता असून ज्याला गर्व नाहीं तोच पुरुष म्हणावयाचा.

**६११ प्रभवार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् ।**
**यः स्यात्प्रभवसंयुक्तःस धर्म इति निश्चयः॥१२।१०९।१०**

जीवांचा उत्कर्ष व्हावा एवढ्यासाठींच धर्म कथन केला आहे. जो उत्कर्षानें युक्त असेल तोच धर्म असा सिद्धांत आहे.

**६१२ प्रयोजनेषु ये सक्ता न विशेषेषु भारत ।**
**तानहं पण्डितान्मन्ये विशेषा हि प्रसङ्गिनः ॥ ५।३८।४४**

[ विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ] हे राजा, जे केवळ कार्यें पार पाडण्याविषयीं तत्पर असतात, फाजील भानगडींत पडत नाहींत, त्यांना मी शहाणे समजतों. कारण, स्वतःचें आधिक्य दाखविणारे कलहाचा प्रसंग आणितात.

**६१३ प्रवारणं तु बालानां पूर्वं कार्यमिति श्रुतिः ॥ ५।७।१७**

बालकांची इच्छा प्रथम पुरवावी अशी श्रुति आहे.

**६१४ प्रवृत्तवाक् चित्रकथ ऊहवान्प्रतिभानवान् ।**
**आशु ग्रन्थस्य वक्ता च यः स पण्डित उच्यते॥५।३३।२८**

बोलका, मनोरंजक गोष्टी माहीत असलेला, तर्कवान् अणि समयसूचक असून जो ग्रंथाचा अर्थ चटकन् सांगतो तो पंडित होय.

**६१५ प्रसादो निष्फलो यस्य क्रोधश्चापि निरर्थकः ।**
**न तं भर्तारमिच्छन्ति षण्ढं पतिमिव स्त्रियः ॥५।३४।२१**

ज्याच्या मेहरबानीचा कांहीं उपयोग नाहीं आणि रागापासूनहि कांहीं हानि नाहीं, असा अधिपति, ज्याप्रमाणें स्त्रियांना नामर्द पति नको असतो त्याप्रमाणें, प्रजेला नको असतो.

**६१६ प्रसृतैरिन्द्रियैर्दुःखी तैरेव नियतैः सुखी ।**
**तस्मादिन्द्रियरूपेभ्यो यच्छेदात्मानमात्मना ॥१२।२०४।९**

इंद्रियें मोकळीं सोडल्यानें मनुष्य दुःखी होतो व तींच आंवरून धरल्यानें सुखी होतो; यासाठीं, इंद्रियांच्या निरनिराळ्या विषयांपासून आपण आपलें मन आवरून धरावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६१७ प्रस्थं वाहसहस्रेषु यात्रार्थं चैव कोटिषु ।**
**प्रासादे मञ्चकं स्थानं यः पश्यति स मुच्यते ॥ १२।२८८।३०**

हजारों नव्हे कोट्यवधि गाडे धान्य पुढें पडलें असतांहि, जो केवळ निर्वाहाला लागणाऱ्या मापटेंभर धान्याचीच अपेक्षा करतो, व ज्याला मोठा राजवाडा रहावयास दिला असतां, एक खाट ठेवण्याइतकीच जागा जो पुरेशी समजतो तो मुक्त होतो.

**६१८ प्रहरिष्यन्प्रियं ब्रूयात्प्रहरन्नपि भारत ।**
**प्रहृत्य च कृपायीत शोचेत च रुदेत च ॥ १।१४०।५६**

( कणिक ब्राह्मण धृतराष्ट्राला सांगतो ) ( शत्रूवर ) प्रहार करण्याचें मनांत असतां वरकरणी त्याच्याशीं गोड बोलावें, तसेंच प्रहार करीत असतांहि गोडच बोलावें आणि प्रहार केल्यावर त्याच्याविषयीं सहानुभूति दाखवावी, खेद प्रदर्शित करावा व रडावेंहि.

**६१९ प्राकृतो हि प्रशंसन्वा निन्दन्वा किं करिष्यति ।**
**वने काक इवाबुद्धिर्वाशमानो निरर्थकम् ॥ १२।११४।८**

हलका मनुष्य, प्रशंसा करून असो, अथवा निंदा करून असो, करणार काय आहे ? अरण्यांत निरर्थक ओरडणाऱ्या कावळ्याप्रमाणें मंदबुद्धि मनुष्याची स्थिति आहे.

**६२० प्राज्ञस्तु जल्पतां पुंसां श्रुत्वा वाचः शुभाशुभाः ।**
**गुणवद्वाक्यमादत्ते हंसः क्षीरमिवाम्भसः ॥ १।७४।९१**

यथेच्छ बरळणाऱ्या लोकांचें बरें वाईट बोलणें ऐकून, पाणी टाकून देऊन दूध ग्रहण करणाऱ्या हंसाप्रमाणें, त्यांतून चांगलें बोलणें तेवढें शहाणा मनुष्य घेत असतो.

**६२१ प्राज्ञो वा यदि वा मूर्खः सधनो निर्धनोऽपि वा ।**
**सर्वः कालवशं याति शुभाशुभसमन्वितः ॥ १२।१५३।४३**

शहाणा असो, मूर्ख असो, श्रीमंत असो दरिद्री असो सर्वांना आपआपलें पापपुण्य बरोबर घेऊन काळाच्या स्वाधीन व्हावें लागतें.

**६२२ प्राणस्यान्नमिदं सर्वं जङ्गमं स्थावरं च यत् ॥ १२।१०।६**

स्थावर जंगम जें जें कांहीं आहे तें सर्व प्राणाचें अन्न होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६२३ प्राप्तं च प्रहरेत्काले न च संवर्तते पुनः ।**
**हन्तुकामस्य देवेन्द्र पुरुषस्य रिपून्प्रति ॥ १२।१०३।२०**
**यो हि कालो व्यतिक्रामेत्पुरुषं कालकाङ्क्षिणम् ।**
**दुर्लभः स पुनस्तेन कालः कर्मचिकीर्षुणा ॥१२।१०३।२१**

( बृहस्पति इंद्राला म्हणतात ) देवेंद्रा, शत्रूला मारण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें योग्य संधि आली असतां प्रहार केला पाहिजे. गेलेली वेळ फिरून येत नसते; कार्य साधण्याच्या इच्छेनें योग्य काळाची वाट पाहणाऱ्या पुरुषानें आलेली संधि गमावली तर ती त्याला फिरून मिळणें कठीण.

**६२४ प्रायेण नीचा व्यसनेषु मग्ना**
**निन्दन्ति दैवं कुकृतं न तु स्वम् ॥ ८।९।११**

नीच लोक संकटांत सांपडले म्हणजे बहुतकरून देवाला दोष लावतात; ते आपल्या दुष्कर्माला बोल लावीत नाहींत !

**६२५ प्रायेण श्रीमतां लोके भोक्तुं शक्तिर्न विद्यते ।**
**जीर्यन्त्यपि हि काष्ठानि दरिद्राणां च सर्वशः ॥१२।२८।२९**

बहुतकरून श्रीमंत लोकांना जेवण्याची शक्तिच नसते. आणि दरिद्री मनुष्यांना लाकडेंसुद्धां सर्व पचून जातात.

**६२६ प्रार्थना विषम् ॥ ३।३१३।८६**

याचना हें विषच होय.

**६२७ प्रीयते हि हरन्पापः परवित्तमराजके ।**
**यदास्य उद्धरन्त्यन्ये तदा राजानमिच्छति ॥ १२।६७।१३**

दुसऱ्याचें द्रव्य हरण करणाऱ्या पापी मनुष्याला देशांत राजा नसलेला बरा वाटतो; पण जेव्हां त्याचें द्रव्य दुसरे लोक नेऊं लागतात, तेव्हां त्याला राजा असावा, असें वाटूं लागतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६२८ फलशाकमपि श्रेयो भोक्तुं ह्यकृपणं गृहे ।**
**परस्य तु गृहे भोक्तुः परिभूतस्य नित्यशः ॥ ३।१९३।३०**

नित्य अपमान सहन करून दुसऱ्याच्या घरीं जेवण्यापेक्षां, मिंधेपणा न पत्करतां स्वतःच्या घरीं मीठभाकरसुद्धां खाल्लेली बरी !

**६२९ बकवच्चिन्तयेदर्थान् सिंहवच्च पराक्रमेत् ।**
**वृकवच्चाप्यलुम्पेत शशवच्च विनिष्पतेत् ॥ १२।१४०।२५**

बगळ्याप्रमाणें आपल्या उद्दिष्टाकडे लक्ष्य ठेवावें आणि सिंहाप्रमाणें पराक्रम गाजवावा. लांडग्याप्रमाणें शत्रूवर अचानक हल्ला करावा, व सशाप्रमाणें निसटून जावें.

**६३० बलं हि क्षत्रिये नित्यं बले दण्डः समाहितः ॥ १२।२३।१३**

क्षत्रियांचे ठिकाणीं बल हें नियमानें वास्तव्य करणारें असून बलावरच दंड अवलंबून आहे.

**६३१ बलज्येष्ठं स्मृतं क्षत्रं मन्त्रज्येष्ठा द्विजातयः ।**
**धनज्येष्ठाःस्मृता वैश्याःशूद्रास्तु वयसाधिकाः॥५।१६८।१७**

क्षत्रिय बळानें श्रेष्ठ, ब्राह्मण मंत्रसामर्थ्यानें श्रेष्ठ आणि वैश्य धनानें श्रेष्ठ होत. शूद्र हे मात्र केवळ वयानें मोठे.

**६३२ बलं तु वाचि द्विजसत्तमानां**
**क्षात्रं बुधा बाहुबलं वदन्ति ॥ ८।७०।१२**

उत्तम ब्राह्मणांचें बळ वाणींत, व क्षत्रियांचें बळ बाहूंत असतें असें शहाणे लोक सांगतात.

**६३३ बलवत्संनिकर्षो हि न कदाचित्प्रशस्यते ॥ १२।१३८।१७५**

बलवानाशीं सान्निध्य असणें केव्हांहि प्रशस्त नव्हे.

**६३४ बलवांश्च यथा धर्मं लोके पश्यति पूरुषः ।**
**स धर्मो धर्मवेलायां भवत्यभिहतः परः ॥ २।६९।१५**

धर्मनिर्णय करण्याची वेळ आली म्हणजे, जगांत बलसंपन्न पुरुष ठरवील तो धर्म ठरतो; दुसऱ्या धर्मांची पायमल्ली होते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६३५ बलवान्वा कृती वेति कृती राजन्विशिष्यते ॥ ९।३३।९**

( श्रीकृष्ण युधिष्ठिराला म्हणतात ) हे राजा, बलवान् आणि कृती यांच्यांत श्रेष्ठ कोण असा विचार करतां, कृती ( म्हणजे डावपेंच जाणणारा, युक्तिमान् ), ह्याच श्रेष्ठ ठरतो.

**६३६ बलिना संनिकृष्टस्य शत्रोरपि परिग्रहः ।**
**कार्य इत्याहुराचार्या विषमे जीवितार्थिना ॥ १२।१३८।४५**

संकटांत सांपडल्यास जीविताची इच्छा करणाऱ्या बलाढ्यहि प्राण्यानें आपल्या समीप असणाऱ्या शत्रूचाहि आश्रय करावा, असें नीतिशास्त्राच्या आचार्यांनीं सांगितलेलें आहे.

**६३७ बहवः पण्डिता मूर्खा लुब्धा मायोपजीविनः ।**
**कुर्युर्दोषमदोषस्य बृहस्पतिमतेरपि ॥ १२।११।६३**

अनेक पंडित आणि मूर्ख लोक लोभी व कपटाचरणावरच उपजीविका करणारे असतात. आणि ते निर्दोष पुरुषालाच नव्हे तर प्रत्यक्ष बृहस्पतीच्याहि बुद्धीला दोष लावितात.

**६३८ बालो युवा च वृद्धश्च यत्करोति शुभाशुभम् ।**
**तस्यां तस्यामवस्थायां तत्फलं प्रतिपद्यते ॥ १२।१८१।१५**

बाल, तरुण अथवा वृद्ध पुरुष जें जें कांहीं शुभ अथवा अशुभ कर्म करतो, त्याचें फळ त्या त्या अवस्थेंत त्याला अवश्य मिळतें.

**६३९ बुद्धिमान्वृद्धसेवया ॥ ३।३१३।४८**

वृद्धांचा समागम केल्यानें मनुष्य चतुर होतो.

**६४० बुद्धिश्च हीयते पुंसां नीचैः सह समागमात् ।**
**मध्यमैर्मध्यतां याति श्रेष्ठतां याति चोत्तमैः ॥ ३।१।३०**

नीच लोकांच्या संगतीनें मनुष्यांची बुद्धि भ्रष्ट होते, मध्यम लोकांच्या संगतीनें ती मध्यम होते, आणि उत्तम लोकांशीं सहवास ठेविल्यानें उत्तम होते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६४१ बुद्धौ कलुषभूतायां विनाशे प्रत्युपस्थिते ।**
**अनयो नयसङ्काशो हृदयान्नापसर्पति ॥ ५।३४।८२:**

बुद्धि मलिन झाली व विनाशकाल जवळ येऊन ठेपला म्हणजे नीतीसारखी दिसणारी अनीति मनुष्याच्या हृदयांत ठाणें देऊन बसते.

**६४२ बुभुक्षां जयते यस्तु स स्वर्गं जयते ध्रुवम् ॥१४।९०।९१**

ज्यानें क्षुधा जिंकली त्यानें खचित स्वर्ग जिंकला.

**६४३ ब्रह्मक्षत्रं हि सर्वेषां वर्णानां मूलमुच्यते ॥१२।७३।५**

ब्राह्मण आणि क्षत्रिय हेच सर्व वर्णांचें मूळ होत.

**६४४ ब्रह्म क्षत्रेण सहितं क्षत्रं च ब्रह्मणा सह ।**
**संयुक्तौ दहतः शत्रून्वनानीवाग्निमारुतौ ॥ ३।१८५।२५**

ब्राह्मणानें क्षत्रियाशीं व क्षत्रियानें ब्राह्मणाशीं सहकार्य केलें म्हणजे ते दोघे मिळून वनेंच्या वनें जाळून फस्त करणाऱ्या अग्नि-वायूंप्रमाणें, शत्रूंना जाळून टाकतील.

**६४५ ब्रह्मचर्यं परो धर्मः ॥ १।१७०।७१**

ब्रह्मचर्य पाळणें हा श्रेष्ठ धर्म होय.

**६४६ ब्रह्म वर्धयति क्षत्रं क्षत्रतो ब्रह्म वर्धते ॥ १२।७३।३२**

ब्राह्मण क्षत्रियाचें सामर्थ्य वाढवितो आणि क्षत्रियामुळें ब्राह्मणाचा उत्कर्ष होतो.

**६४७ ब्रह्महत्याफलं तस्य यः कृतं नावबुध्यते ॥ ७।१८३।२८**

आपणांवर दुसऱ्यानें केलेला उपकार जो स्मरत नाहीं, त्याला ब्रह्महत्त्येचें पातक लागतें.

**६४८ ब्राह्मणस्य तु देहोऽयं न कामार्थाय जायते ।**
**इह क्लेशाय तपसे प्रेत्य त्वनुपमं सुखम् ॥१२।३२१।२३**

ब्राह्मणाचा देह हा सुखोपभोगासाठीं निर्माण झालेला नाहीं, इहलोकीं क्लेश भोगून तपाचरण करण्यासाठीं ब्राह्मण जन्मला आहे. असें केलें तरच परलोकीं जीवाला निरुपम सुख मिळेल.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



६४९ ब्राह्मण्यं बहुभिरवाप्यते तपोभि-
स्तल्लब्ध्वा न रतिपरेण हेलितव्यम् ।
स्वाध्याये तपसि दमे च नित्ययुक्तः
क्षेमार्थी कुशलपरः सदा यतस्व ॥१२।३२१।२४

( व्यासमुनि शुकाला सांगतात. ) पुष्कळ प्रकारें तप करावें तेव्हांच ब्राह्मणत्व प्राप्त होत असतें. तें लाभल्यावर विषयांच्या नादीं लागून व्यर्थ दवडूं नये. आत्मकल्याण साधून घेण्याची इच्छा असेल तर वेदाभ्यास, तप व इंद्रियदमन यांमध्यें नेहमीं दक्ष राहून सत्कर्म करून झटून प्रयत्न कर.

६५० भक्ष्योत्तमप्रतिच्छन्नं मत्स्यो बडिशमायसम् ।
लोभाभिपाती ग्रसते नानुबन्धमवेक्षते ॥ ५।३४।१३

उत्तम प्रकारच्या खाद्य पदार्थानें आच्छादलेला लोखंडाचा गळ मासा लोभानें झडप घालून गिळून टाकतो, [ असें करितांना ] पाठीमागून परिणाम काय होईल इकडे त्याचें लक्ष्य नसतें.

६५१ भज्येतापि न संनमेत् ॥ ९।५।१४

तुटून जावें पण वाकूं नये.

६५२ भयेन भेदयेद्भीरुं शूरमञ्जलिकर्मणा ।
लुब्धमर्थप्रदानेन समं न्यूनं तथौजसा ॥१।१४०।५०

भित्रा असेल त्याला भीति दाखवून फितूर करावा; शूराला हात जोडून, लोभी असेल त्याला द्रव्य देऊन, आणि बरोबरीचा किंवा दुर्बळ असेल त्याला जबरदस्तीनें वश करावा.

६५३ भर्तव्या रक्षणीया च पत्नी हि पतिना सदा ॥३।६९।४१

पतीनें निरंतर पत्नीचें पोषण व रक्षण केलें पाहिजे.

६५४ भवितव्यं सदा राज्ञा गर्भिणीसहधर्मिणा ॥१२।५६।४४

ज्याप्रमाणें गर्भिणी स्त्री गर्भाचें संगोपन करते, त्याप्रमाणें राजानें निरंतर प्रजाजनांचें रक्षण करावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६५५ भारं स वहते तस्य ग्रन्थस्यार्थं न वेत्ति यः ।**
**यस्तु ग्रन्थार्थतत्त्वज्ञो नास्य ग्रन्थागमो वृथा ॥१२।३०५।१४**

ज्याला ग्रंथाचा अर्थ कळत नाहीं [ पण जो नुसती घोकंपट्टी करतो ] तो त्या ग्रंथाचा केवळ भार वाहतो. परंतु ज्यानें ग्रंथाच्या अर्थाचें रहस्य जाणलें त्याचाच अभ्यास सार्थकी लागला.

**६५६ भार्यायां रक्ष्यमाणायां प्रजा भवति रक्षिता ।**
**प्रजायां रक्ष्यमाणायामात्मा भवति रक्षितः ॥ ३।१२।६९**

भार्येचें संरक्षण होऊं लागलें असतां संततीचें संरक्षण होतें, आणि संततीचें संरक्षण होऊं लागलें असतां आपलें संरक्षण होतें.

**६५७ भार्या हि परमो ह्यर्थः पुरुषस्येह पठ्यते ।**
**असहायस्य लोकेऽस्मिँल्लोकयात्रासहायिनी॥१२।१४४।१४**

भार्या ही पुरुषाची इहलोकांतील परमश्रेष्ठ संपत्ति होय असें म्हटलेलें आहे. या जगांत असहाय असलेल्या पुरुषाला संसाराच्या कामीं साहाय्य करणारी तीच आहे.

**६५८ भार्याहीनं गृहस्थस्य शून्यमेव गृहं भवेत् ॥ १२।१४४।५**

भार्येवांचून गृहस्थाचें घर रिकामेंच वाटतें.

**६५९ भिन्नानामतुलो नाशः क्षिप्रमेव प्रवर्तते ॥ १।२९।२०**

ज्यांच्यांत भिन्नभाव उत्पन्न झाला त्यांचा तत्काळ सर्वथा नाश होतो.

**६६० भिन्ना श्लिष्टा तु या प्रीतिर्न सा स्नेहेन वर्तते॥१२।१११।८५**

एकदा मोडून पुनः जोडलेला स्नेह स्नेहाच्या रूपानें टिकत नाहीं.

**६६१ भीतवत्संविधातव्यं यावद्भयमनागतम् ।**
**आगतं तु भयं दृष्ट्वा प्रहर्तव्यमभीतवत् ॥ १।१४०।८२**

संकट जोंवर प्राप्त झालेलें नाहीं, तोंवर भित्र्या माणसाप्रमाणें त्याच्या निवारण्याच्या तजविजींत असावें. परंतु संकट येऊन ठेपलें असें दिसतांच, शूराप्रमाणें त्यास तोंड द्यावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६६२ भीमसेनस्तु धर्मेण युध्यमानो न जेष्यति ।**
**अन्यायेन तु युध्यन्वै हन्यादेव सुयोधनम् ॥ ९।५८।४**

[ श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात ] भीमसेन जर धर्मानें लढेल तर त्यास जय मिळणार नाहीं; परंतु जर अन्यायानें युद्ध करील तर खात्रीनें सुयोधनास ठार करील.

**६६३ भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥६।२७।१३**

जे केवळ आपल्यासाठीं अन्न शिजवितात, ते पातकी लोक [ त्या अन्नाच्या रूपानें ] पापच भक्षण करितात.

**६६४ भूतं हित्वा च भाव्यर्थे योऽवलम्बेत्स मन्दधीः॥१।२३३।१५**

प्राप्त झालेल्या फळाचा त्याग करून पुढें मिळणाऱ्या फळाची जो आशा करीत बसतो तो मूर्ख होय.

**६६५ भूतिः श्रीर्ह्रीर्धृतिः कीर्तिर्दक्षे वसति नालसे॥१२।२७।३२**

वैभव, संपत्ति, विनयशीलपणा, धैर्य व कीर्ति हीं सर्व तत्परतेनें उद्योग करणाऱ्या मनुष्याच्या ठिकाणीं वास करितात; आळशाच्या ठिकाणीं रहात नाहींत.

**६६६ भूमिरेतौ निगिरति सर्पो बिलशयानिव ।**
**राजानं चाप्ययोद्धारं ब्राह्मणं चाप्रवासिनम्॥१२।२३।१५**

युद्ध न करणारा राजा आणि प्रवास न करणारा ब्राह्मण या दोघांना, बिळांत राहणाऱ्या प्राण्यांना सर्प खाऊन टाकतो त्याप्रमाणें, भूमि गिळून टाकते.

**६६७ भूयांसं लभते क्लेशं या गौर्भवति दुर्दुहा ।**
**अथ या सुदुहा राजन्नैव तां वितुदन्त्यपि ॥ १२।६७।९**

जी गाय धार काढूं देण्यास फार त्रास देते, तिला अतिशय क्लेश भोगावे लागतात; पण जी सुखानें दूध देते तिला मुळींच कोणी त्रास देत नाहीं.

**६६८ भेदे गणा विनश्युर्हि भिन्नास्तु सुजयाः परैः ।**
**तस्मात्सङ्घातयोगेन प्रयतेरन्गणाः सदा ॥ १२।१०७।१४**

समुदायांत भेद उत्पन्न झाला कीं त्यांचा सर्वथा नाश ठरलेलाच. कारण त्यांच्यांत फूट पडली म्हणजे शत्रु त्यांचा सहज पराभव करूं शकतात. यास्तव, समुदायांनीं नेहमीं संघशक्तीनें कार्य करावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६६९ भैषज्यमेतद्दुःखस्य यदेतन्नानुचिन्तयेत् ।**
**चिन्त्यमानं हि न व्येति भूयश्चापि प्रवर्धते ॥१२।३३०।१२**

दुःखावर औषध हेंच कीं त्याचें एकसारखें चिंतन करीत बसूं नये. कारण, चिंतन केल्यानें दुःख नाहींसें तर होत नाहींच, पण उलट अधिक वाढतें मात्र.

**६७० मग्नस्य व्यसने कृच्छ्रे धृतिः श्रेयस्करी नृप ॥१२।२२७।३**
**धैर्येण युक्तं सततं शरीरं न विशीर्यते ।**
**विशोकता सुखं धत्ते धत्ते चारोग्यमुत्तमम् ॥१२।२२७।४**
**आरोग्याच्च शरीरस्य स पुनर्विन्दते श्रियम् ॥१२।२२७।५**

( भीष्म युधिष्ठिराला सांगतात ) महत्संकटांत सांपडलेल्या मनुष्यानें धीर धरणें श्रेयस्कर आहे. नेहमीं धैर्य असलें म्हणजे शरीराची हानि होत नाहीं. शोकाचा त्याग केल्यानें सुख होतें व त्यापासून उत्तम आरोग्य प्राप्त होतें. आणि शरीर निरोगी राहिलें म्हणजे मनुष्य गेलेलें वैभव पुनः प्राप्त करून घेतो.

**६७१ मद्यमांसपरस्वानि तथा दारा धनानि च ।**
**आहरेद्रागवशगस्तथा शास्त्रं प्रदर्शयेत् ॥ १२।८८।२२**

विषयाधीन झालेला मनुष्य मद्य, मांस, परस्त्री आणि परद्रव्य यांचा अपहार करील, आणि [ आपल्या दुष्कृत्याचें समर्थन करण्याकरितां ] तसा शास्त्रार्थहि काढून दाखवील.

**६७२ मधुदोहं दुहेद्राष्ट्रं भ्रमरा इव पादपम् ।**
**वत्सापेक्षी दुहेच्चैव स्तनांश्च न विकुट्टयेत् ॥१२।८८।४**

भुंगा जसा झाडाला धका न लावतां फुलांतील मध तेवढा हळूच काढून घेतो त्याप्रमाणें राजानें प्रजेचें मन न दुखवितां तिजपासून कराच्या रूपानें द्रव्य ग्रहण करावें. अथवा, ज्याप्रमाणें गाईची धार काढणारा वांसराला दूध राहील अशा बेतानें धार काढतो, आंचळ अगदीं पिळून काढीत नाहीं. त्याप्रमाणेंच राजानें प्रजेचें पोषण होईल अशा बेतानेंच कर घ्यावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६७३ मधु यः केवलं दृष्ट्वा प्रपातं नानुपश्यति ।**
**स भ्रष्टो मधुलोभेन शोचत्येवं यथा भवान् ॥ ११।१।३७**

( भारती युद्धानंतर संजय धृतराष्ट्राला म्हणतो ) ज्याला तुटलेल्या कड्यास लटकणारें मधाचें पोळें मात्र दिसतें, पण तो तुटलेला कडा दिसत नाहीं, तो मधाच्या लोभानें पुढें जाऊन खालीं घसरतो आणि हल्लीं तूं शोक करीत आहेस असाच पश्चात्ताप करीत बसतो.

**६७४ मन एव मनुष्यस्य पूर्वरूपाणि शंसति ॥ १२।२२८।२**

मनुष्याचा अभ्युदय किंवा हानि हीं पुढें व्हावयाचीं असलीं म्हणजे त्यांचीं पूर्वचिन्हें त्याचें मनच सांगत असतें.

**६७५ मनसश्चेन्द्रियाणां चाप्यैकाग्र्यं परमं तपः ।**
**तज्ज्यायः सर्वधर्मेभ्यः स धर्मः पर उच्यते ॥ १२।२५०।४**

मन आणि इंद्रियें यांची एकाग्रता साध्य करणें हें फार मोठें तप आहे. ही एकाग्रता सर्व प्रकारच्या कर्माचरणापेक्षां श्रेष्ठ आहे. ती साध्य करणें हा श्रेष्ठ धर्म होय.

**६७६ मनसो दुःखमूलं तु स्नेह इत्युपलभ्यते ॥ ३।२।२७**

मनाला दुःख होण्याचें मूळ कारण आसक्ति हेंच असल्याचें आढळून येतें.

**६७७ मनुष्या ह्याढ्यतां प्राप्य राज्यमिच्छन्त्यनन्तरम् ।**
**राज्याद्देवत्वमिच्छन्ति देवत्वादिन्द्रतामपि ॥ १२।१८०।२४**

खरोखर मनुष्यांना ऐश्वर्य प्राप्त झालें, म्हणजे त्यानंतर राज्य मिळविण्याची इच्छा होते. राज्य मिळालें कीं देवपद आणि देवत्वप्राप्तीनंतर इंद्रपदसुद्धां हवेंसें वाटूं लागतें.

**६७८ मन्यते कर्षयित्वा तु क्षमा साध्वीति शम्बरः ।**
**असंतप्तं तु यद्दारु प्रत्येति प्रकृतिं पुनः ॥ १२।१०२।३१**

शत्रूला जर्जर करून सोडल्यावर मग क्षमा केलेली चांगली, असें शंबराचें मत आहे. कारण तापविल्यावांचून वांकविलेलें लाकूड पुनरपि पूर्वस्थितीस येतें.

**६७९ महत्त्वाद्भारवत्वाच्च महाभारतमुच्यते ॥ १८।५।४५**

या भारत ग्रंथाचें महत्त्व ( विस्तार ) आणि भार ( वजन ) फार असल्यामुळें यास महाभारत अशी संज्ञा प्राप्त झाली आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६८० महानप्येकजो वृक्षो बलवान्सुप्रतिष्ठितः ।**
**प्रसह्य एव वातेन सस्कन्धो मर्दितुं क्षणात् ॥ ५।३६।६२**
**अथ ये सहिता वृक्षाः सङ्घशः सुप्रतिष्ठिताः ।**
**ते हि शीघ्रतमान्वातान्सहन्तेऽन्योन्यसंश्रयात् । ५।३६।६३**

एकटा एक वृक्ष मोठा, बळकट असला, व भुईंत खोल गेलेला असला तरी ( सोसाट्याच्या ) वाऱ्यानें एका क्षणांत खोडासहवर्तमान त्याचा चुराडा होणें शक्य आहे. परंतु, जे एकत्र वाढलेले वृक्ष एका जमावानें बळकट पायावर उभे असतात, ते एकमेकांच्या आधारामुळें अति प्रचंड वायूंनाहि दाद देत नाहींत.

**६८१ महान्भवत्यनिर्विण्णः सुखं चानन्त्यमश्नुते ॥ ५।३९।५९**

सतत उद्योग करणाराच पुरुष योग्यतेला चढत असून अक्षय्य सुखहि त्यालाच प्राप्त होतें.

**६८२ माता पिता बान्धवानां वरिष्ठौ**
**भार्या जरा बीजमात्रं तु पुत्रः ।**
**भ्राता शत्रुः क्लिन्नपाणिर्वयस्य**
**आत्मा ह्येकः सुखदुःखस्य भोक्ता ॥ १२।१३९।३०**

आईबाप हे सर्व आप्तवर्गांत वरिष्ठ होत. भार्या ही पुरुषाला वार्धक्य आणण्यास कारणीभूत होत असते. पुत्र हा केवळ आपलें बीज होय. भाऊ हा ( वांटणी घेत असल्यामुळें ) शत्रुच होय. जोंवर हात भिजत आहे तोंवरच मित्र. सारांश, सुख किंवा दुःख भोगणारा आत्मा हा आपला एकटा एक आहे.

**६८३ मातापितृसहस्राणि पुत्रदारशतानि च ।**
**संसारेष्वनुभूतानि यान्ति यास्यन्ति चापरे ॥ १८।५।६०**

निरनिराळ्या हजारों जन्मांत अनुभवलेलीं हजारों आईबापें व शेंकडों स्त्रिया आणि पुत्र हीं सर्व मरून जातात व यापुढें होणारीं इतरहि मरणारच.

**६८४ मातृलाभे सनाथत्वमनाथत्वं विपर्यये ॥ १२।२६६।२६**

आई असली तरच मनुष्य सनाथ असतो, ती नसली कीं अनाथ होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६८५ मानं हित्वा प्रियो भवति ॥ ३।३१३।७८**

अभिमान सोडल्यानें मनुष्य [ लोकांना ] प्रिय होतो.

**६८६ मायया निर्जिता देवैरसुरा इति नः श्रुतम् ॥ ९।५८।५**

( श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात. ) कपटाच्या योगानेंच देवांनीं असुरांना जिंकलें, असें आम्हीं ऐकलें आहे.

**६८७ मायावी मायया वध्यः सत्यमेतद्युधिष्ठिर ॥ ९।३१।७**

( श्रीकृष्ण म्हणतात. ) हे युधिष्ठिरा, कपटी मनुष्याचा कपटानेंच वध केला पाहिजे हें सत्य होय.

**६८८ मास्तं गमस्त्वं कृपणो विश्रूयस्व स्वकर्मणा ।**
**मा मध्ये मा जघन्ये त्वं माधोभूस्तिष्ठ गर्जितः॥५।१३३।१३**

[ विदुला संजयास म्हणते ] तूं दीन होऊन स्वतःचा नाश करून घेऊं नको. स्वपराक्रमानें प्रसिद्धीस ये. तूं मध्यम स्थितींत अथवा हीन स्थितींत राहूं नको. हीन न होतां [ कर्तृत्वानें ] गाजत रहा.

**६८९ मित्रं च शत्रुतामेति कस्मिंश्चित्कालपर्यये ।**
**शत्रुश्च मित्रतामेति स्वार्थो हि बलवत्तरः॥१२।१३८।१४२**

एकादे वेळेस मित्र वैर करूं लागतो आणि शत्रु मित्र बनतो. कारण, स्वार्थ हा फार प्रबळ आहे.

**६९० मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरम् ॥५।१३३।१५**

थोडा वेळ कां होईना पण चमकून जाणें चांगलें; परंतु चिरकाल धुमसत राहणें बरें नव्हे.

**६९१ मूर्खो हि जल्पतां पुंसां श्रुत्वा वाचः शुभाशुभाः ।**
**अशुभं वाक्यमादत्ते पुरीषमिव सूकरः ॥ १।७४।९०**

बोलणाऱ्या लोकांचें बरें वाईट बोलणें ऐकून, त्यांतून वाईट बोलणें तेवढें, विष्ठा ग्रहण करणाऱ्या डुकराप्रमाणें, मूर्ख मनुष्य घेत असतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६९२ मूलमेवादितश्छिन्द्यात्परपक्षस्य नित्यशः ।**
**ततः सहायांस्तत्पक्षान्सर्वांश्च तदनन्तरम् ॥ १।१४०।१६**

नेहमीं आपल्या शत्रुपक्षाचें मूळच पहिल्यानें तोडून टाकावें. नंतर त्याचे साथीदार व त्यानंतर त्याच्या पक्षांतील इतर सर्व लोक यांचा उच्छेद करावा.

**६९३ मृतं वा यदि वा नष्टं योऽतीतमनुशोचति ।**
**दुःखेन लभते दुःखं द्वावनर्थौ प्रपद्यते ॥ ११।२६।४**

मेल्यामुळें किंवा हरवल्यामुळें जें नाहींसें झालें, त्याविषयीं जो शोक करीत बसतो, त्याला त्या दुःख करण्यापासून पुनः दुःख प्राप्त होतें, व अशा रीतीनें तो दोन अनर्थांत सांपडतो.

**६९४ मृतं शरीरमुत्सृज्य काष्ठलोष्टसमं जनाः ।**
**मुहूर्तमिव रोदित्वा ततो यान्ति पराङ्मुखाः॥१३।१११।१४**

मेलेलें शरीर लाकडाप्रमाणें अथवा मातीच्या ढेंकळाप्रमाणें फेंकून देऊन व क्षणभर रडून नंतर लोक पाठमोरे होऊन निघून जातात.

**६९५ मृतकल्पा हि रोगिणः ॥ ५।३६।६७**

रोगी मनुष्यें मेल्यांतच जमा.

**६९६ मृतो दरिद्रः पुरुषः ॥ ३।३१३।८४**

दरिद्री पुरुष जिवंतपणींच मेलेला असतो.

**६९७ मृदुं वै मन्यते पापो भाषमाणमशक्तिकम् ।**
**जितमर्थं विजानीयादबुधो मार्दवे सति ॥ ५।४।६**

कोणी सौम्यपणें बोलूं लागला तर दुष्ट लोक त्याला दुर्बळ समजतात. सौम्यपणा असला म्हणजे मूर्खांला वाटावयाचें कीं आपला पक्ष सिद्ध झाला.

**६९८ मृदुना दारुणं हन्ति मृदुना हन्त्यदारुणम् ।**
**नासाध्यं मृदुना किंचित्तस्मात्तीव्रतरं मृदु ॥ ३।२८।३१**

मृदुपणानें भयंकर शत्रूचा नाश करितां येतो आणि मृदुपणानें भयंकर नसलेल्या शत्रूचाहि नाश करितां येतो. मृदुपणानें असाध्य असें कांहींच नाहीं. यास्तव मृदपणा हा वस्तुतः तीक्ष्णापेक्षांहि तीक्ष्ण आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६९९ मृदुरित्यवजानन्ति तीक्ष्ण इत्युद्विजन्ति च ।**
**तीक्ष्णकाले भवेत्तीक्ष्णो मृदुकाले मृदुर्भवेत् ॥१२।१४०।६५**

राजा मऊपणानें वागणारा असला तर लोक त्याची अवज्ञा करितात. आणि कठोरपणानें वागणारा असला तर लोक त्याला भितात. यासाठीं कठोरपणें वागण्याची वेळ येईल तेव्हां कठोर व्हावें, आणि मऊपणानें वागण्याची वेळ असेल तेव्हां मृदु व्हावें.

**७०० मौनान्न स मुनिर्भवति नारण्यवसनान्मुनिः ।**
**स्वलक्षणं तु यो वेद स मुनिः श्रेष्ठ उच्यते ॥५।४३।६०**

मौनव्रत पाळलें म्हणजे कोणी मुनि होत नाहीं. किंवा अरण्यांत राहिल्यानेंहि मुनि होत नाहीं. ज्यानें आत्मस्वरूप जाणलें तोच मुनिश्रेष्ठ होय.

**७०१ म्रियते याचमानो वै न जातु म्रियते ददत् ।**
**ददत्संजीवयत्येनमात्मानं च युधिष्ठिर ॥१३।६०।५**

( भीष्म म्हणतात ) हे युधिष्ठिरा, याचना करणारा मरण पावतो. देणारा कधींच मरत नाहीं. देणारा याचकाला व स्वतःलाहि जीवदान देतो.

**७०२ य एव देवा हन्तारस्ताँल्लोकोऽर्चयते भृशम् ॥१२।१५।१६**

शत्रूंना ठार मारणारे जे देव आहेत, त्यांनाच लोक अतिशय भजतात.

**७०३ यः कश्चिदप्यसंबद्धो मित्रभावेन वर्तते ।**
**स एव बन्धुस्तन्मित्रं सा गतिस्तत्परायणम् ॥५।३६।३८**

कसल्याहि प्रकारचा संबंध नसतांहि जो कोणी आपल्याशीं मित्रभावानें वागतो, तोच आपला बंधु, तोच मित्र, तोच आसरा, आणि तोच मोठा आधार.

**७०४ यः कृशार्थः कृशगवः कृशभृत्यः कृशातिथिः ।**
**स वै राजन्कृशो नाम न शरीरकृशः कृशः ॥१२।८।२४**

( अर्जुन युधिष्ठिराला म्हणतो ) हे राजा, ज्याच्यापाशीं द्रव्य नाहीं, गुरेंढोरें नाहींत, नोकरचाकर नाहींत, अतिथींचा सत्कार करण्याचें सामर्थ्य नाहीं तोच खरोखर कृश म्हटला पाहिजे, जो केवळ शरीरानें कृश तो खरोखर कृश नव्हे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७०५ यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम् ।**
**तृष्णाक्षयसुखस्यैते नार्हतः षोडशीं कलाम् ॥१२।१७४।४६**

इहलोकीं विषयोपभोगापासून प्राप्त होणारें सुख आणि स्वर्गांतील उच्च सुख हीं दोनहि सुखें वासनाक्षयामुळें प्राप्त होणाऱ्या सुखाच्या पासंगास देखील लागणार नाहींत.

**७०६ यच्छक्यं ग्रसितुं ग्रस्यं ग्रस्तं परिणमेच्च यत् ।**
**हितं च परिणामे यत्तदाद्यं भूतिमिच्छता ॥५।३४।१४**

जें खातां येण्यासारखें असेल, खाल्ल्यावर जें पचेल, व परिणामीं जें हितकर होईल तेंच अन्न कल्याणेच्छु पुरुषानें खाल्लें पाहिजे.

**७०७ यतो धर्मस्ततो जयः ॥ १३।१६७।४१**

जिकडे धर्म तिकडे जय.

**७०८ यत्करोति शुभं कर्म तथा कर्म सुदारुणम् ।**
**तत्कर्तैव समश्नाति बान्धवानां किमत्र ह ॥१२।१५३।४१**

कोणीहि जें चांगलें कर्म करतो अथवा वाईट कर्म करतो, त्याचें फळ त्याचें त्यालाच भोगावें लागतें. यांत त्याच्या नातलगांचा काय संबंध ?

**७०९ यत्तु कार्यं भवेत्कार्यं कर्मणा तत्समाचर ।**
**हीनचेष्टस्य यः शोकः स हि शत्रुर्धनंजय ॥७।८०।८**

( श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात ) उद्दिष्ट साधण्यासाठीं जें करावयाचें तें करण्याच्या उद्योगाला लाग. अर्जुना, जो प्रतिकाराचा कांहीं उद्योग करीत नाहीं, त्याचा शोक हा शत्रुच होय.

**७१० यत्नो हि सततं कार्यस्ततो दैवेन सिध्यति ॥१२।१५३।५०**

सतत प्रयत्न करीत असावें; म्हणजे दैववशात् यश मिळेल.

**७११ यत्र दानपतिं शूरं क्षुधिताः पृथिवीचराः ।**
**प्राप्य तुष्टाः प्रतिष्ठन्ते धर्मःकोऽभ्यधिकस्ततः॥५।१३२।२८**

पृथ्वीवर हिंडणारे क्षुधित लोक ज्या शूर दानपतीपाशीं आले असतां संतुष्ट होऊन पुढें जातात, त्याच्या धर्मापेक्षां कोणता धर्म अधिक आहे ?



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७१२ यत्र धर्मो ह्यधर्मेण सत्यं यत्रानृतेन च ।**
**हन्यते प्रेक्षमाणानां हतास्तत्र सभासदः ॥ ५।९५।४९**

ज्या सभेंत सभासदांच्या डोळ्यांदेखत धर्माचा अधर्मानें व सत्याचा असत्यानें खून केला जातो, त्या सभेंतील सभासदांना धिक्कार असो !

**७१३ यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥६।४२।७८**

[ संजय धृतराष्ट्राला म्हणतो ] जिकडे योगेश्वर कृष्ण, जिकडे धनुर्धारी अर्जुन, तिकडेच लक्ष्मी, विजय, अखंड वैभव आणि नीति हीं राहणार असें माझें मत आहे.

**७१४ यत्र सूक्तं दुरुक्तं च समं स्यान्मधुसूदन ।**
**न तत्र प्रलपेत्प्राज्ञो बधिरेष्विव गायनः ॥५।९२।१३**

( विदुर श्रीकृष्णांना म्हणतो ) ज्याप्रमाणें जेथें चांगलें बोलण्याचा किंवा वाईट बोलण्याचा उपयोग सारखाच होतो तेथें, बहिऱ्या लोकांमध्यें बसून गायन करणें गवयास योग्य नाहीं त्याप्रमाणें, शहाण्या पुरुषानें कांहींएक न बोलणें चांगलें.

**७१५ यत्र स्त्री यत्र कितवो बालो यत्रानुशासिता ।**
**मज्जन्ति तेऽवशा राजन्नद्यामश्मप्लवा इव ॥ ५।३८।४३**

( विदुर धृतराष्ट्र राजाला म्हणतो ) ज्यांच्यावर स्त्री किंवा लुच्चा मनुष्य किंवा अल्पवयी मुलगा अधिकार चालवीत असेल, ते लोक पराधीन होत्साते, नदींत बुडणाऱ्या पाषाणमय होड्यांप्रमाणें नाश पावतात.

**७१६ यत्सुखं सेवमानोऽपि धर्मार्थाभ्यां न हीयते ।**
**कामं तदुपसेवेत न मूढव्रतमाचरेत् ॥ ५।३९।६१**

ज्या सुखाचें सेवन केलें तरी धर्म व अर्थ या दोन पुरुषार्थांना कांहीं बाध येत नाहीं, तेंच यथेष्ट सेवन करावें. मूर्खासारखें [ अविचाराचें ] वर्तन करूं नये.

**७१७ यथा कर्म तथा लाभ इति शास्त्रनिदर्शनम् ॥१२।२७९।२०**

जसें कर्म तसें फळ असा शास्त्राचा सिद्धांत आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७१८ यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ ।**
**समेत्य च व्यपेयातां तद्वद्भूतसमागमः ॥ १२।२८।३६**

ज्याप्रमाणें महासागरांत लाकडाचे दोन ओंडके वहात वहात एका ठिकाणीं येतात, व [ थोड्या वेळानें ] फिरून एकमेकांपासून दूर जातात, त्यासारखा सर्व प्राण्यांचा एकमेकांशीं असणारा सहवास आहे.

**७१९ यथा छायातपौ नित्यं सुसंबद्धौ निरन्तरम् ।**
**तथा कर्म च कर्ता च संबद्धावात्मकर्मभिः ॥ १३।१।७५**

प्रकाश व छाया यांचा जसा निरंतर नित्यसंबंध असतो, तसाच कर्म व कर्ता यांचा त्या त्या स्थितींत नित्य संबंध असतो.

**७२० यथा जीर्णमजीर्णं वा वस्त्रं त्यक्त्वा तु पूरुषः ।**
**अन्यद्रोचयते वस्त्रमेवं देहाः शरीरिणाम् ॥ ११।३।९**

जुनें झालेलें किंवा कधींकधीं नवेंही एक वस्त्र टाकून मनुष्य दुसरें घेतो, त्याप्रमाणेंच प्राण्यांच्या देहांचीही गोष्ट आहे.

**७२१ यथा दानं तथा भोग इति धर्मेषु निश्चयः ॥ १३।६२।८**

जसें दिलें असेल तसेंच भोगावयास मिळतें, असा धर्मशास्त्राचा सिद्धांत आहे.

**७२२ यथा धेनुसहस्रेषु वत्सो विन्दति मातरम् ।**
**तथा पूर्वकृतं कर्म कर्तारमनुगच्छति ॥ १२।३२२।१६**

हजारों गाईंतून वांसरूं जसें नेमकें आपल्या आईला हुडकून काढतें, तसें पूर्वजन्मीं केलेलें कर्म कर्त्याच्या पाठोपाठ येतें.

**७२३ यथा नदीनदाः सर्वे सागरे यान्ति संस्थितिम् ।**
**एवमाश्रमिणः सर्वे गृहस्थे यान्ति संस्थितिम् ॥ १२।२९५।३९**

ज्याप्रमाणें सर्व नद्या आणि नद अखेर समुद्राला जाऊन मिळतात, त्याप्रमाणें इतर सर्व आश्रमांतील लोकांना गृहस्थाश्रमी पुरुषाचा आधार आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७२४ यथा बर्हाणि चित्राणि बिभर्ति भुजगाशनः ।
तथा बहुविधं राजा रूपं कुर्वीत धर्मवित् ॥ १२।१२०।४

मोर जशीं चित्रविचित्र पिसें धारण करतो, त्याप्रमाणें आपलें कर्तव्य ओळखणाऱ्या राजानें [ प्रसंगानुसार ] निरनिराळीं रूपें धारण करावीं.

७२५ यथा बीजं विना क्षेत्रमुप्तं भवति निष्फलम् ।
तथा पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति ॥ १३।६।७

शेत तयार न करितां त्यांत बीं टाकिल्यानें जसें तें वायां जातें, त्याप्रमाणें उद्योग केल्यावांचून नुसत्या दैवानें सिद्धि मिळत नाहीं.

७२६ यथामति यथापाठं तथा विद्या फलिष्यति ॥ १२।३२७।४८

जशी बुद्धि असेल आणि जसा अभ्यास असेल त्या मानानें विद्येचें फल मिळणार.

७२७ यथा मधु समादत्ते रक्षन्पुष्पाणि षट्पदः ।
तद्वदर्थान्मनुष्येभ्य आदद्यादविहिंसया ॥ ५।३४।१७

भुंगा जसा फुलांना अपाय न करतां त्यांतील मध तेवढा काढून घेतो, त्याप्रमाणें राजानें लोकांचें मन न दुखवितां त्यांजपासून द्रव्य घ्यावें.

७२८ यथा मातरमाश्रित्य सर्वे जीवन्ति जन्तवः ।
एवं गार्हस्थ्यमाश्रित्य वर्तन्त इतराश्रमाः ॥ १२।२६९।६

जसे सर्व प्राणी मातेचा आश्रय करून जिवंत राहतात, तसे गृहस्थाश्रमाच्या आधारानें इतर आश्रम राहतात.

७२९ यथा यथा हि पुरुषो नित्यं शास्त्रमवेक्षते ।
तथा तथा विजानाति विज्ञानमथ रोचते ॥ १२।१३०।१०

मनुष्य जसजसा नेहमीं शास्त्राचें अवलोकन करीत जाईल, तसतसें त्याला समजूं लागेल, आणि नंतर त्याला ज्ञानाची आवड उत्पन्न होईल.

७३० यथा यथैव जीवेद्धि तत्कर्तव्यमहेलया ।
जीवितं मरणाच्छ्रेयो जीवन्धर्ममवाप्नुयात् ॥ १२।१४१।६५

ज्या ज्या प्रकारें जीविताचें संरक्षण होईल तें बेलाशक करावें. मरण्यापेक्षां जगणें हेंच श्रेयस्कर आहे. कारण आधीं जगेल तर पुढें धर्म आचरण करील.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७३१ यथा राजन्हस्तिपदे पदानि**
**संलीयन्ते सर्वसत्त्वोद्भवानि ।**
**एवं धर्मान् राजधर्मेषु सर्वान्**
**सर्वावस्थं संप्रलीनान्निबोध ॥ १२।६३।२५**

( भीष्म युधिष्ठिराला म्हणतात ) हे राजा, ज्याप्रमाणें एकट्या हत्तीच्या पावलांत इतर सर्व प्राण्यांच्या पावलांचा समावेश होतो, त्याप्रमाणें एका राजधर्मांत इतर सर्व धर्मांचा सर्व प्रकारें अंतर्भाव होतो हें तूं पक्कें समज.

**७३२ यथाऽवध्ये वध्यमाने भवेद्दोषो जनार्दन ।**
**स वध्यस्यावधे दृष्ट इति धर्मविदो विदुः ॥ ५।८२।१८**

( द्रौपदी श्रीकृष्णांना म्हणते ) वधास पात्र नसलेल्याचा वध होऊं लागला असतां जो दोष लागतो, तोच वधास पात्र असलेल्याचा वध होत नसल्यास दोष लागतो, असें धर्मवेत्त्यांचें मत आहे.

**७३३ यथा वायुस्तृणाग्राणि संवर्तयति सर्वशः ।**
**तथा कालवशं यान्ति भूतानि भरतर्षभ ॥ ११।२।९**

( विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ) जसा वारा गवताचे सर्व शेंडे हलवून सोडतो त्याप्रमाणें सर्व प्राणी काळाच्या तडाक्यांत सांपडतात.

**७३४ यथाशक्ति मनुष्याणां शममालक्षयामहे ।**
**अन्येषामपि सत्त्वानामपि कीटपिपीलिकैः ॥४।५०।१४**

( अश्वत्थामा कर्णाला म्हणतो ) आम्हांला वाटतें कीं, मनुष्यांच्या सहनशीलतेला झाली तरी कांहीं मर्यादा असतेच. फार काय पण किडामुंगी वगैरे इतर प्राणीहि कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंतच दुःखें सहन करितात.

**७३५ यथा शरीरं न ग्लायेन्नेयान्मृत्युवशं यथा ।**
**तथा कर्मसु वर्तेत समर्थो धर्ममाचरेत् ॥ १२।२६५।१४**

ज्याप्रकारें शरीराला थकवा येणार नाहीं आणि तें मृत्युवश होणार नाहीं, अशा प्रकारचें कर्मांचें आचरण करावें. समर्थ राहून धर्माचरण करावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७३६ यथा समुद्रो भगवान् यथा हि हिमवान् गिरिः ।**
**ख्यातावुभौ रत्ननिधी तथा भारतमुच्यते ॥ १८।५।६५**

जसा भगवान् समुद्र आणि जसा पर्वतराज हिमालय रत्ननिधि म्हणून प्रसिद्ध आहेत तसेंच महाभारत हेंहि आहे.

**७३७ यथा हि पुरुषः शालां पुनः संप्रविशेन्नवाम् ।**
**एवं जीवः शरीराणि तानि तानि प्रपद्यते ॥१२।१५।५७**

मनुष्यानें [ एक घर सोडून ] पुनः दुसऱ्या नव्या घरांत प्रवेश करावा, तसा जीव हा निरनिराळ्या देहांत प्रविष्ट होत असतो.

**७३८ यथा ह्यकस्माद्भवति भूमौ पांसुर्विलोलितः ।**
**तथैवेह भवेद्धर्मः सूक्ष्मः सूक्ष्मतरस्तथा ॥ १२।१३६।११**

भुईवरील धुळीचा कण एकाएकीं हलविला असतां जसा [ सूक्ष्म असल्यामुळें दिसेनासा ] होतो, तसाच धर्म हा सूक्ष्म, अत्यंत सूक्ष्म आहे.

**७३९ यथा ह्यामिषमाकाशे पक्षिभिः श्वापदैर्भुवि ।**
**भक्ष्यते सलिले मत्स्यैस्तथा सर्वत्र वित्तवान् ॥ ३।२।४०**

ज्याप्रमाणें आकाशामध्यें पक्षी, भूतलावर श्वापदें, आणि पाण्यामध्यें मासे आमिषावर झडप घालीत असतात, त्याप्रमाणें द्रव्यवान् पुरुषाला लुटण्याकरितां सर्व ठिकाणीं लोक टपून बसलेले असतात.

**७४० यदतप्तं प्रणमते नैतत्संतापमर्हति ।**
**यत्स्वयं नमते दारु न तत्संनामयन्त्यपि ॥ १२।६७।१०**

तापविल्याशिवायच जें लवतें तें तापविण्याची गरज नाहीं. जें लाकूड आपोआपच वांकतें तें तापविण्याच्या भरीस कोणी पडत नाहीं.

**७४१ यदन्येषां हितं न स्यादात्मनः कर्म पौरुषम् ।**
**अपत्रपेत वा येन न तत्कुर्यात्कथंचन ॥ १२।१२४।६७**

आपला जो प्रयत्न किंवा जी कृति दुसऱ्याच्या हिताची होणार नाहीं, अथवा जें केल्यानें आपली आपल्यालाच लाज वाटेल तें केव्हांहि करूं नये.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७४२ यदन्यैर्विहितं नेच्छेदात्मनः कर्म पूरुषः ।**
**न तत्परेषु कुर्वीत जानन्नप्रियमात्मनः ॥ १२।२५९।२०**

जें दुसऱ्यांनीं आपल्यासंबंधानें करूं नये असें मनुष्याला वाटतें, तें आपल्याला अप्रिय आहे, हें लक्षांत वागवून, त्यानेंहि दुसऱ्यासंबंधानें तसें करूं नये

**७४३ यदर्थो हि नरो राजंस्तदर्थोऽस्यातिथिः स्मृतः ॥१५।२६।३७**

( धृतराष्ट्र युधिष्ठिराला म्हणतो ) राजा, अतिथि कितीहि योग्यतेचा असला तरी, तो ज्याचा अतिथि असेल त्याच्या योग्यतेप्रमाणें त्यानें झालें पाहिजे असा नियमच आहे.

**७४४ यदा तु कश्चिज्ज्ञातीनां बाह्यः प्रार्थयते कुलम् ।**
**न मर्षयन्ति तत्सन्तो बाह्येनाभिप्रधर्षणम् ॥ ३।२४३।३**

जेव्हां कोणी परका मनुष्य भाऊबंदांच्या कुळावर उठतो, तेव्हां परक्याकडून आपल्या कुळाचा होत असलेला तो अपमान सज्जन सहन करीत नाहींत.

**७४५ यदा मानं लभते माननार्ह-**
**स्तदा स वै जीवति जीवलोके ।**
**यदावमानं लभते महान्तं**
**तदा जीवन्मृत इत्युच्यते सः ॥ ८।६९।८१**

सन्मान्य पुरुष जोंपर्यंत मान मिळवितो, तोंपर्यंतच या जगांत तो जिवंत असतो. एकदा त्याचा अतिशय अपमान झाला कीं, तो जिवंत असूनहि मेल्याप्रमाणेंच झाला !

**७४६ यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ६।२८।७**

[ भगवान् श्रीकृष्ण सांगतात. ] अर्जुना, ज्या ज्या वेळीं धर्माला ग्लानि येते व अधर्माचा उत्कर्ष होतो त्या त्या वेळीं मी ( भगवान् श्रीकृष्ण ) अवतार घेत असतों.

**७४७ यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।**
**इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६।२६।५८**

कासव जसें आपले सर्व अवयव आंत ओढून घेतें त्याप्रमाणें जेव्हां मनुष्य आपलीं सर्व इंद्रियें त्यांच्या त्यांच्या विषयांपासून आंवरून धरतो, तेव्हांच त्याची बुद्धि स्थिर झाली असें म्हणतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७४८ यदिदं ब्रह्मणो रूपं ब्रह्मचर्यमिति स्मृतम् ।**
**परं तत्सर्वधर्मेभ्यस्तेन यान्ति परां गतिम् ॥ १२।२१४।७**

[ परब्रह्माच्या प्राप्तीचें साधन असल्यामुळें ] ब्रह्मचर्य हें परब्रह्माचें केवळ स्वरूपच आहे असें सांगितलें आहे. तें सर्व प्रकारच्या धर्मनियमांपेक्षां श्रेष्ठ आहे. त्याच्या योगानेंच अत्यंत श्रेष्ठ गति प्राप्त होते. ( मोक्ष मिळतो. )

**७४९ यदि नात्मनि पुत्रेषु न चेत्पौत्रेषु नप्तृषु ।**
**न हि पापं कृतं कर्म सद्यः फलति गौरिव ॥ १२।९१।२१**

आपल्या पापकर्माचें प्रायश्चित्त आपल्याला भोगावें लागलें नाहीं तर आपल्या मुलांना, त्यांना नाहीं तर नातवांना ( तरी भोगावें लागेल ) कारण, गाईला खाणें घातलें असतां ती लगेच जास्त दूध देते, त्याप्रमाणें पापकर्माचें फळ तावडतोब मिळतें असें नाहीं. ( ' गो ' म्हणजे भूमि असा अर्थ घेऊन या श्लोकाच्या दुसऱ्या ओळीचा पुढील प्रमाणें दुसराहि अर्थ टीकाकारांनीं केलेला आहेः–' भूमींत धान्य पेरिलें कीं तें लागलेंच जसें पिकत नाहीं, तसेंच केलेल्या पापकर्माचें फळ तत्काळ मिळूं शकत नाहीं. )

**७५० यदि नैवंविधं जातु कुर्यां जिह्ममहं रणे ।**
**कुतो वा विजयो भूयः कुतो राज्यं कुतो धनम् ॥ ९।६१।६४**

[ श्रीकृष्ण पांडवांस म्हणतात ] युद्धांत [ भीष्मद्रोणादिकांना मारण्याच्या कामीं ] अशा प्रकारचें कपट जर मीं केलें नाहीं, तर तुम्हांला जय कसा मिळेल ? फिरून राज्य कसें मिळणार ? धन कोठून मिळणार ?

**७५१ यदिष्टं तत्सुखं प्राहुर्द्वेष्यं दुःखमिहेष्यते ॥ १२।२९५।२७**

इहलोकीं जें इष्ट वाटतें तें सुख, आणि जें द्वेष्य वाटतें तें दुःख असें मानिलें जातें.

**७५२ यदि संन्यासतः सिद्धिं राजा कश्चिदवाप्नुयात् ।**
**पर्वताश्च द्रुमाश्चैव क्षिप्रं सिद्धिमवाप्नुयुः ॥ १२।१०।२४**

संन्यासानें जर एकाद्या राजाला सिद्धि प्राप्त होती तर [ निष्क्रिय अशा ] पर्वतांना व वृक्षांनासुद्धां सिद्धि तत्काळ मिळाली असती !

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७५३ यदि स्यात्पुरुषः कर्ता शक्रात्मश्रेयसे ध्रुवम् ।**
**आरम्भास्तस्य सिध्येयुर्न तु जातु पराभवेत् १२।२२२।१८**

[ स्थानभ्रष्ट व पाशबद्ध झालेला प्रल्हाद इंद्राला म्हणतो ] इंद्रा, आत्मकल्याण साधून घेणें ही गोष्ट जर निश्चयेंकरून पुरुषाच्याच हातची असती, तर त्याचे सर्व उद्योग सिद्धीस गेले असते; त्याला केव्हांहि अपयश आलें नसतें.

**७५४ यदैव शत्रुर्जानीयात्सपत्नं त्यक्तजीवितम् ।**
**तदैवास्मादुद्विजते सर्पाद्वेश्मगतादिव ॥ ५।१३५।३६**

आपला प्रतिपक्षी जिवावर उदार झाला आहे असें जेव्हां शत्रूला समजून येतें, तेव्हांच त्याला घरांत शिरलेल्या सर्पासारखी त्याची भीति वाटूं लागते.

**७५५ यद्दुरापं दुराम्नायं दुराधर्षं दुरन्वयम् ।**
**तत्सर्वं तपसा साध्यं तपो हि दुरतिक्रमम् ॥ १४।५१।१७**

जें जें म्हणून असाध्य, अज्ञेय, अत्यंत भयंकर किंवा अत्यंत दुस्तर असें असेल तें सर्व तपानें साध्य होतें, खरोखरच, तपाचें अतिक्रमण करणें अशक्य आहे.

**७५६ यद्भूतहितमत्यन्तं तत्सत्यमितिधारणा ॥ ३।२०९।४**

ज्याच्या योगानें जीवाचें अतिशय कल्याण होतें तेंच सत्य असा सिद्धांत आहे.

**७५७ यद्यत्प्रियं यस्य सुखं तदाहु-**
**स्तदेव दुःखं प्रवदन्त्यनिष्टम् ॥ १२।२०१।१०**

ज्याला जें प्रिय वाटतें त्याला तो सुख म्हणतो, तेंच अप्रिय झालें कीं त्यालाच दुःख म्हणतो.

**७५८ यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ ६।२७।२१**

श्रेष्ठ पुरुष ज्या ज्या प्रकारें वागतो त्या त्या प्रकारेंच इतर लोक वागतात. त्याला जें मान्य होतें, त्याचेंच अनुकरण लोक करीत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७५९ यद्यदाचरते राजा तत्प्रजानां स्म रोचते ॥ १२।७५।४**

राजा जें जें करतो तें प्रजेला आवडूं लागतें.

**७६० यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।**
**तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥ ६।३४।४१**

( भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात ) जी जी वस्तु मोठेपणा, ऐश्वर्य किंवा वैभव यांनीं युक्त असेल, ती ती प्रत्येक माझ्या ( परमेश्वराच्या ) तेजाच्या अंशापासून उत्पन्न झालेली आहे असें तूं पक्कें समज.

**७६१ यद्यपि भ्रातरः क्रुद्धा भार्या वा कारणान्तरे ।**
**स्वभावतस्ते प्रीयन्ते नेतरः प्रीयते जनः ॥ १२।१३८।१५४**

कारणपरत्वें भाऊ जरी रागावले किंवा बायको रागावली तरी तीं स्वभावतःच प्रेम करीत असतात. तसें इतर लोक प्रेम करीत नाहींत.

**७६२ यन्निमित्तं भवेच्छोकस्तापो वा दुःखमेव च ।**
**आयासो वा यतो मूलमेकाङ्गमपि तत्त्यजेत् ॥ १२।१७४।४३**

ज्याच्यामुळें शोक, ताप, दुःख किंवा कष्ट होतात, तें कारण जरी आपल्या शरीराचा एक अवयव असलें तरीहि त्याचा त्याग केला पाहिजे.

**७६३ यमाजीवन्ति पुरुषं सर्वभूतानि संजय ।**
**पक्वं द्रुममिवासाद्य तस्य जीवितमर्थवत् ॥ ५।१३३।४३**

( विदुला म्हणते ) संजया, पक्व वृक्षाप्रमाणें ज्याच्याजवळ गेल्यानें सर्व जीवांचें प्राणरक्षण होतें त्याचेंच जीवित सफल झालें.

**७६४ ययोरेव समं वित्तं ययोरेव समं श्रुतम् ।**
**तयोर्विवाहः सख्यं च न तु पुष्टविपुष्टयोः ॥१।१३१।१०**

ज्यांची श्रीमंती सारखी, ज्यांचें ज्ञान सारखें, त्यांच्याच विवाहसंबंध म्हणा किंवा स्नेहसंबंध म्हणा, होत असतो. एक श्रीमंत आणि दुसरा गरीब अशांचा अशा प्रकारचा संबंध कधींहि होत नसतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७६५ यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ ६।४०।२३**

शास्त्रांत सांगितलेला विधि सोडून जो स्वेच्छाचारानें वागतो, त्याला सिद्धि प्राप्त होत नाहीं, आणि श्रेष्ठ गतिहि नाहीं.

**७६६ यस्तु निःश्रेयसं श्रुत्वा प्राक्तदेवाभिपद्यते ।**
**आत्मनो मतमुत्सृज्य स लोके सुखमेधते ॥ ५।१२४।२४**

आपलें खरें कल्याण कशांत आहे हें ऐकल्यावर, स्वतःचें मत बाजूला सारून, जो प्रथमतः त्याचेंच आचरण करतो त्याला जगांत सुख होतें.

**७६७ यस्तु वृद्ध्या न तृप्येत क्षये दीनतरो भवेत् ।**
**एतदुत्तममित्रस्य निमित्तमिति चक्षते ॥ १२।८०।१६**

अभ्युदय कितीही झाला तरी तृप्ति न होणें, आणि हानि झाल्यास अत्यंत दीन होणें हें उत्तम प्रतीच्या मित्राचें लक्षण होय असें सांगितलेलें आहे.

**७६८ यस्माददान्तान्दमयत्यशिष्टान् दण्डयत्यपि ।**
**दमनाद्दण्डनाच्चैव तस्माद्दण्डं विदुर्बुधाः ॥ १२।१५।८**

ज्याअर्थी [ राजदंड हा ] स्वैराचरण करणाऱ्यांना वठणीस आणतो आणि असभ्यपणें वागणारांना शिक्षा करतो, त्याअर्थी दमन करणें आणि दंड करणें या दोन गुणांमुळें ज्ञाते लोक त्याला दंड असें म्हणतात.

**७६९ यस्मिन्क्षमा च क्रोधश्च दानादाने भयाभये ।**
**निग्रहानुग्रहौ चोभौ स वै धर्मविदुच्यते ॥ १२।१४।१७**

ज्याच्या ठायीं [ प्रसंगानुरूप ] क्षमा व क्रोध, दान व ग्रहण, भय व अभय, तसेंच निग्रह व अनुग्रह हीं दोनहि आढळतात तोच खरोखर धर्म जाणणारा होय.

**७७० यस्मिन्नर्थे हितं यत्स्यात्तद्वर्णं रूपमादिशेत् ।**
**बहुरूपस्य राज्ञो हि सूक्ष्मोऽप्यर्थो न सीदति ॥ १२।१२०।६**

ज्या बाबतींत जें योग्य दिसेल त्याप्रकारचें रूप [ राजानें ] धारण करावें. कारण [ प्रसंगाप्रमाणें ] निरानिराळीं रूपें धारण करणाऱ्या राजाची बारीकसारीक गोष्टींत सुद्धां फसगत होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७७१ यस्मिन्यथा वर्तते यो मनुष्य-
स्तस्मिंस्तथा वर्तितव्यं स धर्मः ।
मायाचारो मायया वर्तितव्यः
साध्वाचारः साधुना प्रत्युपेयः ॥ ५।३७।७

ज्याच्याशीं जो मनुष्य ज्या प्रकारें वागतो, त्याच्याशीं त्यानें त्याचप्रकारें वागावें. असें करण्यांतच धर्म आहे. कपट करणाराशीं कपटानें वागावें, आणि सरळपणानें चालणाराशीं सरळपणा ठेवावा.

७७२ यस्मै देवाः प्रयच्छन्ति पुरुषाय पराभवम् ।
बुद्धिं तस्यापकर्षन्ति सोऽवाचीनानि पश्यति ॥ ५।३४।८१

देवांच्या मनांतून ज्याचा नाश करावयाचा असतो, त्याची बुद्धि ते हिरावून घेतात, आणि मग त्याला प्रतिकूल असलेल्या गोष्टी घडून आलेल्या दिसतात.

७७३ यस्य कृत्यं न जानन्ति मन्त्रं वा मन्त्रितं परे ।
कृतमेवास्य जानन्ति स वै पण्डित उच्यते ॥ ५।३३।१८

पुढें करावयाचें ज्याचें कृत्य अथवा योजलेला बेत दुसऱ्यांना कळत नाहीं, काय तें प्रत्यक्ष कृतींत आल्यावरच समजतें त्याला पंडित म्हणतात.

७७४ यस्य दानजितं मित्रं शत्रवो युधि निर्जिताः ।
अन्नपानजिता दाराः सफलं तस्य जीवितम् ॥ ५।३९।८३

ज्यानें उदारपणानें मित्र आपलासा केला, युद्ध करून शत्रूंना जिंकलें आणि अन्नपानादिकांच्या योगानें स्त्रीला स्वाधीन ठेवलें त्याचें जीवित सफल झालें.

७७५ यस्य धर्मो हि धर्मार्थः क्लेशभाङ् न स पण्डितः ।
न स धर्मस्य वेदार्थं सूर्यस्यान्धः प्रभामिव ॥ ३।३३।२३

[ तत्त्व न जाणतां ] केवळ धर्मासाठीं जो धर्माचरण करतो तो शहाणा नसून दुःखाचा मात्र वांटेकरी होणारा असतो. अंधळ्याला ज्याप्रमाणें सूर्याची प्रभा समजत नाहीं, त्याप्रमाणें त्याला धर्माचा अर्थ समजत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७७६ यस्य नास्ति निजा प्रज्ञा केवलं तु बहुश्रुतः ।**
**न स जानाति शास्त्रार्थं दर्वी सूपरसानिव ॥ २।५५।१**

ज्याला स्वताची बुद्धि नाहीं पण ज्यानें केवळ पुष्कळसें ऐकलेलें आहे त्याला, आमटींतल्या पळीला आमटीची चव कळत नाहीं त्याप्रमाणें शास्त्राचें रहस्य कळत नाहीं.

**७७७ यस्य बुद्धिः परिभवेत्तमतीतेन सान्त्वयेत् ।**
**अनागतेन दुष्प्रज्ञं प्रत्युत्पन्नेन पण्डितम् ॥ १।१४०।७४**

ज्याची बुद्धि मंद असेल त्यास आपल्या पूर्वीच्या बढाईच्या गोष्टी सांगाव्या, जो मूर्ख असेल त्यास ' पुढें अमुक करीन ' वगैरे आशा लावावी, आणि जो शाहणा असेल त्यास धनादिक देऊन संतुष्ट करावें.

**७७८ यस्य भार्या गृहे नास्ति साध्वी च प्रियवादिनी ।**
**अरण्यं तेन गन्तव्यं यथारण्यं तथा गृहम् ॥१२।१४४।१७**

ज्याच्या घरांत सत्त्वशील व प्रिय भाषण करणारी स्त्री नाहीं, त्यानें अरण्यांत निघून जावें. कां कीं, जसें अरण्य तसेंच त्याचें घर.

**७७९ यस्य वृत्तं न जल्पन्ति मानवा महदद्भुतम् ।**
**राशिवर्धनमात्रं स नैव स्त्री न पुनः पुमान् ॥५।१३३।२३**

ज्याच्या हातून एकादी मोठी अद्भुत गोष्ट घडल्याचें लोक बोलत नाहींत तो मनुष्य कुचकामाचा, केवळ [ मनुष्यजातीची ] संख्या वाढविणारा होय. वस्तुतः त्याला स्त्रीहि म्हणतां येत नाहीं, मग पुरुष तर तो नव्हेच नव्हे.

**७८० यस्य स्वल्पं प्रियं लोके ध्रुवं तस्याल्पमप्रियम् ॥५।१३५।१७**

जगामध्यें अल्पस्वल्प सत्ता ज्याला प्रिय असते, त्याची ती सत्ता निःसंशय त्याच्या अनर्थालाच कारण होते.

**७८१ यस्यार्थास्तस्य मित्राणि यस्यार्थास्तस्य बान्धवाः ।**
**यस्यार्थाः स पुमाँल्लोके यस्यार्थाः स च पण्डितः॥१२।८।१९**

ज्याच्याजवळ द्रव्य असेल त्याच्यासाठीं मित्र असतात ज्याच्याजवळ द्रव्य आहे त्याच्याकरितां आप्तेष्ट आहेत. जगांत ज्याच्याजवळ द्रव्य असेल तोच खरा पुरुष आणि तोच पंडित.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७८२ यस्यैव बलमोजश्च स धर्मस्य प्रभुर्नरः ॥ १२।१५२।१८**

ज्याच्या आंगीं सामर्थ्य आणि तेज हीं असतात तोच मनुष्य धर्माचरणास समर्थ होतो.

**७८३ यः सदारः स विश्वास्यः ॥ १।७४।४४**

जो सपत्नीक असेल त्याच्यावर विश्वास ठेवावा.

**७८४ यः सपत्नश्रियं दीप्तां हीनश्रीः पर्युपासते ।**
**मरणं शोभनं तस्य इति विद्वज्जना विदुः ॥ १।७९।१३**

जो स्वतःचें ऐश्वर्य नष्ट झालें असतां प्रतिपक्ष्याच्या डोळे दिपणाऱ्या वैभवाची आराधना करतो, त्याला मृत्यु आलेला फार उत्तम असें ज्ञाते लोक म्हणतात.

**७८५ यः समुत्पतितं क्रोधं क्षमयेह निरस्यति ।**
**यथोरगस्त्वचं जीर्णां स वै पुरुष उच्यते ॥ १।७९।४**

सर्प जसा जीर्ण झालेली त्वचा टाकून देतो त्याप्रमाणें अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या क्रोधाचें क्षमेच्या योगानें जो निवारण करतो. तोच पुरुष म्हणावयाचा.

**७८६ यः सौहृदे पुरुषं स्थापयित्वा**
**पश्चादेनं दूषयते स बालः ॥ २।६४।१३**

जो पहिल्यानें आपणच एकाद्याला आपला स्नेही समजतो व मागून त्याला दूषण देतो तो पोरकट होय.

**७८७ या दुस्त्यजा दुर्मतिभिर्या न जीर्यति जीर्यतः ।**
**योऽसौप्राणान्तिकोरोगस्तांतृष्णांत्यजतःसुखम्॥१३।७।२१**

दुष्ट मनुष्यांना जिचा त्याग करितां येत नाहीं, शरीर जीर्ण होत असतां जी कमी होत नाहीं, जी केवळ प्राणांतींच संपणाऱ्या रोगासारखी आहे त्या तृष्णेचा [ लोभाचा ] त्याग करणारास सुख प्राप्त होतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**७८८ यादृशं वपते बीजं क्षेत्रमासाद्य कर्षकः ।**
**सुकृते दुष्कृते वापि तादृशं लभते फलम् ॥१३।६।६**

शेतकरी शेतांत ज्या प्रकारचें बीज टाकतो त्या प्रकारचें त्यास फळ मिळतें. जर त्यानें चांगलें बीं पेरलें तर त्यास चांगलें फळ येतें; आणि वाईट पेरिलें तर वाईट फळ येतें.

**७८९ यादृशः पुरुषस्यात्मा तादृशं संप्रभाषते ॥ ५।३।१**

पुरुषाचें अंतःकरण जशा प्रकारचें असतें तशा प्रकारचें तो भाषण करीत असतो.

**७९० यादृशैः संनिविशते यादृशांश्चोपसेवते ।**
**यादृगिच्छेच्च भवितुं तादृग्भवति पूरुषः ॥ ५।३६।१३**

कोणी मनुष्य ज्या प्रकारच्या लोकांशीं सहवास ठेवितो, ज्या प्रकारच्या मनुष्यांची सेवा करतो, आणि ज्या प्रकारचा होण्याची इच्छा धरतो त्या प्रकारचा तो होतो.

**७९१ यादृशो जायते राजा तादृशोऽस्य जनो भवेत् ॥ ११।८।३२**

जसा राजा असेल तशी त्याची प्रजा होते.

**७९२ यावच्च मार्दवेनैतान् राजन्नुपचरिष्यसि ।**
**तावदेते हरिष्यन्ति तव राज्यमरिंदम ॥ ५।७३।८**

[ श्रीकृष्ण युधिष्ठिरास म्हणतात ] हे शत्रूंचें दमन करणाऱ्या धर्मराजा, जोंपर्यंत तूं सामोपचारानें यांच्याशीं [ म्हणजे कौरवांशीं ] वागत राहाशील तोंपर्यंत हे तुझें राज्य बळकावून बसतील.

**७९३ यावत्कीर्तिर्मनुष्यस्य न प्रणश्यति कौरव ।**
**तावज्जीवति गान्धारे नष्टकीर्तिस्तु नश्यति ॥१।२०३।११**

( भीष्म म्हणतात ) गांधारीपुत्रा दुर्योधना; जोंपर्यंत मनुष्याची कीर्ति नष्ट झालेली नाहीं तोंपर्यंत तो जिवंत असतो. कीर्ति नाहींशी झाली म्हणजे त्याचा नाश होतो.

**७९४ यावद्धि तीक्ष्णया सूच्या विध्येदग्रेण केशव ।**
**तावदप्यपरित्याज्यं भूमेर्नः पाण्डवान्प्रति ॥ ५।१२७।२५**

( दुर्योधन म्हणतो ) कृष्णा, तीक्ष्ण सुईच्या टोकानें जेवढ्याचा वेध करतां येईल तेवढी भूमि देखील आम्ही पांडवांना देणार नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७९५ युक्ता यदा जानपदा भिक्षन्ते ब्राह्मणा इव ।
अभीक्ष्णं भिक्षुरूपेण राजानं घ्नन्ति तादृशाः ॥१२।९१।२३

राष्ट्रांतील प्रजा उद्योगशील असूनहि जर ( उद्योगाच्या अभावामुळें ) भिक्षुरूपी बनून ब्राह्मणांप्रमाणें वारंवार भिक्षा मागूं लागली तर तिच्यायोगानें राजाचा वध होतो.

७९६ ये च मूढतमा लोके ये च बुद्धेः परं गताः ।
त एव सुखमेधन्ते मध्यमः क्लिश्यते जनः ॥ १२।२५।२८

जगांत जे अत्यंत मूढ असतील, अथवा जे ज्ञानाच्या पैलतीराला पोंचलेले असतात तेच सुखानें नांदत असतात. मध्यम स्थितींतल्या लोकांना क्लेशच होतात.

७९७ ये तु बुद्ध्या हि बलिनस्ते भवन्ति बलीयसः ।
प्राणमात्रबला ये वै नैव ते बलिनो मताः॥१२।१५६।१३

जे बुद्धीनें बलिष्ठ असतील, तेच खरे प्रबळ होत. जे केवळ शारीरिक बलानें संपन्न ते खरोखर बलवान् नव्हत.

७९८ ये दम्भान्नाचरन्ति स्म येषां वृत्तिश्च संयता ।
विषयांश्च निगृह्णन्ति दुर्गाण्यतितरन्ति ते ॥ १२।११०।३

जे दांभिकाचरण करीत नाहींत, ज्यांची वृत्ति संयमशील आहे व जे विषयांना जिंकतात ते सर्व संकटांतून पार पडतात.

७९९ ये धनादपकर्षन्ति नरं स्वबलमास्थिताः ।
ते धर्ममर्थं कामं च प्रमथ्नन्ति नरं च तम् ॥ ५।७२।२४

स्वतःच्या बलाचा आश्रय करून जे एकाद्या मनुष्याचें द्रव्य हिरावून घेतात, ते त्याचा धर्म, अर्थ व काम आणि तो मनुष्य या सर्वांचा विध्वंस करतात.

८०० येन खट्वां समारूढः परितप्येत कर्मणा ।
आदावेव न तत्कुर्यादध्रुवे जीविते सति ॥ ५।३९।२९

खाटेवर ( म्हणजे मृत्युशय्येवर ) पडल्यावर ज्या कृत्यामुळें पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येईल असें कृत्य प्रथमतःच करूं नये, कारण जीवित क्षणभंगुर आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८०१ ये न मानित्वमिच्छन्ति मानयन्ति च ये परान् ।**
**मान्यमानान्नमस्यन्ति दुर्गाण्यतितरन्ति ते ॥ १२।११०।१९**

जे सन्मानाची इच्छा करीत नाहींत, जे दुसऱ्यांना मान देतात आणि सन्मानास पात्र असलेल्यांना प्रणाम करितात ते संकटांच्या पार जातात.

**८०२ येन येन शरीरेण यद्यत्कर्म करोति यः ।**
**तेन तेन शरीरेण तत्तत्फलमुपाश्नुते ॥ १३।७।३**

कोणीहि ज्या ज्या शरीरानें जें जें कर्म करतो त्या त्या कर्माचें फळ तें तें शरीर धारण करून भोगतो.

**८०३ ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ॥ ६।२८।११**

[ श्रीकृष्ण म्हणतात ] जे मला ( परमेश्वराला ) जसे भजतात तसें मी त्यांना फल देतों.

**८०४ येऽर्थाः स्त्रीषु समायुक्ताः प्रमत्तपतितेषु च ।**
**ये चानार्ये समासक्ताः सर्वे ते संशयं गताः ॥ ५।३८।४२**

जीं कामें स्त्रिया किंवा झिंगलेला अथवा पतित मनुष्य यांच्यावर सोंपविलीं गेलीं, तसेंच जीं कामें अनार्य मनुष्याकडे दिलीं गेलीं तीं सगळीं संशयांत पडलीं.

**८०५ येषां त्रीण्यवदातानि विद्या योनिश्च कर्म च ।**
**तान्सेवेत्तैः समास्या हि शास्त्रेभ्योऽपि गरीयसी ॥ ३।१।२७**

विद्या, कुल आणि आचरण हीं तीन ज्यांचीं शुद्ध आहेत त्यांची संगत धरावी. खरोखर, त्यांचा समागम शास्त्राभ्यासापेक्षांहि श्रेष्ठ होय.

**८०६ येषां शास्त्रानुगा बुद्धिर्न ते मुह्यन्ति भारत ॥ १।१।२४४**

( संजय धृतराष्ट्राला म्हणतो ) ज्यांची बुद्धि शास्त्रानुसार चालते ते भांबावून जात नाहींत.

**८०७ ये हि धर्मस्य लोप्तारो वध्यास्ते मम पाण्डव ॥ ७।१८१।२८**

( श्रीकृष्ण म्हणतात. ) अर्जुना, जे धर्म बुडवणारे असतील ते माझ्याकडून मारिले जाण्यास योग्य होत.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८०८ ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।**
**आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ॥ ६।२९।२२**

( श्रीकृष्ण म्हणतात. ) अर्जुना, इंद्रियांचा विषयांशीं संबंध घडल्यानें जे भोग उत्पन्न होतात ते खरोखर दुःखाचें माहेरघरच होत, त्यांना आदि असून अंतहि असतो. त्यांच्या ठिकाणीं शहाणा पुरुष रममाण होत नाहीं.

**८०९ योगः कर्मसु कौशलम् ॥ ६।२६।५०**

योग म्हणजे कर्मे करण्याचें कौशल्य. ( कर्मफलाचा लेप न लागेल अशा रीतीनें निष्कामबुद्धीनें कर्मे करणें. )

**८१० यो दुर्लभतरं प्राप्य मानुष्यं द्विषते नरः ।**
**धर्मावमन्ता कामात्मा भवेत्स खलु वञ्च्यते॥१२।२९७।३४**

जो कोणी मनुष्य दुर्लभ मनुष्ययोनींत उत्पन्न होऊनहि धर्माचा द्वेष किंवा निदान अवमान करतो आणि कामोपभोगांत गढून जातो त्याची अखेर फसगत होते.

**८११ यो न दर्शयते तेजः क्षत्रियः काल आगते ।**
**सर्वभूतानि तं पार्थ सदा परिभवन्त्युत ॥ ३।२७।३८**

[ द्रौपदी धर्मराजास म्हणते. ] हे कुंतीपुत्रा, समय प्राप्त झाला असतां जो क्षत्रिय आपलें तेज प्रकट करीत नाहीं त्याचा अपमान सर्व प्राणी नेहमीं करीत असतात.

**८१२ योऽन्यथा सन्तमात्मानमन्यथा प्रतिपद्यते ।**
**किं तेन न कृतं पापं चौरेणात्मापहारिणा ॥ ५।४२।३७**

जो आपलें खरें स्वरूप एकाप्रकारचें असतां तें दुसऱ्या प्रकारचें असल्याचें भासवितो, त्या स्वतःचें खरें स्वरूप लपविणाऱ्या चोरानें कोणतें पाप केलें नाहीं ?

**८१३ यो मां प्रयतते हन्तुं ज्ञात्वा प्रहरणे बलम् ।**
**तस्य तस्मिन्प्रहरणे पुनः प्रादुर्भवाम्यहम् ॥ १४।१३।१३**

[ काम म्हणजे अहंकार म्हणतो. ] एकाद्या आयुधांत सामर्थ्य आहे असें समजून जो मला त्यानें मारण्याचा प्रयत्न करतो, त्याच्या त्या आयुधांतच मी फिरून उत्पन्न होतों.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८१४ यो यथा वर्तते यस्मिंस्तस्मिन्नेव प्रवर्तयन् ।
नाधर्मं समवाप्नोति नचाश्रेयश्च विन्दति ॥५।१७८।५३

जो ज्याच्याशीं ज्याप्रकारें वागतो त्याच्याशीं त्या प्रकारें वागण्यांत कोणताहि अधर्म घडत नाहीं, आणि त्यापासून अकल्याणहि होत नाहीं.

८१५ यो यस्मिञ्जीवति स्वार्थे पश्येत्पीडां न जीवति ।
स तस्य मित्रं तावत्स्याद्यावन्नस्याद्विपर्ययः॥१२।१३८।१४०

जो जिवंत राहिला असतां स्वार्थाला बाध येणार नाहीं व आपले प्राण वांचतील असें ज्याला वाटत असेल त्याचा तो मित्र, उलट स्थिति आली नाहीं तोंवरच असतो.

८१६ योऽरिणा सह संधाय सुखं स्वपिति विश्वसन् ।
स वृक्षाग्रे प्रसुप्तो वा पतितः प्रतिबुध्यते ॥ १२।१४०।३७

जो शत्रूशीं तह केल्यावर त्याच्यावर विश्वास ठेवून खुशाल झोंपा काढतो तो, झाडाच्या शेंड्यावर झोंपी गेलेल्या मनुष्याप्रमाणें, पडल्यावरच जागा होतो.

८१७ यो विद्यया तपसा संप्रवृद्धः
स एव पूज्यो भवति द्विजानाम् ॥ १।८९।३

जो विद्येनें व तपानें वृद्ध झाला तोच द्विजांना पूज्य वाटतो.

८१८ यो वै संतापयति यं स शत्रुः प्रोच्यते नृप ॥ २।५५।१०

( दुर्योधन धृतराष्ट्राला सांगतो ) हे राजा, जो ज्याला पीडा करतो तो त्याचा शत्रु समजला जातो.

८१९ यो हि तेजो यथाशक्ति न दर्शयति विक्रमात् ।
क्षत्रियो जीविताकाङ्क्षी स्तेन इत्येव तं विदुः॥५।१३४।२

जिवाच्या आशेनें जो क्षत्रिय यथाशक्ति पराक्रम करून आपलें तेज प्रकट करीत नाहीं तो चोरच म्हटला पाहिजे !

८२० रक्षणं सर्वभूतानामिति क्षात्रं परं मतम् ॥१२।१२०।३

सर्व भूतांचें रक्षण करणें हाच क्षत्रियाचा परम धर्म होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८२१ रथः शरीरं भूतानां सत्त्वमाहुस्तु सारथिम् ।**
**इन्द्रियाणि हयानाहुः कर्मबुद्धिस्तु रश्मयः ॥११।७।१३**

जीवाचें शरीर हा रथ व बुद्धि हा सारथि होय. इंद्रियें हे [ या रथाला जोडलेले ] घोडे होत. आणि मन हा लगाम होय.

**८२२ राजन्सर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यसि ।**
**आत्मनो बिल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यसि ॥१।७४।८२**

( शकुंतला दुष्यंताला म्हणते ) राजा, दुसऱ्यांचे मोहरीएवढे बारीक दोष तुला दिसतात, पण स्वतःचे बेलफळा एवढे मोठे दोषहि तूं पहात असूनहि तिकडे डोळेझांक करतोस.

**८२३ राजमूला महाबाहो योगक्षेमसुवृष्टयः ।**
**प्रजासु व्याधयश्चैव मरणं च भयानि च ॥ १२।१४१।९**

(भीष्म युधिष्ठिराला म्हणतात ) प्रजेचा योगक्षेम नीट चालणें, पर्जन्य चांगला पडणें, तसेंच प्रजेला रोग, मरण अथवा भय प्राप्त होणें या सर्वांचें मुख्य कारण राजाच आहे.

**८२४ राजमूलो महाप्राज्ञ धर्मो लोकस्य लक्ष्यते ।**
**प्रजा राजभयादेव न खादन्ति परस्परम् ॥ १२।६८।८**

( बृहस्पति वसुमना राजाला सांगतात) लोक धर्मानें वागतात याचें कारण राजाच होय असें दिसून येतें. राजाच्या भीतीमुळेंच लोक एकमेकांना खाऊन टाकीत नाहींत.

**८२५ राजा कृतयुगस्रष्टा त्रेताया द्वापरस्य च ।**
**युगस्य च चतुर्थस्य राजा भवति कारणम् ॥१२।६९।९८**

जगांत कृतयुग उत्पन्न करणारा राजाच होय. तीच गोष्ट त्रेतायुगाची व द्वापर युगाची आणि चौथ्या म्हणजे कलियुगालाहि राजाच कारण होतो.

**८२६ राजा चेन्न भवेल्लोके पृथिव्यां दण्डधारकः ।**
**जले मत्स्यानिवाभक्ष्यन्दुर्बलं बलवत्तराः ॥ १२।६७।१६**

पृथ्वीवर दंड धारण करणारा राजा जर नसता, तर पाण्यांतील माशांप्रमाणें बलवत्तर लोकांनीं दुबळांना खाऊन टाकलें असतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८२७ राजानं प्रथमं विन्देत्ततो भार्यां ततो धनम् ।**
**राजन्यसति लोकस्य कुतो भार्या कुतो धनम् ॥ १२।५७।४१**

मनुष्यांनीं प्रथमतः राजा प्राप्त करून घ्यावा. तदनंतर स्त्री व त्यानंतर धन. कारण राजाच जर नसेल तर लोकांना स्त्री तरी कोठून मिळणार ? आणि धन तरी कोठून मिळणार ?

**८२८ राजा लोकस्य रक्षिता ॥ १२।९०।३**

राजा हाच लोकांचा पालनकर्ता होय.

**८२९ राजैव कर्ता भूतानां राजैव च विनाशकः ।**
**धर्मात्मा यः स कर्ता स्यादधर्मात्मा विनाशकः ॥ १२।९१।९**

प्राण्यांचें कल्याण करणारा राजाच आणि त्यांचा नाश करणारहि पण राजाच. कारण, तो धर्मानें वागेल तर कल्याणकर्ता आणि अधर्मानें वागेल तर नाश करणारा ठरतो.

**८३० राजैव युगमुच्यते ॥ १२।९१।६**

राजालाच युग म्हणतात. [म्हणजे जसा राजा असेल तसें बरें वाईट युग उत्पन्न होतें]

**८३१ राज्ञः प्रमाददोषेण दस्युभिः परिमुष्यताम् ।**
**अशरण्यः प्रजानां यः स राजा कलिरुच्यते ॥ १२।१२।२९**

राजाच्या हलगर्जीपणामुळें चोरांकडून लुबाडल्या जाणाऱ्या प्रजेला जो राजा अभय देऊं शकत नाहीं तो ( मूर्तिमंत ) कलिच होय.

**८३२ राज्ञां हि चित्तानि परिप्लुतानि**
**सान्त्वं दत्त्वा मुसलैर्घातयन्ति ॥ २।६४।१२**

राजांचें चित्त नेहमीं कलुषित असल्यामुळें ते प्रथमतः गोड बोलतात आणि मागाहून डोक्यांत मुसळ घालून प्राण घेतात.

**८३३ राज्ञा हि पूजितो धर्मस्ततः सर्वत्र पूज्यते ॥ १२।७५।४**

राजानें अगोदर धर्माचा मान ठेवला म्हणजे सर्व लोक धर्माचा मान ठेवतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८३४ राज्यं हि सुमहत्तन्त्रं धार्यते नाकृतात्मभिः ।**
**न शक्यं मृदुना वोढुमायासस्थानमुत्तमम् ॥ १२।५८।२१**

राज्य चालविणें हें अत्यंत अवघड काम आहे. ज्यानें आपल्या बुद्धीला विशिष्ट प्रकारचें वळण लावलेलें नाहीं, त्याला तें झेंपणार नाहीं. राज्यधुरा वाहणें हें अत्यंत कष्टप्रद असून तें लेच्यापेच्या मनुष्याला शक्य नाहीं.

**८३५ राज्यं प्रणिधिमूलं हि मन्त्रसारं प्रचक्षते ॥ १२।८३।५१**

हेर हा राज्याचा आधार, आणि सल्लामसलत ही शक्ति होय असें म्हणतात.

**८३६ राष्ट्रस्यैतत्कृत्यतमं राज्ञ एवाभिषेचनम् ।**
**अनिन्द्रमबलं राष्ट्रं दस्यवोऽभिभवन्त्युत ॥ १२।६७।२**

कोणत्यातरी राजाला राज्याभिषेक करणें हें एक राष्ट्राचें प्रमुख कर्तव्य आहे. कारण राष्ट्राला कोणी नियंता नसला म्हणजे तें दुर्बळ झाल्यामुळें शत्रु त्याच्यावर हल्ला करतात.

**८३७ रोहते सायकैर्विद्धं वनं परशुना हतम् ।**
**वाचा दुरुक्तं बीभत्सं न संरोहति वाक्क्षतम् ॥ ५।३४।७८**

बाणांनीं वेधलेलें अथवा कुऱ्हाडीनें तोडलेलें वन फिरून वाढीस लागतें. परंतु दुष्ट व बीभत्स बोलण्यानें पडलेली जखम भरून येत नाहीं.

**८३८ लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः ॥ १२।२५९।५**

लोकव्यवहार सुरळीतपणें चालावा एवढ्यासाठींच धर्माचरणाचा नियम घालून दिला आहे.

**८३९ लोकरञ्जनमेवात्र राज्ञां धर्मः सनातनः ॥ १२।५७।११**

या लोकीं प्रजेला सुखी ठेवणें हाच राजांचा सनातन धर्म आहे.

**८४० लोकवृत्ताद्राजवृत्तमन्यदाह बृहस्पतिः ॥ २।५५।६**

प्रजेच्या कर्तव्याहून राजाचें कर्तव्य निराळें असल्याचें बृहस्पतीनें प्रतिपादिलें आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८४१ लोको ह्यार्यगुणानेव भूयिष्ठं तु प्रशंसति ॥ १३।१२२।२**

लोक चांगल्या गुणांचीच अतिशय प्रशंसा करीत असतात.

**८४२ लोभं हित्वा सुखी भवेत् ॥ ३।३१३।७८**

लोभ टाकिल्यानें मनुष्य सुखी होतो.

**८४३ लोभात्पापं प्रवर्तते ॥ १२।१५८।२**

लोभापासून पातकाची प्रवृत्ति होते.

**८४४ लोहितोदां केशतृणां गजशैलां ध्वजद्रुमाम् ।**
**महीं करोति युद्धेषु क्षत्रियो यः स धर्मवित् ॥१२।५५।१८**

जो संग्रामामध्यें पृथ्वीला रक्तरूपी जलानें युक्त, केशरूपी तृणानें आच्छादित झालेली, गजरूपी पर्वत असलेली व ध्वजरूपी वृक्षांनीं युक्त अशी करितो, तोच क्षत्रिय खरा धर्म वेत्ता होय.

**८४५ वधमेव प्रशंसन्ति शत्रूणामपकारिणाम् ॥१।१४०।१०**

अपकार करणाऱ्या शत्रूंचा वधच करणें प्रशस्त मानतात.

**८४६ वध्यन्ते न ह्यविश्वस्ताः शत्रुभिर्दुर्बला अपि ।**
**विश्वस्तास्तेषु वध्यन्ते बलवन्तोऽपि दुर्बलैः १२।१३८।१९८**

जे सावध असतात ते दुर्बळ असले तरी शत्रूंकडून मारिले जात नाहींत. पण बलाढ्य असले तरी शत्रूविषयीं बेसावध राहणारे, दुर्बळ शत्रूंकडूनहि मारिले जातात.

**८४७ वर्तमानः सुखे सर्वो मुह्यतीति मतिर्मम ॥३।१८१।३०**

( अजगर झालेला नहुष राजा युधिष्ठिराला म्हणतो. ) सुखांत असतां सर्वांना मोह उत्पन्न होतो असें माझें मत आहे.

**८४८ वर्धमानमृणं तिष्ठेत्परिभूताश्च शत्रवः ।**
**जनयन्ति भयं तीव्रं व्याधयश्चाप्युपेक्षिताः॥१२।१४०।५९**

ऋण अवशिष्ट राहिलें तर तें वृद्धिंगतच होत जातें. शत्रु शिल्लक ठेविले तर त्यांचा अपमान झाल्यामुळें ते पुढें अत्यंत भीति उत्पन्न करितात. आणि रोगांची उपेक्षा केली तर त्यापासूनहि अतिशय भीति उत्पन्न होते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८४९ वशे बलवतां धर्मः सुखं भोगवतामिव ।**
**नास्त्यसाध्यं बलवता सर्वं बलवतां शुचि ॥१२।१३४।८**

सुख जसें भोगसाधनें अनुकूल असलेल्याच्या स्वाधीन, तसा धर्म बलसंपन्न असलेल्यांच्या अधीन. ज्यांच्यापाशीं बल आहे त्यांना असाध्य असें कांहींच नाहीं. बलवान् असेल त्याचें सर्वच शुभ.

**८५० वसन्विषयमध्येऽपि न वसत्येव बुद्धिमान् ।**
**संवसत्येव दुर्बुद्धिरसत्सु विषयेष्वपि ॥१२।२९८।६**

शहाणा मनुष्य विषयांच्या गराड्यांत राहूनहि न राहिल्यासारखा असतो. मूर्ख मनुष्य विषय जवळ नसतांहि त्यांत गुरफटल्याप्रमाणें असतो.

**८५१ वहेदमित्रं स्कन्धेन यावत्कालस्य पर्ययः ।**
**प्राप्तकालं तु विज्ञाय भिन्द्याद्घटमिवाश्मनि ॥१२।१४०।१८**

आपला काल उलट आहे तोंवर शत्रूला खांद्यावर देखील बसवावें, परंतु योग्य काल आला आहेसें दिसून येतांच, मडकें दगडावर आपटावें तसा, त्याचा चुराडा करून सोडावा.

**८५२ वाक्शल्यं मनसो जरा ॥ ५।३९।७९**

वाग्बाणामुळें मनाला वार्धक्य येतें.

**८५३ वाक्संयमो हि नृपते सुदुष्करतमो मतः ।**
**अर्थवच्च विचित्रं च न शक्यं बहु भाषितुम् ॥५।३४।७६**

[ विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ] वाणीचा संयम करणें अत्यंत दुर्घट म्हणून म्हटलें आहे. परंतु यथार्थ असून चटकदार असें भाषण पुष्कळ करणें शक्यहि नाहीं.

**८५४ वाक्सायका वदनान्निष्पतन्ति**
**यैराहतः शोचति रात्र्यहानि ।**
**परस्य नामर्मसु ये पतन्ति**
**तान्पण्डितो नावसृजेत्परेषु ॥ १३।१०४।३२**

वाग्बाण हे तोंडांतून सुटत असतात. ते ज्याला लागले तो रात्रंदिवस तळमळत राहतो. यास्तव दुसऱ्याच्या वर्मी लागतील असे वाग्बाण सुज्ञ मनुष्यानें दुसऱ्यावर केव्हांही टाकूं नये.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८५५ वाग्वज्रा ब्राह्मणाः प्रोक्ताः**
**क्षत्रिया बाहुजीविनः ॥ १२।१९९।४६**

वाणी हें ब्राह्मणांचें शस्त्र असून क्षत्रिय हे बाहुबलावर जगणारे होत असें म्हटलें आहे.

**८५६ वाचा भृशं विनीतः स्याद्धृदयेन तथा क्षुरः ।**
**स्मितपूर्वाभिभाषी स्यात्सृष्टो रौद्रेण कर्मणा ॥ १।१४०।६६**

बोलण्यांत अगदीं विनयशील पण हृदयानें कठोर असावें. स्मितपूर्वक बोलावें परंतु आपलें खरें स्वरूप भयंकर कृति करून प्रगट करावें.

**८५७ वासांसि जीर्णानि यथा विहाय**
**नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णा-**
**न्यन्यानि संयाति नवानि देही ॥ ६।२६।२२**

ज्याप्रमाणें मनुष्य जुनीं वस्त्रें टाकून देऊन दुसरीं नवीं घेतो, त्याप्रमाणें आत्मा हा जीर्ण झालेलीं शरीरें टाकून देऊन दुसऱ्या नव्या शरीरांत प्रवेश करतो.

**८५८ विक्रमाधिगता ह्यर्थाः क्षत्रधर्मेण जीवतः ।**
**मनो मनुष्यस्य सदा प्रीणन्ति पुरुषोत्तम ॥ ५।९०।७९**

( कुंती श्रीकृष्णाला म्हणते ) हे पुरुषोत्तमा, पराक्रम करून मिळविलेलें द्रव्य क्षात्रधर्मानें चालणाऱ्या मनुष्याच्या मनाला सदा संतोष देतें.

**८५९ विगुणा ह्यपि संरक्ष्या ज्ञातयो भरतर्षभ ॥ ५।३९।२०**

( विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ) हे भरतश्रेष्ठा, आपल्या कुलांतील गुणहीन पुरुषांचेंहि संरक्षण करणें अवश्य आहे.

**८६० विजयो मन्त्रमूलो हि राज्ञो भवति भारत ॥ २।५।२७**

( नारद युधिष्ठिराला म्हणतात. ) राजाला विजय प्राप्त होण्याला मूळ कारण गुप्त सल्लामसलत हेंच होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



## ८६१ विदिते चापि वक्तव्यं सुहृद्भिरनुरागतः ॥ ४।४।९

एकाद्यास माहीत असलेली गोष्टहि आप्तेष्टांनीं पुनः प्रेमानें सांगावी हें त्यांचें कर्तव्यच आहे.

## ८६२ विद्या तपो वा विपुलं धनं वा
## सर्वं ह्येतद्व्यवसायेन शक्यम् ॥ १२।१२०।४५

विद्या काय, तप काय अथवा विपुल द्रव्य काय हें सर्व उद्योगानेंच मिळविणें शक्य आहे.

## ८६३ विद्यामदो धनमदस्तृतीयोऽभिजनो मदः ।
## मदा एतेऽवलिप्तानामेत एव सतां दमाः ॥ ५।३४।४४

विद्येचा मद, धनाचा मद व तिसरा कुलाचा मद हे तीन गर्विष्ठ लोकांच्या बाबतींत मद म्हणजे अहंकार वाढविणारे ठरतात, तेच सज्जनांच्या बाबतींत दम म्हणजे इंद्रियनिग्रहाला कारण होतात.

## ८६४ विद्या हि सा ब्रह्मचर्येण लभ्या ॥ ५।४४।२

विद्या म्हणून जी आहे ती ब्रह्मचर्यानेंच साध्य होत असते.

## ८६५ विना वधं न कुर्वन्ति तापसाः प्राणयापनम् ॥ १२।१५।२४

जीवहत्या घडल्याविना तपस्व्याचेंसुद्धां प्राणधारण होत नाहीं.

## ८६६ विरूपो यावदादर्शे नात्मनः पश्यते मुखम् ।
## मन्यते तावदात्मानमन्येभ्यो रूपवत्तरम् ॥ १।७४।८७

कुरूप मनुष्य जोंवर आरशांत आपलें तोंड पहात नाहीं, तोंवर त्याला वाटत असतें कीं, आपण इतरांपेक्षां रूपवान् आहों.

## ८६७ विवर्जनं ह्यकार्याणामेतत्सुपुरुषव्रतम् ॥ ४।१४।३६

दुष्कृत्य सर्वथा वर्ज्य करणें हें सत्पुरुषांचें व्रत होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८६८ विवाहकाले रतिसंप्रयोगे**
**प्राणात्यये सर्वधनापहारे ।**
**विप्रस्य चार्थे ह्यनृतं वदेत**
**पञ्चानृतान्याहुरपातकानि ।। ८।६९।३३**

विवाहकालीं, संभोगसमयीं, प्राणसंकट ओढवलें असतां, सर्वस्वाचा नाश होण्याचा समय आला असतां, तसेंच एकाद्या ब्राह्मणाचें हित साधत असेल तर मनुष्यानें असत्य भाषण केलें तरी चालेल. या पांच प्रसंगीं असत्य भाषणाच्या योगानें पातक लागत नाहीं.

**८६९ विश्वासयित्वा तु परं तत्त्वभूतेन हेतुना ।**
**अथास्य प्रहरेत्काले किंचिद्विचलिते पदे ।।१२।१४०।४४**

खरेंखुरें कारण दाखवून शत्रूचा विश्वास संपादन करावा. आणि कालांतरानें त्याचें आसन जरासें डळमळीत झालें कीं, त्याच्यावर प्रहार करावा.

**८७० विश्वासयेत्परांश्चैव विश्वसेच्च न कस्यचित् ।**
**पुत्रेष्वपि हि राजेन्द्र विश्वासो न प्रशस्यते ।। १२।८५।३३**

( भीष्म युधिष्ठिराला म्हणतात ) दुसऱ्यांचा विश्वास संपादन करावा. पण आपण मात्र कोणावरहि विश्वास ठेवूं नये. राजा, फार काय, पण पोटच्या मुलाचासुद्धां पूर्ण विश्वास धरणें प्रशस्त नव्हे.

**८७१ विश्वासाद्भयमभ्येति नापरीक्ष्य च विश्वसेत् १२।१४०।४३**

[ भलत्याच मनुष्यावर ] विश्वास टाकिल्यानें भीति उत्पन्न होत असते. यास्तव, परीक्षा पाहिल्यावांचून कोणावरहि विश्वास ठेवूं नये.

**८७२ विषमं न हि मन्यन्ते प्रपातं मधुदर्शिनः ।। ५।५१।२६**

मध पाहणारे [ मधाच्या ठिकाणाचा ] तुटलेला कडा किती भयंकर आहे इकडे लक्ष देत नाहींत.

**८७३ विषमां च दशां प्राप्तो देवान् गर्हति वै भृशम् ।**
**आत्मनः कर्मदोषाणि न विजानात्यपण्डितः ।। ३।२०९।६**

मूर्ख मनुष्य दुर्दशेच्या फेऱ्यांत सांपडला म्हणजे देवांच्या नांवानें खडे फोडतो, पण आपलें चुकतें कोठें, हें त्याला समजत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८७४ विषमावस्थिते दैवे पौरुषेऽफलतां गते ।**
**विषादयन्ति नात्मानं सत्त्वोपाश्रयिणो नराः ॥३।७९।१४**

दैव प्रतिकूळ होऊन प्रयत्न फुकट गेला असतां, सत्वशील पुरुष अंतःकरण खिन्न होऊं देत नाहींत.

**८७५ विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।**
**रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥ ६।२६।५९**

निराहारी पुरुषाला विषय सोडून जातात, पण त्यांची आवड शिल्लक राहतेच, ही आवडसुद्धां परब्रह्माचा साक्षात्कार झाल्यानंतर नष्ट होते.

**८७६ विष्वग्लोपः प्रवर्तेत भिद्येरन्सर्वसेतवः ।**
**ममत्वं न प्रजानीयुर्यदि दण्डो न पालयेत् ॥ १२।१५।३८**

दंडानें जर संरक्षण केलें नसतें तर चोहोंकडे शून्य होऊन गेलें असतें; सर्व प्रकारच्या मर्यादांचा भंग होऊन गेला असता; आणि कोणाची कशावर मालकी राहिली नसती.

**८७७ विहीनं कर्मणाऽन्यायं यः प्रगृह्णाति भूमिपः ।**
**उपायस्याविशेषज्ञं तद्वै क्षत्रं नपुंसकम् ॥ १२।१४२।३१**

सामादिक उपाय व त्यांचे भेद यांचें ज्ञान नसणारा जो राजा, अन्यायानें प्रजेकडून कर वसूल करतो; पण आपलें प्रजापालनरूप कर्तव्य मात्र करीत नाहीं तो क्षत्रिय केवळ नपुंसक होय.

**८७८ वृक्षमूलेऽपि दयिता**
**यस्य तिष्ठति तद्गृहम् ।**
**प्रासादोऽपि तया हीनः**
**कान्तार इति निश्चितम् ॥ १२।१४४।१२**

कोणी झाडाखालीं राहिला, तरी त्याची स्त्री बरोबर असेल, तर तें त्याचें घरच होय, आणि तिजवांचून जरी एकादें राजमंदिर असलें तरी तें निःसंशय अरण्यच होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८७९ वृत्तं यत्नेन संरक्षेद्वित्तमेति च याति च।**
**अक्षीणो वित्ततः क्षीणो वृत्ततस्तु हतो हतः ५।३६।३७**

शीलाचें यत्नपूर्वक रक्षण करावें. द्रव्य काय, मिळतें आणि जातें, जो केवळ द्रव्यानें क्षीण झाला तो खरोखर क्षीण नव्हे, पण ज्याचें शील भ्रष्ट झालें त्याचा सर्वस्वीं नाश झाला.

**८८० वृत्तेः कार्पण्यलब्धाया अप्रतिष्ठैव ज्यायसी ॥५।९०।७४**

भिंकेपणानें उपजीविका करण्यापेक्षां अगदीं निराधार असणेंच चांगलें.

**८८१ वृत्तेन हि भवत्यार्यो न धनेन न विद्यया ॥ ५।९०।५३**

शीलानेंच मनुष्य आर्य गणला जातो; धनानें नव्हे, अथवा विद्येनेंहि नव्हे.

**८८२ वेदाढ्या वृत्तसंपन्ना ज्ञानवन्तस्तपस्विनः।**
**यत्र तिष्ठन्ति वै विप्रास्तन्नाम नगरं नृप ॥ ३।२००।९१**

( मार्कंडेय युधिष्ठिराला म्हणतात ) हे राजा, वेदपारंगत, शीलसंपन्न, ज्ञानी व तपस्वी असे ब्राह्मण ज्यांत राहात असतील त्यालाच खरोखर नगर म्हणावें.

**८८३ वेदाऽहं तव या बुद्धिरानृशंस्याऽगुणैव सा ॥१२।७५।१८**

[ धर्माचरण करण्याच्या इच्छेनें राज्य सोडून अरण्यांत जाऊं इच्छिणाऱ्या युधिष्ठिरास भीष्म म्हणतात ] तुझ्या बुद्धीला क्रूरत्वाचा संपर्क नाहीं हें मी जाणून आहें पण तशा प्रकारची बुद्धि निष्फल होय.

**८८४ वैद्याश्चाप्यातुराः सन्ति बलवन्तश्च दुर्बलाः।**
**श्रीमन्तश्चापरे षण्ढा विचित्रः कालपर्ययः ॥ १२।२८।२२**

वैद्यांनासुद्धां रोग होतात. आणि बलवान् देखील दुबळे ठरतात. तसेंच कित्येक श्रीमंत लोक नामर्द असतात. ही काळाचीच विचित्र गति आहे.

**८८५ व्यक्तं हि जीर्यमाणोऽपि बुद्धिं जरयते नरः॥७।१४३।१६**

मनुष्य वृद्ध होऊं लागला म्हणजे त्याची बुद्धिहि त्याच्या शरीराबरोबरच जीर्ण होऊं लागते हें अगदीं खरें आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८८६ व्यवसायं समाश्रित्य सहायान् योऽधिगच्छति ।**
**न तस्य कश्चिदारम्भः कदाचिदवसीदति ॥ १२।२९८।४२**

जो आपली मुख्य भिस्त स्वतःचे प्रयत्नावर ठेवून मग दुसऱ्यांचें साहाय्य घेतो, त्याचा कसलाहि प्रयत्न केव्हांहि फसत नाहीं.

**८८७ व्रजे वाप्यथवारण्ये यत्र सन्ति बहुश्रुताः ।**
**तत्तन्नगरमित्याहुः पार्थ तीर्थं च तद्भवेत् ॥ ३।२००।९२**

( मार्कंडेय म्हणतात ) हे युधिष्ठिरा, बहुश्रुत ब्राह्मण जेथें असतील तो गौळवाडा असला, अथवा अरण्य जरी असलें तरी त्यालाच नगर म्हणतात, आणि तेंच तीर्थ होतें.

**८८८ शकुनानामिवाकाशे मत्स्यानामिव चोदके ।**
**पदं यथा न दृश्येत तथा पुण्यकृतां गतिः ॥१२।३२२।१९**

पक्ष्यांनीं आकाशांत आणि माशांनीं पाण्यांत आक्रमिलेल्या मार्गाची जशी कांहीं खूण दिसत नाहीं, त्याप्रमाणें पुण्यवान् लोकांना प्राप्त होणारी गति उघड दिसत नाहीं.

**८८९ शक्नोति जीवितुं दक्षो नालसः सुखमेधते ॥ १०।२।१५**

तत्परतेनें उद्योग करणारा मनुष्य चांगल्या प्रकारें जगूं शकतो. आळशी मनुष्याला सुख म्हणून मिळत नाहीं.

**८९० शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ।**
**कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥६।२९।२३**

शरीर टाकून देण्यापूर्वी या जगांत असतांनाच, जो कामक्रोधांचा तडाका सहन करूं शकतो तो योगी होय. तोच मनुष्य सुखी होतो.

**८९१ शक्यं ह्येवाहवे योद्धुं न दातुमनसूयितम् ॥ १३।८।१०**

समरांगणांत लढणें सहज शक्य आहे; पण असूया [ म्हणजे हेवा, लोभ वगैरे ] न धरितां दान करणें हें मात्र शक्य नाहीं.

**८९२ शत्रुः प्रवृद्धो नोपेक्ष्यो दुर्बलोऽपि बलीयसा ॥ ५।९।२२**

शत्रु दुर्बळ जरी असला तरी तो वृद्धिंगत झाला असतां, बलाढ्य पुरुषानेंहि त्याची उपेक्षा करितां उपयोगी नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**८९३ शत्रुं च मित्ररूपेण सान्त्वेनैवाभिसान्त्वयेत् ।**
**नित्यशश्चोद्विजेत्तस्माद्गृहात्सर्पयुतादिव ॥ १२।१४०।१५**

वरकरणी मित्रत्वाचा आव आणून शत्रूला सामोपचारानेंच वश करावें; परंतु आंत सर्प शिरलेल्या घराप्रमाणें त्याचें निरंतर भय बाळगावें.

**८९४ शत्रुपक्षं समृध्यन्तं यो मोहात्समुपेक्षते ।**
**व्याधिराप्यायित इव तस्य मूलं छिनत्ति सः ॥२।५५।१६**

भरभराटींत असलेल्या शत्रुपक्षाची जो मूर्खपणानें उपेक्षा करतो, त्याचा समूळ उच्छेद तो शत्रुपक्ष, विकोपास गेलेल्या व्याधीप्रमाणें करितो.

**८९५ शत्रुर्निमज्जता ग्राह्यो जङ्घायां प्रपतिष्यता ।**
**विपरिच्छिन्नमूलोऽपि न विषीदेत्कथंचन ॥५।१३३।२०**

बुडतां बुडतां अथवा पडतां पडतांसुद्धां शत्रूची तंगडी पकडावी, आणि त्यासह बुडावें किंवा पडावें. मुळासकट सर्वनाश झाला तरी केव्हांहि खिन्न होऊन बसूं नये.

**८९६ शत्रुश्चैव हि मित्रं च न लेख्यं न च मातृका ।**
**यो वै संतापयति यं स शत्रुः प्रोच्यते नृप ॥२।५५।१०**

[ दुर्योधन धृतराष्ट्राला म्हणतो ] हे राजा, अमका हा शत्रु आणि अमका हा मित्र, असा कांहीं कोणावर छाप मारलेला नाहीं, किंवा अक्षरेंहि खोदलेलीं नाहींत ! तर, ज्याच्यापासून ज्याला ताप होतो, त्यालाच त्याचा शत्रु असें म्हणत असतात.

**८९७ शत्रोरपि गुणा ग्राह्या दोषा वाच्या गुरोरपि ॥४।५१।१५**

शत्रूचेसुद्धां गुण घ्यावे. आणि दोष गुरूचे असले तरीसुद्धां निंद्य मानावे.

**८९८ शयानं चानुशेते हि तिष्ठन्तं चानुतिष्ठति ।**
**अनुधावति धावन्तं कर्म पूर्वकृतं नरम् ॥११।२।३२**

पूर्वजन्मीं केलेलें कर्म मनुष्य झोंपीं गेला कीं, त्याच्याबरोबरच झोंपीं जातें, उभा राहिला कीं लगेच उभें राहतें, आणि तो धावूं लागला म्हणजे त्याच्या मागोमाग धांवत जातें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८९९ शरीरनियमं प्राहुर्ब्राह्मणा मानुषं व्रतम् ।
मनो विशुद्धां बुद्धिं च दैवमाहुर्व्रतं द्विजाः ॥३।९३।२१

[ व्यासादिकमुनि पांडवांना म्हणतात. ] शारीरिक नियम पाळणें हें ज्ञानी लोक मानवी व्रत समजतात. आणि मनावर जय मिळवून बुद्धि शुद्ध करणें हें दैवी व्रत मानतात.

९०० शरीरस्य विनाशेन धर्म एव विशिष्यते ॥१।२१३।२०

आपला प्राण खर्ची घालूनहि धर्म पाळणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे.

९०१ शाश्वतोऽयं धर्मपथः सद्भिराचरितः सदा ।
यद्भार्यां परिरक्षन्ति भर्तारोऽल्पबला अपि ॥३।१२।६८

[ द्रौपदी पांडवांस म्हणते. ] भर्ते अशक्त असले तरीहि भार्येचें संरक्षण करितात. हा सनातन धर्ममार्ग असून सज्जनांनीं नेहमीं आचरलेला आहे.

९०२ शीलं प्रधानं पुरुषे तद्यस्येह प्रणश्यति ।
न तस्य जीवितेनार्थो न धनेन न बन्धुभिः ॥५।३४।४८

मनुष्याच्या ठिकाणीं शील हेंच मुख्य आहे. तेंच ज्याचें नष्ट झालें त्याला या जगांत जीविताचा, धनाचा अथवा बांधवांचा कांहींएक उपयोग नाहीं.

९०३ शीलवृत्तफलं श्रुतम् ॥५।३९।६७

विद्येचें फल म्हणजे उत्तम शील आणि सदाचार.

९०४ शीलेन हि त्रयो लोकाः शक्या जेतुं न संशयः ।
न हि किंचिदसाध्यं वै लोके शीलवतां भवेत् ॥१२।१२४।१५

शीलाच्या जोरावर त्रैलोक्य जिंकणें शक्य आहे. यांत शंका नाहीं. खरोखर, शीलसंपन्न मनुष्यांना असाध्य असें कांहींच नाहीं.

९०५ शुचेरपि हि युक्तस्य दोष एव निपात्यते ।
मुनेरपि वनस्थस्य स्वानि कर्माणि कुर्वतः ॥१२।१११।६०

शुचिर्भूत व आपलें कर्तव्य करण्यांत तत्पर अशाहि पुरुषावर दोषारोप केला जातो. आणि अरण्यामध्यें राहून केवळ आपलीं कर्मे करीत असणाऱ्या ऋषीवरहि दोषारोप केला जातो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९०६ शुभं वा यदि वा पापं द्वेष्यं वा यदि वा प्रियम् ।**
**अपृष्टस्तस्य तद्ब्रूयाद्यस्य नेच्छेत्पराभवम् ॥५।३४।४**

ज्याची हानि होऊं नये अशी आपल्याला इच्छा असते, त्याला त्यानें जरी विचारिलें नसलें तरी, त्याच्यासंबंधानें जें आपणांला दिसत असेल तें सांगावें; मग तें शुभ असो अथवा अशुभ असो. आणि त्याचप्राणें त्याला प्रिय होवो अथवा अप्रिय होवो.

**९०७ शुभं सर्वपवित्रेभ्यो दानमेव परं द्विज ॥ १३।१२०।१६**

( व्यास मैत्रेय मुनींना म्हणतात ) सर्व पवित्र वस्तूंपेक्षां दान हेंच अत्यंत कल्याणकारक आहे.

**९०८ शुभानामशुभानां च द्वौ राशी पुरुषर्षभ ।**
**यः पूर्वं सुकृतं भुङ्क्ते पश्चान्निरयमेव सः ॥ १८।३।१३**

( इंद्र युधिष्ठिराला म्हणतो. ) पुण्य आणि पाप यांच्या दोन निरनिराळ्या राशी आहेत. यांपैकीं सुकृत म्हणजे पुण्य जो प्रथम भोगतो, त्याच्या वांट्याला मागाहून नरकच येतो.

**९०९ शुभेन कर्मणा सौख्यं दुःखं पापेन कर्मणा ।**
**कृतं भवति सर्वत्र नाकृतं विद्यते क्वचित् ॥ ११।२।३६**

सत्कर्मानें सुख आणि दुष्कर्मानें दुःख प्राप्त होतें. जें पूर्वी केलें असेल तेंच केव्हां झालें तरी फलाला येणार. जें केलें नाहीं त्याचें फळहि नाहीं.

**९१० शुश्रूषुरपि दुर्मेधाः पुरुषोऽनियतेन्द्रियः ।**
**नालं वेदयितुं कृत्स्नौ धर्मार्थाविति मे मतिः ॥ १०।५।१**
**तथैव तावन्मेधावी विनयं यो न शिक्षते ।**
**न च किंचन जानाति सोऽपि धर्मार्थनिश्चयम् ॥ १०।५।२**

( कृपाचार्य अश्वत्थाम्याला म्हणतात. ) मंद बुद्धीचा मनुष्य जिज्ञासु असला तरी इंद्रियांवर ताबा मिळविल्यावांचून तो धर्मार्थ पूर्णपणें जाणण्यास समर्थ होणार नाहीं, असें माझें मत आहे. तीच गोष्ट, ज्याच्या मनाला चांगलें वळण लागलेलें नाहीं अशा बुद्धिमान् मनुष्याची, त्याला सुद्धां धर्मार्थाचें निश्चित ज्ञान कधींच होत नाहीं.

म. भा. १०

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९११ शूरः सर्वं पालयति सर्वं शूरे प्रतिष्ठितम् ॥ १२।९९।१८**

शूर पुरुष सर्वांचें रक्षण करतो. शूराच्या आधारानें सर्व राहतात.

**९१२ शूरा वीराश्च शतशः सन्ति लोके युधिष्ठिर ।**
**येषां सङ्ख्यायमानानां दानशूरो विशिष्यते ॥ १३।८।११**

( भीष्म म्हणतात. ) हे युधिष्ठिरा, शूर वीर जगांत शेंकड्यांनीं आहेत. पण त्यांची मोजदाद करूं म्हटलें, तर दानशूर हाच विशेष श्रेष्ठ ठरेल.

**९१३ शृगालोऽपि वने कर्ण शशैः परिवृतो वसन् ।**
**मन्यते सिंहमात्मानं यावत्सिंहं न पश्यति ॥ ८।३९।२८**

[ शल्य म्हणतो ] हे कर्णा, वनांत सशांच्या जमावांत बसला असतां कोल्ह्याला सुद्धां आपण सिंह आहों असें वाटतें. [ पण कोठवर? ] सिंह दृष्टीस पडला नाहीं तोंवर.

**९१४ शृणु यक्ष कुलं तात न स्वाध्यायो न च श्रुतम् ।**
**कारणं हि द्विजत्वे च वृत्तमेव न संशयः ॥ ३।३१३।१०८**

[ युधिष्ठिर म्हणतो. ] बा यक्षा, ऐक. द्विजत्वाला कारण कुल नव्हे, वेदपठण नव्हे, किंवा शास्त्राभ्यासहि नव्हे, तर शील हेंच द्विजत्वाला कारण होय यांत संशय नाहीं.

**९१५ शोकः कार्यविनाशनः ॥ ७।८०।७**

शोकानें कार्यनाश होतो.

**९१६ शोककाले शुचो मा त्वं हर्षकाले च मा हृषः ।**
**अतीतानागतं हित्वा प्रत्युत्पन्नेन वर्तय ॥ १२।२२७।६६**

[ बलि इंद्राला म्हणतो. ] दुःखाच्या वेळीं तूं दुःख करूं नको आणि आनंदाच्या वेळीं हर्ष मानूं नको. पूर्वी होऊन गेलेलें आणि पुढें होणारें यांचा विचार करीत न बसतां वर्तमानकाळाकडे नजर देऊन वाग.

**९१७ शोकस्थानसहस्राणि भयस्थानशतानि च ।**
**दिवसे दिवसे मूढमाविशन्ति न पण्डितम् ॥ ११।२।२२**

रोजच्यारोज हजारों शोक करण्याजोग्या गोष्टी आणि शेंकडों भय वाटण्याजोग्या गोष्टी मूढाला प्राप्त होत असतात, शहाण्याला प्राप्त होत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९१८ श्रद्दधानः शुभां विद्यां हीनादपि समाप्नुयात् ।**
**सुवर्णमपि चामेध्यादाददीताविचारयन् ॥ १२।१६५।३१**

चांगली विद्या हीन मनुष्यापासून देखील श्रद्धेनें ग्रहण करावी. सोनें अपवित्र पदार्थांशीं मिसळलें असल्यास त्यांतूनही खुशाल काढून घ्यावें.

**९१९ श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ ६।४१।३**

मनुष्य हा श्रद्धामय आहे ज्याची जशी श्रद्धा असेल तसा तो होतो.

**९२० श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।**
**ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ६।२८।३९**

इंद्रियें ताब्यांत ठेवून दक्षतेनें प्रयत्न करणाऱ्या श्रद्धावान् मनुष्याला ज्ञान प्राप्त होतें. ज्ञान प्राप्त झाल्यावर लवकरच त्याला परमशांतीचा लाभ होतो.

**९२१ श्रिय एताः स्त्रियो नाम सत्कार्या भूतिमिच्छता ।**
**पालिता निगृहीता च श्रीः स्त्री भवति भारत ॥१३।४६।१५**

स्त्रिया म्हणजे खरोखर मूर्तिमंत लक्ष्मीच होत; कल्याणेच्छु पुरुषानें त्यांचा गौरव करावा. उत्तम प्रकारें पालनपोषण करून योग्य दाबांत ठेविल्यानें स्त्री ही [गृह–] लक्ष्मी होते.

**९२२ श्रियं ह्यविनयो हन्ति जरा रूपमिवोत्तमम् ॥ ५।३४।१२**

वार्धक्यानें जसा सुंदर रूपाचा, तसा अहंकारानें ऐश्वर्याचा नाश होतो.

**९२३ श्रियो बलममात्यांश्च बलवानिह विन्दति ।**
**यो ह्यनाढ्यः स पतितस्तदुच्छिष्टं यदल्पकम् ॥१२।१३४।४**

ऐश्वर्य, सामर्थ्य, आणि अमात्य हें सर्व बलसंपन्न असलेल्याला प्राप्त होतें. जो बलसंपन्न नसेल तो खरोखर पतित होय. अल्पशी सत्ता असणें हें केवळ उच्छिष्टच होय.

**९२४ श्रीमन्तं ज्ञातिमासाद्य यो ज्ञातिरवसीदति ।**
**दिग्धहस्तं मृग इव स एनस्तस्य विन्दति ॥ ५।३९।२७**

विषानें माखलेला बाण हातामध्यें घेऊन मृगहत्त्या करणाराला मृगहत्त्येचें पातक लागतें, त्याप्रमाणें आपल्या कुलामध्यें श्रीमंत पुरुष असतांना जे ज्ञातिजन निकृष्ट दशेस पोंचतात, त्यांचें पातक त्या श्रीमान् पुरुषाला प्राप्त होतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९२५ श्रीमान्स यावद्भवति तावद्भवति पूरुषः ॥ ५।७२।३६**

कोणीहि संपत्तीनें युक्त असेल तोंपर्यंतच खरोखर पुरुष गणला जातो.

**९२६ श्रीर्हता पुरुषं हन्ति पुरुषस्याधनं वधः ॥५।७२।१९**

लक्ष्मीचा घात झाला असतां पुरुषाचा वध होतो. कारण, निर्धनता हा पुरुषाचा वधच होय.

**९२७ श्रुतमाप्नोति हि नरः सततं वृद्धसेवया ॥ १३।१६२।४९**

सतत वृद्धजनांचा समागम केल्यानें मनुष्य बहुश्रुत होतो.

**९२८ श्रुतं प्रज्ञानुगं यस्य प्रज्ञा चैव श्रुतानुगा ।**
**असंभिन्नार्यमर्यादः पण्डिताख्यां लभेत सः ५।३३।२९**

बुद्धीला अनुरूप ज्याचें अध्ययन आहे, अध्ययनाला अनुरूप ज्याचे विचार आहेत, आणि आर्य पुरुषाच्या मर्यादेचें ज्याच्या हातून उल्लंघन होत नाहीं त्याला पंडित ही संज्ञा प्राप्त होते.

**९२९ श्रुतेन तपसा वापि**
**श्रिया वा विक्रमेण वा ।**
**जनान्योऽभिभवत्यन्यान्**
**कर्मणा हि स वै पुमान् ॥ ५।१३३।२५**

विद्येनें किंवा तपानें, संपत्तीनें किंवा पराक्रमानें जो इतरांवर मात करतो, तो आपल्या कर्तृत्वामुळें खरा पुरुष ठरतो.

**९३० श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ६।२७।३५**

[ श्रीकृष्ण सांगतात ] आचरण्यास सोपा अशा परधर्मापेक्षां, सदोष असला तरीहि स्वधर्मच श्रेष्ठ होय. स्वधर्मांत राहून मरण आलें तरी बेहेत्तर. ( कारण ), परधर्माचा स्वीकार करण्यांत मोठें भय आहे.

**९३१ श्रेष्ठो हि पण्डितः शत्रुर्न च मित्रमपण्डितः ॥१२।१३८।४६**

शहाणा शत्रु पत्करला, पण मूर्ख मित्र नको.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९३२ श्रोतव्यं खलु वृद्धानामिति शास्त्रनिदर्शनम् ।**
**न त्वेव ह्यतिवृद्धानां पुनर्बाला हि ते मताः ॥५।१६८।२६**

वृद्धांचें अवश्य ऐकावें असें शास्त्र सांगतें; पण अतिवृद्ध झालेल्यांचें ऐकूं नये. कारण त्यांची गणना पुनरपि बाल झालेल्यांतच केली पाहिजे.

**९३३ श्रोत्रियस्येव ते राजन्मन्दकस्याविपश्चितः ।**
**अनुवाकहता बुद्धिर्नैषा तत्त्वार्थदर्शिनी ॥ १२।१०।१**

[ भीमसेन धर्मराजाला म्हणतो ] एकाद्या मतिमंद मठ्ठ ब्राह्मणाची बुद्धि वेदांची अर्थशून्य घोकंपट्टी करण्यानें नष्ट व्हावी तसा, राजा, तुझ्या बुद्धीला भ्रम झाला असून तिला खरें तत्त्व कळेनासें झालें आहे.

**९३४ श्वःकार्यमद्य कुर्वीत पूर्वाह्णे चापराह्णिकम् ।**
**न हि प्रतीक्षते मृत्युः कृतं वास्य न वा कृतम् ॥१२।३२१।७३**

उद्यांचें कार्य आज करावें; तिसऱ्या प्रहरीं करावयाचें तें सकाळीं करावें. कारण मृत्यु कोणाचें काम झालें अगर न झालें हें पहात बसत नाहीं.

**९३५ षड्दोषाः पुरुषेणेह हातव्या भूतिमिच्छता ।**
**निद्रा तन्द्री भयं क्रोध आलस्यं दीर्घसूत्रता ॥ ५।३३।७८**

आपलें बरें व्हावें असें इच्छिणाऱ्या पुरुषानें सहा दोष टाळावे फार झोंप, सुस्ती, भय, क्रोध, आळस आणि दीर्घसूत्रीपणा.

**९३६ स एव धर्मः सोऽधर्मो देशकाले प्रतिष्ठितः ।**
**आदानमनृतं हिंसा धर्मो ह्यावस्थिकः स्मृतः ॥१२।३६।११**

योग्य वेळीं आणि योग्य स्थळीं जो धर्म ठरतो, तोच अयोग्य वेळीं आणि अयोग्य स्थळीं अधर्म होतो. चौर्यकर्म, असत्यभाषण, हिंसा या सर्वांची गोष्ट अशीच आहे. धर्म हा परिस्थितीप्रमाणें ठरवावा लागतो.

**९३७ संयोगा विप्रयोगान्ता जातानां प्राणिनां ध्रुवम् ।**
**बुद्बुदा इव तोयेषु भवन्ति न भवन्ति च ॥१२।२७।३०**

जन्माला आलेल्या प्राण्यांच्या संयोगांची अखेर वियोगांतच होत असते. पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें, ते एकसारखे उत्पन्न होतात आणि नाहींसे होतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९३८ संवासाज्जायते स्नेहो जीवितान्तकरेष्वपि ।**
**अन्योन्यस्य च विश्वासः श्वपचेन शुनो यथा १२।१३९।४०**

आपला प्राण घेणाऱ्याशीं सुद्धां सहवासानें स्नेह जडतो, आणि एकमेकांना विश्वास वाटतो. उदाहरणार्थ, कुत्र्याचें मांस खाणारा चांडाल आणि कुत्रा.

**९३९ संसारयति कृत्यानि सर्वत्र विचिकित्सते ।**
**चिरं करोति क्षिप्रार्थे स मूढो भरतर्षभ ॥ ५।३३।३४**

( विदुर धृतराष्ट्राला म्हणतो ) जो स्वतः करावयाचीं कामें दुसऱ्यांवर सोंपवितो. प्रत्येक बाबतींत फाजील चिकित्सा करीत बसतो, आणि जें कार्य लवकर झालें पाहिजे त्याला दिरंगाई करतो तो मूढ होय.

**९४० संहता हि महाबलाः ॥ ८।३४।७**

संघ करून एकत्र राहिलेले लोक अत्यंत बलाढ्य होतात.

**९४१ सख्यं सोदर्ययोर्भ्रात्रो—**
**र्दम्पत्योर्वा परस्परम् ।**
**कस्यचिन्नाभिजानामि**
**प्रीतिं निष्कारणामिह ॥ १२।१३८।१५३**

सख्खे बंधु अथवा पतिपत्नी यांच्यामध्यें जो परस्पर स्नेह असतो, तोहि कारणामुळेंच होय. कांहीं तरी कारण असल्यावांचून जगांत कोणाचें कोणावर प्रेम असल्याचें पाहण्यांत नाहीं !

**९४२ संक्षेपो नीतिशास्त्राणामविश्वासः परो मतः १२।१३८।१९७**

सर्व नीतिशास्त्रांचें थोडक्यांत सार हेंच कीं, कोणाचा विश्वास म्हणून धरूं नये.

**९४३ स चेन्निकृत्या युध्येत निकृत्या प्रतियोधयेत् ।**
**अथ चेद्धर्मतो युध्येद्धर्मेणैव निवारयेत् ॥ १२।९५।९**

प्रतिपक्षी जर कपटानें लढेल तर आपणहि उलट कपटानेंच लढावें. आणि तो जर धर्मयुद्ध करील तर आपणहि धर्मानेंच लढून त्याचें निवारण करावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९४४ सत्यं स्वर्गस्य सोपानं पारावारस्य नौरिव ॥ ५।३३।४७**

समुद्र तरून जाण्यास जशी नाव तसा सत्य, हा स्वर्गास जाण्याचा जिना आहे.

**९४५ सत्यं दमस्तपो दानमहिंसा धर्मनित्यता ।**
**साधकानि सदा पुंसां न जातिर्न कुलं नृप ॥३।१८१।४३**

(अजगर झालेला नहुषराजा युधिष्ठिराला म्हणतो) हे राजा, सत्यभाषण, इंद्रियनिग्रह, तप, दान, अहिंसा आणि नित्य धर्माचरण हींच नेहमीं मनुष्यांच्या उपयोगी पडणारीं आहेत. जातीचा कांहीं उपयोग नाहीं, आणि कुलाचाहि नाहीं.

**९४६ सत्यस्य वचनं श्रेयः सत्यज्ञानं तु दुष्करम् ।**
**यद्भूतहितमत्यन्तमेतत्सत्यं ब्रवीम्यहम् ॥ १२।२८७।२०**

[ नारद गालवाला म्हणतात ] सत्य बोलणें चांगलें खरें, पण सत्याचें निभ्रांत ज्ञान होणें मोठें कठीण. ज्याच्या योगानें जीवांचें अत्यंत कल्याण होतें त्यालाच सत्य म्हणतों.

**९४७ सत्यस्य वदिता साधुर्न सत्याद्विद्यते परम् ।**
**तत्त्वेनैव सुदुर्ज्ञेयं पश्य सत्यमनुष्ठितम् ॥ ८।६९।३१**

[ श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात ] सत्य सांगेल तो साधु. सत्यापरतें श्रेष्ठ कांहीं नाहीं. परंतु सत्याचें आचरण करितांना वास्तविक सत्य कोणतें हें समजणेंच अत्यंत कठीण आहे.

**९४८ सत्येन रक्ष्यते धर्मो विद्या योगेन रक्ष्यते ।**
**मृजया रक्ष्यते रूपं कुलं वृत्तेन रक्ष्यते ॥ ५।३४।३९**

सत्यानें धर्माचें रक्षण होतें; व्यासंगाच्या योगानें विद्या जिवंत राहते. नेहमीं साफसूफ ठेविल्यानें रूप टिकून राहतें; आणि सदाचरणानें कुलाचें रक्षण होतें.

**९४९ सत्येन विधृतं सर्वं सर्वं सत्ये प्रतिष्ठितम् ॥ १२।२५९।१०**

सर्व कांहीं सत्याच्या पायावर उभें आहे. सर्व कांहीं सत्याच्या आधारानें राहतें.

**९५० सन्तः परार्थं कुर्वाणा नावेक्षन्ति परस्परम् ॥ ३।२९७।४९**

परोपकार करणारे संत उलट प्रत्युपकार होण्याची कधींही वाट पहात नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९५१ सन्ति पुत्राः सुबहवो दरिद्राणामनिच्छताम् ।**
**नास्ति पुत्रः समृद्धानां विचित्रं विधिचेष्टितम् ॥ १२।२८।२४**

दरिद्री लोकांना इच्छा नसतां पुष्कळ मुलगे होतात आणि कित्येक श्रीमंतांना मुलगा नसतो. दैवाची लीला विचित्र आहे.

**९५२ संतोषो वै श्रियं हन्ति ह्यभिमानं च भारत ।**
**अनुक्रोशभये चोभे यैर्वृतो नाश्नुते महत् ॥ २।४९।१४**

[ दुर्योधन धृतराष्ट्राला म्हणतो ] अल्पसंतुष्ट राहिल्यानें ऐश्वर्याचा व स्वाभिमानाचा नाश होतो. दया आणि भय यांचीही गोष्ट अशीच. यांचा मनुष्यावर पगडा बसला म्हणजे मोठेपणाचें नांवच घ्यावयास नको !

**९५३ संनिमज्जेज्जगदिदं गम्भीरे कालसागरे ।**
**जरामृत्युमहाग्राहे न कश्चिदवबुध्यते ॥ १२।२८।४४**

जरामृत्युरूपी मोठमोठ्या नक्रांनीं व्याप्त असलेल्या खोल अशा कालसागरांत हें सर्व जग ( एक दिवस ) बुडून जाईल हें कोणाच्याच लक्ष्यांत येत नाहीं !

**९५४ सपत्नसहिते कार्ये कृत्वा संधिं न विश्वसेत् ।**
**अपक्रामेत्ततः शीघ्रं कृतकार्यो विचक्षणः ॥ १२।१४०।१४**

जें कार्य केलें असतां शत्रूचें आणि आपलें सारखेंच हित होईल, त्या कार्यापुरता शत्रूशीं समेट करावा. तथापि त्याजवर विश्वास ठेवूं नये; आणि कार्य झालें म्हणजे सुज्ञ मनुष्यानें लागलेंच शत्रूपासून दूर व्हावें.

**९५५ समत्वं योग उच्यते ॥ ६।२६।४८**

( सुखदुःख, यशापयश इत्यादि द्वंद्वांविषयीं सारखी बुद्धि ठेवणें अशा प्रकारच्या ) समत्वबुद्धीला योग असें म्हणतात.

**९५६ समर्थं वाऽसमर्थं वा कृशं वाप्यकृशं तथा ।**
**रक्षत्येव सुतं माता नान्यः पोष्टा विधानतः ॥ १२।२६६।२९**

समर्थ असो वा असमर्थ असो, कृश असो वा लठ्ठ असो, मुलगा कसाहि असला तरी, आईच त्याचा प्रतिपाळ करते. तसें पोषण करणारा दुसरा कोणी नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९५७ समुच्छ्रये यो यतते स राजन् परमो नयः ॥२।५५।११**

[ दुर्योधन धृतराष्ट्राला म्हणतो ] हे राजा, भाग्योदय करण्याकडे जिची प्रवृत्ति असते तीच नीति श्रेष्ठ होय.

**९५८ संपन्नतरमेवान्नं दरिद्रा भुञ्जते सदा ।**
**क्षुत्स्वादुतां जनयति सा चाढ्येषु सुदुर्लभा ॥ ५।३४।५०**

दरिद्री लोक नेहमींच अतिशय मिष्टान्नभक्षण करीत असतात. कारण भुकेनें तोंडाला चव येत असते. आणि तीतर श्रीमंतांना फारच दुर्लभ.

**९५९ संप्रीतिभोज्यान्यन्नानि आपद्भोज्यानि वा पुनः॥ ५।९१।२५**

प्रेम असल्यास अथवा कांहीं आपत्ति असल्यास एकानें दुसऱ्याकडचें अन्न भक्षण करावें.

**९६० संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ६।२६।३४**

संभावित पुरुषाची अपकीर्ति होणें मरणापेक्षां वाईट.

**९६१ संभोजनं संकथनं संप्रश्नोऽथ समागमः ।**
**एतानि ज्ञातिकार्याणि न विरोधः कदाचन ॥ ५।६४।११**

एकत्र भोजन करणें, एकत्र गप्पागोष्टी करणें, एकमेकांस प्रश्न विचारणें आणि भेट देणें या गोष्टी ज्ञातिबांधवांनीं कराव्या. केव्हांहि परस्परांशीं विरोध करूं नये.

**९६२ सर्वकालं मनुष्येण व्यवसायवता सदा ।**
**पीडाकरममित्राणां यत्स्यात्कर्तव्यमेव तत् ॥ ७।१४३।६८**

ज्या ज्या गोष्टीमुळें शत्रूंना पीडा होईल ती प्रत्येक गोष्ट मनुष्यानें सर्वकाळीं मुद्दाम यत्नपूर्वक केली पाहिजे.

**९६३ सर्वं जिह्मं मृत्युपदमार्जवं ब्रह्मणः पदम् ।**
**एतावाञ्ज्ञानविषयः किं प्रलापः करिष्यति॥१२।७९।२१**

कपटानें युक्त असलेलें सर्व कांहीं मरणाला कारण होतें. सरळपणांत ब्रह्मप्राप्ति आहे. जें काय जाणावयाचें तें एवढेंच. जास्त बोलण्यांत काय अर्थ ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९६४ सर्वतीर्थेषु वा स्नानं सर्वभूतेषु चार्जवम् ।**
**उभे त्वेते समे स्यातामार्जवं वा विशिष्यते ॥ ५।३५।२**

सर्व तीर्थांत स्नान करणें आणि सर्वांशीं निष्कपटानें वागणें या दोहोंची योग्यता सारखीच. कदाचित् निष्कपटपणाच कांकणभर श्रेष्ठ ठरेल.

**९६५ सर्वथा धर्ममूलोऽर्थो धर्मश्चार्थपरिग्रहः ।**
**इतरेतरयोर्नीतौ विद्धि मेघोदधी यथा ॥ ३।३३।२९**

( भीम युधिष्ठिराला म्हणतात. ) अर्थ हा सर्वस्वी धर्ममूलक असून धर्म हा अर्थावर अवलंबून आहे. सारांश, मेघ व समुद्र यांप्रमाणें धर्म व अर्थ हे परस्परांवर अवलंबून आहेत.

**९६६ सर्वथानार्यकर्मैतत्प्रशंसा स्वयमात्मनः ॥ ५।७६।६**

आपली आपण प्रशंसा करणें हें सर्वस्वीं अनार्य माणसाचें काम होय.

**९६७ सर्वथा संहतैरेव दुर्बलैर्बलवानपि ।**
**अमित्रः शक्यते हन्तुं मधुहा भ्रमरैरिव ॥ ३।३३।७०**

पोळ्यांतील मध काढणाऱ्याचा मधमाशा एकजुटीनें [ तुटून पडून ] प्राण घेतात. त्याप्रमाणें सर्वांची पूर्ण एकी असेल तर दुर्बळ लोक देखील बलिष्ठ अशाहि शत्रूला ठार करूं शकतात.

**९६८ सर्वभूतहितः साधुरसाधुर्निर्दयः स्मृतः ॥ ३।२१३।९२**

सर्व भूतांच्या हितासाठीं झटतो तो साधु. आणि निर्दयतेनें वागतो तो असाधु ( दुष्ट ) होय.

**९६९ सर्वभूतेषु सस्नेहो यथात्मनि तथाऽपरे ।**
**ईदृशः पुरुषोत्कर्षो देवि देवत्वमश्नुते ॥ १३।१४४।५८**

( महेश्वर म्हणतात. ) हे देवि, पार्वति, जो सर्व प्राण्यांविषयीं वत्सलता धारण करतो आणि आपल्यासारखेंच सर्व भूतांना मानतो, तो श्रेष्ठ पुरुष देवत्वाला पोंचतो.

**९७० सर्वं प्रियाभ्युपगतं धर्ममाहुर्मनीषिणः ॥ १२।२५९।२५**

ज्या ज्या योगानें दुसऱ्याचें प्रिय होईल ती ती प्रत्येक गोष्ट धर्मच होय असें ज्ञाते लोक सांगतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९७१ सर्वं बलवतां पथ्यं सर्वं बलवतां शुचि ।**
**सर्वं बलवतां धर्मः सर्वं बलवतां स्वकम् ॥ १५।३०।२४**

बलसंपन्न असलेल्यांना सर्व कांहीं हितकर आणि सर्व कांहीं पवित्र आहे. पाहिजे तो त्यांचा धर्म आणि सर्व कांहीं त्यांच्या सत्तेचें !

**९७२ सर्वं बलवतो वशे ॥ १२।१३४।३**

सर्व कांहीं बलवानाच्या हातीं असतें.

**९७३ सर्वस्य जीवलोकस्य राजधर्मः परायणम् । १२।५६।३**

सर्व जीवसृष्टीला राजधर्म हाच मोठा आधार आहे.

**९७४ सर्वस्य हि स्वका प्रज्ञा साधुवादे प्रतिष्ठिता ।**
**परबुद्धिं च निन्दन्ति स्वां प्रशंसन्ति चासकृत् ॥ १०।३।५**

ज्याला त्याला स्वतःची बुद्धि सांगते, ते योग्य, असें ठाम वाटतें. सर्वजण दुसऱ्याच्या बुद्धीची निंदा करितात, आणि स्वतःच्या बुद्धीची वारंवार प्रशंसा करितात.

**९७५ सर्वस्वमपि संत्यज्य कार्यमात्महितं नरैः ॥ १२।१३९।८४**

सर्वस्वाचा त्याग करून सुद्धां मनुष्यांनीं आत्मकल्याण साधावें.

**९७६ सर्वः सर्वं न जानाति सर्वज्ञो नास्ति कश्चन ।**
**नैकत्र परिनिष्ठास्ति ज्ञानस्य पुरुषे क्वचित् ॥ ३।७२।८**

सर्वांनाच सर्व गोष्टींचें ज्ञान नसतें. सर्वज्ञ असा कोणीच नाहीं. कोणाहि एकाच मनुष्याच्या ठिकाणीं सर्व ज्ञान एकवटलेलें नाहीं.

**९७७ सर्वा विद्या राजधर्मेषु युक्ताः**
**सर्वे लोका राजधर्मे प्रविष्टाः ॥ १२।६३।२९**

सर्व विद्यांचा राजधर्माशीं संबंध आहे. आणि सर्व प्रकारचे लोकव्यवहार राजधर्माशीं निगडित झालेले आहेत.

**९७८ सर्वे क्षयान्ता निचयाः पतनान्ताः समुच्छ्रयाः।**
**संयोगा विप्रयोगान्ता मरणान्तं हि जीवितम् ॥१२।२७।३१**

सर्व प्रकारच्या संचयांचा शेवट क्षयांत होत असतो, चढण्याची अखेर पडण्यांत होते, संयोगांचें पर्यवसान वियोगांत आणि जीविताचा अंत मरणांत होत असतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९७९ सर्वेण खलु मर्तव्यं मर्त्यलोके प्रसूयता ।**
**कृतान्तविहिते मार्गे मृतं को जीवयिष्यति॥१२।१५३।१३**

मृत्युलोकांत जन्मास येणाऱ्या प्रत्येकाला खचित मरावयाचें आहे, हा मार्ग कृतांतानें [ यमानें ] ठरविला असल्यामुळें मेलेल्याला जिवंत कोण करणार ?

**९८० सर्वे धर्मा राजधर्मप्रधानाः ॥ १२।६३।२७**

सर्व धर्मांमध्यें राजधर्म हा अग्रगण्य आहे.

**९८१ सर्वे लाभाः साभिमाना इति सत्यवती श्रुतिः।१२।१८०।१०**

सर्व प्रकारच्या लाभाच्या मुळाशीं अहंकारबुद्धि असते, अशी श्रुति आहे ती यथार्थ आहे.

**९८२ सर्वेषां कृतवैराणामविश्वासः सुखोदयः ॥ १२।१३९।२८**

आपणांशीं वैर करणाऱ्या कोणाचाहि विश्वास न धरल्यानें सुख होतें.

**९८३ सर्वो दण्डजितो लोको दुर्लभो हि शुचिर्जनः ।**
**दण्डस्य हि भयाद्भीतो भोगायैव प्रवर्तते॥१२।१५।३४**

सर्व लोक दंडाच्या योगानें वठणीवर येतात. स्वभावतःच शुचिर्भूत असलेला मनुष्य विरळा. खरोखर, दंडाच्या भयानेंच कोणी झाला तरी, आपलें ठरलेलें काम करीत असतो.

**९८४ सर्वोपायैरुपायज्ञो दीनमात्मानमुद्धरेत् ॥ १२।१४१।१००**

चतुर पुरुषानें हरप्रयत्न करून हीन स्थितींतून आपला उद्धार करावा.

**९८५ सर्वो विमृशते जन्तुः कृच्छ्रस्थो धर्मदर्शनम् ।**
**पदस्थः पिहितं द्वारं परलोकस्य पश्यति ॥ ९।३२।५९**

कोणीहि मनुष्य संकटांत सांपडला, म्हणजे मग धर्मशास्त्राचा विचार करूं लागतो. उच्चस्थितींत असतांना त्याला स्वर्गाचें द्वार बंद असलेलेंच दिसतें.

**९८६ सर्वो हि मन्यते लोक आत्मानं बुद्धिमत्तरम् ॥१०।३।४**

प्रत्येक मनुष्य स्वतःला अधिक शहाणा समजतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९८७ सर्वो हि लोको नृपधर्ममूलः ॥ १२।१२०।५६**

सर्व लोकांना राजधर्म हा आधारभूत आहे.

**९८८ सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।**
**सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥६।४२।४८**

[ श्रीकृष्ण सांगतात. ] अर्जुना, स्वभावतः प्राप्त झालेलें कर्म सदोष असलें तरी, त्याचा त्याग करूं नये, कारण, अग्नि जसा धुरानें वेष्टिलेला असतो, तसा प्रत्येक कर्मांत कांहींना कांहीं दोष हा असतोच.

**९८९ सहस्रशक्तिश्च शतं शतशक्तिर्दशापि च ।**
**दद्यादपश्च यः शक्त्या सर्वे तुल्यफलाः स्मृताः १४।९०।९७**

ज्याच्याजवळ एक हजार रुपये आहेत त्यानें शंभर दिले, किंवा ज्याच्यापाशीं शंभर आहेत त्यानें दहा दिले आणि ज्याच्यापाशीं कपर्दिकहि नाहीं त्यानें यथाशक्ति नुसतें ओंजळभर पाणी दिलें, तर या तिघांस सारखेंच फळ मिळतें.

**९९० सहायबन्धना ह्यर्थाः सहायाश्चार्थबन्धनाः ।**
**अन्योन्यबन्धनावेतौ विनान्योन्यं न सिध्यतः ॥५।३७।३८**

द्रव्य साहाय्यकर्त्यांवर अवलंबून असून साहाय्यकर्ते द्रव्यावर अवलंबून असतात. सारांश, परस्परांवर अवलंबून असलेल्या या दोन गोष्टी परस्परांवांचून सिद्ध होत नाहींत.

**९९१ साङ्गोपाङ्गानपि यदि यश्च वेदानधीयते ।**
**वेदवेद्यं न जानीते वेदभारवहो हि सः ॥ १२।३१८।५०**

सर्व अंगें आणि उपांगें यांसहित चारहि वेदांचें ज्यानें अध्ययन केलें, परंतु वेदांनीं जाणावयाचें जें परमात्मतत्त्व तें ज्यानें जाणलें नाहीं, तो केवळ वेदग्रंथाचा भार वाहणारा होय.

**९९२ सा भार्या या प्रियं ब्रूते स पुत्रो यत्र निर्वृतिः ।**
**तन्मित्रं यत्र विश्वासः स देशो यत्र जीव्यते ॥१२।१३९।९६**

जी प्रिय भाषण करते तीच भार्या, जो सुखाला कारण होतो तोच पुत्र, ज्याच्यावर विश्वास ठेवितां येतो तोच मित्र, आणि ज्या ठिकाणीं उपजीविका होते तोच देश.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९९३ साम्याद्धि सख्यं भवति वैषम्यान्नोपपद्यते ॥१।१३१।६७**

कांहींतरी सारखेपणा असेल तेव्हां सख्य होतें; विषमता असेल तर तें शक्य नाहीं.

**९९४ सायं प्रातर्मनुष्याणामशनं वेदनिर्मितम् ।**
**नान्तरा भोजनं दृष्टमुपवासी तथा भवेत् ॥१२।१९३।१०**

मनुष्यांनीं सकाळसंध्याकाळ भोजन करावें, असा नियम वेदानें घालून दिलेला आहे. मध्यंतरीं कांहीं खाऊं नये, अशा रीतीनें जो राहतो तो उपवासीच असतो.

**९९५ साहसोत्पतितानां च निराशानां च जीविते ।**
**न शक्यमग्रतः स्थातुं शक्रेणापि धनंजय ॥ ९।५८।१६**

( श्रीकृष्ण म्हणतात ) हे अर्जुना, जिवावर उदार होऊन साहसानें हल्ला करणाऱ्यांच्या पुढें उभें राहण्याची इंद्राची सुद्धां प्राज्ञा नाहीं.

**९९६ सिंहस्य सततं पार्श्वे सिंह एवानुगो भवेत् ।**
**असिंहः सिंहसहितः सिंहवल्लभते फलम् ॥१२।११९।११**
**यस्तु सिंहः श्वभिः कीर्णः सिंहकर्मफले रतः ।**
**न स सिंहफलं भोक्तुं शक्तः श्वभिरुपासितः॥१२।११९।१२**

सदोदित सिंहाच्या संनिध असणारा त्याचा अनुचर सिंहच बनतो. सिंह ज्याच्या बरोबर आहे तो स्वतः सिंह नसला तरी त्याला सिंहाप्रमाणेंच फल मिळतें, परंतु जो स्वतः सिंह असूनही कुत्र्यांच्या जमावांत राहतो आणि सिंहाप्रमाणें कर्मफल मिळण्याची इच्छा करतो, त्याला कुत्र्यांच्या सहवासांत असेपर्यंत तसें फळ मिळणें शक्य नाहीं.

**९९७ सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽप्रियम् ।**
**प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजितः ॥१२।२५।२६**

सुख असो किंवा दुःख असो, प्रिय असो अथवा अप्रिय असो जें जें म्हणून प्राप्त होईल त्याचा, मनांतून नाउमेद न होतां, स्वीकार करावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९९८ सुखं सुखेनेह न जातु लभ्यं ।**
**दुःखेन साध्वी लभते सुखानि ॥३।२३४।४**

[ द्रौपदी सत्यभामेस सांगते ] इहलोकीं सुखासुखीं सुख लाभणें कधींच शक्य नाहीं. दुःख सोसल्यानेंच साध्वीला सुखप्राप्ति होत असते.

**९९९ सुखं च दुःखं च भवाभवौ च ।**
**लाभालाभौ मरणं जीवितं च ।**
**पर्यायशः सर्वमेते स्पृशन्ति**
**तस्माद्धीरो न च हृष्येन्न शोचेत् ॥ ५।३६।४७**

सुख आणि दुःख, उत्कर्ष आणि ऱ्हास, फायदा आणि तोटा, उत्पत्ति आणि लय हीं क्रमाक्रमानें सर्वांनाच प्राप्त होत असतात. म्हणून शहाण्यानें त्याविषयीं हर्षहि मानूं नये आणि शोक पण करूं नये.

**१००९ सुखं दुःखान्तमालस्यं**
**दाक्ष्यं दुःखं सुखोदयम् ॥ १२।२७।३२**

आळसांत [ प्रारंभीं ] सुख वाटतें पण त्याचा शेवट दुःखांत होतो. तत्परतेनें उद्योग करण्यांत [ प्रथम ] दुःख वाटलें तरी त्यापासून परिणामीं सुख होतें.

**१००१ सुखं निराशः स्वपिति नैराश्यं परमं सुखम्॥१२।१७४।६२**

ज्यानें आशा सोडली त्याला सुखानें झोप येते. निराशेसारखें सुख नाहीं.

**१००२ सुखमेव हि दुःखान्तं कदाचिद्दुःखतः सुखम् ।**
**तस्मादेतद्द्वयं जह्याद्य इच्छेच्छाश्वतं सुखम् ॥१२।२५।२४**

सुखाचा अंत दुःखांतच होतो. उलट केव्हां केव्हां दुःखांतून सुखाचा उदय होतो. म्हणून ज्याला शाश्वत सुख हवें असेल त्यानें या दोहोंचाहि त्याग करावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१००३ सुखं मोक्षसुखं लोके न च मूढोऽवगच्छति ।**
**प्रसक्तः पुत्रपशुषु धनधान्यसमाकुलः ॥ १२।२८८।५**

खरें सुख म्हणजे मोक्षसुख. परंतु मूढ मनुष्याला हें समजत नाहीं. तो जगांत पुत्र, पश्वादि संपत्ति यांतच गुंतून राहतो आणि धन, धान्य इत्यादिकांतच गढून गेलेला असतो.

**१००४ सुखस्यानन्तरं दुःखं दुःखस्यानन्तरं सुखम् ।**
**पर्यायेणोपसर्पन्ते नरं नेमिमरा इव ॥ ३।२६१।४९**

चाकाच्या धावेमध्यें एकामागून एक अरे येत असतात त्याप्रमाणें सुखानंतर दुःख आणि दुःखानंतर सुख आळीपाळीनें मनुष्यांना प्राप्त होत असतें.

**१००५ सुखाद्बहुतरं दुःखं जीविते नास्ति संशयः ।**
**स्निग्धस्य चेन्द्रियार्थेषु मोहान्मरणमप्रियम् ॥ १२।२०५।६**

आयुष्यांत सुखापेक्षां दुःखच पुष्कळ अधिक आहे यांत संशय नाहीं. परंतु मोहानें इंद्रियांच्या विषयाच्या ठिकाणीं आसक्त होऊन राहिल्यामुळें मनुष्याला मरण अप्रिय वाटतें.

**१००६ सुखार्थिनः कुतो विद्या**
**नास्ति विद्यार्थिनः सुखम् ॥५।४०।७**

सुखेच्छु पुरुषाला विद्या कोठून प्राप्त होणार ? आणि विद्येची इच्छा करणाऱ्याला सुख कोठून मिळणार ?

**१००७ सुतेषु राजन्सर्वेषु हीनेष्वभ्यधिका कृपा ॥ ३।९।१९**

[ व्यासमुनि धृतराष्ट्राला म्हणतात ] हे राजा, सर्व मुलांत जे गुणहीन असतील त्यांची ( आईबापांना ) काळजी अधिक.

**१००८ सुपूरा वै कुनदिका सुपूरो मुषिकाञ्जलिः ।**
**सुसन्तोषःकापुरुषः स्वल्पकेनैव तुष्यति ॥ ५।१३३।९**

लहानसा ओढा पाण्यानें तेव्हांच भरून जातो. उंदराची ओंजळ सहज भरते. त्याचप्रमाणें क्षुद्र मनुष्यहि सहज संतुष्ट होत असून त्याचें थोडक्यानेंच समाधान होतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१००९ सुप्रज्ञमपि चेच्छूरमृद्धिर्मोहयते नरम् ॥ ३।१८१।३०**

तीव्र बुद्धीच्या शूर पुरुषाला देखील ऐश्वर्याचा मोह पडत असतो.

**१०१० सुप्रणीतो बलौघो हि कुरुते कार्यमुत्तमम् ।**
**अन्धं बलं जडं प्राहुः प्रणेतव्यं विचक्षणैः ॥२।२०।१६**

शक्तीचा ओघ कुशलतेनें वळविला म्हणजे त्याच्याकडून उत्तम प्रकारचें कार्य होतें. बळ हें अंधळें असून जड ( म्हणजे अचेतन ) आहे. त्याचा शहाण्यानें [ इष्टकार्याकडे ] उपयोग करून घेतला पाहिजे.

**१०११ सुप्राकृतोऽपि पुरुषः सर्वः स्त्रीजनसंसदि ।**
**स्तौति गर्वायते चापि स्वमात्मानं न संशयः॥१२।२८४।२७**

कोणीहि अगदीं सामान्य प्रतीचा सुद्धां पुरुष स्त्रीजनांच्या समुदायांत आपली आपणच स्तुति करून प्रौढी मिरवतो यांत संशय नाहीं.

**१०१२ सुबद्धस्यापि भारस्य पूर्वबन्धः श्लथायते॥१।२२१।१७**

[ अर्जुनसुभद्राविवाहानंतर आपल्या नव्या सवतीला उद्देशून द्रौपदी अर्जुनाला म्हणते. ] ओझें एकदां घट्ट बांधलें असलें, तथापि त्यास जर पुनः दुसरी दोरी बांधिली, तर पहिली दोरी सैल पडावयाचीच !

**१०१३ सुमन्त्रिते सुविक्रान्ते सुकृते सुविचारिते ।**
**सिध्यन्त्यर्था महाबाहो दैवं चात्र प्रदक्षिणम् ॥ ३।३६।७**

[ युधिष्ठिर भीमसेनाला म्हणतो ] हे महाबाहो, चांगल्या तऱ्हेची सल्लामसलत, चांगल्या तऱ्हेचा पराक्रम, चांगल्या तऱ्हेचा विचार आणि चांगल्या तऱ्हेचें कर्तृत्व यांच्या योगानें मनोरथ सिद्धीस जातात; परंतु या ठिकाणीं दैवाचीहि अनुकूलता असावी लागते.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१०१४ सुलभाः पुरुषा राजन्सततं प्रियवादिनः ।**
**अप्रियस्य तु पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः॥५।३७।१५**

[ विदुर धृतराष्ट्राला म्हणतो. ] हे राजा, सतत प्रिय भाषण करणारे पुष्कळ आढळतात; परंतु अप्रिय असलें तरी हितकर असेल तेंच सांगणारा विरळा, आणि ऐकणारा त्याहूनहि विरळा.

**१०१५ सूक्ष्मा गतिर्हि धर्मस्य दुर्ज्ञेया ह्यकृतात्मभिः १३।१०।६८**

धर्माचें स्वरूप अत्यंत सूक्ष्म असून मनोजय ज्यांनीं केलेला नाहीं त्यांस तें समजणें कठिण.

**१०१६ सेनापतौ यशो गन्ता न तु योधान्कथंचन॥५।१६८।२८**

यशाचें श्रेय नेहमीं सेनापतीला मिळणार, सैनिकांना कधींच नाहीं.

**१०१७ सोपानभूतं स्वर्गस्य मानुष्यं प्राप्य दुर्लभम् ।**
**तथात्मानं समादध्याद्भ्रश्यते न पुनर्यथा॥१२।३२१।८०**

स्वर्गास जाण्याचा [ जणूं ] जिनाच अशा मनुष्यजन्माला येऊन परमात्म्याकडे असें ध्यान लावावें कीं, जेणेंकरून स्थानभ्रष्ट होण्याचा प्रसंग पुनश्च येणार नाहीं.

**१०१८ सौहृदान्यपि जीर्यन्ते कालेन परिजीर्यतः ॥ १।१३१।६**

कालांतरानें मनुष्य जीर्ण होतो तसा स्नेह सुद्धां कमी होत असतो.

**१०१९ स्थापयेदेव मर्यादां जनचित्तप्रसादिनीम् ।**
**अल्पेऽप्यर्थे च मर्यादा लोके भवति पूजिता १२।१३३।१३**

लोकांचीं अंतःकरणें प्रसन्न राहतील अशाच प्रकारचे नियम केले पाहिजेत. लहानसहान गोष्टींतसुद्धां नियम असलेला लोकांना मान्य होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१०२० स्तेयं कुर्वंश्च गुर्वर्थमापत्सु न निषिध्यते ।**
**बहुशः कामकारेण न चेद्यः संप्रवर्तते ॥ १२।३४।२३**

आपत्कालीं गुरुदक्षिणा देण्यासाठीं चोरी करणें हें निषिद्ध नाहीं. मात्र मनुष्यानें बुद्धिपूर्वक अनेकवार तसें करण्यास प्रवृत्त होऊं नये.

**१०२१ स्त्रियो यत्र च पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ॥ १३।४६।५**

जेथें स्त्रियांचा गौरव होतो तेथें देवता रममाण होतात.

**१०२२ स्वबाहुबलमाश्रित्य योऽभ्युज्जीवति मानवः ।**
**स लोके लभते कीर्तिं परत्र च शुभां गतिम् ॥ ५।१३३।४५**

आपल्या बाहुबळाचा आश्रय करून जो मनुष्य आत्मोद्धार करून घेतो, त्याची इहलोकीं कीर्ति होऊन त्याला परलोकीं उत्तम गति मिळते.

**१०२३ स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥६।४२।१७**

स्वभावतः ठरलेलें कर्म करण्यांत पाप लागत नाहीं.

**१०२४ स्वमांसं परमांसेन यो वर्धयितुमिच्छति ।**
**नास्ति क्षुद्रतरस्तस्मात्स नृशंसतरो नरः ॥ १३।११६।११**

दुसऱ्याचें मांस भक्षण करून आपलें मांस वाढविण्याची जो इच्छा करतो, त्याच्यासारखा नीच कोणी नाहीं. तो मनुष्य अत्यंत दुष्ट होय.

**१०२५ स्वयमुत्पद्यते जन्तुः स्वयमेव विवर्धते ।**
**सुखदुःखे तथा मृत्युं स्वयमेवाधिगच्छति ॥ १२।२८८।१६**

प्राणी स्वतःच जन्म घेतो, स्वतःच वाढतो. तसेंच सुखदुःखें आणि मृत्यु त्याला स्वतःलाच प्राप्त होत असतात.

**१०२६ स्वयं प्राप्ते परिभवो भवतीति विनिश्चयः ॥ १३।८२।१४**

[ दुसऱ्यानें न बोलावितां ] आपण होऊन जर कोणी दुसऱ्याकडे गेलें तर त्याचा अपमान होतो, हें अगदीं निश्चित होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१०२७ स्ववीर्यं यः समाश्रित्य समाह्वयति वै परान् ।**
**अभीतो युध्यते शत्रून् स वै पुरुष उच्यते ॥५।१६३।२**

स्वतःच्या सामर्थ्याचा आश्रय करून जो शत्रूंना युद्धाला आव्हान करतो आणि न भितां लढतो तोच खरा पुरुष म्हणावयाचा.

**१०२८ स्वार्थे सर्वे विमुह्यन्ति येऽपि धर्मविदो जनाः ॥ ४।५१।४**

स्वार्थाचा मोह सर्वांना—जे धर्म जाणणारे त्यांनासुद्धां—पडत असतो.

**१०२९ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः॥ ६।४२।४५**

आपआपलें कर्तव्य आनंदानें करीत राहिल्यानें मनुष्यास परमसिद्धि प्राप्त होते.

**१०३० हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।**
**तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ६।२६।३७**

[ श्रीकृष्ण सांगतात ] अर्जुना, तुला जर युद्धांत मरण आलें तर स्वर्ग मिळेल, आणि तुझा जय झाला तर साऱ्या पृथ्वीचें राज्य तूं भोगशील. यासाठीं, हे कुंतीपुत्रा, युद्धाचा निश्चय करून ऊठ.

**१०३१ हर्षो योधगणस्यैको जयलक्षणमुच्यते ॥ ६।३।७५**

सर्व सैनिकांना लढण्याचा हुरूप वाटणें हेंच जय मिळण्याचें मुख्य लक्षण होय.

**१०३२ हितं यत्सर्वभूतानामात्मनश्च सुखावहम् ।**
**तत्कुर्यादीश्वरे ह्येतन्मूलं सर्वार्थसिद्धये ॥ ५।३७।४०**

सर्व भूतांना जें हितकर आणि स्वतःलाहि सुखावह तेंच ईश्वरार्पणबुद्धीनें करीत असावें. कारण, हेंच सर्व गोष्टी सिद्धीस जाण्याचें मूळ आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीमहाभारतसुभाषितानि

## विषयसूची


विषयः क्रमाङ्कः

अज्ञानम् १२ । २१२

अद्रोहः २३ । २४ । ६४ । ३६०

अधनः २५—२८ । ३८४ । ३९० । ३९१ । ४४६ ।
५१७ । ५७२ । ९२६ ( दरिद्रः )

अधर्मः ३० । ३१ । ३९३ । ४०४ । ५१८ । ५१९ । ७१२ ।
७४६ । ८१४ । ९३६

अनर्थः ४८८ । ५०९ । ६९३

अनार्यः ३९ । ३३२ । ८०४ । ९६६

अनिर्वेदः ४३ । ४४ ( उत्साहः )

अनृतम् ५० । ५४४ । ५८६ । ७१२ । ८६८ । ९३६

अन्नम् ३२६ । ६२२ । ९५९

अपण्डितः ८७३ ( मूढः मूर्खः )

अभिमानः २३५ । ३३२ । ५३३

अमर्षः ७६ । ११३ । २२१ । ३०२ । ५२७


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



अमित्रः ७७ । ७८ । ७९ । ८५१ । ९६२ । ९६७
( अरिः परिपन्थी रिपुः शत्रुः सपत्नः )

अराजकम् ८५ । ६२७

अरिः ८६ । १०१ । १६३ । ५६४ । ५९७ । ६०४ । ८१६
( अमित्रः परिपन्थी रिपुः शत्रुः सपत्नः )

अर्थः २८ । ३८ । ८७—९८ । ३७४ । ४०१ । ४०६
४११—४१४ । ४५८ । ४७१ । ५०४ । ५२१ । ५५३
७०४ । ७८१ । ७९९ । ८५८ । ९१० । ९९०

अवमानः ४६ । ६९ । ८० । ३१६ । ३८९ । ४५१ । ४९८
५९२ । ७४५

अविश्वासः १०४ । २१६ । ८४६ । ९४२ । ९८२

अश्रद्धा १० । ११४

असंतोषः १२४

असाधुः १२९ । ९६८

अहिंसा १३५—१३९ । ४८७ । ७२७

आचारः १४३ । ४०७ । ७५८ । ७५९

आततायी ३४२ । ५१९

आत्मा १४४—१५४ । १९३ । ३९२ । ४५१ । ५०१ ।
५९० । ५९२ । ६१६ । ६५६ । ६८२ । ७८९ । ८१२

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



आपद् १५९—१६१ । ४९० । ५२५
आयुः ३७ । ७३ । १४३ । ३४७ । ४९७
आरोग्यम् ३९४ । ६७०
आर्यः १६४ । ८४१ । ८८१ । ९२८
आलस्यम् १६५ । ९३५ । १०००
आशा १६६ । १६७ । ३३२ । ६०९ ( इच्छा तृष्णा )
आश्चर्यम् १३४ । १६९
इच्छा ५४७ ( आशा तृष्णा )
इन्द्रियम् ९३ । १७५—१७९ । २१८ । २४२ । ३९२ । ५२० । ५६९ । ६१६ । ६७५ । ७४७ । ८२१ । ९१० । ९२०
ईश्वरः १८४ । १०३२
उत्थानम् १८६—१८८ । ५०३
( उद्यमः पुरुषकारः यत्नः व्यवसायः )
उत्साहः १९१ ( अनिर्वेदः )
उद्यमः १९४ ( उत्थानम् पुरुषकारः यत्नः व्यवसायः )
ऐश्वर्यम् ९३ । २२३
ओजः ६५२ । ७८२

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



कर्म ६ । ६० । ७२ । १०७ । १८० । २२४ । २३७ । २३८ । २६७ । ४८६ । ५३० । ७०८ । ७१७ । ७१९ । ७२२ । ७३५ । ७४१ । ७४९ । ८०० । ८०९ । ८९८ । ९०९

कामः २४२ । २४४ । ३३२ । ३५९ । ४०१ । ४०३ । ४११—४१४ । ४४० । ४५८ । ४६२ । ५०४ । ६४८ । ७०५ । ७९९ । ८१० । ८९०

कालः—१ । ८१ । १३२ । २४९—२६२ । ३७८ । ३८१ । ४२६ । ४३१ । ४६५ । ४७९ । ५०६ । ५१३ । ५१६ । ५८३ । ६२१ । ६२३ । ६८९ । ६९९ । ७३३ । ८११ । ८५१ । ८६९ । ८८४ । ९५३

कीर्तिः ७३ । २६८ । २६९ । ५१० । ६६५ । ७९३

कृतघ्नः २७० । २८६ । ६४७

कृतज्ञः २२० । २७५

कृपा ७८ । ६१८ । १००७ ( दया )

कोशः २५ । ७० । ४३४

क्रोधः ३५९ । ४७४ । ४७९ । ६१५ । ७८५ । ८९० । ९३५

क्लीबः १९२ । २१३ । २८७ । ४५२ । ५३३ । ५५७ ( नपुंसकम् षण्ढः )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



क्षत्रियः २९ । २९०—२९७ । ३०३ । ३६२ । ४२१ । ४६० । ४६८ । ६३० । ६३१ । ६३२ । ६४३ । ६४४ । ६४६ । ८११ । ८१९ । ८२० । ८४४ । ८५५ । ८५८ । ८७७

क्षमा २०७ । २९८—३०२ । ४७५ । ६७८ । ७८५

गुरुः ३१३—३१७ । ३६१ । ५९५ । ८९७

गृहस्थाश्रमः १७० । ३१९ । ७२३ । ७२८

गृहिणी ४३५ ( दयिता नारी पत्नी भार्या स्त्री )

जननी ५९३ ( माता )

जयः ६६२ । ७०७ । ७१३ । ७५० । ८६० । १०३१

जरा ३३१ । ३३२ । ४२८ । ६८२ । ८५२

जीवितम् २५८ । २८३ । ३३९ । ३८८ । ३९० । ४८७ । ५१३ । ६३६ । ७३० । ७६३ । ७७४ । ७९३ । ८०० । ८८९ । ९०२ । ९७८ । ९९५ । १००५

ज्ञातिः ५९ । ३४० । ४२४ । ७४४ । ८५९ । ९२४ । ९६१

ज्ञानम् ६३ । १२८ । १४२ । २१८ । ३१५ । ३४१ । ३४५ । ४८५ । ५२३ । ८८२ । ९२० । ९६३ । ९७६ ( विद्या )

तपः १७९ । ३४६—३५१ । ३७४ । ३७६ । ३८८ । ५२० । ५२४ । ५४२ । ६४८ । ६४९ । ६७५ । ७५५ । ८१७ । ८६२ । ८८२ । ९२९

तुष्टिः ३९४ ( संतोषः )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




तृप्तिः ४४९

तृष्णा ३३८ । ४४९ । ७०५ । ७८७ ( आशा इच्छा )

तेजः ४७५ । ७६० । ८११ । ८१९

दक्षः ६६५ । ८८९.

दण्डः ९८ । ३६२—३६६ । ४६६ । ५५२ । ६३० । ७६८ ।
८२६ । ८७६ । ९८३

दया ३६८ । ४८९ ( कृपा )

दयिता ८७८ ( गृहिणी नारी पत्नी भार्या स्त्री )

दरिद्रः ७४ । १८३ । ३८३ । ४५२ । ६२५ । ६९६ ।
९५८ ( अधनः )

दाक्ष्यम् ३७० । ३९४ । ४२६ । ५५३ । १०००

दानम् २३ । ३५ । २३१ । ३६० । ३६७ । ३७०—३७४ ।
३८१ । ३८८ । ५८३ । ५८६ । ६५२ । ७११ ।
७२१ । ७७४ । ८९१ । ९०७ । ९१२

दुःखम् ५१ । ११२ । १४४ । ३८९ । ४४३ । ४५९ ।
५१३ । ५२१ । ५३२ । ५४२ । ६०५ । ६१६ ।
६६९ । ६७६ । ६८२ । ६९३ । ७५१ । ७५७ ।
७६२ । ८०८ । ९०९ । ९९९ । १००४ । १००५

दुर्जनः १८ । ५६


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



दुर्बलः ४८७ । ८२६ । ८४६ । ८८४ । ८९२
देशः ३७८ । ४२६ । ५१६ । ९३६ । ९९२
देहः ६४८ । ७२० ( शरीरम् )
दैवम् ३ । ११८ । १३० । १९२ । ३०६ । ४८६ । ५०३ ।
७१० । ७२५ । ८७४ । १०१३
द्विजः ६३१ । ६३२ । ८१७ । ९१४ ( ब्राह्मणः विप्रः )
धनम् २५ । १६० । १८३ । ३६७ । ३८३ । ३८८—३९४ ।
३९८ । ४०३ । ४२६ । ४६१ । ४६४ । ५१७ ।
५३२ । ५८६ । ६३१ । ६७१ । ७५० । ७९९ । ८२७ ।
८६२ । ८६३ । ८६८ । ८८१ । ९०२ ( वित्तम् श्रीः )
धर्मः ६ । १५ । २१ । २४ । ३० । ३१ । ५८ । ६८ । ८९ ।
१३५ । १३७ । १३९ । १४३ । १५८ । १७२ ।
१९९ । २०३ । २४७ । २८३ । ३२९ । ३५३ ।
३६५ । ३७० । ३९० । ३९१ । ३९२ । ३९५—४२२ ।
४२५ । ४४५ । ४५५ । ४५७ । ४५८ ।
४७१ । ४८० । ४८१ । ५०४ । ५०७ । ५१७ ।
५४० । ५५५ । ५६४ । ५७९ । ६११ । ६३४ ।
६४५ । ६६२ । ६७५ । ७०७ । ७११ । ७१२ ।
७१६ । ७२१ । ७३० । ७३१ । ७३५ । ७३८ ।
७४६ । ७४८ । ७६९ । ७७१ । ७७५ । ७८२ ।

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७९९ । ८०७ । ८१० । ८२४ । ८२९ । ८३३ ।
८३८ । ८४४ । ८४९ । ९०० । ९०१ । ९१० ।
९३० । ९३६ । ९४३ । ९४८ । ९६५ । १०१५

धृतिः ४२६ । ६६५ । ६७०

नगरम् ८८२ । ८८७

नपुंसकम् ८७७ ( क्लीबः षण्ढः )

नयः ६०९ । ६४१ । ९५७ ( नीतिः )

नरकः १७८ । ३५९ । ४३९ । ५९८ ( निरयः )

नारी १०३ । ५७३ । ५८४ ( गृहिणी दयिता पत्नी भार्या स्त्री )

निन्दा २७४ । ६१९ । ६२४

निरयः ४ । ९०८ ( नरकः )

निर्मन्युः ४६० । ५५७

नीतिः ३६३ । ४९० । ७१३ ( नयः )

पण्डितः ८६ । ८७ । २२८ । ३०४ । ३८६ । ३९९ । ५२५ ।
५६० । ५६१ । ५६४ । ५७० । ५७१ । ६१२ । ६१४ ।
६३७ । ७७३ । ७७५ । ७७७ । ७८१ । ८५४ । ९१७ ।
९२८ । ९३१

पतिः ५७३ । ५८१ । ६५३ ( भर्ता )

पतितः ५७२ । ५९१ । ८०४ । ९२३

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



पत्नी ६५३ ( गृहिणी दयिता नारी भार्या स्त्री )
परधर्मः ९३०
परिपन्थी १५५ ( अमित्रः अरिः रिपुः शत्रुः सपत्नः )
पापम् १२५ । २०८ । ४४७ । ५१२ । ५४८ । ५८५ । ५८६ । ६२७ । ६६३ । ६९७ । ७४९ । ८१२ । ८४३ । ९०६ । ९०९
पिता ६१ । ५८७ । ५८८ । ५९१ । ५९५ । ६८२
पुत्रः १४८ । ५८७ । ५८८ । ५९० । ५९१ । ५९३—५९६ । ५९८ । ६०७ । ६८२ । ७४९ । ८७० । ९९२
पुमान् २८४ । ३०२ । ७७९ । ७८१ । ९२९ ( पुरुषः )
पुरुषः ११३ । २२० । २२१ । २८० । २८८ । ५२७ । ५७५ । ६१० । ७८५ । ९२५ । १०२७ ( पुमान् )
पुरुषकारः ३०६ । ७२५ ( उत्थानम् उद्यमः यत्नःव्यवसायः )
पौरुषम् १४६ । १९४ । ७४१ । ८७४
प्रजा ५१० । ६५६ । ७५९ । ८२३ । ८२४ । ८३१
प्रज्ञा ५३२ । ५६९ । ५९९ । ६०५ । ६०६ । ७४७ । ७७६ । ९२८
प्राज्ञः ४६४ । ४९० । ६२० । ६२१ । ७१४
प्राणः ९२ । २०० । ३३२ । ४८९ । ६२२ । ७८७ । ७९७ । ८६५ । ८६८

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



प्रार्थना १९० । ६२६ ( याचना )

प्रियम् २४६ । ३८६ । ४८९ । ५०१ । ५०८ । ५९१ । ६१८ । ६८५ । ७५७ । ७८० । १०१४

प्रीतिः ६६० । ७६१ । ८५८ । ९४१

फलम् ४४ । २३७ । २३८ । २८१ । ५८० । ५८३ । ६३८ । ७२६ । ७४९ । ७८८ । ८०२ । ९०३ । ९९६

बन्धः १४२ । ३७९

बन्धुः १९३ । ४१८ । ५४० । ५६३ । ५७३ । ७०३ । ९०२ ( बान्धवः )

बलम् १५ । २५ । ७० । ७३ । २९७ । ३९२ । ४०८ । ४२५ । ४३१ । ४८७ । ६३०—६३६ । ६८० । ६८९ । ७८२ । ७९७ । ८२६ । ८४६ । ८४९ । ८८४ । ८९२ । ९२३ । ९७१ । ९७२ । १०१०

बान्धवः ५८१ । ६८२ । ७०८ । ७८१ ( बन्धुः )

बालः ९४ । ६०५ । ६११ । ६३८ । ७१५ । ७८६ । ९३२

बुद्धिः २०५ । २१४ । ४१७ । ४२६ । ४३० । ४५४ । ४६४ । ४६५ । ४९० । ५०९ । ५५३ । ५७१ । ५९९ । ६०९ । ६३९—६४१ । ७७२ । ७७७ । ७९६ । ७९७ । ८०६ । ८२१ । ८५० । ८८३ । ८८५ । ८९९ । ९३३ । ९८६ ( मतिः )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



ब्रह्म ३८७ । ७४८ । ९६३
ब्रह्मचर्यम् ३८८ । ६४५ । ७४८ । ८६४
ब्रह्मचारी २४२ । ४६६
ब्राह्मणः २९१ । ४६८ । ५८१ । ६४३ । ६४४ ।
६४६—६४८ । ६६६ । ८५५ ( द्विजः विप्रः )
ब्राह्मण्यम् २९० । ३४६ । ६४९
भयम् १०६ । १६२ । ४५६ । ४६९ । ४७४ । ६५२ ।
६६१ । ८२३ । ८२४ । ८४८ । ८७१ । ९१७ । ९३५
भर्ता ५८७ । ६१५ । ९०१ ( पतिः )
भार्या ९९ । १४८ । ५२८ । ५३९ । ५४० । ५९० ।
६५६—६५८ । ६८२ । ७६१ । ७७८ । ८२७ ।
९०१ । ९९२ ( गृहिणी दयिता नारी पत्नी स्त्री )
भाषणम् २३३ । ७८९ । ८५३ ( वचनम् )
भूतिः १३ । १९१ । ४५१ । ५९५ । ६६५ । ७०६ ।
७१३ । ९२१ । ९३५
भूमिपः १३३ । ८७७ ( राजा )
भेदः ४७२ । ६५२ । ६५९ । ६६० । ६६८
मतिः ५४ । ५५ । ४१८ । ५३१ । ७२६ ( बुद्धिः )
मनः ११९ । ३२२ । ४१७ । ५८३ । ६७४—६७६
८५२ । ८९९

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



मन्त्रः २०४ । ५५० । ५८१ । ६३१ । ७७३ । ८३५ । ८६०

ममत्वम् २० । ३३ । २६३ । ८७६

मरणम् ४५ । ३३४ । ५१३ । ७०१ । ७३० । ७८४ ।
८२३ । १००५ ( मृत्युः )

महत् ३४९ । ४८१ । ५५६ । ६८१ । ७७९ । ८३४

महाभारतम् ११ । ११७ । ४१४ । ६७९ । ७३६

माता ३४३ । ३७४ । ५४१ । ५९१ । ६८२ । ६८४ ।
७२२ । ७२८ । ९५६ ( जननी )

मानः ४७० । ६८५ । ७४५ । ८०१

मानुष्यम् १४१ । ३२३ । ८१० । १०१७

माया ६३७ । ६८६ । ६८७ । ७७१

मित्रम् १६३ । २५५ । २७५ । २८९ । ३७३ । ४२९ । ५३८ ।
६८९ । ७०३ । ७६७ । ७७४ । ७८१ । ८१५ ।
८९३ । ८९६ । ९३१ । ९९२ ( वयस्यः सखा सुहृद् )

मुनिः ७०० । ९०५

मूढः ४० । ११५ । ५७६ । ७१६ । ७९६ । ९१७ । ९३९ ।
१००३ ( अपण्डितः मूर्खः )

मूर्खः ४६५ । ४६७ । ५७० । ६२१ । ६३७ । ६९१
( अपण्डितः मूढः )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



मूलम् ४६९ । ६४३ । ६७६ । ६९२ । ७६२ । ८२३ । ८३५ । ८६० । ८९४ । ८९५

मृतः ३९० । ६९३--६९६ । ७४५ । ९७९

मृत्युः १३१ । २८३ । ३३१ । ३३५ । ३८७ । ४२८ । ७३५ । ९३४ । ९६३ ( मरणम् )

मृदुः २५३ । २५७ । ६९७--६९९ । ८३४

मेधावी ३८६ । ५२३ । ९१०

मोक्षः १४२ । ३७९ । ४१४ । १००३

यत्नः ७१० । ८७९ ( उत्थानम् उद्यमः पुरुषकारः व्यवसायः )

यशः ७३ । ३४७ । ३७० । ३७४ । ५१९ । ५६४ । ५८८ । १०१६

याचना ७०१ ( प्रार्थना )

युगम् ३६३ । ५७९ । ८२५ । ८३०

युद्धम् ८४४ । ८९१ । १०३०

योगः ३४ । ३१५ । ६०४ । ७१३ । ८०९ । ८२३ । ९४८ । ९५५

योगी १५४

रक्षणम् ४५४ । ५१४ । ५९१ । ६५३ । ६५६ । ८२० । ८२८ । ९०१



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



राजा ८२ । ८३ । १२१ । १६८ । २६१ । २६४ । २६६ । २७१ । ३१३ । ३२८ । ३३३ । ३६३ । ४१० । ४१६ । ४२३ । ५०३ । ५३५ । ५४९ । ५८१ । ५९६ । ६२७ । ६५४ । ६६६ । ७२४ । ७३१ । ७५२ । ७५९ । ७७० । ७९१ । ७९५ । ८२३--८३३ । ८३६ । ८३९ । ८४० । ९७३ । ९७७ । ९८० । ९८७ ( भूमिपः )

राज्यम् ७० । ४१५ । ४३८ । ५४६ । ६७७ । ७५० । ७९२ । ८३४ । ८३५

राष्ट्रम् १९८ । २०५ । २०६ । ३३३ । ४२३ । ६७२ । ८३६

रिपुः २२ । १८९ । १९३ । २५५ । २८९ । ४२९ । ५३८ । ५९५ । ६२३ ( अमित्रः अरिः परिपन्थी शत्रुः सपत्नः )

रोगः ६९५ । ७८७

लाभः ४३ । १७१ । ३९४ । ६०६ । ६८४ । ७१७

लोकः ९२ । २४७ । ४६४ । ५३३ । ५९१ । ६५७ । ७०२ । ७५८ । ८२४ । ८२७ । ८२८ । ८३८-८४१ । ९८६ । ९८७

लोभः ३५९ । ५२० । ५८५ । ६५० । ६७३ । ८४२ । ८४३

वक्ता १०१४

वचनम् ६९ ( भाषणम् )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



वधः १३१ । २७४ । ३१६ । ४४१ । ४७४ । ४८८ ।
५६७ । ६८७ । ७३२ । ८०७ । ८४५ । ८४६ ।
८६५ । ९२६
वनम् ५५८ । ६४४ । ८३७
वयस्यः ६८२ ( मित्रम् सखा सुहृद् )
वाक् ७५ । १८६ । २३४ । ४६८ । ६१४ । ६३२ । ६९१ ।
८३७ । ८५२—८५६
विक्रमः ३७८ । ५६२ । ८१९ । ८५८ । ९२९
विज्ञानम् ६०५ । ७२९
वित्तम् ५१० । ६२७ । ७३९ । ७६४ । ८७९ ( धनम् श्रीः )
विद्या १११ । २२७ । २५४ । ३७४ । ५२० । ५४२ ।
७२६ । ८०५ । ८१७ । ८६२—८६४ । ८८१ ।
९१८ । ९४८ ( ज्ञानम् )
विद्यार्थी १६५ । १००६
विद्वान् ४५२
विनाशः ५७९ । ६४१ । ६५९ । ८२९ । ९०० । ९१५
विप्रः ८६८ । ८८२ ( द्विजः ब्राह्मणः )
विश्वासः ७ । ४२ । २१५ । २१६ । २७७ । ३१० । ४६९ ।
५५१ । ५५९ । ५७१ । ७८३ । ८१६ । ८४६ ।
८६९—८७१ । ९३८ । ९९२

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



वृत्तम् १५७ । २३२ । २७३ । ४०८ । ४३२ । ७७९ । ८४० । ८७९ । ८८१ । ८८२ । ९०३ । ९१४ । ९४८

वृद्धः ७३ । २२५ । ४७१ । ४८० । ६३८ । ६३९ । ८१७ । ९२७ । ९३२ ( स्थविरः )

वृद्धिः ४२६ । ४७८ । ७६७

वैरम् २७७ । ४९१—४९३

व्यवसायः ८६२ । ८८६ ( उत्थानम् उद्यमः पुरुषकारः यत्नः )

व्यसनम् ५६४ । ५७० । ६२४ । ६७०

व्याधिः ८२३ । ८४८ । ८९४

शत्रुः १४५ । २११ । २१२ । २५७ । ४३७ । ४४२ । ४७३ । ४७४ । ५१९ । ५३२ । ५४३ । ६०१ । ६३६ । ६४४ । ६८२ । ६८९ । ७०९ । ७५४ । ७७४ । ८१८ । ८४५ । ८४६ । ८४८ । ८९२—८९७ । ९३१ ( अमित्रः अरिः परिपन्थी रिपुः सपत्नः )

शमः ६०२ । ७३४ ( शान्तिः )

शरीरम् ६७० । ६९४ । ७०४ । ७३५ । ७३७ । ८०२ । ८२१ । ८५७ । ८९० । ९०० ( देहः )

शान्तिः ३१५ । ५२० । ९२० ( शमः )

शास्ता ३१३

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




**शास्त्रम्** २१९ । ३५४ । ४६५ । ५७० । ६७१ । ७१७ । ७२९ । ७६५ । ७७६ । ८०५ । ८०६ । ९३२

**शीलम्** १९ । २३ । ३३२ । ३३६ । ३७० । ४०८ । ९०२—९०४

**शुचिः** ५६५ । ९०५ । ९८३

**शुभम्** ६२० । ६२१ । ६३८ । ६९१ । ७०८ । ९०६—९०९

**शूरः** २११ । ३२६ । ४५२ । ६५२ । ७११ । ९११ । ९१२

**शोकः** ५२५ । ६१८ । ६७३ । ७०९ । ७६२ । ९१५–९१७ । ९९९

**शौचम्** ८ । १७ । ४३४

**शौर्यम्** ४२६ । ४९४

**श्रद्धा** १० । ११४ । ३८१ । ४५३ । ४५७ । ५६१ । ९१८—९२०

**श्रीः** ३२ । ४३ । ४६ । ७० । १२४ । १३१ । १६१ । १८५ । १९६ । ४०८ । ४१५ । ४४६ । ५११ । ६२५ । ६६५ । ६७० । ७१३ । ७६० । ७८४ । ८८४ । ९२१—९२६ । ९२९ ( धनम् वित्तम् )

**श्रुतम्** २३२ । ३४६ । ३९२ । ३९४ । ४७१ । ४७६ । ७६४ । ९०३ । ९१४ । ९२७—९२९


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



श्रेयः १६ । ४९ । ३९४ । ४२१ । ४७५ । ५६२ । ६०३ । ६०६ । ६२८ । ६७० । ६९० । ७३० । ७५३ । ९३०
श्रेष्ठः ६४० । ७५८ । ९३१
श्रोता १०१४
षण्ढः ६१५ । ८८४ ( क्लीबः नपुंसकम् )
संयमः ४२६ । ५५३ । ७९८ । ८५३ । ९२०
संयोगः ९३७ । ९७८
संशयः १० । ४७७ । ८०४
सखा ४५२ । ४९९ । ५३५ । ५९० । ५९५ ( मित्रम् वयस्यः सुहृद् )
सख्यम् ३५६ । ४३३ । ४७९ । ७६४ । ९४१ । ९९३ ( संगतम् सौहृदम् )
संगतम् १६८ ( सख्यम् सौहृदम् )
सङ्गः ६६८ । ६८०
सत्त्वम् ४८७ । ७३१ । ७३४ । ७६० । ८२१ । ८७४
सत्यम् ६४ । ११६ । ३६० । ३७० । ३७४ । ४०८ । ४८० । ५४२ । ५४४ । ६८७ । ७१२ । ७५६ । ९४४—९४९
सधनः ६२१
सन् २४३ । ३११ । ३५५ । ४३९ । ५४९ । ७४४ । ८६३ । ९०१ । ९५०

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



संतोषः १२४ । ९५२ ( तुष्टिः )
संधिः ८६ । २५५ । ८१६
संन्यासः २४५ । ७५२
सपत्नः ७५४ । ७८४ । ९५४
( अमित्रः अरिः परिपन्थी रिपुः शत्रुः )
सभा १२६ । ४८० । ७१२
समत्वम् ९५५
समर्थः ५८ । २३६ । ७३५
सहायः २०३ । ५४० । ६५७ । ६९२ । ८८६ । ९९०
साधुः ६२ । ३८६ । ५१५ । ७७१ । ९६८
सामर्थ्यम् ७९ । ५३१ । ६०५
सिद्धिः ४६३ । ४८६ । ७५२ । ७५३ । ७६५
सुखम् १० । ५१ । ६५ । ९१ । १३० । १४४ । २५२ । ३७० । ३९४ । ४१९ । ४५९ । ४७२ । ५१३ । ५३२ । ५४२ । ५९४ । ६०९ । ६४८ । ६७० । ६८१ । ६८२ । ७०५ । ७१६ । ७५१ । ७५७ । ७६५ । ७६६ । ७८७ । ७९६ । ८४७ । ९८९ । ९०९ । ९८२ । ९९७—१००६
सुखी १३८ । ६१६ । ८४२ । ८९०
सुहृद् ४२९ । ५३२ । ५६३ । ८६१ ( मित्रम् वयस्यः सखा )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



सौहृदम् ७८६ । १०१८ ( संगतम् सख्यम् )
स्त्री २३९ । ३०२ । ४१८ । ५८१ । ५८७ । ६०२ । ६१५ । ७१५ । ७७९ । ८०४ । ९२१ । १०११ । १०२१ ( गृहिणी दयिता नारी पत्नी भार्या )
स्थविरः २०० । ४५० ( वृद्धः )
स्वकर्म ६८८ । ९०५ । १०२९
स्वधर्मः ६८ । ९३०
स्वर्गः ८४ । १७८ । ३७० । ४३९ । ६०६ । ६४२
स्वार्थः ५५९ । ५९१ । ६८९ । ८१५ । १०२८
हननम् १५५ । २७६ । ४०४ । ४४४ । ५४८ । ५६४ । ५९५ । ६०५ । ६६२ । ६९८ । ७०२ । ७९५ । ९२२ । ९२६
हर्षः ४७४ । ९१६ । ९९९ । १०३१
हिंसा ५३ । १३६ । १३९ । ९३६
हितम् ७०६ । ७४१ । ७५६ । ७७० । १०३२

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीरामायणसुभाषितानि

संपादक

विष्णु विनायक परांजपे, पेण

भाषांतरकार

भालचंद्र शंकरशास्त्री देवस्थळी

प्रकाशक

केशव भिकाजी ढवळे, गिरगांव-मुंबई

आवृत्ति दुसरी

आषाढ शके १८५२ सन १९३०

किंमत ८ आणे

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीमहाभारतसुभाषितानि

संपादक–विष्णु विनायक परांजपे, पेण

भाषांतरकार–चिंतामण मोरेश्वर परांजपे,

बी. ए., एल्.एल्. बी.

( १०३२ सुभाषितें, किंमत १२ आणे )

---

# सार्थश्रीरामायणसुभाषितानि

भाषांतरकार–भालचंद्र शंकरशास्त्री देवस्थळी

( ५०२ सुभाषितें, किंमत ८ आणे )

---

# सार्थश्रीयोगवासिष्ठसुभाषितानि

भाषांतरकार–विष्णु विनायक परांजपे

( ५०८ सुभाषितें, किंमत ८ आणे )

---

# सार्थश्रीभागवतसुभाषितानि

भाषांतरकार–विष्णु विनायक परांजपे

( ११७ सुभाषितें, किंमत ३ आणे )

---

# सार्थश्रीरामरक्षा

( किंमत १ आणा )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# प्रस्तावना

श्रीवाल्मीकिरामायण हें आदिकाव्य आहे. आर्य लोकांच्या राष्ट्रीय ग्रंथांमध्यें याची गणना होते. या सर्वमान्य ग्रंथांतील निवडक ५०२ सुभाषितवचनांचा संग्रह प्रस्तुत पुस्तकांत केला आहे. वचनें वर्णक्रमानें दिलीं असून त्यांच्या डावीकडे क्रमांक घातले आहेत आणि उजवीकडे स्थलनिर्देश केला आहे. स्थलनिर्देशांत कांड, सर्ग व श्लोक अशा क्रमानें अंक मांडिले आहेत. वचन प्रक्षिप्त सर्गापैकीं असल्यास मुख्य सर्गाचा व प्रक्षिप्त सर्गाचा असे दोन्ही अंक आहेत. वचनांच्या शेवटीं मुख्य विषयांची सूची जोडिली आहे. जो विषय ज्या वचनांत आला त्या वचनाचा क्रमांक त्या विषयापुढें सूचीमध्यें घातला आहे. सूचीमध्यें एकाच अर्थी आलेले अनेक शब्द त्या त्या ठिकाणीं दिले असून पर्यायशब्द कंसांत घातले आहेत. हीं सुभाषितवचनें सर्वांच्या वाचनांत येवोत, अशी श्रीरामप्रभूजवळ प्रार्थना करून प्रस्तावना संपवितों.

श्रीरामनवमी
शके १८५१

**विष्णु विनायक परांजपे**
राहणार पेण, जिल्हा कुलाबा

---

# रामायणांतील कांडांचीं नांवें

१ बालकांड
२ अयोध्याकांड
३ अरण्यकांड
४ किष्किंधाकांड
५ सुंदरकांड
६ युद्धकांड
७ उत्तरकांड

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# निवेदन

श्रीमहाभारत, श्रीरामायण, श्रीयोगवासिष्ठ व श्रीभागवत या राष्ट्रीय व धार्मिक ग्रंथांतील निवडक सुभाषितांचीं मराठी भाषांतरासह चार पुस्तकें प्रकाशित केलीं. हीं पुस्तकें सर्व लोकांना मान्य झाल्यामुळें पहिली आवृत्ति एका वर्षांतच खपून गेली. आतां ही दुसरी आवृत्ति काढिली आहे.

वचन कोणीं कोणाला सांगितलें, हें समजण्याची विशेष अवश्यकता ज्या श्लोकांत दिसून येते, अशा श्लोकांचा अर्थ देतांना आरंभीं कंसांत अवतरण दिलें आहे. अशा अवतरणांची संख्या या आवृत्तींत वाढविली आहे.

धार्मिक शिक्षण देण्याच्या कामीं हीं चारहि सुभाषितांचीं पुस्तकें बरींच उपयोगीं पडतात, असें पुष्कळ पालकांच्या व शिक्षकांच्या प्रत्ययास आलें आहे. तरी सर्व जनतेला या पुस्तकांचा उपयोग होवो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

आषाढ, शके १८५२ प्रकाशक

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीरामायणसुभाषितानि

## मंगलाचरणम्

आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥

हर्ता आपत्तींचा, दाता निखिलार्थसिद्धिंचा तेवीं ।
श्रीराम लोकनंदन, तच्चरणां नित्य नित्य मी सेवीं ॥

---

१ अकुर्वन्तोऽपि पापानि शुचयः पापसंश्रयात् ।का. स. श्लो.
परपापैर्विनश्यन्ति मत्स्या नागह्रदे यथा ॥ ३।३८।२६

ज्याप्रमाणें सर्प असलेल्या डोहांतील मासे नाश पावतात, त्याप्रमाणें स्वतः शुचिर्भूत व पापकर्म न करणारे असेहि लोक पापीजनांचा आश्रय केल्यामुळें त्या दुसऱ्यांच्या पातकांनीं नाश पावतात.

२ अकृतात्मानमासाद्य राजानमनये रतम् ।
समृद्धानि विनश्यन्ति राष्ट्राणि नगराणि च ॥५।२१।११

ज्याच्या चित्ताला ज्ञानाचा संस्कार नाहीं, व जो अनीतीचे ठायीं आसक्त झालेला आहे, अशा राजाची प्राप्ति झाली असतां, समृद्ध राष्ट्रें आणि नगरें नाश पावतात.

३ अग्निं प्रज्वलितं दृष्ट्वा वस्त्रेणाहर्तुमिच्छसि ।
कल्याणवृत्तां यो भार्यां रामस्याहर्तुमिच्छसि ३।४७।४२

( सीता रावणाला म्हणते ) ज्याअर्थीं तूं रामाच्या सदाचरणी भार्येला हरण करण्याचें इच्छितोस, त्याअर्थीं तूं प्रदीप्त झालेला अग्नि पाहून, त्याला वस्त्रानें बांधून आणण्याचीच इच्छा करीत आहेस.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४ अङ्गप्रत्यङ्गजः पुत्रो हृदयाच्चाभिजायते ।
तस्मात्प्रियतरो मातुः प्रिया एव तु बान्धवाः ॥२।७४।१४

( मुख, वक्षःस्थळ, उदर, हस्त, चरण इत्यादि ) अंगांपासून व ( नेत्र अंगुलि, इत्यादि ) प्रत्यंगांपासून आणि हृदयापासून—सर्व अंगांपासूनउत्पन्न झालेल्या तेजाच्या योगें—होणारा पुत्र मातुश्रीस अत्यंत प्रिय असतो. इतर बांधव हे साधारणच प्रिय असतात.

५ अञ्जलिं कुर्मि कैकेयि पादौ चापि स्पृशामि ते ।
शरणं भव रामस्य माऽधर्मो मामिह स्पृशेत् ॥२।१२।३६

( दशरथ म्हणतो ) हे कैकेयि, मी तुला हात जोडितों, व तुझ्या पायांनाही स्पर्श करितों, रामाचें रक्षण कर. ह्या जगांत अधर्म मला स्पर्श न करो.

६ अतिथिः किल पूजार्हः प्राकृतोऽपि विजानता ।
धर्मं जिज्ञासमानेन किं पुनर्यादृशो भवान् ॥ ५।१।११३

( मैनाकपर्वत मारुतीला म्हणतो. ) धर्मजिज्ञासु ज्ञात्या पुरुषानें सामान्य अतिथिही पूजावा, हें योग्य आहे; मग तुजसारखा अतिथि प्राप्त झाला असतां, त्याची पूजा करावी, हें वेगळें कशाला सांगितलें पाहिजे ?

७ अतिमानिनमग्राह्यमात्मसंभावितं नरम् ।
क्रोधनं व्यसने हन्ति स्वजनोऽपि नराधिपम् ॥३।३३।१६

हट्टी, कशानेंही न वळणारा, अति अभिमान बाळगणारा, व सदा क्रोध करणारा, असा मनुष्य, मग तो राजा कां असेना, संकटांत आला असतां, त्याचेच लोक त्याचा नाश करितात.

८ अतिस्नेहपरिष्वङ्गाद्वर्तिरार्द्रापि दह्यते ॥ ४।१।११७

अति स्नेहाच्या-तेलाच्या-संपर्कानें भिजलेलीही वात दग्ध होते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९ अतुष्टं स्वेषु दारेषु चपलं चपलेन्द्रियम् ।
नयन्ति निकृतिप्रज्ञं परदाराः पराभवम् ॥ ५।२१।८

स्वस्त्रीचे ठायीं असंतुष्ट, अजितेंद्रिय, विपरीत बुद्धीच्या, चंचल मनाचे पुरुषास परस्त्रिया अपकीर्तीस पोंचवितात.

१० अत्येति रजनी या तु सा न प्रतिनिवर्तते ।
यात्येव यमुना पूर्णं समुद्रमुदकार्णवम् ॥ २।१०५।१९

ज्याप्रमाणें उदकानें परिपूर्ण भरलेल्या समुद्राकडे यमुना नदी जाते ती कधीं मागें परतून येत नाहीं, त्याप्रमाणें जी रात्र एकदां निघून जाते, ती पुनः परत येत नाहीं.

११ अथवा किं ममैतेन राज्यद्रव्यमयेन तु ।
उद्धृतं मे स्वयं तोयं व्रतादेशं करिष्यति ॥ २।२२।२८

( राम लक्ष्मणाला म्हणतो वनवासाच्या व्रताचा संकल्प करण्यासाठीं मी या अभिषेक जलानें स्नान करीन ) अथवा राज्यांतील द्रव्य ज्याकरितां खर्चीं पडलें आहे असें हें उदक तरी मला कशाला पाहिजे ? मी स्वतः आणिलेल्या उदकानेंच माझा व्रतग्रहणाचा संकल्प होईल.

१२ अथात्मपरिधानार्थं सीता कौशेयवासिनी ।
संप्रेक्ष्य चीरं संत्रस्ता पृषती वागुरामिव ॥ २।३७।९

(राम व लक्ष्मण यांनीं वल्कलें स्वीकारलीं ) नंतर पैठणी नेसलेली सीता आपल्याला नेसण्याकारितां ( कैकेयीनें ) आणून दिलेलें वल्कल पाहून, जाळें पाहिल्यावर त्रस्त होणाऱ्या हरिणीप्रमाणें त्रस्त झाली.

१३ अधर्मः सुमहान्नाथ भवेत्तस्य तु भूपतेः ।
यो हरेद्बलिषड्भागं न च रक्षति पुत्रवत् ॥ ३।६।११

( तपस्वी ऋषि रामाला म्हणतात ) हे नाथ, जो राजा प्रजेपासून उत्पन्नाचा सहावा भाग करभार म्हणून घेऊन तिचें पुत्रवत् पालन करीत नाहीं, तो त्याचा मोठा अधर्म होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१४ अधर्षितानां शूराणां समरेष्वनिवर्तिनाम् ।**
**धर्षणामर्षणं भीरु मरणादतिरिच्यते ॥ ४।१६।३**

( वाली तारेला म्हणतो ) हे भित्र्ये, परोत्कर्ष सहन न करणारे व समरांत माघार न घेणारे, अशा शूरांना शत्रूंनीं केलेला अपमान सहन करणें हें मरणाहूनाहि अधिक दुःखदायक आहे.

**१५ अनभिज्ञाय शास्त्रार्थान्**
**पुरुषाः पशुबुद्धयः ।**
**प्रागल्भ्याद्वक्तुमिच्छन्ति**
**मन्त्रिष्वभ्यन्तरीकृताः ॥ ६।६३।१४**

मंत्रिजनांमध्यें समाविष्ट केलले पशुबुद्धि पुरुष आपल्या आंगच्या बोलकेपणाच्या जोरावर अनभिज्ञास-अज्ञान्यास-शास्त्रार्थाच्या गोष्टी सांगूं इच्छितात.

**१६ अनवस्थौ हि दृश्येते युद्धे जयपराजयौ ॥५।३७।५५**

युद्धामध्यें जय काय किंवा पराजय काय, हे अनिश्चित असतात.

**१७ अनागतविधानं तु कर्तव्यं शुभमिच्छता ।**
**आपदाशङ्कमानेन पुरुषेण विपश्चिता ॥ ३।२४।११**

कल्याण इच्छिणाऱ्या विद्वान् पुरुषानें पुढें विपत्ति येईल, अशी शंका येतांच, ती विपत्ति प्राप्त होण्यापूर्वींच परिहाराची योजना करावी.

**१८ अनिर्वेदं च दाक्ष्यं च मनसश्चापराजयम् ।**
**कार्यसिद्धिकराण्याहुस्तस्मादेतद्ब्रवीम्यहम् ॥४।४९।६**

( सीतेचा शोध लावण्याविषयीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे असें अंगद वानरमंडळीला सांगतो ) उत्साह, दक्षता, आणि कार्याविषयीं उन्मुखता, हीं कार्यसिद्धि घडवून आणितात, असें म्हणतात, म्हणून हें मी सांगतों.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१९ अनिर्वेदः श्रियो मूलमनिर्वेदः परं सुखम् ॥५।१२।१०

उत्साह हें संपत्तीचें कारण होय, आणि उत्साह म्हणजेच परम सुख होय.

२० अनिर्वेदो हि सततं सर्वार्थेषु प्रवर्तकः ।
करोति सफलं जन्तोः कर्म यच्च करोति सः ॥५।१२।११

सर्व गोष्टींची प्रवृत्ति होण्याला उत्साह हेंच एक नेहमींचें कारण आहे. प्राणी जें कांहीं कर्म करितो, तें त्याचें कर्म हाच उत्साह सफल करितो.

२१ अनुबन्धमजानन्तः कर्मणामविचक्षणाः ।
शीघ्रमेव विनश्यन्ति यथा त्वं विनशिष्यसि ॥३।५१।२६

( जटायु पक्षी रावणाला म्हणतो ) जे मूढ पुरुष आपल्या कृत्यांच्या परिणामाकडे लक्ष देत नाहींत ते तुझ्याप्रमाणें सत्वरच नाश पावतात.

२२ अनृतं नोक्तपूर्वं मे न च वक्ष्ये कदाचन ।
एतत्ते प्रतिजानामि सत्येनैव शपाम्यहम् ॥ ४।७।२२

( राम सुग्रीवाला म्हणतो ) आजपर्यंत मीं पूर्वीं कधीं अनृत भाषण केलें नाहीं, आणि पुढेंही कधीं करणार नाहीं, हें मी तुला प्रतिज्ञेनें सांगतों व यासंबंधीं सत्याची शपथ वाहतों.

२३ अन्तकाले हि भूतानि मुह्यन्तीति पुरा श्रुतिः ।
राज्ञैवं कुर्वता लोके प्रत्यक्षा सा श्रुतिः कृता ॥२।१०६।१२

( भरत रामाला म्हणतो–दशरथ पित्यानें कैकेयीचें म्हणणें मान्य केलें–यावरून ) अंतकाल प्राप्त झाला असतां प्राण्यांची बुद्धि विपरीत होते, असें पूर्वीपासून ऐकिवांत आहे; आणि ही गोष्ट, असें करणाऱ्या राजानें, आज लोकांत सिद्ध करून दाखविली आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२४ अपक्षो हि कथं पक्षी कर्म किंचित्समारभेत् ॥ ४।५९।२३

( गृध्रराज संपाति वानरांना सांगतो ) पंख नाहींतसे झालेला पक्षी कांहीं पराक्रमाचें कृत्य करण्यास प्रवृत्त होणार कसा ?

२५ अप्यहं जीवितं जह्यां त्वां वा सीते सलक्ष्मणाम् ।
न तु प्रतिज्ञां संश्रुत्य ब्राह्मणेभ्यो विशेषतः ॥३।१०।१८

( राम म्हणतो ) हे सीते, मी तुझा, लक्ष्मणाचा, व स्वतःच्या जीविताचाही त्याग करीन. परंतु कोणाजवळ, विशेषतः ब्राह्मणांजवळ, केलेल्या प्रतिज्ञेचा त्याग कधींही करणार नाहीं.

२६ अप्यहं जीवितं जह्यां युष्मान्वा पुरुषर्षभाः ।
अपवादभयाद्भीतः किं पुनर्जनकात्मजाम् ॥७।४५।१४

( राम बंधूंना म्हणतो ) पुरुषश्रेष्ठांनो, लोकापवादाला भिऊन मी स्वजीविताचा व तुमचाहि त्याग करीन; मग जनककन्येचा त्याग करीन, यांत आश्चर्य तें काय ?

२७ अप्येव दहनं स्पृष्ट्वा वने तिष्ठन्ति पादपाः ।
राजदण्डपरामृष्टास्तिष्ठन्ते नापराधिनः ॥ ६।२९।१२

अग्नीनें स्पर्श केलेले वृक्षही वनांत राहतात, परंतु राजदंडास पात्र झालेले अपराधी ( जिवंत ) राहात नाहींत.

२८ अप्रमत्तश्च यो राजा सर्वज्ञो विजितेन्द्रियः ।
कृतज्ञो धर्मशीलश्च स राजा तिष्ठते चिरम् ॥ ३।३३।२०

जो राजा ( सर्वदा ) सावधान, सर्वज्ञ, जितेंद्रिय, कृतज्ञ आणि धर्मशील असतो, तो राज्यावर चिरकाल स्थिर राहातो.

२९ अप्रमत्तो बले कोशे दुर्गे जनपदे तथा ।
भवेथा गुह राज्यं हि दुरारक्षतमं मतम् ॥ २।५२।७२

( राम म्हणतो ) हे गुहा, तूं सैन्य, कोश, किल्ले, तसेच देश यांसंबंधानें सावधान रहा. कारण, राज्याचें रक्षण करणें म्हणजे अत्यंत कठीण होय, असें मानिलें आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३० अमृतं विषसंपृक्तं त्वया वानर भाषितम् ।
यच्च नान्यमना रामो यच्च शोकपरायणः ॥५।३७।२

( सीता मारुतीला म्हणते ) हे वानरा, तुझें भाषण विषमिश्रित अमृतासारखें आहे. 'रामाचें मन ( तुजवांचून ) कोणत्याही ठिकाणीं आसक्त होत नाहीं,' हें जें तूं बोललास, तें अमृतासारखें, व 'राम ( तुझ्यासंबंधानें ) एकसारखा शोक करीत आहे' असें जें तूं सांगितलेंस, तें मला विषासारखें वाटत आहे.

३१ अयं हि सागरो भीमः सेतुकर्मदिदृक्षया ।
ददौ दण्डभयाद्गाधं राघवाय महोदधिः॥ ६।२२।४७

( वानरश्रेष्ठ नल म्हणतो ) ह्या भयंकर महोदधि सागरानें, दंडाच्या भीतीमुळें, सेतुकार्य पाहाण्याची इच्छा धरून राघवास ( आपला ) ठाव दिला.

३२ अयुक्तचारं दुर्दर्शमस्वाधीनं नराधिपम् ।
वर्जयन्ति नरा दूरान्नदीपङ्कमिव द्विपाः ॥ ३।३३।५

जो राजा ( राष्ट्रांतील बातम्या समजाव्या म्हणून ) हेरांची योजना करीत नाहीं; ( प्रजाजनांस ) दर्शन देत नाहीं. जो परतंत्र असतो, ( स्त्रियादिकांच्या स्वाधीन असतो ) त्याला नदींतील चिखल पाहतांच हत्ती नदीचा त्याग करून जातात, त्याप्रमाणें लोक वर्ज्य करितात.

३३ अरयश्च मनुष्येण विज्ञेयाश्छद्मचारिणः ।
विश्वस्तानामविश्वस्ताश्छिद्रेषु प्रहरन्त्यपि ॥ ४।२।२२

कपटानें संचार करणाऱ्या शत्रूंचा मनुष्यानें शोध घेत रहावें. कारण, ते सावध राहून, संधि सांपडली असतां, विश्वास पावलेल्या ( शत्रु ) जनांवर प्रहार करण्यास चुकत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३४ अर्थं वा यदि वा कामं शिष्टाः शास्त्रेष्वनागतम् ।
व्यवस्यन्त्यनुराजानं धर्मं पौलस्त्यनन्दन ॥ ३।५०।९

( जटायु म्हणतो ) हे रावणा, शास्त्रामध्यें ज्याचा नीट बोध होत नाहीं असा धर्म, अर्थ, अथवा काम राजाचेंच आचरण पाहून शिष्ट लोक निश्चित करीत असतात.

३५ अर्थानर्थान्तरे बुद्धिर्निश्चितापि न शोभते ।
घातयन्तीह कार्याणि दूताः पण्डितमानिनः ॥५।२।३८

( लंका अवलोकन केल्यानंतर मारुतीचे स्वगत विचार ) कार्याकार्याविषयीं स्वामीनें मंत्र्यासहवर्तमान जरी एखादा विचार निश्चित केला असला; तरी अयोग्य दूताशीं गांठ पडल्यावर त्या विचारापासून कांहींएक निष्पन्न होत नाहीं. कारण, शहाणपणाच्या घमेंडींत असणारे दूत स्वामिकार्याचा घात करितात.

३६ अर्थिनः कार्यनिर्वृत्तिमकर्तुरपि यश्चरेत् ।
तस्य स्यात्सफलं जन्म किं पुनः पूर्वकारिणः॥४।४३।७

ज्यानें पूर्वी आपल्यावर उपकार केला नाहीं, अशा अर्थिजनाची ( याचकाची ) कार्यसिद्धि केल्यानें जीवित सफल होईल; मग ज्यानें पूर्वी आपल्यावर उपकार केले आहेत, त्याचें कार्य केल्यानें तें जीवित सफल होईलच, हें कशाला सांगितलें पाहिजे ?

३७ अर्थिनामुपपन्नानां पूर्वं चाप्युपकारिणाम् ।
आशां संश्रुत्य यो हन्ति स लोके पुरुषाधमः ॥४।३०।७१

पूर्वी ज्यांनीं आपल्यावर उपकार केले आहेत, अशा याचकांना त्यांच्या कार्यसिद्धीच्या कामीं वचन देऊन जो कार्यहानि करितो, तो पुरुष लोकांमध्यें अधम होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३८ अर्थी येनार्थकृत्येन संव्रजत्यविचारयन् ।
तमर्थमर्थशास्त्रज्ञाः प्राहुरर्थ्याः सुलक्ष्मण ॥ ३।४३।३४

( राम म्हणतो ) हे भल्या लक्ष्मणा, कोणी पुरुष एखाद्या अर्थाची अपेक्षा करून त्याच्या प्राप्तीसाठीं प्रयत्न करितो, तो, विचार न करितां केलेला असला, तरी अर्थशास्त्रज्ञ शहाणे लोक त्यास ' अर्थच ' म्हणत असतात.

३९ अर्थेन हि विमुक्तस्य पुरुषस्याल्पचेतसः ।
विच्छिद्यन्ते क्रियाः सर्वा ग्रीष्मे कुसरितो यथा ६।८३।३३

ग्रीष्म ऋतूंत ज्याप्रमाणें लहान लहान नद्या आटून जातात त्याप्रमाणें द्रव्यहीन आणि अल्पबुद्धि अशा मनुष्याच्या सर्व क्रिया नाश पावतात.

४० अर्थेभ्योऽथ प्रवृद्धेभ्यः संवृत्तेभ्यस्ततस्ततः ।
क्रियाः सर्वाः प्रवर्तन्ते पर्वतेभ्य इवापगाः ॥६।८३।३२

पर्वतापासून ज्याप्रमाणें नद्या उत्पन्न होत असतात, त्याप्रमाणें संपादन केलेल्या आणि सर्वत्र वृद्धिंगत झालेल्या द्रव्यापासून सर्व क्रिया सिद्ध होतात.

४१ अर्थो हि नष्टकार्यार्थैरयत्नेनाधिगम्यते ॥ ४।१।१२१

नष्ट झालेली वस्तू ज्यांना अवश्य मिळवावयाची आहे त्यांना ती यत्नावांचून कधींहि मिळत नाहीं.

४२ अवश्यं लभते कर्ता फलं पापस्य कर्मणः ।
घोरं प्रत्यागते काले द्रुमः पुष्पमिवार्तवम् ॥३।२९।८

ज्याप्रमाणें वृक्षावर त्या त्या ऋतुकालाला उचित अशीं पुष्पें उत्पन्न होतात, त्याप्रमाणें पापकर्माचें दुःखरूप फल भोगकाल आला असतां कर्त्याला अवश्य भोगावें लागतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४३ अवश्यं प्राणिना प्राणा रक्षितव्या यथाबलम् ॥ ६।९।१४

प्रत्येक प्राण्यानें आपले प्राण अवश्य यथासामर्थ्य रक्षण करावे.

४४ अविज्ञाय फलं यो हि कर्म त्वेवानुधावति ।
स शोचेत्फलवेलायां यथा किंशुकसेवकः ॥ २।६३।९

जो पुरुष कर्माच्या फलाचा विचार न करितां तें कर्म करण्यास प्रवृत्त होतो, त्याची फळ मिळण्याची वेळ प्राप्त झाली असतां, पळसाच्या झाडाची ( फलप्राप्त्यर्थ ) सेवा करणाऱ्यासारखी शोकस्थिति होईल.

४५ अविस्तरमसंदिग्धमविलम्बितमव्यथम् ।
उरःस्थं कण्ठगं वाक्यं वर्तते मध्यमस्वरम् ॥ ४।३।३१
अनया चित्रया वाचा त्रिस्थानव्यञ्जनस्थया ।
कस्य नाराध्यते चित्तमुद्यतासेररेरपि ॥ ४।३।३३

( मारुतीचें भाषण ऐकून राम लक्ष्मणाला म्हणतो ) ( उत्तम वाक्य म्हटलें म्हणजे ) जें अति विस्तृत नसतें, संदिग्ध नसतें, त्वरित उच्चारितां येतें, श्रोत्यांच्या कर्णांस पीडा देत नाहीं. उरःस्थलापासून कंठाकडे मध्यम स्वरांत–अति उच्च नाहीं, किंवा अति नीचही नाहीं–अशा स्वरांत जातें तें होय. ( हृदय, कंठ आणि शिरःस्थान अशा ) तीन ठिकाणीं स्पष्टपणें व्यक्त होणाऱ्या ( ह्याच्या ) वाणीनें खड्ग उगारून आलेल्या शत्रूचेंही रंजन झाल्यावांचून रहाणार नाहीं. ( मग इतरांचें होईल, हें उघडच आहे. )

४६ अशोक शोकापनुद शोकोपहतचेतनम् ।
त्वन्नामानं कुरु क्षिप्रं प्रियासंदर्शनेन माम् ।३।६०।१७

( राम म्हणतो. ) हे शोकहारका अशोका ! माझी शोकानें ज्ञानशक्ति नष्ट झाली आहे. प्रिये ( सीते ) च्या दर्शनानें मला त्वरित तुझ्या नामाप्रमाणें ( अशोक ) कर.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४७ असृजद्भगवान्पक्षौ द्वावेव हि पितामहः ।

सुराणामसुराणां च धर्माधर्मौ तदाश्रयौ ॥ ६।३५।१३

ऐश्वर्यसंपन्न अशा पितामहानें–ब्रह्मदेवानें–देव आणि असुर असे दोन पक्ष निर्माण केले, आणि त्यांच्या ठिकाणीं अनुक्रमें धर्म व अधर्म उत्पन्न केले.

४८ अस्मिञ्जीवति वीरे तु हतमप्यहतं बलम् ।

हनूमत्युज्झितप्राणे जीवन्तोऽपि मृता वयम् ॥६।७४।२२

( मारुति जिवंत आहे काय, असा जांबवानानें बिभीषणाला प्रश्न केला असतां बिभीषणानें विचारलें कीं, मारुतीबद्दलच प्रश्न कां विचारला यावर जांबवान् बिभीषणाला सांगतो ) हा वीर हनुमान् जिवंत असतां सैन्य मारलें गेलें, तरी तें न मारिल्यासारखें आहे, आणि हा मेला असतां आम्ही जिवंत असूनही मेल्यासारखे आहों.

४९ अस्वाधीनं कथं दैवं प्रकारैरभिराध्यते ।

स्वाधीनं समतिक्रम्य मातरं पितरं गुरुम् ॥ २।३०।३३

( राम सीतेला म्हणतो ) माता, पिता व गुरु हीं आपल्या हातचीं दैवतें टाकून देऊन स्वाधीन नसलेल्या दुसऱ्या दैवताची नाना प्रकारांनीं आराधना, करावी तरी कशी ?

५० अहं हि वचनाद्राज्ञः पतेयमपि पावके ॥ २।१८।२८

भक्षयेयं विषं तीक्ष्णं पतेयमपि चार्णवे ।

नियुक्तो गुरुणा पित्रा नृपेण च हितेन च ॥ २।१८।२९

( राम कैकेयीला म्हणतो ) मी राजाच्या सांगण्यावरून अग्नींत देखील पडेन. हितकर्ता गुरु, माझा बाप ( दशरथ ) राजा, यानें आज्ञा केली असतां, मी तीक्ष्ण विषाचें भक्षण करीन, किंवा समुद्रांतही उडी घेईन.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



५१ अहितं च हिताकारं धाष्ट्याज्जल्पन्ति ये नराः ।
अवश्यं मन्त्रबाह्यास्ते कर्तव्याः कृत्यदूषकाः॥६।६३।१६

जे कोणी वस्तुतः अहितप्रद, परंतु बाहेरून हितकारक वाटण्याजोगें भाषण धाष्ट्यानें करितात, ते कार्यनाशक होत. त्यांस आपल्या विचारांत-सल्लामसलतींत-घेऊं नये.

५२ अहिरेव अहेः पादान्विजानाति न संशयः ॥ ५।४२।९

सर्पाचे पाय-चरणरहित गति-सर्पच जाणतो, यांत संशय नाहीं.

५३ अहो तम इवेदं स्यान्न प्रज्ञायेत किंचन ।
राजा चेन्न भवेल्लोके विभजन्साध्वसाधुनी ॥ २।६७।३६

चांगलें आणि वाईट याची निवड करणारा राजा जर पृथ्वीवर नसेल, तर सर्वच अंधार होईल, आणि (कार्याकार्य) कांहींच समजणार नाहीं.

५४ अहोरात्राणि गच्छन्ति सर्वेषां प्राणिनामिह ।
आयूंषि क्षपयन्त्याशु ग्रीष्मे जलमिवांशवः ॥२।१०५।२०

ग्रीष्म ऋतूंत उदकाचा नाश करणाऱ्या (सूर्य) किरणांप्रमाणें या मृत्युलोकीं निघून जाणाऱ्या दिवसरात्री सर्व प्राण्यांच्या आयुष्याचा शीघ्र नाश करितात.

५५ आकारश्छाद्यमानोऽपि न शक्यो विनिगूहितुम् ।
बलाद्धि विवृणोत्येव भावमन्तर्गतं नृणाम् ॥ ६।१७।६४

मनुष्यानें आपला आकार-हर्षविकारादि मनोभावनांनीं चेहऱ्यावर होणारा फेरफार-आंवरून धरण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी तो आंवरतां येत नाहीं. तो आकार, मनुष्यांचा अंतर्गत (चांगला वाईट) भाव कशाना कशा प्रकारें प्रगट करितोच.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



५६ आढ्यो वापि दरिद्रो वा दुःखितः सुखितोऽपि वा ।
निर्दोषश्च सदोषश्च वयस्यः परमा गतिः ॥ ४।८।८

श्रीमंत असो, वा दरिद्री असो; सुखी असो वा दुःखी असो; निर्दोष असो, वा सदोष असो, मित्र म्हणजे परम गति होय.

५७ आत्मप्रशंसिनं दुष्टं धृष्टं विपरिधावकम् ।
सर्वत्रोत्सृष्टदण्डं च लोकः सत्कुरुते नरम् ॥ ६।२१।१५

आत्मप्रशंसा करणारा, दुष्ट आचरणाचा, साहसी, आपल्या प्रसिद्धीकारितां धांवपळ करणारा, व सर्वत्र दंड करीत जाणारा, अशाच पुरुषाचा लोक सत्कार कारितात.

५८ आत्मानं नियमैस्तैस्तैः कर्षयित्वा प्रयत्नतः ।
प्राप्यते निपुणैर्धर्मो न सुखाल्लभते सुखम् ॥३।९।३१

( धर्मसंपादनार्थ जे जे नियम सांगितले आहेत ) त्या त्या नियमांच्या योगेंकरून प्रयत्नांनीं शरीर झिजवून शहाणे लोक धर्माची प्राप्ति करून घेतात. कारण, सुखापासून सुख मिळत नसतें. ( कष्ट करून सुख मिळवावें लागतें. )

५९ आत्मानमनुशोच त्वं किमन्यमनुशोचसि ।
आयुस्तु हीयते यस्य स्थितस्याथ गतस्य च॥२।१०५।२१

( राम भरताला म्हणतो ) तूं आपल्याविषयीं शोक कर. दुसऱ्याविषयीं काय म्हणून शोक कारितोस ? कोणी मनुष्य, मग तो उभा असो, किंवा चालणारा असो त्याचें आयुष्य क्षीण होत असतें.

६० आत्मा रक्ष्यः प्रयत्नेन ॥ ५।४६।१६

( प्रत्येकानें ) प्रयत्नपूर्वक स्वदेहाचें रक्षण करावें.

६१ आत्मा हि दाराः सर्वेषा दारसंग्रहवर्तिनाम्॥ २।३७।२४

प्रत्येक विवाहित पुरुषाची स्त्री हा त्याचा आत्माच आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**६२ आनृशंस्यं परो धर्मः ॥ ५।३८।३९**

( प्राणिमात्रावर ) दया करणें हाच श्रेष्ठ धर्म होय.

**६३ आभिजात्यं हि ते मन्ये यथा मातुस्तथैव च ।**
**न हि निम्बात्स्रवेत्क्षौद्रं लोके निगदितं वचः॥२।३५।१७**

( सुमंत्र सारथि कैकेयीला धिक्कारपूर्वक म्हणतो ) तुझा कुलीनपणा तुझ्या आईप्रमाणेंच मी समजत आहें ! ( तुझ्या आईप्रमाणेंच तूं दुष्ट आहेस. ) 'लिंबाच्या झाडांतून कधीं मध पाघळत नाहीं' ही म्हण लोकांमध्यें प्रसिद्ध आहे.

**६४ आम्रं छित्त्वा कुठारेण निम्बं परिचरेत्तु कः ।**
**यश्चैनं पयसा सिञ्चेन्नैवास्य मधुरो भवेत् ॥ २।३५।१६**

आंब्याचें झाड कुऱ्हाडीनें तोडून टाकून लिंबाच्या झाडाची जोपासना कोण करणार आहे ? कारण, या लिंबाच्या झाडाला जो पाणी घालील त्याच्याकरितां तें कधीं मधुर होणार नाहीं.

**६५ आयस्ते विपुलः कच्चित्कच्चिदल्पतरो व्ययः ।**
**अपात्रेषु न ते कच्चित्कोशो गच्छति राघव ॥२।१००।५४**

( राम भरताला विचारतो. ) हे राघवा, तुझी प्राप्ति विपुल आहेना ? तुझा खर्च अति अल्प आहेना ? तुझ्या खजिन्यांतील द्रव्य अपात्रीं खर्च होत नाहींना ?

**६६ आराधिता हि शीलेन प्रयत्नैश्चोपसेविताः ।**
**राजानः संप्रसीदन्ति प्रकुप्यन्ति विपर्यये ॥ २।२६।३५**

राजे लोकांची सद्वर्तनानें आराधना आणि प्रयत्नपूर्वक सेवा केली असतां ते प्रसन्न होतात. याच्या उलट वर्तनानें ते क्रुद्ध होतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



६७ आस्फोटयामास चुचुम्ब पुच्छं
ननन्द चिक्रीड जगौ जगाम ।
स्तम्भानरोहन्निपपात भूमौ
निदर्शयन्स्वां प्रकृतिं कपीनाम् ॥ ५।१०।५४

('ही सीता असावी' असा तर्क झाल्यावर मारुतीला आनंद झाला त्याचें वर्णन) वानरांना योग्य असा आपला जातिस्वभाव दर्शविण्यास उद्युक्त झालेला तो हनुमान् आपलें पुच्छ आपटूं लागला, त्याचें चुंबन घेऊं लागला, मनामध्यें आनंदित होऊन क्रीडा करूं लागला, गाऊं लागला. इकडे तिकडे धावाधाव करूं लागला. आणि खांबावर चढून फिरून जमिनीवरही उड्या मारूं लागला.

६८ आहुः सत्यं हि परमं धर्मं धर्मविदो जनाः ॥ २।१४।३

'सत्य हाच परम धर्म होय,' असें धर्मवेत्ते लोक म्हणतात.

६९ इदं शरीरं निःसंज्ञं बन्ध वा घातयस्व वा ।
नेदं शरीरं रक्ष्यं मे जीवितं वापि राक्षस ॥ ३।५६।२१
न तु शक्यमपक्रोशं पृथिव्यां दातुमात्मनः ॥३।५६।२२

(सीता रावणाला म्हणते) हे राक्षसा, हें जड शरीर बांधून ठेव, अगर याचा घात कर. कारण माझी पृथ्वीवर (सीता गैर चालीची निघाली अशा प्रकारची) निंदा होणार असेल तर शरीर काय, अथवा जीवित काय, यांचें रक्षण मला करावयाचें नाहीं.

७० इदं तु मम दीनस्य मनो भूयः प्रकर्षति ।
यदिहास्य प्रियाख्यातुर्न कुर्मि सदृशं प्रियम् ॥ ६।१।१२
एष सर्वस्वभूतस्तु परिष्वङ्गो हनूमतः ।
मया कालमिमं प्राप्य दत्तस्तस्य महात्मनः ॥ ६।१।१३

(राम म्हणतो) सीतेचा शोध लागला ही प्रियवार्ता कथन करणाऱ्या ह्या वानराचें-मारुतीचें-त्यानें केलेल्या कार्यानुरूप प्रिय मी करूं शकत नाहीं, त्यामुळें मज दीनाचें मन अत्यंत खिन्न होत आहे. अशा वेळीं कडकडून भेट देणें हेंच काय तें माझ्यापाशीं उरलें आहे आणि ही भेट मी त्या महात्म्या हनुमंताला देत आहें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७१ उत्तरं नोत्सहे वक्तुं दैवतं भवती मम ।
वाक्यमप्रतिरूपं तु न चित्रं स्त्रीषु मैथिलि ॥३।४५।२९

( लक्ष्मण म्हणतो ) हे सीते, तूं माझें दैवत असल्यामुळें माझ्यानें तुला उत्तर देववत नाहीं. स्त्रियांनीं अनुचित भाषण करणें, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ( हें साहजिक आहे. )

७२ उत्साहवन्तः पुरुषा नावसीदन्ति कर्मसु ॥ ४।१।१२३

उत्साही पुरुष कोणत्याही कार्यांत खचून जात नाहींत.

७३ उत्साहो बलवानार्य नास्त्युत्साहात्परं बलम् ।
सोत्साहस्य हि लोकेषु न किंचिदपि दुर्लभम् ॥४।१।१२२

( लक्ष्मण रामाला म्हणतो ) हे आर्या, उत्साह हा ( अत्यंत ) बलवान् आहे. उत्साहापेक्षां दुसरें श्रेष्ठ असें बल नाहीं. उत्साही पुरुषाला लोकांमध्यें दुर्लभ असें कांहींच नाहीं.

७४ उद्विजन्ते यथा सर्पान्नरादनृतवादिनः ।
धर्मः सत्यपरो लोके मूलं सर्वस्य चोच्यते ॥२।१०९।१२

सर्पापासून जशी लोकांना भीति असते, त्याचप्रमाणें असत्यवादी मनुष्यापासून लोकांना भीति असते. ज्यांत सत्य मुख्य आहे, असा जो धर्म, तोच लोकांत ( सर्व इष्टप्राप्तीचें ) मूळ आहे, असें सांगतात.

७५ उद्वेजनीयो भूतानां नृशंसः पापकर्मकृत् ।
त्रयाणामपि लोकानामीश्वरोऽपि न तिष्ठति ॥३।२९।३

जो प्राणिमात्राला उद्विग्न करितो, जो पापकर्मी व दुष्ट असतो तो तीनही लोकांचा प्रभु झाला, तरी फार कालपर्यंत टिकणार नाहीं.

७६ उपकारफलं मित्रमपकारोऽरिलक्षणम् ॥ ४।८।२१

उपकाररूप फल हें मित्रत्वाचें लक्षण व अपकार करणें हें शत्रुत्वाचें लक्षण होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७७ उपकारेण वीरस्तु प्रतिकारेण युज्यते ।
अकृतज्ञोऽप्रतिकृतो हन्ति सत्त्ववतां मनः ॥ ४।२७।४५

वीर पुरुषावर कोणींही उपकार केला असतां, तो वीर पुरुष प्रत्युपकार करितोच. उपकार न जाणून प्रत्युपकार न करील, तर तो सत्त्वशील पुरुषांचा मनोभंग करितो.

७८ उपभुक्तं यथा वासः स्रजो वा मृदिता यथा ।
एवं राज्यात्परिभ्रष्टः समर्थोऽपि निरर्थकः ॥ ३।३३।१९

ज्याप्रमाणें वापरलेलें वस्त्र अथवा चुरगळलेल्या माळा निरुपयोगी होतात, त्याचप्रमाणें राज्यापासून भ्रष्ट झालेला पुरुष समर्थ असूनही निरुपयोगी होतो.

७९ उपशान्तवणिक्पण्या नष्टहर्षा निराश्रया ।
अयोध्या नगरी चासीन्नष्टतारमिवाम्बरम् ॥ २।४८।३५

( राम वनवासाला गेल्यावर अयोध्येची स्थिति. ) वाण्यांचीं दुकानें बंद झालीं, हर्ष नाहींसा झाला, लोकांचा आश्रय तुटल्यासारखा झाला अशा प्रकारें ती अयोध्या नगरी नक्षत्रशून्य आकाशाप्रमाणें निस्तेज दिसूं लागली.

८० उपायकुशलो ह्येव जयेच्छत्रूनतन्द्रितः ॥६।८।१२

उपाययोजनेंत कुशल अशा मनुष्यानें आळस टाकून शत्रूंस जिंकावें.

८१ उभे सन्ध्ये शयानस्य यत्पापं परिकल्प्यते ।
तच्च पापं भवेत्तस्य यस्यार्योऽनुमते गतः ॥ २।७५।४४

( आपल्या निरापराधिपणाविषयीं खात्री करून देणारा भरत कौसल्येला म्हणतो ) ज्याची अनुमति मिळवून आर्य-श्रीरामचंद्र-वनवासाला गेला, त्यास सकाळीं व संध्याकाळीं निद्रा करणाऱ्याला जें पाप लागतें, तें लागावें.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८२ ऋद्धियुक्ता हि पुरुषा न सहन्ते परस्तवम् ॥ २।२६।२५

वैभवयुक्त पुरुषांस दुसऱ्याची स्तुति सहन होत नाहीं.

८३ एक एव हि वन्ध्यायाः शोको भवति मानसः।
अप्रजास्मीति संतोषो न ह्यन्यः पुत्र विद्यते ॥ २।२०।३७

( कौसल्या रामाला म्हणते ) पुत्रा, वंध्येला ( मला संतति नाहीं, असा ) एकच मानसिक शोक असतो; इतर कोणतेंही दुःख तिला असत नाहीं.

८४ एकाङ्गहीनं ह्यस्त्रेण जीवितं मरणाद्वरम् ॥ २।९५प्र.।५३

( राम कावळ्याला म्हणतो ) मरणापेक्षां ( माझ्या ) अस्त्रानें एक अवयव कमी होऊन ( तुला ) जिवंत राहणें बरें आहे.

८५ एकैकस्योपकारस्य प्राणान्दास्यामि ते कपे।
शेषस्येहोपकाराणां भवाम ऋणिनो वयम् ॥७।४०।२३

( राम मारुतीला म्हणतात ) हे कपे, तुझ्या एकेका उपकाराकरितां मी प्राण देईन. शेष राहिलेल्या उपकारांचेबद्दल आम्ही तुझे ऋणी राहूं.

८६ एतदर्थं हि राज्यानि प्रशासति नराधिपाः।
यदेषां सर्वकृत्येषु मनो न प्रतिहन्यते ॥ २।५२।२५

राजे लोक याकरितांच राज्य करितात कीं, (कामक्रोधादिविषयक प्रवृत्ति करणाऱ्या ) कोणत्याही कृत्यांत आपला मनोभंग होऊं नये.

८७ एष स्वभावो नारीणामनुभूय पुरा सुखम्।
अल्पामप्यापदं प्राप्य दुष्यन्ति प्रजहत्यपि ॥२।३९।२१

स्त्रियांचा असा स्वभाव असतो कीं, पूर्वी सुखाचा अनुभव घेऊन पुढें अल्पही विपत्ति आली असतां, त्या ( पतीला ) दोष देतात, किंवा त्याचा त्यागही करितात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८८ एषा हि प्रकृतिः स्त्रीणामासृष्टे रघुनन्दन ।
समस्थमनुरज्यन्ते विषमस्थं त्यजन्ति च ॥ ३।१३।५

( अगस्त्यमुनि रामाला म्हणतात ) सृष्टि निर्माण झाल्यापासून स्त्रियांचा स्वभावच असा दिसून येतो कीं, चांगल्या स्थितींत (पति) असल्यास त्या त्याचें अनुरंजन करितात. परंतु तो विषम-दरिद्री-स्थितींत असल्यास त्या त्याचा त्याग करितात.

८९ एष्टव्या बहवः पुत्रा गुणवन्तो बहुश्रुताः ।
तेषां वै समवेतानामपि कश्चिद्गयां व्रजेत् ॥ २।१०७।१३

गुणवंत आणि बहुश्रुत असे अनेक पुत्र असावे, अशी इच्छा ( मनुष्यानें ) करावी. कारण, त्या एकत्र झालेल्या पुत्रांतून एखादा तरी ( पितरांच्या स्वर्गप्राप्त्यर्थ ) गयेला जाईल.

९० ऐश्वर्यमदमत्तो हि सर्वोऽहमिति मन्यते ॥ ५।६४।१९

ऐश्वर्याच्या मदानें मत्त झालेला प्रत्येक इसम ' मीच ( प्रभु ) ' असें मानतो.

९१ ऐश्वर्ये वा सुविस्तीर्णे व्यसने वा सुदारुणे ।
रज्ज्वेव पुरुषं बद्ध्वा कृतान्तः परिकर्षति ॥ ५।३७।३

अत्यंत विपुल ऐश्वर्याच्या स्थितींत काय, किंवा महाभयंकर संकटाच्या स्थितींत काय, यम पुरुषास दोरीनें बद्ध करून आकर्षण करीत असतो.

९२ औरस्यानपि पुत्रान् हि त्यजन्त्यहितकारिणः ।
समर्थान्संप्रगृह्णन्ति जनानपि नराधिपाः ॥ २।२६।३६

राजे लोक औरस पुत्रांचा, ते अहित करणारे असल्यास, त्याग करितात. आणि समर्थ अशा प्राकृत मनुष्यांचाही संग्रह करितात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९३ कच्चिज्ज्ञानपदो विद्वान् दक्षिणः प्रतिभानवान् ।
यथोक्तवादी दूतस्ते कृतो भरत पण्डितः ॥२।१००।३५

( राम म्हणतो ) हे भरता, स्वदेशांतील, विद्वान्, हुशार, बुद्धिमान्, आज्ञेनुसार वागणारे आणि चतुर दूत तूं ठेविले आहेसना ? ( श्लोक ९३ ते १०० यांमध्यें रामानें भरताला कुशल प्रश्न विचारिले आहेत.)

९४ कच्चित्सहस्रैर्मूर्खाणामेकमिच्छसि पण्डितम् ।
पण्डितो ह्यर्थकृच्छ्रेषु कुर्यान्निःश्रेयसं महत् ॥२।१००।२२

हजारों मूर्खांचा त्याग करून एकाच पंडिताचा ( सहवास ) करण्याचें तूं इच्छितोस ना ? कारण, कोणत्याही कार्यासंबंधानें संकट आलें असतां पंडितच ( तरणोपाय सुचवून ) कल्याण करितो.

९५ कच्चित्स्वादुकृतं भोज्यमेको नाश्नासि राघव ।
कच्चिदाशंसमानेभ्यो मित्रेभ्यः संप्रयच्छसि॥२।१००।७५

हे राघवा, ( भरता ) स्वादिष्ट केलेले भोज्य पदार्थ तूं एकटाच भक्षण करीत नाहींस ना ? त्या पदार्थांची इच्छा करणाऱ्या मित्रांना तूं ते देतोस ना ?

९६ कच्चिदर्थं च कामं च धर्मं च जयतां वर ।
विभज्य काले कालज्ञ सर्वान्वरद सेवसे ॥ २।१००।६३

हे वीरश्रेष्ठा ! तूं कालज्ञ आहेस, तसाच वरदही आहेस; तरी धर्म, अर्थ, काम या पुरुषार्थांचें तूं वेळा नेमून योग्यकालीं सेवन करीत असतोस ना ?

९७ कच्चिदर्थं विनिश्चित्य लघुमूलं महोदयम् ।
क्षिप्रमारभसे कर्म न दीर्घयसि राघव ॥ २।१००।१९

( राम भरताला म्हणतो ) हे राघवा, जें अल्प यत्नानें साध्य होणारें व ज्याचें फल मोठें आहे, अशा कार्याचा निश्चय करून तें कार्य त्वरित करितोस ना ? त्या कामीं विलंब लावीत नाहींस ना ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९८ कच्चिन्न सर्वे कर्मान्ताः प्रत्यक्षास्तेऽविशङ्कया ।
सर्वे वा पुनरुत्सृष्टा मध्यमेवात्र कारणम् ॥ २।१००।५२

( राम भरताला विचारतो ) तुझे सर्व चाकर निर्भयपणें तुझ्या दृष्टीसमोर येत नाहींत ना ? किंवा त्या सर्वांना तूं बंदी केली नाहींस ना ? अशा संबंधांत ( राजानें ) मध्यम मार्ग धरिलेला बरा.

९९ कच्चिन्निद्रावशं नैषि कच्चित्कालेऽवबुध्यसे ।
कच्चिच्चापररात्रेषु चिन्तयस्यर्थनैपुणम् ॥ २।१००।१७

तूं निद्रावश होत नाहींस ना ? तूं योग्य कालीं जागृत होतोस ना ? द्रव्यप्राप्ति कोणत्या उपायानें होईल, याचें चिंतन उत्तररात्रीं करितोस ना ?

१०० कच्चिन्मन्त्रयसे नैकः कच्चिन्न बहुभिः सह ।
कच्चित्ते मन्त्रितो मन्त्रो राष्ट्रं न परिधावति ॥२।१००।१८

( राम भरताला विचारतो ) तूं आपल्या स्वतःशींच एकटा अथवा पुष्कळ मंडळीशीं मसलत करीत नाहींस ना ? तूं ठरविलेली मसलत अमलांत येण्यापूर्वींच राष्ट्रामध्यें प्रसिद्ध होत नाहीं ना ?

१०१ कथं राजा स्थितो धर्मे परदारान्परामृशेत् ॥ ३।५०।६

( प्रजापालनरूप ) धर्माचे ठिकाणीं स्थित असणारा राजा परस्त्रीला कसा बरें स्पर्श करील ?

१०२ कन्यापितृत्वं दुःखं हि सर्वेषां मानकाङ्क्षिणाम् ॥ ७।९।१०

सर्व मानी मनुष्यांना पोटीं कन्या येणें म्हणजे खरोखर दुःख होय.

१०३ कर्णवन्ति हि भूतानि विशेषेण तुरङ्गमाः ।
यूयं तस्मान्निवर्तध्वं याचनां प्रतिवेदिताः ॥ २।४५।१५

( राम रथांत बसून अरण्यांत जाऊं लागला असतां, द्विजमंडळी रथाच्या घोड्यांना ' तुम्ही परत फिरा ' असें म्हणतात ) प्राण्यांना कान आहेत, विशेषेंकरून अश्वांचे कान तर अधिक तिखट आहेत. म्हणून हे अश्वांनो, आमच्या याचनेकडे लक्ष देऊन तुम्ही परत फिरा. ( बहिऱ्यांसारखे पुढें जाऊं नका. )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१०४ कर्तव्यं वास्तुशमनं सौमित्रे चिरजीविभिः ॥ २।५६।२२

(राम म्हणतो) हे लक्ष्मणा, चिरकाल जीविताची इच्छा करणाऱ्यांनीं वास्तुशांति करावी.

१०५ कर्म लोकविरुद्धं तु कुर्वाणं क्षणदाचर ।
तीक्ष्णं सर्वजनो हन्ति सर्पं दुष्टमिवागतम् ॥ ३।२९।४

(राम खर राक्षसाला म्हणतो) हे राक्षसा, प्राप्त झालेल्या दुष्ट सर्पांचा सर्व लोक वध करितात. त्याचप्रमाणें लोकविरुद्ध कर्म करणाऱ्या क्रूर पुरुषाचाही वध करितात.

१०६ कल्याणी बत गाथेयं लौकिकी प्रतिभाति माम् ।
एति जीवन्तमानन्दो नरं वर्षशतादपि ॥ ६।१२६।२

(भरत मारुतीला म्हणतो) मनुष्य जिवंत राहिल्यास, शंभर वर्षांनीं कां होईना, त्याला आनंद प्राप्त होतो, ही लोकप्रसिद्ध म्हण कल्याणप्रद आहे, असें मला वाटतें.

१०७ कश्चिदाम्रवणं छित्त्वा पलाशांश्च निषिञ्चति ।
पुष्पं दृष्ट्वा फले गृध्नुः स शोचति फलागमे ॥ २।६३।८

जो कोणी आम्रवन तोडून पलाश वृक्षांचें सिंचन करितो, व त्या पळसांचें पुष्प पाहून फळही तसेंच मिळेल, अशी आशा करितो, तो फलप्राप्तिकालीं शोक पावतो.

१०८ कामं दृष्ट्वा मया सर्वा विश्वस्ता रावणस्त्रियः ।
न तु मे मनसा किंचिद्वैकृत्यमुपपद्यते ॥ ५।११।४२

(सीतेचा शोध लावण्यासाठीं रावणाच्या अंतःपुरांत शिरलेला मारुति म्हणतो) परपुरुष आपणाला पाहील, अशी यत्किंचित्‌ही शंका ज्यांच्या मनांत नाहीं, अशा निःशंकपणें पडलेल्या सर्व रावणस्त्रिया मीं पाहिल्या, परंतु या पाहण्यामुळें मनामध्यें कांहींच विकार उत्पन्न झाला नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१०९ कायेन कुरुते पापं मनसा संप्रधार्य तत् ।**
**अनृतं जिह्वया चाह त्रिविधं कर्म पातकम् ।।२।१०९।२१**

मनुष्य प्रथमतः अंतःकरणांत पापकर्माचा निश्चय करितो, नंतर त्या पापाचा जिव्हेनें उच्चार करितो, व तदनंतर देहानें त्याचें आचरण करितो, असें तीन प्रकारचें पापकर्म आहे.

**११० कार्याणां कर्मणा पारं ।**
**यो गच्छति स बुद्धिमान् ।। ६।८८।१४**

जो कृति करून कार्याच्या पार जातो, तो बुद्धिमान् होय.

**१११ कार्यार्थिनां विमर्दो हि राज्ञां दोषाय कल्पते।।७।५३।२४**

कार्यार्थी लोकांचा कलह म्हटला म्हणजे राजांना दोषास्पद होतो.

**११२ कार्ये कर्मणि निर्वृत्ते यो बहून्यपि साधयेत् ।**
**पूर्वकार्याविरोधेन स कार्यं कर्तुमर्हति ।। ५।४१।५**

मुख्य कार्य सिद्धीला गेलें असतां, त्या पूर्वकार्यास विरोध न येईल, अशा रीतीनें दुसरींही बहुत कार्यें जो करितो, तोच कार्य करण्याविषयीं योग्य होतो.

**११३ कालो हि दुरतिक्रमः ।। ३।६८।२१**

कालाचें अतिक्रमण करणें ही गोष्ट दुःसाध्य आहे.

**११४ किं त्वामन्यत वैदेहः पिता मे मिथिलाधिपः ।**
**राम जामातरं प्राप्य स्त्रियं पुरुषविग्रहम् ।। २।३०।३**

( वनवासाला येण्यासंबंधानें अनुमति मिळावी म्हणून सीता रामाला म्हणते ) हे रामा, माझा पिता मिथिलापति जनक यास, आकृतीनें मात्र पुरुष, परंतु वस्तुतः स्त्री अशा तुम्हां जांवयाची प्राप्ति होऊन काय बरें वाटलें असेल ?

**११५ कीर्त्यर्थं तु समारम्भः सर्वेषां सुमहात्मनाम् ।।७।४५।१३**

सर्व महात्मे कीर्ति संपादन करण्याकरितांच खटपट करीत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



११६ कुलीनमकुलीनं वा
वीरं पुरुषमानिनम् ।
चारित्रमेव व्याख्याति
शुचिं वा यदि वाशुचिम् ॥ २।१०९।४

पुरुष चांगल्या कुळांतील आहे किंवा वाईट कुळांतील आहे, वीर आहे किंवा अधीर आहे आणि पवित्र आहे कीं अपवित्र आहे, हें सर्व त्याच्या वर्तनावरून समजून येतें.

११७ कृतकृत्या हि वैदेही छायेवानुगता पतिम् ।
न जहाति रता धर्मे मेरुमर्कप्रभा यथा ॥ २।४०।२४

छायेप्रमाणें पतीला अनुसरणारी सीता खरोखर धन्य आहे. कारण, सूर्याची प्रभा ज्याप्रमाणें मेरुपर्वताला सोडीत नाहीं, त्याप्रमाणें धर्माचे ठिकाणीं रत असलेली ही सीता आपल्या पतीला सोडून रहात नाहीं.

११८ कृतं न प्रतिकुर्याद्यः पुरुषाणां हि दूषकः ॥ ४।३८।२६

पुरुषांमध्यें तोच धर्मनाशक होय कीं, जो केलेल्या उपकाराची फेड प्रत्युपकारानें करीत नाहीं.

११९ कृतार्था ह्यकृतार्थानां मित्राणां न भवन्ति ये ।
तान्मृतानपि क्रव्यादाः कृतघ्नान्नोपभुञ्जते ॥४।३०।७३

जे स्वतः कृतार्थ होऊन कृतकार्य न झालेल्या आपल्या मित्रांच्या उपयोगीं पडत नाहींत, त्या कृतघ्नांस मेल्यावर श्वानादि मांसभक्षक पशुसुद्धां भक्षण करीत नाहींत.

१२० कृते च प्रतिकर्तव्यमेष धर्मः सनातनः ॥५।१।१०६

उपकाराची प्रत्युपकारानें फेड करावी, हा सनातन धर्म होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१२१ कृत्स्नाद्भयाज्ज्ञातिभयं सुकष्टं विदितं च नः ॥ ६।१६।८

(रावण बिभीषणाला म्हणतो.) कोणत्याही भयापेक्षां भाऊबंदांचें भय फारच कठीण, हें आम्हांला समजून चुकलें आहे.

१२२ कैकेयि मामकाङ्गानि मा स्प्राक्षीः पापनिश्चये ।
नहि त्वां द्रष्टुमिच्छामि न भार्या नच बान्धवी ॥ २।४२।६

(राम वनांत निघून गेल्यावर दशरथ कैकेयीला म्हणतो) हे कैकेयि, तूं माझ्या अवयवांना स्पर्श करूं नको. हे पापनिश्चये, मला तुझें तोंड पाहण्याची इच्छा नाहीं. तूं माझी भार्या नव्हेस इतकेंच नव्हे परंतु (लांबची कोणी) नातेवाईक सुद्धां नव्हेस.

१२३ कोपं न गच्छन्ति हि सत्त्ववन्तः ॥ ५।५२।१६

सत्त्वशील मनुष्य कधींही कोपवश होत नाहींत.

१२४ क्रुद्धः पापं न कुर्यात्कः क्रुद्धो हन्याद्गुरूनपि ।
क्रुद्धः परुषया वाचा नरः साधूनधिक्षिपेत् ॥ ५।५५।४

क्रुद्ध झाला असतां कोण बरें पाप करणार नाहीं? क्रुद्ध पुरुष गुरूचाही वध करील. क्रुद्ध मनुष्य आपल्या कठोर भाषणानें साधूंनाही टाकून बोलेल.

१२५ क्रोधः प्राणहरः शत्रुः
क्रोधो मित्रमुखो रिपुः ।
क्रोधो ह्यसिर्महातीक्ष्णः
सर्वं क्रोधोऽपकर्षति ॥ ७।५९ प्र. २।२१

क्रोध हा प्राणहरणकर्ता शत्रु होय. क्रोध हा मित्रमुख शत्रु (हितशत्रु) आहे. क्रोध अत्यंत तीक्ष्ण असा खड्ग आहे. क्रोध हा सर्वनाशक आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१२६ क्षत्रियाणां तु वीराणां वनेषु नियतात्मनाम् ।
धनुषा कार्यमेतावदार्तानामभिरक्षणम् ॥ ३।९।२६

क्षत्रिय वीरांचा धर्म म्हटला म्हणजे, वनांत राहून मनोनिग्रह करणाऱ्या पीडित जनांचें धनुष्याच्या साह्यानें रक्षण करणें, हा होय.

१२७ क्षत्रियाणामिह धनुर्हुताशस्येन्धनानि च ।
समीपतः स्थितं तेजो बलमुच्छ्रयते भृशम् ॥ ३।९।१५

अग्नीचें तेज काष्ठाचे योगानें या लोकीं जसें वृद्धिंगत होतें, त्याप्रमाणें क्षत्रियांजवळ असलेलें धनुष्य, त्यांच्या तेजोबलाची वृद्धि करितें.

१२८ क्षत्रियैर्धार्यते चापो नार्तशब्दो भवेदिति ॥ ३।१०।३

( रक्षण होत नसल्यामुळें ) पीडित होऊन लोकांना रडत बसण्याची पाळी येऊं नये, एवढ्याचकरितां क्षत्रियांनीं धनुष्य धारण करावयाचें असतें.

१२९ क्षत्रियो निहतः संख्ये न शोच्य इति निश्चयः६।१०९।१९

क्षात्रिय रणांगणावर पडला असतां, त्याबद्दल शोक करूं नये, ही निश्चित गोष्ट आहे.

१३० क्षमया हि समायुक्तं मामयं मकरालयः ।
असमर्थं विजानाति धिक् क्षमामीदृशे जने ॥ ६।२१।२०

( समुद्रानें दर्शन दिलें नाहीं तेव्हां राम लक्ष्मणाला म्हणतो ) मीं क्षमेचें अवलंबन केलें असल्यामुळें हा समुद्र मला अशक्त समजत आहे. म्हणून अशा पुरुषाचे ठिकाणीं दर्शविलेल्या क्षमेला धिक्कार असो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१३१ गतिं खर इवाश्वस्य हंसस्येव च वायसः ।**
**नान्वेतुमुत्सहे वीर तव मार्गमरिंदम ॥ ६।१२८।५**

( भरत रामाला म्हणतो. ) हे शत्रुदमना वीरा, ज्याप्रमाणें घोड्याच्या गतीचें अनुकरण करण्यास गर्दभ असमर्थ आहे, अथवा हंसाची गति स्वीकारण्यास कावळा असमर्थ आहे. त्याप्रमाणें प्रजेचें रक्षण करण्याच्या तुझ्या मार्गाचें अवलंबन करण्यास मी असमर्थ आहें.

**१३२ गतिरेका पतिर्नार्या द्वितीया गतिरात्मजः ।**
**तृतीया ज्ञातयो राजंश्चतुर्थी नैव विद्यते ॥ २।६१।२४**

( कौसल्या दशरथाला म्हणते ) हे राजा, स्त्रियांना पहिली गति म्हणजे पति ही होय. त्यांची दुसरी गति म्हणजे पुत्र, आणि तिसरी गति म्हटली म्हणजे ज्ञाति होत. त्यांना चवथी गति ( आधार ) म्हणून नाहीं.

**१३३ गतोदके सेतुबन्धो न कल्याणि विधीयते ॥ २।९।५४**

( मंथरा कैकेयीला म्हणते ) हे कल्याणि, पाणी निघून गेल्यावर कोणी बांध घालीत नसतात.

**१३४ गर्जन्ति न वृथा शूरा निर्जला इव तोयदाः ॥६।६५।३**

शूर लोक, निर्जल मेघांप्रमाणें, व्यर्थ गर्जना करीत नसतात.

**१३५ गात्रेषु वलयः प्राप्ताः श्वेताश्चैव शिरोरुहाः ।**
**जरया पुरुषो जीर्णः किं हि कृत्वा प्रभावयेत् २।१०५।२३**

( राम भरताला सांगतो ) अवयवांवर सुरकुत्या पडतात, मस्तकावरील केस पांढरे होऊन जातात आणि जरेनें मनुष्य जीर्ण होऊन जातो. तेव्हां कोणता उपाय करून हें सर्व टाळण्याला प्राणी समर्थ होणार आहे ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१३६ गायन्ति केचित्प्रहसन्ति केचित्
नृत्यन्ति केचित्प्रणमन्ति केचित् ।
पठन्ति केचित्प्रचरन्ति केचित्
प्लवन्ति केचित्प्रलपन्ति केचित् ॥ ५।६१।१७

( सीतेचा शोध लागल्यामुळें आनंदित झालेले वानर मधुपान करून तर्र झाले ) कित्येक ( वानर ) गाऊं लागले, कित्येक हसूं लागले, कित्येक नाचूं लागले, कित्येक प्रणाम करूं लागले, कित्येक पठण करूं लागले, कित्येक संचार करूं लागले, कित्येक उड्या मारूं लागले, तर कित्येक बडबड करूं लागले.

१३७ गुणवान्वा परजनः स्वजनो निर्गुणोऽपि वा ।
निर्गुणः स्वजनः श्रेयान् यः परः पर एव सः॥६।८७।१५

( इंद्रजित् बिभीषणाला म्हणतो ) स्वजन निर्गुण असून दुसरे जरी गुणी असले तरी निर्गुणी स्वजन बरे, परंतु जे परके ते परकेच होत.

१३८ गुरुलाघवमर्थानामारम्भे कर्मणां फलम् ।
दोषं वा यो न जानाति स बाल इति होच्यते ॥ २।६३।७

कोणत्याही कर्माला आरंभ करण्याच्या वेळीं त्याच्या फलासंबंधानें उत्कृष्टानिकृष्टभाव आणि गुणदोष जो जाणीत नाहीं त्याला मूर्ख असें म्हणतात.

१३९ गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।
उत्पथं प्रतिपन्नस्य कार्यं भवति शासनम् ॥ २।२१।१३

कार्याकार्यविचार न जाणणारा, दुर्मार्गाला लागलेला, व गर्विष्ठ, अशा गुरूसही दंड करणें योग्य होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१४० गृह्यन्ते यदि रोषेण त्वादृशोऽपि विचक्षणाः ।
ततः शास्त्रविपश्चित्त्वं श्रम एव हि केवलम् ॥ ५।५२।८

( बिभीषण रावणाला म्हणतो ) तुझ्यासारखे शहाणे लोक जर क्रोधाधीन होतात, तर मग शास्त्रांमध्यें पांडित्य संपादन करणें म्हणजे केवळ वृथा श्रमच होत.

१४१ गोघ्ने चैव सुरापे च चौरे भग्नव्रते तथा ।
निष्कृतिर्विहिता सद्भिः कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥४।३४।१२

गोहत्या करणाराला, सुरापान करणाराला, चोराला, व्रतभंग करणाराला, सज्जनांनीं प्रायश्चित्त सांगितलें आहे; परंतु कृतघ्नाला प्रायश्चित्त सांगितलें नाहीं.

१४२ गोदावरीं प्रवेक्ष्यामि हीना रामेण लक्ष्मण ।
आबन्धिष्येऽथवा त्यक्ष्ये विषमे देहमात्मनः॥३।४५।३७
पिबामि वा विषं तीक्ष्णं प्रवेक्ष्यामि हुताशनम् ।
न त्वहं राघवादन्यं कदापि पुरुषं स्पृशे ॥ ३।४५।३८

( सीता म्हणते ) हे लक्ष्मणा, रामाचा वियोग झाला असतां मी गोदावरीमध्यें उडी टाकीन, गळ्याला फास लावून घेईन, कड्यावर उभी राहून तेथून आपला देह लोटून देईन, नाहींतर तीक्ष्ण विष सेवन करीन अथवा अग्नीमध्यें प्रवेश करीन. परंतु रामावांचून इतर पुरुषाला मी कधींहि स्पर्श करणार नाहीं.

१४३ गोब्राह्मणहितार्थाय देशस्य च हिताय च ।
तव चैवाप्रमेयस्य वचनं कर्तुमुद्यतः ॥ १।२६।५

( विश्वामित्र मुनींनीं ताटकेचा वध करण्याविषयीं रामाला सांगितलें असतां राम विश्वामित्रांना म्हणतो ) गोब्राह्मणांच्या हिताकरितां आणि देशाच्या कल्याणाकरितां अतर्क्य प्रभावानें युक्त जे आपण त्या आपल्या आज्ञेप्रमाणें वागण्यास मी तयार आहें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१४४ चतुर्णामाश्रमाणां हि गार्हस्थ्यं श्रेष्ठमुत्तमम् २।१०६।२२

चारही आश्रमांमध्यें गृहस्थाश्रम हाच उत्तम होय.

१४५ चन्द्रहीनमिवाकाशं तोयहीनमिवार्णवम् ।
अपश्यन्निहतानन्दं नगरं ते विचेतसः ॥ २।४७।१८

( रामाच्या पाठोपाठ गेलेले लोक खिन्न होऊन परत अयोध्येमध्यें आले त्या वेळीं ) चंद्रहीन आकाशाप्रमाणें अथवा उदकशून्य सागराप्रमाणें आनंदरहित झालेलें नगर त्या भांबावून गेलेल्या लोकांनीं अवलोकन केलें.

१४६ चारेण विदितः शत्रुः पण्डितैर्वसुधाधिपैः ।
युद्धे स्वल्पेन यत्नेन समासाद्य निरस्यते ॥ ६।२९।२२

शहाण्या राजांनीं हेरांकडून ज्याची माहिती मिळविली आहे असा शत्रु युद्धभूमीवर प्राप्त झाला असतां, अल्प प्रयत्नानें नाश पावतो.

१४७ छिन्ना भिन्ना प्रभिन्ना वा दीप्ता वाग्नौ प्रदीपिता ।
रावणं नोपतिष्ठेयं किं प्रलापेन वश्चिरम् ॥ ५।२६।१०

( सीता राक्षसस्त्रियांना म्हणते ) तुमच्या या पुष्कळ बडबडीचा उपयोग काय ? मी छिन्नभिन्न झालें असतां, माझे तुकडे तुकडे झाले असतां, मी अग्नीनें भाजून गेलें असतां, अथवा पेटलें असतांही रावणाचा स्वीकार करणार नाहीं.

१४८ जानामि शीलं ज्ञातीनां सर्वलोकेषु राक्षस ।
हृष्यन्ति व्यसनेष्वेते ज्ञातीनां ज्ञातयः सदा ॥ ६।१६।३

( रावण बिभीषणाला म्हणतो ) हे राक्षसा, त्रैलोक्यामध्यें भाऊबंदांचा स्वभाव कसा असतो, हें मी जाणीत आहें. अरे, भाऊबंदांवर संकटें आलीं असतां दुसरे भाऊबंद नेहमीं आनंद मानीत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१४९ जीवन्त्या हि स्त्रिया भर्ता दैवतं प्रभुरेव च ।।२।२४।२१

स्त्री जिवंत असतांना पति हेंच तिचें दैवत आहे, त्याचप्रमाणें तो तिचा प्रभुही आहे.

१५० जीवेच्चिरं वज्रधरस्य पश्चा-
च्छचीं प्रधृष्याप्रतिरूपरूपाम् ।
न मादृशीं राक्षस धर्षयित्वा
पीतामृतस्यापि तवास्ति मोक्षः ।। ३।४८।२४

( सीता रावणाला म्हणते ) हे राक्षसा, वज्र धारण करणाऱ्या इंद्राची जी अनुपम सौंदर्यसंपन्न भार्या शची तिचा अपहार केल्या-नंतरही कदाचित् पुष्कळ दिवसपर्यंत जिवंत राहणें शक्य आहे; परंतु बलात्कारानें मजसारख्या रामभार्येला हरण करून नेल्यावर तूं जरी अमृतपान केलेंस तरी मृत्यूपासून तुझी सुटका होणार नाहीं.

१५१ जेतव्यमिति काकुत्स्थो मर्तव्यमिति रावणः ।
धृतौ स्ववीर्यसर्वस्वं युद्धेऽदर्शयतां तदा ।। ६।१०७।७

रामानें जिंकण्याचा व रावणानें मरण्याचा निश्चय करून आपलें सर्व कांहीं सामर्थ्य त्या वेळीं युद्धामध्यें प्रगट केलें.

१५२ ज्येष्ठो भ्राता पिता वापि यश्च विद्यां प्रयच्छति ।
त्रयस्ते पितरो ज्ञेया धर्मे च पथि वर्तिनः ।।४।१८।१३

( राम वालीला म्हणतो ) वडील बंधु, पिता आणि जो विद्या शिकवितो तो हे तिघेजण, धर्ममार्गानें चालणाऱ्याचे पिते आहेत असें समजलें पाहिजे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१५३ तडित्पताकाभिरलंकृताना-
मुदीर्णगम्भीरमहारवाणाम् ।
विभान्ति रूपाणि बलाहकानां
रणोत्सुकानामिव वानराणाम् ॥ ४।२८।३१

( वर्षाकालाचें वर्णन ) ज्यांच्याकडून गंभीर आणि मोठा शब्द उच्चारला जात आहे, अशीं हीं विद्युल्लतारूप पताकांनीं शोभणारीं मेघांचीं रूपें युद्धार्थ उत्सुक झालेल्या वानरांसारखीं शोभत आहेत.

१५४ ततः सुमन्त्रेण गुहेन चैव
समीयतू राजसुतावरण्ये ।
दिवाकरश्चैव निशाकरश्च
यथाम्बरे शुक्रबृहस्पतिभ्याम् ॥ २।९९।४१

( भरत शत्रुघ्न वनामध्यें असलेल्या रामाला भेटले ) नंतर सूर्य आणि चंद्र हे जसे आकाशांत शुक्र आणि बृहस्पति यांच्याशीं संयुक्त होतात ( भेटतात ), त्याप्रमाणें ते राजपुत्र-रामलक्ष्मण-अरण्यांत सुमंत्र ( प्रधान ) आणि गुह यांना भेटले.

१५५ तदद्भुतं स्थैर्यमवेक्ष्य राघवे
समं जनो हर्षमवाप दुःखितः ।
न यात्ययोध्यामिति दुःखितोऽभवत्
स्थिरप्रतिज्ञत्वमवेक्ष्य हर्षितः ॥ २।१०६।३४

रामाच्या आंगचें ( पितृवचनपालनरूप ) अद्भुत स्थैर्य पाहून लोकांना दुःख झालें, तसाच हर्षही झाला. रामचंद्र अयोध्येला येत नाहीं, म्हणून दुःख झालें, त्याप्रमाणें त्याच्या प्रतिज्ञेची स्थिरता पाहून त्यांना हर्ष झाला.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१५६ तद्ब्रूहि वचनं देवि राज्ञो यदभिकाङ्क्षितम् ।
करिष्ये प्रतिजाने च रामो द्विर्नाभिभाषते ॥ २।१८।३०

( राम म्हणतो ) देवि ( कैकेयि, ) राजाच्या मनांत जो कांहीं अभिप्राय असेल, तो सांग. राम कधींही ( परस्परविरुद्ध ) दोनदां बोलत नसतो.

१५७ तन्मे दहति गात्राणि विषं पीतमिवाशये ।
हा नाथेति प्रिया सा मां ह्रियमाणा यदब्रवीत् ॥ ६।५।७

( राम लक्ष्मणाला म्हणतो ) उदरामध्यें विष घेतलें असतां तें ज्याप्रमाणें गात्रें दग्ध करून टाकितें, त्याप्रमाणें रावण हरण करून नेत असतांना 'हे नाथ' असें जें ती सीता मला उद्देशून म्हणाली तें म्हणणें माझीं गात्रें दग्ध करीत आहे.

१५८ तपते यजते चैव
यच्च दानं प्रयच्छति ।
क्रोधेन सर्वं हरति
तस्मात्क्रोधं विसर्जयेत् ॥ ७।५९ प्र. २।२२

मनुष्य जें कांहीं तप करितो, यजन करितो, अथवा दान देतो, त्या सर्वांचा क्रोध नाश करितो; म्हणून क्रोधाचा त्याग करावा.

१५९ तपो हि परमं श्रेयः संमोहमितरत्सुखम् ॥ ७।८४।९

तप हें परम कल्याण करणारें आहे; इतर सुख मोह पाडणारें आहे.

१६० तीक्ष्णकामास्तु गन्धर्वास्तीक्ष्णकोपा भुजंगमाः ।
मृगाणां तु भयं तीक्ष्णं ततस्तीक्ष्णक्षुधा वयम् ॥४।५९।९

( गृध्रराज संपाति वानरांना म्हणतो ) ज्याप्रमाणें गंधर्वांची कामवासना तीक्ष्ण असते, सर्पांचा क्रोध तीक्ष्ण असतो आणि मृगांचें भय तीक्ष्ण असतें त्याप्रमाणें आम्हां गृध्रपक्ष्यांची क्षुधा तीक्ष्ण असते.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१६१ तीक्ष्णमल्पप्रदातारं प्रमत्तं गर्वितं शठम् ।
व्यसने सर्वभूतानि नाभिधावन्ति पार्थिवम्॥३।३३।१५

जो (आपल्या प्रधानादिकांशीं) कठोरपणानें वागतो, त्यांस वेतन वगैरे स्वल्प प्रमाणानें देतो, जो उन्मत्तपणें वागतो, गर्व धारण करितो, गुप्तपणें लोकांचें अहित करितो, अशा राजावर संकट आलें असतां, त्याच्या संरक्षणाकरितां कोणीही-त्याचे स्वजनही-धावून येत नाहींत.

१६२ त्वद्विधा न हि शोचन्ति सततं सर्वदर्शनाः ।
सुमहत्स्वपि कृच्छ्रेषु रामानिर्विण्णदर्शनाः ॥ ३।६६।१४

(लक्ष्मण म्हणतो) हे रामा, तुझ्यासारखे सर्वज्ञानसंपन्न लोक, केवढींही मोठीं संकटें आलीं, तरी विषादरहित असतात. कधींही शोक करीत नाहींत.

१६३ त्वं तु बालस्वभावश्च बुद्धिहीनश्च राक्षस ।
ज्ञातव्यं तं न जानीषे कथं राजा भविष्यसि ॥ ३।३३।८

(शूर्पणखा रावणाला म्हणते.) हे राक्षसा, तुझा बालस्वभाव अजून गेला नाहीं. तूं बुद्धिहीन आहेस. जें जाणण्यास योग्य तें तूं जाणत नाहींस. तूं राजा कसा होणार?

१६४ त्वं पुनर्जम्बुकः सिंहीं मामिहेच्छसि दुर्लभाम् ।
नाहं शक्या त्वया स्प्रष्टुमादित्यस्य प्रभा यथा ३।४७।३७

(सीता रावणाला म्हणते) तूं तर कोल्हा असून दुर्लभ अशा सिंहपत्नीची-माझी-इच्छा करीत आहेस; सूर्यापासून सूर्यप्रभा वेगळी करून स्पर्श करणें जसें शक्य नाहीं, त्याप्रमाणें तूं मला स्पर्श करणें ही गोष्ट शक्य नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१६५ दण्ड एव परो लोके पुरुषस्येति मे मतिः ।
धिक्क्षमामकृतज्ञेषु सान्त्वं दानमथापि वा ॥ ६।२२।४६

(नल वानर रामाला म्हणतो अकृतज्ञ अनुपकारी पुरुषाला) दंड करणें, ही गोष्ट पुरुषाची मोठी कार्यसिद्धि घडवून आणणारी आहे, असें मला वाटतें. कृतघ्नाला क्षमा करणें, सामोपचाराच्या गोष्टी सांगणें, किंवा दान करणें, हें धिक्कारास्पद आहे.

१६६ दद्यान्न प्रतिगृह्णीयात्सत्यं ब्रूयान्न चानृतम् ।
अपि जीवितहेतोर्हि रामः सत्यपराक्रमः ॥ ५।३३।२५

(लंकेमध्यें अशोक वनांत सीता दृष्टीस पडल्यावर तिच्यापुढें मारुतीनें श्रीरामचंद्राचे गुण वर्णन केले) सत्यपराक्रमी राम दान करील, प्रतिग्रह करणार नाहीं; सत्यभाषण करील, असत्य बोलणार नाहीं. किंबहुना जीविताचाही त्याग करील, परंतु सत्य सोडणार नाहीं.

१६७ दीनो वा राज्यहीनो वा यो मे भर्ता स मे गुरुः ।
तं नित्यमनुरक्तास्मि यथा सूर्यं सुवर्चला ॥ ५।२४।९

(सीता रावणाला म्हणते) माझा भर्ता, मग तो दीन असो, अगर राज्यहीन असो, तो मला पूज्य आहे. ज्याप्रमाणें सूर्यपत्नी सुवर्चला सूर्याचे ठिकाणीं अनुरक्त असते, त्याप्रमाणें मी नेहमीं त्या रामाचेच ठिकाणीं अनुरक्त आहें.

१६८ दीप्तमग्निमरण्यं वा यदि रामः प्रवेक्ष्यति ।
प्रविष्टं तत्र मां देवि त्वं पूर्वमवधारय ॥ २।२१।१७

(लक्ष्मण कौसल्येला म्हणतो) हे देवि, प्रज्वलित अग्नींत, अथवा अरण्यांत जर राम प्रवेश करील, तर त्याच्या आधींच मी त्या ठिकाणीं प्रवेश करीन हें तूं पक्कें समज.

१६९ दुःखितः सुखितो वापि सख्युर्नित्यं सखा गतिः ४।८।४०

दुःखी असो, अगर सुखी असो, मित्राला मित्रच गति होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१७० दुःखे मे दुःखमकरोर्व्रणे क्षारमिवाददाः ।
राजानं प्रेतभावस्थं कृत्वा रामं च तापसम् ॥ २।७३।३

( भरत कैकेयीला म्हणतो ) राजाला ठार मारून व रामाला तपस्वी करवून, व्रणावर क्षाराचें सिंचन करावें, त्याप्रमाणें तूं माझ्या दुःखावर दुःखाची डागणी दिली आहेस.

१७१ दुर्बलस्य त्वनाथस्य
राजा भवति वै बलम् ॥ ७।५९ प्र. ३।२२

दुर्बल व अनाथ यांचें बल म्हटलें म्हणजे राजा होय.

१७२ दुर्लभं हि सदा सुखम् ॥ २।१८।१३

नेहमीं सुख मिळणें म्हणजे दुर्लभ आहे.

१७३ दुर्लभस्य च धर्मस्य जीवितस्य शुभस्य च ।
राजानो वानरश्रेष्ठ प्रदातारो न संशयः ॥ ४।१८।४२

( राम वालीला म्हणतो ) हे वानरश्रेष्ठा, दुर्लभ धर्म, जीवित आणि कल्याण यांची ( प्रजेला ) प्राप्ति करून देणारे राजेच आहेत यांत संशय नाहीं.

१७४ दुःशीलः कामवृत्तो वा धनैर्वा परिवर्जितः ।
स्त्रीणामार्यस्वभावानां परमं दैवतं पतिः ॥२।११७।२४

वाईट आचरणाचा, स्वेच्छाचारी किंवा धनहीन असा जरी पति असला, तरी तो सुस्वभावी स्त्रियांना परम दैवतच होय.

१७५ दृश्यमाने भवेत्प्रीतिः सौहृदं नास्त्यदृश्यतः ।
नाशयन्ति कृतघ्नास्तु न रामो नाशयिष्यति॥५।२६।३९

( लंकेमध्यें कारागृहांत पडलेली सीता विचार करते ) दृष्टीसमोर असलेल्या मनुष्याचे ठिकाणीं प्रेम कायम असतें. तेंच मनुष्य दृष्टीआड झालें असतां त्याच्यासंबंधानें प्रेम कायम रहात नाहीं. परंतु ( सांप्रत असेंही म्हणतां येणार नाहीं.) कारण कृतघ्न पुरुष दृष्टीआड झालेल्या मनुष्यावरील प्रेम नाहींसें करतात, तसें राम करणार नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१७६ दृष्टपूर्वं न ते रूपं पादौ दृष्टौ तवानघे ।
कथमत्र हि पश्यामि रामेण रहितां वने ॥ ७।४८।२२

( ' तूं माझ्याकडे समक्ष बघून जा ' असें सीतेनें लक्ष्मणाला सांगितलें असतां लक्ष्मण सीतेला म्हणतो) हे निष्पापे ( सीते, ) तुझें रूप मीं पूर्वी पाहिलेलें नाहीं. तुझे चरण मात्र मीं पाहिलेले आहेत. ह्या वनांत राम संनिध नसतांना मी तुझ्याकडे कसा बरें पाहूं ?

१७७ दृष्टा देवीति हनुमद्वदनादमृतोपमम् ।
आकर्ण्य वचनं रामो हर्षमाप सलक्ष्मणः ॥ ५।६४।४३

हनुमंताच्या तोंडून आपण देवी ( सीता ) पाहिली, असें अमृततुल्य वचन ऐकून लक्ष्मणाला व रामाला परम हर्ष झाला. ( आनंदाची वार्ता लौकर समजावी, अशी सर्वांना स्वाभाविक उत्सुकता असते, म्हणून मारुतीनें वाक्य उच्चारतांना देखील त्यांतल्या त्यांत जो महत्त्वाचा शब्द ' दृष्टा ' हाच आरंभीं उच्चारला आहे. )

१७८ देशकालविहीनानि कर्माणि विपरीतवत् ।
क्रियमाणानि दुष्यन्ति हवींष्यप्रयतेष्विव ॥ ६।६३।६

अयोग्य ठिकाणीं व अयोग्यवेळीं घडणारीं विपरीतकर्में असंस्कृत अग्नीमध्यें टाकलेल्या हविर्द्रव्याप्रमाणें दुःखाला कारणीभूत होतात.

१७९ देशे देशे कलत्राणि देशे देशे च बान्धवाः ।
तं तु देशं न पश्यामि यत्र भ्राता सहोदरः ॥६।१०१।१४
किंतु राज्येन दुर्धर्ष लक्ष्मणेन विना मम ।
कथं वक्ष्याम्यहं त्वम्बां सुमित्रां पुत्रवत्सलाम् ॥
६।१०१।१५

( युद्धामध्यें रावणानें लक्ष्मणाला पाडिलें असतां राम शोक करितो. ) ठिकठिकाणीं भार्या आहेत व ठिकठिकाणीं बांधवही आहेत; परंतु लक्ष्मणासारखा भ्राता कोठें दृष्टीस पडेल असें मला वाटत नाहीं. हे अजिंक्य, तुज लक्ष्मणावांचून मला राज्याशीं काय कर्तव्य आहे ? पुत्रवत्सल सुमित्रा मातेला मी आतां काय बरें सांगूं ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१८० दैवतं हि पतिः स्त्रियाः ॥ ७।९५।१०

स्त्रीचें दैवत म्हणजे पति होय.

१८१ दैवं पुरुषकारेण यः समर्थः प्रबाधितुम् ।
न दैवेन विपन्नार्थः पुरुषः सोऽवसीदति ॥ २।२३।१८

जो पुरुष आपल्या पराक्रमानें दैवाचा निरास करण्यास समर्थ असतो, त्याचा दैवानें कार्यनाश झाला, तरी तो खचून जात नाहीं.

१८२ द्विधा भज्येयमप्येवं न नमेयं तु कस्यचित् ।
एष मे सहजो दोषः स्वभावो दुरतिक्रमः ॥ ६।३६।११

( रावण माल्यवान् राक्षसाला म्हणतो ) प्रसंग पडल्यास माझ्या ( कळकाप्रमाणें ) दोन चिरफळ्याही होऊन जातील परंतु मी कोणाच्याही पुढें नम्र होणार नाहीं. हा माझा स्वाभाविक दोष आहे. परंतु स्वभाव पालटतां येणें अशक्य आहे.

१८३ धनत्यागः सुखत्यागो देशत्यागोऽपि वानघ ।
वयस्यार्थे प्रवर्तन्ते स्नेहं दृष्ट्वा तथाविधम् ॥ ४।८।९

( सुग्रीव रामाला म्हणतो ) हे निष्पापा, तशा प्रकारचा स्नेह पाहून, त्या स्नेह्याकरितां द्रव्याचा, सुखाचा किंवा देशाचाही त्याग केला जातो.

१८४ धन्याः खलु महात्मानो ये बुद्ध्या कोपमुत्थितम् ।
निरुन्धन्ति महात्मानो दीप्तमग्निमिवाम्भसा ॥५।५५।३

प्रदीप्त झालेला अग्नि ज्याप्रमाणें उदकानें विझवून टाकितात, त्याप्रमाणें उत्पन्न झालेला क्रोध जे महात्मे आपल्या बुद्धीनें नाहींसा करतात ते खरोखर धन्य होत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१८५ धर्ममर्थं च कामं च काले यस्तु निषेवते ।
विभज्य सततं वीर स राजा हरिसत्तम ॥ ४।३८।२१

( राम सुग्रीवाला म्हणतो ) हे वानरश्रेष्ठ वीरा, जो धर्म, अर्थ आणि काम यांचें कालविभागानें त्या त्या काळीं सेवन करितो तोच ( खरा ) राजा होय.

१८६ धर्मलोपो महांस्तावत्कृते ह्यप्रतिकुर्वतः ।
अर्थलोपश्च मित्रस्य नाशे गुणवतो महान् ॥४।३३।४७

उपकाराबद्दल प्रत्युपकार न करणाऱ्याच्या हातून मोठा धर्मलोप होतो. त्यामुळें गुणवान् मित्राच्या मैत्रीचा नाश होऊन मोठी अर्थहानिही होते.

१८७ धर्मात्प्रच्युतशीलं हि पुरुषं पापनिश्चयम् ।
त्यक्त्वा सुखमवाप्नोति हस्तादाशीविषं यथा॥६।८७।२२

हातांतून सर्पास टाकिलें असतां जसें सुख होतें, त्याचप्रमाणें धर्मभ्रष्ट पापमति पुरुषाचा त्याग केला असतां सुख होतें.

१८८ धर्मादर्थः प्रभवति धर्मात्प्रभवते सुखम् ।
धर्मेण लभते सर्वं धर्मसारमिदं जगत् ॥ ३।९।३०

धर्मापासून अर्थलाभ होतो, धर्मापासून सुख होतें. धर्मापासून सर्व कांहीं प्राप्त होतें. हें जग म्हणजे धर्माच्या आश्रयावर आहे.

१८९ धर्मेण राष्ट्रं विन्देत धर्मेणैवानुपालयेत् ।
धर्माच्छरण्यतां याति राजा सर्वभयापहः॥७।५९प्र.२।१५

धर्मानें राजाला राष्ट्र प्राप्त होत असून धर्माच्याच योगानें तो प्रजेचें परिपालन करण्यास समर्थ होतो. धर्माच्याच योगानें राजा सर्व भयांचें निवारण करणारा होत असल्यामुळें शरण जाण्यास तो योग्य होत असतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१९० धर्मो हि परमो लोके धर्मे सत्यं प्रतिष्ठितम् ॥२।२१।४१

लोकांमध्यें धर्म हा अत्यंत श्रेष्ठ आहे, आणि धर्माच्याच ठिकाणीं सत्य प्रतिष्ठित आहे.

१९१ धर्मो हि श्रूयते पक्ष अमराणां महात्मनाम् ।
अधर्मो रक्षसां पक्षो ह्यसुराणां च राक्षस ॥ ६।३५।१४

( मातामह माल्यवान् रावणाला म्हणतो ) हे राक्षसा, धर्म हा महात्म्या देवांचा पक्ष आहे, आणि अधर्म हा राक्षस आणि असुर यांचा पक्ष आहे, असें ऐकण्यांत येतें.

१९२ धर्षितं मर्षणीयं च चेष्टितं कृतकर्मणाम् ॥ ५।६३।३०

( सुग्रीव दधिमुखाला म्हणतो. सीतेचा शोध लागल्यामुळें आनंदित झालेल्या वानरांनीं मधुवन फस्त करून टाकिलें.) हे वानर कृतकार्य असल्यामुळें, त्यांची दांडगाई आणि त्यांच्या चेष्टा क्षम्य आहेत.

१९३ धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मेण विधृताः प्रजाः ।
यस्माद्धारयते सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ॥७।५९।प्र.२।७

धारणामुळें ' धर्म ' असें नांव प्राप्त झालें आहे. प्रजा धर्मानें धारण केल्या जातात, याच कारणास्तव सर्व स्थावरजंगम त्रैलोक्याचें धारण धर्म करीत असतो.

१९४ धारणाद्विद्विषां चैव धर्मेणारञ्जयन्प्रजाः ।
तस्माद्धारणमित्युक्तं स धर्म इति निश्चयः ॥७।५९प्र.२।८

शत्रूंचें-अधर्माचें-नियमन करून व न्यायाला अनुसरून धर्म, प्रजांचें अनुरंजन करीत असतो. असा जो धर्म त्यासच ' धारण ' असें निश्चित म्हटलें आहे.

१९५ धिगस्तु परवश्यताम् ॥ ५।२५।२०

परवशतेला धिक्कार असो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१९६ धिगस्तु योषितो नाम शठाः स्वार्थपरायणाः ।
न ब्रवीमि स्त्रियः सर्वा भरतस्यैव मातरम्॥२।१२।१००

( दशरथ म्हणतो ) ज्या स्वार्थपरायण लबाड स्त्रिया आहेत, त्यांना धिक्कार असो. सर्व स्त्रियांविषयीं मी बोलत नाहीं. भरताच्या मातेला मात्र माझें बोलणें लागू आहे.

१९७ धुरमेकाकिनां न्यस्तां वृषभेण बलीयसा ।
किशोरवद्गुरुं भारं न वोढुमहमुत्सहे ॥६।१२८।३

( भरत रामाला म्हणतो ) ज्याप्रमाणें एकाद्या बलिष्ठ बैलानें आपल्या खांद्यावरील जोखडाचा मोठा भार ( जवळील ) कोंवळया गोऱ्ह्यावर लादला असतां तो त्या वत्साच्यानें वाहवत नाहीं, तसा मी हा मोठा राज्यभार वाहण्यास उत्साह पावत नाहीं.

१९८ धृतिप्रवालः प्रसभाग्र्यपुष्प-
स्तपोबलः शौर्यनिबद्धमूलः ।
रणे महाराक्षसराजवृक्षः
संमर्दितो राघवमारुतेन ॥ ६।१०९।१०

( रणांगणांत रावण मरून पडल्यानंतर बिभीषण म्हणतो ) धैर्य हेच ज्याचे कोमल पल्लव, हट्ट हेंच ज्याचें उत्कृष्ट पुष्प, तप हेंच ज्याचें बल आणि शौर्य हेंच ज्याचें खोल गेलेलें मूळ, असा राक्षसराजरूप प्रचंड वृक्ष रणामध्यें रामरूप वायूनें उलथून पाडिला.

१९९ न कश्चिन्नापराध्यति ॥ ४।३६।११

ज्याच्याकडून अपराध घडत नाहीं, असा कोणी नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२०० न कालस्यास्ति बन्धुत्वं न हेतुर्न पराक्रमः ।**
**न मित्रज्ञातिसम्बन्धः कारणं नात्मनो वशः ॥४।२५।७**

कालाला बंधुत्व नाहीं, त्याला कोणत्याही कारणाची गरज लागत नाहीं; त्याला फिरविण्यास पराक्रम समर्थ होत नाहीं, मित्र व ज्ञातिजन यांचा संबंधही त्याला लागत नाहीं, तो कोणाच्याही अधीन राहत नाहीं.

**२०१ न कालादुत्तरं किंचित्परं कर्म उपासितुम् ॥ ४।२५।३**

वेळ निघून गेली म्हणजे कोणतेंही सत्कर्म करितां येत नाहीं.

**२०२ न कुलेन न रूपेण**
**न दाक्षिण्येन मैथिली ।**
**मयाधिका वा तुल्या वा**
**तत्तु मोहान्न बुध्यसे ॥ ६।१११।२८**

( मरण पावलेल्या रावणाकडे पाहून त्याची स्त्री मंदोदरी विलाप करते ) कुलानें, रूपानें अथवा सरळस्वभावानें सीता माझ्यापेक्षां जास्त नाहीं, इतकेंच नव्हे, तर माझ्या बरोबरीचीही नाहीं; परंतु मोहामुळें तुला या गोष्टीचा उमज पडला नाहीं.

**२०३ न खल्वद्यैव सौमित्रे**
**जीवितं जाह्नवीजले ।**
**त्यजेयं राजवंशस्तु**
**भर्तुर्मे परिहास्यते ॥ ७।४८।८**

( सीता म्हणते ) हे लक्ष्मणा, गंगेच्या पाण्यांत मी आज प्राणत्याग करीत नाहीं. तसें केल्यास ( मी गर्भवती असल्याकारणानें ) पतीचा राजवंश नष्ट होईल.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२०४ नखैस्तुदन्तो दशनैर्दशन्त-
स्तलैश्च पादैश्च समापयन्तः ।
मदात्कपिं ते कपयः समन्ता-
न्महावनं निर्विषयं च चक्रुः ॥ ५।६१।२४

( सीतेचा शोध लागल्यामुळें आनंदित झालेले वानर दधिमुखानें रक्षण केलेल्या मधुवनांत शिरले व त्याला न जुमानतां तेथें त्यांनीं धुमाकूळ घातला. ) कांहीं जण नखांनीं त्या दधिमुखाचे बोचकारे काढूं लागले, कांहींजण दांतांनीं त्याला चावूं लागले, आणि कांहींजण चपराकांनीं व लाथांनीं त्याला मृतप्राय करूं लागले. असो. अशा रीतीनें मद चढल्यामुळें त्या वानरांनीं त्या सर्व महावनांतील यत्किंचितही योग्य वस्तु शिल्लक ठेविली नाहीं.

२०५ न च कर्मसु सीदन्ति महत्स्वमिततेजसः ॥ ५।६८।१९

महातेजस्वी लोक मोठ्या कामांत कधींही श्रम पावत नाहींत. ( खचून जात नाहींत. )

२०६ न च पश्यामि सदृशं पृथिव्यां तव किंचन ।
सदृशं यत्प्रियाख्याने तव दत्त्वा भवेत्सुखम् ६।११३।१९

( रामानें रावणाचा वध केला ही आनंदाची वार्ता मारुतीच्या मुखांतून ऐकल्यावर सीता म्हणते हे मारुते, ) तूं जी प्रियवार्ता कथन केलीस, त्याबद्दल योग्य देणगी तुला देऊन सुख पावेन, अशी एकही वस्तु पृथ्वीवर मला दिसत नाहीं.

२०७ न च सीता त्वया हीना न चाहमपि राघव ।
मुहूर्तमपि जीवावो जलान्मत्स्याविवोद्धृतौ ॥ २।३५।३१

( लक्ष्मण म्हणतो ) हे राघवा, उदकांतून बाहेर काढलेले मासे ज्याप्रमाणें जिवंत राहणें अशक्य आहे, त्याचप्रमाणें तुझा वियोग झाला असतां, सीतेला अथवा मला थोडावेळही जिवंत राहणें अशक्य आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२०८ न चातिप्रणयः कार्यः कर्तव्योऽप्रणयश्च ते ।
उभयं हि महादोषं तस्मादन्तरदृग्भव ॥ ४।२२।२३

( सुग्रीवाबरोबर कसें वागावें याविषयीं मरणोन्मुख वाली आपल्या अंगद पुत्राला उपदेश करतो. ) सुग्रीवाशीं तूं अति लगटपणाही करूं नकोस, व तुटकपणानेंही वागूं नकोस; कारण हीं दोन्हीं मोठीं अनर्थावह आहेत. म्हणून तूं मध्यम मार्गाकडे लक्ष देऊन वागत जा.

२०९ न चिरं पापकर्माणः क्रूरा लोकजुगुप्सिताः ।
ऐश्वर्यं प्राप्य तिष्ठन्ति शीर्णमूला इव द्रुमाः ॥३।२९।७

ज्यांचीं मुळें छिन्न झालीं आहेत, असे वृक्ष वांचत नाहींत; त्याप्रमाणें जे क्रूर असून पापकर्में करणारे असतात, व तेणेंकरून लोकनिंदेस पात्र झालेले असतात, त्यांस ऐश्वर्य प्राप्त झालें, तरी त्याचा ते चिरकाल उपभोग घेऊं शकत नाहींत.

२१० न चिरात्प्राप्यते लोके पापानां कर्मणां फलम् ।
सविषाणामिवान्नानां भुक्तानां क्षणदाचर ॥ ३।२९।९

( राम खर राक्षसाला म्हणतो ) हे निशाचरा, भक्षण केलेल्या सविष अन्नाचें फल प्राप्त होण्यास जसा फार वेळ लागत नाहीं, तसा जगामध्यें पापकर्माचें फळ प्राप्त होण्यास फार वेळ लागत नाहीं.

२११ न तत्कुर्यादसिस्तीक्ष्णः सर्पो वा व्याहतः पदा ।
अरिर्वा नित्यसंक्रुद्धो यथात्मा दुरनुष्ठितः॥७।५९प्र.२।२५

कुमार्गाला लागलेलें मन ज्याप्रमाणें घात करतें, त्याप्रमाणें तीक्ष्ण खड्ग, शेपटीवर पाय दिलेला सर्प किंवा नेहमीं क्रुद्ध असलेला शत्रुदेखील घात करीत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२१२ न तत्समाचरेद्धीरो यत्परोऽस्य विगर्हयेत् ।
यथात्मनस्तथान्येषां दारा रक्ष्या विमर्शनात्॥३।५०।८

( जटायु रावणाला म्हणतो ) दुसरा ज्याला नांव ठेवील तें कर्म विचारी पुरुषानें कधींही करूं नये. आपल्या स्त्रीप्रमाणेंच परस्त्रीचेंही परपुरुषाच्या स्पर्शापासून रक्षण केलें पाहिजे.

२१३ न तं पश्याम्यहं लोके परोक्षमपि यो नरः ।
स्वमित्रोऽपि निरस्तोऽपि योऽस्य दोषमुदाहरेत्॥२।२१।५

( लक्ष्मण कौसल्येला म्हणतो ) अपमान करून सोडलेला हाडवैरी जरी झाला, तरी रामाच्या मागेंसुद्धां त्याचा दोष काढणारा पुरुष या जगतामध्यें कोणी असेलसा मला दिसत नाहीं.

२१४ न तु सद्योऽविनीतस्य दृश्यते कर्मणः फलम् ।
कालोऽप्यङ्गीभवत्यत्र सस्यानामिव पक्तये ॥३।४९।२७

बेफामपणें केलेल्या कृत्याचें फळ तावडतोब दृष्टीस पडत नाहीं. कारण धान्यें परिपक्क होण्यास ज्याप्रमाणें कालाची अपेक्षा आहे, त्याप्रमाणें कर्माचें फल प्राप्त होण्यास कालाची अपेक्षा आहे.

२१५ न ते मनुष्या देवास्ते ये चारु शुभकुण्डलम् ।
मुखं द्रक्ष्यन्ति रामस्य वर्षे पञ्चदशे पुनः ॥ २।६४।६८

( मरणोन्मुख दशरथराजा म्हणतो ) रामचंद्राचें सुंदर कुंडलमंडित मनोहर मुख पंधराव्या वर्षी जे पुनः पाहातील, ते मनुष्य नव्हेत, तर साक्षात् देव होत.

२१६ न त्वां पश्यामि कौसल्ये साधु मां पाणिना स्पृश ।
रामं मेऽनुगता दृष्टिरद्यापि न निवर्तते ॥ २।४२।३४

( राम वनवासाला गेल्यामुळें दुःखी झालेला दशरथराजा मध्यरात्रीं कौसल्येला म्हणतो. ) हे कौसल्ये, तूं मला दिसत नाहींस. तूं मला आपल्या हस्तानें स्पर्श कर बरें ! माझी दृष्टि रामाच्या बरोबर गेली आहे, ती त्यापासून निवृत्त होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२१७ न त्वेवानागते काले देहाच्च्यवति जीवितम् ॥२।३९।५

काल प्राप्त झाल्याशिवाय देहापासून जीवित नष्ट होत नाहीं.

२१८ न दूतवध्यां प्रवदन्ति सन्तो
दूतस्य दृष्टा बहवो हि दण्डाः ॥ ५।५२।१४

दूताचा वध करण्यास सज्जनांनीं सांगितलें नाहीं. दूताला इतर दंड सांगितले आहेत.

२१९ न देशकालौ हि यथार्थधर्मा-
ववेक्षते कामरतिर्मनुष्यः ॥ ४।३३।५५

कामासक्त झालेल्या मनुष्याला देशकालांचें भान राहात नाहीं आणि तो धर्म व अर्थ या पुरुषार्थांचीही पर्वा करीत नाहीं.

२२० न नूनं चात्मनः श्रेयः पथ्यं वा समवेक्षसे ।
मृत्युकाले यथा मर्त्यो विपरीतानि सेवते ॥ ३।५३।१७

( सीता रावणाला म्हणते ) स्वतःला कोणती गोष्ट तात्काल किंवा परिणामीं सुखावह होणारी आहे, याचा विचार तूं खरोखर मुळींच करीत नाहींस. मृत्यु समीप आलेला मनुष्य ज्याप्रमाणें विपरीत कृत्यांचें अवलंबन करूं लागतो, त्याप्रमाणें तूं करीत आहेस.

२२१ नन्दन्त्युदित आदित्ये नन्दन्त्यस्तमितेऽहनि ।
आत्मनो नावबुध्यन्ते मनुष्या जीवितक्षयम् ॥२।१०५।२४

सूर्योदय झाला असतां मनुष्यें आनंदित असतात, आणि दिवस अस्ताला गेला असतांही आनंदीच असतात. परंतु आपल्या जीविताचा क्षय होत आहे, हें त्यांना समजत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२२२ न परेणाहृतं भक्ष्यं व्याघ्रः खादितुमिच्छति ।
एवमेव नरव्याघ्रः परलीढं न मन्यते ॥२।६१।१६

( कौसल्या दशरथाला म्हणते ) ज्याप्रमाणें व्याघ्र दुसऱ्यानें आणिलेलें भक्ष्य खाण्याची इच्छा करीत नाहीं, त्याचप्रमाणें श्रेष्ठ पुरुष दुसऱ्याचें उष्टें कधीं घेत नाहीं.

२२३ न पापानां वधे पापं विद्यते शत्रुसूदन ॥ ५।५२।११

( रावण बिभीषणाला म्हणतो ) हे शत्रुनाशका, पाप्याचा वध करण्यांत पाप कधींही लागत नाहीं.

२२४ न पिता नात्मजो वात्मा न माता न सखीजनः ।
इह प्रेत्य च नारीणां पतिरेको गतिः सदा ॥२।२७।६

( सीता रामाला म्हणते ) इहलोकीं, आणि परलोकींही स्त्रियांस पिता, पुत्र, आत्मा ( स्वतः ती, ) माता, किंवा सख्या ह्यांतून एकही गति नसून त्यांची गति म्हणजे एक पतिच होय.

२२५ न पित्र्यमनुवर्तन्ते मातृकं द्विपदा इति ।
ख्यातो लोकप्रवादोऽयं भरतेनान्यथा कृतः॥३।१६।३४

मनुष्यें पित्याच्या स्वभावाचें अनुकरण न करितां मातेच्या स्वभावाचें अनुकरण करितात, म्हणून लोकांत प्रसिद्धि आहे, ती भरतानें खोटी करून दाखविली. ( भरत कैकेयीच्या वळणावर गेला नाहीं. )

२२६ न बुद्धिपूर्वं नाबुद्धं स्मरामीह कदाचन ।
मातृणां वा पितुर्वाहं कृतमल्पं च विप्रियम् ॥२।२२।८

( राम लक्ष्मणाला म्हणतो ) मातांना अथवा पित्याला अप्रिय असलेली क्षुल्लकही गोष्ट समजून अथवा न समजून कधींही केल्याचें मला स्मरत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२२७ न मे दुःखं प्रिया दूरे न मे दुःखं हृतेति च ।
एतदेवानुशोचामि वयोऽस्या ह्यतिवर्तते ॥ ६।५।५

(राम लक्ष्मणाला म्हणतो) प्रिया दूर झाली म्हणून मी शोक करीत नाहीं किंवा तिचें शत्रूनें हरण केलें म्हणूनही मला दुःख नाहीं; परंतु हिचा आयुष्यकाल फुकट जात आहे, म्हणून मला दुःख होत आहे.

२२८ नयनाभ्यां प्रसुप्तो वा जागर्ति नयचक्षुषा ।
व्यक्तक्रोधप्रसादश्च स राजा पूज्यते जनैः ॥३।३३।२१

(शूर्पणखा रावणाला म्हणते) डोळे मिटून निजला तरी न्यायदृष्टि उघडी ठेवून जो जागत असतो, आणि योग्य ठिकाणींच ज्याचा क्रोध व कृपा हीं व्यक्त होत असतात, त्याच राजाला लोक मान देत असतात.

२२९ न राज्यभ्रंशनं भद्रे न सुहृद्भिर्विनाभवः ।
मनो मे बाधते दृष्ट्वा रमणीयमिमं गिरिम् ॥ २।९४।३

( राम चित्रकूट पर्वताची शोभा सीतेला दाखवितो ) हे कल्याणि, हा रमणीय पर्वत अवलोकन करून राज्यभ्रंश आणि सुहृदांचा वियोग यांच्या योगानें माझ्या मनाला पीडा होत नाहीं.

२३० न रामः परदारान्स चक्षुर्भ्यामपि पश्यति ॥ २।७२।४८

( कैकेयी भरताला म्हणते ) तो राम परस्त्रीकडे कधीं डोळ्यांनीं पहात देखील नाहीं.

२३१ नवमासधृतं गर्भं भास्करस्य गभस्तिभिः ।
पीत्वा रसं समुद्राणां द्यौः प्रसूते रसायनम् ॥ ४।२८।३

( माल्यवान् पर्वतावर राहात असतां राम लक्ष्मणाजवळ वर्षाकालाचें वर्णन करितो. ) सूर्यकिरणांच्या योगानें समुद्राचें पाणी शोषून घेऊन ( कार्तिकादि ) नऊ महिनेपर्यंत धारण केलेला व रसायनाप्रमाणें लोकांच्या जीवनास कारण होणारा जलरूप गर्भ आकाशरूपी स्त्री टाकून देत आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२३२ न वाक्यमात्रेण भवान्प्रधानो ।
न कत्थनात्सत्पुरुषा भवन्ति ॥ ६।७१।५९

( लक्ष्मण अतिकाय राक्षसाला म्हणतो ) केवळ बडबड करण्यानें तूं श्रेष्ठ होत नाहींस आणि फुशारक्या मारण्यानें कोणी सत्पुरुषही होत नाहींत.

२३३ न विषादे मनः कार्यं विषादो दोषवत्तरः ।
विषादो हन्ति पुरुषं बालं क्रुद्ध इवोरगः ॥ ४।६४।९

( समुद्र पाहून खिन्न झालेल्या वानरांना धीर देऊन अंगद म्हणतो ) तुम्हीं मनामध्यें खेद करूं नका, खेद हा फार वाईट आहे. कारण क्रुद्ध झालेला सर्प ज्याप्रमाणें बालकाचा घात करतो, त्याप्रमाणें खेद हा मनुष्याचा घात करितो.

२३४ न शक्तस्त्वं बलाद्धर्तुं वैदेहीं मम पश्यतः ।
हेतुभिर्न्यायसंयुक्तैर्ध्रुवां वेदश्रुतीमिव ॥ ३।५०।२२

( जटायु रावणाला म्हणतो ) ज्याप्रमाणें न्याययुक्त हेतूंनीं ( प्रमाणांनीं ) सनातन वेदश्रुतीस अन्यथा करणें शक्य नाहीं, (मीमांसकांपुढें सनातन वेदश्रुतीला हेत्वाभासांच्या योगानें भलतीकडे नेण्यास ज्याप्रमाणें शास्त्री समर्थ होत नाहीं ) त्याप्रमाणें तूं माझ्या समक्ष बलात्कारानें सीतेला हरण करण्याविषयीं समर्थ होणार नाहींस.

२३५ न शेकुः समवस्थातुं निहते वाहिनीपतौ ।
सेतुबन्धं समासाद्य विशीर्णं सलिलं यथा ॥ ६।५८।५९

( प्रहस्त सेनापतीचा वध झाल्यावर राक्षसांची झालेली स्थिति ) फुटलेल्या बंधाऱ्यापाशीं येऊन पोंचलेलें पाणी ज्याप्रमाणें स्थिर राहण्यास समर्थ होत नाहीं, त्याप्रमाणें सेनापतीचा वध झाल्यावर ते राक्षस समरांगणामध्यें उभे राहण्यास समर्थ झाले नाहींत.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२३६ न शोकपरितापेन श्रेयसा युज्यते मृतः ॥ ४।२५।२

शोकसंतापामुळें मृताला कधींही सद्गति प्राप्त होत नाहीं.

२३७ न शोभार्थाविमौ बाहू न धनुर्भूषणाय मे ।
नासिराबन्धनार्थाय न शराः स्तम्भहेतवः॥ २।२३।३१
अमित्रमथनार्थाय सर्वमेतच्चतुष्टयम् ॥ २।२३।३२

( लक्ष्मण रामाला म्हणतो ) हे माझे बाहु कांहीं शोभेकरितां नाहींत, हें धनुष्य भूषण म्हणून मीं बाळगिलेलें नाहीं. ही तरवार मी कांहीं कंबरेला बांधून ठेवण्याकरितांच घेतलेली नाहीं व हे बाण स्वस्थ पडून राहण्याकरितां मी धारण केलेले नाहींत. या सर्व चारीही वस्तु शत्रूंचा नाश करण्याकरितांच आहेत.

२३८ नष्टं दृष्ट्वा नाभ्यनन्दन् विपुलं वा धनागमम् ।
पुत्रं प्रथमजं लब्ध्वा जननी नाप्यनन्दत ॥२।४८।५

( वनांत निघालेल्या रामाच्यामागें जाऊन परत आलेल्या लोकांची स्थिति. ) नष्ट झालेली वस्तु सांपडली असतां अथवा पुष्कळ द्रव्य मिळालें असतांही कोणाला आनंद होईनासा झाला व पहिल्याच खेपेस पुत्र झाला तरी मातेला आनंद होईनासा झाला.

२३९ न स क्षमः कोपयितुं यः प्रसाद्यः पुनर्भवेत् ।
पूर्वोपकारं स्मरता कृतज्ञेन विशेषतः ॥ ४।३२।२०

( हनुमान् सुग्रीवाला म्हणतो ) ज्याची पुनरपि कृपा संपादन करण्याचा प्रसंग यावयाचा असेल त्याला क्रोध आणणेंच योग्य नाहीं. विशेषतः स्वतःवर पूर्वी झालेला उपकार स्मरणाऱ्या कृतज्ञ पुरुषानें तर ही गोष्ट करितांच उपयोगी नाहीं.

२४० न सर्वे भ्रातरस्तात भवन्ति भरतोपमाः ।
मद्विधा वा पितुः पुत्राः सुहृदो वा भवद्विधाः॥६।१८।१५

( सर्व वानरमंडळीकडे पाहून राम लक्ष्मणाला म्हणतो ) बाबारे, सर्वच भ्राते भरतासारखे नाहींत, पित्याचे सर्वच पुत्र माझ्यासारखे नाहींत किंवा तुमच्यासारखे मित्रही सर्वांना मिळत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२४१ न स संकुचितः पन्था येन वाली हतो गतः ।
समये तिष्ठ सुग्रीव मा वालिपथमन्वगाः ॥४।३०।८१

(राम लक्ष्मणाला म्हणतो, तूं सुग्रीवाकडे जाऊन त्याला असें सांग कीं,) माझ्याकडून वध पावलेला वाली ज्या मार्गानें गेला, तो मार्ग कांहीं अगदीं संकुचित नाहीं, (वाली जात असतांना तुलाही त्याच्या बरोबर जातां येईल, इतका तो मोठा आहे.) म्हणून आपल्या वचनाविषयीं खबरदार रहा. आणि वालीच्या मार्गाला जाऊं नकोस.

२४२ न साम रक्षस्सु गुणाय कल्पते
न दानमर्थोपचितेषु युज्यते ।
न भेदसाध्या बलदर्पिता जनाः
पराक्रमस्त्वेष ममेह रोचते ॥ ५।४१।३

(लंकेंत शिरल्यावर मारुति विचार करतो.) या राक्षसांचे ठिकाणीं सामाचा कांहीं उपयोग होणार नाहीं. जे धनसंपन्न असतात, त्यांच्या ठिकाणीं दानाचा उपयोग होत नाहीं; जे लोक बलानें गर्विष्ठ असतात, ते भेद उपायानें साध्य होत नसतात. (या राक्षसांना जिंकण्याकरितां) पराक्रमाचीच योजना करणें मला इष्ट वाटतें.

२४३ न साम्ना शक्यते कीर्तिर्न साम्ना शक्यते यशः ।
प्राप्तुं लक्ष्मण लोकेऽस्मिञ्जयो वा रणमूर्धनि॥६।२१।१६

(राम म्हणतो) हे लक्ष्मणा, सामोपायानें (देशांतरीं) कीर्ति होत नाहीं, किंवा (स्वदेशींही) यश प्राप्त होत नाहीं; तसेंच इहलोकीं रणांगणावर जयही सामोपचारानें प्राप्त होत नाहीं.

२४४ न सा सभा यत्र न सन्ति वृद्धा
वृद्धा न ते ये न वदन्ति धर्मम् ।
नासौ धर्मो यत्र न सत्यमस्ति
न तत्सत्यं यच्छलेनानुविद्धम् ॥ ७।५९ प्र. ३।३३

जीमध्यें वृद्धमंडळी नाहीं, ती सभा नव्हे; जे धर्माला अनुसरून बोलत नाहींत ते वृद्ध नव्हेत; ज्यामध्यें सत्य नाहीं तो धर्म नव्हे; आणि ज्यांत कपट आहे, तें सत्य नव्हे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२४५ न सुप्रतिकरं तत्तु मात्रा पित्रा च यत्कृतम् ।। २।१११।९**

आईबापांनीं ( पुत्रावर ) केलेले उपकार फेडणें कधींही शक्य नाहीं.

**२४६ न हि कंचन पश्यामो राघवस्यागुणं वयम् ।। २।३६।२७**

( सिद्धार्थ प्रधान दशरथाला म्हणतो ) राघवाच्या ठिकाणीं आम्हांला कोणताच दोष दिसून येत नाहीं.

**२४७ न हि गन्धमुपाघ्राय रामलक्ष्मणयोस्त्वया ।**
**शक्यं संदर्शने स्थातुं शुना शार्दूलयोरिव ।। ५।२१।३१**

( सीता रावणाला म्हणते ) कुत्रा वाघाच्या दृष्टीपुढें उभा राहणें जसें अशक्य आहे, त्याचप्रमाणें रामलक्ष्मणांची यत्किंचितही गंधवार्ता ( सुगावा ) लागतांच त्यांच्या दृष्टीसमोर राहणें तुला अशक्य आहे.

**२४८ न हि तद्भविता राष्ट्रं यत्र रामो न भूपतिः ।**
**तद्वनं भविता राष्ट्रं यत्र रामो निवत्स्यति ।। २।३७।२९**

( वसिष्ठमुनि कैकेयीला म्हणतात ) जेथें राम राजा नाहीं, तें ( स्थल ) कधींही राष्ट्र होणार नाहीं; आणि जेथें राम वास्तव्य करील, तें वनही राष्ट्र होईल.

**२४९ न हि ते स्त्रीवधकृते घृणा कार्या नरोत्तम ।।१।२५।१७**

( विश्वामित्र रामाला ताटकेचा वध करण्याविषयीं सांगतात ) हे पुरुषश्रेष्ठा, स्त्रीवध करावा लागत आहे म्हणून तूं मनामध्यें दया आणूं नकोस.

**२५० न हि धर्मविरुद्धेषु बह्वपायेषु कर्मसु ।**
**मूलघातिषु सज्जन्ते बुद्धिमन्तो भवद्विधाः ।।५।५१।१८**

( मारुति रावणाला म्हणतो ) जीं कृत्यें धर्माच्या विरुद्ध आहेत, ज्यांत अनेक अपाय आहेत, जीं समूळ घात करणारीं आहेत, त्या कृत्यांच्या ठिकाणीं तुमच्यासारखे बुद्धिमंत लोक आसक्त होत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२५१ न हि धर्माभिरक्तानां लोके किंचन दुर्लभम् ॥७।१०।३३**

जगांत धर्माच्या ठिकाणीं अनुरक्त असणाऱ्यांना कांहींच दुर्लभ नाहीं.

**२५२ न हि प्रकृष्टाः प्रेष्यन्ते प्रेष्यन्ते हीतरे जनाः ॥५।३९।३९**

( कार्याविषयीं योजना करितांना ) कनिष्ठ श्रेष्ठांना प्रेरणा करीत नसून श्रेष्ठच कनिष्ठांना प्रेरणा करितात.

**२५३ न हि प्रतिज्ञां कुर्वन्ति वितथां सत्यवादिनः ।**
**लक्षणं हि महत्त्वस्य प्रतिज्ञापरिपालनम् ॥६।१०१।५१**

सत्यवादी लोक आपली प्रतिज्ञा कधींही खोटी करीत नसतात. प्रतिज्ञेचें परिपालन करणें हेंच मोठेपणाचें लक्षण होय.

**२५४ न हि प्रेषयिता तात स्वामी प्रेष्यःकथंचन ॥ ४।६५।२२**

( जांबवान् अंगदाला म्हणतो ) बाबारे, जो प्रभु इतरांस ( दूत म्हणून ) पाठविणारा, तो दूतांनीं पाठविण्यास योग्य-प्रेष्य-कदापि होणार नाहीं.

**२५५ न ह्यतो धर्मचरणं किंचिदस्ति महत्तरम् ।**
**यथा पितरि शुश्रूषा तस्य वा वचनक्रिया ॥२।१९।२२**

( राम कैकेयीला म्हणतो ) पित्याची शुश्रूषा करणें, अथवा त्याच्या आज्ञेप्रमाणें वागणें यापेक्षां कोणतेंही धर्माचरण श्रेष्ठ नाहीं.

**२५६ न ह्यनिष्टोऽनुशास्यते ॥ ३।१०।२०**

जो अप्रिय असेल त्याला कोणी हिताचा उपदेश करीत नसतो.

**२५७ न ह्यबुद्धिं गतो राजा सर्वभूतानि शास्ति हि ॥ ४।२।१८**

बुद्धिभ्रष्ट झालेला राजा सर्व प्रजांवर अंमल चालविण्यास समर्थ होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२५८ न ह्यर्थास्तत्र तिष्ठन्ति न दारा न च बान्धवाः ।
सुप्रीतो भृत्यवर्गस्तु यत्र तिष्ठति राघव ॥ ७।६४।६

जेथें (शत्रु चालून आला असतां) संतुष्ट भृत्यवर्ग राहतो (उपयोगीं पडतो) तेथें द्रव्य, स्त्रिया किंवा बांधव, हे रहात नाहींत (उपयोगीं पडत नाहींत.)

२५९ न ह्येकः साधको हेतुः स्वल्पस्यापीह कर्मणः ।
यो ह्यर्थं बहुधा वेद स समर्थोऽर्थसाधने ॥ ५।४१।६

स्वल्पही कार्य साधण्याच्या कामीं एकच हेतु पुरा होत नाहीं. ज्याला भरपूर साधनें माहीत आहेत, तोच कार्यसिद्धि करूं शकतो.

२६० नाग्निरग्नौ प्रवर्तते ॥ ५।५५।२२

अग्नीस दग्ध करण्यास अग्नि प्रवृत्त होत नाहीं.

२६१ नाग्निर्नान्यानि शस्त्राणि न नः पाशा भयावहाः ।
घोराः स्वार्थप्रयुक्तास्तु ज्ञातयो नो भयावहाः ॥ ६।१६।७

(पद्मवनांत पूर्वी हत्तींनीं म्हटलेले श्लोक रावण बिभीषणाला सांगतो) अग्नि, इतर शस्त्रें आणि पाश हीं आम्हांला भय उत्पन्न करणारीं नाहींत, परंतु हे क्रूर, स्वार्थसाधु भाऊबंद मात्र आम्हांला भयावह आहेत.

२६२ नातन्त्री विद्यते वीणा नाचक्रो विद्यते रथः ।
नापतिः सुखमेधेत या स्यादपि शतात्मजा ॥ २।३९।२९

वीणा जशी तारेवांचून वाजणें शक्य नाहीं, रथ जसा चक्रावांचून असणें शक्य नाहीं, तशी शतपुत्रवती स्त्री असली, तरी ती पतीवांचून सुख पावणार नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२६३ नात्र कश्चिद्यथाभावं प्राणी समतिवर्तते ।
तेन तस्मिन्न सामर्थ्यं प्रेतस्यास्त्यनुशोचतः २।१०५।२८

ह्या लोकीं कोणीही प्राणी जन्ममरणांचें उल्लंघन करूं शकत नाहीं. ( असें आहे तरी तो मृतास उद्देशून शोक करितो. ) वस्तुतः ह्या शोक करणाऱ्याच्या आंगांत स्वजनावर येणारा मृत्यु टाळण्याचें सामर्थ्य नसतें.

२६४ नाददानं शरान्घोरान्विमुञ्चन्तं महाबलम् ।
न कार्मुकं विकर्षन्तं रामं पश्यामि संयुगे ॥ ३।३४।७

( शूर्पणखा रामाची हकीकत रावणाला सांगते ) हा महाबलवान् राम ( भात्यांतून ) घोर बाण केव्हां काढितो, केव्हां शत्रूवर सोडितो, तसेंच रणांगणावर धनुष्य केव्हां आकर्षण करितो, हें मला कांहींच कळत नाहीं.

२६५ नाराजके जनपदे तूद्यानानि समागताः ।
सायाह्ने क्रीडितुं यान्ति कुमार्यो हेमभूषिताः॥२।६७।१७

अराजक देशामध्यें सुवर्णभूषणांनीं भूषित झालेल्या कुमारिका एकत्र जुळून सायंकाळीं बागांतून क्रीडा करण्यास जात नाहींत.

२६६ नाराजके जनपदे धनवन्तः सुरक्षिताः ।
शेरते विवृतद्वाराः कृषिगोरक्षजीविनः ॥२।६७।१८

राजहीन देशांत धनवान् लोक सुरक्षित नसतात. कृषि करणारे गोरक्षण करणारे लोकही दरवाजे उघडे टाकून निजूं शकत नाहींत.

२६७ नाराजके जनपदे प्रहृष्टनटनर्तकाः ।
उत्सवाश्च समाजाश्च वर्धन्ते राष्ट्रवर्धनाः ॥२।६७।१५

अराजक देशांत आनंदित नट व सूत्रधार ज्यामध्यें आहेत असे देवादिकांचे उत्सव व राष्ट्रोन्नतीला कारण होणारे समाज वृद्धिंगत होत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२६८ नाराजके जनपदे योगक्षेमः प्रवर्तते ॥ २।६७।२४

राजहीन देशांत लोकांचे योगक्षेम सुखानें चालत नाहींत.

२६९ नाराजके जनपदे स्वकं भवति कस्यचित् ।
मत्स्या इव जना नित्यं भक्षयन्ति परस्परम् ॥२।६७।३१

राजहीन देशांत कोणाचाही जीव स्वस्थ नसतो. मत्स्य जसे परस्परांचें भक्षण करीत असतात, तसेंच अशा देशांत लोक परस्परांस भक्षण करितात.

२७० नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुण्डले ।
नूपुरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवन्दनात् ॥ ४।६।२२

( सीतेचे अलंकार ओळखण्यास सांगितलें असतां लक्ष्मण रामाला म्हणतो ) सीतेचीं बाहुभूषणें मला ठाऊक नाहींत, व कुंडलेंही माहीत नाहींत. परंतु नेहमीं सीतेच्या पायां पडण्याचा प्रसंग येत असल्यामुळें तोरड्यांची मात्र मला ओळख पटत आहे.

२७१ नित्यमन्योन्यसंहृष्टा व्यसनेष्वाततायिनः ।
प्रच्छन्नहृदया घोरा ज्ञातयस्तु भयावहाः ॥ ६।१६।५

( रावण बिभीषणाला म्हणतो ) एकमेकांच्या विपत्तीमध्यें आनंद मानून आपला आशय गुप्त ठेवणारे हे क्रूर आततायी ( एकमेकांच्या घरावर अग्नि ठेवणारे ) भाऊबंद फारच भयंकर आहेत.

२७२ निमित्तं लक्षणं स्वप्नं शकुनिस्वरदर्शनम् ।
अवश्यं सुखदुःखेषु नराणां परिदृश्यते ॥ ३।५२।२

सुखाचे किंवा दुःखाचे प्रसंग यावयाचे असल्यास स्वप्न अथवा पक्ष्यांचा स्वर असें कांहीं तरी सूचक चिन्ह मनुष्यांच्या दृष्टीस अवश्य येत असतें.

२७३ नियुक्तैर्मन्त्रिभिर्वाच्यो ह्यवश्यं पार्थिवो हितम् ४।३२।१८

नियोजित मंत्र्यांनीं राजाला हिताच्या गोष्टी अवश्य सांगाव्या.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२७४ निरायुधानां क्रमतामसङ्गगतिपौरुषाः ।
दारा ह्युपहसिष्यन्ति स वै घातः सुजीवताम्॥६।६६।२०

( युद्धाचे वेळीं पळत सुटणाऱ्या वानरांना अंगद म्हणतो. ) तुमची गति व पराक्रम हीं दोन्हीं कोठेंही कुंठित होणारीं नसतांना आयुधांचा त्याग करून जर तुम्ही जाऊं लागलां, तर तुमच्या बायकाही तुम्हांला हसतील आणि स्त्रियांनीं उपहास करणें हा तर मानानें राहणाऱ्यांचा घातच होय.

२७५ निरुत्साहस्य दीनस्य शोकपर्याकुलात्मनः ।
सर्वार्था व्यवसीदन्ति व्यसनं चाधिगच्छति ॥ ६।२।६

निरुत्साह, दीन, शोकानें व्याकुल, अशा पुरुषांचीं सर्व कार्यें नाश पावतात, आणि त्यांजवर संकटें कोसळतात.

२७६ नीत्या सुनीतया राजा धर्मं रक्षति रक्षिता ।
यदा न पालयेद्राजा क्षिप्रं नश्यन्ति वै प्रजाः ॥७।५९ प्र. २।५

प्रजेचें रक्षण करणारा राजा उत्कृष्ट चालविलेल्या नीतीनें धर्माचें रक्षण करीत असतो. राजा जेव्हां धर्माचें रक्षण करीनासा होतो तेव्हां प्रजेचा सत्वर नाश होतो.

२७७ नृशंसमनृशंसं वा प्रजारक्षणकारणात् ।
पातकं वा सदोषं वा कर्तव्यं रक्षता सदा ॥ १।२५।१८

ज्यास प्रजारक्षण करावयाचें आहे, त्याला त्या रक्षणाकरितां क्वचित् प्रसंगीं थोडेंसें क्रौर्याचें किंवा किंचित् पातक, अगर कांहीं सदोष कर्म करणें भाग पडलें, तरी त्यानें तें करावें.

२७८ नेयं मम मही सौम्य दुर्लभा सागराम्बरा ।
न हीच्छेयमधर्मेण शक्रत्वमपि लक्ष्मण ॥ २।९७।७

( राम म्हणतो ) हे सौम्य लक्ष्मणा, ही सागररूप वस्त्र परिधान केलेली पृथ्वी मला दुर्लभ आहे, असें नाहीं. तथापि मी तिची इच्छा करीत नाहीं. अधर्मानें इंद्रपद मिळालें, तरी त्याची मी इच्छा करीत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२७९ नैकान्तविजयो युद्धे भूतपूर्वः कदाचन ।**
**परैर्वा हन्यते वीरः परान्वा हन्ति संयुगे ॥६।१०९।१८**

युद्धांत निश्चयात्मक जयच होतो, असें पूर्वी कधींही झालें नाहीं. वीरपुरुष रणांगणावर शत्रूकडून मारला जातो किंवा शत्रूला मारितो.

**२८० नैतच्चित्रं नरव्याघ्रे शीलवृत्तविदां वरे ।**
**यदार्यं त्वयि तिष्ठेत्तु निम्नोत्सृष्टमिवोदकम्॥२।११३।१६**

( भरद्वाज मुनि म्हणतात हे भरता, ) तूं नरश्रेष्ठ आणि उत्तम प्रकारचा शीलवृत्तज्ञ आहेस. तसेंच, तुझ्या ठिकाणीं उत्तम चारित्र्य वसत आहे, त्यांत आश्चर्य नाहीं. टाकलेलें पाणी खोलगट जागेंतच रहात असतें.

**२८१ नैतच्छिथिलया बुद्ध्या त्वं वेत्सि महदन्तरम् ।**
**क्व च स्वजनसंवासः क्व च नीचपराश्रयः ॥ ६।८७।१४**

( इंद्रजित् बिभीषणाला म्हणतो. ) स्वजनासह वास्तव्य करणें कोणीकडे, आणि शत्रूच्या आश्रयाला राहून नीच बनणें कोणीकडे ? यांतील महदंतर तुझ्या कोत्या बुद्धीमुळें तुला समजत नाहीं.

**२८२ नैवंविधमसत्कारं राघवो मर्षयिष्यति ।**
**बलवानिव शार्दूलो वालधेरभिमर्शनम् ॥ २।६१।१९**

( कौसल्या दशरथाला सांगते, भरतानें उपभोगिलेलें राज्य राम स्वीकारणार नाहीं. ) बलवान् व्याघ्र ज्याप्रमाणें पुच्छस्पर्श सहन करीत नाहीं, त्याप्रमाणें राम अशा प्रकारचा अपमान कधींही सहन करणार नाहीं.

**२८३ नैषा हि सा स्त्री भवति श्लाघनीयेन धीमता ।**
**उभयोर्लोकयोर्लोके पत्या या संप्रसाद्यते ॥ २।६२।१३**

स्वर्गलोक व मनुष्यलोक या दोहोंमध्यें स्तुत्य असलेल्या विचारी भर्त्याकडून जी स्त्री आपण प्रसन्न व्हावें म्हणून प्रार्थना करून घेते, ती स्त्री लोकामध्यें कुलीन म्हणून गणली जात नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२८४ न्यस्तदण्डा वयं राजन् जितक्रोधा जितेन्द्रियाः ।
रक्षणीयास्त्वया शश्वद्गर्भभूतास्तपोधनाः ॥ ३।१।२२

( महर्षि रामाला म्हणतात. ) हे राजा, आम्हीं क्रोधसंयमन व इंद्रियदमन करून प्राण्यांचा निग्रह करण्याचें सोडिलें आहे. म्हणून माता ज्याप्रमाणें गर्भाचें रक्षण करिते, त्याप्रमाणें तुला आमचें रक्षण करणें अवश्य आहे.

२८५ पतिर्हि देवता नार्याः पतिर्बन्धुः पतिर्गुरुः ।
प्राणैरपि प्रियं तस्माद्भर्तुः कार्यं विशेषतः ॥ ७।४८।१८

पति हीं स्त्रियांची देवता आहे. स्त्रियांचा बंधु आणि गुरुही तोच आहे. म्हणून भर्त्याचें प्रियकार्य प्राण खर्ची घालूनही विशेषेंकरून त्यांनीं करावें.

२८६ पतिशुश्रूषणान्नार्यास्तपो नान्यद्विधीयते ॥ २।११८।९

पतिशुश्रूषेपलीकडे स्त्रीला दुसरें कोणतेंही तप नाहीं.

२८७ पद्ममातपसंतप्तं परिक्लिष्टमिवोत्पलम् ।
काञ्चनं रजसा ध्वस्तं क्लिष्टं चन्द्रमिवाम्बुदैः॥२।१०४।२५
मुखं ते प्रेक्ष्य मां शोको दहत्यग्निरिवाश्रयम् ।
भृशं मनसि वैदेहि व्यसनारणिसंभवः ॥ २।१०४।२६

( कौसल्या म्हणते. )हे सीते, उन्हानें संतप्त झालेलें पद्म, चुरडलेलें रक्तकमल, धुळीनें मलिन झालेलें सुवर्ण, अथवा मेघाच्छादित चंद्र, यांप्रमाणें तुझें मुख पाहून ( अरणीपासून उत्पन्न झालेला ) अग्नि आश्रयभूत काष्ठांस दहन करितो, तसाच माझ्या अंतःकरणांत दुःखरूप अरणीपासून उत्पन्न झालेला शोक मला दहन करीत आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२८८ परत्रवासे हि वदन्त्यनुत्तमं
तपोधनाः सत्यवचो हितं नृणाम् ॥ २।११।२९

(कैकेयी दशरथाला म्हणते.) परलोकीं वास्तव्य करण्यामध्यें मनुष्यांना सत्यवचन अत्यंत हितकारक होतें असें तपोधन म्हणत असतात.

२८९ परदाराभिमर्शात्तु नान्यत्पापतरं महत् ॥ ३।३८।३०

परस्त्रीगमनापेक्षां अधिक असें दुसरें कोणतेंही महापातक नाहीं.

२९० परदारावरोधस्य प्रसुप्तस्य निरीक्षणम् ।
इदं खलु ममात्यर्थं धर्मलोपं करिष्यति ॥ ५।११।३९

(सीतेचा शोध लावण्यासाठीं रावणाच्या अंतःपुरांत शिरलेला मारुति म्हणतो.) अंतःपुरांत निजलेल्या परस्त्रियांचें अवलोकन, ही गोष्ट माझ्या धर्माचा अतिशयेंकरून लोप करील.

२९१ परं निर्वेदमागम्य न हि नोन्मीलनं क्षमम् ॥ ४।४९।८

(अंगद वानरांना म्हणतो.) मनामध्यें अतिशय खिन्न होऊन उद्योग सोडून देणें योग्य नाहीं.

२९२ परमापद्गतस्यापि धर्मे मम मतिर्भवेत् ॥ ७।१०।३०

(बिभीषणानें ब्रह्मदेवाजवळ वर मागितला.) मी पराकाष्ठेच्या विपत्तींत जरी सांपडलों तरी धर्माकडेच माझी बुद्धि असावी.

२९३ परस्पर्शात्तु वैदेह्या न दुःखतरमस्ति मे ।
पितुर्विनाशात्सौमित्रे स्वराज्यहरणात्तथा ॥३।२।२१

(विराध राक्षसानें सीतेला उचलून नेलें हें पाहून राम म्हणतो.) हे लक्ष्मणा, सीतेला झालेला परपुरुषाचा स्पर्श, ह्याहून अधिक दुःखदायक असें मला कांहीं वाटत नाहीं. पित्याचें मरण आणि स्वराज्यहरण ह्यांहूनही तें दुःख अधिक आहे

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२९४ परस्य वीर्यं स्वबलं च बुद्ध्वा
स्थानं क्षयं चैव तथैव वृद्धिम् ।
तथा स्वपक्षेऽप्यनुमृश्य बुद्ध्या
वदेत्क्षमं स्वामिहितं स मन्त्री ॥ ६।१४।२२

जो पुरुष शत्रूचें आणि आपलें बल जाणतो, शत्रूच्या आणि आपल्या सैन्याची स्थिति, वृद्धि, आणि क्षय ह्यांचा बुद्धिपूर्वक विचार करितो, आणि स्वामीचें हित कशांत आहे तें योग्य रीतीनें सांगतो, तोच खरा मंत्री होय.

२९५ परस्वहरणे युक्तं परदाराभिमर्शकम् ।
त्याज्यमाहुर्दुरात्मानं वेश्म प्रज्वलितं यथा ॥६।८७।२३

परद्रव्यापहारी आणि परस्त्रीहरणकर्ता असा जो दुरात्मा तो प्रज्वलित गृहाप्रमाणें त्याज्य होय.

२९६ परस्वानां च हरणं परदाराभिमर्शनम् ।
सुहृदामतिशङ्का च त्रयो दोषाः क्षयावहाः ॥ ६।८७।२४

परद्रव्य हरण करणें, परस्त्रीसमागम आणि मित्रांच्या ठिकाणीं शंकित वृत्ति हे तीन दोष नाशकारक आहेत.

२९७ पराक्रमोत्साहमतिप्रताप-
सौशील्यमाधुर्यनयानयैश्च ।
गाम्भीर्यचातुर्यसुवीर्यधैर्यै-
र्हनूमतः कोऽप्यधिकोऽस्ति लोके ॥ ७।३६।४३

पराक्रम, उत्साह, बुद्धि, प्रताप, सुशीलता मधुरवाणी, नीति व अनीति यांचें ज्ञान, गांभीर्य, चातुर्य, उत्कृष्टवीर्य, आणि धैर्य या गुणांनीं जगतामध्यें हनुमानापेक्षां कोण बरें अधिक आहे ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२९८ परान्तकाले हि गतायुषो नरा
हितं न गृह्णन्ति सुहृद्भिरीरितम् ॥ ६।१६।२७

ज्यांचें आयुष्य संपलें आहे असे पुरुष सुहृदांनीं केलेलें हितकारक भाषण अंतकालीं ऐकून घेत नाहींत.

२९९ परिमृष्टो दशान्तेन दशाभागेन सेव्यते ॥ ३।७२।८

( सुग्रीव तुझ्या सारखाच दुःखी आहे त्याच्याशीं तूं सख्य कर, असें कबंधानें रामाला सांगितलें. ) जो ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडला आहे, त्याला ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडलेल्याचीच मदत होत असते.

३०० पापानुबन्धो वै यस्य कर्मणः को नु तत्पुमान् ।
कुर्वीत लोकाधिपतिः स्वयंभूर्भगवानपि ॥ ३।५१।३२

( जटायु रावणाला म्हणतो. ) ज्याचा परिणाम चांगला नाहीं तें कर्म प्रत्यक्ष लोकाधिपति भगवान् ब्रह्मदेवही जरी झाला, तरी कोणता बरें ( कल्याणेच्छु ) पुरुष करण्यास प्रवृत्त होईल ?

३०१ पिता हि दैवतं तात देवतानामपि स्मृतम् ॥ २।३४।५२

( राम दशरथाला म्हणतो. ) बाबा, देवतांना सुद्धां पिता हेंच दैवत म्हणून म्हटलें आहे.

३०२ पितुर्हि वचनं कुर्वन्न कश्चिन्नाम हीयते ॥ २।२१।३७

पितृवाक्याचें पालन करणारा कोणीहि हानि पावत नाहीं.

३०३ पितुर्हि समतिक्रान्तं पुत्रो यः साधु मन्यते ।
तदपत्यं मतं लोके विपरीतमतोऽन्यथा ॥२।१०६।१५

( भरत रामाला म्हणतो.) पित्याच्या हातून कांहीं अतिक्रम झाला असतां जो पुत्र तो सुधारून घेतो, त्यालाच लोकांमध्यें अपत्य म्हणून म्हणतात. याच्या उलट वागणारास अपत्य म्हणत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३०४ पीडाकरममित्राणां यच्च कर्तव्यमेव तत् ॥ ६।८१।२९

शत्रूंना जें जें म्हणून पीडादायक आहे, तें तें ( त्यांत पाप असलें तरी ) कर्तव्यच होय.

३०५ पुन्नाम्नो नरकाद्यस्मात्पितरं त्रायते सुतः ।
तस्मात्पुत्र इति प्रोक्तः पितॄन्यः पाति सर्वतः ॥२।१०७।१२

' पुत् ' नामक नरकापासून पित्याचें रक्षण करितो, अथवा ( स्वर्गलोकप्राप्तिकारक कर्मांनीं ) जो पितरांचें नित्यशः रक्षण करितो, त्यासच ' पुत्र ' असें म्हणतात.

३०६ पुरुषस्य हि लोकेस्मिन् शोकः शौर्यापकर्षणः ॥६।२।१३

या लोकीं शोक हा पुरुषाच्या शौर्याचा नाश करणारा आहे.

३०७ पूर्वं कृतार्थो मित्राणां न तत्प्रतिकरोति यः ।
कृतघ्नः सर्वभूतानां स वध्यः प्लवगेश्वर ॥४।३४।१०

( लक्ष्मण सुग्रीवाला म्हणतो. ) हे वानरश्रेष्ठा, पूर्वी मित्रांच्या हातून स्वतःचें कार्य झालें असतांही जो त्या मित्रांचे उपकार फेडीत नाहीं, असा कृतघ्न पुरुष सर्व लोकांस वध्य आहे.

३०८ पूर्वापकारिणं हत्वा न ह्यधर्मेण युज्यते ॥ २।९६।२४

ज्यानें प्रथम अपकार केला आहे, अशाचा वध केला असतां अधर्म घडत नाहीं.

३०९ पौरकार्याणि यो राजा न करोति दिने दिने ।
संवृते नरके घोरे पतितो नात्र संशयः ॥७।५३।६

जो राजा पौरजनांचीं कार्यें प्रत्यहीं करीत नाहीं, तो वायूचा संचार नसलेल्या घोर नरकांत पडतो यांत संशय नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३१० पौरा ह्यात्मकृताद्दुःखाद्विप्रमोच्या नृपात्मजैः ।
न तु खल्वात्मना योज्या दुःखेन पुरवासिनः॥२।४६।२३

(राम लक्ष्मणाला सांगतो.) आपणांकरितां जर नगरवासी लोकांना दुःख होत असेल, तर राजपुत्रांनीं त्यांना दुःखांतून मुक्त केलें पाहिजे. आपल्याकारितां लोकांना दुःख होऊं देणें खरोखर योग्य नाहीं.

३११ पौरुषेण तु यो युक्तः स तु शूर इति स्मृतः॥ ६।७१।६०

ज्याच्या आंगीं पराक्रम आहे त्यालाच शूर असें म्हणतात.

३१२ प्रतिग्रहो हि विप्रेन्द्र क्षत्रियाणां सुगर्हितः ॥७।७६।३५

(राम अगस्त्य मुनींना म्हणतो.) हे ब्राह्मणश्रेष्ठा, क्षत्रियांस प्रतिग्रह म्हणजे अत्यंत निंद्य होय.

३१३ प्रतिज्ञायां हि नष्टायां धर्मो हि विलयं व्रजेत्॥७।१०६।९

प्रतिज्ञा नष्ट झाली असतां धर्म लयाला जातो.

३१४ प्रतिवक्तुं प्रकृष्टे हि नापकृष्टस्तु शक्नुयात्॥ ४।१८।४७

(वाली रामाला म्हणतो.) श्रेष्ठाच्यापुढें उत्तर देण्यास कनिष्ठ समर्थ होणार नाहीं.

३१५ प्रत्यगारमिवायान्ती सवत्सा वत्सकारणात् ।
बद्धवत्सा यथा धेनू राममाताभ्यधावत ॥ २।४०।४३

(राम वनवासाला निघाला असतां त्याच्यामागें कौसल्या जाऊं लागली.) घरांत वासरूं बांधून ठेविलें असलें म्हणजे गाय परत येतांना वासराकरितां जशी धावत धावत घरीं येते, तशी राममाता कौसल्या रामाच्या मागोमाग धावूं लागली.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३१६ प्रधानं साधकं वैद्यं धर्मशीलं च राक्षस ।
ज्ञातयोऽप्यवमन्यन्ते शूरं परिभवन्ति च ॥ ६।१६।४

( रावण बिभीषणाला म्हणतो. ) हे राक्षसा, आपल्या कुलामध्यें श्रेष्ठ पदास चढलेला, राज्यरक्षण वगैरे करणारा, ज्ञानी आणि धर्मशील असा जरी कोणी असला, तरी भाऊबंद त्याचा अपमान करीत असतात. आणि तो जरी शूर असला तरी छिद्र पाहून त्याचा पराजय करीत असतात.

३१७ प्रवादःसत्यमेवायं त्वां प्रति प्रायशो नृप ।
पतिव्रतानां नाकस्मात्पतन्त्यश्रूणि भूतले॥६।१११।६६

( रावणवधामुळें विलाप करणारी मंदोदरी रावणाला उद्देशून म्हणते. ) हे राजा, 'पतिव्रता स्त्रियांचे अश्रु कांहींतरी अनर्थ ओढवल्यावांचून विनाकारण कधींहि भूमीवर पडत नाहींत ' अशी जी लोकांमध्यें म्हण आहे, ती तुझ्या संबंधानें खरी ठरली.

३१८ प्रशमश्च क्षमा चैव आर्जवं प्रियवादिता ।
असामर्थ्यफला ह्येते निर्गुणेषु सतां गुणाः ॥ ६।२१।१४

शांति, क्षमा, सरलपणा, प्रियवादित्व हे सज्जनांचे गुण निर्गुण पुरुषांच्या ठिकाणीं निरुपयोगी होतात.

३१९ प्राप्तचारित्रसंदेहा मम प्रतिमुखे स्थिता ।
दीपो नेत्रातुरस्येव प्रतिकूलासि मे दृढा ॥ ६।११५।१७

( राम सीतेला म्हणतो. ) ज्याप्रमाणें नेत्ररोगी पुरुषाला दिवा अतिशय प्रतिकूल होत असतो, त्याप्रमाणें माझ्या समोर असलेली तूं, तुझ्या वर्तनासंबंधानें संशय उत्पन्न झाल्यामुळें माझ्या दृष्टीला अतिशय प्रतिकूल झाली आहेस.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३२० प्राप्स्यामि यानद्य गुणान्को मे श्वस्तान्प्रदास्यति ।
अपक्रमणमेवातः सर्वकामैरहं वृणे ॥ २।३४।४०

( राम दशरथाला म्हणतो, ठरल्याप्रमाणें वनांत गेलों असतां ) आज जे गुण मला प्राप्त होतील, ते मला उद्यां कोण देणार आहे ? येथून गमन करणें यांतच माझे सर्व मनोरथ परिपूर्ण होत आहेत, यासाठीं आजच्या आज वनवासाला जाणें हेंच मला पसंत आहे.

३२१ प्रासादाग्रे विमानैर्वा वैहायसगतेन वा
सर्वावस्थागता भर्तुः पादच्छाया विशिष्यते॥२।२७।९

( सीता रामाला म्हणते. ) कोणतीही अवस्था प्राप्त झाली तरी स्त्रीनें पतिचरणांच्या छायेला असणेंच–राजवाड्यांत राहण्यापेक्षां, विमानांत बसून फिरण्यापेक्षां अथवा सिद्धि प्राप्त झाल्यामुळें आकाशमार्गानें गमन करण्यापेक्षां—अधिक श्रेयस्कर आहे.

३२२ प्रियं चेद्भरतस्यैतद्रामप्रव्राजनं भवेत् ।
मा स्म मे भरतः कार्षीत्प्रेतकृत्यं गतायुषः ॥ २।१२।९२

( दशरथ म्हणतो. ) रामाचा वनवास जर भरताला प्रिय असेल, तर मी मृत झाल्यावर माझें उत्तरकार्य त्यानें करूं नये.

३२३ प्रैष्यं पापीयसां यातु सूर्यं च प्रति मेहतु ।
हन्तु पादेन गां सुप्तां यस्यार्योऽनुमते गतः ॥ २।७५।२२

( रामाला वनांत पाठविणाऱ्यास भरताचे शिव्याशाप. ) ज्याच्या अनुमतीनें श्रेष्ठ राम वनवासाला गेला, त्याला अत्यंत पापी जनांची सेवा करणें भाग पडो. त्यास सूर्याचे पुढें मूत्र केल्याचें पाप लागो; तसेंच निद्रिस्त गाईला लाथ मारल्याचें पाप त्याच्या आंगीं जडो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३२४ प्रोत्साहितोऽयं कैकेय्या संतुष्टो यदि नः पिता ।
अमित्रभूतो निःसङ्गं बध्यतां वध्यतामपि ॥ २।२१।१२

( लक्ष्मण रामाला व कौसल्येला म्हणतो. ) कैकेयीच्या प्रोत्साहनानें तिजवर संतुष्ट होऊन आमचा पिता जर आमच्यांशीं शत्रुत्वानें वागूं लागेल, तर खरोखर त्याला बांधून टाकण्याला अथवा त्याचा वध करण्यालाही कांहीं चिंता नाहीं.

३२५ बलिषड्भागमुद्धृत्य नृपस्यारक्षितुः प्रजाः ।
अधर्मो योऽस्य सोऽस्यास्तु यस्यार्योऽनुमते गतः॥२।७५।२५

( भरत म्हणतो. ) प्रजांपासून ( कररूपानें ) सहावा भाग घेऊनही त्यांचें रक्षण न केल्यानें जें पाप राजास लागतें, तें पाप ज्याच्या अनुमतीनें श्रेष्ठ राम वनाला गेला, त्याला लागो.

३२६ बलैः समग्रैर्युधि मां रावणं जित्य संयुगे ।
विजयी स्वपुरं यायात्तत्तस्य सदृशं भवेत् ॥ ५।३९।२९

(सीता मारुतीला म्हणते.) समग्र सैन्यासह येऊन व रणांगणावर रावणाला जिंकून विजयी होत्साता राम मला राजधानीला घेऊन जाईल, तर ती गोष्ट त्याला शोभण्यासारखी होईल.

३२७ बहवः साधवो लोके युक्ता धर्ममनुष्ठिताः ।
परेषामपराधेन विनष्टाः सपरिच्छदाः ॥३।३९।२१

धर्मानुष्ठान करूनही इतरांच्या अपराधानें परिवारासह नाश पावलेले अनेक साधुपुरुष या लोकीं आहेत.

३२८ बालिशस्तु नरो नित्यं वैक्लव्यं योऽनुवर्तते ।
स मज्जत्यवशः शोके भाराक्रान्तेव नौर्जले ॥ ४।७।१०

( सुग्रीव रामाला म्हणतो. ) ओझ्यानें जर्जर झालेली नौका ज्याप्रमाणें पाण्यामध्यें बुडते, त्याप्रमाणें जो बालिश पुरुष नेहमीं खेद करीत बसतो, तो निरुपाय होऊन शोकामध्यें बुडून जातो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३२९ बालिशो बत कामात्मा रामो दशरथात्मजः ।
इति वक्ष्यति मां लोको जानकीमविशोध्य हि ॥६।११८।१४

( राम म्हणतो. ) मी सीतेची शुद्धि न करितां ( तिचें ग्रहण केल्यास ) राम हा अत्यंत विषयलंपट झाला आहे आणि मूर्ख आहे, असें लोक मला म्हणतील.

३३० बालेन्द्रगोपान्तरचित्रितेन
विभाति भूमिर्नवशाद्वलेन ।
गात्रानुपृक्तेन शुकप्रभेण
नारीव लाक्षोक्षितकम्बलेन ॥ ४।२८।२४

( राम लक्ष्मणाजवळ वर्षाकालाचें वर्णन करितो. ) लहान लहान इंद्रगोपसंज्ञक कीटकांनीं मधून मधून चित्रविचित्र झालेल्या हिरव्यागार गवतानें युक्त झालेली भूमि, लाक्षाबिंदुयुक्त अशी पोपटी रंगाची शालजोडी आंगासरशीं पांघरून बसलेल्या स्त्रीप्रमाणें दिसत होती.

३३१ बाष्पेण पिहितं दीनं रामः सौमित्रिणा सह ।
चकर्षेव गुणैर्बद्धं जनं पुरनिवासिनम् ॥ २।४५।१२

( वनांत जाणाऱ्या रामाच्या मागोमाग प्रजाजन जाऊं लागले. ) अश्रूंनीं ज्यांचे नेत्र भरून गेलेले आहेत अशा त्या नगरवासी दीन जनांना लक्ष्मणासहवर्तमान राम आपल्या गुणांनीं बांधून टाकून जसा कांहीं ओढूनच नेऊं लागला.

३३२ ब्रह्मन्ब्रह्मबलं दिव्यं क्षात्राच्च बलवत्तरम् ॥ १।५४।१४

( कामधेनु वसिष्ठांना म्हणते. ) हे ब्राह्मणा, क्षात्रबलापेक्षां दिव्य ब्रह्मबल अधिक श्रेष्ठ आहे.

३३३ ब्रुवन्परार्थं परवान्न दूतो वधमर्हति ॥ ५।५२।१९

दूत म्हटला म्हणजे परवश असून तो दुसऱ्याचा निरोप सांगणारा असतो, त्याअर्थीं त्याचा वध करणें योग्य नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३३४ भगवन्प्राणिनां नित्यं नान्यत्र मरणाद्भयम् ॥७।१०।१६

(रावण ब्रह्मदेवाला म्हणतो.) हे भगवन्, प्राण्यांना नेहमीं मरणापेक्षां दुसरें कशाचेंही भय नाहीं.

३३५ भर्ता तु खलु नारीणां गुणवान्निर्गुणोऽपि वा ।
धर्मं विमृशमानानां प्रत्यक्षं देवि दैवतम् ॥ २।६२।८

(दशरथ कौसल्येला म्हणतो.) हे देवि, पति गुणवान् असो, वा निर्गुण असो; धर्मानें चालणाऱ्या स्त्रियांचें तो खरोखर प्रत्यक्ष दैवत आहे.

३३६ भर्ता नाम परं नार्याः शोभनं भूषणादपि ॥ ५।१६।२६

अलंकारापेक्षांही पति हें स्त्रियांचें परम सुंदर भूषण आहे.

३३७ भर्तुरिच्छा हि नारीणां पुत्रकोट्या विशिष्यते ॥२।३५।८

पतीच्या इच्छेला अनुसरून वागणें हें, स्त्रियांना एक कोटि पुत्र प्राप्त होण्यापेक्षांही अधिक आहे.

३३८ भर्तुर्भक्तिं पुरस्कृत्य रामादन्यस्य वानर ।
नाहं स्प्रष्टुं स्वतो गात्रमिच्छेयं वानरोत्तम ॥५।३७।६२
यदहं गात्रसंस्पर्शं रावणस्य गता बलात् ।
अनीशा किं करिष्यामि विनाथा विवशा सती ५।३७।६३

(सीता मारुतीला म्हणते.) हे वानरा, हे वानरश्रेष्ठा, भर्त्याच्या ठिकाणीं अतिशयच भक्ति असल्यामुळें त्या रामावांचून दुसऱ्या कोणाच्याही शरीराला आपण होऊन स्पर्श करण्याची माझी इच्छा नाहीं. रावणाच्या शरीराचा स्पर्श मला झाला आहे; परंतु तो माझ्या इच्छेविरुद्ध झाला आहे. मी अनाथ, स्वतः असमर्थ आणि पराधीन असल्यामुळें करणार काय ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३३९ भर्तुः शुश्रूषया नारी लभते स्वर्गमुत्तमम् ।
अपि या निर्नमस्कारा निवृत्ता देवपूजनात् ॥२।२४।२७

( राम कौसल्येला म्हणतो. ) जी स्त्री देवादिकांस नमस्कार करीत नाहीं, किंवा त्यांचें पूजन करीत नाहीं, केवळ भर्त्याची शुश्रूषा करिते, त्या स्त्रीला उत्कृष्ट स्वर्ग प्राप्त होतो.

३४० भवान्कलत्रमस्माकं स्वामिभावे व्यवस्थितः ।
स्वामी कलत्रं सैन्यस्य गतिरेषा परंतप ॥ ४।६५।२३

( जांबवान् अंगदाला म्हणतो. ) स्वामी या नात्यानें असलेला तूं आम्हांला भार्येच्या स्थानीं आहेस. ( भर्त्यानें भार्येचें रक्षण करणें जसें अत्यंत अवश्य आहे, तसें आम्हीं सर्व वानरांनीं जिवंत जीव आहे तोंपर्यंत तुझें रक्षण करणें अवश्य आहे. ) हे शत्रुतापना, स्वामी हीच सैन्याची भार्या होय. तोच सैन्याचा आधार आहे.

३४१ भावज्ञेन कृतज्ञेन धर्मज्ञेन च लक्ष्मण ।
त्वया पुत्रेण धर्मात्मा न संवृत्तः पिता मम ॥३।१५।२९

( पर्णशालेमध्यें तयार केलेला आश्रम पाहून संतुष्ट झालेला राम लक्ष्मणाला म्हणतो. ) हे लक्ष्मणा, तूं माझ्या मनांतील अभिप्राय जाणणारा आहेस. तूं कृतज्ञ आहेस, धर्मज्ञ आहेस; असा तूं पुत्र असल्यामुळें माझा धर्मात्मा पिता ( दशरथ ) मरण पावलाच नाहीं असें मला वाटतें. ( कारण तूंच माझें पित्याप्रमाणें परिपालन करीत आहेस. )

३४२ भूताश्चार्था विनश्यन्ति देशकालविरोधिताः ।
विक्लवं दूतमासाद्य तमः सूर्योदये यथा ॥ ५।२।३७

सूर्योदय झाला असतां ज्याप्रमाणें अंधकार नाहींसा होतो, त्याप्रमाणें अयोग्य दूताची गांठ पडली असतां, देश व काल विरुद्ध झाल्या कारणानें जवळ जवळ सिद्धीस गेलेलींही कार्यें नाहींशीं होत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३४३. मत्ता गजेन्द्रा मुदिता गवेन्द्रा
वनेषु विक्रान्ततरा मृगेन्द्राः ।
रम्या धरेन्द्रा निभृता नरेन्द्राः
प्रक्रीडितो वारिधरैः सुरेन्द्रः ॥ ४।२८।४३

( वर्षाकालाचें वर्णन. ) वनामध्यें जिकडे तिकडे गजेंद्र मत्त झाले आहेत, मोठमोठे वृषभ आनंदित झाले आहेत, सिंह आपला पराक्रम जास्त जास्तच गाजवूं लागले आहेत, पर्वत रमणीय दिसूं लागले आहेत, राजे लोक स्वस्थ बसले आहेत आणि देवराज इंद्र मेघांच्या योगानें क्रीडा करीत बसला आहे.

३४४ मदङ्गे जीर्णतां यातु यत्त्वयोपकृतं कपे ।
नरः प्रत्युपकाराणामापत्स्वायाति पात्रताम् ॥७।४०।२४

( राम मारुतीला म्हणतो. ) हे कपे, तूं केलेले उपकार माझ्या आंगीं जिरून जावोत. ( तुझ्या उपकारांची फेड तुझ्यावर तसा प्रसंग येऊन माझ्या हातून न होवो. ) मनुष्य संकटकालीं उपकारांच्या फेडीला पात्र होत असतो. ( तुझें उपकारांचें ओझें मजवर जशाचें तसें राहणार. )

३४५ मनो हि हेतुः सर्वेषामिन्द्रियाणां प्रवर्तने ।
शुभाशुभास्ववस्थासु तच्च मे सुव्यवस्थितम्॥५।११।४३

( सीतेचा शोध लावण्यासाठीं रावणाचें अंतःपुर पाहिल्यावर मारुति म्हणतो. ) बऱ्या वाईट स्थितीमध्यें कोणत्याही इंद्रियाची प्रवृत्ति होण्याचें कारण मन हेंच आहे. आणि तें माझें मन तर अगदीं स्वस्थ आहे.

३४६ मन्त्रमूलं च विजयं प्रवदन्ति मनस्विनः ६।६।५

जय मसलतीवर अवलंबून असतो, असें विचारी लोक म्हणत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३४७ मन्ये प्रीतिविशिष्टा सा मत्तो लक्ष्मण सारिका ।
यत्तस्याः श्रूयते वाक्यं शुक पादमरेर्दश ॥ २।५३।२२

( राम म्हणतो. ) हे लक्ष्मणा, ( माझ्या मातेनें पालन करून बोलण्यास शिकविलेली) साळुंकी माझ्यापेक्षां माझ्या मातेवर अधिक प्रीति करणारी आहे असें मला वाटतें. कारण 'हे शुका, शत्रूच्या पायाला दंश कर ' असें तरी त्या साळुंकीचें वाक्य तिच्या कानावर पडत असतें. ( परंतु शत्रूचा पराजय करण्यासंबंधाचे तसे नुसते माझे शब्द देखील तिच्या कानावर पडत नाहींत. )

३४८ ममैव नूनं मरणं न विद्यते
न चावकाशोऽस्ति यमक्षये मम ।
यदन्तकोऽद्यैव न मां जिहीर्षति
प्रसह्य सिंहो रुदतीं मृगीमिव ॥ २।२०।५०

( कौसल्या म्हणते. ) शोक करीत बसलेल्या हरिणीला एकाएकीं उचलून नेणाऱ्या सिंहाप्रमाणें मृत्यु मला नेण्याचें मनांत आणीत नाहीं, यावरून मी खरोखर अमर आहें, व यमाच्या घरीं मला जागा नाहीं हेंच खरें.

३४९ मयैकेन तु निर्युक्तः परिमुच्यस्व राघव ।
मां हि भूतबलिं दत्त्वा पलायस्व यथासुखम्॥३।६९।३९
अधिगन्तासि वैदेहीमचिरेणेति मे मतिः ॥ ३।६९।४०

( कबंध राक्षसाच्या तावडींत सांपडल्यावर लक्ष्मण रामाला म्हणाला. ) हे राघवा, माझ्या एकट्याचा या राक्षसाला ( कबंधाला ) बलि देऊन आपणाला सोडीव, आणि येथून सुखानें पळून जा. लवकरच जानकीची तुला प्राप्ति होईल, असें मला वाटतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३५० मरणान्तानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम् ।
क्रियतामस्य संस्कारो ममाप्येष यथा तव ॥ ६।१०९।२६

( रावणाचें और्ध्वदेहिक कर्म करण्याविषयीं अनुज्ञा देतांना राम बिभीषणाला सांगतो. ) वैराचा अंत मरणाबरोबर होत असल्यामुळें, तें आमचें वैराचें प्रयोजन आतां संपलें. ( आपला कार्यभाग उरकला आहे. ) तर जसा तो तुझा आप्त, तसाच माझाही असल्यामुळें, त्याचा संस्कार कर.

३५१ महतेवाम्बुवेगेन भिन्नः सेतुर्जलागमे ।
दुरावरं त्वदन्येन राज्यखण्डमिदं महत् ॥ २।१०५।५

( भरत रामाला म्हणतो. ) ज्याप्रमाणें पर्जन्यकालीं जलवेगानें मोडलेला पूल दुरुस्त करणें अत्यंत कठीण आहे, त्याप्रमाणें हें भरतखंड नांवाचें प्रचंड राज्य तुझ्यावांचून इतरांस आवरतां येणें कठीण आहे.

३५२ महर्षयो धर्मतपोऽभिरामाः
कामानुकामाः प्रतिबद्धमोहाः ।
अयं प्रकृत्या चपलः कपिस्तु
कथं न सज्जेत सुखेषु राजा ॥ ४।३३।५७

( कामासक्त झालेल्या सुग्रीवाबद्दल तारा लक्ष्मणाला म्हणते. ) धर्मार्थ तपश्चर्या करून त्यांत रममाण होणारे असे महर्षिही कामातुर होऊन स्त्रियांविषयीं मोहित झाले आहेत, मग जातीनेंच चंचल असलेला हा वानर, आणि त्यांतूनही राजा असतांना विषयसुखाविषयीं कसा बरें आसक्त होणार नाहीं ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३५३ मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।**
**यत्क्रौञ्चमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥ १।२।१५**

(वाल्मीकि मुनींच्या मुखांतून निघालेले सहज उद्गार.) हे निषादा, ज्याअर्थी या क्रौंच पक्ष्यांच्या जोडप्यापैकीं काममोहित झालेल्या एकाचा (नराचा) तूं वध केला आहेस, त्याअर्थी तुझे पाय फार वर्षे भुईला लागणार नाहींत. (तूं फार दिवस जगणार नाहींस.) (या श्लोकाचा अन्य रीतीनें आशीर्वादपर खालीलप्रमाणें अर्थ करितां येतो. हे मा-निषाद-लक्ष्मीचे निवासस्थानभूत रामचंद्रा! मंदोदरी व रावण या दंपत्यांतून रावणाचा तुम्हीं वध केला, त्याअर्थी अनेक वर्षेपर्यंत अखंड प्रतिष्ठेस-ऐश्वर्यास-आपण प्राप्त व्हावें.)

**३५४ मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुतः ।**
**अमितस्य तु दातारं भर्तारं का न पूजयेत् ॥ २।३९।३०**

पिता भ्राता किंवा पुत्र यांनीं कितीही दिलें, तरी तें परिमितच असावयाचें; अपरिमित देणारा म्हणजे एक पतिच होय. अशा पतीची सेवा कोणती स्त्री करणार नाहीं?

**३५५ मुमूर्षूणां तु सर्वेषां यत्पथ्यं तन्न रोचते ॥ ३।५३।१८**

जे मरणोन्मुख झालेले असतात,त्यांना पथ्य म्हणून आवडतच नाहीं.

**३५६ मूलमर्थस्य संरक्ष्यमेष कार्यविदां नयः ।**
**मूले हि सति सिध्यन्ति गुणाः सर्वे फलोदयाः ॥४।६५।२५**

कोणत्याही गोष्टीचें मूळ रक्षण करून ठेविलें पाहिजे, असा कार्यवेत्त्या पुरुषांचा न्याय आहे. कारण मूळ जर कायम असेल तर इतर सर्व उदयोन्मुख गुण सिद्धीस जातात. (सर्व किरकोळ गोष्टी सिद्ध होतात.)

**३५७ मृदुर्हि परिभूयते ॥ २।२१।११**

जो मृदु असतो, त्याचा (सर्वत्र) पराजय व्हावयाचाच. (मऊ सांपडलें म्हणजे लोक कोपरानें खणूं लागतात.)

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३५८ यः कृते हन्यते भर्तुः स पुमान् स्वर्गमृच्छति॥ ६।९२।९

जो स्वामिकार्यासाठीं वध पावतो, तो पुरुष स्वर्गाला जातो.

३५९ यः खल्वपि वनं प्राप्य मृगव्यालनिषेवितम् ।
न पिबेन्मधु संप्राप्य स नरो बालिशो भवेत् ॥ ६।१३।२

मृग आणि सर्प यांनीं आश्रय केलेलें दुर्गम वन प्राप्त झाल्यावर मध हातीं आला असतां, जो त्याचें सेवन करीत नाहीं तो मूर्ख पुरुष होय.

३६० यः पश्चात्पूर्वकार्याणि कर्माण्यभिचिकीर्षति ।
पूर्वं चापरकार्याणि स न वेद नयानयौ ॥ ६।१२।३२

पूर्वी कर्तव्य असलेल्या कर्मांचा जो मागाहून विचार करितो आणि नंतरचीं कामें पूर्वी करूं पाहतो. त्याला न्याय अन्याय कांहींच समजत नाहीं.

३६१ यतो मूलं नरः पश्येत्प्रादुर्भावमिहात्मनः ।
कथं तस्मिन्न वर्तेत प्रत्यक्षे सति दैवते ॥ २।१८।१६

( राम कैकेयीला म्हणतो. ) जो ( पिता ) आपल्या जन्मास मूळ कारण, ज्यापासून आपण जन्माला आलों, व म्हणून जो आपलें प्रत्यक्ष दैवत, त्या पित्याच्या मनाप्रमाणें कोणता बरें पुरुष वागणार नाहीं ?

३६२ यत्कर्तव्यं मनुष्येण धर्षणां प्रतिमार्जता ।
तत्कृतं रावणं हत्वा मयेदं मानकाङ्क्षिणा ॥ ६।११५।१३

( राम सीतेला म्हणतो. ) अपमानाचें परिमार्जन करणाऱ्या मनुष्याच्या हातून जें होण्यासारखें आहे, तें मी लौकिकाची चाड बाळगणाऱ्या रामानें रावणाचा वध करून केलें आहे.

३६३ यत्कृत्वा न भवेद्धर्मो न कीर्तिर्न यशो ध्रुवम् ।
शरीरस्य भवेत्खेदः कस्तत्कर्म समाचरेत् ॥ ३।५०।१९

( जटायु रावणाला म्हणतो. ) जें केल्यानें धर्म, कीर्ति, अढळ यश यांपैकीं कांहींएक प्राप्त होत नाहीं, उलट शरीराला क्लेश मात्र होतात त्या कर्माचें आचरण कोण बरें करील ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३६४ यत्र रामो भयं नात्र नास्ति तत्र पराभवः ॥२।४८।१५
ज्या ठिकाणीं राम आहे त्याठिकाणीं भय नाहीं व पराजयही नाहीं.

३६५ यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महार्णवे ।
समेत्य तु व्यपेतायां कालमासाद्य कंचन ॥२।१०५।२६
एवं भार्याश्च पुत्राश्च ज्ञातयश्च वसूनि च ।
समेत्य व्यवधावन्ति ध्रुवो ह्येषां विनाभवः॥२।१०५।२७

ज्याप्रमाणें महासागरामध्यें एक काष्ठ आणि दुसरें काष्ठ यांचा समागम होतो, नंतर कांहीं वेळानें त्यांचा वियोग होतो, त्याचप्रमाणें भार्या, पुत्र, भाऊबंद व संपत्ति यांचा समागम होत असून नंतर तीं एकमेकांपासून दूर धावूं लागतात. कारण, ह्यांचा वियोग हा ठरलेलाच आहे.

३६६ यथागारं दृढस्थूणं जीर्णं भूत्वोपसीदति ।
तथावसीदन्ति नरा जरामृत्युवशं गताः॥ २।१०५।१८

घराचे खांब बळकट असले, तरी तें घर जीर्ण होऊन नाश पावतें, त्याप्रमाणें मनुष्यें जरा व मृत्यु यांच्या स्वाधीन होऊन नाश पावतात.

३६७ यथा तव तथान्येषां रक्ष्या दारा निशाचर ।
आत्मानमुपमां कृत्वा स्वेषु दारेषु रम्यताम् ॥ ५।२१।७

( सीता रावणाला म्हणते. ) हे राक्षसा, जशा तुझ्या स्त्रिया तुला संरक्षणीय आहेत तशाच दुसऱ्यांच्याही आहेत, म्हणून जें आपणाला दुःख तेंच दुसऱ्याला दुःख, असें समजून तूं स्वतःच्याच स्त्रीजनांचे ठिकाणीं रममाण हो.

३६८ यथा दृष्टिः शरीरस्य नित्यमेव प्रवर्तते ।
तथा नरेन्द्रो राष्ट्रस्य प्रभवः सत्यधर्मयोः ॥ २।६७।३३

ज्याप्रमाणें शरीराचें हिताहित पाहण्याविषयीं दृष्टि नेहमीं तत्पर असते, त्याचप्राणें सत्य आणि धर्म ह्यांची प्रवृत्ति करणारा राजा राष्ट्राच्या हिताहिताविषयीं नेहमीं दक्ष असतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३६९ यथा पुष्करपत्रेषु पतितास्तोयबिन्दवः ।
न श्लेषमभिगच्छन्ति तथाऽनार्येषु सौहृदम् ॥६।१६।११

कमलपत्रांवर पडलेले जलबिंदु ज्याप्रमाणें त्या पत्रांना चिकटत नाहींत, त्याचप्रमाणें दुष्ट पुरुषांचे अंतःकरणांत मैत्री ठरत नाहीं.

३७० यथा पूर्वं गजः स्नात्वा गृह्य हस्तेन वै रजः ।
दूषयत्यात्मनो देहं तथाऽनार्येषु सौहृदम् ॥ ६।१६।१५

ज्याप्रमाणें हत्ती प्रथमतः स्नान करितो, आणि नंतर लगेच सोंडेनें धूळ घेऊन आपलें सर्व शरीर मलिन करितो, ( म्हणजे स्नानामुळें प्राप्त झालेली निर्मलता नाहींशी करून टाकितो ) त्याप्रमाणें दुष्ट लोक पूर्वी संपादन केलेला स्नेह स्वतःच नाहींसा करून टाकितात.

३७१ यथा फलानां पक्वानां नान्यत्र पतनाद्भयम् ।
एवं नरस्य जातस्य नान्यत्र मरणाद्भयम् ॥ २।१०५।१७

ज्याप्रमाणें पक्व फलांना पतनावांचून दुसरें भय नाहीं, त्याचप्रमाणें जन्मास आलेल्या मनुष्यांना मरणावांचून दुसरें भय नाहीं.

३७२ यथा हि कुरुते राजा प्रजास्तमनुवर्तते ॥ ७।४३।१९

जसें राजा करूं लागतो, तसें लोकही त्याला अनुसरून वागूं लागतात.

३७३ यथा ह्यनुदका नद्यो यथा वाप्यतृणं वनम् ।
अगोपाला यथा गावस्तथा राष्ट्रमराजकम् ॥ २।६७।२९

जशा उदकहीन नद्या, जसें तृणरहित वन, जशा गुराख्यावांचून गाई, त्याप्रमाणें अराजक राष्ट्र होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३७४ यदन्तरं वायसवैनतेययो—
र्यदन्तरं मद्गुमयूरयोरपि ।
यदन्तरं हंसकगृध्रयोर्वने
तदन्तरं दाशरथेस्तवैव च ॥ ३।४७।४७

( सीता रावणाला म्हणते. ) कावळा आणि गरुड यांमध्यें जेवढें अंतर आहे, पाणकोंबडा आणि मोर यांमध्यें जेवढें अंतर आहे हंस आणि गिधाड यांमध्यें जेवढें अंतर आहे, तेवढें अंतर तूं आणि दाशरथि राम यांच्यामध्यें आहे.

३७५ यदन्तरं सिंहशृगालयोर्वने
यदन्तरं स्यन्दनिकासमुद्रयोः ।
सुराग्र्यसौवीरकयोर्यदन्तरं
तदन्तरं दाशरथेस्तवैव च ॥ ३।४७।४५

( सीता रावणाला म्हणते. ) सिंह आणि कोल्हा ह्यांच्यांत जें अंतर वनामध्यें दिसून येतें, किंवा समुद्र आणि ओढा यांच्यामध्यें जें अंतर दृष्टोत्पत्तीस येतें, अथवा अमृत आणि कांजी ह्यांच्यामध्यें जें अंतर अनुभवाला येतें, तें अंतर दाशरथि राम आणि तूं यांच्यामध्यें असल्याचें निदर्शनास येत आहे.

३७६ यदन्तरं काञ्चनसीसलोहयो—
र्यदन्तरं चन्दनवारिपङ्कयोः ।
यदन्तरं हस्तिबिडालयोर्वने
तदन्तरं दाशरथेस्तवैव च ॥ ३।४७।४६

( सीता रावणाला म्हणते. ) जेवढें अंतर सुवर्ण आणि शिसें या धातूंमध्यें आहे, जेवढें अंतर चंदनोदक आणि चिखल यांत आहे, आणि जेवढें अंतर हत्ती व मांजर यांत आहे, तेवढें अंतर दाशरथि राम आणि तूं यांत आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३७७ यदन्नःपुरुषो भवति तदन्नास्तस्य देवताः ॥ २।१०३।३०

(राम म्हणतो.) जें अन्न पुरुष भक्षण करीत असेल तेंच अन्न त्यानें आपल्या देवतांना द्यावें.

३७८ यदाचरति कल्याणि शुभं वा यदि वाशुभम् ।
तदेव लभते भद्रे कर्ता कर्मजमात्मनः ॥ २।६३।६

(दशरथ कौसल्येला म्हणतो.) हे कल्याणि, मनुष्य शुभ अथवा अशुभ जें कांहीं कर्म करितो, त्याचें फल त्या कर्त्या पुरुषाला कर्माप्रमाणें प्राप्त होतेंच.

३७९ यदा विनाशो भूतानां दृश्यते कालचोदितः ।
तदा कार्ये प्रमाद्यन्ति नराः कालवशं गताः ॥ ३।५६।१६

जेव्हां कालाच्या प्रेरणेप्रमाणें प्राण्यांचा नाश होण्याचा समय दिसत असतो, तेव्हां कालाच्या अधीन झालेल्या लोकांची बुद्धि कर्तव्यासंबंधानें विपरीत होत असते.

३८० यदि त्वं प्रस्थितो दुर्गं वनमद्यैव राघव ।
अग्रतस्ते गमिष्यामि मृद्नन्ती कुशकण्टकान् ॥ २।२७।७

(सीता म्हणते.) हे राघवा, आपण जर आजच दुर्गम वनवासाला निघालां, तर तुमच्यापुढें मीहि दर्भ व कांटे तुडवीत तुडवीत जाणार.

३८१ यदिन्द्रो वर्षते वर्षं न तच्चित्रं भविष्यति ।
आदित्योऽसौ सहस्रांशुः कुर्याद्वितिमिरं नभः ॥४।३९।२
चन्द्रमा रजनीं कुर्यात्प्रभया सौम्य निर्मलाम्
त्वद्विधो वापि मित्राणां प्रीतिं कुर्यात्परंतप ॥ ४।३९।३

(राम सुग्रीवाला म्हणतो.) इंद्रानें जर पर्जन्यवृष्टि केली किंवा हजारों किरणांनीं युक्त असलेल्या सूर्यानें आकाश अंधकाररहित केलें, चंद्रानें आपल्या प्रभेच्या योगानें रात्र निर्मल करून टाकिली किंवा हे विनयसंपन्न शत्रुतापना, तुझ्यासारख्यानें मित्रांवर प्रेम केलें, तर तें कांहीं आश्चर्य म्हणतां येणार नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३८२ यदि ह्यकाले मरणं यदृच्छया
लभेत कश्चिद्गुरुदुःखकर्शितः ।
गताहमद्यैव परेतसंसदं
विना त्वया धेनुरिवात्मजेन वै ॥ २।२०।५३

( कौसल्या रामाला म्हणते. ) अत्यंत दुःखपीडित मनुष्य स्वेच्छेनुरूप जर मरण पावेल, तर वत्सरहित धेनूप्रमाणें मीहि तुझ्या वियोगानें आजच यमसदनाला गेल्यें असत्यें.

३८३ यद्द्रव्यं बान्धवानां वा मित्राणां वा क्षये भवेत् ।
नाहं तत्प्रतिगृह्णीयां भक्ष्यान्विषकृतानिव ॥२।९७।४

( राम लक्ष्मणाला म्हणतो. ) बांधवांच्या व मित्रांच्या नाशानें प्राप्त होणारें द्रव्य विषमिश्रित भक्ष्य पदार्थांप्रमाणें मी स्वीकारणार नाहीं.

३८४ यद्विना भरतं त्वां च शत्रुघ्नं वापि मानद ।
भवेन्मम सुखं किंचिद्भस्म तत्कुरुतां शिखी ॥ २।९७।८

( राम म्हणतो. ) हे मान देणाऱ्या ( लक्ष्मणा, ) तुझा, भरताचा किंवा शत्रुघ्नाचा वियोग होऊन जें कांहीं सुख मला होणार असेल त्याचें अग्नि भस्म करून टाको.

३८५ यद्वृत्ताःसन्ति राजानस्तद्वृत्ताः सन्ति हि प्रजाः२।१०९।९

राजे ज्या वर्तनाचे असतात, त्याच वर्तनाच्या प्रजा असतात.

३८६ यमक्षयमनुप्राप्ता द्रक्ष्यन्ति न हि मानवाः ॥ २।६४।६१

( दशरथ कौसल्येला म्हणतो. ) यमसदनाला निघालेल्या मानवांना कांहीं दिसेनासें होतें.

३८७ यमिच्छेत्पुनरायातं नैनं दूरमनुव्रजेत् ॥ २।४०।५०

( देशांतरीं जाणाऱ्यानें ) पुनः सत्वर परत यावें, अशी इच्छा असल्यास त्याला फार दूरपर्यंत पोहोंचविण्यास जाऊं नये.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३८८ यमिच्छेन्नरकं नेतुं सपुत्रपशुबान्धवम् ।
देवेष्वधिष्ठितं कुर्याद्गोषु तं ब्राह्मणेषु च ॥ ७।५९प्र.२।४८

ज्याला पुत्र, पशु, बांधव या सर्वांसह नरकांत पाडण्याची आपली इच्छा असेल, त्याला देवांवर, ब्राह्मणांवर किंवा गाईंवर अधिकारी नेमावें.

३८९ यस्तु राजा स्थितोऽधर्मे मित्राणामुपकारिणाम् ।
मिथ्या प्रतिज्ञां कुरुते को नृशंसतरस्ततः ॥ ४।३४।८

जो राजा अधर्मानें वागणारा असून, उपकार करणाऱ्या मित्रांपाशीं खोटी प्रतिज्ञा करितो, त्याहून अत्यंत दुष्ट असा कोण बरें आहे ?

३९० यस्तु हित्वा मतं भर्तुः स्वमतं संप्रधारयेत् ।
अनुक्तवादी दूतः सन् स दूतो वधमर्हति ॥ ६।२०।१९

जो दूत आपल्या धन्याचें मत सोडून आपलेंच मत प्रतिपादन करितो, तो दूत धन्यानें न सांगितलेलें बोलत असल्यामुळें वधास पात्र आहे.

३९१ यस्त्वया सह स स्वर्गो निरयो यस्त्वया विना ।
इति जानन्परां प्रीतिं गच्छ राम मया सह ॥ २।३०।१८

( सीता रामाला म्हणते. ) आपल्याबरोबर जी स्थिति मला प्राप्त होईल तो माझा स्वर्ग आहे, आणि आपला वियोग होऊन कसलीही स्थिति जरी प्राप्त होणार असली, तरी तो मला नरक आहे; हें माझें आपल्या ठिकाणीं असलेलें पराकाष्ठेचें प्रेम जाणून हे राम, आपण मला बरोबर घेऊन वनांत चला.

३९२ यस्मात्पश्यन्ति दूरस्थान्सर्वानर्थान्नराधिपाः ।
चारेण तस्मादुच्यन्ते राजानो दीर्घचक्षुषः ॥ ३।३३।१०

राजेलोक दूरदूरच्या सर्व गोष्टी हेरांकडून जाणून घेतात म्हणून त्यांना 'दीर्घदृष्टि' असें म्हणतात.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३९३ यस्य भृत्याश्च दासाश्च मृष्टान्यन्नानि भुञ्जते ।
कथं स भोक्ष्यते रामो वने मूलफलान्ययम् ॥ २।२४।३

( कौसल्या म्हणते. ) ज्याचे नोकर आणि ज्याचे दास मिष्टान्न भोजन करीत आहेत, असा हा राम वनामध्यें मुळें आणि फळें खाऊन कसा राहणार ?

३९४ यस्याः पुत्रसहस्राणि सापि शोचति कामधुक् ।
किं पुनर्या विना रामं कौसल्या वर्तयिष्यति॥२।७४।२८

जिला हजारों पुत्र आहेत, ती कामधेनु देखील ( आपल्या पुत्रांना दुःखी पाहून ) शोक करिते, ( मग जिला एकच पुत्र आहे ) अशी कौसल्या रामावांचून ( रामाला वनांत होणारे क्लेश मनांत आणून ) कसें बरें जीवन धारण करील ?

३९५ यस्यार्था धर्मकामार्थास्तस्य सर्वं प्रदक्षिणम् ।
अधनेनार्थकामेन नार्थः शक्यं विचिन्वता ॥६।८३।३८

ज्याच्यापाशीं द्रव्य असेल त्याचेच धर्म, अर्थ व काम हे पुरुषार्थ सिद्धीस जातात. सर्व कांहीं त्याला अनुकूल असतें. द्रव्याची इच्छा करणारा मनुष्य शोधक असला तरी दरिद्री असल्यास त्याला द्रव्यप्राप्ति होणार नाहीं. ( आरंभीं थोडें तरी द्रव्य असल्यावांचून द्रव्य मिळणें शक्य नाहीं. )

३९६ यस्यार्थास्तस्य मित्राणि यस्यार्थास्तस्य बान्धवाः ।
यस्यार्थाः स पुमाँल्लोके यस्यार्थाः स च पण्डितः॥६।८३।३५

ज्याच्याजवळ पैसा आहे, त्याला मित्र आणि बांधव यांची प्राप्ति होते. ज्याच्याजवळ संपत्ति आहे, तोच जगांत मनुष्य, आणि तोच जगांत पंडित.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३९७ यस्यार्थाः स च विक्रान्तो यस्यार्थाः स च बुद्धिमान् ।
यस्यार्थाः स महाबाहुर्यस्यार्थाः स गुणाधिकः॥६।८३।३६

ज्याच्याजवळ पैसा आहे, तोच पराक्रमी; ज्याच्याजवळ धन आहे, तोच बुद्धिमान्. ज्याच्याजवळ द्रव्य आहे, तो महाबाहु आणि तोच अधिक गुणवान्.

३९८ यः समुत्पतितं क्रोधं क्षमयैव निरस्यति ।
यथोरगस्त्वचं जीर्णां स वै पुरुष उच्यते ॥ ५।५५।६

सर्प जशी जीर्ण त्वचा सोडतो, त्याप्रमाणें उत्पन्न झालेल्या क्रोधाला जो क्षमेनें घालवितो, तोच खरोखर पुरुष म्हटला आहे.

३९९ यः स्वपक्षं परित्यज्य परपक्षं निषेवते ।
स स्वपक्षे क्षयं याते पश्चात्तैरेव हन्यते॥६।८७।१६

( इंद्रजित् बिभीषणाला म्हणतो. ) जो स्वकीय पक्ष सोडून परपक्षाचा स्वीकार करितो, तो, स्वपक्ष नाशाला गेला असतां, त्याच्या ( परपक्षा ) कडून मारला जातो.

४०० या त्वं विरहिता नीता चलचित्तेन रक्षसा ।
दैवसंपादितो दोषो मानुषेण मया जितः ॥ ६।११५।५

( रावणवधानंतर राम सीतेला म्हणतो. ) चंचल चित्ताच्या राक्षसानें ( रावणानें ) तुला एकटी असतांना नेलें, हा अनर्थ दैवामुळें घडला व तो मी मनुष्याच्या पराक्रमानें नाहींसा केला.

४०१ यादृशं कुरुते कर्म तादृशं फलमश्नुते ॥ ७।१५।२४

ज्या प्रकारचें कर्म मनुष्य करितो, त्याचप्रकारचें फळ त्याला मिळतें.

४०२ ये तु सभ्याः सदा ज्ञात्वा तूष्णीं ध्यायन्त आसते ।
यथाप्राप्तं न ब्रुवते ते सर्वेऽनृतवादिनः ॥७।५९प्र.३।३४

जे सभासद एकादी गोष्ट जाणूनही स्वस्थ बसून राहतात, बोलणें प्राप्त झालें असतांही बोलत नाहींत, ते खोटें बोलणारे होत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४०३ ये शोकमनुवर्तन्ते न तेषां विद्यते सुखम् ।**
**तेजश्च क्षयते तेषां न त्वं शोचितुमर्हसि ॥ ४।७।१२**

( सुग्रीव रामाला म्हणतो. ) जे शोकाला अनुसरून वागतात, त्यांना सुख होत नाहीं. त्यांच्या तेजाचा क्षय होतो. म्हणून तूं शोक करूं नकोस.

**४०४ यो विषादं प्रसहते विक्रमे समुपस्थिते ।**
**तेजसा तस्य हीनस्य पुरुषार्थो न सिध्यति ॥ ४।६४।१०**

( अंगद वानरांना म्हणतो. ) पराक्रम करून दाखविण्याचा प्रसंग आला असतां जो पुरुष खिन्न होऊन बसतो, त्या तेजोहीन पुरुषाचा मनोरथ कधींही सिद्धीस जात नाहीं.

**४०५ यो हि कालव्यतीतेषु मित्रकार्येषु वर्तते ।**
**स कृत्वा महतोऽप्यर्थान्न मित्रार्थेन युज्यते ॥४।२९।१५**

जो योग्य काल निघून गेला असतां, मित्रकार्याकरितां प्रयत्न करितो, त्यानें मोठमोठीं कार्यें केलीं, तरी मित्रकार्य सिद्धीस नेल्याचें फळ त्याला प्राप्त होत नाहीं.

**४०६ यो हि दत्त्वा द्विपश्रेष्ठं कक्ष्यायां कुरुते मनः ।**
**रज्जुस्नेहेन किं तस्य त्यजतः कुञ्जरोत्तमम् ॥ २।३७।३**

( राम दशरथाला म्हणतो. ) श्रेष्ठ हत्तीचें दान करून जो त्याला बांधावयाच्या दोरीवर मन ठेवील, ( तर तें आश्चर्य होय. ) त्याला उत्तम हत्तीचा त्याग केल्यानंतर त्या दोरीशीं काय कर्तव्य असतें ?

**४०७ यो हि भृत्यो नियुक्तः सन्भर्त्रा कर्मणि दुष्करे ।**
**कुर्यात्तदनुरागेण तमाहुः पुरुषोत्तमम् ॥६।१।७**

धन्यानें दुर्घट कार्याकडे योजना केली असतां तें कार्य पार पाडून त्याच्या ठिकाणीं प्रेम असल्यामुळें जो सेवक दुसरेंही कार्य शेवटास नेतो, तो उत्तम पुरुष होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४०८ यो हि विक्लवया बुद्ध्या प्रसरं शत्रवे दिशेत् ।
स हतो मन्दबुद्धिः स्याद्यथा कापुरुषस्तथा ॥ ७।६८।२०

जो अविचारानें शत्रूला अवसर देतो, त्या मंदबुद्धि पुरुषाचा दुर्बल पुरुषाप्रमाणें वध होतो.

४०९ रकारादीनि नामानि रामत्रस्तस्य रावण ।
रत्नानि च रथाश्चैव वित्रासं जनयन्ति मे ॥ ३।३९।१८

( मारीच म्हणतो. ) हे रावणा, रामाची जरब बसून गेल्यामुळें रकारानें ज्या नांवांचा आरंभ होतो, तीं नांवें म्हणजे उदाहरणार्थ, रत्नें, रथ इत्यादि हीं माझे ठिकाणीं भय उत्पन्न करितात.

४१० रक्ष्या हि राज्ञा धर्मेण सर्वे विषयवासिनः ॥२।१००।४८

राजानें आपल्या देशांत राहणाऱ्या सर्व लोकांचें धर्मानें परिपालन केलें पाहिजे.

४११ राघवस्य प्रियां भार्यामधिगन्तुं त्वमिच्छसि ।
अवसृज्य शिलां कण्ठे समुद्रं तर्तुमिच्छसि ॥ ३।४७।४१

( सीता रावणाला म्हणते. ) रामाची प्रिय भार्या प्राप्त होण्याची तूं इच्छा करीत आहेस; म्हणजे गळ्यामध्यें शिळा बांधून समुद्र तरून जाण्याचेंच तूं मनामध्यें आणिलें आहेस.

४१२ राजदोषैर्विपद्यन्ते प्रजा ह्यविधिपालिताः ।
असद्वृत्ते हि नृपतावकाले म्रियते जनः ॥ ७।७३।१६

अन्यायानें पाळलेल्या प्रजांचा राजाच्या दोषांनीं नाश होतो. राजा दुर्वर्तन करणारा निघाल्यास प्रजा अकालीं मरतात.

४१३ राजमूलाः प्रजाः सर्वा राजा धर्मः सनातनः ७।५९प्र.३।३८

सर्व प्रजा राजमूलक असतात. राजा म्हणजे सनातन धर्म होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४१४ राजा कर्ता च गोप्ता च
सर्वस्य जगतः पिता ।
राजा कालो युगं चैव
राजा सर्वमिदं जगत् ॥ ७।५९प्र.२।६

राजा हा कर्ता, रक्षक, तसाच सर्व जगाचा पिता आहे. राजा काल आणि युग असून हें सर्व जगत् राजाच आहे.

४१५ राजा धर्मश्च कामश्च द्रव्याणां चोत्तमो निधिः ।
धर्मः शुभं वा पापं वा राजमूलं प्रवर्तते ॥ ३।५०।१०

( जटायु रावणाला म्हणतो. ) धर्म, काम आणि उत्तम वस्तूंचें उत्कृष्ट भांडार हें सर्व राजाच आहे. कारण, धर्म, पुण्य अथवा पातक हें सर्व राजमूलकच प्रवृत्त होत असतें.

४१६ राजा माता पिता चैव
राजा हितकरो नृणाम् ॥ २।६७।३४

राजा ( प्रजांची ) माता, त्याप्रमाणें पिताही आहे. राजा प्रजांचें हित करणारा आहे.

४१७ राजैव कर्ता भूतानां
राजा चैव विनायकः ।
राजा सुप्तेषु जागर्ति
राजा पालयति प्रजाः ॥ ७।५९प्र.२।४

राजाच सर्व भूतांचा कर्ता असून, त्यांचा मोठा नायकही तोच आहे. सर्व लोक निजले असतां राजा जागतो, आणि प्रजापालन करितो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४१८ राज्यं भ्रष्टं वनेवासः सीता नष्टा मृतो द्विजः ।
ईदृशीयं ममालक्ष्मीर्दहेदपि हि पावकम् ॥ ३।६७।२४
संपूर्णमपि चेदद्य प्रतरेयं महोदधिम् ।
सोऽपि नूनं ममालक्ष्म्या विशुष्येत्सरितांपतिः ३।६७।२५

( जटायु पक्षी मूर्च्छित झालेला पाहून राम म्हणतो. ) राज्य नाहींसें झालें, वनामध्यें वास्तव्य करण्याचा प्रसंग आला, सीतेचा ठिकाण नाहीं, आणि ( कैवारी जटायु ) पक्षीही मरून गेला; अशा प्रकारची ही माझी आपत्ति अग्नीलाही जाळून टाकील. हा दुःखसंताप शमन होण्याकरितां संपूर्ण महासागरामध्यें जर मी आज उडी घातली, तर तो नद्यांचा अधिपति असलेला सागरही माझ्या आगीमुळें खरोखर शुष्क होऊन जाईल.

४१९ रामं दशरथं विद्धि मां विद्धि जनकात्मजाम् ।
अयोध्यामटवीं विद्धि गच्छ तात यथासुखम्॥२।४०।९

( सुमित्रा लक्ष्मणाला म्हणते. ) बाबा, तूं रामाचे ठिकाणीं दशरथ राजाची भावना कर, जनकात्मजा सीता मी आहें, असें समज. आणि अरण्य म्हणजे अयोध्या, असें समजून वनाला सुखानें जा.

४२० रामो भामिनि लोकस्य चातुर्वर्ण्यस्य रक्षिता ।
मर्यादानां च लोकस्य कर्ता कारयिता च सः॥५।३५।११

( मारुति लंकेमध्यें सीतेच्यापुढें रामाचे गुण वर्णन करितो. ) बाई सीते, राम हा चातुर्वर्ण्याचा रक्षणकर्ता असून लोकांना धर्ममर्यादा घालून देणारा व त्याप्रमाणें लोकांना वागविणाराही आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४२१ लक्ष्मीश्चन्द्रादपेयाद्वा हिमवान्वा हिमं त्यजेत् ।
अतीयात्सागरो वेलां न प्रतिज्ञामहं पितुः ॥२।११२।१८

( राम भरताला म्हणतो. ) फारतर काय, कांति चंद्राला सोडून जाईल, हिमालयपर्वतावरीलही बर्फ नाहींसें होईल व समुद्रही मर्यादेचें उल्लंघन करील, परंतु मी आपल्या पित्याच्या प्रतिज्ञेचा त्याग करणार नाहीं.

४२२ लोकप्रवादः सत्योऽयं पण्डितैः समुदाहृतः ।
अकाले दुर्लभो मृत्युः स्त्रिया वा पुरुषस्य वा ॥५।२५।१२

( सीता म्हणते. ) स्त्रीला काय किंवा पुरुषाला काय, अकालीं मृत्यु येणें दुर्लभ होय, ही विद्वानांच्या तोंडची म्हण सत्य आहे.

४२३ वक्तव्यतां च राजानो वने राज्ये व्रजन्ति च ॥७।४३।६

( राम म्हणतो. ) राजे वनामध्यें असोत अथवा राज्यावर असोत; लोक त्यांना कांहींना कांहीं तरी नांवें ठेवीतच असतात.

४२४ वयस्यस्योपकर्तव्यं धर्ममेवानुपश्यता ॥ ४।१८।२९

धर्माकडे दृष्टि देऊन वागणाऱ्यानें मित्रावर उपकार केलाच पाहिजे.

४२५ वर्जयेद्वज्रमुत्सृष्टं वर्जयेदन्तकश्चिरम् ।
त्वद्विधं नतु संक्रुद्धो लोकनाथः स राघवः ॥५।२१।२३

( सीता रावणाला म्हणते. ) इंद्राच्या हातून सुटलेलें वज्र अथवा प्रत्यक्ष मृत्युही पुष्कळ दिवसपर्यंत कदाचित् तुझी उपेक्षा करील. परंतु क्रुद्ध झालेला लोकनाथ राम तुझ्यासारख्याचा प्राणघात केल्याशिवाय रहाणार नाहीं.

४२६ वसेत्सह सपत्नेन क्रुद्धेनाशीविषेण च ।
न तु मित्रप्रवादेन संवसेच्छत्रुसेविना ॥ ६।१६।२

( रावण बिभीषणाला म्हणतो. ) शत्रूशीं सहवास करावा. क्रुद्ध झालेल्या सर्पाबरोबरही रहावें; परंतु मित्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या आणि शत्रूची शुश्रूषा करणाऱ्या पुरुषाबरोबर कधीं वास्तव्य करूं नये.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४२७ वहन्ति वर्षन्ति नदन्ति भान्ति
ध्यायन्ति नृत्यन्ति समाश्वसन्ति ।
नद्यो घना मत्तगजा वनान्ताः
प्रियाविहीनाः शिखिनः प्लवङ्गमाः ॥४।२८।२७

(माल्यवान् पर्वतावर राहत असतां राम लक्ष्मणाजवळ वर्षाकालाचें वर्णन करितो.) सांप्रतकाळीं नद्या वाहूं लागल्या आहेत, मेघांनीं वर्षाव सुरू केला आहे, मदोन्मत्त हत्ती गर्जना करीत आहेत, वनप्रदेशामध्यें शोभा येत चालली आहे, प्रिय स्त्रियांचा वियोग झालेले पति स्त्रियांचें ध्यान करीत आहेत, मोर नृत्य करूं लागले आहेत आणि (सुग्रीवाला राज्य प्राप्त झाल्यामुळें) वानरांनाही धीर येऊं लागला आहे. (या श्लोकांतील पहिल्या दोन चरणांमध्यें क्रियापदें आलीं असून शेवटच्या दोन चरणांमध्यें त्या क्रियापदांचे कर्ते क्रमानें दिले आहेत.)

४२८ वाच्यावाच्यं प्रकुपितो न विजानाति कर्हिचित् ।
नाकार्यमस्ति क्रुद्धस्य नावाच्यं विद्यते क्वचित्॥५।५५।५

अतिशय क्रुद्ध झालेला मनुष्य बोलावें काय, आणि बोलूं नये काय, हें जाणत नाहीं. क्रुद्ध मनुष्याला अकार्य असें कांहीं नाहीं, आणि अवाच्य असेंही कांहीं नाहीं.

४२९ वामः कामो मनुष्याणां यस्मिन्किल निबध्यते ।
जने तस्मिंस्त्वनुक्रोशः स्नेहश्च किल जायते ॥ ५।२२।४

(रावण सीतेला म्हणतो.) हा मनुष्यांचा काम दुष्ट आहे. रागावण्यास योग्य अशा मनुष्याचे ठिकाणीं हा जडला, तर त्याविषयीं सुद्धां मनुष्याचे मनांत स्नेह व दया हीं उत्पन्न होतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४३० वाहि वात यतः कान्ता तां स्पृष्ट्वा मामपि स्पृश ।
त्वयि मे गात्रसंस्पर्शश्चन्द्रे दृष्टिसमागमः ॥ ६।५।६

( सीताविरहामुळें शोकाकुल झालेला राम वाऱ्याला म्हणतो. ) हे वायो, ज्या ठिकाणीं माझी कांता आहे, तेथें जा, आणि तिला स्पर्श करून ये, नंतर मला स्पर्श कर. कारण, चंद्र दृष्टीस पडला असतां ज्याप्रमाणें उष्णतेमुळें झालेला संताप नाहींसा होतो, त्याप्रमाणें कांतेच्या शरीराला स्पर्श करून तूं मला स्पर्श केलास, म्हणजे माझा विरहजन्य संताप कांहीं कमी होईल.

४३१ विक्लवो वीर्यहीनो यः
स दैवमनुवर्तते ।
वीराः संभावितात्मानो
न दैवं पर्युपासते ॥ २।२३।१७

जो भित्रा आणि पराक्रमहीन असतो, तो दैवाच्या मागें लागतो. वीर आणि अब्रूदार पुरुष दैवाची कास धरून बसत नाहींत.

४३२ विगर्हितं च नीचं च
कथमार्योऽभिधास्यति ।
त्राहीति वचनं सीते
यस्त्रायेत्त्रिदशानपि ॥ ३।५९।११

( लक्ष्मण म्हणतो. ) हे सीते; जो देवांचेंही रक्षण करूं शकेल तो आर्य राम 'लक्ष्मणा, माझें संरक्षण कर' हें क्षत्रियाला अयोग्य आणि म्हणूनच निंद्य असे शब्द कसे उच्चारील ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४३३ विदितश्चास्तु भद्रं ते योऽयं रणपरिश्रमः ।
सुतीर्णः सुहृदां वीर्यान्न त्वदर्थं मया कृतः ॥६।११५।१५

रक्षता तु मया वृत्तमपवादं च सर्वतः ।
प्रख्यातस्यात्मवंशस्य न्यङ्गं च परिमार्जता ॥
६।११५।१६

(राम सीतेला म्हणतो.) तुझें कल्याण असो. मित्रांच्या सामर्थ्यामुळें ज्याच्यांतून मी चांगल्या रीतीनें पार पडलों, तो हा संग्रामासंबंधी खटाटोप तुझ्या करितां केलेला नाहीं. हें तुला माहीत असूं दे. आपलें वर्तन कायम राखण्याकरितां, अपवाद सर्वस्वी टाळण्याकरितां आणि आपल्या प्रख्यात वंशाला आलेला कमीपणा नाहींसा करण्याकरितां हा सर्व खटाटोप मीं केला आहे.

४३४ विद्यते गोषु संपन्नं विद्यते ज्ञातितो भयम् ।
विद्यते स्त्रीषु चापल्यं विद्यते ब्राह्मणे तपः ॥ ६।१६।९

(पद्मवनांत हत्तींनीं म्हटलेले श्लोक रावण बिभीषणाला सांगतो.) गाईचे ठिकाणीं हव्यकव्यसाधनसंपत्ति, ज्ञातींचे ठिकाणीं भय, स्त्रियांचे ठिकाणीं चंचलता व ब्राह्मणाचे ठिकाणीं तप हीं ठरलेलींच आहेत.

४३५ विनाशयन्ति भर्तारं सहिताः शत्रुभिर्बुधैः ।
विपरीतानि कृत्यानि कारयन्तीह मन्त्रिणः ॥ ६।६३।१७

विचारी शत्रूंशीं मिळून गेलेले कांहीं मंत्री धन्याचा नाश करण्याच्या उद्देशानें त्याच्याकडून विपरीत कृत्यें करवितात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४३६ विनाशे बहवो दोषा जीवन्प्राप्नोति भद्रकम् ।
तस्मात्प्राणान्धरिष्यामि ध्रुवो जीवति संगमः॥५।१३।४५

(लंकेंत सीतेचा शोध लागेना त्यावेळीं मारुति म्हणतो.) प्राणत्याग करण्यांत पुष्कळच दोष असून पुरुष जिवंत राहिला असतां त्याचें कधींतरी कल्याण होतेंच. म्हणून मी प्राण धारण करून राहीन. कारण पुरुष कायम राहिल्यास त्याला इष्ट असलेली गोष्ट कधींतरी निःसंशय प्राप्त होतच असते.

४३७ विनीतविनयस्यापि प्रकृतिर्न विधीयते ।
प्रकृतिं गूहमानस्य निश्चयेन कृतिर्ध्रुवा॥७।५९ प्र. २।२६

ज्याला विनयाचें शिक्षण मिळालें आहे, त्यालाही मूळस्वभाव टाकितां येत नाहीं. ह्यास्तव (दुष्ट) स्वभाव जरी एखाद्यानें बाहेर दाखविला नाहीं, तरी (दुष्ट) कृत्य त्याच्या हातून होणार हें ठरलेलेंच आहे.

४३८ विलीयमानैर्विहगैर्निमीलद्भिश्च पङ्कजैः ।
विकसन्त्या च मालत्या गतोऽस्तं ज्ञायते रविः॥४।२८।५२

सांप्रत पक्षी आपापल्या घरट्यांत जाऊं लागले आहेत, सूर्यविकासी कमलें मिटलीं आहेत, आणि मालती प्रफुल्लित झाली आहे, यावरून सूर्य अस्तास गेला आहे असें समजतें.

४३९ विव्यथे भरतो तीव्रव्रणे तुद्येव सूचिना ॥ २।७५।१७

(कौसल्येनें निर्भर्त्सना केली असतां) भरत, तीव्र व्रणाचे ठिकाणीं सुईनें टोंचावें, त्याप्रमाणें व्यथित झाला.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४४० विषादनक्राध्युषिते परित्रासोर्मिमालिनि ।
किं मां न त्रायसे मग्नां विपुले शोकसागरे ॥ ३।२१।१२

(कान व नाक कापले गेल्यानंतर शूर्पणखा भ्रात्या खराला म्हणते.) खेदरूप नक्रांचें ज्यांत वास्तव्य आहे, आणि ज्यावर त्रासरूप लाटा उसळत आहेत अशा अगाध शोकसागरांत मग्न झालेल्या माझा उद्धार तूं कां बरें करीत नाहींस ?

४४१ व्यसने वार्थकृच्छ्रे वा भये वा जीवितान्तगे ।
विमृशंश्च स्वया बुद्ध्या धृतिमान्नावसीदति ॥ ४।७।९.

संकटकालीं, धनाचा नाश झाला असतां, अथवा जीविताचा नाश करणारें असें भय प्राप्त झालें असतांही स्वतःच्या बुद्धीनें विचार करणारा धैर्यवान् पुरुष मनामध्यें खचत नाहीं.

४४२ व्रतोपवासनिरता या नारी परमोत्तमा ।
भर्तारं नानुवर्तेत सा च पापगतिर्भवेत् ॥ २।२४।२६

आचरणानें सर्वोत्कृष्ट आणि नेहमीं व्रतें व उपवास करणारी अशी जरी स्त्री असली, तरी भर्त्याच्या अनुरोधानें जर ती वागत नसेल तर तिला नरकप्राप्ति होते.

४४३ शक्यमापतितः सोढुं प्रहारो रिपुहस्ततः ।
सोढुमापतितः शोकः सुसूक्ष्मोऽपि न शक्यते॥२।६२।१६

शत्रूच्या हातचा प्रहार सहन करणें शक्य आहे. परंतु प्राप्त झालेला अतिसूक्ष्मही शोक सहन करणें शक्य नाहीं.

४४४ शक्या लोभयितुं नाहमैश्वर्येण धनेन वा ।
अनन्या राघवेणाहं भास्करेण यथा प्रभा ॥ ५।२१।१५

(सीता रावणाला म्हणते.) ऐश्वर्याच्या योगानें अथवा धनाच्या योगानें माझें मन कोणालाही वळवितां येणें शक्य नाहीं. कारण, सूर्यापासून जशी त्याची प्रभा भिन्न नाहीं, तशीच मी रामापासून भिन्न नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४४५ शतयोजनविस्तीर्णः सागरो मकरालयः ।
विक्रमश्लाघनीयेन क्रमता गोष्पदीकृतः ॥ ५।३६।८

( सीता मारुतीला म्हणते. ) मकरांचें वसतिस्थान, तसेंच शंभर योजनें विस्तीर्ण अशा समुद्राचें उल्लंघन करून तूं त्याला गाईच्या पावलाप्रमाणें करून टाकिलें आहेस. त्याअर्थी तुझा पराक्रम अत्यंत वर्णनीय आहे.

४४६ शरार्चिषमनाधृष्यं चापखड्गेन्धनं रणे ।
रामाग्निं सहसा दीप्तं न प्रवेष्टुं त्वमर्हसि ॥ ३।३७।१५

( मारीच रावणाला म्हणतो. ) बाण ह्या ज्याच्या ज्वाला आहेत, धनुष्य व खड्ग हीं ज्याचीं इंधनें आहेत, व ज्याच्यासमोर जाणेंही दुर्घट आहे अशा रामरूप प्रदीप्त अग्नींत रणामध्यें अविचारानें प्रवेश करणें तुला योग्य नाहीं.

४४७ शिलातलं प्राप्य यथा मृगेन्द्रो
महारणं प्राप्य यथा गजेन्द्रः ।
राज्यं समासाद्य यथा नरेन्द्र-
स्तथा प्रकाशो विरराज चन्द्रः ॥ ५।५।७

( लंकेंत गेलेल्या मारुतीनें आकाशाच्या मध्यभागीं आलेला चंद्र अवलोकन केला. ) शिलातलावर प्राप्त झालेला सिंह, मोठ्या रणांगणावर येऊन ठेपलेला गजश्रेष्ठ, राज्यप्राप्ति झालेला नरपति जसे शोभतात, त्याप्रमाणें ह्या वेळीं प्रकाशमान झालेला चंद्र शोभत होता.

४४८ शुभं वा यदि वा पापं यो हि वाक्यमुदीरितम् ।
सत्येन प्रतिगृह्णाति स वीरः पुरुषोत्तमः ॥ ४।३०।७२

शुभ किंवा अशुभ वाक्य एकदां उच्चारिलें असतां तें जो खरें करून दाखवितो तोच वीर पुरुषश्रेष्ठ होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४४९ शुभकृच्छुभमाप्नोति पापकृत्पापमश्नुते ।
विभीषणः सुखं प्राप्तस्त्वं प्राप्तः पापमीदृशम् ॥६।१११।२६

( मंदोदरी वध पावलेल्या रावणाला उद्देशून म्हणते. ) पुण्यकर्म करणाऱ्याला कल्याणप्राप्ति होते, तर पापकर्म करणाऱ्याला पापफळ भोगावें लागतें. विभीषणाला सुखाची प्राप्ति झाली, आणि ( त्याच्या उलट ) तुला अशी वाईट स्थिति प्राप्त झाली आहे.

४५० शुष्ककाष्ठैर्भवेत्कार्यं लोष्टैरपि च पांसुभिः ।
न तु स्थानात्परिभ्रष्टैः कार्यं स्याद्वसुधाधिपैः॥३।३३।१८

शुष्क काष्ठांनीं, मातीच्या ढेकळांनीं, तसेंच रजःकणांनींही कार्यें होतात. परंतु राजा एकदां स्थानभ्रष्ट झाला म्हणजे त्याजपासून कोणतेंही कार्य होत नाहीं.

४५१ शूराश्च बलवन्तश्च कृतास्त्राश्च रणाजिरे ।
कालाभिपन्नाः सीदन्ति यथा वालुकसेतवः॥ ३।६९।५०

शूर असोत, बलवान् असोत, अथवा रणभूमीवर अस्त्रविद्यानैपुण्य दाखविणारे असोत, कालानें व्याप्त झाले असतां ते वाळूच्या सेतूप्रमाणें नाश पावतात.

४५२ शूरेण धनदभ्रात्रा बलैः समुदितेन च ।
अपोह्य रामं कस्माच्चिद्दारचौर्यं त्वया कृतम् ॥५।२२।२२

( सीता रावणाला म्हणते. ) सैन्यांच्या योगानें प्रबल झालेला तूं कुबेराचा भ्राता मोठा शूर पडलास; म्हणूनच मारीच राक्षसाच्या मायेनें रामाला दूर घालवून स्त्रीचौर्य करण्याचें शौर्य तुझ्या हातून घडलें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४५३ शोकश्च किल कालेन गच्छता ह्यपगच्छति ।**
**मम चापश्यतः कान्तामहन्यहनि वर्धते ॥ ६।५।४**

( राम लक्ष्मणाला म्हणतो. ) काल जसजसा जातो, तसतसा शोक खरोखर कमी होत असतो. परंतु सीता दृष्टीस पडत नसल्यामुळें माझा शोक तर दिवसेंदिवस वाढत आहे.

**४५४ शोकः सर्वार्थनाशनः ॥ ६।२।१७**

शोक हा सर्वार्थांचा नाशक आहे.

**४५५ शोकेनाभिप्रपन्नस्य जीविते चापि संशयः ॥ ४।७।१३**

शोकानें मनुष्य व्याप्त झाला असतां जीविताविषयीं देखील संशय उत्पन्न होत असतो.

**४५६ शोको नाशयते धैर्यं शोको नाशयते श्रुतम् ।**
**शोको नाशयते सर्वं नास्ति शोकसमो रिपुः॥२।६२।१५**

शोक धैर्याचा नाश करितो, शोक ( शिकलेल्या ) शास्त्रविद्येचा नाश करितो, शोक सर्वांचा नाश करितो. म्हणून शोकासारखा दुसरा शत्रु नाहीं.

**४५७ शोच्यस्त्वमसि दुर्बुद्धे निन्दनीयश्च साधुभिः ।**
**यस्त्वं स्वजनमुत्सृज्य परभृत्यत्वमागतः ॥ ६।८७।१३**

( इंद्रजित् बिभीषणाला म्हणतो. ) हे दुर्बुद्धे, ज्याअर्थी स्वजनांचा त्याग करून तूं परक्यांचा दास झाला आहेस, त्याअर्थी तुझी स्थिति शोचनीय झाली असून तूं सज्जनांच्या निंदेस पात्र झाला आहेस.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४५८ श्रूयते हि द्रुमः कश्चिच्छेत्तव्यो वनजीवनैः ।
संनिकर्षादिषीकाभिर्मोचितः परमाद्भयात् ॥ २।८।३०

( मंथरा कैकेयीला म्हणते. ) वनामध्यें उपजीविका करणाऱ्यांना एक वृक्ष तोडावयाचा होता; परंतु त्याच्या भोंवतालीं असलेल्या कांटेरी झुडपांनीं त्या पराकाष्ठेच्या तोडण्याच्या भीतीपासून त्या वृक्षाला मुक्त केलें असें ऐकण्यांत आहे.

४५९ षट्पादतन्त्रीमधुराभिधानं
प्लवङ्गमोदीरितकण्ठतालम् ।
आविष्कृतं मेघमृदङ्गनादै-
र्वनेषु संगीतमिव प्रवृत्तम् ॥ ४।२८।३६

( राम लक्ष्मणाजवळ वर्षाकालाचें वर्णन करितो. ) वनामध्यें आज गायन सुरू झाल्यासारखें वाटत आहे. कारण भृंग गुंजारव करीत असल्यामुळें तंतुवाद्यांच्या मधुरध्वनीचा भास होत आहे, बेडूक शब्द करीत असल्यामुळें कोणी गवईच आपल्या कंठांतून तालसूर काढीत असल्यासारखें भासत आहे. आणि मेघांची गर्जना चालू असल्यामुळें मृदंगवादनच सुरू असल्याचा भास होत आहे.

४६० संश्रुत्य च न शक्ष्यामि जीवमानः प्रतिश्रवम् ।
मुनीनामन्यथाकर्तुं सत्यमिष्टं हि मे सदा ॥ ३।१०।१७

( राम सीतेला म्हणतो. ) एकदां जी मुनींच्या जवळ प्रतिज्ञा केली, त्या प्रतिज्ञेचें जिवांत जीव आहे तोंपर्यंत माझ्यानें उल्लंघन होणें शक्य नाहीं.

४६१ सक्तं ग्राम्येषु भोगेषु कामवृत्तं महीपतिम् ।
लुब्धं न बहु मन्यन्ते श्मशानाग्निमिव प्रजाः ॥३।३३।३

जो राजा ग्राम्य विषयांचे ठिकाणीं आसक्त होऊन मनास येईल, तसें वर्तन करणारा आणि लोभी असतो, त्यास प्रजा स्मशानांतील अग्नीप्रमाणें अनादरणीय समजतात.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४६२ संजीवितं क्षिप्रमहं त्यजेयं
विषेण शस्त्रेण शितेन वापि ।
विषस्य दाता न तु मेऽस्ति कश्चि-
च्छस्त्रस्य वा वेश्मनि राक्षसस्य ॥ ५।२८।१६

( रावणाच्या कारागृहांत त्रस्त झालेली सीता म्हणते. ) विषानें किंवा तीक्ष्ण शस्त्रानें मी आतां जीविताचा त्याग सत्वर करणार आहें, परंतु या राक्षसाच्या गृहांत विष किंवा शस्त्र कोणी मला आणून देईल, असा नाहीं.

४६३ स तु श्रेष्ठैर्गुणैर्युक्तः प्रजानां पार्थिवात्मजः ।
बहिश्चर इव प्राणो बभूव गुणतः प्रियः ॥ २।१।१९

उत्कृष्ट गुणांनीं संपन्न असलेला तो राजकुमार राम आंगच्या गुणांमुळें प्रजाजनांना-शरीराबाहेर संचार करणारा प्राणच कीं काय असा-प्रिय झाला.

४६४ सत्यधर्माभिरक्तानां नास्ति मृत्युकृतं भयम्॥६।४६।३४

सत्यधर्माचे ठिकाणीं आसक्त झालेल्या लोकांना मृत्यूचें भय नसतें.

४६५ सत्यमेकपदं ब्रह्म सत्ये धर्मः प्रतिष्ठितः ।
सत्यमेवाक्षया वेदाः सत्येनावाप्यते परम् ॥ २।१४।७

सत्य हें एकपदरूप ( ॐकाररूप ) ब्रह्म आहे; सत्याचे ठिकाणीं धर्माची स्थिति आहे; अक्षय वेदही सत्याच्याच आश्रयानें आहेत. सत्यानें परब्रह्माची प्राप्ति होते.

४६६ सत्यमेवेश्वरो लोके सत्ये धर्मः सदाश्रितः॥२।१०९।१३

सत्य म्हणजेच परमेश्वर होय, सज्जनांनीं आश्रय केलेला धर्म सत्याचे ठिकाणीं आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४६७ सत्यं बतेदं प्रवदन्ति लोके
नाकालमृत्युर्भवतीति सन्तः ॥ ५।२८।३

( सीता म्हणते. ) अकालीं कोणालाही मरण येत नाहीं, म्हणून सत्पुरुष बोलतात, तें सत्य आहे.

४६८ सत्यश्चात्र प्रवादोऽयं लौकिकः प्रतिभाति मा ।
पितॄन्समनुजायन्ते नरा मातरमङ्गनाः ॥ २।३५।२८

( सुमंत्र सारथि कैकेयीला म्हणतो. ) पुरुष पित्याप्रमाणें होतात आणि स्त्रिया मातेप्रमाणें निपजतात, या लौकिक म्हणीची सत्यता ह्या तुझ्या आचरणांत तर मला अगदीं खरोखर पटत आहे.

४६९ सदृशाच्चापकृष्टाच्च लोके कन्यापिता जनात् ।
प्रधर्षणमवाप्नोति शक्रेणापि समो भुवि ॥ २।११८।३५

कन्येचा पिता हा पृथ्वीवर इंद्रासारखा असला, तरी आपल्या बरोबरीच्या किंवा आपल्याहून कमी योग्यतेच्याही वरपक्षाकडून त्याचा अपमान होतो. ( मग योग्यतेनें अधिक असलेल्या वरपक्षाची तर गोष्ट पाहिजे कशाला ? )

४७० सन्तश्चारित्रभूषणाः ॥ ६।११३।४२

सज्जनांचें भूषण म्हणजे त्यांचें चारित्र्य होय.

४७१ संनिकर्षाच्च सौहार्दं जायते स्थावरेष्विव ॥ २।८।२८

( मंथरा कैकेयीला म्हणते. ) वृक्षलतादिकांचे ठिकाणीं सांनिध्यामुळें जसें परस्परसंयोगरूप प्रेम वाढत असतें, तसें मनुष्यांमध्येंही सांनिध्यामुळेंच प्रेम वाढत असतें.

४७२ स भारः सौम्य भर्तव्यो यो नरं नावसादयेत् ।
तदन्नमपि भोक्तव्यं जीर्यते यदनामयम् ॥ ३।५०।१८

( जटायु रावणाला म्हणतो. ) हे सौम्या, ज्याच्याखालीं चिरडून जाण्याची पाळी येणार नाहीं, तो भार मनुष्यानें उचलावा आणि अन्न तरी रोगोत्पत्ति न होतां जें जिरेल तेंच खावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४७३ समुत्पतितमेघस्य वीचिमालाकुलस्य च ।
विशेषो न द्वयोरासीत्सागरस्याम्बरस्य च ॥ ६।४।१२०

उद्भवलेल्या मेघांनीं युक्त असलेलें आकाश आणि लाटांच्या समुदायांनीं व्याप्त होऊन गेलेला समुद्र ह्यांमध्यें कांहींएक भेद दिसेनासा झाला.

४७४ संपृष्टेन तु वक्तव्यम् ॥ ३।४०।९

विचारलें असतां बोलावें.

४७५ संप्राप्तमवमानं यस्तेजसा न प्रमार्जति ।
कस्तस्य पौरुषेणार्थो महताप्यल्पचेतसः ॥ ६।११५।६

( राम सीतेला म्हणतो. ) अपमान झाला असतां जो तेजाच्या योगानें त्याचें परिमार्जन करीत नाहीं, त्या मंदमति पुरुषाचा पराक्रम जरी मोठा असला तरी त्याचा काय उपयोग ?

४७६ सरितां तु पतिः स्वल्पां मर्यादां सत्यमन्वितः ।
सत्यानुरोधात्समये वेलां स्वां नातिवर्तते ॥ २।१४।६

समुद्र सत्यव्रत असल्या करणानें सत्याचा त्याग होईल, या भीतीनें ( चंद्रोदयकालीं ) स्वल्प मर्यादा उल्लंघ्य असूनही तो स्वतःच्या मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं.

४७७ सर्वत्र खलु दृश्यन्ते साधवो धर्मचारिणः ।
शूराः शरण्याः सौमित्रे तिर्यग्योनिगतेष्वपि ॥ ३।६८।२४

( सीतेला सोडविण्यासाठीं रावणापाशीं युद्ध करीत असतां जटायु पक्षी मरण पावला हें पाहून राम म्हणतो. ) हे लक्ष्मणा, शूर व शरण जाण्यास योग्य असे धर्मानें वागणारे साधुजन खरोखर सर्वत्र म्हणजे तिर्यग्योनि प्राप्त झालेल्या प्राण्यांतही दृष्टीस पडतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४७८ सर्वथा सुकरं मित्रं दुष्करं प्रतिपालनम् ।
अनित्यत्वात्तु चित्तानां प्रीतिरल्पेऽपि भिद्यते॥४।३२।७

( सुग्रीव मंत्र्यांना म्हणतो. ) मित्र संपादन करणें सुलभ आहे, परंतु त्याच्याशीं सख्य कायम राखणें मात्र सर्व प्रकारें कठीण आहे. कारण, अंतःकरणें स्थिर नसल्यामुळें शत्रूंनीं अल्पस्वल्प जरी मित्राच्या कानांत सांगितलें, तरी सुद्धां उभयतांतील प्रेमाला व्यत्यय येतो.

४७९ सर्वदा सर्वभूतानां नास्ति मृत्युरलक्षणः ।
तव तद्वदयं मृत्युर्मैथिलीकृतलक्षणः ॥६।१११।२९

( मंदोदरी रावणाला उद्देशून म्हणते. ) सर्व प्राण्यांना सर्वकाळीं निमित्तावांचून मृत्यु नाहीं, त्याप्रमाणें तुला हा आलेला मृत्यु सीतेच्या निमित्तानें आहे.

४८० सर्वे क्षयान्ता निचयाः पतनान्ताः समुच्छ्रयाः ।
संयोगा विप्रयोगान्ता मरणान्तं च जीवितम्॥७।५२।११

तस्मात्पुत्रेषु दारेषु मित्रेषु च धनेषु च ।
नातिप्रसङ्गः कर्तव्यो विप्रयोगो हि तैर्ध्रुवम् ॥ ७।५२।१२

सर्व ऐश्वर्याचा शेवट नाशांत होतो, उच्चत्वाचा शेवट पतनांत होतो, संयोगाचा शेवट वियोगांत होतो, आणि जीविताचा शेवट मरणांत होतो. म्हणून पुत्र, स्त्री, मित्र, धनसंपत्ति यांच्या ठिकाणीं अतिशय आसक्ति कधीं करूं नये. कारण, त्यांचा वियोग निःसंशय व्हावयाचाच आहे.

४८१ सर्वे चण्डस्य बिभ्यति ॥ ६।२।२१

जो अत्यंत क्रुद्ध असतो, त्याला सर्व भितात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४८२ स सुहृद्यो विपन्नार्थं दीनमभ्युपपद्यते ।
स बन्धुर्योऽपनीतेषु साहाय्यायोपकल्पते ॥ ६।६३।२७

ज्याचा कार्यभाग नष्ट झाला आहे, अशा दीनावर जो उपकार करितो, तोच सुहृद् होय, आणि नीतिमार्गापासून दूर गेलेल्या लोकांना नीतिमार्गावर आणून सोडण्यासाठीं जो साह्य करण्यास तयार असतो तो बंधु होय.

४८३ सहस्राण्यपि मूर्खाणां यद्युपास्ते महीपतिः ।
अथवाप्ययुतान्येव नास्ति तेषु सहायता ॥२।१००।२३
एकोऽप्यमात्यो मेधावी शूरो दक्षो विचक्षणः ।
राजानं राजपुत्रं वा प्रापयेन्महतीं श्रियम् ॥२।१००।२४

( राम भरताला म्हणतो. ) हजारोंच नव्हें परंतु लाखों मूर्ख लोक जरी राजाजवळ असले तरी त्यांची राजाला मदत होत नाहीं. परंतु बुद्धिमान, शूर, दक्ष व नीतिशास्त्रवेत्ता असा एक जरी अमात्य जवळ असला, तरी तो राजाला अथवा राजपुत्राला मोठें वैभव प्राप्त करून देईल. ( ‘ अयुत ’ म्हणजे ‘ दहा हजार ’ असा अर्थ असतांना ‘ अयुतानि ’ याचें भाषांतर भाषेंत जुळण्याकरितां ‘ लाखों ’ असें केलें आहे. )

४८४ सहैव मृत्युर्व्रजति सह मृत्युर्निषीदति ।
गत्वा सुदीर्घमध्वानं सह मृत्युर्निवर्तते ॥ २।१०५।२२

( राम भरताला म्हणतो. ) प्राणी जाऊं लागला तरी मृत्यु त्याच्या बरोबर जातोच; तो बसला तरी मृत्यु त्याच्या बरोबर बसतोच, आणि बराच दूर मार्ग चालून प्राणी परत फिरूं लागला, तरी देखील मृत्यु त्याच्या बरोबरच चालत जाऊन परत फिरतो ( मृत्यु प्राण्यांच्या संनिध एकसारखा आहेच आहे. )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४८५ सागरं चाम्बरप्रख्यमम्बरं सागरोपमम् ।
रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥६।१०७।५१

सागर आकाशासारखा आहे तसें आकाश सागरासारखें आहे. परंतु रामरावणाचें युद्ध म्हणजे रामरावणांच्या सारखेंच होय. ( त्याला उपमाच नाहीं. )

४८६ सापराधोऽपि बालो हि रक्षितव्यः स्वबान्धवैः ७।१३।२०

कोणी बालक जरी अपराधी असला, तरी त्याचें बांधवांनीं रक्षण करणें योग्य आहे.

४८७ सीताहरणजं दुःखं न मे सौम्य तथागतम् ।
यथा विनाशो गृध्रस्य मत्कृते च परंतप ॥ ३।६८।२५

( जटायूचा वध झाल्यानंतर राम लक्ष्मणाला म्हणतो. ) हे विनयसंपन्न शत्रुतापना, माझ्याकरितां गृध्रपक्ष्याचा ( जटायूचा ) वध झाला, याबद्दल जसा माझ्या मनाला चटका लागून राहिला आहे, तसा सीतेचा अपहार झाल्यामुळें होणाऱ्या दुःखाचा चटका लागून राहिलेला नाहीं.

४८८ सुजीवं नित्यशस्तस्य यः परैरुपजीव्यते ।
राम तेन तु दुर्जीवं यः परानुपजीवति ॥ २।१०५।७

( भरत म्हणतो. ) हे रामा, ज्या पुरुषाच्या जीवितावर दुसरे जीवित चालवितात, त्या पुरुषाचें जीवित धन्य होय. तसेंच ज्या पुरुषाचें जीवित दुसऱ्यावर अवलंबून असतें, तें जीवित दुःखावह होय.

४८९ सुनीतं हितकामेन वाक्यमुक्तं दशानन ।
न गृह्णन्त्यकृतात्मानः कालस्य वशमागताः॥६।१६।२०

( बिभीषण रावणाला म्हणतो. ) हे दशानना, हितेच्छु पुरुषानें उत्कृष्टनीतीला अनुसरूनही केलेलें भाषण कालाच्या तावडींत सापडलेले अजितेंद्रिय पुरुष स्वीकारीत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४९० सुमुखं दुर्मुखी रामं वृत्तमध्यं महोदरी ।
विशालाक्षं विरूपाक्षी सुकेशं ताम्रमूर्धजा ॥ ३।१७।९
प्रियरूपं विरूपा सा सुस्वरं भैरवस्वना ।
तरुणं दारुणा वृद्धा दक्षिणं वामभाषिणी ॥३।१७।१०
न्यायवृत्तं सुदुर्वृत्ता प्रियमप्रियदर्शना ।
शरीरजसमाविष्टा राक्षसी राममब्रवीत् ॥३।१७।११

( रामाजवळ शूर्पणखा आली आणि बोलूं लागली. ) राम सुंदर मुखाचा, तर ती ( शूर्पणखा ) दुर्मुखी; राम कृश उदराचा, तर ती महोदरी; राम विशालाक्ष, तर ती विरूपाक्षी; राम सुंदर केशांचा, तर ती ताम्रकेशी; राम सुस्वरूप, तर ती कुरूप; रामाचा सुस्वर तर तिचा कर्कश स्वर; राम तरुण तर ती क्रूर व वृद्ध; राम चतुर भाषण करणारा; तर ती दुर्भाषण करणारी; राम न्यायानें वागणारा, तर ती अत्यन्त दुर्वृत्त; राम सर्वांस प्रिय, तर ती सर्वांस अप्रिय, अशी ती कामपीडित ( शूर्पणखा ) राक्षसी रामाला म्हणाली. ( या ठिकाणीं राम व शूर्पणखा यांना दिलेलीं विशेषणें परस्पर विरुद्ध आहेत. )

४९१ सुलभाः पुरुषा राजन्सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः॥३।३७।२

( मारीच रावणाला म्हणतो. ) हे राजा, ( हिताहिताचा विचार न करितां केवळ ) सतत मधुर भाषण करणारे पुरुष सुलभ आहेत; परंतु अप्रिय जरी असलें तरी हितकारक भाषण करणारा वक्ता आणि तें ऐकून घेणारा श्रोता हे दुर्लभ आहेत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४९२ सुहृदामर्थकृच्छ्रेषु युक्तं बुद्धिमता सदा ।
समर्थेनोपसंदेष्टुं शाश्वतीं भूतिमिच्छता ॥ ६।१७।३३

( राम वानरांना म्हणतो. ) मित्रांचा निरंतर अभ्युदय व्हावा, अशी इच्छा करणाऱ्या बुद्धिमान् व विचारसमर्थ पुरुषानें, कार्याकार्याविषयीं संदेह प्राप्त झाला असतां, मित्रांना उपदेश करणें सर्वदा योग्यच आहे.

४९३ सूक्ष्मः परमविज्ञेयः सतां धर्मः प्लवङ्गम ।
हृदिस्थः सर्वभूतानामात्मा वेद शुभाशुभम् ॥४।१८।१५

( राम वालीला म्हणतो. ) हे वानरा, सज्जनांचा धर्म सूक्ष्म असल्यामुळें तो इतरांना समजणें अत्यंत अशक्य आहे. प्राणिमात्राच्या हृदयामध्यें वास करणारा परमात्मा मात्र प्राण्यांचें पापपुण्य जाणीत आहे.

४९४ सौमित्रे योऽभिषेकार्थे मम संभारसंभ्रमः ।
अभिषेकनिवृत्त्यर्थे सोऽस्तु संभारसंभ्रमः ॥ २।२२।५

( राम म्हणतो. ) हे लक्ष्मणा, माझ्या अभिषेकाचें सामान जितक्या त्वरेनें जुळविण्यांत आलें आहे, तितक्या त्वरेनें वनवासाला जाण्याच्या सामग्रीची तयारी झाली पाहिजे.

४९५ स्त्रिया भर्ता हि दैवतम् ॥ २।३९।३१

पति म्हणजे स्त्रियांचें दैवतच होय.

४९६ स्त्रीणां पवित्रं परमं पतिरेको विशिष्यते ॥ २।३९।२४

स्त्रियांना पति हेंच उत्कृष्ट पुण्यसाधन आहे, स्त्रीला इतर सर्व पुण्यसाधनांपेक्षां पति अधिक आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४९७ स्थिरं हि नूनं हृदयं ममायसं**
**न भिद्यते यद्भुवि नो विदीर्यते ।**
**अनेन दुःखेन च देहमर्पितं**
**ध्रुवं ह्यकाले मरणं न विद्यते ॥ २।२०।५१**

(राम वनवासाला जाणार हें ऐकून शोकाकुल झालेली कौसल्या म्हणते.) खरोखर माझें हृदय ज्याअर्थी ह्या प्रसंगीं फाटून जात नाहीं, त्याअर्थी तें लोखंडाचें बनविल्याप्रमाणें बळकट आहे आणि अशा प्रकारच्या दुःखानें देह व्याप्त झाला असतांना देखील ज्याअर्थी तो विदीर्ण होऊन पृथ्वीवर पडत नाहीं, त्याअर्थी मरण अकालीं कोणाला येत नाहीं, हेंच निश्चित आहे.

**४९८ स्निग्धस्य भजमानस्य युक्तमर्थाय कल्पितुम् ॥७।२५।४९**

प्रेमानें आपल्याजवळ येणाऱ्याच्या उपयोगीं पडणें योग्य आहे.

**४९९ स्वर्गो धनं वा धान्यं वा विद्याः पुत्राः सुखानि च ।**
**गुरुवृत्त्यनुरोधेन न किंचिदपि दुर्लभम् ॥ २।३०।३६**

(राम सीतेला म्हणतो.) वडिलांच्या तंत्रानें वागणाऱ्याला स्वर्ग, धन, धान्य, विद्या, पुत्र आणि सुख ह्यांपैकीं कांहींच दुर्लभ नाहीं.

**५०० स्वामिना प्रतिकूलेन प्रजास्तीक्ष्णेन रावण ।**
**रक्ष्यमाणा न वर्धन्ते मृगा गोमायुना यथा ॥ ३।४१।१४**

(मारीच रावणाला म्हणतो.) व्याध रक्षण करीत असतांना ज्याप्रमाणें मृग वृद्धिंगत होत नाहींत, त्याचप्रमाणें प्रतिकूल आणि उग्र असा राजा रक्षण करीत असतांना प्रजेची भरभराट होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



५०१ हंसो यथा राजतपञ्जरस्थः
सिंहो यथा मन्दरकन्दरस्थः ।
वीरो यथा गर्वितकुञ्जरस्थ-
श्चन्द्रोऽपि बभ्राज तथाम्बरस्थः ॥ ५।५।४

( लंकेंत गेलेल्या मारुतीनें चंद्र अवलोकन केला. ) रुप्याच्या पिंजऱ्यामध्यें असलेला हंस जसा शोभतो, मंदरपर्वताच्या गुहेंत राहिलेला सिंह जसा दिसतो आणि मदोन्मत्त हत्तीवर आरूढ झालेला वीर जसा चमकतो, तसा आकाशांत असलेला चंद्र झळकूं लागला.

५०२ हित्वा धर्मं तथार्थं च कामं यस्तु निषेवते ।
स वृक्षाग्रे यथा सुप्तः पतितः प्रतिबुध्यते ॥ ४।३८।२२

( राम सुग्रीवाला म्हणतो. ) धर्म व अर्थ यांची पर्वा न करितां जो कामाचेंच सेवन करितो, तो, वृक्षाग्रावर झोपी गेलेला पुरुष ज्याप्रमाणें खालीं पडल्यावर जागा होतो, त्याप्रमाणें ऐश्वर्यापासून भ्रष्ट झाल्यानंतर शुद्धीवर येतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीरामायणसुभाषितानि

## विषयसूची

विषयः क्रमाङ्कः


अधर्मः ४७ । १९१ । ३०८ । ३२५ । ३८९

अनार्यः ३७०

अनिर्वेदः १८—२० ( उत्साहः )

अनृतम् ७४ । ४०२

अन्नम् ४७२

अपवादः २६ । ४३३

अमित्रः ३०४ । ३२४ ( अरिः रिपुः )

अराजकम् २६५—२६९ । ३७३

अरिः ३३ । ७६ ( अमित्रः रिपुः )

अर्थः ३४ । ३८—४१ । ९६ । ९७ । १८५ । १८६ । १८८ । २१९ । ३५६ । ३९५—३९७ । ४४१ । ४९२ । ५०२

आकारः ५५

आत्मजः १३२ ( पुत्रः सुतः )

आत्मा ६० । ६१ । २११ । ४९३

आयुः ५४ । ५९ । २९८


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




इन्द्रियम् ३४५

उत्साहः ७२ । ७३ । २७५ ( अनिर्वेदः )

ऐश्वर्यम् ९० । ९१ । २०९ ( भूतिः )

कर्म ४०१

कलत्रम् ३४० ( दाराः नारी योषित् स्त्री )

कामः ३४ । ९६ । १६० । १८५ । २१९ । ३५२ । ३९५ । ४१५ । ४२९ । ५०२

कालः ११३ । १८५ । २०० । २०१ । २१४ । २१७ । २१९ । ३६५ । ३७९ । ४०५ । ४१४ । ४२२ । ४५१ । ४६७ । ४८९

कीर्तिः ११५ । २४३ । ३६३

कृतघ्नः ११९ । १४१ । १६५ । १७५ । ३०७

कोपः १२३ । १६० । १८४ । २३९ ( क्रोधः )

क्रोधः १२४ । १२५ । १५८ । ३९८ । ४२८ ( कोपः )

क्षत्रियः १२६—१२९ । ३१२ । ३३२

क्षमा १३० । १६५ । ३१८ । ३९८

गार्हस्थ्यम् १४४

गुरुः ४९ । १३९ । १६७ । २८५ । ४११

चन्द्रः ४४७ । ५०१

चारित्रम् ११६ । ४७०

जयः १६ । २४३ । २७९ । ३४६


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



जीवितम् ८४ । १०६ । १७३ । २२१ । ४३६ ।
४५५ । ४८० । ४८८

ज्ञातिः १२१ । १३२ । १४८ । २६१ । २७१ । ३१६ । ४३४

तपः १५९ । २८६ । ४३४

तेजः ४०३ । ४०४ । ४७५

दक्षः ४८३

दण्डः २७ । ३१ । ५७ । १६५

दाक्ष्यम् १८

दाराः ६१ । २१२ । ३६७ । ४८० ( कलत्रम् नारी योषित् स्त्री )

दुःखम् १०२ । २७२ । ३१०

दूतः ३५ । ९३ । २१८ । ३३३ । ३४२ । ३९०

दैवम् १८९ । ४३१

धनम् ४८० । ४९९ ( श्रीः )

धर्मः ३४ । ४७ । ५८ । ६२ । ६८ । ७४ । ९६ । १२० ।
१७३ । १८५–१९१ । १९३ । १९४ । २१९ । २४४ ।
२५० । २५१ । २५५ । २७६ । २९२ । ३१३ ।
३५२ । ३६३ । ३६८ । ३९५ । ४१० । ४१३ ।
४१५ । ४६४–४६६ । ४७७ । ४९३ । ५०२

धृतिः ४४१ ( धैर्यम् )

धैर्यम् ४५६ ( धृतिः )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



नरकः ३८८ ( निरयः )

नराधिपः ७ । ३२ । ८६ । ९२ ( नरेन्द्रः पार्थिवः भूपतिः महीपतिः राजा वसुधाधिपः )

नरेन्द्रः ३६८ ( नराधिपः पार्थिवः भूपतिः महीपतिः राजा वसुधाधिपः )

नारी ८७ । १३२ । २२४ । २८५ । २८६ । ३३५–३३७ । ३३९ । ४४२ ( कलत्रम् दाराः योषित् स्त्री )

निरयः ३९१ ( नरकः )

निर्वेदः २९१

नृपः ३१० । ३२५

पण्डितः ९४ । ३९६

पतिः १३२ । १७४ । १८० । २२४ । २६२ । २८३ । २८५ । २८६ । ४९६ ( भर्ता )

परजनः १३७

परदाराः ९ । १०१ । २३० । २८९ । २९० । २९५ । २९६

परपक्षः ३९९

पराजयः १६ ( पराभवः )

पराभवः ९ ( पराजयः )

पातकम् १०९ । २७७ ( पापम् )

पापम् १ । ४२ । ७५ । २०९ । २१० । २२३ । २८९ । ३०० । ४१५ । ४४९ ( पातकम् )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




पार्थिवः १६१ । २७३ ( नराधिपः नरेन्द्रः भूपतिः महीपतिः राजा वसुधाधिपः )

पिता: ४९ । १५२ । २२५ । ३०१–३०३ । ३०५ । ३५४ । ४१४ । ४१६ । ४६८ । ४६९

पुत्रः ४ । ८९ । ९२ । २४० । ३०३ । ३०५ । ४८० । ४९९ ( आत्मजः सुतः )

पुमान् ३९६ ( पुरुषः )

पुरुषः ३९८ । ४०७ ( पुमान् )

पुरुषकारः १८१ ( यत्नः )

पौरुषम् ३११

प्रकृतिः ४३७

प्रजा २७६ । २७७ । ३७२ । ३८५ । ४१२ । ४१३ । ४१७ । ४६१ । ४६३ । ५००

प्रतिज्ञा २५ । २५३ । ३१३ । ४२१ ।

प्राणः ४३ । ४३६ । ४६३

प्रीतिः १७५ । ४७८ । ( सौहृदम् स्नेहः )

फलम् ४०१

बन्धुः ४८२ ( बान्धवः भ्राता )

बलम् १७१

बान्धवः ४ । ३८३ । ३९६ । ४८६ ( बन्धुः भ्राता )

बालः १३८ । ४८६ ( मूर्खः )

बुद्धिमान् ११० । ३९७ । ४९२


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



ब्राह्मणः ३३२ । ४३४

भयम् १६० । ३३४ । ३७१ । ४३४ । ४४१ । ४६४

भर्ता १४९ । १६७ । ३२१ । ३३५–३३९ । ३५४ । ४४२ ।
४९५ ( पतिः )

भारः ४७२

भावः ५५

भूतिः ४९२ ( ऐश्वर्यम् )

भूपतिः १३ ( नराधिपः नरेन्द्रः पार्थिवः महीपतिः राजा वसुधाधिपः)

भृत्यः २५८ । ४०७ । ४५७

भ्राता २४० । ३५४ ( बन्धुः बान्धवः )

मनः ३४५

मन्त्रः १०० । ३४६

मन्त्री २९४ । ४३५

मरणम् ८४ । ३३४ । ३५० । ३७१ । ३८२ । ४८० (मृत्युः)

महीपतिः ४६१ (नराधिपः नरेन्द्रः पार्थिवः भूपतिः राजा वसुधाधिपः)

माता ४ । ४९ । २२५ । ४१६ । ४६८ ।

मित्रम् ७६ । ९५ । १८६ । ३०७ । ३८३ । ३८९ । ३९६
४०५ । ४२६ । ४७८ । ४८० (वयस्यः सखा सुहृद्)

मूर्खः ९४ । ४८३ ( बालः )

मूलम् ३५६



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



मृत्युः ३६६ । ४२२ । ४६४ । ४६७ । ४७९ । ४८४ (मरणम्)
मृदुः ३५७
मेधावी ४८३
यत्नः ४१ ( पुरुषकारः )
यशः २४३ । ३६३
युगम् ४१४
योषित् १९६ ( कलत्रम् दाराः नारी स्त्री )
राजा २ । २७ । २८ । ३४ । ५३ । ६६ । ७८ । १०१ । १११ । १६३ । १७१ । १७३ । १८५ । १८९ । २२८ । २५७ । २७६ । ३०९ । ३५२ । ३७२ । ३८५ । ३८९ । ३९२ । ४१० । ४१२–४१७ । ४२३ (नराधिपः नरेन्द्रः पार्थिवः भूपतिः महीपतिः वसुधाधिपः)
राष्ट्रम् १८९ । ३६८ । ३७३
रिपुः ४४३ । ४५६ ( अमित्रः अरिः )
वक्ता ४९१
वयस्यः ५६ । १८३ । ४२४ ( मित्रम् सखा सुहृद् )
वसुधाधिपः ४५० ( नराधिपः नरेन्द्रः पार्थिवः भूपतिः महीपतिः राजा )
वाक्यम् ४५
विषादः २३३ । ४०४

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



वृद्धः २४४
वैरम् ३५०
व्यसनम् ९१ । २७५ । ४४१
शुचिः १
शुभम् ३७८ । ४१५ । ४४९ । ४९३
शूरः १४ । १३४ । ३११ । ४५१ । ४७७ । ४८३ ।
शोकः ४४ । ४६ । १०७ । २३६ । २७५ । ३०६ । ३२८ ।
४०३ । ४४३ । ४५३—४५६
श्रीः १९ । ४८३ ( धनम् )
श्रेयः १५९
श्रोता ४९१
सखा १६९ ( मित्रम् वयस्यः सुहृद् )
सत्त्ववान् १२३
सत्यम् ६८ । ७४ । १९० । २४४ । २५३ । २८८ ।
३६८ । ४४८ । ४६० । ४६४—४६६ । ४७६
सन् २३२ । ४७० । ४९३ ( साधुः )
सभा २४४ । ४०२
साधुः ३२७ । ४७७ ( सन् )
साम २४२ । २४३
सुखम् १९ । ५८ । १५९ । १७२ । १८७ । १८८ ।
२७२ । ३५२ । ३८४ । ४०३ । ४९९

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



सुतः ३५४ ( आत्मजः पुत्रः )

सुहृद् २४० । २९६ । २९८ । ४८२ । ४९२ ( मित्रम् वयस्यः सखा )

सौहृदम् १७५ । ३७० । ४७१ ( प्रीतिः स्नेहः )

स्त्री ७१ । ८८ । १४९ । १७४ । १८० । १९६ । २४९ । २८३ । ४३४ । ४९५ । ४९६ ( कलत्रम् दाराः नारी योषित् )

स्नेहः ८ । १८३ । ४२९ । ४९८ ( प्रीतिः सौहृदम् )

स्वजनः १३७ । २८१ । ४५७

स्वपक्षः ३९९

स्वभावः १८२

स्वर्गः ३९१ । ४९९

हितम् २९८

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मुद्रक—रा. रा. **रघुनाथ रामचंद्र बखले**, मुंबईवैभव प्रेस,
सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, गिरगांव, मुंबई.

प्रकाशक—**केशव भिकाजी ढवळे**, ( रामचंद्र बिल्डिंग )
गिरगांव, मुंबई.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीयोगवासिष्ठसुभाषितानि

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

## सार्थश्रीमहाभारतसुभाषितानि

संपादक–विष्णु विनायक परांजपे, पेण

भाषांतरकार–चिंतामण मोरेश्वर परांजपे, बी. ए., एल्एल्. बी.

( १०३२ सुभाषितें, किंमत १२ आणे )

---

## सार्थश्रीरामायणसुभाषितानि

भाषांतरकार–भालचंद्र शंकरशास्त्री देवस्थळी

( ५०२ सुभाषितें, किंमत ८ आणे )

---

## सार्थश्रीयोगवासिष्ठसुभाषितानि

भाषांतरकार–विष्णु विनायक परांजपे

( ५०८ सुभाषितें, किंमत ८ आणे )

---

## सार्थश्रीभागवतसुभाषितानि

भाषांतरकार–विष्णु विनायक परांजपे

( ११७ सुभाषितें, किंमत ३ आणे )

---

## सार्थश्रीरामरक्षा

( किंमत १ आणा )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीयोगवासिष्ठसुभाषितानि

संपादक व भाषांतरकार

**विष्णु विनायक परांजपे, पेण**

प्रकाशक

**केशव भिकाजी ढवळे, गिरगांव-मुंबई**

आवृत्ति दुसरी

आषाढ शके १८५२ सन १९३०

किंमत ८ आणे

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मुद्रकः—रा. रा. **रघुनाथ रामचंद्र बखले**, मुंबईवैभव प्रेस,
सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, गिरगांव, मुंबई.

प्रकाशक—**केशव भिकाजी ढवळे**, ( रामचंद्र बिल्डिंग )
गिरगांव, मुंबई.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# प्रस्तावना

श्रीयोगवासिष्ठ हा वेदान्ताचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. वसिष्ठ महर्षींनीं रामाला केलेला उपदेश आद्य कवि वाल्मीकि यांनीं आपल्या प्रासादिक वाणीनें यामध्यें वर्णिला आहे. या ग्रंथाचीं मुख्य प्रकरणें ६ असून श्लोकसंख्या ३२ हजार आहे. यांतील निवडक ५०८ संस्कृत सुभाषितवचनें प्रस्तुत पुस्तकांत घेतलीं आहेत आणि वचनांच्याखालीं मराठी भाषान्तर दिलें आहे. वचनें वर्णक्रमानें दिलीं असून शेवटीं मुख्य विषयांची सूची जोडिली आहे. वचनांच्या डावीकडे क्रमांक घातले आहेत आणि उजवीकडे स्थलनिर्देश केला आहे. स्थलनिर्देशांतील डावीकडून पहिला अंक प्रकरणाचा, दुसरा सर्गाचा व तिसरा श्लोकाचा समजावा. ६ व्या निर्वाण प्रकरणाच्या उत्तरार्धाबद्दल ७ हा अंक घातला आहे. सूचीमध्यें विषयापुढील अंक हे वचनांचे क्रमांक आहेत.

हें सुभाषितवचनांचें पुस्तक सर्वांच्या वाचनांत येवो, अशी श्रीरामप्रभूची प्रार्थना करून प्रस्तावना संपवितों.

श्रीरामनवमी, शके १८५१ } विष्णु विनायक परांजपे
राहणार पेण, जिल्हा कुलाबा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# निवेदन

श्रीमहाभारत, श्रीरामायण, श्रीयोगवासिष्ठ व श्रीभागवत या राष्ट्रीय व धार्मिक ग्रंथांतील निवडक सुभाषितांचीं मराठी भाषांतरासह चार पुस्तकें प्रकाशित केलीं. हीं पुस्तकें सर्व लोकांना मान्य झाल्यामुळें पहिली आवृत्ति एका वर्षांतच खपून गेली. आतां ही दुसरी आवृत्ति काढिली आहे.

वचन कोणीं कोणाला सांगितलें, हें समजण्याची विशेष अवश्यकता ज्या श्लोकांत दिसून येते, अशा श्लोकांचा अर्थ देतांना आरंभीं कंसांत अवतरण दिलें आहे. अशा अवतरणांची संख्या या आवृत्तींत वाढविली आहे.

धार्मिक शिक्षण देण्याच्या कामीं हीं चारहि सुभाषितांचीं पुस्तकें बरींच उपयोगीं पडतात, असें पुष्कळ पालकांच्या व शिक्षकांच्या प्रत्ययास आलें आहे. तरी सर्व जनतेला या पुस्तकांचा उपयोग होवो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

आषाढ, शके १८५२ प्रकाशक

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# श्रीयोगवासिष्ठांतील प्रकरणांचीं नांवें


१ वैराग्य

२ मुमुक्षुव्यवहार

३ उत्पत्ति

४ स्थिति

५ उपशम

६ निर्वाण पूर्वार्ध

७ निर्वाण उत्तरार्ध


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीयोगवासिष्ठसुभाषितानि

१ अकृत्रिमं सुखं कीर्तिमायुश्चैवाभिवाञ्छता । प्र०स०श्लो०
सर्वाभिमतदानेन पूजनीया गुणान्विताः ॥ ३।७७।२६

स्वाभाविक सुख, कीर्ति आणि आयुष्य ह्यांची इच्छा करणाऱ्या मनुष्यानें सर्वांना इष्ट अशा दानाच्या योगानें गुणिजनांचा सत्कार करणें योग्य आहे.

२ अकृत्रिमफलं त्यक्त्वा यः कृत्रिमफलं व्रजेत् ।
त्यक्त्वा स मन्दारवनं कारञ्जं याति काननम् ॥६।२९।१२६

स्वाभाविक फळ सोडून कृत्रिम फळाच्या मागें लागणारा, स्वर्गांतील मंदारवन सोडून कडू करंजाच्या वनांत जाणारा समजावा.

३ अजितात्मा जनो मूढो रूढो भोगैककर्दमे ।
आपदां पात्रतामेति पयसामिव सागरः ॥ ७।३३।२२

ज्याप्रमाणें पाणी शेवटीं समुद्राला जाऊन मिळतें, त्याप्रमाणें आत्मसंयमन न करणाऱ्या व भोगरूपी चिखलांत रुतून गेलेल्या मूढ मनुष्याला सर्व आपत्ति प्राप्त होतात.

४ अज्ञतातज्ज्ञते पूर्वं वक्तुर्निर्णीय कार्यतः ।
यः करोति नरः प्रश्नं प्रच्छकः स महामतिः ॥ २।११।४७

व्यवहारावरून वक्ता तज्ज्ञ आहे किंवा नाहीं, याचा प्रश्न करण्यापूर्वीं विचार करून नंतर जो मनुष्य प्रश्न करितो तो खरोखरीच बुद्धिमान् होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



५ अज्ञस्यार्धप्रबुद्धस्य सर्वं ब्रह्मेति यो वदेत् ।
महानरकजालेषु स तेन विनियोजितः ॥ ४।३९।२४

अगदीं अज्ञ असलेल्या व अर्धवट ज्ञान झालेल्या शिष्याला 'हें सर्व ब्रह्म आहे' असा बोध जो गुरु करितो तो त्या शिष्याला महानरकांतच लोटतो.

६ अज्ञानमपि नास्त्येव प्रेक्षितं यन्न लभ्यते ।
विचारिणा दीपवता स्वरूपं तमसो यथा ॥ ७।५७।५

ज्याप्रमाणें दिवा घेऊन अंधकाराचा शोध करणाऱ्याला अंधकार कधींहि दिसावयाचा नाहीं, त्याप्रमाणें विचारपूर्वक पाहणारास अज्ञान देखील नाहीं, असें दिसून येईल.

७ अज्ञोऽपि तज्ज्ञतामेति
शनैः शैलोऽपि चूर्ण्यते ।
बाणोऽप्येति महालक्ष्यं
पश्याभ्यासविजृम्भितम् ॥७।६७।२६

( विद्याधरी वसिष्ठांना म्हणते ) अभ्यासाचा म्हणजे पुनः पुनः एखादी गोष्ट केल्याचा परिणाम पहा. या अभ्यासानें अज्ञ देखील तज्ज्ञ होतो, हळूहळू पर्वताचेंहि चूर्ण अभ्यासामुळें होतें, आणि अचेतन असलेला बाण देखील धनुर्धराच्या अभ्यासामुळेंच सूक्ष्म लक्ष्याचा वेध करू शकतो.

८ अत उक्तं मया राम यदि शुद्धे हि चेतसि ।
उपदेशः प्रसरति तैलबिन्दुरिवाम्भसि ॥ ७।१६।४

श्रीवसिष्ठ म्हणतात-पाण्यामध्यें पडलेला तेलाचा थेंब जसा सहज पसरतो, तसा शुद्ध अन्तःकरणाच्या शिष्याला केलेला उपदेश तत्काळ ठसतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९ अतज्ज्ञायैव विषया स्वदन्ते न तु तद्विदः ।
न हि पीतामृतायान्तः स्वदते कटु काञ्जिकम् ।।७।४५।४०

तत्त्व न जाणणाऱ्या पुरुषालाच विषय आवडतात, तत्त्ववेत्त्याला कधींहि आवडत नाहींत. कारण अमृत पिऊन तृप्त झालेल्याला कडू कांजी पिण्याची इच्छाच होणार नाहीं.

१० अत्राहारार्थं कर्म कुर्यादनिन्द्यं
कुर्यादाहारं प्राणसंधारणार्थम् ।
प्राणाः संधार्यास्तत्त्वजिज्ञासनार्थं
तत्त्वं जिज्ञास्यं येन भूयो न दुःखम् ।। ७।२१।१०

मुमुक्षु पुरुषानें या लोकीं आहारासाठीं निंद्य कर्म करू नये. आहार प्राणधारण होण्यासाठीं करावा. तत्त्वजिज्ञासेकरितांच प्राणांच धारण करावें व ज्याच्या ज्ञानानें पुनः दुःख उत्पन्न होण्याचा प्रसंग येणार नाहीं, तेंच तत्त्व जाणण्याची इच्छा करावी.

११ अथापदं प्राप्य सुसंपदं वा
महामतिः स्वप्रकृतं स्वभावम् ।
जहाति नो मन्दरवेल्लितोऽपि
शौक्ल्यं यथा क्षीरमयाम्बुराशिः ।। ५।९३।९८

ज्याप्रमाणें मंदरपर्वताच्या योगानें घुसळला जाणारा क्षीरसागर आपलें शुक्लत्व सोडीत नाहीं, त्याप्रमाणें महामति पुरुष आपत्कालीं किंवा संपत्कालीं आपला मूळ स्वभाव सोडीत नाहीं.

१२ अदर्शितमुखा एव दुर्जना मर्मवेधिनः ।। ३।७०।६०

दुर्जन मनुष्य नेहमीं आपलें तोंड लपवून दुसऱ्याचा मर्मभेद करीत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१३ अद्यैव कुरु यच्छ्रेयो वृद्धः सन्किं करिष्यसि ।
स्वगात्राण्यपि भाराय भवन्ति हि विपर्यये ॥ ७।१६२।२०

आजच आपलें कल्याण करून घे. तूं वृद्ध झाल्यावर काय करूं शकणार ? कारण वृद्धापकालीं आपलीं गात्रेंच आपणांला भारभूत होत असतात.

१४ अद्यैव न चिकित्सां यः करोति मरणापदः ।
संप्राप्तायां मृतौ मूढः करिष्यति किमातुरः ॥ ७।१०३।३८

मरणरूपी आपत्तीची चिकित्सा जो मूढ मनुष्य आजच्या आज करीत नाहीं, तो, मरणकाल प्राप्त झाला असतां, पीडित झाल्यावर काय करूं शकेल ?

१५ अनन्तं समतानन्दं परमार्थं विदुर्बुधाः ।
स येभ्यः प्राप्यते नित्यं ते सेव्याःशास्त्रसाधवः ॥ २।६।३४

समत्वापासून होणाऱ्या शाश्वत आनंदाला ज्ञाते लोक परमार्थ म्हणतात. या परमार्थाची प्राप्ति शास्त्र व सत्पुरुष यांच्या योगानें होते, म्हणून निरंतर त्यांची सेवा केली पाहिजे.

१६ अनन्तमपतृष्णस्य स्वयमेव प्रवर्तते ।
ध्यानं गलितपक्षस्य संस्थानमिव भूभृतः ॥ ७।४५।४४

पंख तुटून गेल्यामुळें पर्वत जसा एकाच जागीं स्थिर राहतो, तसा निरिच्छ पुरुष सहजच ध्यानस्थ होतो.

१७ अनन्ताः पितरो यान्ति यान्त्यनन्ताश्च मातरः ।
इह संसारिणां पुंसां वनपादपपर्णवत् ॥ ५।२०।३३

ज्याप्रमाणें वनामधील वृक्षावर असंख्य पानें येतात आणि गळून जातात, त्याप्रमाणें या संसारांत आपले अनंत आईबाप होतात आणि जातात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१८ अनन्तानीह दुःखानि सुखं तृणलवोपमम् ।
नातः सुखेषु बध्नीयादृष्टिं दुःखानुबन्धिषु ॥ २।१३।२३

या जगांत सुख पहावें तर अत्यंत अल्प आहे, व दुःख पहावें तर अनंत आहे; यासाठीं परिणामीं दुःख देणाऱ्या विषयसुखाची आस्था बाळगूं नये.

१९ अनहंवेदनं सिद्धिरहंवेदनमापदः ॥ ६।९९।१३

'अहम्' असें न जाणणें हीच सिद्धि व 'अहम्' असें जाणणें ह्याच सर्व आपत्ति.

२० अनागतानां भोगानामवाञ्छनमकृत्रिमम् ।
आगतानां च संभोग इति पण्डितलक्षणम् ॥ ४।४६।८

अप्राप्त विषयांची इच्छा स्वाभाविक नसणें आणि प्राप्त विषयांचा उपभोग घेणें हें पंडिताचें लक्षण आहे.

२१ अनायासकदर्थिन्या गृहीते जरसा जने ।
पलाय्य गच्छति प्रज्ञा सपत्न्येवाहताङ्गना ॥ १।२२।५

आयास न पडतां दीन करून सोडणाऱ्या जरेचा पगडा मनुष्यावर बसला म्हणजे त्याची बुद्धि सवतीमत्सरानें रागावलेल्या स्त्रीप्रमाणें त्याला सोडून निघून जाते.

२२ अनार्तेन हि संमानो बहुमानो न बुध्यते ।
पूर्णानां सरितां प्रावृट्पूरः स्वल्पो न राजते ॥ ४।२३।५४

पाण्यानें नेहमीं भरलेल्या नद्यांना पावसाच्या लहान लहान सरींनीं येणाऱ्या पुराचें महत्त्व नाहीं, त्याप्रमाणें ज्याला दुःख कधीं माहीत नाहीं, अशा मनुष्याचा सन्मान केला तर त्याला त्याची फारशी किंमत वाटत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२३ अनित्यं यौवनं बाल्यं शरीरं द्रव्यसंचयाः ।
भावाद्भावान्तरं यान्ति तरङ्गवदनारतम् ॥ १।२८।१०

बाल्य, तारुण्य, शरीर, द्रव्यसंचय इत्यादि सर्व वस्तू अनित्य असून समुद्रावरील लाटांप्रमाणें त्यांचीं रूपें एकसारखीं पालटत असतात.

२४ अनुद्वेगः श्रियो मूलम् ॥ ३।१११।२२

उद्विग्न न होणें हें संपत्तीचें मूळ होय.

२५ अनुरक्ताङ्गनालोललोचनालोकिताकृति ।
स्वस्थीकर्तुं मनः शक्तो न विवेको महानपि ॥ १।२६।३८

अनुरक्त असलेल्या तरुणीनें चंचल नेत्रकटाक्ष फेकले असतां मोठा विवेकी मनुष्य असला तरी, तो आपलें मन आवरण्याला समर्थ होत नाहीं.

२६ अनेकजन्मनामन्ते विवेकी जायते पुमान् ॥ ६।१२६।४

अनेक जन्मांचा अनुभव घेऊन पुरुष विवेकी होतो.

२७ अन्तकः पर्यवस्थाता जीविते महतामपि ।
चलन्त्यायूंषि शाखाग्रलम्बाम्बूनीव देहिनाम् ॥७।९३।८५

मोठमोठ्यांच्या जीवितालाही ग्रासण्यासाठीं यम त्यांच्याभोंवतीं घिरट्या घालीत असतो. प्राण्यांचें आयुष्य शाखाग्रावर लोंबणाऱ्या जलबिंदूइतकेंच स्थिर आहे !

२८ अन्तर्नैराश्यमादाय बहिराशोन्मुखेहितः ।
बहिस्तप्तोऽन्तरा शीतो लोके विहर राघव ॥ ५।१८।२१

( श्रीवसिष्ठ म्हणतात ) हे राघवा, आंतून निराश राहा, पण बाहेरून आशावान् असल्यासारखा उद्योग कर. तसेंच धनादिकांचा नाश झाला असतां आंतून शांत रहा, पण बाह्यतः संतप्त असल्याप्रमाणें वर्तन ठेव.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२९ अन्तःशीतलता या स्यात्तदनन्ततपःफलम् ॥ ५।५६।९**

अन्तःकरण शांत असणें, हें अनंत तपाचें फल होय.

**३० अन्तस्तृष्णोपतप्तानां दावदाहमयं जगत् ।**
**भवत्यखिलजन्तूनां यदन्तस्तद्बहिःस्थितम् ॥ ५।५६।३४**

तृष्णेमुळें अन्तःकरण संतप्त झालेल्या लोकांना हें जग वणवा लागल्यासारखें दिसतें. कारण, जें मनुष्याच्या मनांत असतें, तेंच त्याच्या दृष्टीला बाह्य जगांत दिसतें.

**३१ अन्तःसंसक्तिरेवैकं कारणं बन्धमोक्षयोः ॥ ५।६७।३४**

अन्तःकरणाची आसक्ति असणें व नसणें हेंच बंध आणि मोक्ष यांचें मुख्य कारण होय.

**३२ अन्तःसंत्यक्तसर्वाशो वीतरागो विवासनः ।**
**बहिःसर्वसमाचारो लोके विहर राघव ॥ ५।१८।१८**

( श्रीवसिष्ठ म्हणतात ) हे राघवा, अन्तःकरणांतील सर्व आशा, विषयप्रेम व वासना यांना पार झुगारून दे, आणि बाह्यतः सर्व लोकव्यवहार करीत जा.

**३३ अन्तःसारतया कार्यं लघवोऽप्याप्नुवन्ति हि ॥ ३।७२।१९**

एखादा क्षुद्र मनुष्यदेखील आपलें कार्य अन्तःकरणाच्या दृढनिश्चयाच्या सामर्थ्यामुळें पार पाडतो.

**३४ अन्नभूता हि महतां लघवो यत्नशालिनाम् ।**
**यथेष्टं विनियोज्यन्ते तेन कर्मसु लोष्टवत् ॥ २।६।१३**

दैववादी दुबळे लोक उद्योगी बलिष्ठ लोकांच्या भक्ष्यस्थानीं पडतात. मातीच्या ढेकळांना तुडवून वाटेल तसा आकार देतां येतो, त्याप्रमाणें प्रयत्न करणारे लोक आपल्या कार्यामध्यें दुबळ्या आळशी लोकांचा वाटेल तसा उपयोग करून घेतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३५ अपरीक्ष्य च यः शिष्यं प्रशास्त्यतिविमूढधीः ।
स एव नरकं याति यावदाभूतसंप्लवम् ॥ ४।३९।२६

शिष्याची परीक्षा न करतां आणि त्याची योग्यता न जाणतां जो गुरु त्याला ज्ञानोपदेश करितो, तो चिरकाल नरकवासाचें दुःख भोगितो.

३६ अपश्यन्काष्ठरन्ध्रस्थवृषणाक्रमणं यथा ।
कीलोत्पाटी कपिर्दुःखमेतीदं हि तथा मनः ॥ ३।९९।४१

लाकडामध्यें ठोकलेली पाचर उपटणाऱ्या एखाद्या अविचारी वानराचा वृषण फटीमध्यें सांपडून तो मूर्ख वानर जसा संकटांत सांपडतो, त्याप्रमाणें नेहमीं कांहींना कांहीं उलाढाली करण्यांत दंग झालेलें चंचल मन दुःख भोगतें.

३७ अपि कष्टतरां प्राप्तैर्दशां विवशतां गतैः ।
मनागपि न संत्याज्या मानवैः साधुसंगतिः ॥ २।१६।८

कसल्याही प्रकारची कष्टदशा प्राप्त होऊन मनुष्य विव्हल झाला, तरी त्यानें सत्संगाचा त्याग क्षणभरहि करूं नये.

३८ अपि जीवितदानेन गुणिनं परिपालयेत् ।
गुणवत्संगमौषध्या मृत्युरप्येति मित्रताम् ॥ ३।७७।२८

गुणिजनांच्या रक्षणासाठीं प्रत्यक्ष जीवितावर पाणी सोडण्याचा प्रसंग आला तरी, त्याला माघार घेतां कामा नये, कारण गुणिजनांच्या समागमरूपी औषधीमुळें प्रत्यक्ष मृत्युसुद्धां मित्र बनत असतो.

३९ अपि पौरुषमादेयं शास्त्रं चेद्युक्तिबोधकम् ।
अन्यत्त्वार्षमपि त्याज्यं भाव्यं न्याय्यैकसेविना ॥२।१८।२

युक्तिबोध करणारें शास्त्र एखाद्या सामान्य पुरुषानें केलेलें असलें तरी तें ग्राह्य आहे. परंतु एखाद्या प्राचीन ऋषीनें केलेलेंहि शास्त्र युक्तिशून्य असलें, तर न्यायी मनुष्यानें त्याचा त्याग करणेंच उचित आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४० अपि मेरुसमं प्राज्ञमपि शूरमपि स्थिरम् ।
तृणीकरोति तृष्णैका निमेषेण नरोत्तमम् ॥ १।१७।५०

एखादा मनुष्य मेरुप्रमाणें अढळ, विद्वान्, शूर आणि स्थिर बुद्धीचा असला तरी त्याला, तृष्णा क्षणामध्यें तृणाप्रमाणें तुच्छ करून सोडते.

४१ अपि शूरा अतिप्राज्ञास्ते न सन्ति जगत्त्रये ।
अविद्यया ये पुरुषा न नाम विवशीकृताः ॥ ४।४१।३७

अविद्येच्या तडाक्यांत सांपडला नाहीं असा शूर किंवा महाबुद्धिमान् पुरुष त्रिभुवनांतहि विरळा.

४२ अपूर्वाह्लाददायिन्य उच्चैस्तरपदाश्रयाः ।
अतिमोहापहारिण्यः सूक्तयो हि महीयसाम् ॥ ५।४।५

थोर पुरुषांच्या सूक्ति अपूर्व आल्हाद देणाऱ्या, अत्युच्चपदाला पोंचविणाऱ्या आणि अनर्थकारक मोह घालविणाऱ्या असतात.

४३ अपेक्षैव घनो बन्ध उपेक्षैव विमुक्तता ॥ ७।२६।३६

विषयांची अपेक्षा हाच दृढबंध होय. आणि उपेक्षा हाच मोक्ष होय.

४४ अप्यब्धिपानान्महतः सुमेरून्मूलनादपि ।
अपि वह्न्यशनात्साधो विषमश्चित्तनिग्रहः ॥ १।१६।२४

समुद्र पिऊन टाकणें, मेरुपर्वत उपटून काढणें, किंवा अग्नि भक्षण करणें याच्यापेक्षांहि चित्ताचा निग्रह करणें हें जास्त कष्टतर आहे.

४५ अप्यापदि दुरन्तायां नैव गन्तव्यमक्रमे ॥ ४।३२।३९

केवढेंहि अनिवार संकट कोसळलें तरी सन्मार्ग सोडून जाऊं नये.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४६ अप्राप्तकारिणं भूपं रोधयन्ति च वै प्रजाः ॥ ६।८४।२७

प्रजा अयोग्य कार्य करणाऱ्या राजाचें निवारण करतात.

४७ अबन्धुर्बन्धुतामेति नैकट्याभ्यासयोगतः ।
यात्यनभ्यासतो दूरात्स्नेहो बन्धुषु तानवम् ॥ ७।६७।२९

नेहमींच्या सहवासामुळें जो आप्त नसतो तोही आप्त होतो, आणि प्रत्यक्ष बंधु असून तो निरंतर दूर राहिल्यास स्नेहसंबंध कमी होऊन परक्याप्रमाणें भासतो.

४८ अभ्यासभास्वति तपत्यवनौ वने च
वीरस्य सिध्यति न यन्न तदास्ति किंचित् ।
अभ्यासतो भुवि भयान्यभयीभवन्ति
सर्वासु पर्वतगुहास्वपि निर्जनासु ॥ ७।६७।४५

जितेंद्रिय वीर पुरुषाचा अभ्याससूर्य प्रकाशमान होत असतांना भूमि, जल, अंतरिक्ष इत्यादिकांतील कोणतीही वस्तू त्याला प्राप्त करून घेतां येते. इतकेंच नव्हे कोणत्याही निर्जन पर्वतगुहेंतील व्याघ्रसर्पादि भयंकर प्राणीहि त्याला भय उत्पन्न करूं शकत नाहींत.

४९ अभ्यासेन कटु द्रव्यं भवत्यभिमतं मुने ।
अन्यस्मै रोचते निम्बस्त्वन्यस्मै मधु रोचते ॥ ७।६७।२८

( विद्याधरी श्रीवसिष्ठांना म्हणते ) हे मुने, अभ्यासानें कडू पदार्थही गोड वाटूं लागतो. एखाद्याला मध आवडतो, तर एखाद्याला अभ्यासामुळें कडू लिंबच आवडतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



५० अम्लं मधुरसासिक्तं मधुरं मधुरञ्जितम् ।
बीजं प्रतिविषाकल्कासिक्तं च कटु जायते ॥ ४।३५।२९

चिंचेच्या झाडाला मध, साखर इत्यादि पदार्थांचें खत घातलें तर त्या चिंचेच्या झाडावर येणाऱ्या चिंचा गोड असतात. परंतु चिंचेला धोतरा, करंज यांच्या रसांचें खत घातल्यास त्याच चिंचा कडू निपजतात, असा आरामशास्त्राचा नियम आहे.

५१ अयं बन्धुरयं नेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु विगतावरणैव धीः ॥ ५।१८।६१

'हा माझा बंधु' आणि 'हा माझा बंधु नव्हे' ही विचारसरणी क्षुद्र पुरुषांच्या ठिकाणीं असते. परंतु श्रेष्ठ आचरणाच्या महात्म्यांच्या बुद्धीवरील संकुचित भावनेचें आवरण नाहींसें होऊन त्यांची बुद्धि सर्वत्र सम झालेली असते.

५२ अयोऽयासि च संतप्ते शुद्धे तप्तं तु लीयते ॥ ४।१७।२९

लोखंडाचे दोन तुकडे एकत्र ठेवल्यानें एकमेकांत मिसळत नाहींत, परंतु कांहीं क्षार टाकून शुद्ध केलेले आणि तापवून द्रवमय झालेले तेच तुकडे एकमेकांत पूर्णपणें मिसळतात.

५३ अर्थिनां यन्निराशत्वं सत्तमेऽभिभवो हि सः ॥ १।७।१०

आपल्याकडे याचना करण्यासाठीं आलेल्या मनुष्याची निराशा होणें हें सत्पुरुष लांछन समजतात.

५४ अर्धं सज्जनसंपर्कादविद्याया विनश्यति ।
चतुर्भागस्तु शास्त्रार्थैश्चतुर्भागं स्वयत्नतः ॥ ७।१२।३७

सज्जनांच्या सहवासानें अर्धी अविद्या नष्ट होते. चतुर्थांश अविद्या शास्त्रविचारानें जाते. राहिलेला चतुर्थभाग आपल्या प्रयत्नानें घालवितां येतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



५५ अलब्धज्ञानदृष्टीनां क्रिया पुत्र परायणम् ।
यस्य नास्त्यम्बरं पट्टं कम्बलं किं त्यजत्यसौ॥६।८७।१७

ज्यांना ज्ञानदृष्टि प्राप्त झाली नाहीं, त्यांना कर्म हेंच परम साधन आहे. ज्याचेपाशीं उंची वस्त्र नाहीं त्यानें आपल्या जवळचा कांबळा टाकून देणें योग्य होईल काय ?

५६ अवश्यभाव्यस्तमयो जातस्याहर्पतेरिव ॥ ४।४८।२७

सूर्याचा उदय झाला म्हणजे त्याचा अस्त व्हावयाचा हा नियम जसा ठरलेला आहे, तसा जो प्राणी जन्मास आला तो केव्हांतरी मरणारच.

५७ अविरुद्धैव सा युक्तिर्ययापदि हि जीव्यते ॥ ३।६८।१२

आपत्तीमध्यें वाटेल ती युक्ति योजून जिवंत राहणें ही गोष्ट शास्त्राला केव्हांही संमतच आहे.

५८ अशिष्यायाविरक्ताय यत्किंचिदुपदिश्यते ।
तत्प्रयात्यपवित्रत्वं गोक्षीरं श्वदृताविव ॥ २।२।२१

जें ज्ञान विषयासक्त अयोग्य शिष्याला दिलें जातें, तें कुत्र्याच्या कातड्याच्या पात्रांत ठेविलेल्या गाईच्या दुधाप्रमाणें अपवित्र होतें.

५९ असतः शशशृङ्गादेः कारणं मार्गयन्ति ये ।
वन्ध्यापुत्रस्य पौत्रस्य स्कन्धमासादयन्ति ते ॥ ७।२२।९

सशाच्या शिंगासारख्या मुळींच नसलेल्या वस्तूंच्या कारणांचा जे शोध करीत बसतात, ते वन्ध्येच्या मुलाच्या नातवाच्या खांद्यावर बसतात असेंच म्हटलें पाहिजे.

६० असतामपि संरूढं सौहार्दं न निवर्तते ॥ ३।८२।४७

दुष्टांच्याही अंतःकरणांत एकदां प्रेम दृढ झालें, म्हणजे तें नाहींसें होणें शक्य नसतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



६१ असत्यभूतं तोयान्तश्चन्द्रव्योमतलादिकम् ।
बाला एवाभिवाञ्छन्ति मनोमोहाय नोत्तमाः॥४।४५।४७

पाण्यामध्यें पडलेलें चंद्राचें किंवा आकाशाचें असत्य प्रतिबिंब धरण्याचा मोह अज्ञ मुलांना पडतो, परंतु ज्ञात्या पुरुषाला असा मोह कधींही उत्पन्न होणार नाहीं.

६२ अस्माच्छास्त्रवराद्बोधा जायन्ते ये विचारितात् ।
लवणैर्व्यञ्जनानीव भान्ति शास्त्रान्तराणि तैः॥७।१६३।५४

मिठाच्या योगानें चटणी, भाजी यांना जशी रुचि येते त्याप्रमाणें या मुख्य शास्त्राच्या (योगवासिष्ठाच्या) विचारानें होणाऱ्या बोधामुळें इतर शास्त्रें सहज समजतात.

६३ अहंकारघने शान्ते तृष्णा नवतडिल्लता ।
शान्तदीपशिखावृत्त्या क्वापि यात्यतिसत्वरम् ॥१।१५।१३

अहंकाररूपी मेघ एकदां नाहींसा झाला, म्हणजे तृष्णारूपी वीज विझलेल्या दिव्याच्या ज्योतीप्रमाणें कोठें नाहींशी होते तेंही समजत नाहीं.

६४ अहंकारानुसंधानवर्जनादेव राघव ।
पौरुषेण प्रयत्नाच्च तीर्यते भवसागरः ॥४।३३।७०

( श्रीवसिष्ठ म्हणतात ) हे राघवा, मोठ्या प्रयत्नानें आणि धैर्यानें अहंकाराला हद्दपार कर म्हणजे, तूं भवसागर तरून जाशील.

६५ अहंकाराम्बुदे क्षीणे दृश्यते चिद्दिवाकरः ॥ ५।६४।४५

अहंकाररूपी मेघ दूर झाला म्हणजे चैतन्यरूपी सूर्याचें दर्शन होतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



६६ अहमित्येव बन्धाय नाहमित्येव मुक्तये ॥ ७।२५।२०

देहादिकालाच 'मी' असें मानणें हा बंध, व देहादिक 'मी' नाहीं असें मानणें हाच मोक्ष.

६७ अहो नु चित्रा मायेयं तता विश्वविमोहिनी ।
असत्यैवापि सद्रूपा मरुभूमिषु वारिवत् ॥ ६।६३।७

खरोखर विश्वाला मोह पाडणारी ही विचित्र माया पसरली आहे! ही असत्य आहे, तथापि निर्जल प्रदेशावर भासणाऱ्या मृगजळाप्रमाणें सत्यच आहे असें वाटतें.

६८ अहो बत दुरुच्छेदाः प्राणिनां स्नेहवागुराः ॥ ३।४३।४८

प्राण्यांना बद्ध करणारे स्नेहपाश तोडून टाकणें खरोखर अतिशय कठीण आहे.

६९ अहो मोहस्य माहात्म्यं
यदयं सर्वदुःखहा ।
चिन्तामणिर्विचाराख्यो
हृत्स्थोऽपि त्यज्यते जनैः ॥ ७।१।१२

केवढें हो हें मोहाचें माहात्म्य, कीं लोक आपल्या हृदयांत असलेल्याही सर्वदुःखनाशक विचार नांवाच्या चिंतामणीला टाकून देतात.

७० आज्ञाचरणमेवाहुर्मुख्यमाराधनं सताम् ॥ ६।२३।४

सज्जनांच्या आज्ञेप्रमाणें वर्तन ठेवणें हेंच त्यांचें मुख्य आराधन आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७१ आत्मज्ञानं विदुर्ज्ञानं ज्ञानान्यन्यानि यानि तु ।
तानि ज्ञानावभासानि सारस्यानवबोधनात् ॥ ७।२१।७

आत्मज्ञान हेंच खरें ज्ञान असून बाकीचीं ज्ञानें म्हणजे ज्ञानाभास आहेत. कारण, त्यांच्या योगानें साररूप तत्त्व कळत नाहीं.

७२ आत्मवत्सर्वभूतानि परद्रव्याणि लोष्टवत् ।
स्वभावादेव न भयाद्यः पश्यति स पश्यति ॥ ५।५६।४९

जो भयामुळें नव्हे, तर स्वभावतःच सर्व भूतांना आपल्याप्रमाणें मानतो आणि परद्रव्याला मातीच्या ढेकळांप्रमाणें समजतो, तोच खरा तत्त्ववेत्ता होय.

७३ आत्मीयेष्वर्थजातेषु मिथ्यात्मसु सुतादिषु ।
बुद्बुदेष्विव तोयानां न स्नेहस्तत्त्वदर्शिनाम् ॥ ७।१०२।१६

स्वकीय धनपुत्रादिकांवर तीं मिथ्या असल्यामुळें पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें तत्त्ववेत्त्यांची आस्था नसते.

७४ आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ७।१६२।१८

प्रत्येक मनुष्य आपणच आपला हितकर्ता होतो व अहित-कर्ताहि होतो.

७५ आत्यन्तिकी विरसता यस्य दृश्येषु दृश्यते ।
स बुद्धो नाप्रबुद्धस्य दृश्यत्यागे हि शक्तता ॥ ७।४५।३६

ज्याच्या ठिकाणीं दृश्य वस्तूंविषयीं पूर्णपणें वैराग्य असेल तोच ज्ञानी, असें जाणावें. कारण अज्ञ पुरुषाला दृश्य वस्तूंचा त्याग करण्याचें सामर्थ्य नसतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७६ आदावन्ते च यन्नास्ति कीदृशी तस्य सत्यता ।
आदावन्ते च यन्नित्यं तत्सत्यं नाम नेतरत् ॥ ५।५।९

जें पूर्वकालीं आणि उत्तरकालीं नाहीं तें मधल्या कालांत तरी सत्य कसें असणार? जें सर्वदा (तिन्हीकालांत) असतें, तें वास्तविक सत्य होय, तद्व्यतिरिक्त सत्य असणें शक्य नाहीं.

७७ आदावेव हि नोत्पन्नं यत्तस्येहास्तिता कुतः ।
कुतो मरौ जलसरिद्द्वितीयेन्दौ कुतो ग्रहः ॥ ३।७।४२

जें आरंभीं उत्पन्नच झालेलें नाहीं त्याला अस्तित्व कोठून असणार? रखरखीत वाळवंटांत भासणारी नदी आणि दृष्टिदोषामुळें आकाशांत भासणारा दुसरा चंद्र यांना अस्तित्व कसें असेल?

७८ आदौ शमदमप्रायैर्गुणैः शिष्यं विशोधयेत् ।
पश्चात्सर्वमिदं ब्रह्म शुद्धस्त्वमिति बोधयेत् ॥ ४।३९।२३

शिष्याची बुद्धि प्रथम शमदमादि गुणांनीं चांगली शुद्ध करावी, नंतर 'हें सर्व जग ब्रह्म आहे' आणि 'तूंहि शुद्ध ब्रह्मच आहेस' असा उपदेश करावा.

७९ आनन्दायैव भूतानि यतन्ते यानि कानिचित्।६।१०८।२०

कोणताहि प्राणी सुखासाठींच यत्न करीत असतो.

८० आपतन्ति प्रतिपदं यथाकालं दहन्ति च ।
दुःखचिन्ता नरं मूढं तृणमग्निशिखा इव ॥ २।११।४०

अग्नीची ज्योत गवताला जाळून टाकते त्याप्रमाणें दुःख आणि चिंता यांचे तडाखे मूढ मनुष्याला पावलोपावलीं सहन करावे लागतात; व त्याच्या आंगाचा नेहमीं दाह करतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८१ आपदः क्षणमायान्ति क्षणमायान्ति संपदः ।
क्षणं जन्म क्षणं मृत्युर्मुने किमिव न क्षणम् ॥ १।२८।३१

(राम श्रीवसिष्ठांना म्हणतो) क्षणांत आपत्ति, क्षणांत संपत्ति; क्षणांत जन्म, क्षणांत मृत्यु अशा तऱ्हेनें हे मुने, जगांतील सर्व गोष्टी क्षणिक आहेत.

८२ आपदो या दुरुत्तारा याश्च तुच्छाः कुयोनयः ।
तास्ता मौर्ख्यात्प्रसूयन्ते खादिरादिव कण्टकाः॥२।१३।१६

खैराच्या झाडापासून कांटे उत्पन्न होतात, त्याप्रमाणें सर्व तऱ्हेच्या अधम योनि आणि दुस्तर आपत्ति मूर्खपणापासून उत्पन्न होतात.

८३ आपातमात्ररम्येभ्यो भोगेभ्यः किमवाप्यते ।
सत्सङ्गचिन्तामणितः सर्वसारमवाप्यते ॥ ६।२०।३९

विचार करी पर्यंतच रम्य वाटणाऱ्या भोगांपासून काय मिळणार? कांहीं नाहीं. पण सत्संगरूप चिंतामणीपासून सर्वांमध्यें श्रेष्ठ असलेलें पद प्राप्त होतें.

८४ आयुः पल्लवकोणाग्रलम्बाम्बुकणभङ्गुरम् ।
उन्मत्तमिव संत्यज्य यात्यकाण्डे शरीरकम् ॥ १।१४।१

झाडावरील पानाच्या टोंकावर लोंबणाऱ्या पाण्याच्या थेंबाप्रमाणें जीवित क्षणभंगुर आहे. उन्मत्त मनुष्याप्रमाणें जीवित शरीराचा त्याग करून केव्हांच निघून जात.

८५ आयुषः क्षण एकोऽपि सर्वरत्नैर्न लभ्यते ।
नीयते तद्वृथा येन प्रमादः सुमहानहो ॥ ७।१७५।७८

आयुष्याचा एक क्षण सुद्धां रत्नांच्या राशी दिल्यानेंही मिळणार नाहीं, हें जर निश्चित आहे, तर आयुष्य व्यर्थ घालविणें हा मोठा बेसावधपणा नव्हे काय?



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८६ आयुषः खण्डखण्डाश्च निपतन्तः पुनः पुनः ।
न कश्चिद्वेत्ति कालेन क्षतानि दिवसान्यहो ॥ ७।९३।५१

हरहर ! काळ हा प्राण्यांच्या आयुष्याचे तुकडे तुकडे करून टाकीत असतो. पण प्रत्येक दिवशीं अशा प्रकारें क्षय पावणारें आयुष्य संपत आहे हें कोणाच्या लक्षांत येत नाहीं.

८७ आलस्यं यदि न भवेज्जगत्यनर्थः
को न स्याद्बहुधनको बहुश्रुतो वा ।
आलस्यादियमवनिः ससागरान्ता
संपूर्णा नरपशुभिश्च निर्धनैश्च ॥ २।५।३०

या जगामध्यें अनर्थकारक आळस नसता, तर प्रत्येक मनुष्य संपत्तिमान् आणि विद्वान् झाला असता. परंतु आळसामुळें ही समुद्रवलयांकित संपूर्ण पृथ्वी नरपशूंनीं आणि निर्धन लोकांनीं भरून गेली आहे.

८८ आशा हि लोहरज्जुभ्यो विषमा विपुला दृढा ।
कालेन क्षीयते लोहं तृष्णा तु परिवर्धते ॥ ६।९१।६

आशा ही लोखंडी साखळदंडाहून अतिशय कठीण व मोठी मजबूत आहे. लोखंड कांहीं कालानें घासून घासून झिजून जातें, परंतु आशा मात्र उत्तरोत्तर वाढतच जाते.

८९ आस्थामात्रमनन्तानां दुःखानामाकरं विदुः ।
अनास्थामात्रमभितः सुखानामाकरं विदुः ॥ ४।२७।२५

आसक्ति असणें ही केवळ अनंत दुःखांची खाण आहे. आणि आसक्ति नसणें ही स्थिति सर्व सुखांची खाण आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९० इच्छोदयो यथा दुःखमिच्छाशान्तिर्यथा सुखम् ।
तथा न नरके नापि ब्रह्मलोकेऽनुभूयते ॥ ७।३६।२४

इच्छा उत्पन्न झाल्यानें दुःख होतें तसें दुःख नरकांतही होत नाहीं; आणि इच्छा नाहींशी झाली असतां जें सुख मिळतें तसें श्रेष्ठसुख ब्रह्मलोकामध्येंही अनुभवाला येत नाहीं.

९१ इच्छोपशमनं कर्तुं यदि कृत्स्नं न शक्यते ।
स्वल्पमप्यनुगन्तव्यं मार्गस्थो नावसीदति ॥ ७।३६।३०

सर्व इच्छा एकदम नाहींशा करणें अशक्य झाल्यास क्रमाक्रमानें थोडथोड्या इच्छा सोडीत जाव्या. कारण, सन्मार्गानें जाणारा पुरुष कधींही क्लेश भोगीत नाहीं.

९२ इतो नाभिमताः सर्वे ज्ञस्य भोगाः स्वभावतः ।
भवन्ति कोऽतितृप्तो हि दुरन्नं किल वाञ्छति ॥ ६।५९।३०

ज्ञानी पुरुषाला स्वभावतःच कोणताही भोग स्वीकारणें मान्य नसतें. कारण जो मिष्टान्नानें अतिशय तृप्त झाला तो कदन्नाची इच्छा कशी धरील ?

९३ इत्युक्तवत्यथ मुनौ दिवसो जगाम
सायंतनाय विधयेऽस्तमिनो जगाम ।
स्नातुं सभा कृतनमस्करणा जगाम
श्यामाक्षये रविकरेण सहाजगाम ॥ २।५।३२

(श्रीवाल्मीकि भरद्वाजाला म्हणाले)—वसिष्ठ मुनींनीं अशा तऱ्हेचें भाषण केल्यानंतर संध्याकाळ झाली, व सूर्य अस्तास गेला. तेव्हां सभेंतील मुनि वसिष्ठमुनींना नमस्कार करून सायंकाळचीं स्नानसंध्यादि विहित कर्मे करण्यासाठीं निघून गेले, आणि रात्र सरल्यानंतर पुन्हां दुसऱ्या दिवशीं सूर्याच्या किरणांबरोबर वसिष्ठमुनींकडे आले.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**९४ इंद्रियोत्तमरोगाणां भोगाशावर्जनादृते ।**
**नौषधानि न तीर्थानि न च मन्त्राश्च शान्तये ।।७।६।४५**

इंद्रियरूपी रोगावर भोगांची आशा सोडणें यावांचून दुसरें कोणतेंही औषध नाहीं. तीर्थें, मंत्र इत्यादिकांच्या योगानें हा रोग नाहींसा होत नाहीं.

**९५ इष्टवस्त्वर्थिनां तज्ज्ञसूपदिष्टेन कर्मणा ।**
**पौनःपुन्येन करणान्नेतरच्छरणं मुने ।। ७।६७।२३**

( विद्याधरी श्रीवसिष्ठांना म्हणते ) हे मुने, लौकिक शिल्प अथवा वैदिक विद्या इत्यादि फलांची इच्छा करणाऱ्या विद्यार्थ्यांस त्या त्या विद्यांच्या गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें पुनः पुनः त्याचा अभ्यास करणें हेंच श्रेयस्कर आहे.

**९६ इहैव नरकव्याधेश्चिकित्सां न करोति यः ।**
**गत्वा निरौषधं स्थानं सरुजः किं करिष्यति ।।७।१०३।५१**

येथें असतांनाच पुढच्या नरकव्याधीची चिकित्सा केली पाहिजे. औषध मिळणार नाहीं अशा ठिकाणीं गेल्यावर रोगग्रस्त मनुष्य काय करणार ?

**९७ ईप्सितावेदनाख्यात्तु मनःप्रशमनादृते ।**
**गुरूपदेशशास्त्रार्थमन्त्राद्या युक्तयस्तृणम् ।। ३।१११।१४**

इष्टवस्तूविषयीं वैराग्य उत्पन्न होऊन मन शांत झाल्याशिवाय गुरूपदेश, शास्त्रार्थ, मंत्र इत्यादि युक्त्या व्यर्थ होत.

**९८ ईश्वरप्रेरितो गच्छेत्स्वर्गं नरकमेव वा ।**
**स सदैव पराधीनः पशुरेव न संशयः ।। २।६।२७**

केवळ ईश्वरानें प्रेरणा केल्यामुळें मनुष्य स्वर्गाला किंवा नरकाला जातो, असें ज्याला वाटतें, असा मनुष्य नेहमीं पराधीनच राहणार; व असला मनुष्य निःसंशय पशु होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९९ ईश्वरो न महाबुद्धे दूरे न च सुदुर्लभः ।
महाबोधमयैकात्मा स्वात्मैव परमेश्वरः ॥७।४८।२२

( श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात ) ईश्वर दूर नाहीं, तो अतिशय दुर्लभही नाहीं. परमेश्वर ज्ञानस्वरूप, एकरूप असून स्वतःचा आत्माच आहे.

१०० उत्कन्धरो विततनिर्मलचारुपक्षो
हंसोऽयमत्र नभसीति जनैः प्रतीतः ।
गृह्णाति पल्वलजलाच्छफरीं यदासौ
ज्ञातस्तदा खलु बकोऽयमितीह लोकैः ॥७।११८।५

आकाशांतून जात असतांना वर उंच केलेली मान व पसरलेले शुभ्र सुंदर पंख यांवरून ' हा हंसच असावा, ' असें प्रथम लोकांना वाटलें; परंतु पुढें जेव्हां डबक्यांतील पाण्यांतून मासे गट्ट करीत आहे असें दृष्टीस पडल, तेव्हां ' हा बगळा आहे ' अशी लोकांची खातरी झाली. ( बाह्य आकारावरून जरी एखाद्याची बरोबर ओळख न पटली, तरी त्याचें आचरण पाहिल्यावर ती सहज पटते. )

१०१ उत्थितानुत्थितानेतानिन्द्रियाहीन्पुनःपुनः ।
हन्याद्विवेकदण्डेन वज्रेणेव हरिर्गिरीन् ॥ ५।८।१७

इंद्र आपल्या वज्रानें पर्वतांचें चूर्ण करून टाकितो, त्याप्रमाणें इंद्रियरूपी सर्पांनीं आपलीं डोकीं वर केलेलीं असोत किंवा नसोत, तीं विवेकरूपी दंडानें पुनः पुन्हां फोडून टाकावीं.

१०२ उत्सवादपि नीचानां कलहोऽपि सुखायते ॥३।७०।७६

नीचवृत्तीच्या लोकांना आनंदोत्सवापेक्षांहि कलहच अधिक प्रिय असतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१०३ उदारगुणयुक्ता ये विहरन्तीह देहिनः ।
धरातलेन्दवः सङ्गाद्भृशं शीतलयन्ति ते ॥३।७७।३०

जे उदार व गुणवान् पुरुष या जगांत विहार करतात, ते आपल्या सहवासानें सर्व लोकांना शीतलता आणि आल्हाद देणारे पृथ्वीवरील दुसरे चंद्रच होत.

१०४ उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्रपालनम् ।
ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञैव राघव ॥ ६।८३।१३

(श्रीवसिष्ठ म्हणतात ) हे राघवा, उपदेश करणें हें केवळ शास्त्रीय व्यवस्थेचें परिपालन करणें आहे. पण ज्ञानाचें कारण केवळ शिष्याची शुद्ध बुद्धिच आहे.

१०५ उभाभ्यामेव पक्षाभ्यां यथा खे पक्षिणां गतिः ।
तथैव ज्ञानकर्मभ्यां जायते परमं पदम् ॥ १।१।७

पक्ष्यांना आकाशांत संचार करण्याला ज्याप्रमाणें दोन पंखांची गरज असते, त्याप्रमाणें कर्म आणि ज्ञान या दोन साधनांच्या योगानें मोक्षरूपी परमपदाची प्राप्ति होते.

१०६ उह्यन्ते वारणा यत्र तत्रोर्णायुषु का कथा ॥७।६८।३७

हत्तीसारखे मोठेमोठे प्राणीही ज्या प्रवाहांतून वाहत जातात, तेथें क्षुद्र मेंढ्यांची काय कथा !

१०७ ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति तत् ।
असंकल्पः परं श्रेयः स किमन्तर्न भाव्यते ॥६।१२६।९४

(श्रीवसिष्ठ म्हणतात ) मी हात वर करून मोठ्यानें ओरडत आहें पण माझ्या आक्रोशाकडे कोणी लक्ष देत नाहीं. विषयसंकल्पाचा त्याग केल्यानें मोक्षप्राप्ति होईल, ही गोष्ट लोक अंतःकरणांत कां ठसवून घेत नाहींत ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१०८ एतया तदलं मेऽस्तु तुच्छया पूर्वचिन्तया ।
पौरुषं याति साफल्यं वर्तमानचिकित्सया ॥५।२५।१६

( बलि म्हणतो ) गत गोष्टीबद्दल शोक करण्यांत काय अर्थ आहे ? वर्तमानकाळीं कोणती गोष्ट कर्तव्य आहे, याचा विचार केल्यानें पुरुषप्रयत्न सफल होतो.

१०९ एतावति धरणितले
सुभगास्ते साधुचेतनाः पुरुषाः ।
पुरुषकलासु च गण्या
न जिता ये चेतसा स्वेन ॥ ४।२३।६०

या पृथ्वीवर तेच भाग्यवान्, साधु, खरे पुरुष, आणि कलावान् होत कीं, ज्यांना त्यांच्या चित्तानें जिंकून त्यांच्यावर आपला पगडा बसविला नाहीं.

११० एतावतैव देवेशः परमात्मावगम्यते ।
काष्ठलोष्टसमत्वेन देहो यदवलोक्यते ॥५।६४।४४

देह हा काष्ठ व ढेकूळ यांच्या सारखा जड आहे ही गोष्ट मनांत निरंतर वागवीत जाणें हाच देवश्रेष्ठ परमात्म्याच्या ज्ञानाचा उपाय आहे.

१११ एतावदेव बोधस्य
बोधत्वं यद्वितृष्णता ।
पाण्डित्यं नाम तन्मौर्ख्यं
यत्र नास्ति वितृष्णता ॥ ७।१९४।३४

हेंच खरें ज्ञान कीं, ज्याच्या योगानें विषयलालसा नाहींशी होईल. ज्याच्यायोगानें विषयतृष्णा नाहींशी होत नाहीं असें पांडित्य म्हणजे केवळ मूर्खत्वच होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



११२ कपर्दकार्धलाभेन कृपणो बहु मन्यते ॥३।७०।७७

एखाद्या कृपणाच्या हातीं एखादी फुटकी कवडी लागली, तरी तेवढ्यामुळें त्याला एखादा मोठा निधि सांपडल्यासारखा आनंद होतो [ अशा रीतीनें प्राण्यांच्या अहंकाराचा चमत्कार खरोखर दुर्निवार आहे ]

११३ कवलयति नरकनिकरं
परिहरति मृणालिकां ध्वाङ्क्षः ।
यदतोऽस्तु मा स्मयस्ते
स्वभ्यस्तं सर्वदा स्वदते ॥ ७।११६।६४

( एकजण मित्राला म्हणतो ) कावळा कमलतंतु सोडून घाणेरडे पदार्थ खातो, यांत आश्चर्य नाहीं; कारण रोजच्या सवयीनें निंद्य पदार्थही स्वादिष्ट वाटूं लागतात.

११४ कान्तावियोगजातेन हृदि दुःस्पर्शवह्निना ।
यौवने दह्यते जन्तुस्तरुर्दावाग्निना यथा ॥ १।२०।१७

तारुण्यांत स्त्रीचा वियोग झाला म्हणजे, स्पर्श करण्यास कठीण अशा शोकरूपी अग्नीनें मनुष्याचें अंतःकरण वणव्यानें जळणाऱ्या वृक्षाप्रमाणें जळून जातें.

११५ कामनाम्ना किरातेन विकीर्णा मुग्धचेतसाम् ।
नार्यो नरविहङ्गानामङ्ग बन्धनवागुराः ॥ १।२१।१८

( राम श्रीवसिष्ठांना म्हणतो ) कामरूपी भिल्लानें मूढमनुष्यरूपी पक्ष्यांना पकडण्यासाठीं तरुण स्त्रिया हें एक जाळें पसरून ठेविलें आहे.

११६ कारणेन विना कार्यं न च नामोपपद्यते ॥ ७।५७।१३

कारणावांचून कार्य संभवतच नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



११७ कार्यमण्वपि काले तु कृतमेत्युपकारताम् ।
महदप्युपकारोऽपि रिक्ततामेत्यकालतः ॥ १।७।२६

योग्यवेळीं एखाद्याचें लहानसें काम केलें तरी तो मनुष्य आभारी होतो; परंतु वेळ निघून गेल्यावर कितीही मोठा उपकार केला तरी फुकट जातो.

११८ कालः कवलनैकान्तमतिरत्ति गिरन्नपि ।
अनन्तैरपि लोकौघैर्नायं तृप्तो महाशनः ॥ १।२३।१०

काल हा सर्वांना खाऊन टाकण्यांत अगदीं दंग झालेला आहे. तो एकाच वेळीं अनेकांचा संहार करीत असतो. तो इतका अधाशी आहे कीं, अगणित लोकांचा संहार करूनही त्याची तृप्ति होत नाहीं. (तोंडांत घास असतांना आणखी खातच असतो.)

११९ कालविद्भिर्विनिर्णीतं पाण्डित्यं यस्य राघव ।
अनध्यापित एवासौ तज्ज्ञश्चेद्दैवमुत्तमम् ॥ २।८।१९

(श्रीवसिष्ठ म्हणतात) हे राघवा, एखादा मनुष्य पंडित होणार, असें ज्योतिष्यानें भाकीत केलें, परंतु अध्ययन न करतां असा मनुष्य विद्वान् होऊं शकेल, तर दैव बलिष्ठ आहे असें म्हणतां येईल.

१२० कालविद्भिर्विनिर्णीता यस्यातिचिरजीविता ।
स चेज्जीवति संछिन्नशिरास्तद्दैवमुत्तमम् ॥ २।८।१८

एखादा मनुष्य पुष्कळ दिवस जगणार असें ज्योतिष्यानें सांगितलें, आणि अशा स्थितींत त्या मनुष्याचें डोकें उडविलें असतांही तो जगला, तर मात्र दैव समर्थ आहे, असें म्हणतां येईल.

१२१ कालः सर्वंकषो ह्ययम् ॥ ७।१४०।५

काल हा सर्वांचाच नाश करणारा आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१२२ किं दूरं व्यवसायिनाम् ॥ ३।२९।३८

उद्योग करणाऱ्या लोकांना मिळविण्यास कठीण असें या जगांत काय आहे?

१२३ कुटिला कोमलस्पर्शा विषवैषम्यशंसिनी ।
दशत्यपि मनाक्स्पृष्टा तृष्णा कृष्णेव भोगिनी १।१७।१७

विषयतृष्णा ही कुटिल असून तिचा स्पर्श आरंभीं मोठा गोड वाटतो, परंतु परिणामीं ती विषाप्रमाणें घात करिते. एकाद्या काळ्या नागिणीला जरा स्पर्श होतांच ती डसते त्याप्रमाणें तृष्णेला स्पर्श केल्याबरोबर ती मनुष्याला मूढ बनविते.

१२४ कुरङ्गालिपतङ्गेभमीनास्त्वेकैकशो हताः ।
सर्वैर्युक्तैरनर्थैस्तु व्याप्तस्याज्ञ कुतः सुखम् ॥ ५।५२।२१

(उद्दालक मुनि अज्ञ चित्ताला बोध करितात) शब्दस्पर्शादि विषय इतके अनर्थकारक आहेत कीं, एकेका विषयामध्यें आसक्त होणारे हरिण, भ्रमर, पतंग, हत्ती आणि मासा हे जीव घात करून घेतात. पांचही विषयांमध्यें रममाण होणाऱ्या मनुष्यावर सर्व तऱ्हेचे अनर्थ कोसळतील यांत नवल काय? त्याला कोठून सुख मिळणार?

१२५ कृच्छ्रेषु दूरास्तविषादमोहाः
स्वास्थ्येषु नोत्सिक्तमनोभिरामाः ।
सुदुर्लभाः संप्रति सुन्दरीभि-
रनाहतान्तःकरणा महान्तः ॥ १।२७।८

विपत्तीमध्यें ज्यांना विषाद वाटत नाहीं व मोह पडत नाहीं आणि संपत्ति प्राप्त झाली असतां जे गर्वानें फुगून जात नाहींत; तसेंच सुंदर स्त्रिया पाहून ज्यांच्या अंतःकरणांत मुळींच विकार उत्पन्न होत नाहीं असे महात्मे सांप्रतकाळीं फारच दुर्मिळ आहेत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१२६ केनापदि विचार्यन्ते वर्णधर्मकुलक्रमाः ॥ ३।१०६।५२

आपत्तीमध्यें सांपडलेला मनुष्य आपला वर्ण, धर्म, किंवा आपली कुलपरंपरा ह्यांचा विचार कधीं तरी करतो का?

१२७ केवलात्कर्मणो ज्ञानान्न हि मोक्षोऽभिजायते ।
किं तूभाभ्यां भवेन्मोक्षः साधनं तूभयं विदुः ॥ १।१।८

केवल कर्मानें किंवा केवल ज्ञानानें मोक्ष साध्य होत नाहीं. तर कर्म आणि ज्ञान हीं दोन्ही मोक्षाचीं साधनें आहेत.

१२८ कोकिलः काकसंघातैः समवर्णाननाकृतिः ।
गदितैर्व्यक्ततामेति सभायामिव पण्डितः ॥७।११६।७३

कावळ्यांच्या समूहांत असलेला कोकिल पक्षी हा वर्ण, मुख व आकृति यांच्यामध्यें साम्य असल्यामुळें जरी ओळखूं आला नाहीं, तरी ज्याप्रमाणें पंडित कोण आहे हें सभेंतील भाषणावरून समजतें, त्याप्रमाणें मधुर शब्दांवरून कोकिल पक्षी सहज ओळखूं येतो.

१२९ को न गृह्णाति मूढोऽपि
वाक्यं युक्तिसमन्वितम् ॥७।१८३।२२

ज्या भाषणांत कांहींतरी युक्ति आहे, असें भाषण मूर्ख मनुष्य देखील मानीत असतो.

१३० को नाम परिपृच्छन्तं विनीतं वञ्चयेत्पुमान् ॥६।८५।८४

नम्रतेनें प्रश्न करणाराला कोणता बरें पुरुष फसवील ?

१३१ कोपं विषादकलनां विततं च हर्षं
नाल्पेन कारणवशेन वहन्ति सन्तः ॥१।५।१५

सत्पुरुषांना अल्पकारणावरून क्रोध, खेद किंवा हर्ष कधींही उत्पन्न होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१३२ कोऽहं कथमयं दोषः संसाराख्य उपागतः ।
न्यायेनेति परामर्शो विचार इति कथ्यते ॥ २।१४।५०

माझें खरें स्वरूप काय व हा संसाररूपी दोष आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं कसा उत्पन्न झाला, इत्यादि प्रश्नांचें शास्त्रानें सांगितलेल्या मार्गानें चिंतन करणें यालाच विचार असें म्हणतात.

१३३ क्षणमानन्दितामेति क्षणमेति विषादिताम् ।
क्षणं सौम्यत्वमायाति सर्वस्मिन्नटवन्मनः ॥१।२८।३८

मनाची स्थिति एकाद्या नटाप्रमाणें क्षणांत आनंदाची तर क्षणांत खिन्नतेची व क्षणांत सौम्यतेची दिसून येते.

१३४ क्षणमायाति पातालं क्षणं याति नभःस्थलम् ।
क्षणं भ्रमति दिक्कुञ्जे तृष्णा हृत्पद्मषट्पदी ॥१।१७।३१

तृष्णा ही क्षणामध्यें पातालांत जाते, व क्षणामध्यें आकाशांत गमन करते अशा रीतीनें तृष्णा ही हृदयरूपी कमळावरील भ्रमरी असून दिशारूपी कुंजामध्यें भ्रमण करीत असते.

१३५ गम्भीराणि प्रसन्नानि साधुचेतःसरांसि हि ॥७।२३।३५

साधूंचीं अतःकरणरूपी सरोवरें खोल व स्वच्छ असतात.

१३६ गुणं ममेमं जानातु जनः पूजां करोतु मे ।
इत्यहंकारिणामीहा न तु तन्मुक्तचेतसाम् ॥७।१०२।३१

माझा हा गुण लोकांना कळावा, त्यांनीं माझा सत्कार करावा, ही इच्छा अहंकार असलेल्या लोकांना असते. मुक्त झालेल्यांना अशी इच्छा मुळींच नसते.

१३७ गुणवति जने बद्धाशानां श्रमोऽपि सुखावहः।७।११८।२६

गुणी मनुष्याच्या आशेवर राहून श्रम पडले तरी ते सुखावह होतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१३८ गुणैः कतिपयैरेव बहुदोषोऽपि कस्यचित् ।
उपादेयो भवत्येव शौर्यसंतोषभक्तिभिः ॥ ७।११६।५५

पुष्कळ दोष असलेल्या मनुष्यालाही त्याच्या आंगच्या शौर्यादि कांहीं थोड्याशा गुणांमुळें कांहीं लोक पदरीं बाळगतात.

१३९ गुरुश्चेदुद्धरत्यज्ञमात्मीयात्पौरुषादृते ।
उष्ट्रं दान्तं बलीवर्दं तत्कस्मान्नोद्धरत्यसौ ॥५।४३।२६

शिष्यानें स्वतः प्रयत्न केला नसतांही जर गुरु त्याचा अज्ञानांतून उद्धार करूं शकतात, तर वठणीस आणलेल्या उंट, बैल इत्यादि जनावरांनासुद्धां त्या गुरूनें आत्मज्ञानी केलें असतें.

१४० गेहमेवोपशान्तस्य विजनं दूरकाननम् ।
अशान्तस्याप्यरण्यानी विजना सजना पुरी ॥७।३।३८

शांत पुरुषाला त्याचें घरच निर्जन अरण्य आहे. पण शांत नसलेल्या पुरुषाला निर्जन अरण्यही लोकांनीं गजबजून गेलेलें नगर आहे.

१४१ गोरर्थे ब्राह्मणस्यार्थे मित्रस्यार्थे च सन्मते ।
शरणागतयत्नेन स मृतः स्वर्गभूषणम् ॥ ३।३१।२८

( श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात ) गाई, ब्राह्मण, मित्र आणि शरण आलेला यांच्या रक्षणासाठीं लढत असतां, जो वीरपुरुष आपला देह धारातीर्थी अर्पण करतो, तो स्वर्गलोकाला खरोखर अलंकृतच करतो.

१४२ चन्द्रांशव इवोत्सार्य तमांस्यमृतनिर्मलाः ।
अन्तः शीतलयन्त्येता महताममला गिरः ॥ ५।४।४

महात्म्यांची वाणी चंद्रकिरणासारखी निर्मल, शीतल आणि अमृतमय असून मोहांधकार नष्ट करणारी व अंतःकरणाला सुख देणारी असते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१४३ चित्तमिन्द्रियसेनाया नायकं तज्जयाज्जयः ।
उपानद्गूढपादस्य ननु चर्मावृतैव भूः ॥ ७।१६३।६

इंद्रियरूपी सेनेचा अधिपति चित्त आहे. या चित्ताला जिंकलें असतां इंद्रियें जिंकलीं जातात. पायांत जोडे घातलेल्या मनुष्याला सर्व पृथ्वी चामड्यानें आच्छादिल्यासारखीच आहे. ( जोडे घालून पाय झांकले म्हणजे पृथ्वीवरील सर्व कांट्यांचें निवारण झालेंच, त्याप्रमाणें एका चित्ताला जिंकल्यानें सर्व इंद्रियांना जिंकल्यासारखेंच होतें. )

१४४ चित्रसंगरयुद्धस्य सैन्यस्याक्षुब्धता यथा ।
तथैव समता ज्ञस्य व्यवहारवतोऽपि च ॥ ७।३०।५

चित्रांतील समरांगणांत युद्ध करीत असलेलें सैन्य निश्चेष्ट असतें, त्याप्रमाणें ज्ञानी पुरुष व्यवहार करीत असतांही आंतून निश्चल असतो.

१४५ चित्रामृतं नामृतमेव विद्धि
चित्रानलं नानलमेव विद्धि ।
चित्राङ्गना नूनमनङ्गनेति
वाचा विवेकस्त्वविवेक एव ॥ ४।१८।६९

( श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात ) चित्रांतील अमृत खरें अमृत नव्हे, चित्रांतील अग्नि हा खरा अग्नि नव्हे, आणि चित्रांतील स्त्री ही खरी स्त्री नव्हे, त्याप्रमाणें केवळ बोलण्यांतील विवेक म्हणजे खरा विवेक नव्हे, तर तो अविवेकच होय.

१४६ चिन्तनेनैधते चिन्ता त्विन्धनेनेव पावकः ।
नश्यत्यचिन्तनेनैव विनेन्धनमिवानलः ॥ ५।२१।६

ज्याप्रमाणें अग्नीमध्यें इंधन टाकीत गेल्यास तो एकसारखा वाढत जातो, त्याप्रमाणें विषयांचें चिंतन करीत गेल्यानें चिंता वाढूं लागते; परंतु इंधनें टाकण्याचें बंद केल्यास अग्नि आपोआप विझून जातो, त्याप्रमाणें विषयांचें चिंतन थांबविलें म्हणजे चिंतेचाही नाश होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१४७ चिन्तामणिरियं प्रज्ञा हृत्कोशस्था विवेकिनः ।
फलं कल्पलतेवैषा चिन्तितं संप्रयच्छति ॥५।१२।३४

विचारी पुरुषांच्या हृदयकोशांत असलेली बुद्धि हा चिन्तामणिच आहे. अथवा चिंतिलेलें फल देणारी ती एक कल्पलताच आहे.

१४८ जगद्दृश्यं तु यद्यस्ति न शाम्यत्येव कस्यचित् ।
नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ॥३।१।२६

दृश्यजग जर खरोखरच असेल तर त्याचा कोणाच्याही ठिकाणीं बाध होणें शक्य नाहीं. कारण जें नाहीं तें आहेसें होत नाहीं, व जें आहे तें नाहींसें होत नाहीं.

१४९ जडः क इव वा नाम गुणागुणमपेक्षते ॥ ३।७०।६२

मूर्ख मनुष्याच्या ठिकाणीं गुण आणि अवगुण यांचें तारतम्य बेतांचेंच असतें.

१५० जडत्वान्निःस्वरूपत्वात्सर्वदैव मृतं मनः ।
मृतेन मार्यते लोकश्चित्रेयं मौर्ख्यचक्रिका ॥५।१३।१००

मन हें जड आणि निःस्वरूप असल्यामुळें सर्वदा मेलेलेंच आहे परंतु या मृत मनाकडून अनेक लोक मारले जातात, ही मूर्खपरंपरा विचित्रच म्हणावयाची.

१५१ जडेन मूकेनान्धेन निहतो मनसापि यः ।
मन्ये स दह्यते मूढः पूर्णचन्द्रमरीचिभिः॥ ५।१३।१०३

जड, मूढ आणि अंध अशा मनाकडून जो मारला जातो, असा मूढ पुरुष पूर्ण चंद्राच्या शीतळ किरणांनीं सुद्धां जाळला जाण्याला काय हरकत आहे ?

१५२ जडो देहो मनश्चात्र न जडं नाजडं विदुः॥ ३।११०।१३

देह हा केवळ जड आहे, परंतु मन हें धड जडही नाहीं, आणि चेतनही नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१५३ जन्मान्तरशताभ्यस्ता राम संसारसंस्थितिः ।
सा चिराभ्यासयोगेन विना न क्षीयते क्वचित् ५।९२।२३

संसारस्थितीचा अभ्यास मागील शेंकडों जन्मांत झालेला आहे, त्यामुळें दीर्घ काल साधनांचा अभ्यास केल्यावांचून संसारस्थिति क्षीण होणार नाहीं.

१५४ जयन्ति ते महाशूराः साधवो यैर्विनिर्जितम् ।
अविद्यामेदुरोल्लासैः स्वमनो विषयोन्मुखम् ॥ ४।३५।१

अविद्येच्या योगानें विलक्षण रीतीनें उल्लास पावणारें आणि विषयोन्मुख होणारें स्वतःचें मन ज्यांनीं जिंकलें अशा महाशूर सत्पुरुषांचा जयजयकार असो !

१५५ जराकुसुमितं देहद्रुमं दृष्ट्वैव दूरतः ।
अभ्यापतति वेगेन मुने मरणमर्कटः ॥ १।२२।१६

( राम श्रीवसिष्ठांना म्हणतो ) हे मुने, देहरूपी वृक्ष म्हातारपणामुळें फुलला आहे असें दुरून दृष्टीस पडतांच मरणरूपी माकड त्यावर जोरानें झडप घालतें.

१५६ जरा जगत्यामजिता जनानां
सर्वैषणास्तात तिरस्करोति ॥ १।२२।३८

( राम श्रीवसिष्ठांना म्हणतो ) म्हातारपण हें अजिंक्य आहे, तें मनुष्यांच्या सर्व इच्छांना न जुमानतां त्यांच्यावर आपला पगडा बसवितें.

१५७ जरामार्जारिका भुङ्क्ते यौवनाखुं तथोद्धता ।
परमुल्लासमायाति शरीरामिषगर्धिनी ॥ १।२२।२५

जरा ही उद्धट मांजरी असून ती तारुण्यरूपी उंदीर गट्ट करून टाकते आणि शरीररूपी भक्ष्य भक्षण करण्यास अगदीं टपून बसलेली असते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१५८ जरासुधालेपसिते शरीरान्तःपुरान्तरे ।
अशक्तिरार्तिरापच्च तिष्ठन्ति सुखमङ्गनाः ॥ १।२२।३६

जरारूपी चुन्याचा लेप दिल्यामुळें शरीररूपी अंतःपुर फटफटीत दिसूं लागलें, म्हणजे अशक्तता, पीडा व आपत्ति ह्या स्त्रिया त्या अंतःपुरांत आनंदानें राहूं लागतात.

१५९ जलमेव यथाम्भोधिर्न तरङ्गादिकं पृथक् ।
आत्मैवेदं तथा सर्वं न भूतोयादिकं पृथक्॥५।७१।१४

समुद्र म्हणजे पाणीच असून लाटा पाण्याहून निराळ्या नसतात त्या प्रमाणें हें सर्व जग तत्त्वतः आत्माच असून पृथ्वी, उदक इत्यादि भूतें आत्म्याहून भिन्न नाहींत.

१६० जले जलचरव्यूहान् सूक्ष्मान्स्थूलो निकृन्तति ।
ग्रासार्थं निर्दयो मत्स्यः कैवात्र परिदेवना ॥ ५।१४।२०

पाण्यांतील मोठा निर्दय मासा आपणापेक्षां लहान जलचर प्राण्यांना खाऊन टाकतो, या ठिकाणीं शोक तरी किती करणार ? (प्रबलांकडून दुर्बलांना पीडा व्हावयाची असा या सृष्टींतील नियमच आहे.)

१६१ जाग्रत्येव सुषुप्तस्थः कुरु कर्माणि राघव ।
अन्तः सर्वपरित्यागी बहिः कुरु यथागतम् ॥६।१२५।६

(श्रीवसिष्ठ म्हणतात) हे राघवा, जागृतीमध्यें सुषुप्तीमध्यें असल्याप्रमाणें राहून कर्मे करीत जा. आंतून सर्वांचा परित्याग कर, पण बाहेर प्राप्त झालेला व्यवहार करण्यास चुकूं नकोस.

१६२ जायते जीव्यते पश्चादवश्यं च विनश्यति ॥४।४८।२५

उत्पन्न होऊन जगणें, हें जसें सृष्टींतील एक कार्य आहे, तसेंच शेवटीं मरणें हेंही एक अवश्य कार्य होय.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१६३ जायते दर्शनादेव मैत्री विशदचेतसाम् ॥ ३।७८।३५

मोकळ्यामनाचीं माणसें एकमेकांना भेटतांक्षणीं त्यांची परस्पर मैत्री जमत असते.

१६४ जायन्ते च म्रियन्ते च शरीराणि शरीरिणाम् ।
पादपानां च पर्णानि का तत्र परिदेवना ॥ ६।३२।५०

झाडांना पानें येतात, व पुढें गळून पडतात; त्याप्रमाणें प्राण्यांचीं शरीरें उत्पन्न होतात व पुढें नष्ट होतात; यांत दुःख कशाचें ?

१६५ जितेन्द्रिया महासत्त्वा ये त एव नरा भुवि ।
शेषानहमिमान्मन्ये मांसयन्त्रगणांश्चलान् ॥ ७।६।४३

( श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात ) ज्यांनीं इंद्रियें जिंकिलीं आहेत, आणि जे अत्यन्त धैर्यवान् व बुद्धिशाली आहेत, त्यांनाच या पृथ्वीवर खरोखर 'मनुष्यें' असें म्हणतां येईल. बाकीचे लोक म्हणजे केवल हालचाल करणारीं मांसाचीं यंत्रेंच होत असें मी समजतों.

१६६ जिते मनसि सर्वैव विजिता चेन्द्रियावलिः ।
शीर्यते च यथा तन्तौ दग्धे मौक्तिकमालिका ३।११०।२५

दोरा जळतांच त्यांत ओंवलेले मोत्यांचे दाणे गळून पडतात; त्याप्रमाणें एक मन जिंकलें म्हणजे सर्व इंद्रियें जिंकलीं गेलीं असें समजावें.

१६७ जीर्यन्ते जीर्यतः केशा दन्ता जीर्यन्ति जीर्यतः ।
क्षीयते जीर्यते सर्वं तृष्णैवैका न जीर्यते ॥ ७।९३।८६

वृद्ध झालेल्या प्राण्यांचे केस पिकतात, दांत पडतात, सर्व अवयव शिथिल होतात, पण एक तृष्णा मात्र तरुण राहते, ती कमी होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१६८ जीवं विवेकिनमिहोपदिशन्ति तज्ज्ञा
नो बालमुद्धमभसन्मयमार्यमुक्तम् ॥ ६।४१।५९

तत्त्वज्ञ लोक विवेकी जीवालाच उपदेश करतात. श्रेष्ठ लोकांनीं ज्याची उपेक्षा केली आहे, देहादिकांच्या ठिकाणीं जो आसक्त आहे अशा अत्यंत भ्रमिष्ठ मूर्खाला ते उपदेश करीत नाहींत.

१६९ जीवितं गलति क्षिप्रं जलमञ्जलिना यथा ।
प्रवाह इव वाहिन्या गतं न विनिवर्तते ॥ ७।९३।८९

ओंजळींत घेतलेलें पाणी ज्याप्रमाणें गळून जातें, त्याप्रमाणें प्रत्येक क्षणाला आयुष्य कमी होत जातें. नदीचा पुढें गेलेला ओघ जसा माग येत नाहीं, तसें गेलेलें आयुष्य परत येत नाहीं.

१७० जेतुमन्यं कृतोत्साहैः पुरुषैरिह पण्डितैः ।
पूर्वं हृदयशत्रुत्वाज्जेतव्यानीन्द्रियाण्यलम् ॥ ४।२३।५९

दुसऱ्यांना जिंकण्याची हाव धरणाऱ्या सुज्ञ पुरुषांनीं प्रथम आपल्या हृदयाच्या शत्रुभूत असलेल्या इंद्रियांना जिंकावें.

१७१ ज्ञातज्ञेयस्य मनसो नूनमेतद्धि लक्षणम् ।
न स्वदन्ते समग्राणि भोगवृन्दानि यत्पुनः ॥ २।२।३

ज्ञेयतत्त्व जाणल्याची म्हणजे परब्रह्मसाक्षात्कार झाल्याची हीच खूण आहे कीं, त्या स्थितीनंतर सर्व तऱ्हेच्या विषयोपभोगांबद्दल कायमचा वीट येऊन जातो.

१७२ ज्ञानं हि परमं श्रेयः ॥ ६।८७।१६

ज्ञान हेंच परमश्रेष्ठ आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१७३ ज्ञानवानेव सुखवान् ज्ञानवानेव जीवति ।
ज्ञानवानेव बलवांस्तस्माज्ज्ञानमयो भव ॥ ५।९२।४९

(श्रीवसिष्ठ म्हणतात) हे रामा, जो ज्ञानी असतो, तोच खरा सुखी, तोच खरा जिवंत, आणि तोच खरा बलवान् असतो; म्हणून तूं ज्ञानी हो.

१७४ ज्ञानाद्विषयवैरस्यं स समाधिर्हि नेतरः ॥ ७।४६।१५

ज्ञानामुळें विषयांची आवड नाहींशी होणें, हीच समाधि होय. इतर कारणांमुळें विषय नावडणें ही समाधि नव्हे.

१७५ ज्ञानिनैव सदा भाव्यं राम न ज्ञानबन्धुना ।
अज्ञातारं वरं मन्ये न पुनर्ज्ञानबन्धुताम् ॥ ७।२१।१

( श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात ) प्रत्येकानें ज्ञानी व्हावें, पण ज्ञानाच्या योगानें यथेष्ट आचरण करणारा ज्ञानबंधु होऊं नये. अशा ज्ञानबंधूपेक्षां मुळींच ज्ञान नसलेला बरा; असें मी समजतों.

१७६ तच्चिन्तनं तत्कथनमन्योन्यं तत्प्रबोधनम् ।
एतदेकपरत्वं च तदभ्यासं विदुर्बुधाः ॥ ३।२२।२४

श्रवणाच्या योगानें समजलेलें तत्त्व बुद्धीमध्यें आरूढ व्हावें, अशा दृष्टीनें त्याचें निरंतर चिंतन करणें, ज्ञात्या पुरुषांशीं संवाद करणें, समान अधिकाऱ्यांनीं तें तत्त्व एकमेकांना सांगून त्यासंबंधान परस्परांना बोध करून देणें आणि अखंड तदाकार वृत्ति राखण्याचा प्रयत्न करणें, याला ज्ञाते पुरुष अभ्यास असें म्हणतात.

१७७ तडित्सु शरदभ्रेषु गन्धर्वनगरेषु च ।
स्थैर्यं येन विनिर्णीतं स विश्वसितु विग्रहे ॥ १।१८।६१

आकाशांतील वीज, शरदृतूमधील मेघ आणि गंधर्वनगर हीं सर्व स्थिर आहेत, असें ज्याला वाटत असेल, त्यानें देहाच्या शाश्वतीविषयीं खुशाल विश्वास बाळगावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१७८ तपसैवं महोग्रेण यद्दुरापं तदाप्यते ॥ ३६।६८।१४

मिळविण्यास कठीण अशी कोणतीही वस्तु मोठ्या उग्रतपानें प्राप्त होते.

१७९ तरङ्गं प्रतिबिम्बेन्दुं तडित्पुञ्जं नभोऽम्बुजम् ।
ग्रहीतुमास्थां बध्नामि नत्वायुषि हतास्थितौ ॥१।१४।७

(राम श्रीवसिष्ठांना म्हणतो) पाण्यावरील लाटा, चंद्राचें प्रतिबिंब, विजेची चमक, आकाशांतील कमळें यांना पकडतां येईल. परंतु चंचल आयुष्यावर विश्वास ठेवतां येणार नाहीं.

१८० तर तारुण्यमस्तीदं यावत्ते तावदम्बुधेः ।
ननु संसारनाम्नोऽस्माद्बुद्ध्या नावा विशुद्धया ७।१६२।१९

(श्रीवसिष्ठ रामाला सांगतात) तारुण्य आहे तोंपर्यंतच 'शुद्धबुद्धि' या नौकेच्या योगानें संसारसागरांतून तरून जाण्याचा यत्न कर.

१८१ तरन्ति मातङ्गघटातरङ्गं
रणाम्बुधिं ये मयि ते न शूराः ।
शूरास्त एवेह मनस्तरङ्गं
देहेन्द्रियाम्भोधिमिमं तरन्ति ॥ १।२७।९

(राम श्रीवसिष्ठांना म्हणतो) ज्या रणरूपी समुद्रामध्यें शेंकडों हत्तींचे कळप तरंगाप्रमाणें दिसत आहेत, असा समुद्र तरून जाणारे लोक खरे शूर, असें मी समजत नाहीं, तर खरे शूर योद्धे तेच कीं, जे मनोरूपी तरंगांनीं युक्त असलेल्या देहेंद्रियरूपी समुद्रांतून सुरक्षितपणें तरून जातात.

१८२ तरवोऽपि हि जीवन्ति जीवन्ति मृगपक्षिणः ।
स जीवति मनो यस्य मननेन न जीवति ॥ १।१४।११

जगांत वृक्ष किंवा पशुपक्षी जगतच आहेत; परंतु तें जगणें खरें नव्हे. तोच खरा जिवंत कीं, ज्याचें मन वासनाक्षयामुळें जिवंत नाहीं. किंवा तत्त्वबोधामुळें जो मनाला तुच्छ लेखतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१८३ ताडितस्य हि यः पश्चात्संमानः सोऽप्यनन्तकः ।
शालेर्ग्रीष्माभितप्तस्य कुसेकोऽप्यमृतायते ॥४।२३।५३

उन्हानें करपून गेलेल्या भाताच्या शेतावर थोडासा पाऊस पडला तरी त्याला ती अमृतवृष्टि वाटते, त्याप्रमाणें पुष्कळ कालपर्यंत निग्रह केलेल्या मनाला थोडासा मान दिला म्हणजे तें संतुष्ट होतें.

१८४ तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाणाः
क्षारं जलं कापुरुषाः पिबन्ति ॥ ७।१६३।५६

हेकेखोर लोक जवळ असलेलें गंगोदक न पितां, ही आमच्या बापाची विहीर आहे, असें म्हणून तिचेंच खारट पाणी पितात.

१८५ तावदुत्तमतामेति पुमानपि दिवौकसाम् ।
कृपणैरिन्द्रियैर्यावत्तृणवन्नापकृष्यते ॥ ७।६।४२

विषयासक्त होणारीं इंद्रियें जोंपर्यंत मनुष्याला गवताप्रमाणें आकर्षण करीत नाहींत, तोंपर्यंतच तो देवांना देखील मान्य होतो.

१८६ तावन्नयति संकोचं तृष्णा वै मानवाम्बुजम् ।
यावद्विवेकसूर्यस्य नोदिता विमला प्रभा ॥ २।१३।२०

जोंपर्यंत विवेकरूपी सूर्याचा उदय होऊन त्याचा स्वच्छ प्रकाश सर्वत्र पसरला नाहीं, तोंपर्यंतच तृष्णा ही मनुष्यरूपी कमलाला संकुचित करते.

१८७ तिष्ठतस्तव कार्येषु
मास्तु रागेषु रञ्जना ।
स्फटिकस्येव चित्राणि
प्रतिबिम्बानि गृह्णतः ॥ ३।११४।७६

( श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात ) स्फटिक मणि अनेक प्रकारच्या वस्तूंचीं प्रतिबिंबें ग्रहण करतो, परंतु तो त्या वस्तूंचे ठिकाणीं आसक्त होत नाहीं; त्याप्रमाणें व्यवहारांत वावरत असतां मोह उत्पन्न करणाऱ्या विषयांच्या ठिकाणीं तुझें चित्त आसक्त न होवो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१८८ तुच्छोऽप्यर्थोऽल्पसत्त्वानां
गच्छति प्रार्थनीयताम् ॥ ३।७०।३१

क्षुद्र अंतःकरणाचे लोक नेहमीं क्षुद्र फलासाठींच धडपडत असतात.

१८९ तुल्यवर्णच्छदैः कृष्णः संगतैः किल कोकिलैः ।
केन विज्ञायते काकः स्वयं यदि न भाषते ॥ ७।११६।६६

कोकिल पक्ष्यांप्रमाणेंच पंख, रंग हे असणारा कावळा त्या कोकिलांच्या बरोबर असतां जोंपर्यंत स्वतःचा शब्द करीत नाहीं, तोंपर्यंत तो कोणाला ओळखूं येणार आहे ?

१९० ते पूज्यास्ते महात्मानस्त एव पुरुषा भुवि ।
ये सुखेन समुत्तीर्णाः साधो यौवनसंकटात् ॥ १।२०।४१

( राम श्रीवासिष्ठांना म्हणतो ) जे पुरुष यौवनरूपी संकटांतून सुखानें तरून जातात, तेच पृथ्वीवर पूज्य, तेच महात्मे, आणि तेच खरे पुरुष होत.

१९१ ते महान्तो महाप्राज्ञा निमित्तेन विनैव हि ।
वैराग्यं जायते येषां तेषां ह्यमलमानसम् ॥ २।११।२४

ते महाबुद्धिमान् महात्मे खरोखरच धन्य होत कीं, ज्यांच्या निर्मल मनामध्यें निमित्ताशिवायच वैराग्य उत्पन्न होतें.

१९२ त्यक्तावनेर्विटपिनो भूयः पत्राणि नो यथा ।
निर्वासनस्य जीवस्य पुनर्जन्मादि नो तथा ॥ ५।४८।५५

वृक्षाचीं मुळेंच तोडून टाकलीं म्हणजे त्याच्यावर पुन्हां पानें येत नाहीं, त्याप्रमाणें ज्याच्या वासना नाहींशा झालेल्या आहेत, अशा प्राण्याला पुनर्जन्मादि अवस्था प्राप्त होत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१९३ त्यजत्स्वात्मसुखं सौम्यं मनो विषयविद्रुतम् ।
अङ्कुशेनेव नागेन्द्रं विचारेण वशं नयेत् ॥ ४।२३।५१

हत्तीला अंकुशाच्या योगानें कह्यांत ठेवतात, त्याप्रमाणें स्वात्मसुखाचा त्याग करून विषयसुखाच्या मागें धांव घेणाऱ्या मनाला विचाराच्या योगानें ताब्यांत ठेवावें.

१९४ त्यजन्त्युद्यममुद्युक्ता न स्वकर्माणि केचन ॥ ३।२।५

उद्योगी पुरुष स्वकर्मापासून कधींही पराङ्मुख होत नाहींत.

१९५ त्यागो न युक्त इह कर्मसु नापि रागः ॥ ५।५।५४

अवश्य प्राप्त कर्मांचा त्याग करणें व त्याविषयीं आसक्ति ठेवणें हीं दोन्ही युक्त नव्हत.

१९६ दासाः पुत्राः स्त्रियश्चैव बान्धवाः सुहृदस्तथा ।
हसन्त्युन्मत्तकमिव नरं वार्धककम्पितम् ॥ १।२२।६

उन्मत्त मनुष्याकडे पाहून लोक हसतात, त्याप्रमाणें म्हातारपणीं मनुष्याचें शरीर कांपूं लागलें म्हणजे त्याचे नोकर चाकर, मुलगे, बायका, बधु, आणि मित्र त्याच्याकडे पाहून हसूं लागतात.

१९७ दीनो वासनया लोकः कृतान्तेनापकृष्यते ।
रज्ज्वेव बालेन खगो विवशो भृशमुच्छ्वसन् ॥४।२७।३४

जाळ्यांत किंवा फासांत सांपडून पराधीन झालेल्या व घाबरलेल्या पक्ष्याला एकादें लहान पोर दोरी धरून सहज ओढतें; त्याप्रमाणें वासनेच्या योगानें दीन झालेल्या मनुष्याला यम आपल्या फासांनीं ओढतो.

१९८ दीर्घसंसाररोगस्य विचारो हि महौषधम् ॥ २।१४।२

संसाररूपी दीर्घरोगावर विचार हें रामबाण औषध आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१९९ दुःखशोकमहाष्ठीलः कष्टकण्टकसंकटः ।
सहस्रशाखतां याति दारिद्र्यदृढशाल्मलिः ॥६।७।१९

दुःख व शोक या ज्याच्या मोठ्या बिया आहेत, कष्टरूपी कांट्यांनीं जो भरून गेला आहे, असा हा दारिद्र्यरूपी बळकट सावरीचा वृक्ष हजारों खांद्यांनीं विस्तार पावतो.

२०० दुःखानि मौर्ख्यविभवेन भवन्ति यानि
नैवापदो न च जरामरणेन तानि ॥ ६।८८।२७

आपत्ति, जरा व मरण यांच्या पासून जें दुःख होत नाहीं, तें दुःख मूर्खपणाच्या प्रभावानें भोगावें लागतें.

२०१ दुःखाद्यथा दुःखकाले हा कष्टमिति कथ्यते ।
हाकष्टशब्दपर्यायस्तथा हादैवमित्यपि ॥ २।६।३

दुःखाचे वेळीं 'हाय हाय, केवढी दुःखाची गोष्ट' असे उद्गार निघतात. या अर्थानेंच कधीं कधीं 'हाय हाय, दैव केवढें बलिष्ठ आहे' असेही उद्गार पर्यायानें निघतात.

२०२ दुःखितस्य निशा कल्पः सुखितस्यैव च क्षणः ३।६०।२२

मनुष्य दुःखी कष्टी असला म्हणजे त्याला एक रात्र कल्पाप्रमाणें दीर्घ वाटते आणि सुखामध्यें कितीही काळ लोटला, तरी तो त्याला एक क्षणाप्रमाणेंच वाटतो.

२०३ दुरीहितं दुर्विहितं सर्वं सज्जनसूक्तयः ।
प्रमार्जयन्ति शीतांशोस्तमःकाण्डमिवाङ्ग्रयः ॥ ५।४।७

ज्याप्रमाणें चंद्राचे किरण अंधकाराचा नाश करतात, त्याप्रमाणें सज्जनांचीं चांगलीं वचनें सर्व शारीरिक व मानसिक दोष दूर करतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२०४ दुरुत्तरा या विपदो दुःखकल्लोलसंकुलाः ।
तीर्यते प्रज्ञया ताभ्यो नावापद्भ्यो महामते ॥५।१२।२०

( श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात ) दुःखरूपी लाटांच्या योगानें भयंकर आणि दुस्तर भासणारी विपत्तिरूपी नदी प्रज्ञारूपी नौकेचा आश्रय केल्यानें सहज तरून जातां येते.

२०५ दुर्जनो येन तेनैव नाशितेनैति हृष्टताम् ॥ ३।७०।८२

कोणत्या तरी रीतीनें दुसऱ्याचा नाश झाला म्हणजे दुर्जनाला आनंद होत असतो.

२०६ दुःसाध्याः सिद्धिमायान्ति रिपवो यान्ति मित्रताम् ।
विषाण्यमृततां यान्ति संतताभ्यासयोगतः ॥७।६७।३३

सतत अभ्यासानें, मिळण्यास कठीण अशी कोणतीही वस्तू प्राप्त होते, शत्रु मित्र होतात, आणि विष हें अमृताप्रमाणें होतें.

२०७ दुःसाध्यो वासनात्यागः सुमेरून्मूलनादपि ॥५।९२।१०

मेरु पर्वत उपटून टाकण्यापेक्षांही वासनांचा त्याग करणें कठीण आहे.

२०८ दूरमुत्सहते राजा
महासत्त्वो महापदि ।
अल्पसत्त्वो जनः शोच-
त्यल्पेऽपि हि परिक्षते ॥ ६।१२७।४३

महाबलवान् राजा युद्धादिकांच्या मोठ्या आपत्तींत सांपडला, तरी साधनसंपन्न असल्यामुळें फार मोठा उत्साह धारण करतो. पण अल्प सामर्थ्य असलेला मनुष्य त्याची थोडीशी जरी हानि झाली तरी फार शोक करतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२०९ दृष्टान्तेन विना राम नापूर्वार्थोऽवबुध्यते ।
यथा दीपं विना रात्रौ भाण्डोपस्करणं गृहे ॥ २।१८।५१

( श्रीवासिष्ठ म्हणतात ) हे रामा, ज्याप्रमाणें रात्रींच्या वेळीं दिव्याच्या प्रकाशाशिवाय घरांतील भांडीं वगैरे वस्तू दिसत नाहींत, त्याप्रमाणें दृष्टांताशिवाय अदृष्ट अर्थाचा बोध होत नाहीं.

२१० देहपादपसंस्थस्य हृदयालयगामिनः ।
तृष्णा चित्तखगस्येयं वागुरा परिकल्पिता ॥ ४।२७।३३

देहरूपी वृक्षावरील हृदयरूपी घरट्याकडे जाणाऱ्या चित्तरूपी पक्ष्याला पकडण्याकरितांच हें तृष्णारूपी जाळें जणूंकाय निर्माण करण्यांत आलें आहे.

२११ देहोऽहमिति या बुद्धिः सा संसारनिबन्धनी ।
न कदाचिदियं बुद्धिरादेया हि मुमुक्षुभिः ॥ ६।११८।८

' मी देह आहें, ' अशी जी बुद्धि ती संसारांत जखडून टाकणारी आहे. यासाठीं मुमुक्षूंनीं त्या बुद्धीचा स्वीकार केव्हांही करूं नये.

२१२ दैन्यदारिद्र्यदुःखार्ता अप्यन्ये पुरुषोत्तमाः ।
पौरुषेणैव यत्नेन याता देवेन्द्रतुल्यताम् ॥ २।५।२७

दैन्य, दारिद्र्य आणि दुःख यांनीं युक्त असलेले उत्तम पुरुष पूर्वी पुरुषप्रयत्नानेंच इंद्रपदाला पोंचले आहेत.

२१३ दैवं संप्रेरयति मामिति दग्धधियां मुखम् ।
अदृष्टश्रेष्ठदृष्टीनां दृष्ट्वा लक्ष्मीर्निवर्तते ॥ २।५।२०

' मला दैव प्रेरणा करीत आहे ' असें म्हणणाऱ्या लोकांची बुद्धि होरपळून गेली आहे, असें समजावें. ज्यांच्या दृष्टीला दैवच श्रेष्ठ आहे असें वाटतें, अशा लोकांचें तोंड दिसल्याबरोबर लक्ष्मी त्यांच्याकडे पाठ फिरविते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२१४ दैवमेवेह चेत्कर्तृ पुंसः किमिव चेष्टया ।
स्नानदानासनोच्चारान्दैवमेव करिष्यति ॥ २।८।६

सर्व गोष्टी जर दैवानेंच होत असतील, तर मनुष्याला कांहीं हालचाल तरी करून काय करावयाचें आहे? तसें असेल तर स्नानदानादि क्रियाही दैवच करूं शकेल.

२१५ दैवात्तमिति मन्यन्ते ये हतास्ते कुबुद्धयः ॥ २।५।२९

कोणतीही गोष्ट दैवानें घडून येते, अशी ज्यांची भावना असते, ते मनुष्य दुष्टबुद्धीचे असून त्यांचा अखेरीस नाश होतो.

२१६ दोषान्प्रसवति स्फारान्वासनावलिता मतिः ।
कीर्णकण्टकबीजा भूः कण्टकप्रसरं यथा ॥ ४।३५।६

कांटेरी झाडें तोडून टाकलीं, पण त्या झाडांचीं मुळें भूमींत तशींच कायम असलीं, तर त्यांची पुन्हां जोरानें वाढ होऊन सर्व भूमि कांट्यांनीं भरून जाते; त्याचप्रमाणें विषयांचा त्याग केला, तरी जोंपर्यंत अंतःकरणांत वासनाबीज शिल्लक आहे, तोंपर्यंत तें विषयांचें स्मरण करवून रागद्वेषादि दोष उत्पन्न केल्याशिवाय राहणार नाहीं.

२१७ द्विविधो भवति प्रष्टा तत्त्वज्ञोऽज्ञोऽथवापि च ।
अज्ञस्याज्ञतया देयो ज्ञस्य तु ज्ञतयोत्तरः ॥ ७।२९।३२

तत्त्वज्ञ आणि अज्ञ असे दोन प्रकारचे प्रश्न करणारे असतात, तत्त्वज्ञाला तात्त्विक उत्तर दिलें पाहिजे आणि अज्ञ मनुष्याला त्याच्या सारखें सांगून शांत केलें पाहिजे.

२१८ द्वौ हुडाविव युध्येते पुरुषार्थौ समासमौ ।
प्राक्तनश्चैहिकश्चैव शाम्यत्यत्राल्पवीर्यवान् ॥ २।५।५

दोन एडके आपसांत लढूं लागले म्हणजे त्यांची कधीं बरोबरी होते किंवा एक अधिक बलिष्ठ असल्यास तो दुसऱ्याला जिंकतो, त्याचप्रमाणें पूर्वींचा व हल्लींचा प्रयत्न हे एकमेकांशीं लढत असतात, त्यामध्यें कमी सामर्थ्याचा असेल त्याला हार खावी लागते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२१९ धीमन्तो न निषेवन्ते पर्यन्ते दुःखदां क्रियाम्॥५।५२।८

ज्या कृत्याचा परिणाम दुःखदायक होणार, असें कृत्य करण्याला विचारी लोक केव्हांच तयार होत नाहींत.

२२० धीरोऽप्यतिबहुज्ञोऽपि कुलजोऽपि महानपि ।
तृष्णया बध्यते जन्तुः सिंहः शृङ्खलया यथा॥४।२७।२२

ज्याप्रमाणें सिंह श्रृंखलेनें बद्ध होतो त्याप्रमाणें मनुष्य कितीही धैर्यवान्, ज्ञानी आणि कुलीन असला, तरी तृष्णेच्या जाळ्यांत सांपडून बद्ध होतो.

२२१ धीः सम्यग्योजिता पारमसम्यग्योजिताऽऽपदम् ।
नरं नयति संसारे भ्रमन्ती नौरिवार्णवे ॥ ५।१२।३६

बुद्धि चांगल्या रीतीनें योजिली तर मनुष्य संकटांतून पार पडतो, अयोग्य रीतीनें तिचा उपयोग केल्यास आपत्ति प्राप्त होते. ज्याप्रमाणें अशिक्षित नावाड्याची नौका समुद्रामध्यें गिरक्या खाते, त्याप्रमाणें मंदबुद्धि पुरुष या संसारसागरांत गटंगळ्या खात राहतो.

२२२ न कदाचन जायन्ते शीतांशोरुष्णरश्मयः ॥ १।९।३

चंद्राचे किरण कधींही उष्ण होत नाहींत.

२२३ न कारणं विना कार्यं भवतीत्युपपद्यते ॥ ७।१७९।८

कारण असल्यावांचून कार्य होणें संभवत नाहीं.

२२४ न कालमतिवर्तन्ते महान्तः स्वेषु कर्मसु ॥ ५।१०।९

महात्मे आपल्या कर्तव्यकर्माविषयीं केव्हांही कालातिक्रम होऊं देत नाहींत. ( वेळच्यावेळीं काम करतात. )

२२५ न किंचन फलं धत्ते स्वाभ्यासेन विना क्रिया॥२।१८।११

अभ्यास केल्याशिवाय कोणतेंच कृत्य फलद्रूप होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२२६ न किंचिद्दीर्घसूत्राणां सिध्यत्यात्मक्षयादृते ॥ ३।७८।८

दीर्घसूत्री मनुष्य विलंब करून आपल्या कार्याचा नाश करून घेतात, यापेक्षां जास्त कांहीं त्यांच्या पदरांत पडत नाहीं.

२२७ न केचन जगद्भावास्तत्त्वज्ञं रञ्जयन्त्यमी ।
मर्कटा इव नृत्यन्तो गौरीलास्यार्थिनं हरम् ॥४।५७।५६

गौरीच्या नृत्याची इच्छा करणाऱ्या शंकरापुढें माकडें नाचूं लागलीं असतां त्याला त्याबद्दल प्रेम वाटणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें या जगांतील कोणतीही वस्तु ज्ञानी पुरुषाचें चित्त आकर्षण करूं शकत नाहीं.

२२८ न क्षमन्ते महान्तोऽपि
पौनःपुन्येन दुष्क्रियाम् ॥ ५।३०।१२

वारंवार केलेल्या अपराधांची महात्मे देखील क्षमा करीत नाहींत.

२२९ नगर्यां दह्यमानायां भूषितायां तथोत्सवे ।
सम एव महीपालो जनको भूभृतां वरः ॥७।१९८।३१

राजधानीची मिथिलानगरी जळूं लागली किंवा उत्सवाचे वेळीं ती सुशोभित केली, तरी दोन्ही स्थितींत राजश्रेष्ठ जनकराजाची अंतःकरणाची समता कायम असे.

२३० न च निस्पन्दता लोके दृष्टेह शवतां विना ।
स्पन्दाच्च फलसंप्राप्तिस्तस्माद्दैवं निरर्थकम् ॥ २।८।८

हालचाल ही फक्त प्रेतामध्येंच काय ती होत नाहीं; हालचाल केल्यानेंच फलप्राप्ति होत असल्यामुळें दैव हें निरर्थक आहे.

२३१ न जातु ते विगण्यन्ते गणनासु गरीयसाम् ।
ये तरङ्गैस्तृणानीव ह्रियन्ते हर्षशोकयोः ॥ ६।१२७।५०

लाटांबरोबर गवत वाहत जातें त्याप्रमाणें जे हर्षशोकांच्या तडाक्यांत सांपडतात, त्यांची गणना श्रेष्ठ लोकांमध्यें होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२३२ न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा क्वचित् ।
पौरुषेण प्रयत्नेन यन्नाप्नोति गुणान्वितः ।। ४।६२।१९

या पृथ्वीवर, आकाशांत किंवा देवलोकांत अशी एकही वस्तू नाहीं कीं, जी प्रयत्न करणाऱ्या गुणवानाला साध्य होत नाहीं.

२३३ न तदस्ति विमोहाय यद्विविक्तस्य चेतसः ।। ३।७८।२१

विचार करणाऱ्या अंतःकरणाला मोह पाडील अशी कोणतीही स्थिति नाहीं.

२३४ न तपांसि न तीर्थानि न शास्त्राणि जयन्ति च ।
संसारसागरोत्तारे सज्जनासेवनं विना ।। ४।३३।१४

संसारसागरांतून तरून जाण्यासाठीं केलेलें तप, तीर्थाटन आणि शास्त्राध्ययन हीं सर्व सज्जनसेवेवांचून व्यर्थ होत.

२३५ न देशो मोक्षनामास्ति
न कालो नेतरा स्थितिः ।। ६।१२१।१२

मोक्ष म्हणून कांहीं कोणता निराळा देश नाहीं, निराळा काल नाहीं, किंवा निराळी स्थिति नाहीं.

२३६ न मे मनोरमाः कामा न च रम्या विभूतयः ।
इदं मत्ताङ्गनापाङ्गभङ्गलोलं च जीवितम् ।। ७।९३।६०

( सिद्ध श्रीवसिष्ठांना म्हणतात ) विषय व ऐश्वर्य हीं दोन्ही रमणीय असतील, परंतु माझें मन विषयांचे ठिकाणीं रमत नाहीं, व ऐश्वर्यापासूनही आनंद पावत नाहीं. कारण, जीवित हेंच मुळीं मत्तस्त्रियांच्या कटाक्षाइतकेंच चंचल आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२३७ न मोक्षो नभसः पृष्ठे न पाताले न भूतले ।
मोक्षो हि चेतो विमलं सम्यग्ज्ञानविबोधितम् ५।७३।३५

मोक्ष हा कांहीं कोठें आकाशांत, पाताळांत किंवा पृथ्वीवर आहे असें नाहीं, तर योग्य तऱ्हेचें ज्ञान होऊन झालेली मनाची निर्मल स्थिति म्हणजेच मोक्ष होय.

२३८ न मौर्ख्यादधिको लोके कश्चिदस्तीह दुःखदः॥५।२९।५७

या लोकांत मूर्खपणापेक्षां अधिक दुःखदायक असें कांहीं नाहीं.

२३९ न वैराग्यात्परो बन्धुर्न संसारात्परो रिपुः॥६।१२७।५९

वैराग्याहून श्रेष्ठ दुसरा बंधु नाहीं व संसाराहून दुसरा शत्रु नाहीं.

२४० न व्याधिर्न विषं नापत्तथा नाधिश्च भूतले ।
खेदाय स्वशरीरस्थं मौर्ख्यमेकं यथा नृणाम्॥२।१३।१३

स्वतःच्या मूर्खपणामुळें जितकें दुःख भोगावें लागतें, तितकें दुःख मानसिक चिंता, शारीरिक पीडा, विष व आपत्ति यांच्यापासूनहीं भोगावें लागत नाहीं.

२४१ न शास्त्रैर्नापि गुरुणा दृश्यते परमेश्वरः ।
दृश्यते स्वात्मनैवात्मा स्वया सत्त्वस्थया धिया ६।११८।४

परमेश्वर शास्त्रें व गुरु यांच्या योगानें दिसत नाहीं. तर आपल्या स्वतःच्या सत्त्वस्थ बुद्धीनेंच त्याचें दर्शन होतें.

२४२ नष्टं नष्टमुपेक्षेत प्राप्तं प्राप्तमुपाहरेत् ।
निर्विकारतयैतद्धि परमार्चनमात्मनः ॥ ६।३९।४४

जें जें नष्ट झालें असेल त्याची उपेक्षा करणें आणि जें जें यदृच्छेनें प्राप्त होईल त्याचा स्वीकार करण या दोन्ही गोष्टी निर्विकार चित्तानें कराव्या, म्हणजे हेंच आत्म्याचें श्रेष्ठ पूजन होईल.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२४३ न सज्जनाद्दूरतरः क्वचिद्भवे-
भजेत साधून्विनयक्रियान्वितः ।
स्पृशन्त्ययत्नेन हि तत्समीपगं
विसारिणस्तद्गतपुष्परेणवः ॥ ७।९८।२४

सज्जनांपासून केव्हांही दूर राहूं नये, नम्रतापूर्वक त्यांची सेवा करावी. कारण, सज्जनांच्याजवळ राहणाराला त्यांच्या गुणरूपी पुष्पांतील पसरणाऱ्या रजःकणाचा लाभ अनायासें होतो.

२४४ न स्तौमि न च निन्दामि क्वचित्किंचित्कदाचन ।
आत्मनोऽन्यस्य वा साधो तेनाहं शुभमागतः ६।२६।१३

(भुशुंड श्रीवसिष्ठांना म्हणतो) मी केव्हांही व कोठेंही थोडी-सुद्धां आपली स्तुति करीत नाहीं व दुसऱ्याची निंदा करीत नाहीं त्यामुळें मला कल्याणकारक स्थिति प्राप्त झाली आहे.

२४५ न स्वकर्म विना श्रेयः प्राप्नुवन्तीह मानवाः ॥ ५।४८।६९

स्वकर्माचें अनुष्ठान केल्याशिवाय मनुष्यांना या जगांत श्रेयःप्राप्ति होत नाहीं.

२४६ न स्वधैर्यादृते कश्चिदभ्युद्धरति संकटात् ॥ ५।२१।१०

स्वतःच्या धैर्यावांचून आपणाला संकटांतून कोणीही पार पाडणार नाहीं.

२४७ न हि चन्द्रं विना शुद्धा सविकासा कुमुद्वती ॥ २।१२।६

चंद्रावांचून श्वेत कमलिनी विकास पावत नाहीं.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२४८ न हि जानाति दुर्बुद्धि-
विनाशं प्रत्युपस्थितम् ॥ ३।१०२।३६

दुर्बुद्धि असलेल्या मनुष्याला आपल्या पुढें येऊन ठेपलेला स्वतःचा नाश समजून येत नाहीं.

२४९ न हि तज्ज्ञस्य शान्तस्य ममाहमिति विद्यते ॥ ७।३०।२

तत्त्वज्ञ आणि शांत मनुष्याचे ठिकाणीं ‘मी’ आणि ‘माझें’ असे दोन्ही भाव नसतात.

२५० न हि पर्यनुयोक्तव्याः स्वप्नविभ्रमरीतयः ।
न तदस्ति जगत्यस्मिन् यन्न संभवति भ्रमे ॥६।६१।१६

परमात्म्याची माया अघटितघटना करण्यांत मोठी पटाईत आहे, त्यामुळें या जगांत स्वप्न, भ्रम इत्यादिकांप्रमाणें ‘असें कसें होऊं शकेल’ असें म्हणतांच येत नाहीं. जें भ्रमांत संभवत नाहीं, असें या जगांत कांहीं नाहीं.

२५१ न हि सत्त्ववतामस्ति दुःसाध्यमिह किंचन ॥ ३।८२।२९

उद्योगी लोकांना मिळविण्यास कठीण असें या जगांत कांहींएक नाहीं.

२५२ ना यथा यतते नित्यं यद्भावयति यन्मयः ।
यादृगिच्छेच्च भवितुं तादृग्भवति नान्यथा ॥७।१५७।३१

मनुष्य नित्य ज्यासाठीं अगदीं तन्मय होऊन अनन्य भावानें प्रयत्न करतो व जसें होण्याची इच्छा करतो, तसाच तो होतो. एरवीं कधींही होत नाहीं.

२५३ नाशोऽपि सुखयत्यज्ञमेकवस्त्वतिरागिणम् ॥ ३।७०।२३

एखाद्या वस्तूवर आसक्त झालेल्या अज्ञ मनुष्याला स्वतःचा नाश झाला तरी तो सुद्धां सुखदायकच वाटतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२५४ नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
यत्तु नास्ति स्वभावेन कः क्लेशस्तस्य मार्जने ॥३।७।३८

जें असत् आहे, त्याला कधीं अस्तित्वच नाहीं, आणि जें सत् आहे त्याचा केव्हांही अभाव होऊं शकत नाहीं. म्हणून जें वस्तुतः नाहीं, तें नाहींसें करण्याला क्लेश कसले ?

२५५ नासिधारा न वज्रार्चिर्न तप्तायःकणार्चिषः ।
तथा तीक्ष्णा यथा ब्रह्मंस्तृष्णेयं हृदि संस्थिता॥१।१७।४८

( राम श्रीवसिष्ठांना म्हणतो ) मनुष्याच्या हृदयामध्यें राहणारी तृष्णा ही जितकी तीक्ष्ण असते, तितकी तरवारीची धार, वज्राचें तेज किंवा तापलेल्या लोखंडांतून बाहेर पडणाऱ्या ठिणग्या तीक्ष्ण नसतात.

२५६ नास्ति शत्रुः प्रकृत्यैव न च मित्रं कदाचन ।
सुखदं मित्रमित्युक्तं दुःखदाः शत्रवः स्मृताः॥५।५३।५८

कोणी कोणाचा मूळचाच शत्रु नाहीं, व मूळचाच मित्रही नाहीं. सुख देणारा तो मित्र, व दुःख देणारा तो शत्रु, असेंच मानलें जातें.

२५७ नाहं देहस्य नो देहो मम नायमहं तथा ।
इति विश्रान्तचित्ता ये ते मुने पुरुषोत्तमाः १।१८।५३

( राम श्रीवसिष्ठांना म्हणतो ) 'मी देहाचा कोणीं नाहीं, देह माझा कोणी नाहीं, व हा देह हें माझें खरें स्वरूप नव्हे,' या भावनेनें जे मनुष्य परमात्मस्वरूपांत स्थिर होतात, तेच उत्तम पुरुष होत.

२५८ नित्यं सज्जनसंपर्काद्विवेक उपजायते ।
विवेकपादपस्यैव भोगमोक्षौ फले स्मृतौ ॥ २।११।५८

सज्जनांचा सहवास केल्यानें विवेक अवश्य उत्पन्न होतो, व भोग आणि मोक्ष हीं त्या विवेकरूपी वृक्षाचींच फळें आहेत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२५९ नित्याशुचेऽप्रियजने भषणैकनिष्ठ
रथ्यान्तरभ्रमणनीतसमस्तकाल ।
कौलेयकाशयसमानतयैव मन्ये
मूर्खेण केनचिदहो बत शिक्षितोऽसि ॥७।११६।५८

हे कुत्र्या, तुझ्यामध्यें आपल्यासारखेच गुण आहेत असें पाहून, नित्य अपवित्रता, अप्रिय जनांवर भों भों करणें, रस्त्यांतून फिरत सारा वेळ फुकट घालविणें, इत्यादि गुण कोणी मूर्खानें तुला शिकविले आहेत असें मला वाटतें. (अर्थात् तुझ्यापेक्षां तुझ्या गुरूमध्यें असले गुण अधिक असले पाहिजेत.)

२६० निरिच्छतैव निर्वाणं सेच्छतैव हि बन्धनम् ॥७।३६।३८

इच्छा नसणें हाच मोक्ष होय. आणि इच्छा असणें हाच बंध होय.

२६१ निर्दयः कठिनः क्रूरः कर्कशः कृपणोऽधमः ।
न तदस्ति यदद्यापि न कालो निगिरत्ययम् ॥१।२३।९

काल हा निर्दय, कठीण, क्रूर, कर्कश, कृपण आणि अधम आहे. काळ हा ज्याला गिळून टाकीत नाहीं. असें अद्यापि कांहींच नाहीं.

२६२ निर्मले मुकुरे वक्रमयत्नेनैव बिम्बति ॥ २।२।१९

स्वच्छ आरशामध्यें तोंडाचें प्रतिबिंब सहज रीतीनें पडतें.

२६३ निर्वासनं जीवितमेव मोक्षः ॥७।१७७।४३

जीवित वासनारहित असणें हाच मोक्ष होय.

२६४ निःसंकल्पो यथाप्राप्तव्यवहारपरो भव ॥ ४।५३।४७

(दाशूर तपस्वी आपल्या पुत्राला म्हणतो.) संकल्परहित होऊन प्राप्त झालेला व्यवहार योग्य रीतीनें करीत जा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२६५ नैर्घृण्यमस्थैर्यमथाशुचित्वं
रथ्याचरत्वं परिकुत्सितत्वम् ।
श्वभ्यो गृहीतं किमु नाम मूर्खै-
र्मूर्खेभ्य एवाथ शुना न जाने ॥ ७।११६।५४

निर्दयता, चंचलता, अपवित्रता, रस्त्यांतून व्यर्थ भटकणें, निंद्य असणें हे धर्म मूर्खांनीं कुत्र्यांपासून घेतले, किंवा कुत्रे मूर्खांपासून शिकले हें नक्की समजत नाहीं.

२६६ नैवास्त्यसौ जगति यः परदुःखशान्त्यै
प्रीत्या निरन्तरतरं सरलं यतेत ॥ ७।११९।३

दुसऱ्याचें दुःख नाहींसें करण्यासाठीं मनापासून निरंतर योग्य रीतीनें झटणारा या जगामध्यें कोणीही नाहीं.

२६७ नोदेति नास्तमायाति सुखे दुःखे मुखप्रभा ।
यथाप्राप्तस्थितेर्यस्य जीवन्मुक्तः स उच्यते ॥ ३।९।६

सुखाचे वेळीं ज्याच्या तोंडावरील तेज वाढत नाहीं, आणि दुःखाचे वेळीं तें कमी होत नाहीं. याप्रमाणें प्राप्त स्थितीमध्यें जो निर्विकार असतो तोच जीवन्मुक्त होय.

२६८ नोद्विजन्ते स्वकार्येषु जना अध्यवसायिनः ॥६।८८।१९

निश्चयी लोक आपल्या कार्याविषयीं कधीं उद्विग्न होत नाहींत.

२६९ नोपपन्नं हि यद्यत्र तत्र तन्न विराजते ।
मध्ये काचकलापस्य महामूल्यो मणिर्यथा ॥५।३२।२८

जें ज्या ठिकाणीं योग्य नसतें, तें त्या ठिकाणीं शोभतही नाहीं. काचेच्या मण्यांच्या ढिगांत महामूल्यवान् रत्न कसें शोभणार ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२७० पथिकाः पथि दृश्यन्ते रागद्वेषविमुक्तया ।
यथा धिया तथैवैते द्रष्टव्याः स्वेन्द्रियादयः ॥६।११८।५

प्रवासी ज्या मार्गानें जातात, त्या मार्गावर आसक्ति ठेवीत नाहींत त्याप्रमाणें आपल्या देहेंद्रियादिकांस रागद्वेषरहित बुद्धीनें पाहावें.

२७१ पदमतुलमुपैतुमिच्छतोच्चैः
प्रथममियं मतिरेव लालनीया ।
फलमभिलषता कृषीवलेन
प्रथमतरं ननु कृष्यते धरैव ॥ ५।१२।४०

चांगल्या पिकाची इच्छा करणारा शेतकरी प्रथम जमीन नांगरून तिची उत्तम मशागत करतो, त्याप्रमाणें अतुल अशा परमात्मपदाच्या प्राप्तीची इच्छा करणाऱ्या पुरुषानें प्रथम विवेकाच्या योगानें आपली बुद्धि शुद्ध करावी.

२७२ परं विवर्धनं बुद्धेरज्ञानतरुशातनम् ।
समुत्सारणमाधीनां विद्धि साधुसमागमम् ॥ २।१६।५

(श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात) साधूंचा समागम बुद्धीची वाढ करतो, अज्ञानरूपी वृक्षाला तोडून टाकतो आणि सर्व मानसिक दुःखें नाहींशीं करतो.

२७३ परं विषयवैतृष्ण्यं समाधानमुदाहृतम् ।
आहृतं येन तन्नूनं तस्मै नृब्रह्मणे नमः ॥ ७।४५।४६

विषयांविषयीं अत्यंत वैराग्य हेंच समाधान आहे. तें ज्यानें संपादन केलें आहे, त्या मनुष्यरूपी ब्रह्माला नमस्कार असो.

२७४ परमपदप्रतिमो हि साधुसङ्गः ॥ ५।६१।४८

सत्पुरुषांच्या सहवासाची योग्यता प्रत्यक्ष मोक्षसुखाइतकी आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२७५ परं पौरुषमाश्रित्य दन्तैर्दन्तान्विचूर्णयन् ।
शुभेनाशुभमुद्युक्तं प्राक्तनं पौरुषं जयेत् ॥ २।५।९

दांतांनीं दांतांचें चूर्ण होईल इतक्या जोरानें शास्त्रीय प्रयत्न करून अनर्थ उत्पन्न करणाऱ्या पूर्वीच्या कर्मांचा पाडाव करावा.

२७६ परस्परेच्छाविच्छित्तिर्न हि सौहार्दबन्धनी ॥ ३।५५।७२

परस्परांच्या इच्छांचा भंग झाला असतां खरी मैत्री टिकत नाहीं.

२७७ परस्परेप्सितस्नेहो दुर्लभो हि जगत्त्रये ॥ ६।१०८।२१

परस्परांना इष्ट असलेला, अर्थात् कृत्रिम नसलेला, स्नेह त्रैलोक्यांत दुर्लभ आहे.

२७८ परामृश्य विवेकेन संसाररचनामिमाम् ।
वैराग्यं येऽधिगच्छन्ति त एव पुरुषोत्तमाः २।११।२६

या संसाररचनेचा विवेकानें विचार करून ज्यांना वैराग्य उत्पन्न होतें, ते खरोखर उत्तम पुरुष होत.

२७९ परायणं हि प्रभवः संदेहेष्वनुजीविनाम् ॥ ३।२।१६

सेवकांना कोणतेंही संकट उत्पन्न झालें असतां, त्याप्रसंगीं धनी हाच त्यांचा मुख्य आधार होय.

२८० परिज्ञातोपभुक्तो हि भोगो भवति तुष्टये ।
विज्ञाय सेवितो मैत्रीमेति चोरो न शत्रुताम् ॥४।२३।४१

अमुक चोर आहे, असें पक्कें ज्ञान झाल्यावर त्याच्याशीं वागतांना सावधपणा ठेवतां येतो, यामुळें स्नेहभाव जुळतो, वैरभाव राहात नाहीं. त्याप्रमाणें विषयांचें वास्तविक स्वरूप ओळखून, ते योग्य रीतीनें सेवन करणाराला त्यांची बाधा होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२८१ परोपकारकारिण्या परार्तिपरितप्तया ।
बुद्ध एव सुखी मन्ये स्वात्मशीतलया धिया॥१।२६।३९

(राम श्रीवसिष्ठांना म्हणतो) परोपकार करणारी, दुसऱ्याच्या दुःखानें दुःखित होणारी व आत्मज्ञानानें तृप्त झालेली अशी बुद्धि ज्या ज्ञानी पुरुषाची आहे, तो खरा सुखी असें मला वाटतें.

२८२ पापस्य हि भयाल्लोको राम धर्मे प्रवर्तते ॥ ५।७५।३७

(श्रीवसिष्ठ म्हणतात) हे रामा, पापाच्या भयानेंच लोकांची धर्माकडे प्रवृत्ति होत असते.

२८३ पीताशेषविवेकाम्बुः शरीराम्भोधिवाडवः ।
न निर्दहति यं कोपस्तं मृत्युर्न जिघांसति ॥ ६।२३।९

ज्यानें विवेकरूपी सर्व उदक पिऊन टाकलें आहे, असा शरीररूपी समुद्रांतील क्रोधरूपी वडवाग्नि ज्याला जाळीत नाहीं, त्याला ठार मारण्याची इच्छा मृत्यु करीत नाहीं.

२८४ पुण्यानि यान्ति वैफल्यं
वैफल्यं यान्ति मातरः ।
भाग्यानि यान्ति वैफल्यं
नाभ्यासस्तु कदाचन ॥७।६७।३२

'मीं अमुक पुण्य केलें' असें आपल्या तोंडानें दुसऱ्यास सांगितलें असतां तें पुण्य व्यर्थ जातें. प्रसंगीं मातेचा व ऐश्वर्याचाही उपयोग होत नाहीं, परंतु अभ्यास हा कधींही फुकट जात नाहीं.

२८५ पुत्रमित्रकलत्रादि तृष्णया नित्यकृष्टया ।
खगेष्विव किरात्येदं जालं लोकेषु रच्यते ॥ १।१७।१५

भिल्लीण पक्ष्यांना पकडण्याकरितां जाळें तयार करते, त्याप्रमाणें मनुष्यांना नेहमीं आकर्षण करणारी तृष्णा ही पुत्र, मित्र, स्त्री इत्यादिकांचें जाळें तयार करते.

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२८६ पुरुषार्थात्फलप्राप्तिर्देशकालवशादिह ।
प्राप्ता चिरेण शीघ्रं वा यासौ दैवमिति स्मृता ॥२।७।२१

पुरुषप्रयत्नानेंच होणारी फलप्राप्ति देश व काल यांच्या परिस्थितीप्रमाणें लवकर किंवा उशिरां होत असते. यालाच दैव असें म्हणतात.

२८७ पूजनं ध्यानमेवान्तर्नान्यदस्त्यस्य पूजनम् ।
तस्मात्त्रिभुवनाधारं नित्यं ध्यानेन पूजयेत् ॥ ६।३८।६

परमेश्वराचें अंतःकरणांत ध्यान करणें हेंच त्याचें मुख्य पूजन होय. त्याहून दुसरें पूजन नाहीं. यासाठीं त्रिभुवनाचा आधार जो परमात्मा, त्याचें ध्यानाच्या योगानें नेहमीं पूजन करावें.

२८८ पूर्णस्तु प्राकृतोऽप्यन्यत् पुनरप्यभिवाञ्छते ।
जगत्पूरणयोग्याम्बुर्गृह्णात्येवार्णवो जलम् ॥ ४।२३।५५

सर्व जगाला बुडवून टाकतां येईल, इतका पाण्याचा सांठा ज्यांत भरलेला आहे, असा समुद्र देखील तेवढ्यानें तृप्त न होतां जास्त जास्त पाणी सांठवीत असतो; त्या प्रमाणें प्राकृत मनुष्य कितीही श्रीमान् असला, तरी अधिकाधिक संपत्तीची हाव बाळगीतच असतो.

२८९ पूर्वसिद्धस्वभावोऽयमादेहं न निवर्तते ॥ ३।८२।४०

देह पडेपर्यंत पूर्वसिद्ध स्वभाव पालटत नाहीं.

२९० पूर्वापरविचारार्थचारुचातुर्यशालिनी ।
सविकासा मतिर्यस्य स पुमानिह कथ्यते ॥ २।११।७२

पूर्वापर विचार आणि कोणताही सूक्ष्म अर्थ उत्तम रीतीनें ग्रहण करण्याचें चातुर्य जिला आहे, अशी विकास पावलेली बुद्धि ज्याचे ठिकाणीं आहे तोच खरा मनुष्य समजावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**२९१ पौनःपुन्येन करणमभ्यास इति कथ्यते ।**
**पुरुषार्थः स एवेह तेनास्ति न विना गतिः ।। ७।६७।४३**

पुन्हा पुन्हा तेंच तेंच करणें याला अभ्यास असें म्हणतात, हाच पुरुषार्थ होय. या अभ्यासावांचून मनुष्याला दुसरा मार्ग नाहीं.

**२९२ पौरुषं सर्वकार्याणां कर्तृ राघव नेतरत् ।**
**फलभोक्तृ च सर्वत्र न दैवं तत्र कारणम् ।। २।९।२**

( श्रीवसिष्ठ म्हणतात ) हे राघवा; कर्तृत्व आणि भोक्तृत्व यांचा संबंध मनुष्याच्या प्रयत्नाकडे आहे; दैवाचा त्याच्याशीं कांहींएक संबंध नाहीं.

**२९३ पौरुषं स्पन्दफलवद्दृष्टं प्रत्यक्षतो न यत् ।**
**कल्पितं मोहितैर्मन्दैर्दैवं किंचिन्न विद्यते ।। २।४।१०**

मनुष्यानें प्रयत्नपूर्वक एखादें कार्य केलें असतां, त्याचा परिणाम प्रत्यक्ष दृष्टीस पडतो. परंतु दैव प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळें ती केवळ मंदबुद्धीच्या मूर्ख लोकांची कल्पना आहे.

**२९४ पौरुषस्य महत्त्वस्य सत्त्वस्य महतः श्रियः ।**
**इन्द्रियाक्रमणं साधो सीमान्तो महतामपि ।। ७।६।४१**

( विद्याधर भुशुंडाला म्हणतो ) इंद्रियांवर आपला पगडा बसविण्यासाठीं महात्म्यांनाही आपलें पौरुष, महत्त्व, मोठें धैर्य व शांतिरूपी संपदा यांची पराकाष्ठा करावी लागते.

**२९५ पौरुषाद्दृश्यते सिद्धिः पौरुषाद्धीमतां क्रमः ।**
**दैवमाश्वासनामात्रं दुःखे पेलवबुद्धिषु ।। २।७।१५**

कार्यसिद्धि उद्योगानें होते. ज्ञाते पुरुष आपला वर्तनक्रम पौरुषाच्याच योगानें चालवितात. दुबळ्या बुद्धीच्या लोकांना दुःखाचे वेळीं समाधानासाठीं दैवाचा उपयोग होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२९६ पौरुषेण प्रयत्नेन त्रैलोक्यैश्वर्यसुन्दराम् ।
कश्चित्प्राणिविशेषो हि शक्रतां समुपागतः ॥ २।४।१३

पौरुषप्रयत्नाचा अवलंब करून कोणा एका मनुष्यानें त्रैलोक्याच्या ऐश्वर्यानें युक्त असलेलें श्रेष्ठ इंद्रपद प्राप्त करून घेतलें.

२९७ पौरुषेणान्नमाक्रम्य यथा दन्तेन चूर्ण्यते ।
अन्यः पौरुषमाश्रित्य तथा शूरेण चूर्ण्यते ॥ २।६।१२

प्रयत्नानें अन्न मिळवून तोंडांत घातल्यानंतर त्याचें चर्वण दांतांनीं केलें जातें, त्याप्रमाणें पौरुषाचाच आश्रय करून शूर मनुष्य दुबळ्या लोकांचें मर्दन करतो.

२९८ प्रज्ञया नखरालूनमत्तवारणयूथपाः ।
जम्बुकैर्विजिताः सिंहाः सिंहैर्हरिणका इव ॥ ५।१२।३१

आपल्या भयंकर पंजांनीं मस्त हत्तीच्या कळपांतील मुख्य हत्तींना फाडून टाकणाऱ्या बलाढ्य सिंहांनाही कोल्ह्यांनीं, आपल्या बुद्धीच्या बळावर सिंहांनीं हरणांना सहज जिंकावें, त्याप्रमाणें अनेक वेळां जिंकलें आहे.

२९९ प्रज्ञावानसहायोऽपि कार्यान्तमधिगच्छति ।
दुष्प्रज्ञः कार्यमासाद्य प्रधानमपि नश्यति ॥ ५।१२।२३

बुद्धिमान् मनुष्याला कोणत्याही प्रकारची मदत नसली तरी तो मोठमोठीं कार्यें करतो. पण बुद्धि नसलेल्या मनुष्याला केवढेंही मोठें साहाय्य असलें तरी त्याच्या मुख्य कार्याचाच नाश होतो.

३०० प्रज्ञासौजन्ययुक्तेन शास्त्रसंवलितेन च ।
पौरुषेण न यत्प्राप्तं न तत्क्वचन लभ्यते ॥ ६।२९।९

शास्त्रीय मार्गानें विचार करणारी बुद्धि, सौजन्य व पौरुषप्रयत्न यांच्या योगानें प्राप्त होत नाहीं, अशी कुठेंही वस्तू नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३०१ प्रत्यक्षमानमुत्सृज्य योऽनुमानमुपेत्यसौ ।
स्वभुजाभ्यामिमौ सर्पाविति प्रेक्ष्य पलायते ॥२।५।१९

प्रत्यक्ष ज्याचें फळ दिसत आहे अशा पौरुषप्रयत्नाचा त्याग करून, केवळ अनुमानानें सिद्ध होणाऱ्या दैवाचा आश्रय जो मनुष्य करतो, तो आपल्याच हातांना सर्प मानून पळूं लागतो, असें म्हणण्यास काय हरकत आहे ?

३०२ प्रभुताबृंहितं चेतो नाहार्यमभिनन्दति ॥ ५।४६।६

ज्याच्या ठिकाणीं प्रभुत्व आलें आहे, व अधिकार चालविण्याचें सामर्थ्य आहे, त्याला कृत्रिम भूषणादिकांचें काय महत्त्व आहे.

३०३ प्रवाहपतितं कार्यं कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ४।५६।३४

प्रवाहपतित कार्य करणारा दोषांपासून अलिप्त असतो.

३०४ प्राक्तनं चैहिकं चेति द्विविधं विद्धि पौरुषम् ।
प्राक्तनोऽद्यतनेनाशु पुरुषार्थेन जीयते ॥ २।४।१७

पूर्वीचें व हल्लींचें असें दोन प्रकारचें पौरुष आहे. या जन्मांत मनुष्यानें नेटानें प्रयत्न केला असतां पूर्वजन्मांतील पौरुष नाहींसें करून टाकितां येतें.

३०५ प्राक्स्वकर्मेतराकारं दैवं नाम न विद्यते ।
बालः प्रबलपुंसेव तज्जेतुमिह शक्यते ॥ २।६।४

आपणच पूर्वी केलेल्या कर्माशिवाय दैव म्हणून कांहीं निराळी वस्तु नाहीं; इतकेंच नव्हे तर शक्तिमान् मनुष्य एखाद्या लहान मुलाला आपल्या कह्यांत ठेवतो, त्याप्रमाणें पूर्वीच्या दुष्टसंस्कारांना सध्यां केलेल्या प्रयत्नांनीं जिंकून टाकतां येणें अगदीं शक्य आहे.

३०६ प्राज्ञं प्राप्य न पृच्छन्ति ये केचित्ते नराधमाः ३।७८।३३

विद्वानाची गांठ पडली असतां प्रश्न विचारून जे आपला संशय नाहींसा करून घेत नाहींत, ते केवळ नराधम होत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३०७ प्राप्तकालं कृतं कार्यं राजते नाथ नेतरत् ।
वसन्ते राजते पुष्पं फलं शरदि राजते ॥ ६।८४।२२

( चूडाला शिखिध्वज पतीला म्हणते ) योग्य समयीं केलेलेंच कार्य शोभतें. दुसरें शोभत नाहीं. वसंतऋतूमध्यें फूल शोभतें आणि शरदृतूंत फळ शोभतें.

३०८ प्राप्तेन येन नो भूयः प्राप्तव्यमवशिष्यते ।
तत्प्राप्तौ यत्नमातिष्ठेत्कष्टयापि हि चेष्टया ॥७।६।३१

जें मिळविलें असतां पुन्हां कांहींएक मिळवावयाचें उरणार नाहीं, असेंच पद मिळविण्याविषयीं जोराचा प्रयत्न करावा. मग त्यामध्यें कितीही कष्ट पडले तरी चालतील.

३०९ प्रामाणिकस्य तज्ज्ञस्य वक्तुः पृष्टस्य यत्नतः ।
नानुतिष्ठति यो वाक्यं नान्यस्तस्मान्नराधमः २।११।४६

प्रमाणशुद्ध भाषण करणाऱ्या तज्ज्ञ मनुष्याला प्रश्न केल्यानंतर जो त्याच्या वचनाप्रमाणें वागत नाहीं, त्याच्यापेक्षां अधम मनुष्य दुसरा कोणीही नाहीं.

३१० प्रायः परपरित्राणमेव कर्म निजं सताम् ॥ ३।२६।२०

दुसऱ्याचें रक्षण करण्यासाठींच सत्पुरुषांच्या हातून कोणतेंही कर्म होत असतें.

३११ बद्धो हि वासनाबद्धो मोक्षः स्याद्वासनाक्षयः ४।५७।१९

जो वासनेनें बद्ध असतो, तोच खरा बद्ध; आणि ज्याचा वासनाक्षय झाला, तोच मुक्त समजावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३१२ बन्धमुक्तो महीपालो ग्राममात्रेण तुष्यति ।
परैरबद्धो नाक्रान्तो न राज्यं बहु मन्यते ॥ ४।२३।५७

अटकेंत असलेला राजा मोकळा झाल्यावर त्याला जरी एखादा गांव मिळाला तरी तेवढ्यानें तो संतुष्ट होतो. परंतु ज्याला शत्रूंनीं बद्ध केलें नाहीं व ज्याच्यावर कोणाचा ताबा नाहीं अशा राजाला राज्य देऊं केलें, तरी सुद्धां त्याचें त्याला कांहींच महत्त्व वाटत नाहीं.

३१३ बलं बुद्धिश्च तेजश्च क्षयकाल उपस्थिते ।
विपर्यस्यति सर्वत्र सर्वथा महतामपि ॥ ७।१४०।६

नाश होण्याची वेळ आली म्हणजे सर्वठिकाणीं सर्वप्रकारें मोठमोठ्यांचीही बुद्धि विपरीत होते, बळ चालेनासें होतें, व तेज लोपून जातें.

३१४ बहुनात्र किमुक्तेन संक्षेपादिदमुच्यते ।
संकल्पनं परो बन्धस्तदभावो विमुक्तता ॥ ६।१२६।९७

अधिक बोलून काय करावयाचें आहे ? थोडक्यांत सांगावयाचें हें कीं, संकल्प करणें हाच मोठा बंध होय, व संकल्परहित असणें हाच मोक्ष होय.

३१५ बाल्यमल्पदिनैरेव यौवनश्रीस्ततो जरा ।
देहेऽपि नैकरूपत्वं कास्था बाह्येषु वस्तुषु ॥ १।२८।३७

बाल्यदशेनंतर थोडक्याच दिवसांनीं तारुण्य, व नंतर म्हातारपण अशा भिन्न दशा प्रत्यक्ष देहाचे ठिकाणीं दिसून येतात; मग बाह्य वस्तु एकरूप राहतील असा भरंवसा ठेवण्यांत काय अर्थ आहे ?

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३१६ बीजात्कारणतः कार्यमङ्कुरः किल जायते ।
न बीजमपि यत्रास्ति तत्र स्यादङ्कुरः कुतः॥७।५७।१२

कारणापासून कार्य उत्पन्न होतें. या नियमाप्रमाणें बीजापासून अंकुर उत्पन्न होतो. परंतु ज्या ठिकाणीं बीजच नाहीं तेथें अंकुर कसा उत्पन्न होईल ?

३१७ बीभत्सं विषयं दृष्ट्वा को नाम न विरज्यते ।
सतामुत्तमवैराग्यं विवेकादेव जायते ॥ २।११।२३

बीभत्स विषय पाहून त्यांच्याबद्दल कोणाला तिटकारा वाटणार नाहीं ? परंतु सत्पुरुषांचे ठिकाणीं जें उत्कृष्ट वैराग्य असतें तें विवेकामुळें उत्पन्न होतें.

३१८ भवत्यखिलजन्तूनां यदन्तस्तद्बहिः स्थितम् ॥५।५६।३४

कोणत्याही प्राण्याच्या अंतःकरणांत ज्याविषयीं विचार चालू असतो त्याप्रमाणेंच त्याला बाह्य जगांत दिसत असतें.

३१९ भविष्यं नानुसंधत्ते नातीतं चिन्तयत्यसौ ।
वर्तमाननिमेषं तु हसन्नेवानुवर्तते ॥ ५।१२।१४

जनक राजा भावी गोष्टींची चिंता वहात नसे. आणि गत गोष्टींचें स्मरण करीत नसे. तसेंच वर्तमानकाळीं सर्व व्यवहार आनंदानें करीत असे.

३२० भारोऽविवेकिनः शास्त्रं भारो ज्ञानं च रागिणः ।
अशान्तस्य मनो भारो भारो नात्मविदो वपुः॥१।१४।१३

अविवेकी मनुष्याला शास्त्र, विषयी मनुष्याला ज्ञान व रागीट मनुष्याला मन हें भारभूत वाटतें. परंतु आत्मज्ञान झालेल्या मनुष्याला शरीर हें भारभूत होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३२१ भूतानि सन्ति सकलानि बहूनि दिक्षु
बोधान्वितानि विरलानि भवन्ति किंतु ।
वृक्षा भवन्ति फलपल्लवजालयुक्ताः ।
कल्पद्रुमास्तु विरलाः खलु संभवन्ति ॥ ७।९७।४७

पानें, फळें यांनीं भरून गेलेले सामान्य वृक्ष सर्वत्र आढळतात. परंतु कल्पवृक्ष सर्वत्र दिसत नाहींत. त्याप्रमाणें मोहांत गुरफटून गेलेले लोक सर्व ठिकाणीं दृष्टीस पडतात, परंतु ज्ञानसंपन्न लोक अगदीं क्वचित्‌च आढळतात.

३२२ भोगेच्छामात्रको बन्धस्तत्त्यागो मोक्ष उच्यते॥४।३५।३

विषयोपभोगांची इच्छा असणें हाच बंध, आणि भोगेच्छा नसणें हाच मोक्ष होय.

३२३ भोगेष्वस्वदमानेषु पुंसः श्रेयः पुरो गतम्॥ ४।३३।६९

ज्याला विषयोपभोगांचा अत्यंत तिटकारा आला, त्याच्या पुढें मोक्ष हात जोडून उभा आहे !

३२४ मत्त ऐरावतो बद्धः सर्षपस्येव कोटरे ।
मशकेन कृतं युद्धं सिंहौघैरणुकोटरे ॥ ३।२०।९
पद्माक्षे स्थापितो मेरुर्निगीर्णो भृङ्गसूनुना ।
स्वप्नाब्दगर्जितं श्रुत्वा चित्रं नृत्यन्ति बर्हिणः३।२०।१०

( असमंजस विधानें ) एकाद्या मत्तहत्तीला मोहरीच्या गाभ्यांत बांधून ठेवलें, एखाद्या चिलटान परमाणूच्या पोटांत सिंहांच्या कळपाबरोबर युद्ध केलें, एखाद्या कमलाच्या बीजामध्यें मेरुपर्वत सांठविला व तो एखाद्या लहानशा भुंग्यानें गिळून टाकला, स्वप्नांतील मेघांची गर्जना ऐकून चित्रांतील मोर नाचूं लागले.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३२५ मन एव समर्थं वो मनसो दृढनिग्रहे ।**
**अराजा कः समर्थः स्याद्राज्ञो राघव निग्रहे॥३।११२।१९**

(श्रीवसिष्ठ म्हणतात) श्रोतृजनहो, तुमच्या मनाचा दृढनिग्रह करण्याला तुमचें मनच समर्थ आहे. हे राघवा, राजाचा निग्रह करण्याला जो राजा नाहीं, असा कोणता सामान्य मनुष्य समर्थ होईल?

**३२६ मनःकृतं कृतं लोके न शरीरकृतं कृतम् ॥ ३।८९।१**

मनानें जें केलें तेंच खरोखर केलेलें असें समजावें; केवळ शरीरानें केलें, तें केलें असें म्हणतां येत नाहीं.

**३२७ मनो हि न जडं राम नापि चेतनतां गतम् ॥ ३।९६।३७**

(श्रीवसिष्ठ म्हणतात) हे रामा, मन हें धड जडही नाहीं, आणि चेतनही नाहीं.

**३२८ मरणस्य मुने राज्ञो**
**जराधवलचामरा ।**
**आगच्छतोऽग्रे निर्याति**
**स्वाधिव्याधिपताकिनी ॥ १।२२।३०**

(राम श्रीवसिष्ठांना म्हणतो) मरण हा एक राजा असून त्याची स्वारी आपल्याकडे येऊं लागली, म्हणजे त्याच्या अगोदर आधिव्याधिरूपी सेना बाहेर पडत असून जरारूपी पांढरी चवरी पुढें दिसूं लागते.

**३२९ महतां दर्शनं नाम न कदाचन निष्फलम् ॥३।२६।३९**

महात्म्यांचें दर्शन केव्हांही निष्फळ होत नाहीं.

**३३० महतामेव संपर्कात्पुनर्दुःखं न बाधते ।**
**को हि दीपशिखाहस्तस्तमसा परिभूयते ॥ ३।८२।८**

जळणारी मशाल हातांत असली म्हणजे अंधारांत चांचपडण्याचा कोणालाही प्रसंग येत नाहीं, त्याप्रमाणें महात्म्यांचा सहवास झाल्यावर कोणालाही दुःख भोगण्याचा प्रसंग येत नाहीं.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३३१ महाकर्ता महाभोक्ता महात्यागी भवानघ ।
सर्वाः शङ्काः परित्यज्य धैर्यमालम्ब्य शाश्वतम् ६।११५।१

( श्रीवसिष्ठ म्हणतात ) हे निष्पाप रामा, तूं सर्व शंका सोडून देऊन, शाश्वत धैर्याचा आश्रय करून, महाकर्ता, महाभोक्ता, व महात्यागी हो.

३३२ महाशनानामेकान्ते भोजनं हि सुखायते ॥ ३।८२।४४

पुष्कळ आहार करणारांना एकान्तांत भोजन करणें सुखावह होत असतें.

३३३ मांसपाञ्चालिकायास्तु
यन्त्रलोलेऽङ्गपञ्जरे ।
स्नाय्वस्थिग्रन्थिशालिन्याः
स्त्रियाः किमिव शोभनम् ॥ १।२१।१

यंत्रांतील निरनिराळे भाग अत्यंत चंचल असतात. त्याप्रमाणें स्त्रीच शरीर असून तें स्नायु, अस्थि इत्यादिकांनीं बनलेलें असतें. स्त्री केवळ मांसाची पुतळी असून तिच्यामध्यें रमणीय असें काय आहे ?

३३४ मुकुरे निर्मले द्रव्यमयत्नेनैव बिम्बति ॥ ७।७।४

स्वच्छ आरशामध्यें कोणत्याही वस्तूचें प्रतिबिंब सहज पडतें.

३३५ मुख्याङ्कुरं सुभग विद्धि मनो हि पुंसो
देहास्ततः प्रविसृतास्तरुपल्लवाभाः ।
नष्टेऽङ्कुरे पुनरुदेति न पल्लवश्री-
र्नैवाङ्कुरः क्षयमुपैति दलक्षयेषु ॥ ३।८९।५२

( इंद्रब्राह्मण इंद्रद्युम्न राजाला म्हणतो ) मनुष्याचें मन हाच संसारतरूचा मुख्य अंकुर आहे. आणि ह्या अंकुरापासून ससाररूपी वृक्षाला देहरूपी पालवी फुटत असते. मूळ अंकुरच नाहींसा झाला, तर झाडाला पुन्हा पालवी फुटत नाहीं; पण नुसतीं पानें गळून पडलीं असतां मूळ अंकुर नष्ट होत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३३६ मूढानुमानसंसिद्धं दैवं यस्यास्ति दुर्मतेः ।
दैवाद्दाहोऽस्ति नैवेति गन्तव्यं तेन पावके ॥ २।८।५

केवळ मूर्खपणाच्या अनुमानामुळें दैव आहे असें ज्याला वाटतें, त्यानें त्या दैवाची परीक्षा करण्याकरितां अग्नीमध्यें उडी टाकून आंगाचा दाह होतो किंवा नाहीं तें पहावें !

३३७ मूढैः प्रकल्पितं दैवं तत्परास्ते क्षयं गताः ।
प्राज्ञास्तु पौरुषार्थेन पदमुत्तमतां गताः ॥ २।८।१६

दैव ही केवळ मूर्खांची कल्पना आहे या दैवाच्या नादीं जे लागतात त्यांचा नाश होतो. ज्ञाते लोक उद्योगाच्या योगानें उत्तम पदाला जाऊन पोहोंचतात.

३३८ मूढोत्तारणमेवेह स्वभावो महतामिति ॥ ३।७६।१२

मूढ लोकांचा उद्धार करणें हाच महात्म्यांचा स्वभाव असतो.

३३९ मृतिर्गुणितिरस्कारो जीवितं गुणिसंश्रयः ॥ ३।७७।३१

गुणिजनांचा तिरस्कार म्हणजेच मृत्यु. आणि गुणिजनांचा आश्रय म्हणजेच खरें जीवित होय.

३४० मोक्षद्वारे द्वारपालाश्चत्वारः परिकीर्तिताः ।
शमो विचारः संतोषश्चतुर्थः साधुसंगमः ॥ २।११।५९

शम, विचार, संतोष आणि साधुसमागम हे मोक्षाच्या द्वारावरील चार द्वारपाल आहेत.

३४१ मोक्षः शीतलचित्तत्वं बन्धः संतप्तचित्तता ॥ ७।९५।२९

चित्त शांत असणें हा मोक्ष व चित्त संतप्त असणें हा बंध होय.

३४२ मोहनाशाय महतां वचो नो मोहवृद्धये ॥ ५।४९।६

महात्म्यांचें भाषण मोहाचा नाश करतें त्याची वाढ करीत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३४३ मौर्ख्यं हि बन्धनमवेहि परं महात्मन् ॥ ६।८९।३१

(चूडाला शिखिध्वजाला म्हणते) मूर्खपणा हें मोठें बंधन आहे असें समज.

३४४ य एव यत्नः क्रियते बाह्यार्थोपार्जने जनैः ।
स एव यत्नः कर्तव्यः पूर्वं प्रज्ञाविवर्धने ॥ ५।१२।२६

द्रव्यादि बाह्य पदार्थ मिळविण्यासाठीं मनुष्य जसा प्रयत्न करतो तसा जोराचा प्रयत्न प्रथमतः बुद्धि वाढविण्यासाठीं करावा.

३४५ यत्कृतं मनसा तात तत्कृतं विद्धि राघव ।
यत्त्यक्तं मनसा तावत्तत्त्यक्तं विद्धि चानघ ॥ ३।११०।१४

(श्रीवसिष्ठ म्हणतात) हे निष्पाप रामा, जें मनानें केलें तेंच खरोखर केलें असें जाण. आणि ज्याचा मनानें त्याग केला त्याचाच त्याग केला असें समज.

३४६ यत्नवद्भिर्दृढाभ्यासैः प्रज्ञोत्साहसमन्वितैः ।
मेरवोऽपि निगीर्यन्ते कैव प्राक्पौरुषे कथा ॥ २।४।१८

बुद्धिमान्, उत्साही, उद्योगी पुरुषांनीं प्रयत्नपूर्वक दृढ अभ्यास केला असतां, त्यांना मेरुपर्वत सुद्धां गडप करून टाकतां येतो, मग पूर्वजन्मांतील पौरुष नाहींसें करतां येईल, यांत नवल काय ?

३४७ यत्नेनापि पुनर्बद्धं केन वृन्तच्युतं फलम् ॥ ७।१२५।३२

देठापासून गळलेलें फळ पुन्हां कोणीतरी प्रयत्न करून देठाला पूर्वीप्रमाणें चिकटवूं शकेल काय ?

३४८ यत्सुखं दुःखमेवाहुः क्षणनाशानुभूतिभिः ।
अकृत्रिममनाद्यन्तं यत्सुखं तत्सुखं विदुः ॥ ७।६८।३१

क्षणांत नाश पावण्याचा अनुभव येत असल्यामुळें ज्ञाते लोक विषयसुखाला दुःखच असें म्हणतात. आणि जें स्वाभाविक, अनादि, अनंत असें आत्मस्वरूपाचें सुख त्यालाच खरें सुख म्हणतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३४९ यथाचारं यथाशास्त्रं यथाचित्तं यथास्थितम् ।
व्यवहारमुपादत्ते यः स आर्य इति स्मृतः ॥ ६।१२६।५५

वृद्धांचा आचार व शास्त्र यांच्या अनुरोधानें प्रसन्नचित्तानें यथास्थित कर्म करणारा व लौकिक व्यवहारही पाळणारा, त्याला आर्य असें म्हणतात.

३५० यथा देहोपयुक्तं हि करोत्यारोग्यमौषधम् ।
तथेन्द्रियजयेऽभ्यस्ते विवेकः फलितो भवेत् ॥४।१८।६६

औषध पथ्यपूर्वक सेवन केल्यानेंच आरोग्य प्राप्त होतें, त्याप्रमाणें इंद्रियजयाचा अभ्यास केला, तरच आत्मानात्मविवेक फलद्रूप होईल.

३५१ यथा न किंचित्कलयन्मञ्चके स्पन्दते शिशुः ।
तथा फलान्यकलयन्कुरु कर्माणि राघव ॥ ५।७०।२०

( श्रीवासिष्ठ म्हणतात. ) हे राघवा, एखादें लहान मूल कोणत्याही तऱ्हेचा संकल्प न करितां आनंदानें पलंगावर लोळत असतें; त्याप्रमाणें कर्मफलाचा मुळींच विचार न करतां तूं आपलीं प्राप्तकर्में करीत जा.

३५२ यथा नाशेन वा भाव्यं तथोदेत्यशुभा मतिः ॥ ३।७१।१७

जशा रीतीनें नाश व्हावयाचा असतो, तशा तऱ्हेची दुर्बुद्धि अगोदर उत्पन्न होते.

३५३ यथाप्राप्तं हि कर्तव्यमसक्तेन सदा सता ।
मुकुरेणाकलङ्केन प्रतिबिम्बक्रिया यथा ॥ ३।८८।११

एखादा स्वच्छ आरसा आपल्यासमोर येणाऱ्या पदार्थाचें प्रतिबिंब धारण करतो, त्याप्रमाणें आसक्त न होतां आपलें प्राप्त झालेलें कर्तव्य प्रत्येकानें अवश्य करीत राहिलें पाहिजे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३५४ यथा रजोभिर्गगनं यथा कमलमम्बुभिः ।
न लिप्यते हि संश्लिष्टैर्देहैरात्मा तथैव च ॥ ५।५।३१

आकाशांत धूळ उडाली म्हणून तें मलिन होत नाहीं, किंवा कमलपत्रावर उदक पडलें तरी तें त्याला चिकटत नाहीं, त्याप्रमाणें आत्म्याशीं कितीहि देहांचा संबंध आला तरी तो त्यांच्या योगानें लिप्त होत नाहीं.

३५५ यथा वन्ध्यासुतो नास्ति यथा नास्ति मरौ जलम् ।
यथा नास्ति नभोवृक्षस्तथा नास्ति जगद्भ्रमः ॥ ३।७।४३

ज्याप्रमाणें वंध्येचा मुलगा, मृगजळांतील पाणी, आकाशांतील वृक्ष यांना अस्तित्व नसतें त्याप्रमाणें जगाच्या भ्रमाची स्थिति आहे.

३५६ यथा शाम्येन्मनोऽनिच्छं
नोपदेशशतैस्तथा ॥ ७।३६।२३

इच्छा सोडल्यानें मन जसें शांत होतें, तसें शेंकडों उपदेशांनींही शांत होत नाहीं.

३५७ यथा स्पर्शेन पवनः सत्तामायाति नो गिरा ।
तथेच्छातानवेनैव विवेकोऽस्य विबुध्यते ॥ ४।१८।६८

नुसता ' वारा ' हा शब्द ऐकल्यानें त्याचें अस्तित्व कळत नसतें, तर त्यासाठीं वाऱ्याचा अंगाला स्पर्श व्हावा लागतो, त्याप्रमाणें ' मी विवेकी आहें ' असें म्हटल्यानें विवेकाची परीक्षा होत नाहीं, तर विषयाची तृष्णा कमी असणें हीच विवेक असल्याची खूण होय.

३५८ यथा हि काष्ठजतुनोर्यथा बदरकुण्डयोः ।
श्लिष्टयोरपि नैकत्वं देहदेहवतोस्तथा ॥ ३।११४।६२

लाकूड आणि लाख किंवा बोरें आणि भांडें हीं एकमेकांशीं चिकटलेलीं दिसलीं, तरी त्यांचें वास्तविक ऐक्य संभवत नाहीं, त्याचप्रमाणें देह आणि जीवात्मा यांची स्थिति आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३५९ यदवध्यवधात्पापं वध्यत्यागात्तदेव हि ॥ ३।९०।३

अवध्याचा वध केल्यानें जितकें पातक लागतें, तितकेंच पातक वध्याचा वध न केल्यानें लागत असतें.

३६० यदार्यगर्हितं यद्वा न्यायेन न समार्जितम् ।
तस्माद् ग्रासाद्वरं मन्ये मरणं देहिनामिदम् ॥ ३।७६।७

आर्य लोकांनीं निंद्य ठरविलेलें किंवा अन्यायाचें कृत्य करून आपलें पोट भरण्यापेक्षां मनुष्यांनीं मरून जाणें हेंच श्रेयस्कर होय.

३६१ यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ।
इमं समस्तविज्ञानशास्त्रकोशं विदुर्बुधाः ॥ ३।८।१२

जें या योगवासिष्ठ ग्रंथांत आहे, तेंच इतर ग्रंथांतून आहे आणि जें यांत नाहीं तें कोठेंही नाहीं. कारण हा ग्रंथ म्हणजे सर्व विज्ञानशास्त्रांचें भांडार आहे, असें विद्वान् लोक मानतात.

३६२ यदेव क्रियते नित्यं रतिस्तत्रैव जायते ॥ ३।२।४८

मनुष्य जें कृत्य नेहमीं करतो, तेंच पुन्हा करण्याची आवड त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होते.

३६३ यद्यथा कल्पितं येन स संपश्यति तत्तथा ॥ ७।१७७।३

ज्यानें ज्या वस्तूची ज्या प्रकारानें कल्पना केली, तो त्या वस्तूला तशा प्रकारानें पाहतो.

३६४ यद्वस्तु विद्यमानं सत् प्रश्नस्तत्र विराजते ॥ ६।९६।४२

जी वस्तु विद्यमान व सद्रूप असते, तिच्याविषयीं प्रश्न केला तर तो शोभतो.

३६५ यन्त्रं तिलानां कठिनं राशिमुग्रमिवाकुलम् ।
यं पीडयति नानङ्गस्तं मृत्युर्न जिघांसति ॥ ६।२३।१०

तेल काढण्याचा कठीण घाणा तिळांची मोठी रास पिळून काढतो, त्याप्रमाणें मदन ज्याला व्याकुळ करून पीडा देत नाहीं, त्याला ठार मारण्याची इच्छा मृत्यु करीत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३६६ यन्नाम किल नास्त्येव**
**तच्छान्तौ का कदर्थना ॥ ७।१४२।४५**

मुळांत जी वस्तु नाहीं, तिचा परिहार करण्याविषयीं क्लेश तरी कसले !

**३६७ यन्मयो हि भवत्यङ्ग पुरुषो वक्ति तादृशम् ॥ ७।२९।४०**

( श्रीवसिष्ठ रामाला सांगतात. ) मनुष्याचें जसें ज्ञान असेल, तसें तो भाषण करतो.

**३६८ यमो निर्घृणराजेन्द्रो नार्तं नामानुकम्पते ।**
**सर्वभूतदयोदारो जनो दुर्लभतां गतः ॥ १।२६।७**

यम हा अत्यंत निर्दय असून त्याला दुःखितांची मुळींच कींव येत नाहीं. सर्व प्राण्यांवर दया करणारा थोर मनुष्य या जगांत फारच विरळा.

**३६९ ययैवाजीव्यते युक्त्या सैवापदि विराजते ॥ ७।१९६।१६**

आपत्कालीं ज्या युक्तीनें प्राण वांचतात, तीच उत्तम होय.

**३७० यस्त्विच्छातानवे यत्नं न करोति नराधमः ।**
**सोऽन्धकूपे स्वमात्मानं दिनानुदिनमुज्झति ॥७।३६।३१**

जो नीच मनुष्य आपल्या इच्छा कमी करण्याचा प्रयत्न करीत नाहीं तो आपणाला प्रत्येक दिवशीं अंधकूपांत फेकीत असतो.

**३७१ यस्याग्रे न गलति संशयः समूलो**
**नैवासौ क्वचिदपि पण्डितोक्तिमेति ॥ ३।७९।३३**

जो आपल्यापुढें मांडलेल्या शंकेचें समूल निरसन करीत नाहीं, त्याला पंडित ही पदवी केव्हांच प्राप्त होत नाहीं.

**३७२ यस्यान्तर्वासनारज्ज्वा ग्रन्थिबन्धः शरीरिणः ।**
**महानपि बहुज्ञोऽपि स बालेनापि जीयते ॥४।२७।२०**

जो मनुष्य अंतःकरणांतील वासनारूपी दोरीनें घट्ट बांधलेला असतो, तो कितीही बलवान् किंवा विद्वान् असो, प्रसंगीं लहानशा पोराकडूनही पराजित होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३७३ यस्येच्छाननुसंधानमात्रे दुःसाध्यता मतेः ।
गुरूपदेशशास्त्रादि तस्य नूनं निरर्थकम् ॥ ७।३६।३५

इच्छेचा संबंध न ठेवणें, एवढें देखील ज्याच्या बुद्धीला दुःसाध्य वाटत असेल, त्यानें घेतलेला गुरूपदेश, त्याचें शास्त्रज्ञान इत्यादि सर्व खरोखर व्यर्थ होय.

३७४ यस्योज्ज्वलति तीक्ष्णाग्रा पूर्वापरविचारिणी ।
प्रज्ञादीपशिखा जातु जाड्यान्ध्यं तं न बाधते॥५।१२।१९

ज्याच्या ठिकाणीं पूर्वापरविचार करणाऱ्या कुशाग्र बुद्धीची ज्योति प्रज्वलित झालेली असते, त्याला अज्ञानरूपी अंधकार केव्हांही बाधा करीत नाहीं.

३७५ यः स्नातः शीतसितया
साधुसंगतिगङ्गया ।
किं तस्य दानैः किं तीर्थैः
किं तपोभिः किमध्वरैः ॥ २।१६।१०

ज्यानें सत्संगरूपी गंगेच्या थंड व स्वच्छ पाण्यांत स्नान केलें आहे, त्याला दान, तीर्थ, तप आणि यज्ञ यांच्यापासून कोणतें पुण्य प्राप्त व्हावयाचें राहिलें आहे ?

३७६ यावत्तिलं यथा तैलं यावद्देहं तथा दशा ।
यो न देहदशामेति स च्छिनत्त्यसिनाम्बरम् ६।१०४।४२

जोंपर्यंत तीळ असतात तोंपर्यंत त्यांत तेल असतेंच. त्याप्रमाणें जोंपर्यंत शरीर असतें तोंपर्यंत हर्ष, खेद इत्यादि विकार होणारच देह असेपर्यंत ज्याला हे विकार होत नाहींत तो तरवारीनें आकाशच कापून काढतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३७७ यावत्सर्वं न संत्यक्तं तावदात्मा न लभ्यते ।
सर्वावस्थापरित्यागे शेष आत्मेति कथ्यते ॥ ५।५८।४४

जोंपर्यंत मनानें सर्व विषयांचा पूर्णपणें त्याग केला नाहीं, तोंपर्यंत कोणालाही आत्मप्राप्ति होणार नाहीं. कारण मनाच्या सर्व अवस्थांचा त्याग झाल्यानंतर अवशिष्ट राहणारा तोच आत्मा, असा सिद्धांत आहे.

३७८ यावदन्यन्न संत्यक्तं
तावत्सामान्यमेव हि ।
वस्तु नासाद्यते साधो
स्वात्मलाभे तु का कथा ॥ ५।५८।४५

( मांडव्य ऋषि सुरघु राजाला म्हणतात. ) सामान्य व्यवहारामध्यें-देखील एखादी क्षुद्र वस्तु तिच्या विरोधी वस्तूंचा त्याग केल्याशिवाय हातीं लागत नाहीं; असा नियम आहे. तर आत्मलाभाच्या संबंधानें हा नियम विशेषच लागू पडावा, यांत काय आश्चर्य आहे ?

३७९ यावद्देहं स्वभावोऽस्य देहस्य न निवर्तते ॥ ३।७६।५

जोंपर्यंत देह आहे, तोंपर्यंत त्याचे धर्म नाहींसे होत नाहींत.

३८० या विवेकविकासिन्यो मतयो महतामिह ।
न ता विपदि मज्जन्ति तुम्बकानीव वारिणि ॥ २।१४।११

भोपळा पाण्यांत बुडत नाहीं, त्याप्रमाणें विवेकानें विकास पावलेली महात्म्यांची बुद्धि विपत्काळीं निराशेंत बुडून जात नाहीं.

३८१ युक्तियुक्तमुपादेयं वचनं बालकादपि ।
अन्यत्तृणमिव त्याज्यमप्युक्तं पद्मजन्मना ॥ २।१८।३

एखाद्या मुलानेंही केलेलें सयुक्तिक भाषण ग्राह्य समजावें, परंतु प्रत्यक्ष ब्रह्मदेवानेंही केलेलें भाषण युक्तीच्या विरुद्ध असल्यास तें त्याज्य समजावें.

३८२ युक्त्या च व्यवहारिण्या स्वार्थः प्राज्ञेन साध्यते ३।७८।२५

ज्ञाते लोक आपलें कार्य व्यवहार्य युक्तीनें साधीत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३८३ युक्त्या प्रबोध्यते मूढः प्राज्ञस्तत्त्वेन बोध्यते ॥ ६।४९।२१

मूढाला युक्तीनें बोध करावा लागतो व जाणत्याला तत्त्व सांगून बोध करावा लागतो.

३८४ युक्त्यैव बोधयित्वैष जीव आत्मनि योज्यते ।
यद्युक्त्यासाद्यते कार्यं न तद्यत्नशतैरपि ॥ ६।४९।१९

युक्तीनेंच बोध करून या जीवाला आत्मप्राप्ति करून द्यावी लागते. कारण जें कार्य युक्तीनें साधतें तें शेंकडो प्रयत्नांनींही साधत नाहीं.

३८५ युज्यते वेष्टनं वायोराकाशस्य च खण्डनम् ।
ग्रथनं च तरङ्गाणामास्था नायुषि युज्यते ॥ १।१४।५

वाऱ्याची गुंडाळी करतां येते, आकाशाचे तुकडे करतां येतात, पाण्यावरील लाटांना एकत्र ओंवतां येतें. इत्यादि गोष्टींवर एकवेळ विश्वास बसेल, परंतु आयुष्यावर विश्वास बसत नाहीं.

३८६ ये केचन समारम्भा ये जनस्य क्रियाक्रमाः ।
ते सर्वे देहमात्रार्थमात्मार्थं न तु किंचन ॥ ४।५७।३१

बाह्य विषयांवर दृष्टि ठेवणारे लोक सर्व वैदिक किंवा लौकिक कर्में केवळ देहाच्या सुखासाठीं करीत असतात; परंतु आत्मज्ञानासाठीं मुळींच प्रयत्न करीत नाहींत.

३८७ येन नासादितं हेम रीतिं किं स परित्यजेत् ॥ ६।१०१।४०

ज्याला सोन्याची माहितीच नाहीं तो पितळ मिळविण्याच्याच मार्गांत असणार.

३८८ येन प्राप्तेन लोकेऽस्मिन्न प्राप्यमवशिष्यते ।
तत्कृतं सुकृतं मन्ये शेषं कर्म विषूचिका ॥ ६।७४।१७

(भगीरथ म्हणतो) जें प्राप्त झालें असतां या लोकांत कांहीं अधिक मिळावयाचें राहात नाहीं, तेंच करणें याला मी 'सुकृत' समजतों. बाकीचें कर्म म्हणजे पटकीप्रमाणें अपवित्र व दुःखदायक होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३८९ येनाभ्यासः परित्यक्त इष्टे वस्तुनि सोऽधमः ।
कदाचिन्न तदाप्नोति वन्ध्या स्वतनयं यथा ॥ ७।६७।३४

ज्यानें इच्छिलेल्या वस्तूविषयींचा अभ्यास सोडून दिला, तो नीच होय. वंध्येला ज्याप्रमाणें स्वतःचा मुलगा प्राप्त होत नाहीं, त्याप्रमाणें अभ्यास सोडून देणाराला इष्ट वस्तु कधींही प्राप्त होत नाहीं.

३९० ये शूरा ये च विक्रान्ता ये प्राज्ञा ये च पण्डिताः ।
तैस्तैः किमिव लोकेऽस्मिन्वद दैवं प्रतीक्ष्यते ॥२।८।१७

(श्रीवसिष्ठ म्हणतात हे रामा,) या जगांत जे लोक शूर, पराक्रमी, बुद्धिमान् व पंडित म्हणून प्रसिद्धीला आले ते केवळ पौरुषाच्याच योगानें होत. तूंच सांग कीं, ते कधीं दैवाची वाट पहात बसले होते काय?

३९१ येषां गुणेष्वसंतोषो रागो येषां श्रुतं प्रति ।
सत्यव्यसनिनो ये च ते नराः पशवोऽपरे ॥ ४।३२।४३

ज्यांचा हावरेपणा सद्गुणांविषयीं आहे, ज्यांना प्रेम विद्येचें आहे, आणि व्यसन सत्याचें आहे, तेच खरोखर मनुष्य होत. इतर लोक केवळ पशुतुल्य होत.

३९२ यैरेव जायते रागो मूर्खस्याधिकतागतैः ।
तैरेव भोगैः प्राज्ञस्य विराग उपजायते ॥४।४६।५

ज्या विषयोपभोगांच्या समृद्धीमुळें मूर्ख मनुष्यांना प्रेम उत्पन्न होतें, त्याच विषयांच्या अभिवृद्धीमुळें ज्ञात्यांना वैराग्य उत्पन्न होतें.

३९३ यो न निर्वासनो नूनं सर्वधर्मपरोऽपि सः ।
सर्वज्ञोऽप्यभितो बद्धः पञ्जरस्थो यथा खगः॥६।५५।४४

ज्याच्या वासना नाहींशा झाल्या नाहींत, तो खरोखर सर्वधर्मपरायण व सर्वज्ञ जरी असला तरी पिंजऱ्यांतील पक्ष्याप्रमाणें सर्व बाजूंनीं बद्धच आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३९४ योऽन्तःशीतलतां यातो यो भावेषु न मज्जति ।
व्यवहारी न संमूढः स शान्त इति कथ्यते॥२।१३।७८

ज्याचें अंतःकरण तृप्त आहे, विषयांच्या पसाऱ्यांत राहूनही जो विषयासक्त होत नाहीं, आणि व्यवहार करीत असूनही जो मोह पावत नाहीं, तोच खरा शांत होय.

३९५ यो यादृक्क्लेशमाधातुं समर्थस्तादृगेव सः ।
अवश्यं फलमाप्नोति प्रबुद्धोऽस्त्वज्ञ एव वा॥७।१०२।३३

ज्ञानी असो अज्ञानी असो, जो ज्या प्रकारचे कष्ट करण्यास समर्थ असेल, त्याप्रकारचें फल त्याला अवश्य प्राप्त होतें.

३९६ यो यो यथा प्रयतते स स तत्तत्फलैकभाक् ।
न तु तूष्णीं स्थितेनेह केनचित्प्राप्यते फलम् ॥२।७।१९

जो जो मनुष्य जसा जसा प्रयत्न करतो, तसें तसें फल त्याला प्राप्त होतें; परंतु स्वस्थ बसून कोणालाही फल प्राप्त होत नाहीं.

३९७ यो यो यादृग्गुणो जन्तुः स तामेवैति संस्थितिम् ।
सदृशेष्वप्यजेषु श्वा न मध्ये रमते क्वचित् ॥५।३२।२९

जो ज्या गुणाचा असेल तो त्या गुणाला योग्य अशा स्थितींतच राहातो. रंगारूपानें एखादा कुत्रा बकऱ्यासारखा असला तरी तो त्यांच्या कळपांत केव्हांही रमत नाहीं.

३९८ योऽसत्तातस्य कूपोऽयमिति कौपं पिबत्यपः ।
त्यक्त्वा गाङ्गं पुरःस्थं तं को न शास्त्यतिरागिणम् ॥२।१८।४

' ही विहीर आमच्या वडिलांनीं खणलेली आहे ' असें म्हणून आपल्या पुढें असलेलें गंगेचें पाणी टाकून जो त्या विहिरीचेंच पाणी पितो, त्या हट्टी मनुष्याला कोण बरें सांगणार ?

३९९ रम्यवस्तुक्षयायैव मूढानां जृम्भते पदम् ॥ ६।६२।२५

सुंदर वस्तूंचा नाश करण्यासाठींच मूढलोकांचें स्थान वाढत असतें

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४०० राग एव हि शोभायै
निर्गुणानां जडात्मनाम् ।। ७।१२०।१०

( हा फुललेला पळसाचा वृक्ष केवळ रंगीत फुलांच्या योगानें राजासारखा शोभत आहे, त्याप्रमाणें ) खरी शोभा देणारे औदार्यादि गुण मूर्खांच्या ठिकाणीं नसल्यामुळें शोभा आणण्यासाठीं त्यांना केवळ रंगीत वस्त्रालंकारच धारण करावे लागतात.

४०१ राजते हि पदार्थश्रीर्महतामर्पणाच्छुभा ।। ३।१०४।३७

एखादा मूल्यवान् चांगला पदार्थ योग्य असलेल्या थोर लोकांना अर्पण केला असतां शोभूं लागतो.

४०२ राज्यानि संपदः स्फारा भोगो मोक्षश्च शाश्वतः ।
विचारकल्पवृक्षस्य फलान्येतानि राघव ।। २।१४।१०

( श्रीवसिष्ठ म्हणतात ) राज्य, विपुलसंपत्ति, विषयोपभोग आणि मोक्ष हीं सर्व विचाररूपी कल्पवृक्षाचींच फळें होत.

४०३ लोकनिन्द्यस्य दुर्जन्तोर्जीवितान्मरणं वरम् ।।५।४६।४३

लोकांच्या निंदेला पात्र झालेल्या दुष्ट पुरुषानें जगण्यापेक्षां मरून जाणें हेंच श्रेयस्कर आहे.

४०४ लोकस्थितिरलङ्घ्या हि महतामपि मानद ।। ५।६५।३०

( श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात ) महात्म्यांनासुद्धां लोकस्थितीचें उल्लंघन करतां येत नाहीं.

४०५ वरं शरावहस्तस्य चाण्डालागारवीथिषु ।
भिक्षार्थमटनं राम न मौर्ख्यहतजीवितम् ।। २।१३।२७

( श्रीवसिष्ठ म्हणतात ) हे रामा, चांडालांच्या वस्तींतून हातांत थाळी घेऊन भीक मागण्याचा प्रसंग आला तरी पुरवला, परंतु मूर्खपणामुळें निष्फळ झालेलें जीवित कंठण्याचा प्रसंग नको.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४०६ वरं कर्दमभेकत्वं मलकीटकता वरम् ।
वरमन्धगुहाहित्वं न नरस्याविचारिता ॥ २।१४।४६

चिखलांत बेडूक होऊन राहावें लागणें, घाणीमधील किडा बनावें लागणें किंवा एखाद्या गुहेमध्यें आंधळा सर्प होऊन रहावें लागणें चांगलें, परंतु मनुष्य होऊनही विचाररहित असणें चांगलें नाहीं.

४०७ वसनाशनमात्रेण तुष्टाः शास्त्रफलानि ये ।
जानन्ति ज्ञानबन्धूंस्तान्विद्याच्छास्त्रार्थशिल्पिनः ७।२१।५

उत्तमवस्त्रें आणि भोजनादि पदार्थ मिळणें हेंच शास्त्रज्ञानाचें फल असें समजून आनंद मानणारे लोक शास्त्रार्थाचे केवळ शिल्पी (कसबी) होत. ज्ञानी नव्हत. (कारागीर लोकांनीं तयार केलेल्या सुंदर वस्तूंचे भोक्ते दुसरे, कारागीर फक्त मजुरीचे मालक. तीच यांची तऱ्हा.)

४०८ वसन्तो नन्दनोद्यानमिन्दुरप्सरसः स्मृताः ।
इत्येकतः समुदितं संतोषामृतमेकतः ॥ ७।४७।४४

वसंत ऋतु, नंदनवन, चंद्र, आणि अप्सरा या सर्वांपासून होणारें सुख एका संतोषरूपी अमृतापासून मिळतें.

४०९ वस्त्वल्पमप्यतिबृहल्लघुसत्त्वो हि मन्यते ॥ ७।१८।२३

कोणताही प्राणी आपल्या बुद्धिसामर्थ्याप्रमाणें वस्तूला महत्त्व देतो. कमी बुद्धीचा मनुष्य अतिशय मूल्यवान् पदार्थाला कमी किंमतीचा समजून क्षुद्रवस्तूला फार महत्त्व देतो. (उंदीर रत्नादिकांना तुच्छ मानून धान्याचे कण गोळा करतात. तसेंच खेळणारें मूल मातीचें नवीन चित्र घेण्यासाठीं जवळचा मूल्यवान् दागिना देण्यासही तयार होतें.)

४१० वस्त्ववस्थानगतं सर्वं शुभमप्यशुभं भवेत् ॥७।११६।५२

कोणतीही शुभवस्तु अयोग्य ठिकाणीं राहिल्यास ती अशुभ होते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४११ वातान्तर्दीपकशिखालोलं जगति जीवितम् ।
तडित्स्फुरणसंकाशा पदार्थश्रीर्जगत्त्रये ॥ ११२८।११

वाऱ्याच्या झोतांत सांपडलेल्या दिवटीच्या ज्योतीप्रमाणें जगांतील जीविताची स्थिति क्षणभंगुर आहे. त्रैलोक्यांतील सर्व पदार्थांची शोभा विजेच्या प्रकाशाप्रमाणें चंचल आहे.

४१२ वासनातन्तुबद्धा ये आशापाशवशीकृताः ।
वश्यतां यान्ति ते लोके रज्जुबद्धाः खगा इव ॥४।२७।१८

जे आशापाशांत गुरफटले जाऊन वासनातंतूंनीं बद्ध झालेले असतात, ते जाळ्यांत अडकलेल्या पक्ष्यांप्रमाणें कोणालाही सहज जिंकतां येतात.

४१३ वासनातानवं राम मोक्ष इत्युच्यते बुधैः ।
पदार्थवासनादार्ढ्यं बन्ध इत्यभिधीयते ॥ २।२।५

( श्रीवसिष्ठ म्हणतात ) हे रामा, वासना क्षीण होत जाणें या स्थितीलाच ज्ञाते पुरुष मोक्ष असें म्हणतात. व पदार्थांबद्दलची वासना दृढ होत जाणें हाच बंध होय असें त्यांचें मत आहे.

४१४ वासनावागुराकृष्टो मनोहरिणको नृणाम् ।
परां विवशतामेति संसारवनगुल्मके ॥ ३।११०।११

वासनारूपी जाळ्यांत सांपडलेलें मनुष्याचें मनोरूपी हरिण संसाररूपी वनांतील झाडींत अतिशय विव्हल होऊन जातें.

४१५ विचारसंतोषशमसत्समागमशालिनि ।
प्रवर्तन्ते श्रियो जन्तौ कल्पवृक्षाश्रिते यथा ॥ २।१६।२४

कल्पवृक्षाचा आश्रय केला म्हणजे सर्व तऱ्हेचें ऐश्वर्य प्राप्त होतें याप्रमाणें विचार, संतोष, शम आणि सत्समागम यांनीं युक्त असलेल्या मनुष्याला सर्व ऐश्वर्य प्राप्त होतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४१६ विचारः सफलस्तस्य विज्ञेयो यस्य सन्मतेः ।
दिनानुदिनमायाति तानवं भोगगृध्नुता ॥ ४।१८।६५

चांगली बुद्धि असलेल्या ज्या पुरुषाचा विषयोपभोगांचा लोभ दिवसेंदिवस कमी होत असतो, त्याचाच आत्मविषयक विचार सफल होत जातो.

४१७ विचारोदयकारिण्या धिया व्यवहरन्ति ये ।
फलानामत्युदाराणां भाजनं हि भवन्ति ते ॥२।१४।१२

जे लोक विचार करणाऱ्या बुद्धीनें व्यवहार करतात, ते अतिशय उत्कृष्ट फळ मिळविण्याला पात्र होतात.

४१८ विद्राविते शत्रुजने समस्ते
समागतायामभितश्च लक्ष्म्याम् ।
सेव्यन्त एतानि सुखानि यावत्
तावत्समायाति कुतोऽपि मृत्युः ॥ १।२७।२०

सर्व शत्रूंचें पारिपत्य करून, सर्व प्रकारची संपत्ति मिळवून मनुष्य अनेक सुखांचा अनुभव घेत आहे, तोंच मृत्यु अचानक येऊन त्याच्यावर झडप घालतो.

४१९ विना पुरुषयत्नेन दृश्यते चेज्जनार्दनः ।
मृगपक्षिगणं कस्मात्तदासौ नोद्धरत्यजः ॥ ५।४३।१५

मनुष्यानें स्वतः उद्योग केल्यावांचून जर त्याला ईश्वराचें दर्शन होऊं शकलें असतें, तर पशु, पक्षी इत्यादिकांचा सुद्धां उद्धार त्यानें कां केला नसता ?

४२० वियोगायैव संयोगाः ॥ ६।१२६।२८

वियोग होण्यासाठींच संयोग होत असतात.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४२१ विविधवनकुसुमकेसरधवलवपुर्हंस इव दृष्टः ।
काकः कृमिकुलकवलं क्लिन्नमथो कवलयन् ज्ञातः ७।११६।६५

वनांतील नानाप्रकारच्या पुष्पपरागांनीं शुभ्र झालेला कावळा हंसासारखा जरी वाटला, तरी किड्यांनीं भरलेलें व मारून गेलेलें मांस खाण्यासाठीं तो उचलून घेत आहे असें दिसल्याबरोबर हा कावळाच आहे अशी खात्री झाली.

४२२ विवेकोऽस्ति वचस्येव चित्रेऽग्निरिव भास्वरः ।
यस्य तेनापरित्यक्ता दुःखायैवाविवेकिता ॥ ४।१८।६७

ज्याचा विवेक बोलण्यांतच मात्र आहे, त्याला चित्रांतील अग्नीप्रमाणें विवेकाचा मुळींच उपयोग होत नाहीं. त्याच्या ठिकाणीं अविवेकच असल्यामुळें त्यापासून दुःख होतें.

४२३ विश्वामित्रेण मुनिना दैवमुत्सृज्य दूरतः ।
पौरुषेणैव संप्राप्तं ब्राह्मण्यं राम नान्यथा ॥ २।८।२०

( श्रीवसिष्ठ म्हणतात ) हे रामा, विश्वामित्र मुनींनीं दैव दूर बाजूला झुगारून देऊन केवळ पौरुषाच्याच बलावर ब्राह्मण्य प्राप्त करून घेतलें.

४२४ विषं विषयवैषम्यं न विषं विषमुच्यते ।
जन्मान्तरघ्ना विषया एकदेहहरं विषम् ॥ १।२९।१३

ज्याला आपण विष म्हणून म्हणतों, तें वास्तविक विष नसून विषय हेंच खरें विष होय. विषप्राशन केलें असतां एका देहाचा नाश होतो, परंतु विषयांचें सेवन हें अनेक जन्मांचा नाश करतें.

४२५ विषयान्प्रति भोः पुत्र सर्वानेव हि सर्वथा ।
अनास्था परमा ह्येषा सा युक्तिर्मनसो जये ॥५।२४।१७

( विरोचन बलीला म्हणतो ) हे पुत्रा, सर्व विषयांसंबंधानें पूर्णपणें अनास्था असणें हीच मनोजयाची सर्वोत्कृष्ट युक्ति आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४२६ वृक्षाः प्रतिवनं सन्ति नित्यं सफलपल्लवाः ।
नत्वपूर्वचमत्कारो लवङ्गः सुलभः सदा ॥ १।३३।४१

प्रत्येक वनामध्यें फळांनीं व फुलांनीं भरलेले असे शेंकडों वृक्ष आढळून येतात. परंतु आश्चर्यकारक लवंगवृक्ष एखादाच आढळतो.

४२७ व्याचष्टे यः पठति च शास्त्रं भोगाय शिल्पिवत् ।
यतते न त्वनुष्ठाने ज्ञानबन्धुः स उच्यते ॥ ७।२१।३

कारागीर द्रव्य मिळविण्यासाठीं प्रयत्न करतो, त्याप्रमाणें उपभोग मिळविण्यासाठीं जो शास्त्र पढतो व त्याचें व्याख्यान करतो, पण स्वतः त्याप्रमाणें वागण्याविषयीं झटत नाहीं, तो ज्ञानबंधु म्हणजे नांवाचाच ज्ञानी होय.

४२८ शतादेकतमस्यैव सर्वोदारचमत्कृतिः ।
ईप्सितार्थार्पणैकान्तदक्षा भवति भारती ॥ १।३३।३२

शेंकडों वक्त्यांमध्यें एकाद्याचेंच भाषण सहृदय मनुष्यांच्या अंतःकरणांत विस्मय उत्पन्न करणारें आणि इच्छिलेल्या अर्थाचा निश्चयानें बोध करणारें असतें.

४२९ शमेनासाद्यते श्रेयः शमो हि परमं पदम् ॥ २।१३।५२

शमानेंच मोक्ष प्राप्त होतो. व शम हेंच श्रेष्ठपद आहे.

४३० शरदम्बुधरच्छायागत्वर्यो यौवनश्रियः ।
आपातरम्या विषयाः पर्यन्तपरितापिनः ॥ ७।९३।८४

शरदृतूंतील मेघांच्या छायेप्रमाणें तारुण्याची शोभा क्षणिक आहे; आणि शब्दादिविषय वरवर सुखदायक खरे; परंतु शेवटीं अत्यंत दुःखदायक होत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४३१ शरीरमरुतापोत्थां युवतामृगतृष्णिकाम् ।
मनोमृगाः प्रधावन्तः पतन्ति विषयावटे ॥ १।२०।३२

शरीर हें रखरखीत वाळवंट आहे, त्यांतील तापानें उत्पन्न झालेल्या तारुण्यरूपी मृगजळाकडे मनोरूपी हरिण धांवत जातात; आणि शेवटीं विषयांच्या खड्ड्यांत जाऊन पडतात.

४३२ शस्त्राणि दयिताङ्गानि लग्नान्यङ्गे निरम्बरे ।
यो बुध्यमानः सुसमः स परस्मिन्पदे स्थितः ॥ ७।१।१

ज्याच्या उघड्या आंगावर झालेले शस्त्रांचे प्रहार आणि स्त्रीच्या अवयवांचा स्पर्श हीं दोन्ही ज्याला सारखींच वाटतात, तो ब्रह्मपदाला पोंचला असें समजावें.

४३३ शास्त्रं सुबोधमेवेदं सालंकारविभूषितम् ।
काव्यं रसमयं चारु दृष्टान्तैः प्रतिपादितम् ॥२।१८।३३

हा योगवासिष्ठ शास्त्रीय ग्रंथ अतिशय सुबोध आहे, अनेक अलंकार व पुष्कळ दृष्टांत यांच्या योगानें एखाद्या काव्याप्रमाणें रम्य व सरस बनला आहे.

४३४ शास्त्रसज्जनसंसर्गैः प्रज्ञां पूर्वं विवर्धयेत् ।
सेकसंरक्षणारम्भैः फलप्राप्तौ लतामिव ॥ ५।१२।२४

एखाद्या वेलीला चांगलीं फळें यावीं असें वाटत असेल, तर तिला पाणी घालून तिचें रक्षण करावें लागतें, त्याप्रमाणें कार्यसिद्धीस नेणाऱ्या पुरुषानें शास्त्र आणि सत्समागम यांच्या योगानें प्रथम आपली बुद्धि वाढवावी.

४३५ शिखी वार्यपि नादत्ते भूमेर्भुङ्क्ते बलादहिम् ।
दौरात्म्यं तन्न जाने किं सर्पस्य शिखिनोऽथवा॥७।११८।१९

मोर भूमीवरील पाणीही पीत नाहीं पण सर्पाला मात्र बलात्कारानें खाण्यासाठीं उचलून नेतो, तेव्हां याठिकाणीं अंतःकरणाचा दुष्टपणा सर्पाचा आहे किंवा मोराचा आहे तें समजत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४३६ शिष्यप्रज्ञैव बोधस्य कारणं गुरुवाक्यतः ॥ ६।१२८।६३

ज्ञान होण्याला गुरुवाक्यापेक्षां शिष्याची बुद्धिच अधिक कारण आहे.

४३७ शुद्धेऽल्पोऽप्युपदेशो हि निर्मले तैलबिन्दुवत् ।
लगत्युत्तानचित्तेषु नादर्शे इव मौक्तिकम् ॥ ७।५।३

तेलाचा थेंब निर्मल वस्त्रावर पडला असतां आंत शिरून जसा पसरतो तसा थोडाही उपदेश शुद्ध चित्तामध्यें चांगल्या रीतीनें बिंबतो, परंतु चित्त गंभीर नसल्यास आरशांत पडलेल्या मोत्याच्या प्रतिबिंबाप्रमाणें उपदेश ठसत नाहीं.

४३८ शुभवासनया चेतो महत्या जायते महत् ।
भवतीन्द्रमनोराज्य इन्द्रतास्वप्नभाङ्नरः ॥ ४।३५।३०

शुभ वासनेमुळें मन शुभ होतें, आणि मोठ्या वासनेमुळें मनही मोठें होतें. ‘ मी इंद्र होईन ’ असें मनोराज्य करणारा स्वप्नामध्यें इंद्र होतो.

४३९ शुभाशुभाभ्यां मार्गाभ्यां वहन्ती वासनासरित् ।
पौरुषेण प्रयत्नेन योजनीया शुभे पथि ॥ २।९।३०

वासनारूपी नदी शुभ किंवा अशुभ अशा दोन्ही मार्गांनीं वाहत असते. आपल्या वासनेचा प्रवाह अशुभमार्गानें जात आहे असें दिसून आल्यास प्रयत्न करून तो प्रवाह शुभ मार्गाकडे वळवावा.

४४० शून्यमाकीर्णतामेति मृतिरप्युत्सवायते ।
आपत्संपदिवाभाति विद्वज्जनसमागमे ॥ २।१६।३

विद्वान् लोकांच्या सहवासांत असणाऱ्याला एखादें शून्यस्थानही मनुष्यांनीं गजबजल्याप्रमाणें दिसतें, मृत्युही उत्सवाप्रमाणें आनंददायक वाटतो. व आपत्तीलाही त्याच्या दृष्टीनें संपत्तीचें स्वरूप प्राप्त होतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४४१ शैशवं वार्धकं ज्ञेयं तिर्यक्त्वं मृतिरेव च ।
तारुण्यमेव जीवस्य जीवितं तद्विवेकि चेत् ॥७।१६२।२१

बाळपण आणि म्हातारपण या दोन्ही अवस्थांत ज्ञान प्राप्त होत नसल्यामुळें त्या पशुपक्ष्यांप्रमाणें व्यर्थ होत. त्या मरणतुल्यच आहेत. प्राण्याचें खरें जीवित म्हणजे तारुण्य होय. परंतु तें देखील विचार करणारें असेल तर.

४४२ शैशवं च मनश्चैव सर्वास्वेव हि वृत्तिषु ।
भ्रातराविव लक्ष्येते सततं भङ्गुरस्थिती ॥ १।१९।१६

बाळपण आणि मन या दोहोंचें स्वरूप सारखेंच चंचल आहे, यावरून सर्व वृत्तींमध्यें हीं दोन्ही भावंडेंच आहेत, असें वाटतें.

४४३ श्मशानमापदं दैन्यं दृष्ट्वा को न विरज्यते ।
तद्वैराग्यं परं श्रेयः स्वतो यदभिजायते ॥ २।११।२८

स्मशानांत गेल्यानंतर किंवा आपात्ति आणि दैन्य प्राप्त झाल्यानंतर कोणाला वैराग्य उत्पन्न होत नाहीं ? परंतु असलें वैराग्य खरें नव्हे, स्वतः विचार करून जें वैराग्य उत्पन्न होतें, तेंच अत्यंत श्रेयस्कर होय.

४४४ श्रीमानजननिन्द्यश्च शूरश्चाप्यविकत्थनः ।
समदृष्टिः प्रभुश्चैव दुर्लभाः पुरुषास्त्रयः ॥ १।१३।११

लोकांच्या निंदेला पात्र न झालेला श्रीमंत, स्वतः प्रौढि न सांगणारा शूर, आणि सर्वत्र समदृष्टि असणारा राजा हे तीन पुरुष या जगांत दुर्लभ आहेत.

४४५ श्रुत्वा स्पृष्ट्वा च दृष्ट्वा च भुक्त्वा घ्रात्वा शुभाशुभम् ।
न हृष्यति ग्लायति यः स शान्त इति कथ्यते॥२।१३।८२

चांगल्या किंवा वाईट गोष्टी ऐकून, पाहून, तसेंच चांगल्या किंवा वाईट पदार्थांना स्पर्श करून, त्यांचा वास घेऊन, किंवा उपभोग घेऊन ज्याला हर्ष किंवा विषाद उत्पन्न होत नाहीं, त्यालाच शांत असें म्हणतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४४६ संयोगे च वियोगे च महान्तो हि महाशयाः॥६।१११।११

पुत्र, मित्र इत्यादिकांचा समागम किंवा वियोग झाला असतां महात्मे पुरुष मेरुपर्वताप्रमाणें स्थिर असतात.

४४७ संशान्ताहंकृतेर्जन्तोर्भोगा रोगा महामते ।
न स्वदन्ते सुतृप्तस्य यथा प्रतिविषा रसाः ॥ ४।३३।६८

( श्रीवसिष्ठ रामाला म्हणतात. ) भोजन करून अत्यंत तृप्त झालेल्या मनुष्याला उत्तमोत्तम पक्वान्नेंही विषाप्रमाणें वाटतात; त्याप्रमाणें अहंकार नाहींसा होऊन आत्मज्ञानानें तृप्त झालेल्या मनुष्याला विषयोपभोग रोगांप्रमाणें वाटतात.

४४८ संशान्ते चित्तवेताले यामानन्दकलां तनुः ।
याति तामपि राज्येन जागतेन न गच्छति ॥४।१५।२०

चित्तरूपी वेताळ शांत झाला असतां, शरीराला प्राप्त होणाऱ्या सुखाच्या एका कलेची म्हणजे सोळाव्या हिश्शाची बरोबरी सर्व जगताचें राज्य मिळाल्यानें होणाऱ्या आनंदालाही करतां येणार नाहीं.

४४९ संसार एव दुःखानां सीमान्त इति कथ्यते ।
तन्मध्यपतिते देहे सुखमासाद्यते कथम् ॥ ५।९।५२

संसार म्हणजे दुःखाची पराकाष्ठा असें सत्पुरुष सांगतात. तेव्हां अशा संसारांत पडलेल्या देहामध्यें सुखप्राप्ति कोठून होणार ?

४५० संसारविषवृक्षोऽयमेकमास्पदमापदाम् ।
अज्ञं संमोहयेन्नित्यं मौर्ख्यं यत्नेन नाशयेत् ॥२।११।६

संसार हा एक विषवृक्ष असून त्याच्यापासून सर्व तऱ्हेच्या आपत्ति उत्पन्न होतात. अज्ञ मनुष्याला हा संसार मोह उत्पन्न करतो, यासाठीं प्रयत्न करून अज्ञानाचा नाश केला पाहिजे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४५१ संसारस्यास्य दुःखस्य सर्वोपद्रवदायिनः ।
उपाय एक एवास्ति मनसः स्वस्य निग्रहः ॥४।३५।२

सर्व प्रकारें उपद्रव होणाऱ्या अशा या संसारदुःखाचा नाश होण्याला स्वतःच्या मनाचा निग्रह हाच काय तो एक उपाय आहे.

४५२ संसारात्तरणे जन्तोरुपायो ज्ञानमेव हि ॥ २।१०।२२

संसारांतून तरून जाण्याला ज्ञान हाच काय तो एक उपाय आहे.

४५३ संसाराम्बुनिधावस्मिन्वासनाम्बुपरिप्लुते ।
ये प्रज्ञानावमारूढास्ते तीर्णा बुडिताः परे ॥ ४।४६।२२

वासनारूपी पाण्यानें ओतप्रोत भरलेल्या या संसारसमुद्रांत जे बुद्धिरूपी नावेचा आश्रय करतात, तेच या समुद्राच्या पलीकडे तरून जातात, इतर बुडून जातात.

४५४ संकटे विस्मरत्येव जनो गौरवसत्क्रियाम् ॥ ३।७४।२५

कोणीही झाला तरी संकटाचे वेळीं आदर सत्कार करणें विसरून जातोच.

४५५ संकल्पः परमो बन्धस्त्वसंकल्पो विमुक्तता॥३।११४।२४

संकल्प हाच मोठा बंध असून असंकल्प हाच खरा मोक्ष आहे.

४५६ सज्जनाशयनीकाशं त्यक्त्वा बर्ही महत्सरः ।
पिबत्यम्ब्वभ्रनिष्ठ्यूतं मन्ये तन्नातिभीतितः ७।११८।२०

( सहचर राजाला म्हणतो ) सज्जनांच्या अंतःकरणाप्रमाणें स्वच्छ असलेलें मोठें सरोवर सोडून, मोर मेघांतून गळलेलें पाणी पितो, याचें कारण आपलें मस्तक वाकवावें लागेल, हेंच असावें असें वाटतें.

४५७ सज्जनो हि समुत्तार्य विपद्भ्यो निकटस्थितम् ।
नियोजयति संपत्सु स्वालोकेष्विव भास्करः ॥७।४७।३०

सूर्य स्वतःच्या प्रकाशानें इतरांना प्रकाशित करतो, त्याप्रमाणें सज्जन आपल्याजवळ असलेला कोणी विपत्तींत पडल्यास त्याला विपत्तीपासून सोडवून चांगली स्थिति प्राप्त करून देतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४५८ सतां साप्तपदं मैत्रम् ।। ७।२१६।४**

सज्जनांच्या मागून सात पावलें चालल्यानें त्यांच्याशीं सख्य होतें.

**४५९ सतो हि मार्जनक्लेशो नासतस्तु कदाचन ।। ३।६०।२**

जी सद्वस्तु आहे ती नाहींशी करणें शक्य नाहीं, परंतु जी असद्वस्तु आहे तिचा बाध करण्याला मुळींच क्लेश पडत नाहींत.

**४६० सत्यं मनोरमाः कामाः सत्यं रम्या विभूतयः ।**
**किं तु मत्ताङ्गनापाङ्गभङ्गलोलं हि जीवितम्।।७।९३।७९**

विषय आणि ऐश्वर्य हीं रमणीय आहेत, असें धरून चाललों, तथापि जीवित हेंच मुळीं मत्त स्त्रियांच्या कटाक्षा इतकें चंचल आहे याला काय करणार ?

**४६१ सत्यां प्रज्ञामहानावि विवेके सति नाविके ।**
**संसारसागरादस्माद्यो न तीर्णो धिगस्तु तम् ।।५।७६।१३**

बुद्धिरूपी मोठी नौका व विवेकरूपी नावाडी असतां, या संसार-सागराच्या पैल तीराला जो जात नाहीं, त्याला धिक्कार असो.

**४६२ सन्तोऽतीतं न शोचन्ति भविष्यच्चिन्तयन्ति नो ।**
**वर्तमानं च गृह्णन्ति कर्म प्राप्तमखण्डितम् ।। ६।१२४।१३**

सज्जन भूतकालाच्या गोष्टींविषयीं शोक करीत बसत नाहींत व पुढील कार्याबद्दलही चिंता करीत नाहींत, तर वर्तमानकाळीं प्राप्त झालेलें कर्म मात्र सतत करीत राहतात.

**४६३ संतोषः परमो लाभः सत्सङ्गः परमा गतिः ।**
**विचारः परमं ज्ञानं शमो हि परमं सुखम् ।।२।१६।१९**

संतोष हा अत्यंत श्रेष्ठ लाभ, सत्संग ही परमगति, विचार हें परमज्ञान, आणि शम हेंच परम सुख होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४६४ संतोषः साधुसङ्गश्च विचारोऽथ शमस्तथा ।
एत एव भवाम्भोधावुपायास्तरणे नृणाम् ॥ २।१६।१८

संतोष, सत्संग, विचार आणि शांति हींच काय तीं मनुष्यांना संसाररूपी सागरांतून तारून नेणारीं मुख्य साधनें आहेत.

४६५ संतोषो हि परं श्रेयः संतोषः सुखमुच्यते ॥ २।१५।१

संतोष हाच मोक्ष, व संतोष हेंच आत्यंतिक सुख होय.

४६६ समया स्वच्छया बुद्ध्या सततं निर्विकारया ।
यथा यत्क्रियते राम तद्दोषाय सर्वदा ॥ ७।१९९।७

सम, निर्मल व निर्विकार बुद्धीनें जें जें करावें तें तें नेहमीं निर्दोषच असतें.

४६७ समुद्रस्येव गाम्भीर्यं धैर्यं मेरोरिव स्थितम् ।
अन्तः शीतलता चेन्दोरिवोदेति विचारिणः ॥२।१८।१८

समुद्राचें गांभीर्य, मेरूचें धैर्य व चंद्राची शीतलता हीं विचारी मनुष्याच्या अंतःकरणाला प्राप्त होतात.

४६८ संपदः प्रमदाश्चैव तरङ्गोत्तुङ्गभङ्गुराः ।
कस्तास्वहिफणच्छत्रच्छायासु रमते बुधः ॥ ७।४७।४९

संपदा आणि प्रमदा म्हणजे तरुण व सुंदर स्त्रिया या पाण्यावरील मोठ्या तरंगाप्रमाणें क्षणभंगुर आहेत. सर्पाच्या फणांच्या छायेप्रमाणें असलेल्या संपदा आणि प्रमदा यांच्या ठिकाणीं कोणता शाहाणा मनुष्य रममाण होईल ?

४६९ संभवत्यङ्ग जगति न बीजेन विनाङ्कुरः ॥ ६।९४।६२

( कुंभमुनि शिखिध्वज राजाला म्हणतात ) या जगांत बीजावांचून अंकुर संभवत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४७० सर्वकर्माणि संत्यज्य कुर्यात्सज्जनसङ्गमम् ।**
**एतत्कर्म निराबाधं लोकद्वितयसाधनम् ॥ ७।९८।२३**

सर्व कर्में सोडून प्रथम सज्जनांचा सहवास करावा. सत्समागम हा उपाय मुळींच त्रासदायक नसून इहलोक व परलोक साधून देणारा आहे.

**४७१ सर्वं काले हि शोभते ॥ ३।६७।६१**

सर्व गोष्टी योग्यवेळींच शोभत असतात.

**४७२ सर्वज्ञोऽपि बहुज्ञोऽपि माधवोऽपि हरोऽपि च ।**
**अन्यथा नियतिं कर्तुं न शक्तः कश्चिदेव हि ॥५।८९।२६**

कोणी एखादा सर्वज्ञ असो, बहुज्ञ असो, स्वतः भाग्यवान् विष्णु असो, किंवा शंकर असो नियतीला म्हणजे सृष्टिनियमाला बदलण्यास कोणीही समर्थ नाहीं.

**४७३ सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।**
**यदा पश्यत्यभेदेन तदा जीवो विमुच्यते ॥६।१२८।४९**

सर्वभूतांमध्यें आत्म्याला व आत्म्यामध्यें सर्व भूतांना हा जीव जेव्हां अभेदानें पाहतो तेव्हां तो मुक्त होतो.

**४७४ सर्वमेवेह हि सदा संसारे रघुनन्दन ।**
**सम्यक्प्रयुक्तात्सर्वेण पौरुषात्समवाप्यते ॥ २।४।८**

(श्रीवसिष्ठ म्हणतात) हे राघवा, या संसारांत योग्य दिशेनें प्रयत्न केला असतां सर्वांना नेहमीं वाटेल ती वस्तु प्राप्त करून घेतां येते.

**४७५ सर्वं ब्रह्मेति यो ब्रूयादप्रबुद्धस्य दुर्मतेः ।**
**स करोति सुहृद्बुद्ध्या स्थाणोर्दुःखनिवेदनम् ॥६।४९।२०**

दुष्टबुद्धीच्या मूर्ख मनुष्याला 'हें सर्व ब्रह्मच आहे' असें जो सांगतो, तो, जड खांबाला आपला मित्र समजून आपलें दुःख सांगतो; असेंच म्हटलें पाहिजे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४७६ सर्वस्य जन्तुजातस्य सर्ववस्त्ववभासने ।
सर्वदैवैक एवोच्चैर्जयत्यभ्यासभास्करः ॥७।६७।४१

सर्व प्राण्यांना कोणतीही वस्तु सर्वदा भासविणारा एक अभ्यासरूपी सूर्यच सर्वोत्कृष्ट आहे.

४७७ सर्वस्य बीजे संत्यक्ते सर्वं त्यक्तं भवत्यलम् ॥६।९३।३५

सर्वाचें बीज टाकलें असतां सर्वांचा त्याग पूर्णपणें केल्यासारखा होतो.

४७८ सर्वस्याः सरितो वारि प्रयात्यायाति चाकरात् ।
देहनद्याः पयस्त्वायुर्यात्येवायाति नो पुनः॥७।९३।४८

सर्व नद्यांचें पाणी जरी वाहून जात असलें, तरी तें पुनः मेघ, पर्वत इत्यादिकांपासून येत असतें. परंतु या देहरूपी नदींतील आयुष्यरूपी पाणी एकसारखें जात मात्र असतें, पण त्यांत दुसरी कडून भर पडत नाहीं.

४७९ सर्वः स्वसंकल्पवशाल्लघुर्भवति वा गुरुः ॥ ३।७०।३०

जो तो प्राणी आपल्या संकल्पाच्या योगानें उच्च किंवा नीच स्थिति प्राप्त करून घेत असतो.

४८० सर्वे क्षयान्ता निचयाः पतनान्ताः समुच्छ्रयाः ।
संयोगा विप्रयोगान्ताः सर्वे संसारवर्त्मनि ॥ ५।८६।५५

या संसारांत सर्व संग्रहांचा शेवटीं नाश होतो, उंचावर चढलेले अखेरीस पतन पावतात, आणि ज्यांचा संयोग झाला असेल, त्या सर्वांचा शेवटीं वियोग होतो.

४८१ सर्वेषामेव धर्माणां कर्मणां शर्मणामपि ।
पण्डितः पुण्डरीकाणां मार्तण्ड इव मण्डनम् ॥ ७।१४३।१

आकाशाचें भूषण असलेला सूर्य ज्याप्रमाणें कमलांना विकसित करतो, त्याप्रमाणें सभेचें भूषण असलेला पंडित सर्व धर्मांचा, कर्मांचा, आणि सुखांचा निर्णय करतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४८२ सर्वेषु सुखदुःखेषु सर्वासु कलनासु च ।
मनः कर्तृ मनो भोक्तृ मानसं विद्धि मानवम्॥३।११५।२४

(श्रीवसिष्ठ म्हणतात) हे रामा, सर्व सुखदुःखांचें आणि कल्पनांचें कर्तृत्व आणि भोक्तृत्व मनाकडे आहे. यासाठीं मन म्हणजेच मनुष्य हें लक्षांत ठेव.

४८३ सर्वैव लोकयात्रेयं प्रोता तृष्णावरत्रया ।
रज्जुबन्धाद्विमुच्यन्ते तृष्णाबन्धान्न केचन ॥ ५।१५।२३

हे सर्व लोकसमुदाय तृष्णारूपी चामड्याच्या वादीमध्यें ओवले गेले आहेत. इतर कसल्याही दोरीनें बद्ध झालेला मनुष्य त्या बंधापासून मुक्त होऊं शकतो, परंतु तृष्णेच्या बंधांतून कोणीही सहसा मुक्त होऊं शकत नाहीं.

४८४ सलिलं स्थलतां याति स्थलीभवति वारिभूः ।
विपर्यस्यति सर्वं हि सकाष्ठाम्बुतृणं जगत् ॥ १।२८।९

ज्या ठिकाणीं पाणी आहे, त्या ठिकाणीं कांहीं काळानें भूमि दिसते; व ज्या ठिकाणीं भूमि असते, त्या ठिकाणीं कांहीं दिवसांनीं पाणी दिसूं लागतें. अशारीतीनें काष्ठ, उदक आणि तृण यांनीं युक्त असलेलें जग कालमानानें बदलत असतें.

४८५ सहस्रेभ्यः सहस्रेभ्यः कश्चिदुत्थाय वीर्यवान् ।
भिनत्ति वासनाजालं पञ्जरं केसरी यथा ॥ ७।९४।३९

ज्याप्रमाणें सिंह पिंजऱ्यांतून बाहेर पडतो, त्याप्रमाणें हजारों लोकांतील एखादाच सामर्थ्यवान् पुरुष वासनेचें जाळें तोडून मोकळा होतो.

४८६ साधुसंगतयो लोके सन्मार्गस्य च दीपिकाः ॥ २।१६।९

या जगामध्यें साधूंचा समागम हा सन्मार्ग दाखविणारा दिवा आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४८७ साधूपदिष्टमार्गेण यन्मनोऽङ्गविचेष्टितम् ।
तत्पौरुषं तत्सफलमन्यदुन्मत्तचेष्टितम् ॥ २।४।११

सत्पुरुषांनीं आंखून दिलेल्या मार्गानें काया, वाचा आणि मन यांनीं जें कर्म केलें जातें, तेंच पौरुष होय. अशा पौरुषानेंच फलप्राप्ति होते. याशिवाय केलेलें इतर कर्म उन्मत्त मनुष्याच्या कर्माप्रमाणें निष्फल होतें.

४८८ सिंहवत्सर्ववेगेन पतन्त्यर्थे किलार्थिनः ॥ ३।७८।६

कार्य साधणारे लोक आपल्या कार्यावर सिंहाप्रमाणें एकदम झडप घालीत असतात.

४८९ सीमान्तं सर्वदुःखानामापदां कोशमुत्तमम् ।
बीजं संसारवृक्षाणां प्रज्ञामान्द्यं विनाशयेत् ॥५।१२।२७

सर्व दुःखांची पराकाष्ठा, आपत्तींचें मोठें भांडार, व संसारवृक्षाचें बीज, अशा प्रकारच्या बुद्धिमांद्याचा नाश करावा.

४९० सुनिर्मलापि विस्तीर्णा पावन्यपि हि यौवने ।
मतिः कलुषतामेति प्रावृषीव तरङ्गिणी ॥ १।२०।१८

पावसाळ्यांत नदीचें पाणी गढूळ होतें, त्याप्रमाणें बुद्धि कितीही निर्मल, उदार आणि शुद्ध असली, तरी ती तारुण्यांत मलिन होते.

४९१ सुभगाः सुलभारोहाः फलपल्लवशालिनः ।
जायन्ते तरवो देशे न तु चन्दनपादपाः ॥ १।३३।४०

दिसण्यांत सुंदर आणि चढण्याला सुलभ असे फल आणि पल्लव यांनीं युक्त असलेले वृक्ष सर्वत्र दिसून येतात; परंतु चंदनाचे वृक्ष मात्र विरळा होत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४९२ सुरज्ज्वेव बलीवर्दो बध्यते जन्तुरास्थया ॥ ६।२८।६४

दोरीनें बैल बांधला जातो त्याप्रमाणें आशेच्या योगानें प्राणी बद्ध होतो.

४९३ सुलभो दुर्जनाश्लेषो दुर्लभः सत्समागमः ॥ १।२६।२१

दुर्जनांची संगति सुलभ आहे, परंतु सत्समागम मात्र दुर्लभ आहे.

४९४ सुविरक्तं मुनेश्चेतो रक्तं च विषयार्थिनः ।
रमयन्ति समं रम्या विजना वनभूमयः ॥७।१२०।२९

मुनिजनांचें विरक्त चित्त आणि कामी पुरुषांचें विषयासक्त चित्त या दोहोंना एकांत असलेल्या रम्य वनभूमि सारख्याच आनंद देतात.

४९५ सुसाध्यः करटोद्भेदो मत्तैरावणदन्तिनः ।
नोत्पथप्रतिपन्नानां स्वेन्द्रियाणां विनिग्रहः ॥७।६।४०

इंद्राच्या मत्त ऐरावत हत्तीचें गंडस्थळ सहज फोडतां येईल; परंतु भलत्याच मार्गानें जाणाऱ्या स्वतःच्या इंद्रियांचा निग्रह करणें सुलभ नाहीं.

४९६ सौहार्दं सुजनानां हि दर्शनादेव वर्धते ॥ ३।८२।३७

चांगल्या लोकांची भेट होतांच मैत्री वाढत असते.

४९७ सौहार्देन प्रवृत्तस्य को वाक्यं नाभिनन्दति ॥३।८२।४८

प्रेमानें बोलणाऱ्याच्या भाषणाचें कोण बरें कौतुक करणार नाहीं ?

४९८ स्त्रीलोचनैस्तडित्पुञ्जैर्ज्वालाजालैस्तरङ्गकैः ।
चापलं शिक्षितं ब्रह्मन्छैशवाक्रान्तचेतसः ॥ १।१९।१५

( राम श्रीवसिष्ठांना म्हणतो ) स्त्रियांचे नेत्र, विद्युल्लता, अग्नीच्या ज्वाला, आणि समुद्रावरील लाटा यांनीं बाल्यदशेकडूनच चांचल्याचें शिक्षण घेतलें आहे, असें वाटतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४९९ स्फटिकः प्रतिबिम्बेन यथा याति न रञ्जनम् ।
तज्ज्ञः कर्मफलेनान्तस्तथा नायाति रञ्जनम् ॥६।१२२।६

स्फटिकमणि प्रतिबिंबाच्या योगानें जसा रंगीत होत नाहीं. त्याप्रमाणें ज्ञानी मनुष्य अंतःकरणांत कर्मफलाच्या योगानें कांहींएक विकार पावत नाहीं.

५०० स्वधर्मेण च हिंसैव महाकरुणया समा ॥ ३।८२।४६

स्वधर्माप्रमाणें केलेली हिंसा ही मोठ्या दयेसारखीच आहे.

५०१ स्वया वासनया लोको यद्यत्कर्म करोति यः ।
स तथैव तदाप्नोति नेतरस्येह कर्तृता ॥ ४।१३।११

जगामध्यें आपल्या वासनेप्रमाणें लोक जें जें कर्म करितात, त्या त्या कर्माचेंच फळ ते भोगतात, त्यांत इतरांच्या कर्तृत्वाचा मुळींच संबंध नाहीं.

५०२ स्ववासनानुसारेण सर्व आस्पदमीहते ॥ ३।७३।२९

प्रत्येक प्राणी आपापल्या वासनेप्रमाणेंच स्थानाची इच्छा करितो.

५०३ हरिवक्षोगता लक्ष्मीरपि शोभार्थमेव यत् ।
बिभर्ति कमलं हस्ते कान्याशंसाधिका भवेत् ७।११७।२१

कमल हें इतकें सुंदर आहे कीं, प्रत्यक्ष विष्णूच्या वक्षःस्थळाच्या ठिकाणीं बसणारी, सर्व सौंदर्याची अधिदेवता जी लक्ष्मी तिनें शोभा येण्यासाठीं आपल्या हातांत कमल धारण केलें आहे. दुसरा कोणी यापेक्षां कमलाची अधिक प्रशंसा काय करणार आहे ?

५०४ हस्तं हस्तेन संपीड्य दन्तैर्दन्तान्विचूर्ण्य च ।
अङ्गान्यङ्गैरिवाक्रम्य जयेच्चेन्द्रियशात्रवान् ॥४।२३।५८

हातावर हात चोळून, दांतांनीं दांत चावून, गात्रांनीं गात्रें आवळून धरून, अर्थात् वाटतील ते दृढ प्रयत्न करून इंद्रियरूपी शत्रूंना जिंकून टाकावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



५०५ हृदि यावदहंभावो वारिदः प्रविजृम्भते ।
तावद्विकाससमायाति तृष्णाकुटजमञ्जरी ॥ ४।३३।३०

जोंपर्यंत अंतःकरणरूपी आकाशांत अहंकाररूपी मेघ वावरत आहे तोंपर्यंत तृष्णारूपी कुड्याची वेल विकास पावत असते.

५०६ हृद्गुहावासिचित्तत्त्वं मुख्यं सानातनं वपुः ।
शङ्खचक्रगदाहस्तो गौण आकार आत्मनः ॥ ५।४३।२७

हृदयरूपी गुहेमध्यें वास करणारें चैतन्यतत्त्व हेंच आत्म्याचें मुख्य आणि सनातन शरीर आहे; हातांत शंख, चक्र व गदा हीं असलेला आकार हें मुख्य शरीर नव्हे.

५०७ हृद्याकाशे विवेकार्के शमालोकिनि निर्मले ।
अनर्थसार्थकर्तारो नोद्यन्ति किल केतवः ॥ २।१८।२१

हृदयाकाशांत विवेकरूपी सूर्याचा उदय झाला म्हणजे शांतिरूपी स्वच्छ प्रकाश पडतो; मग अनर्थसूचक कामादि धूमकेतु उदय पावत नाहींत.

५०८ हेलया राजहंसेन यत्कृतं कलकूजितम् ।
न तद्वर्षशतेनापि जानात्याशिक्षितुं बकः ॥ ७।११७।३५

राजहंसानें सहज केलेला मधुर किलबिल शब्द बगळ्याला शंभर वर्षे अभ्यास करूनही करतां येणार नाहीं.

---

यो. वा. ७

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीयोगवासिष्ठसुभाषितानि

## विषयसूची

विषयः क्रमाङ्कः


अज्ञः ४५०

अज्ञानम् ६

अनङ्गः ३६५

अभ्यासः ७ । ४७–४९ । ९५ । ११३ । १५३ । १७६ । २०६ । २२५ । २८४ । ३४६ । ३८९ । ४७६

अविद्या ४१ । ५४

आत्मा ७४ । १५९ । २४१ । २४२ । ३२० । ३७७ । ३७८ । ३८३ । ३८६

आनन्दः ७९

आपद् ५७ । ८१ । ८२ । १२६ । ३६९ । ४४३ । ४५० । ४८९

आयुः १ । २७ । ८४–८६ । १७९ । ३८५ । ४७८

आर्यः ३४९

आलस्यम् ८७

आशा ८८ । ४१२

आस्था ८९ । ४२५ । ४९२

इच्छा ९० । ९१ । २६० । ३२२ । ३५७ । ३७० । ३७३

इन्द्रियम् ९४ । १०१ । १४३ । १६६ । १७० । १८१ । १८५ । २९४ । ३५० । ४९५ । ५०४


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




ईश्वरः ९९ । २४१
उपकारः ११७
उपदेशः ९७ । १०४ । ३५६ । ३७३ । ४३७
कर्म १०५ । १२७ । २४५
कामः ११५ । ४६०
कालः ११७ । ११८ । १२१ । २२४ । २६१ । ३०७ । ४७१
कीर्तिः १
कोपः २८३
गुणः १ । ३८ । १०३ । १३७ । १३८ । १४९ । २३२ । ३३९
गुरुः ९७ । १३९ । २४१
चित्तम् ४४ । १४३ । ३४१ । ४४८
चिन्ता १४६
चेतः १०९ । ४३८ । ४९४
जडः १४९ । ४००
जरा २१ । १५५–१५८ । ३२८
जीवितम् १८२ । ३३९ । ४०३ । ४११ । ४४१ । ४६०
ज्ञः ९२ । १४४
ज्ञप्तिः १०४
ज्ञानम् ७१ । १०५ । १२७ । १७१–१७५ । २३७ । ३२० । ४०७ । ४२७ । ४५२ । ४६३
तत्त्वम् १० । २२७ । ३८३


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




तपः २९।१७८

तृष्णा ३० । ४० । १११ । १२३ । १३४ । १६७ । १८६ । २१० । २२० । २५५ । ४८३ । ५०५

दारिद्र्यम् १९९

दुःखम् १८ । ८९ । २०० । २०२ । २३८ । ३४८ । ४५१ । ४८२ । ४८९

दुर्जनः १२ । २०५ । ४९३

देवः ११०

दैवम् ११९ । १२० । २०१ । २१३–२१५ । २३० । २८६ । २९२ । २९३ । २९५ । ३०५ । ३३६ । ३३७ । ३९० । ४२३

धर्मः २८२ । ५००

धीः २१९ । २२१ । २४१ । २८१ । ४१७

धैर्यम् २४६ । ३३१

ध्यानम् १६ । २८७

नरः १६५ । ३९१

नारी ११५

नीचः १०२

पण्डितः २० । ३७१ । ४८१

परमार्थः १५

पाण्डित्यम् १११

पापम् २८२ । ३५९


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




पुमान् २९०

पुरुषः १०९ । १५० । २५७ । २७८

पुरुषार्थः २१८ । २९१ । ३०४

पौरुषम् १३९ । २१२ । २३२ । २७५ । २९२–२९७ । ३०० । ३०४ । ३३७ । ४२३ । ४३९ । ४७४ । ४८७

प्रज्ञा २१ । १०४ । १४७ । २०४ । २९८–३०० । ३४४ । ३४६ । ३७४ । ४३४ । ४३६ । ४५३ । ४६१ । ४८९

प्राज्ञः ३०६ । ३३७ । ३८२ । ३८३ । ३९२

बद्धः ३११

बन्धः ३१ । ४३ । ६६ । ३१४ । ३२२ । ३४१ । ३४३ । ४१३ । ४५५

बुद्धः ७५ । २८१

बुद्धिः ४६६

बोधः १११ । ३२१ । ४३६

भवः ४६४

भोगः २५८ । २८० । ३२२ । ३२३ । ३९२ । ४०२ । ४१६ । ४२७ । ४४७

मतिः २७१ । २९० । ३५२ । ४९०

मनः २५ । ३६ । ९७ । १३३ । १५० । १५१ । १५४ । १६६ । १८१ । १८२ । १९३ । ३२० । ३२५–३२७ । ३३५ । ३४५ । ३५६ । ४१४ । ४२५ । ४३१ । ४३८ । ४४२ । ४५१ । ४८२


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




मरणम् १४ । १५५ । ३२८ । ३६० । ४०३

महात्मा १९०

महान् १२५ । १४२ । १९१ । २२४ । २२८ । २९४ । ३१३ । ३२९ । ३३० । ३३८ । ३४२ । ३७२ । ३८० । ४०४ । ४४६

माया ६७

मित्रम् २५६

मुक्तः १३६ । २६७

मुक्तिः ६६

मूढः ३ । १४ । ८० । १२९ । १५१ । ३३६–३३८ । ३८३ । ३९९

मूर्खः २५९ । २६५

मृतिः ३३९ । ४४०

मृत्युः २८३ । ३६५ । ४१८

मैत्री १६३ । ४५८

मोक्षः ३१ । १२७ । २३५ । २३७ । २५८ । २६३ । ३११ । ३२२ । ३४० । ३४१ । ४०२ । ४१३

मौर्ख्यम् ८२ । १११ । २०० । २३८ । २४० । ३४३ । ४०५ । ४५०

यत्नः ३४ । २१२ । २३२ । २९६ । ३४६ । ४१९ । ४३९

युक्तिः १२९ । ३८१–३८४ । ४२५

रिपुः ७४


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




लक्ष्मीः २१३

वासना १९२ । १९७ । २०७ । २१६ । २६३ । ३११ । ३७२ । ३९३ । ४१२–४१४ । ४३८ । ४३९ । ४५३ । ५०१ । ५०२

विचारः ६९ । १३२ । १९३ । १९८ । ३४० । ४०२ । ४०६ । ४१५–४१७ । ४६३ । ४६४ । ४६७

विद्वान् ४४०

विमुक्तता ४३ । ३१४ । ४५५ । ४७३

विरागः ३९२

विवेकः २५ । २६ । १०१ । १४५ । १४७ । १६८ । १८६ । २३३ । २५८ । २७८ । ३१७ । ३२० । ३५० । ३५७ । ३८० । ४२२ । ४४१ । ४६१ । ५०७

विषयः ९ । ४२४ । ४२५ । ४३० । ४३१

वैतृष्ण्यम् २७३

वैराग्यम् १९१ । २३९ । २७८ । ३१७ । ४४३

व्यवसायः १२२

शत्रुः २५६

शमः ३४० । ४१५ । ४२९ । ४६३ । ४६४ । ५०७

शान्तः १४० । २४९ । ३२० । ३९४ । ४४५

शास्त्रम् १५ । ३९ । ९७ । २४१ । ३२० । ३७३ । ४२७ । ४३४

शिष्यः ३५ । ५८ । ७८ । १०४


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




शूरः १८१ । २९७ । ४४४
श्रीः २४ । ४११ । ४१५ । ४३० । ४४४
श्रेयः १३ । २४५ । ३२३ । ४२९ । ४६५
संसारः १७ । १३२ । १५३ । १८० । १९८ । २११ । २३९ । २४३ । ४१४ । ४४९–४५३ । ४६१ । ४८० । ४८९
संकल्पः १०७ । २६४ । ३१४ । ४५५ । ४७९
सज्जनः २०३ । २३४ । २५८ । ४३४ । ४५७ । ४७०
सन् ७० । ८३ । १३१ । ३१० । ४१५ । ४५८ । ४६२ । ४६३ । ४९३
संतोषः ३४० । ४०८ । ४१५ । ४६३–४६५
साधुः १५ । ३७ । १०९ । १३५ । १५४ । २४३ । २७२ । २७४ । ३४० । ३७५ । ४६४ । ४८६ । ४८७
सिद्धिः १९ । २९५
सुखम् १ । १८ । ८९ । १२४ । २०२ । २८१ । ३४८ ४४९ । ४६३ । ४६५ । ४८२
सुजनः ४९६
सौहार्दम् ६० । २७६ । ४९६ । ४९७
स्त्री ३३३ । ४९८
स्नेहः ६८ । ७३ । २७७
स्वभावः ११ । २८९ । ३३८ । ३७९
हिंसा ५००


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीभागवतसुभाषितानि

संपादक व भाषांतरकार

विष्णु विनायक परांजपे, पेण

प्रकाशक

केशव भिकाजी ढवळे, गिरगांव–मुंबई

आवृत्ति दुसरी

आषाढ, शके १८५२ सन १९३०

किंमत ३ आणे

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

## सार्थश्रीमहाभारतसुभाषितानि

संपादक—विष्णु विनायक परांजपे, पेण

भाषांतरकार—चिंतामण मोरेश्वर परांजपे,

बी. ए., एल्.एल्. बी.

( १०३२ सुभाषितें, किंमत १२ आणे )

---

## सार्थश्रीरामायणसुभाषितानि

भाषांतरकार—भालचंद्र शंकरशास्त्री देवस्थळी

( ५०२ सुभाषितें, किंमत ८ आणे )

---

## सार्थश्रीयोगवासिष्ठसुभाषितानि

भाषांतरकार—विष्णु विनायक परांजपे

( ५०८ सुभाषितें, किंमत ८ आणे )

---

## सार्थश्रीभागवतसुभाषितानि

भाषांतरकार—विष्णु विनायक परांजपे

( ११७ सुभाषितें, किंमत २ आणे )

---

## सार्थश्रीरामरक्षा

( किंमत १ आणा )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# प्रस्तावना

श्रीभागवत हा पुराणग्रंथांमध्यें प्रसिद्ध ग्रंथ आहे. याचे १२ स्कंध असून श्लोकसंख्या १८ हजार आहे. यांतील निवडक ११७ संस्कृत सुभाषितवचनें प्रस्तुत पुस्तकांत घेतलीं आहेत. आणि प्रत्येक श्लोकाच्याखालीं त्याचें मराठी भाषांतर दिलें आहे. वचनें वर्णक्रमानें लाविलीं असून शेवटीं मुख्य विषयांची सूची जोडिली आहे. वचनांच्या डावीकडे क्रमांक घातले आहेत व उजवीकडे स्थलनिर्देश केला आहे. स्थलनिर्देशांत डावीकडून पहिला अंक स्कंधाचा, दुसरा अध्यायाचा व तिसरा श्लोकाचा समजावा. सूचीमध्यें विषयापुढील अंक हे वचनाचे क्रमांक आहेत.

हीं सुभाषितवचनें सर्वांच्या वाचनांत येवोत अशी श्रीकृष्णपरमात्म्याची प्रार्थना करून प्रस्तावना संपवितों.

ज्येष्ठ, शके १८५१ { विष्णु विनायक परांजपे
रहाणार पेण, जिल्हा कुलाबा

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# निवेदन

श्रीमहाभारत, श्रीरामायण, श्रीयोगवासिष्ठ व श्रीभागवत या राष्ट्रीय व धार्मिक ग्रंथांतील निवडक सुभाषितांचीं मराठी भाषांतरासह चार पुस्तकें प्रकाशित केलीं. हीं पुस्तकें सर्व लोकांना मान्य झाल्यामुळें पहिली आवृत्ति एका वर्षांतच खपून गेली. आतां ही दुसरी आवृत्ति काढिली आहे.

वचन कोणीं कोणाला सांगितलें, हें समजण्याची विशेष अवश्यकता ज्या श्लोकांत दिसून येते, अशा श्लोकांचा अर्थ देतांना आरंभीं कंसांत अवतरण दिलें आहे. अशा अवतरणांची संख्या या आवृत्तींत वाढविली आहे.

धार्मिक शिक्षण देण्याच्या कामीं हीं चारहि सुभाषितांचीं पुस्तकें बरींच उपयोगीं पडतात, असें पुष्कळ पालकांच्या व शिक्षकांच्या प्रत्ययास आलें आहे. तरी सर्व जनतेला या पुस्तकांचा उपयोग होवो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

आषाढ, शके १८५२ प्रकाशक

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

ॐ

# सार्थश्रीभागवतसुभाषितानि

१ अचक्षुरन्धस्य यथाग्रणीः कृतः स्क. अ. श्लो.
तथा जनस्याविदुषोऽबुधो गुरुः ॥ ८ । २४ । ५०

ज्याप्रमाणें आंधळ्या मनुष्यानें आंधळा मनुष्य आपला पुढारी केला असतां त्यापासून कांहींएक उपयोग होत नाहीं, त्याप्रमाणें ज्ञान नसलेल्या लोकांनीं अडाणी गुरु केला असतां त्याचा कांहींएक उपयोग होत नाहीं.

२ अज्ञानादथवा ज्ञानादुत्तमश्लोकनाम यत् ।
संकीर्तितमघं पुंसो दहेदेधो यथानलः ॥ ६।२।१८

ज्याप्रमाणें जाणूनबुजून टाकिलेला किंवा नकळत पडलेला अग्नि काष्ठें जाळून टाकितो, त्याप्रमाणें पवित्र कीर्ति असलेल्या परमेश्वराचें नांव समजून उच्चारिलें किंवा त्याचा सहज उच्चार झाला, तरी तें नांव मनुष्याचें पातक नाहींसें करून टाकितें.

३ अणुभ्यश्च महद्भ्यश्च
शास्त्रेभ्यः कुशलो नरः ।
सर्वतः सारमादद्यात्
पुष्पेभ्य इव षट्पदः ॥ ११।८।१०

ज्याप्रमाणें भ्रमर लहानमोठ्या फुलांतील रस ग्रहण करतो, त्याप्रमाणें विवेकी मनुष्यानें लहानमोठ्या सर्व शास्त्रांतील महत्त्वाचा भाग ग्रहण करावा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४ अण्वप्युपाहृतं भक्तैः प्रेम्णा भूर्येव मे भवेत् ।
भूर्यप्यभक्तोपहृतं न मे तोषाय कल्पते ॥ १०।८१।३

( श्रीकृष्ण सुदाम्याला म्हणाले. ) भक्तांनीं प्रेमानें अर्पण केलेली वस्तू जरी थोडी असली तरी ती मला पुष्कळ वाटते. आणि अभक्तांनीं पुष्कळ वस्तू जरी अर्पण केल्या, तरी त्यापासून मला संतोष होत नाहीं.

५ अनागतमतीतं च वर्तमानमतीन्द्रियम् ।
विप्रकृष्टं व्यवहितं सम्यक् पश्यन्ति योगिनः १०।६१।२१

पुढें होणाऱ्या, पूर्वीं झालेल्या आणि वर्तमानकाळीं इंद्रियांना न समजणाऱ्या, दूर असलेल्या, मध्यें पडदा, भिंत इत्यादि व्यवधान असल्यामुळें न दिसणाऱ्या सर्व वस्तूंना योगी लोक प्रत्यक्ष पाहतात.

६ अनापृष्टमपि ब्रूयुर्गुरवो दीनवत्सलाः ॥ ३।७।३६

दीनांवर दया करणारे गुरु न विचारलेल्यादेखील गोष्टींबद्दल सांगत असतात.

७ अयं हि परमो लाभो नृणां साधुसमागमः ॥ १२।१०।७

साधूंचा समागम घडणें हा मनुष्यांना मोठाच लाभ होय.

८ अरयोऽपि हि संधेयाः सति कार्यार्थगौरवे ।
अहिमूषकवद्देवा ह्यर्थस्य पदवीं गतैः ॥ ८।६।२०

( समुद्रमंथनाचेपूर्वीं दैत्यांशीं सख्य करा, असें भगवान् विष्णूंनीं देवांना सांगितलें. ) देवहो, एखादें मोठें कार्य घडवून आणण्यासाठीं शत्रूंबरोबर सुद्धां मैत्री केली पाहिजे. ती तुम्ही करा आणि तुमचा कार्यभाग झाल्यावर, सर्प उंदरांना गिळून टाकतो त्याप्रमाणें दैत्यांचा नाश करा.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९ असतः श्रीमदान्धस्य दारिद्र्यं परमञ्जनम् ।
आत्मौपम्येन भूतानि दरिद्रः परमीक्षते ॥ १०।१०।१३

संपत्तीच्या मदानें अंध झाल्यामुळें कर्तव्याकर्तव्य न पाहणाऱ्या विवेकशून्य पुरुषाला दारिद्र्य हेंच उत्तम अंजन होय. कारण, दरिद्री पुरुष आपल्यासारखींच दुःखें सर्वांना प्राप्त होत असतील असें निश्चयानें जाणतो.

१० अहं भक्तपराधीनो ह्यस्वतंत्र इव द्विज ॥ ९।४।६३

( श्रीभगवान् विष्णु सुदर्शन चक्रानें पीडित झालेल्या दुर्वास ऋषींना म्हणाले. ) हे ब्राह्मणा, मी भक्ताच्या अधीन आहें, यामुळें तुझ्या रक्षणाविषयीं स्वतंत्र असल्यासारखा नाहीं.

११ अहो दैन्यमहो कष्टं पारक्यैः क्षणभङ्गुरैः ।
यन्नोपकुर्यादस्वार्थैर्मर्त्यैः स्वज्ञातिविग्रहैः ॥ ६।१०।१०

द्रव्य, पुत्रादिक बांधव व शरीर यांची स्थिति अशी आहे कीं, यांचा स्वतःला उपयोग होत नाहीं, यांना कोल्हीं कुत्रीं खाऊन टाकणार व यांचा क्षणाचाही भरंवसा नाहीं. तेव्हां यांच्या योगानें मनुष्यानें कोणावरही उपकार न करणें ही किती तरी दैन्याची व दुःखाची गोष्ट आहे !

१२ आयुः श्रियं यशो धर्मं लोकानाशिष एव च ।
हन्ति श्रेयांसि सर्वाणि पुंसो महदतिक्रमः ॥१०।४।४६

सज्जनांचा छळ केला असतां, मनुष्याचें आयुष्य, संपत्ति, यश, धर्म, उत्तमलोकप्राप्ति. आशीर्वाद, कल्याणकारक गोष्टी या सर्वांचा नाश होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**१३ आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ॥ ११।८।४४**

आशा धरणें हें अतिशय दुःखाचें कारण आहे. आणि आशा नसणें हें परम सुखाचें कारण आहे.

**१४ इन्द्रियाणि जयन्त्याशु निराहारा मनीषिणः ।**
**वर्जयित्वा तु रसनं तन्निरन्नस्य वर्धते ॥ ११।८।२०**

आहाराचा त्याग करणारे विचारी पुरुष रसनेंद्रियाशिवाय बाकीच्या सर्व इंद्रियांना जिंकतात. परंतु अन्नरहित पुरुषाचें रसनेंद्रिय वाढत जातें. ( रसाविषयीं अधिक आसक्ति उत्पन्न होते. )

**१५ ईश्वराणां वचः सत्यं तथैवाचरितं क्वचित् ।**
**तेषां यत्स्ववचोयुक्तं बुद्धिमांस्तत्समाचरेत् १०।३३।३२**
**कुशलाचरितेनैषामिह स्वार्थो न विद्यते ।**
**विपर्ययेण वाऽनर्थो निरहंकारिणां प्रभो ॥ १०।३३।३३**

( शुकाचार्य परीक्षितीला म्हणतात. ) ज्ञानी समर्थ पुरुषांचें भाषण सत्य असतें. उपदेशाप्रमाणें त्यांचें आचरण क्वचित् असतें. म्हणून बुद्धिमान् मनुष्यानें त्यांच्या उपदेशाला अनुसरून असलेल्या आचाराचें आचरण करावें. हे राजा, अशा अहंकार नसलेल्या पुरुषांना धर्माप्रमाणें आचरण करून या लोकीं कांहीं सुखप्राप्ति करून घ्यावयाची नसते, किंवा त्यांच्या हातून अधर्माचरण घडल्यास त्यांना परलोकीं दुःखही प्राप्त होणारें नसतें.

**१६ उत्तमश्चिन्तितं कुर्यात्प्रोक्तकारी तु मध्यमः ।**
**अधमोऽश्रद्धया कुर्यादकर्तोच्चरितं पितुः ॥ ९।१८।४४**

जो मुलगा बापाच्या मनांत असलेलें कार्य करतो तो उत्तम, जो सांगितलेलें करतो तो मध्यम, जो सांगितलेलें अश्रद्धेनें करतो तो कनिष्ठ आणि जो बापाचें सांगणें अश्रद्धेनेंसुद्धां करीत नाहीं, तो केवळ विष्ठेसारखाच होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१७ उद्यतस्य हि कामस्य प्रतिवादो न शस्यते ।
अपि निर्मुक्तसङ्गस्य कामरक्तस्य किं पुनः ॥३।२२।१२

सर्वसंगपरित्याग केलेल्या पुरुषाला देखील स्वतः प्राप्त झालेल्या विषयाचा अव्हेर करणें योग्य नाहीं, मग विषयासक्त पुरुषाला तो कोठून योग्य होईल ?

१८ एकः प्रसूयते जन्तुरेक एव प्रलीयते ।
एकोऽनुभुङ्क्ते सुकृतमेक एव च दुष्कृतम् ॥ १०।४९।२१

प्राणी एकटाच जन्मास येतो, ( स्त्रीपुत्रादिकांसह जन्मास येत नाहीं ) व एकटाच मरण पावतो. तसेंच पुण्याचें फळ सुख, एकटाच भोगतो व पापाचें फळ दुःखसुद्धां एकटाच भोगितो.

१९ एतदेव हि सच्छिष्यैः कर्तव्यं गुरुनिष्कृतम् ।
यद्वै विशुद्धभावेन सर्वार्थात्मार्पणं गुरौ ॥ १०।८०।४१

उत्तम शिष्यांनीं गुरूंच्या उपकारांची फेड हीच करावी कीं, सर्व पुरुषार्थ ज्यापासून प्राप्त होतात, तो देह शुद्धभक्तीनें गुरूंना अर्पण करावा.

२० एतावत्येव शुश्रूषा कार्या पितरि पुत्रकैः ।
बाढमित्यनुमन्येत गौरवेण गुरोर्वचः ॥ ३।२४।१३

मुलांनीं वडिलांची सेवा करावयाची म्हणजे एवढेंच कीं, त्यांच्या आज्ञेचा स्वीकार 'ठीक आहे' अशा बहुमानानें करावयाचा.

२१ एतावानव्ययो धर्मः पुण्यश्लोकैरुपासितः ।
यो भूतशोकहर्षाभ्यामात्मा शोचति हृष्यति ॥६।१०।९

प्राणिमात्राला दुःख झालें असतां, ज्याला स्वतःला दुःख होतें, व प्राणिमात्राचें सुख पाहून ज्याला सुख होतें, अशा पुरुषाचा जो धर्म, तोच अक्षय धर्म होय. कारण सत्कीर्तिमान् लोकांनीं याच धर्माचें आचरण केलें आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२२ एतावान् हि प्रभोरर्थो यद्दीनपरिपालनम् ॥ ८।७।३८

समर्थ पुरुषांचें हेंच कर्तव्य आहे कीं, त्यांनीं दीन जनांचें परिपालन करावें.

२३ एष राज्ञां परो धर्मो ह्यार्तानामार्तिनिग्रहः ॥१।१७।११

पीडित झालेल्या लोकांचें दुःख निवारण करणें हाच राजांचा मुख्य धर्म आहे.

२४ एष वै परमो योगो मनसः संग्रहः स्मृतः ।
हृदयज्ञत्वमन्विच्छन् दम्यस्येवार्वतो मुहुः ॥११।२०।२१

शिक्षण देण्यास योग्य अशा उद्धट घोड्याला शिकवितांना, ज्याप्रमाणें कांहीं वेळ त्याच्या तंत्रानें चालून हळूहळू त्याला योग्य तें वळण लावावें लागतें, त्याप्रमाणें प्रथम कांहीं प्रसंगीं मनाच्या तंत्रानें चालून शेवटीं तें मन पूर्णपणें ताब्यांत आणावें. अशा रीतीनें मनाचा निग्रह करणें हेंच मोठें योगसाधन आहे.

२५ कर्मणा जायते जन्तुः कर्मणैव निलीयते ।
सुखं दुःखं भयं क्षेमं कर्मणैवाभिपद्यते ॥ १०।२४।१३

प्राणी कर्माच्या योगानें उत्पन्न होतो, कर्माच्या योगानें लय पावतो. सुख दुःख, भय, आणि कल्याण हीं सर्वही कर्माच्याच योगानें प्राप्त होतात.

२६ कालो बलीयान्बलिनां भगवानीश्वरोऽव्ययः ।
प्रजाः कालयते क्रीडन् पशुपालो यथा पशून् १०।५१।१९

काल हा सर्व बलिष्ठांमध्यें बलिष्ठ असून अविनाशी भगवान् ईश्वर आहे. तो क्रीडा करीत असतां, ज्याप्रमाणें पशूंचें रक्षण करणारा पशूंना इकडे तिकडे नेतो, त्याप्रमाणें प्रजांची घडामोड करतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



२७ किं विद्यया किं तपसा
किं त्यागेन श्रुतेन वा ।
किं विविक्तेन मौनेन
स्त्रीभिर्यस्य मनो हृतम् ११।२६।१२

ज्याचें मन स्त्रियांनीं आपल्या ताब्यांत ठेविलें आहे, ( जो स्त्रीलंपट झाला आहे ) त्याच्या विद्येचा, तपाचा, त्यागाचा, अध्ययनाचा, एकान्तवासाचा आणि मौनाचा काय उपयोग आहे ?

२८ किं दुर्मर्षं तितिक्षूणां
किमकार्यमसाधुभिः ।
किं न देयं वदान्यानां
कः परः समदर्शिनाम् १०।७२।१९

सहनशील पुरुषांना दुःसह असें कांहींच नाहीं. दुष्टांना अकार्य म्हणून कांहींच नाहीं. ( वाटेल तें दुष्कृत्य करण्याची त्यांची तयारी असते. ) देतां येणार नाहीं असें दानशूर पुरुषांजवळ काय आहे ? ( ते वाटेल ती वस्तू देऊन टाकतील. ) आणि समदृष्टि असलेल्या लोकांना परका असा कोणीच नाहीं.

२९ किं प्रमत्तस्य बहुभिः परोक्षैर्हायनैरिह ।
वरं मुहूर्तं विदितं घटेत श्रेयसे यतः ।। २।१।१२

या लोकीं सावध नसल्यामुळें अविचारानें केवळ विषयसेवनांत एखाद्या मनुष्याचीं पुष्कळ वर्षें निघून गेलीं, तरी त्यांचा काय उपयोग आहे ? त्यापेक्षां ज्ञानानें युक्त अशा दोन घटकाही श्रेष्ठ होत. कारण, मनुष्य त्या दोन घटकांमध्यें स्वहितासाठीं यत्न करतो.



For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३० कोन्वर्थः सुखयत्येनं कामो वा मृत्युरन्तिके ।
आघातं नीयमानस्य वध्यस्येव न तुष्टिदः ॥११।१०।२०

या जीवाच्या संनिध मृत्यु उभा आहे अशा स्थितींत कोणता धनादि पदार्थ किंवा शब्दादि विषय त्याला सुख देणार आहे ? वध्य पुरुषाला वध करण्याच्या जागेकडे नेत असतां, त्यावेळीं माळा, चंदन, मिष्टान्न इत्यादि पदार्थ दिले असतां, ते त्याला सुखदायक होत नाहींत; त्याप्रमाणें पुढें मृत्यु असलेल्या या जीवाला कोणताच पदार्थ संतोष उत्पन्न करीत नाहीं.

३१ कौमार आचरेत्प्राज्ञो धर्मान् भागवतानिह ।
दुर्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थदम् ॥७।६।१

ज्ञात्या पुरुषानें या मनुष्यजन्मामध्येंच व त्यांतूनही कौमारावस्थेमध्येंच भागवतधर्माचें आचरण करावें. कारण, हा मनुष्यजन्म दुर्लभ असून पुरुषार्थ साधून देणारा आहे, तथापि तो अशाश्वत आहे.

३२ गुरुर्न स स्यात्स्वजनो न स स्यात्
पिता न स स्याज्जननी न सा स्यात् ।
दैवं न तत्स्यान्न पतिश्च स स्यात्
न मोचयेद्यः समुपेतमृत्युम् ॥ ५।५।१८

आपल्याजवळ आलेल्या लोकांची मृत्यूपासून ज्याला सुटका करतां येत नाहीं, तो गुरु नव्हे, स्वजन नव्हे, आणि पिता होण्याला योग्य नव्हे, ती माता नव्हे, तें दैवत नव्हे, तो पति नव्हे, ( ज्याला आपलें कर्तव्य बरोबर करतां येत नसेल, त्यानें ती ती पदवी प्राप्त करून घेऊं नये )

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



३३ जन्मलाभः परः पुंसामन्ते नारायणस्मृतिः ॥२।१।६

अंतकाळीं नारायणाची स्मृति होणें हाच मनुष्यजन्म प्राप्त झाल्याचा मोठा लाभ होय.

३४ जातस्य मृत्युर्ध्रुव एष सर्वतः
प्रतिक्रिया यस्य न चेह कॢप्ता ।
लोको यशश्चाथ ततो यदि ह्यमुं
को नाम मृत्युं न वृणीत युक्तम् ॥६।१०।३२

उत्पन्न झालेल्या प्राण्याला तो कोठेंही गेला तरी मृत्यु निःसंशय येणारच. या लोकीं मृत्यु टाळण्याचा उपाय ईश्वरानें निर्माण केला नाहीं. म्हणून या मृत्यूपासून जर इहलोकीं यश आणि परलोकीं स्वर्ग हीं प्राप्त होत असतील, तर या प्राप्त झालेल्या योग्य मृत्यूचा कोण बरें स्वीकार करणार नाहीं ? सर्वही करतीलच.

३५ जिह्वयातिप्रमाथिन्या जनो रसविमोहितः ।
मृत्युमृच्छत्यसद्बुद्धिर्मीनस्तु बडिशैर्यथा ॥ ११।८।१९

ज्याप्रमाणें मासा आमिष लाविलेल्या गळाच्या (लोहकंटकाच्या) योगानें मृत्युमुखीं पडतो, त्याप्रमाणें रससेवनाविषयीं आसक्त झालेला दुर्बुद्धि मनुष्य उच्छृंखल, दुर्जय अशा जिव्हेच्या योगानें मृत्युमुखांत पडतो.

३६ जिह्वां क्वचित्संदशति स्वदद्भिः
तद्वेदनायां कतमाय कुप्येत् ॥ ११।२३।५१

केव्हां तरी मनुष्य आपल्याच दांतांनीं आपली जीभ चावतो, त्यावेळीं होणाऱ्या वेदनांमुळें त्यानें कोणावर रागें भरावें ? (दांतांना रागें भरून ताडण करावें तर आपणांलाच दुसरी पीडा होईल.)

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**३७ जीवितं मरणं जन्तोः**
**गतिः स्वेनैव कर्मणा ।**
**राजंस्ततोऽन्यो नान्यस्य**
**प्रदाता सुखदुःखयोः ॥ १२।६।२५**

( बृहस्पति जनमेजय राजाला सांगतात. ) हे राजा, जिवंत राहणें, मृत्यु येणें, स्वर्गादिलोकांची प्राप्ति होणें हीं सर्व प्राण्याला आपल्या कर्मांच्याच योगानें प्राप्त होत असतात. यासाठीं दुसऱ्याला सुखदुःखें देणारा दुसरा कोणी नाहीं.

**३८ तत्कर्म हरितोषं यत्**
**सा विद्या तन्मतिर्यया ॥ ४।२९।४९**

ज्याच्या योगानें ईश्वराला संतोष होतो तेंच खरें कर्म होय. आणि जिच्या योगानें श्रीहरीकडे बुद्धि लागते, तीच खरी विद्या होय.

**३९ तथारिभिर्न व्यथते शिलीमुखैः**
**शेतेऽर्दिताङ्गो हृदयेन दूयता ।**
**स्वानां यथा वक्रधियां दुरुक्तिभिः**
**दिवानिशं तप्यति मर्मताडितः ॥ ४।३।१९**

ज्याप्रमाणें आपल्या कुटिलबुद्धि बांधवांच्या दुर्भाषणानें मर्मस्थानीं ताडित झालेला पुरुष व्यथित झालेल्या अंतःकरणामुळें रात्रंदिवस संताप पावतो, त्याप्रमाणें शत्रूंनीं बाणांच्या योगानें आंगाचे तुकडे पाडिले तरी संताप पावत नाहीं. कारण, त्याला थोडी तरी झोंप येते, परंतु मर्मभेद झालेल्याला मुळींच चैन पडत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४० तद्वै धनुस्त इषवः स रथो हयास्ते
सोऽहं रथी नृपतयो यत आनमन्ति ।
सर्वं क्षणेन तदभूदसदीशरिक्तं
भस्मन्हुतं कुहकराद्धमिवोप्तमूष्याम् ॥ १।१५।११

( श्रीकृष्ण निजधामास गेल्यानंतर अर्जुनाचा गवळयांनीं पराजय केला त्यासंबंधानें अर्जुन युधिष्ठिरास सांगतो. ) संग्रामाचेवेळीं राजे लोक ज्याला नमस्कार करीत असत, तेंच गांडीव धनुष्य, तेच बाण, तोच अग्नीनें दिलेला दिव्यरथ, तेच घोडे, तोच मी रथी पण हें सर्व साहित्य श्रीकृष्णाचा वियोग झाल्यामुळें एका क्षणांत व्यर्थ झालें! भस्मामध्यें केलेलें हवन, मायावी पुरुषांपासून मिळविलेल्या वस्तु किंवा उखर म्हणजे खाऱ्या जमिनींत पेरलेलें धान्य हीं ज्याप्रमाणें व्यर्थ होतात, त्याप्रमाणें श्रीकृष्णाचें अधिष्ठान नाहींसें झाल्याबरोबर माझें सर्व सामर्थ्य फुकट गेलें.

४१ तप्यन्ते लोकतापेन साधवः प्रायशो जनाः ।
परमाराधनं तद्धि पुरुषस्याखिलात्मनः ॥ ८।७।४४

साधु पुरुष बहुतकरून लोकांच्या दुःखानें स्वतः दुःखी होतात. ( लोकांचें दुःख निवारण करण्यासाठीं स्वतः दुःख भोगितात. ) दुसऱ्याकरितां दुःख सहन करणें हेंच सर्वात्म्या परमेश्वराचें उत्कृष्ट आराधन होय.

४२ तांस्तान्कामान्हरिर्दद्यात् यान् यान् कामयते जनः ।
आराधितो यथैवैष तथा पुंसां फलोदयः ॥ ४।१३।३४

मनुष्य ज्या ज्या विषयांची इच्छा धारण करतो, ते ते विषय श्रीहरि त्याला देतो. जसें हरीचें आराधन करावें, तशीच फलप्राप्ति मनुष्यांना होते.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**४३ तावज्जितेन्द्रियो न स्याद्विजितान्येन्द्रियः पुमान् ।**
**न जयेद्रसनं यावज्जितं सर्वं जिते रसे ॥ ११।८।२१**

इतर इंद्रियें जिंकणाऱ्या पुरुषानें जोंपर्यंत रसनेंद्रिय जिंकिलें नाहीं, तोंपर्यंत तो जितेंद्रियच नव्हे. रसनेंद्रिय जिंकिलें असतां त्यानें सर्व इंद्रियें जिंकिल्यासारखीं आहेत.

**४४ तावत्प्रमोदते स्वर्गे यावत्पुण्यं समाप्यते ।**
**क्षीणपुण्यः पतत्यर्वागनिच्छन्कालचालितः॥११।१०।२६**

प्राणी स्वर्गामध्यें पुण्य संपेपर्यंत विषयांचा उपभोग घेत असतां आनंद पावतो, परंतु पुण्य संपतांच तेथून पडण्याची इच्छा करीत नसतांही, कालानें त्यास पाडिलें म्हणजे तो खालीं पडतो.

**४५ दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षणभङ्गुरः ।**
**तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुण्ठप्रियदर्शनम् ॥ ११।२।२९**

( निमिराजा, कवि हरि इत्यादि नऊ योगेश्वरांना म्हणाला. ) क्षणभंगुर असलेलाही हा मनुष्यदेह जीवांना दुर्लभ आहे; आणि त्या मनुष्यजन्मामध्येंही भगवद्भक्तांचें दर्शन दुर्लभ आहे असें मी मानितों.

**४६ दुष्करः को नु साधूनां दुस्त्यजो वा महात्मनाम् ९।५।१५**

महात्म्या साधूंना करण्यास अथवा टाकण्यास कठीण असें काय आहे? कांहींच नाहीं.

**४७ दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं पिबेज्जलम् ।**
**सत्यपूतां वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत् ॥ ११।१८।१६**

दृष्टीनें पाहून शुद्ध ठरलेल्या जागीं पाऊल टाकावें, वस्त्रानें गाळलेलें पाणी प्यावें, सत्यानें पवित्र अशी वाणी उच्चारावी आणि मनानें विचार करून शुद्ध असेल तेंच आचरण करावें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



४८ द्वावेव चिन्तया मुक्तौ परमानन्द आप्लुतौ ।
यो विमुग्धो जडो बालो यो गुणेभ्यः परं गतः ॥११।९।४

या जगांत ज्यांना चिंता नाहीं, व जे परमानंदांत निमग्न आहेत, असे दोघेजणच आहेत. एक अज्ञानी उद्योगरहित बालक आणि दुसरा परमेश्वराशीं ऐक्य पावलेला गुणातीत साधु.

४९ धर्मव्यतिक्रमो दृष्ट ईश्वराणां च साहसम् ।
तेजीयसां न दोषाय वह्नेः सर्वभुजो यथा ॥१०।३३।३०
नैतत्समाचरेज्जातु मनसापि ह्यनीश्वरः ।
विनश्यत्याचरन्मौढ्याद्यथा रुद्रोऽब्धिजं विषम् ॥
१०।३३।३१

पावित्र असलेल्या सर्वभक्षक अग्नीनें जरी अमंगल पदार्थ जाळून टाकिले तरी त्यामुळें तो जसा अपवित्र होत नाहीं, त्याप्रमाणें तेजस्वी समर्थ पुरुषांच्या हातून धर्ममर्यादांचें उल्लंघन आणि भलत्याच गोष्टी करण्याचें साहस जरी झालें, तरी त्यांना दोष लागत नाहीं. शंकरांनीं कालकूट विष भक्षण केलें, म्हणून दुसरा सामान्य पुरुष तसें करण्यास प्रवृत्त होईल, तर तो जसा नाश पावेल, त्याप्रमाणें मूर्खपणामुळें शास्त्रविरुद्ध कर्म करणारा नाश पावेल. समर्थ नसलेल्या पुरुषानें शास्त्रविरुद्ध कर्म मनानेंही आचरण करूं नये.

५० धर्मार्थकाममोक्षाख्यं य इच्छेच्छ्रेय आत्मनः ।
एकमेव हरेस्तत्र कारणं पादसेवनम् ॥ ४।८।४१

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे पुरुषार्थ साधल्यानें कल्याण प्राप्त होतें. हे कल्याणकारक पुरुषार्थ साधण्यास श्रीहरीच्या चरणांचें सेवन करणें हेंच एक साधन आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**५१ न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।**
**हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥९।१९।१४**

ज्याप्रमाणें अग्नि हा तूप इत्यादि हवनीय द्रव्यांच्या योगानें शांत न होतां अधिकच प्रदीप्त होतो, त्याप्रमाणें विषयांच्या उपभोगानें विषय भोगण्याची इच्छा कधींही शांत होत नाहीं. उलट वाढतच जाते.

**५२ न तथा तप्यते विद्धः पुमान्बाणैः सुमर्मगैः ।**
**यथा तुदन्ति मर्मस्था ह्यसतां परुषेषवः ॥११।२३।३**

मर्मस्थळीं लागलेल्या दुर्जनांच्या कठोर वाग्बाणांनीं पुरुष दुःखानें जसा संतप्त होतो, तसा मर्मस्थानीं लागलेल्या लोहमय खऱ्या बाणांनीं विद्ध झालेलाही पुरुष संतप्त होत नाहीं.

**५३ ननु स्वार्थपरो लोको न वेद परसंकटम् ।**
**यदि वेद न याचेत नेति नाह यदीश्वरः ॥ ६।१०।६**

( देव दधीचि ऋषींना म्हणतात. ) खरोखर स्वार्थाविषयीं तत्पर असलेल्या लोकांना दुसऱ्याचें संकट समजत नाहीं. जर समजेल तर ते याचनाच करणार नाहींत, तसेंच ज्याच्यापाशीं याचना केली, तो जर देण्यास समर्थ असेल व दुसऱ्याचें संकट जाणणारा असेल, तर 'देत नाहीं' असें कधींच म्हणणार नाहीं.

**५४ न वै शूरा विकत्थन्ते दर्शयन्त्येव पौरुषम् ॥ १०।५०।२०**

शूर पुरुष आपली स्वतःची स्तुति करीत नाहींत, तर स्तुतीला कारण असलेला पराक्रमच करून दाखवितात.

**५५ न संरम्भेण सिध्यन्ति सर्वेऽर्थाः सान्त्वया यथा ॥८।६।२४**

सामोपचारानें जशीं कार्यें सिद्ध होतात तशीं रागानें होत नाहींत.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



५६ न सभां प्रविशेत्प्राज्ञः सभ्यदोषाननुस्मरन् ।
अब्रुवन्विब्रुवन्नज्ञो नरः किल्बिषमश्नुते ॥ १०।४४।१०

सभासदांचे दोष जाणणाऱ्या बुद्धिमान् मनुष्यानें आधीं सभेमध्येंच जाऊं नये. कारण, दोष जाणूनहीं न बोलेल, किंवा धर्मपक्षाच्या उलट बोलेल, अथवा विचारिलें असतां मी जाणत नाहीं असें म्हणेल, तर त्याला पाप लागतें.

५७ नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ॥ ६।१।५३

कोणीही एक क्षणभर देखील कर्म केल्यावांचून कधींही राहूं शकत नाहीं.

५८ न ह्यम्मयानि तीर्थानि न देवा मृच्छिलामयाः ।
ते पुनन्त्युरुकालेन दर्शनादेव साधवः ॥ १०।४८।३१

उदकानें युक्त असलेलीं तीर्थें हीं तीर्थें नव्हत, असें नाहीं, त्याचप्रमाणें मातीचे व दगडाचे देव हे देव नव्हत असें नाहीं, परंतु हीं तीर्थें व हे देव पुष्कळ काळपर्यंत सेवा केली असतां पवित्र करतात आणि साधुलोक त्यांचें दर्शन होतांच पवित्र करतात.

५९ नामसंकीर्तनं यस्य
सर्वपापप्रणाशनम् ।
प्रणामो दुःखशमनस्तं
नमामि हरिं परम् ॥ १२।१३।२३

ज्याचें नामसंकीर्तन केलें असतां तें सर्व पातकांचा नाश करितें, व ज्याला नमस्कार केला असतां सकल दुःखांचा नाश होतो, त्या सर्वोत्तम श्रीहरीला मी नमस्कार करितों.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



६० नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं
प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ।
मयानुकूलेन नभस्वतेरितं
पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥ ११।२०।१७

( भगवान् श्रीकृष्ण उद्धवाला सांगतात. ) सर्व उत्कृष्ट फळें प्राप्त करून देण्याचें मुख्य साधन हा नरदेह आहे. हा कोट्यवधि उद्योगांनींही प्राप्त होणारा नाहीं तथापि सहज प्राप्त झाला आहे. ही नरदेहरूपी नौका चांगल्या प्रकारची आहे. गुरु हा तिच्या मधील नावाडी होय. वारा अनुकूल असला म्हणजे नाव चांगल्या तऱ्हेनें चालते त्याप्रमाणें माझें स्मरण केलें असतां मी अनुकूल होऊन प्रेरणा करतों. अशा तऱ्हेची सर्व सामग्री असलेली ही नरदेहरूपी नौका प्राप्त झाली असतां, जो संसाररूपी सागर तरून जात नाहीं, तो आत्मघातकीच समजावा.

६१ नेह चात्यन्तसंवासः कर्हिचित्केनचित्सह ।
राजन्स्वेनापि देहेन किमु जायात्मजादिभिः१०।४९।२०

( अक्रूर धृतराष्ट्र राजाला सांगतो. ) हे राजा, यालोकीं कोणत्याही प्राण्याचा कोणाही प्राण्याबरोबर केव्हांही निरंतर एकत्र सहवास घडत नाहीं. अत्यंत प्रिय असलेल्या आपल्या देहाबरोबर सुद्धां निरंतर सहवास घडत नाहीं, मग स्त्रीपुत्रादिकांबरोबर घडत नाहीं, हें काय सांगावें ?

६२ नैकत्र प्रियसंवासः सुहृदां चित्रकर्मणाम् ।
ओघेन व्यूह्यमानानां प्लवानां स्रोतसो यथा ॥ १०।५।२५

ज्याप्रमाणें उदकप्रवाहाच्या ओघानें वाहून जाणाऱ्या तृणकाष्ठादिकांची स्थिति एके ठिकाणीं घडत नाहीं, त्याप्रमाणें चित्रविचित्र कर्में असणाऱ्या सुहृज्जनांचा प्रिय असलेला समागम एका ठिकाणीं कायमचा घडत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



६३ पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ १०।८१।४

( श्रीकृष्ण सुदाम्याला सांगतात. ) जो कोणी मला पान, फूल, फळ आणि पाणी यांपैकीं कांहींही भक्तीनें अर्पण करतो, त्या शुद्ध अंतःकरणाच्या मनुष्यानें तें भक्तीनें अर्पण केलेलें मी सेवन करतों. ( आनंदानें ग्रहण करतों. )

६४ पथि च्युतं तिष्ठति दिष्टरक्षितं
गृहे स्थितं तद्विहतं विनश्यति ।
जीवत्यनाथोऽपि तदीक्षितो वने
गृहेऽपि गुप्तोस्य हतो न जीवति ॥ ७।२।४०

ईश्वरानें रक्षण केलेली वस्तू मार्गामध्येंही पडली असतां तशीच राहते, तिला कोणी नेत नाहीं. आणि ज्या वस्तूची ईश्वरानें उपेक्षा केली ती घरामध्यें असली तरी नाहींशी होते. त्याचप्रमाणें एखादा पुरुष अनाथ असूनही ईश्वरानें त्याच्यावर कृपादृष्टि ठेविली असतां तो वनामध्येंही जिवंत राहतोच. आणि ईश्वरानें ज्याची उपेक्षा केली तो पुरुष घरामध्यें सुरक्षित असूनही जगत नाहीं.

६५ परोऽप्यपत्यं हितकृद्यथौषधं
स्वदेहजोऽप्यामयवत्सुतोऽहितः ।
छिन्द्यात्तदङ्गं यदुतात्मनोऽहितं
शेषं सुखं जीवति यद्विवर्जनात् ॥ ७।५।३७

परिणामीं हितकारक असणाऱ्या औषधाप्रमाणें एखादा परका पुरुष जर आपला हितकर्ता असेल, तर तो आपलें अपत्यच समजला पाहिजे. आणि प्रत्यक्ष औरस पुत्र असूनही अहित करणारा असेल, तर तो रोगाप्रमाणें शत्रु समजला पाहिजे. फारतर काय, शरीराचा एखादा अवयव आपणांस अपायकारक असेल तर तो तोडून टाकावा. कारण तेवढ्या भागाचा त्याग केला असतां बाकीचें शरीर सुखानें जिवंत राहतें.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



६६ पुत्रदाराप्तबन्धूनां संगमः पान्थसंगमः ॥ ११।१७।५३

पुत्र, स्त्री, आप्त आणि बांधव यांचा समागम केवळ पांथस्थ लोकांच्या सहवासासारखा क्षणिक आहे.

६७ पौरुषं दर्शयन्ति स्म शूरा न बहुभाषिणः ॥१०।७७।१९

शूर पुरुष (युद्धामध्यें) पुष्कळ बोलून न दाखवितां आपला पराक्रमच करून दाखवितात.

६८ प्रभवो ह्यात्मनः स्तोत्रं जुगुप्सन्त्यपि विश्रुताः ४।१५।२५

प्रख्यात असलेले समर्थ पुरुष आपल्या वर्णनीय पराक्रमाचीही स्तुति करवीत नाहींत. स्तुति ऐकण्याचा त्यांस कंटाळा येतो.

६९ प्रायेणाभ्यर्चितो देवो येऽप्रजा गृहमेधिनः ।
कदपत्यभृतं दुःखं ये न विन्दन्ति दुर्भरम् ॥४।१३।४३

जे गृहस्थ निपुत्रिक आहेत त्यांनीं बहुतकरून देवाचें चांगलें पूजन केलें असलें पाहिजे. कारण त्यांना कुपुत्रापासून होणारें अतिशय दुःसह दुःख मुळींच सोसावें लागत नाहीं. (कुसंतानापेक्षां निसंतान बरें.)

७० बन्ध इन्द्रियविक्षेपो मोक्ष एषां च संयमः ॥११।१८।२२

इंद्रियें विषयासक्त होणें हाच बंध व इंद्रियें विषयांपासून आवरून धरणें हाच मोक्ष होय.

७१ ब्राह्मणस्य हि देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते ।
कृच्छ्राय तपसे चेह प्रेत्यानन्तसुखाय च ॥११।१७।४२

ब्राह्मणाचा देह संसारांतील तुच्छ विषय भोगण्यासाठीं नाहीं, तर या लोकीं, जिवंत असेपर्यंत कष्ट करून तप करण्याकरितां, आणि मरण पावल्यानंतर परलोकीं अनंत सुख भोगण्याकरितां आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७२ ब्राह्मणः समदृक् शान्तो दीनानां समुपेक्षकः ।
स्रवते ब्रह्म तस्यापि भिन्नभाण्डात्पयो यथा ॥४।१४।४१

सर्व ठिकाणीं समदृष्टि ठेवणारा व शांत असा ब्राह्मणही जर दीन जनांची उपेक्षा करील, तर त्याचेंही तप ज्याप्रमाणें फुटक्या भांड्यांतून पाणी हळूहळू पाझरून जातें, त्याप्रमाणें उत्तरोत्तर क्षीण होत जाऊन शेवटीं नाहींसें होतें.

७३ ब्रूयुः स्निग्धस्य शिष्यस्य गुरवो गुह्यमप्युत ॥१।१।१८

गुरु प्रेमळ शिष्याला रहस्यही सांगतात.

७४ भयं प्रमत्तस्य वनेष्वपि स्यात्
यतः स आस्ते सहषट्सपत्नः ।
जितेन्द्रियस्यात्मरतेर्बुधस्य
गृहाश्रमः किं नु करोत्यवद्यम् ॥ ५।१।१७

आसक्ति उत्पन्न होईल या भीतीनें इंद्रियें स्वाधीन नसलेला मनुष्य या वनांतून त्या वनांत जरी फिरत राहिला, तथापि तेथें त्याला संसारभय प्राप्त होतेंच. कारण त्याच्याबरोबर कामक्रोधादि सहा शत्रु असतातच. बरें, इंद्रियें जिंकून आत्मस्वरूपीं रममाण असणारा ज्ञाता पुरुष गृहस्थाश्रमांत राहिला, तरी त्याचें काय नुकसान होणार आहे? कांहीं नाहीं.

७५ भूतानामिह संवासः प्रपायामिव सुव्रते ॥ ७।२।२१

( हिरण्यकशिपु आपल्या मातेला म्हणतो. ) हे सुव्रते माते, पाणपोईवर जमलेल्या लोकांचा सहवास जसा क्षणिक असतो, त्याप्रमाणें या लोकामध्यें प्राण्यांचा समागम क्षणिक आहे.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



७६ भूर्यप्यभक्तोपहृतं न मे तोषाय कल्पते ॥११।२७।१८

( श्रीकृष्ण उद्धवाला सांगतात. ) ज्याच्या अंतःकरणांत भक्ति नाहीं त्यानें पुष्कळ उपचार अर्पण केले तरी त्यापासून मला संतोष होत नाहीं.

७७ भौमान् रेणून् स विममे यो विष्णोर्वर्णयेद्गुणान् ८।५।६

श्रीविष्णूचे संपूर्ण गुण जो वर्णन करील, तो भूमीच्या रजःकणांचीही गणना करील.

७८ आतरीशकृतः पाशो नृणां यः स्नेहसंज्ञितः ।
तं दुस्त्यजमहं मन्ये शूराणामपि योगिनाम् १०।८४।६१

( वसुदेव नंदाला म्हणाला. ) हे दादा, स्नेह नांवाचा जो मनुष्यांना पाशच आहे, तो ईश्वरानें निर्माण केलेला असल्यामुळें शूर लोकांना व योगिजनांना देखील तोडण्यास मोठा कठीण आहे असें मी समजतों.

७९ मल्लानामशनिर्नृणां नरवरः स्त्रीणां स्मरो मूर्तिमान्
गोपानां स्वजनोऽसतां क्षितिभुजां शास्ता स्वपित्रोः शिशुः।
मृत्युर्भोजपतेर्विराडविदुषां तत्त्वं परं योगिनां
वृष्णीनां परदेवतेति विदितो रङ्गं गतः साग्रजः ॥
१०।४३।१७

( कंसाच्या रंगमंडपांत असलेल्या सर्व लोकांना त्यांच्या त्यांच्या अभिप्रायाप्रमाणें श्रीकृष्ण भासला. ) चाणूरमुष्टिकादिक मल्लांना वज्र, सामान्य मनुष्यांना श्रेष्ठ पुरुष, स्त्रियांना मूर्तिमंत मदन, नंदादिक गोपांना स्वजन, दुष्ट राजांना शासन करणारा, वसुदेव देवकी यांना बालक, कंसाला मृत्यु, अज्ञ लोकांना मोठाच पराक्रम करणारा, योग्यांना परमात्मतत्त्व आणि यादवांना परमदेवता. याप्रमाणें श्रीकृष्ण बलरामासह रंगमंडपांत शिरला असतां, ज्याच्या त्याच्या भावनेप्रमाणें एकच असून अनेकप्रकारचा भासला.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८० महत्सेवां द्वारमाहुर्विमुक्तेः ॥५।५।२

सत्पुरुषांची सेवा करणें हेंच मुक्तीचें द्वार आहे. असें म्हणतात.

८१ मातरं पितरं वृद्धं भार्यां साध्वीं सुतं शिशुम् ।
गुरुं विप्रं प्रपन्नं च कल्पोऽबिभ्रच्छ्वसन्मृतः ॥ १०।४५।७

जो पुरुष पालनपोषण करण्यास समर्थ असूनही वृद्ध आईबापांचें, पतिव्रता स्त्रीचें, लहान पुत्राचें, गुरूचें, ब्राह्मणाचें, व शरणागताचें रक्षण करीत नाहीं, तो जिवंत असून मेल्यासारखाच होय.

८२ मातरं पितरं भ्रातॄन्सर्वांश्च सुहृदस्तथा ।
घ्नन्ति ह्यसुतृपो लुब्धा राजानः प्रायशो भुवि॥१०।१।६७

आपल्या प्राणांची तृप्ति करणारे व लोभी असलेले राजे बहुतकरून आई, बाप, भाऊ, त्याचप्रमाणें सर्वही मित्र यांचा सुद्धां वध करतात मग इतरांची कथा काय ?

८३ मृत्युर्जन्मवतां वीर देहेन सह जायते ।
अद्य वाब्दशतान्ते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ॥१०।१।३८

( वसुदेव कंसाला म्हणाला. ) हे वीरा, जन्मास आलेल्या प्राण्यांचा मृत्यु देहाबरोबरच उत्पन्न होतो. आज किंवा शंभर वर्षांनीं तरी प्राण्यांना मृत्यु हा निश्चित प्राप्त होणार.

८४ मृत्युर्बुद्धिमताऽपोह्यो यावद्बुद्धिबलोदयम् ।
यद्यसौ न निवर्तेत नापराधोऽस्ति देहिनः ॥१०।१।४८

बुद्धिमान् पुरुषानें आपल्या बुद्धीची व बळाची पराकाष्ठा करून प्राप्त झालेला मृत्यु चुकवावा. प्रयत्न करूनही मृत्यु टाळतां आला नाहीं, तर त्या प्राण्याकडे कांहीं दोष नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८५ य उद्धरेत्करं राजा प्रजा धर्मेष्वशिक्षयन् ।
प्रजानां शमलं भुङ्क्ते भगं च स्वं जहाति सः ॥४।२१।२४

( पृथुराजा सभासदांना म्हणाला. ) जो राजा प्रजांना धर्माविषयीं शिक्षण न देतां त्यांच्यापासून करभार मात्र ग्रहण करितो, त्याला प्रजांचें पाप भोगावें लागतें. आणि तो आपल्या ऐश्वर्यापासून भ्रष्ट होतो.

८६ य उद्यतमनादृत्य कीनाशमभियाचते ।
क्षीयते तद्यशः स्फीतं मानश्चावज्ञया हतः ॥ ३।२२।१३

जो पुरुष न मागतां प्राप्त झालेल्या वस्तूचा अनादर करून पुढें त्या वस्तूची याचना एखाद्या कृपण मनुष्याजवळ करतो, त्या पुरुषाचें यश जरी सर्व ठिकाणीं पसरलेलें असलें तरी तें नाश पावतें, आणि लोकांमध्यें त्याची अवज्ञा होऊन मानखंडनाही होते.

८७ यत्पृथिव्यां व्रीहियवं हिरण्यं पशवः स्त्रियः ।
न दुह्यन्ति मनःप्रीतिं पुंसः कामहतस्य ते ॥ ९।१९।१३

( ययाति देवयानीला म्हणतो. ) तांदूळ, जव, सोनें, पशु, स्त्रिया इत्यादि पृथ्वीवरील सर्व विषय, विषयवासनांनीं ग्रस्त झालेल्या पुरुषाच्या मनाला संतोष देण्यासाठीं कधींही पुरे पडत नाहींत.

८८ यथा प्रयान्ति संयान्ति स्रोतोवेगेन वालुकाः ।
संयुज्यन्ते वियुज्यन्ते तथा कालेन देहिनः ॥ ६।१५।३

ज्याप्रमाणें ( नदीच्या ) प्रवाहवेगानें वाळू एका ठिकाणीं जमते व दूरही जाते. त्याप्रमाणें कालाच्या योगानें प्राण्यांचा समागम आणि वियोग हे घडत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



८९ यदा न कुरुते भावं सर्वभूतेष्वमङ्गलम् ।
समदृष्टेस्तदा पुंसः सर्वाः सुखमया दिशः ॥ ९।१९।१५

जो पुरुष प्राणिमात्राच्या अकल्याणाची इच्छा करीत नाहीं, आणि सर्वत्र समदृष्टि ठेवितो. त्याला सर्वही दिशा सुखमयच होतात.

९० यद्यदाचरति श्रेयानितरस्तत्तदीहते ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ ६।२।४

श्रेष्ठ पुरुष जें जें कर्म करितो, तें तें कर्म इतर लोकही करतात, व तो श्रेष्ठ पुरुष जें शास्त्र प्रमाण मानितो, त्या शास्त्रालाच प्रमाण मानून इतर लोकही वागत असतात.

९१ ययोरात्मसमं वित्तं जन्मैश्वर्याकृतिर्भवः ।
तयोर्विवाहो मैत्री च नोत्तमाधमयोः क्वचित् १०।६०।१५

जात, कूळ, स्वरूपसौंदर्य, संपत्ति, ऐश्वर्य व उत्कर्ष हीं परस्परांना अनुरूप ज्यांच्यामध्यें असतील, त्यांच्यामध्यें विवाहसंबंध घडून येतो व मैत्री जडते. श्रेष्ठ व कनिष्ठ यांच्यामध्यें विवाहसंबंध होत नाहीं व अशा लोकांची मैत्रीही जुळत नाहीं.

९२ यशो यशस्विनां शुद्धं
श्लाघ्या ये गुणिनां गुणाः ।
लोभः स्वल्पोऽपि तान् हन्ति
श्वित्रो रूपमिवेप्सितम् ॥ ११।२३।१६

ज्याप्रमाणें श्वेतकुष्ठाच्या योगानें सुंदर रूपाला कमीपणा येतो, त्याप्रमाणें स्वल्प असलेलाही लोभ यशस्वी पुरुषांच्या निर्मल यशाचा व गुणी पुरुषांच्या स्तुत्य गुणांचा नाश करतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९३ यश्च मूढतमो लोके यश्च बुद्धेः परं गतः ।
तावुभौ सुखमेधेते क्लिश्यत्यन्तरितो जनः ॥ ३।७।१७

देहादिकांच्या ठिकाणीं अत्यंत आसक्त असलेला परममूर्ख व प्रकृतीच्या पलीकडे असलेल्या परमेश्वरस्वरूपाला प्राप्त झालेला ज्ञानी हे दोघे सुखानें राहतात. यांच्या स्थितींच्या मधल्या अवस्थेंत असणारा हा मात्र अतिशय क्लेश भोगितो. ( जो केवळ अज्ञानी तो एक सुखी किंवा जो पूर्ण ज्ञानी तो एक सुखी. परंतु धड ज्ञानी नाहीं व अज्ञानीही नाहीं, तो अतिशय दुःखी असतो. )

९४ यस्य राष्ट्रे प्रजाः सर्वास्त्रस्यन्ते साध्व्यसाधुभिः ।
तस्य मत्तस्य नश्यन्ति कीर्तिरायुर्भगो गतिः॥१।१७।१०

( परीक्षिति राजा गोरूप धारण केलेल्या पृथ्वीला म्हणतो. ) हे साध्वि, ज्या राजाच्या राष्ट्रांतील निरपराधी लोकांना दुष्टांपासून त्रास उत्पन्न होतो, त्या मत्त झालेल्या राजाची कीर्ति, आयुष्य भाग्य व परलोक हीं सर्वही नाश पावतात.

९५ सा दुस्त्यजा दुर्मतिभिर्जीर्यतो या न जीर्यते ।
तां तृष्णां दुःखनिवहां शर्मकामो द्रुतं त्यजेत् ॥९।१९।१६

दुर्बुद्धि असलेल्या पुरुषाला विषयतृष्णा सोडवत नाहीं. तो जरी वृद्ध झाला तरी विषयांची तृष्णा कमी होत नाहीं. या विषयतृष्णेमुळें अतिशय दुःखें प्राप्त होतात, हें जाणून कल्याणेच्छु पुरुषानें हिचा सत्वर त्याग करावा.

९६ यावद्भ्रियेत जठरं तावत्स्वत्वं हि देहिनाम् ।
अधिकं योऽभिमन्येत स स्तेनो दण्डमर्हति ॥७।१४।८

आपलें पोट भरण्यास जितकें अन्न लागेल, तितकेंच अन्न खरोखर आपलें आहे असें म्हणतां येईल. त्यापेक्षां अधिकावर जो आसक्ति ठेवितो, तो केवळ चोर होय. तो दंडाला पात्र होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



९७ योऽनित्येन शरीरेण
सतां गेयं यशो ध्रुवम् ।
नाचिनोति स्वयं कल्पः
स वाच्यः शोच्य एव सः ॥ १०।७२।२०

जो प्राणी स्वतः समर्थ असूनही आपल्या अनित्य शरीरानें साधूंना गायन करण्यास योग्य असें शाश्वत यश संपादन करीत नाहीं, तो निंद्य होय व भाग्यहीनपणामुळें शोक करण्यासही योग्य होय. ( त्याची कीव करावी तितकी थोडीच. )

९८ यो वा अनन्तस्य गुणाननन्तान्
अनुक्रमिष्यन्स तु बालबुद्धिः ।
रजांसि भूमेर्गणयेत्कथंचित्
कालेन नैवाखिलशक्तिधाम्नः ॥११।४।२

जो पुरुष अनंताच्या अनंत गुणांची गणना करण्यास तयार होईल तो मंदबुद्धि समजला पाहिजे. कारण कोणी एखादा महाबुद्धिमान् पुरुष दीर्घकालपर्यंत मोठा प्रयत्न करून कदाचित् भूमीच्या रजःकणांची गणना करील, परंतु सर्व शक्तींचा आश्रय अशा भगवंताच्या गुणांची गणना करण्यास तो समर्थ होणार नाहीं.

९९ राज्ञो हि परमो धर्मः स्वधर्मस्थानुपालनम् ।
शासतोऽन्यान् यथाशास्त्रमनापद्युत्पथानिह ॥११।१७।१६

आपत्काल नसतां भलत्याच मार्गानें ( शास्त्रविरुद्धमार्गानें ) जाणाऱ्या अधार्मिक लोकांस यथाशास्त्र शासन करून स्वधर्मनिष्ठ सज्जनांचें निरंतर पालन करणें हाच राजाचा मुख्य धर्म होय.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१०० लब्ध्वा सुदुर्लभमिदं बहुसंभवान्ते
मानुष्यमर्थदमनित्यमपीह धीरः ।
तूर्णं यतेत न पतेदनुमृत्यु यावत्
निःश्रेयसाय विषयः खलु सर्वतः स्यात्॥ ११।९।२९

अनित्य असूनही सर्व पुरुषार्थ साधून देणारा म्हणूनच अत्यंत दुर्लभ असा नरदेह यालोकीं पुष्कळ जन्म घेतल्यानंतर भाग्यानें प्राप्त झाला असतां, हा वारंवार मरणारा आहे म्हणून जोंपर्यंत हा पडला नाहीं, तोंपर्यंतच धैर्यवान पुरुषानें मोठ्या त्वरेनें मोक्ष मिळविण्यासाठीं यत्न करावा. केवळ विषयसेवन हें श्वानसूकरादिक योनींमध्येंही प्राप्त होतेंच, त्यासाठीं यत्न कशाला ?

१०१ विक्रीडतोऽमृताम्भोधौ किं क्षुद्रैःखातकोदकैः ६।१२।२२

अमृताच्या सागरामध्यें क्रीडा करणाऱ्याला लहानशा खाचेंतील ( खळग्यांतील ) पाण्याचें काय महत्त्व आहे ? कांहींच नाहीं.

१०२ श्रेयः कुर्वन्ति भूतानां साधवो दुस्त्यजासुभिः॥८।२०।७

साधु लोक त्याग करण्यास कठीण अशा प्राणांच्या योगानेंही प्राण्यांवर उपकार करितात.

१०३ षड्वर्गसंयमैकान्ताः सर्वा नियमचोदनाः ॥ ७।१५।२८

सर्वही नियमविधींचें पर्यवसान कामक्रोधादि सहा शत्रूंचें संयमन करण्यामध्येंच आहे.

१०४ संसारेऽस्मिन्क्षणार्धोऽपि सत्सङ्गःशेवधिर्नृणाम् ११।२।३०

एखादा द्रव्याचा निधि प्राप्त झाला असतां जसा आनंद होतो, तसा या संसारामध्यें मनुष्यांना अर्धा क्षणभर सुद्धां घडलेल्या सत्समागमापासून आनंद होतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१०५ संकीर्त्यमानो भगवाननन्तः
श्रुतानुभावो व्यसनं हि पुंसाम् ।
प्रविश्य चित्तं विधुनोत्यशेषं
यथातमोऽर्कोऽभ्रमिवातिवातः ॥ १२।१२।४७

ज्याप्रमाणें सूर्य अंधकाराचा नाश करतो, किंवा प्रचंड वारा मेघांना वितळून नाहींसें करितो, त्याप्रमाणें भगवान् अनंताचें कीर्तन केलें असतां, अथवा त्याचा प्रभाव श्रवण केला असतां तो भगवान् कीर्तन किंवा श्रवण करणाऱ्या मनुष्यांच्या हृदयांत प्रवेश करून त्यांचीं सर्व दुःखें नाहींशी करितो.

१०६ संनिकर्षोऽत्र मर्त्यानामनादरणकारणम् ।
गाङ्गं हित्वा यथान्याम्भस्तत्रत्यो याति शुद्धये ॥
१०।८४।३१

या लोकीं अत्यंत सहवास असला म्हणजे मनुष्यांना अनादर उत्पन्न होतो. गंगेच्या तीरीं राहणारा मनुष्य शुद्धतेसाठीं गंगोदक सोडून दुसऱ्या तीर्थाच्या उदकाकडे जात असतो.

१०७ संभावितस्य स्वजनात्पराभवो
यदा स सद्यो मरणाय कल्पते ॥ ४।३।२५

संभावित मनुष्याचा आप्तजनांकडून अपमान झाला म्हणजे त्याचवेळीं त्याला तो अपमान मरणासारखा वाटतो. (अपमानापेक्षां मरण बरें, असें त्याला होतें.)

१०८ सर्वार्थसंभवो देहो जनितः पोषितो यतः ।
न तयोर्याति निर्वेशं पित्रोर्मर्त्यः शतायुषा ॥१०।४५।५

सर्व पुरुषार्थ संपादन करून देणारा देह ज्यांच्यापासून उत्पन्न झाला, व ज्यांनीं त्याचें पोषण केलें, त्या आईबापांचें ऋण फेडणें हें शंभर वर्षें जगूनही घडत नाहीं.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



१०९ सर्वाश्रमानुपादाय स्वाश्रमेण कलत्रवान् ।
व्यसनार्णवमत्येति जलयानैर्यथार्णवम् ॥३।१४।१७

ज्याप्रमाणें नावाडी नौकेच्या योगानें दुसऱ्या लोकांसह समुद्रांतून तरून जातो, त्याप्रमाणें सपत्नीक पुरुष आपल्या गृहस्थाश्रमाच्या योगानें इतर आश्रमी लोकांस बरोबर घेऊन ( त्यांना अन्नवस्त्रादिक देऊन ) संकटरूपी सागरांतून तरून जातो.

११० सर्वाः समुद्धरेद्राजा पितेव व्यसनात्प्रजाः ॥११।१७।४५

ज्याप्रमाणें बाप आपल्या मुलांना संकटांतून सोडवितो, त्याप्रमाणें राजानें आपल्या प्रजांना संकटांतून सोडवावें.

१११ साधवो हृदयं मह्यं साधूनां हृदयं त्वहम् ।
मदन्यत्ते न जानन्ति नाहं तेभ्यो मनागपि ॥ ९।४।६८

( भगवान् विष्णु दुर्वास ऋषींना म्हणाले. ) साधु हे माझें हृदय आहेत ( साधु हे मला फार प्रिय आहेत ) आणि मी साधूंचें हृदय आहें ( मी त्यांना फार प्रिय आहें ) कारण ते माझ्याहून दुसरी प्रिय वस्तु कोणतीही जाणत नाहींत आणि मीही त्यांच्याहून प्रिय असलेली दुसरी स्वल्पही वस्तू जाणत नाहीं.

११२ साधुषु प्रहितं तेजः प्रहर्तुः कुरुतेऽशिवम् ॥ ९।४।६९

साधूंवर गाजविलेला प्रभाव प्रहार करणाऱ्याचेंच अकल्याण करितो.

११३ सुखदुःखदो न चान्योऽस्ति
यतः स्वकृतभुक् पुमान् ॥ १०।५४।३८

मनुष्याला सुख किंवा दुःख देणारा दुसरा कोणीच नाहीं. तर तो आपण स्वतः केलेल्या कर्मानेंच सुख किंवा दुःख भोगीत असतो.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



**११४ सुलभा युधि विप्रर्षे ह्यनिवृत्तास्तनुत्यजः ।**
**न तथा तीर्थ आयाते श्रद्धया ये धनत्यजः ॥ ८।२०।९**

( बली शुक्राचार्यांना सांगतो. ) हे ब्रह्मर्षे, युद्धामध्यें परत न फिरतां देहाचा त्याग करणारे लोक या लोकीं जसे पुष्कळ आढळतात, तसे सत्पात्रीं श्रद्धापूर्वक द्रव्य देणारे लोक पुष्कळ आढळत नाहींत.

**११५ स्त्रीषु नर्म विवाहे च**
**वृत्त्यर्थे प्राणसंकटे ।**
**गोब्राह्मणार्थे हिंसायां**
**नानृतं स्याज्जुगुप्सितम् ॥ ८।१९।४३**

स्त्रियांना अधीन ठेवणें, विनोद, विवाह, उपजीविका, प्राणसंकट, गोब्राह्मणांचें हित, आणि हिंसा टाळणें या प्रसंगीं असत्य भाषण केलें असतां तें निंद्य ठरत नाहीं.

**११६ स्नेहानुबन्धो बन्धूनां मुनेरपि सुदुस्त्यजः ॥ १०।४७।५**

बांधवांच्या स्नेहाचा संबंध सोडून देणें, हें एखाद्या मननशील मुनीला देखील कठीण जातें.

**११७ स्वयं हि तीर्थानि पुनन्ति सन्तः ॥ १।१९।८**

सत्पुरुष तीर्थांना स्वतः पवित्र करीत असतात.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

# सार्थश्रीभागवतसुभाषितानि

## विषयसूची


| विषयः | क्रमाङ्कः | विषयः | क्रमाङ्कः |
|---|---|---|---|
| अनृतम् | ११५ | कालः | २६ । ४४ |
| अपत्यम् | ६५।६९ | गुणः | ७७ । ९२ । ९८ |
| अर्थः | ८।५०।५५ | गुरुः | १ । ६ । १९ । २० । ३२ । ६० । ७३ । ८१ |
| असन् | ९।५२ | गृहस्थाश्रमः | ६९।७४ |
| असाधुः | २८ | चिन्ता | ४८ |
| आनन्दः | ४८ | जननी | ३२ |
| आयुः | १२।९४ | जीवितम् | ३७ |
| आशा | १३ | तपः | २७ । ७१ |
| इन्द्रियम् | १४ । ४३ । ७० । ७४ | तीर्थम् | ५८ । ११४ । ११७ |
| ईश्वरः | १५ । ४० । ४९ । ५३ | तृष्णा | ९५ |
| उपकारः | ११ | दण्डः | ९६ |
| कर्म | २५ । ३७ । ३८ । ५७ | दारिद्र्यम् | ९ |
| कलत्रम् | १०९ | दिष्टम् | ६४ |
| कामः | १७।३०।४२।५०।५१। ७१ । ८७ । ८८ | दीनः | २२ । ७२ |


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir




दुःखम् १३ । २५ । ३७ । ६९ । ९५ । ११३
दुरुक्तिः ३९
देहः ( मानुषः ) ३१ । ३३। ४५ । ६० । ६१ । ७१ । १००
धर्मः १२ । २१ । ३१। ४९ । ५०
पातिः ३२
पिता ३२ । ८१ । ८२ । १०८
पुत्रः १६ । २०
पौरुषम् ५४ । ६७
प्रभुः २२ । ६८
बन्धः ७०
ब्राह्मणः ७१ । ७२ । ११५
भक्तः ४ । १० । ७६
भक्तिः ६३
भवः ६०
मनः २४ । २७ । ४७ । ८७
मरणम् ३७ । १०७
महान् १२ । ४६ । ८०
मृत्युः ३२ । ३४ । ३५ । ८३ । ८४
मैत्री ९१
मोक्षः ७० । ८०
यशः १२ । ८६ । ९२ । ९७
याचना ५३
योगः २४
योगी ५ । ७८
रसनम् १४ । ४३
राजा २३ । ८२ । ८५ । ९४ । ९९ । ११०
लाभः ७ । ३३
लोभः ९२
विद्या २७ । ३८
विवाहः ९१ । ११५
शिष्यः १९ । ७३
शूरः ५४ । ६७ । ७८


For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir



श्रीः ९।१२
श्रेयः २९।५०।१००।१०२
श्रेयान् ९०
संवासः ६१।६२।७५
संकटम् ५३
संगमः ६६
सन् १०४।११७
सभा ५६
समदृक् २८।७२।८९
साधुः ७।४१।४६।५८।
१०२।१११।११२
सुखम् १३।२५।३०।३७
७१।८९।९३।११३
स्तेनः ९६
स्त्री २७।११५
स्नेहः ७८।११६
स्वार्थः ५३
हिंसा ११५

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मुद्रक—रा. रा. रघुनाथ रामचंद्र बखले, मुंबईवैभव प्रेस,
सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, गिरगांव, मुंबई.

प्रकाशक—केशव भिकाजी ढवळे, ( रामचंद्र बिल्डिंग )
गिरगांव, मुंबई.

For Private And Personal Use Only

Shri Mahavir Jain Aradhana Kendra www.kobatirth.org Acharya Shri Kailassagarsuri Gyanmandir

Serving JinShasan
092555
gyanmandir@kobatirth.org

For Private And Personal Use Only